रशियन कथा

भाग २

रशियन कथा

भाग २

रादुगा प्रकाशन · मॉस्को

लोकवाङ्मय गृह प्रा. लि. मुंबई

अनुवाद : अनिल हवालदार
सजावट : वा. कोझ्लोव
चित्रे : से. सेम्योनोव

Антология русского рассказа в 2-х т.т.
Том 2
На языке маратхи

ANTHOLOGY OF RUSSIAN SHORT STORIES
In 2 Vols. Vol. 2 Classics of Russian Literature
In Marathi

© कथा, लेखकांचा परिचय, मराठी
अनुवाद, रादुगा प्रकाशन, १९८७
सोविएत संघात मुद्रीत

ISBN 5-05-001322-4
ISBN 5-05-001324-0

अनुक्रमणिका

मार्क्सिम गोर्की : व्ला. इ. लेनिन 5
अलेक्सान्द्र मालीश्किन : दक्षिणेकडे जाणारी आगगाडी 33
आंद्रेय प्लातोनोव : फ्रो 59
अलेक्सेय तल्स्तोय : रशियन स्वभाव 91
कॉन्स्तन्तिन सीमोनोव: तिसरा ॲड्‌जूटन्ट 105
मिखायल शोलोखोव : माणसाचे दैव 119
व्लादीमिर बोगोमोलोव : पहिले प्रेम 165
विक्तर अस्ताफ्येव : बायकोचे हात 173
वालेन्तिन रासपूतिन : फ्रेंचचा धडा 197
यूरी नगीबिन : नवा नवरा 237
यूरी कझाकोव : दोघे डिसेंबरात 259
व्लादीमिर सोलोऊखिन : वार्वारा इवानोवना 275
वासिली ब्येलोव : टेकडचा 285
वासिली शुकशीन : हट्टी 291
फ्योदोर अब्रामोव : सर्वसुखी 315
येवगेनी नोसोव : जिवंत ज्वाला 321
कॉन्स्तन्तिन पाऊस्तोवस्की : रशियाच्या गाभ्यात 327

माक्सिम गोर्की

व्ला. इ. लेनिन

माक्सिम गोर्की (१८६८-१९३६). साहित्यात समाजसत्तावादी वास्तववादाला प्रथम आणणारे माक्सिम गोर्की सोविएत संघाच्या लेखक संघाचे पहिले अध्यक्ष होते व त्यांच्याच पुढाकाराने लेखक संघाची स्थापना झाली होती. १९१७ च्या ऑक्टोबर क्रांतीनंतर सार्वत्रिक सांस्कृतिक विकासाच्या आणि प्रबोधनाच्या सरकारी कार्यक्रमाला गोर्की यांनी मनःपूर्वक पाठिंबा दिला. गोर्कींच्या व्यक्तिमत्त्वाचा हितकारक लाभ अनुभवला नाही असा जुन्या पिढीतील सोविएत लेखक क्वचितच आढळेल. उमलत्या लेखकाला स्वतः-च्या गुणांविषयी वाटणाऱ्या अनिश्चिततेमधून उद्भवणाऱ्या अनावश्यक चुका आणि चंचलता टाळण्यासाठी त्याच्या कारकीर्दीच्या आरंभीच्या व सर्वांत अवघड वर्षांमध्ये गोर्कींनी शब्दाने अथवा कृतीने मदत न केलेला सोविएत लेखक जुन्या पिढीत क्वचित आढळेल.

अनेक मासिकांची व प्रकाशनगृहांची गोर्कींनी स्थापना केली (सोविएत वाचकाला सर्वोत्तम जागतिक अभिजात साहित्याची ओळख करून देणाऱ्या 'व्सेमिरनाया लितेरातूरा' प्रकाशनगृहासकट) आणि १३ साहित्यिक नियतकालिकांचे संपादन केले.

गोर्की जगातील पहिले कामगारवर्गीय लेखक होते; जगातील सर्व प्रमुख राजकीय घडामोडींची त्यांनी नोंद घेतली. 'संस्कृतीच्या प्रभूंनो, तुम्ही कुणाच्या बाजूचे आहात?' ह्या जागतिक बुद्धिमंतांना उद्देशून १९३२ साली प्रकाशित केलेल्या लेखामधून त्यांनी फॅसिझमविरोधी पहिला आवाज उठविला होता.

सोविएत काळात गोर्कींची प्रकाशने: 'आर्तामोनोव आणि त्यांची मुले' (१९२५), कादंबरी; 'येगोर ब्रूलीच्योव व इतर' (१९३२), 'दस्तीगायेव व इतर' (१९३३), 'वास्सा झेलेझ्नोवा' (१९३५), नाटके; आणि सैद्धांतिक व सामाजिक संघर्षाला अटळपणे तोंड फुटणार होते त्या क्रांतीपूर्वीच्या दशकांमधील रशियन जीवनाचे विस्तीर्ण दर्शन घडविणारी कादंबरी 'क्लिम सामगिनचे आयुष्य' (१९३६).

व्लादीमिर लेनिन वारले.

त्यांच्या कट्टर शत्रूंपैकीसुद्धा काहीजण प्रामाणिकपणे कबूल करतात : लेनिन यांच्या रूपाने जग अशा एका माणसाला मुकले, "ज्याच्यात आजच्या सर्व थोर माणसांपेक्षा अधिक तेजस्वी बुद्धिमत्ता सामावली होती."

...त्यांच्या मृत्यूनंतर ताबडतोब मी जे काही लिहिले होते ते निराशेच्या मन:स्थितीत, घाईघाईने आणि वाईट लिहिले होते. काही अशा गोष्टी होत्या ज्या "व्यवहारचातुर्या" पायी नमूद करणे मला शक्य नव्हते ; आशा आहे की हे समजून घेण्यात येईल. हा माणूस दूरदर्शी आणि शहाणा होता व "मोठ्या शहाणपणात मोठे दु:ख सामावलेले असते."

ते खूप पुढचे पहात होते आणि १९१९-१९२१ ह्या काळातील माणसांबद्दल विचार करताना व बोलताना, त्यापुढील काही वर्षांनंतर ती माणसे कशी असतील ह्याविषयी अनेकदा अचूक भाकीत करीत होते. त्यांच्या भाकीतांवर नेहमी विश्वास ठेवावासा वाटत नसे, कारण अनेकवेळा ती निरुत्साही करणारी असत, पण दुर्दैवाने अनेक माणसांनी त्यांचे संशय खरे ठरविले. त्यांच्याबद्दलच्या माझ्या आठवणी वाईट पद्धतीने लिहिलेल्या तर आहेतच, शिवाय त्यांच्यात कालक्रम नाही व काही खेदजनक रिकाम्या जागा आहेत. लंडन काँग्रेसपासून मी आरंभ करायला पाहिजे होते, जेव्हा काही लोक संशयाने आणि अविश्वासाने पहात होते व काही लोक उघड वैरभावनेने आणि द्वेषाने पहात होते, अशा स्वरूपातील व्लादीमिर इल्यिच माझ्यासमोर उभे होते.

लंडनच्या उपनगरातील विचित्र कळकट लाकडी चर्चमधील त्या बोडक्या भिंती, भिकार शाळेतील वर्गाप्रमाणे भासणाऱ्या छोट्या अरुंद हॉलच्या बाणाकृती खिडक्या मी आत्तासुद्धा स्पष्ट पाहू शकतो. ती इमारत केवळ बाहेरून चर्चसारखी दिसत होती. आतमध्ये धार्मिक बाबींचा लवलेशसुद्धा नव्हता व सखल व्यासपीठ हॉलच्या मागील बाजूस नव्हते, तर दोन दारांच्या दरम्यान होते.

त्या वर्षापर्यंत लेनिन यांना मी कधीही भेटलो नव्हतो अथवा त्यांचे लेखन जेवढे वाचायला पाहिजे होते, तेवढे वाचलेले नव्हते. तरीसुद्धा, त्यांचे जे काही लिखाण मी वाचले होते त्यामुळे आणि त्यांना प्रत्यक्ष भेटलेल्या लोकांनी सांगितलेल्या उत्साही हकीकतींमुळे मी त्यांच्याकडे फार आकर्षित झालो होतो. जेव्हा आमची ओळख करून देण्यात आली, तेव्हा त्यांनी माझा हात गच्च पकडला, त्यांच्या भेदक डोळयांनी माझा ठाव घेतला आणि जणू जुना स्नेही असल्याप्रमाणे विनोदी स्वरात ते म्हणाले :

"तुम्ही आलात हे छान झालं! तुम्हाला मारामाऱ्या आवडतात म्हणे? इथं जोरदार मारामारी होणार आहे."

लेनिन यांच्याविषयी मी मनात वेगळे चित्र रेखाटले होते. त्यांच्यात काहीतरी अभाव असल्याचे मला जाणवत होते. त्यांचा 'र'चा अस्पष्ट उच्चार आणि काखेत अंगठे खुपसण्याची त्यांची ढब ह्यामुळे ते अक्कडबाज भासत होते. ते फारच सामान्य होते, त्यांच्यात "पुढारी" मुळीच नव्हता. मी लेखक आहे आणि तपशीलांची नोंद घेणे माझे काम आहे. ही सवय बनलीय आणि काहीवेळा ती त्रासदायक ठरते.

जेव्हा मला गे. वा. प्लेखानोव यांच्यापुढे "सादर" करण्यात आले, तेव्हा हातांची घडी घालून कठोर नजरेने ते माझ्याकडे पहात राहिले; एखादा थकलेला मास्तर आणखी एका नव्या विद्यार्थ्याकडे बघतो, तसा कंटाळलेला भाव त्यांच्या मुद्रेवर होता. अत्यंत ठरीव वाक्य ते माझ्याशी बोलले: "तुमच्या गुणांचा मी चाहता आहे." माझ्या आठवणीत राहील असे ह्याशिवाय दुसरे ते काहीही बोलले नाहीत. एकमेकांशी "मन:पूर्वक" बोलण्याची त्यांना अथवा मला सबंध काँग्रेसच्या दरम्यान कधीही इच्छा झाली नाही.

पण हा टक्कलवाला, 'र'चा बोबडा उच्चार करणारा, दणकट शरीरयष्टीचा माणूस एका हाताने स्वतःचे भव्य कपाळ चोळीत आणि दुसऱ्या हाताने माझा हात दाबीत एकदम बोलू लागला होता; त्याच्या विलक्षण सावध डोळ्यांमध्ये प्रेमळ चमक उमटली होती. इ. प. लादीझ-नीकोव यांच्याकडून त्यांनी माझ्या 'आई' पुस्तकाचे हस्तलिखित घेऊन वाचले होते आणि त्यातील उणीवांवर आता ते माझ्याशी बोलत होते. मी त्यांना सांगितले की, पुस्तक लिहिताना माझी घाई झाली होती, पण त्यामागील कारणाचा मी खुलासा करण्यापूर्वीच लेनिन यांनी समंज-सपणे मान हलविली आणि स्वतःच कारण सांगितले: मी लिहिण्याची घाई केली हे छानच झाले, कारण त्या पुस्तकाची फार गरज होती. अनेक कामगारांनी अजाणता, केवळ उत्स्फूर्तपणे क्रांती-चळवळीत भाग घेतला होता व आता 'आई'चे वाचन त्यांना खूप उपयुक्त ठरेल.

"अगदी योग्य वेळेचे पुस्तक!" त्यांनी फक्त एवढेच कौतुकाचे उद्‌गार काढले, पण मला ते खूप मौल्यवान होते. त्यानंतर त्यांनी मला सरळ व्यावहारिक प्रश्न विचारले की, 'आई'चे इतर कुठल्या भाषांमध्ये अनुवाद झालेत अथवा नाही, आणि रशियन व अमेरिकन सेन्सॉरनी पुस्तकाची कितपत नासाडी केली होती. जेव्हा मी त्यांना सांगितले की, लेखकावर खटला भरण्यात येणार आहे, तेव्हा त्यांनी कपाळाला आठ्या घातल्या, मग डोक्याला मागे झटका दिला, डोळे मिटले व विलक्षण रीतीने ते खो खो हसले...

व्लादीमिर इल्यिच घाईघाईने व्यासपीठावर चढले. त्यांच्या बोबड्या 'र'मुळे ते वाईट वक्ते आहेत असे भासायचे, पण अवघ्या एका मिनि-टाच्या आत इतरांप्रमाणे मीही पूर्ण गुंगून गेलो. अत्यंत अवघड राजकीय प्रश्नांचा एवढ्या साध्या रीतीने कुणी उहापोह करू शकतो, ह्याची मला पूर्वी कधीही कल्पना नव्हती. वक्ता अलंकारिक वाक्यांची उधळण कर-णारा नव्हता. प्रत्येक शब्दाची विलक्षण सहजतेने फोड करून ते सांगत होते. त्यांनी निर्माण केलेल्या असाधारण ठशाचे वर्णन करणे फार अवघड आहे.

लांब केलेल्या आणि किंचित उंचावलेल्या हाताने जणू ते प्रत्येक शब्द तोलत होते, त्यांच्या विरोधकांच्या वाक्यांना चाळत होते आणि

वजनदार युक्तिवाद सादर करून सिद्ध करत होते की, कामगारवर्गाने उदारमतवादी भांडवलदारांच्या पिछाडीला अथवा अग्रभागी न राहता स्वतःच्या मार्गाने प्रवास करणे योग्य आहे, तसे करणे त्याचे कर्तव्य आहे. ते सर्व अत्यंत असाधारण होते आणि केवळ स्वतःचे मत म्हणून नव्हे, तर इतिहासाचे सांगणे म्हणून ते बोलत होते, असे वाटत होते. त्यांच्या भाषणातील बंदिस्तपणा, प्रांजलपणा आणि आवेश, व्यासपीठावरील त्यांची उभे राहण्याची ढब, साक्षात अभिजात कलाकृती होती. अनावश्यक असे काहीही नव्हते, शोभेपुरते काही नव्हते आणि तसे जर काही असलेच तर ते दिसत नव्हते, कारण चेहऱ्याला दोन डोळे असणे अथवा हाताला पाच बोटे असणे जेवढे स्वाभाविक, तेवढेच त्यांचे शब्दालंकार स्वाभाविक आणि अपरिहार्य होते.

त्यांच्या आधीच्या वक्त्यांपेक्षा ते कमी बोलले, पण त्यांच्या भाषणाचा प्रभाव इतरांपेक्षा फार मोठा होता. मला केवळ एकट्यालाच असे जाणवले नव्हते, कारण माझ्यापाठी मी कौतुकाची कुजबुज ऐकली :

"फार नेटकी मांडणी केली!"

आणि खरेच तसे होते, कारण त्यांच्या प्रत्येक युक्तिवादापाठी आंतरिक आधार होता.

लेनिन यांचे भाषण अप्रिय वाटल्याचे आणि ते स्वतः अधिकच अप्रिय वाटल्याचे प्रकट करण्यास मेन्शेविक मुळीच कचरले नाहीत. क्रांतिकारक विचारसरणीला व्यवहाराच्या कसोटीला लावण्यासाठी पक्षाने त्या विचारसरणीच्या उच्चतम टोकाला जाण्याची गरज आहे ही गोष्ट त्यांनी जेवढ्या जास्त खात्रीलायकपणे सिद्ध करून दिली, तेवढ्या जास्त दुष्टपणे मेन्शेविकांनी त्यांच्या भाषणात अडथळे आणले :

"काँग्रेस ही तत्त्वविवेचनाची जागा नव्हे!"

"आम्हाला शिकवायचा प्रयत्न करू नका! आम्ही शाळकरी मुलं नव्हेत!"

त्या ओरडणाऱ्यांमध्ये दुकानदारी चेहऱ्याचा एक धिप्पाड, दाढीवाला सर्वांत वाईट होता. आसनावरून ताडकन उठत तो अडखळत ओरडला :

"का – ट... वाले... कार... स्थान तु-म-चा ख-खेळ! तुम्ही ब्लांकीस्ट* आ-हा-त!"

लेनिन यांच्या शब्दांना रोझा ल्यूक्झेंबुर्ग यांनी संमतीदर्शक मान डोलावली आणि नंतरच्या एका बैठकीत त्या मेन्शेविकांना म्हणाल्या:

"तुम्ही मार्क्सवादी भूमिकांमध्ये उभे रहात नाहीत, तुम्ही त्यांच्यावर बसता, लोळतासुद्धा."

हॉलमध्ये गरम, चिडकी, उपहासाची आणि द्वेषाची लाट उसळली. व्लादीमिर इल्यिच लेनिन यांच्यावर शेकडो डोळे खिळले होते, त्यांना वेगवेगळया रूपांमध्ये पहात होते. विरोधी उद्‌गार त्यांना विचलीत करीत नव्हते, ते स्पष्टपणे बोलत होते आणि मुळीच डगमगले नव्हते. ह्या बाह्य संयमाची त्यांना केवढी किंमत मोजावी लागली, ती काही दिवसांनंतर मला समजली. केवळ सैद्धांतिक शिखरांवरून पक्षाला स्वत:मधील मतभेदाची कारणे स्पष्ट दिसू शकत होती, ह्या स्वयंसिद्ध सत्यामुळे ही वैरभावना निर्माण झाली होती हे पाहणे विचित्र होते व दु:खदायी होते. माझे मत अधिकाधिक ठाम होत चालले होते की, कॉंग्रेसचा प्रत्येक दिवस व्लादीमिर इल्यिचना जास्त जास्त ताकद देत होता व त्यांची स्वत:बद्दलची खात्री वाढवत होता. दर दिवसागणिक त्यांची भाषणे अधिक खंबीर बनत होती आणि कॉंग्रेसमधील संपूर्ण बोल्शेविक विभाग जास्त ठाम मन:स्थितीत होता. रोझा ल्यूक्झेंबुर्ग यांच्या मेन्शेविकांविरोधी सुरेख, जोरदार भाषणानेही मी हेलावून गेलो.

लेनिन त्यांचा सारा मोकळा वेळ कामगारांमध्ये व्यतीत करीत होते, त्यांच्या जीवनामधील अत्यंत बारीकसारीक तपशीलांबद्दल त्यांना प्रश्न विचारीत होते.

"बायकांची परिस्थिती कशी आहे? घरकामाचा रगाडा? अभ्यासाला किंवा वाचनाला त्यांना सवड मिळते?"

कॉंग्रेसपूर्वी लेनिनना कधीही न पाहिलेल्या अनेक कामगारांनी हाईड पार्कमध्ये त्यांच्याशी वार्तालाप केले. त्यांच्यातील एकाने खास शेरा मारला:

---

*क्रांतिकारक परिस्थितीविनासुद्धा उठाव करावा असा पुरस्कार करणाऱ्यांचा गट – सं.

"मला माहीत नाही... कदाचित त्यांच्याइतका हुशार युरोपच्या कामगारांपाशी इथं कुणी आहे–बेबेल किंवा त्यांच्यासारखा दुसरा कुणी. पण ह्यांच्याइतका दुसरा पहिल्याच दृष्टीक्षेपात आवडेल, असा मात्र कुणीही नाही!"

त्यावर दुसरा स्मित करीत पुढे म्हणाला:

"ते आपल्यापैकी एक आहेत!"

"प्लेखानोवसुद्धा आहे!" कुणीतरी आक्षेप घेतला.

"प्लेखानोव आपले मास्तर आहेत, मुख्य आहेत, पण लेनिन आपले साथी आहेत, नेते आहेत!" योग्य प्रत्युत्तर आले.

"प्लेखानोवना त्यांचा फ्रॉक-कोट जरा जास्तच घट्ट व्हायला लागलाय!" एका तरुणाने धूर्त शेरा मारला.

व्लादीमिर इल्यिच एकदा रेस्तराँकडे जात होते तेव्हा त्यांना काहीतरी विचारण्यासाठी एक कामगार मेन्शेविक त्यांच्यापाशी आला. लेनिन यांनी चालण्याचा वेग मंदावला, बरोबरीच्या लोकांपासून ते किंचित मागे पडले आणि सुमारे पाच मिनिटे उशीरा रेस्तराँत पोहोचले.

"पक्षाच्या काँग्रेसमध्ये असा भाबडा माणूस आढळतो हे आश्चर्य आहे!" कपाळाला आठी घालीत ते म्हणाले. "आपल्या मतभेदांचं खरं कारण त्याला माहीत करून घ्यायचं होतं. मी त्याला म्हणालो: 'तुमच्या साथींची पार्लमेंटात बसायची इच्छा आहे, पण आमचं मत आहे की, कामकरी वर्गानं लढाईची तयारी केली पाहिजे.' मला वाटतं, त्याला माझं बोलणं समजलं..."

एखाद्या स्वस्त, लहान रेस्तराँमध्ये आमचा छोटा गट नेहमी जेवायचा. माझ्या ध्यानात आले की, व्लादीमिर इल्यिच अत्यंत कमी खात: बेकनच्या चकतीबरोबर दोन-तीन अंडी आणि दाट, काळया बीयरचे एक भांडे. ते अर्थातच स्वतःची काळजी करीत नसत, पण कामगारांविषयीची त्यांना वाटणारी आस्था आश्चर्यकारक होती. म. फ्यो. आन्द्रेयेवा यांच्याकडे कामगारांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था होती. लेनिन सतत आन्द्रेयेवा यांना विचारीत:

"आपल्या कॉम्रेडना खाण्यासाठी पुरेसं आहे ना? कुणी उपाशी रहात नाही? हं... कदाचित जास्त सँडविच बनवले पाहिजेत?"

माझ्या हॉटेलात ते मला भेटायला आले, तेव्हा चिंतायुक्त मुद्रेने माझा बिछाना चाचपून पाहू लागले!

"तुम्ही काय करताय?"

"चादरी ओलसर नाहीत ह्याची खात्री करून घेतोय. तुम्ही तुमच्या प्रकृतीची काळजी घेतली पाहिजे."

१९१८ च्या शरदामध्ये सोर्मोवोचे कामगार द्मित्री पावलोव ह्यांना, त्यांच्या मते लेनिन ह्यांचे खास वैशिष्टय कोणते, असे मी विचारले होते.

"साधेपणा! सत्याइतके ते साधे आहेत!" क्षणभरही न घुटमळता, जणू केव्हाच प्रस्थापित झालेल्या वस्तुस्थितीला सांगावे, असे ते उत्तरले.

माणसाचे सेवक सर्वसाधारणपणे त्याचे कठोर टीकाकार असतात, पण आयुष्यात खूप काही ज्याने पाहिले होते असा लेनिन यांचा शोफर घील म्हणाला होता:

"लेनिन – ते वेगळ्या खास प्रकारचे आहेत. त्यांच्यासारखा दुसरा कुणीही नाही. एके दिवशी म्यास्नीत्स्काया रस्त्यावरून खूप रहदारीतून मी मोटार चालवत होतो. आम्ही अगदी मुंगीच्या गतीनं पुढं सरकत होतो आणि कुणी आम्हाला धक्का मारील ह्या भीतीनं सतत कर्णा वाजवत होतो. मी फार घबरलो होतो. चालत्या मोटारीतून पडण्याचा धोका पत्करून ते मागील दार उघडून माझ्या शेजारच्या पुढच्या सीटवर येऊन बसले आणि सांत्वनाचा स्वरात मला म्हणाले: 'घील, घाबरू नको. इतरांप्रमाणं चालवत रहा!' मी जुना ड्रायव्हर आहे आणि दुसरा कुणीही असं वागला नसता हे मला माहीत आहे."

लेनिन यांची सर्व मते किती सहजतेने व लवचिकपणे एका विचारधारेत एकवटत त्याचे वर्णन करणे अवघड ठरेल.

होकायंत्राच्या सुईप्रमाणे त्यांचा विचार नेहमी कामकरी जनतेच्या वर्गीय हितसंबंधाच्या दिशेने रोखलेला असायचा. लंडनमध्ये एका संध्याकाळी आम्हाला करण्यासारखे विशेष काही नव्हते म्हणून आमच्यातील एक गट एका छोटया लोकशाहीवादी थिएटरमधील खेळ पहायला गेला. विदूषकांना आणि विनोदी कार्यक्रमांना व्लादीमिर इल्यिच मनसोक्त हसले, बाकीच्या बहुतेक कार्यक्रमांकडे त्यांनी फारसे लक्ष दिले नाही,

पण ब्रिटिश कोलंबियामधील लाकूडतोड्यांची जोडी झाड तोडते तो प्रसंग त्यांनी लक्षपूर्वक पाहिला. रंगमंचावर लाकूडतोड्यांची छावणी दाखविली होती आणि अवघ्या एका मिनिटात यार्डभर जाडीचा लाकडाचा बुंधा त्या दोघांनी कुऱ्हाडींनी तोडला.

"अर्थात, हे केवळ लोकांच्या मनोरंजनासाठी. प्रत्यक्षात त्यांना एवढं वेगानं काम करणं शक्य नाही," त्यांनी शेरा मारला. "मात्र तिथंही कुऱ्हाडी घेऊन जातात आणि चांगल्या जंगलाची निष्कारण नासधूस करतात: ही तुमची ब्रिटिश संस्कृती!"

भांडवलशाही व्यवस्थेतील उत्पादनाच्या अराजकतेबद्दल, वाया जाणाऱ्या कच्च्या मालाच्या प्रचंड टक्क्यांबद्दल ते बोलले आणि ह्याबद्दल पुस्तक लिहिण्याचा अद्याप कुणीही विचार केलेला नाही, असे अखेरीस खेदपूर्वक म्हणाले. त्यांचा विचार मला पूर्णपणे कळला नाही, पण मी काही प्रश्न विचारण्यापूर्वीच, "तऱ्हेवाईकपणा" हा नाटचाचा एक खास प्रकार आहे ह्या विषयाकडे ते वळले होते.

"परंपरेविषयीचा तो औपरोधिक अथवा संशयात्मक दृष्टिकोन आहे, तिला उलटसुलट करण्याची, थोडा पीळ देण्याची आणि परंपरेतील अतार्किकता उघड करण्याची ती इच्छा आहे. हे अवघड आहे आणि स्वारस्यपूर्ण आहे."

दोन वर्षांनंतर, काप्री येथे अ. अ. बग्दानोव-मालीनोवस्की यांच्याशी मनोराज्यवादी कादंबरीवर चर्चा करताना ते म्हणाले होते:

"भांडवलदारी दरोडेखोरांनी पृथ्वीची कशी लूट केलीय, तिच्या तेलाची, लोखंडाची, लाकडाची आणि कोळशाची कशी उधळण केलीय, ह्याबद्दलची कादंबरी तुम्ही कामगारांसाठी लिहायला पाहिजे. सीन्योर माखिस्त*, ते फार उपयुक्त पुस्तक ठरेल!"

लंडनमध्ये आमचा निरोप घेण्यापूर्वी त्यांनी मला आश्वासन दिले की, काप्रीमध्ये ते विश्रांतीसाठी येतील.

---

* १९ व्या शतकाच्या अखेरी व २० व्या शतकाच्या आरंभीची आत्मनिष्ठ कल्पनावादी विचारप्रणाली.

पण ते काप्रीला येण्यापूर्वीच, पॅरीसमधील एका विद्यार्थ्याच्या दोन खोल्यांच्या फ्लॅटमध्ये माझी त्यांच्याशी भेट झाली. केवळ आकारापुरता तो विद्यार्थ्याचा फ्लॅट होता, पण आतील व्यवस्था वेगळी होती. नदेज्दा कॉन्स्तन्तीनोवना यांनी आमच्यासाठी चहा बनविला आणि आम्हा दोघांना बोलता यावे म्हणून त्या बाहेर गेल्या. त्यावेळी 'ज्नानीये' प्रकाशन गृह आपला कारभार गुंडाळत होते आणि आमच्या सर्व लेखकांना एकत्र आणू शकेल असे नवे प्रकाशन गृह स्थापण्याबाबत चर्चा करण्यासाठी व्लादीमिर इल्यिचांकडे मी आलो होतो. व्लादीमिर इल्यिच, वा. वा. वोरोवस्की व आणखी कुणीतरी एक, परदेशातील संपादक राहतील आणि वा. अ. देस्नीत्स्की-स्त्रोयेव त्यांचे रशियात प्रतिनिधी राहतील, असा मी प्रस्ताव मांडला.

कामगारांना आत्मशिक्षणासाठी आणि प्रचारासाठी वास्तव साहित्याची संपदा पुरविण्यासाठी, पश्चिमी व रशियन साहित्याच्या इतिहासावर, सांस्कृतिक इतिहासावर पुस्तकांची मालिका लिहिणे आवश्यक आहे, असे माझे मत होते.

पण सेन्सॉर आणि लोकांचे संघटन करण्यातील अडचणी लक्षात घेऊन व्लादीमिर इल्यिच यांनी ती योजना फेटाळून लावली. बहुतेक लोक व्यावहारिक पक्षकार्यात गुंतलेले होते आणि लिहिण्यासाठी त्यांच्यापाशी सवड नव्हती. जाडजूड पुस्तके लिहिण्याचा तो काळ नव्हता, असा त्यांचा मुख्य व सर्वात पटण्याजोगा युक्तिवाद होता. जाडजूड पुस्तकांचा वाचक मुख्यत: बुद्धिजीवी वर्ग होता व तो समाजवादाला सोडून उदारमतवादाकडे वळत होता आणि त्याने निवडलेल्या मार्गापासून आम्ही त्याला च्युत करू शकत नव्हतो. आम्हाला वर्तमानपत्राची, पुस्तिकांची गरज होती. 'ज्नानीये' मालिका परत सुरू करणे चांगले ठरले असते, पण रशियात सेन्सॉरमुळे ते अशक्य होईल आणि इथे वाहतुकीच्या कारणांपायी शक्य नसेल. लोकांपर्यंत शेकडो हजारो पत्रके पोहोचविण्याचे काम आम्हाला करायचे होते, पण एवढ्या संख्येने देशात बेकायदेशीरपणे पत्रके नेणे शक्य नव्हते. तेव्हा अधिक चांगला काळ येईपर्यंत प्रकाशन गृह स्थापण्याची कल्पना स्थगित करावी लागली.

दूमाबद्दल, "अक्त्याब्रिस्त" असल्याबद्दल "शरमणाऱ्या" सनदशीर देमोक्रातांबद्दल आश्चर्यकारक उत्साहाने व प्रवाहीपणे लेनिन बोलू लागले आणि त्यांनी नमूद केले की, देमोक्रातांसमोरचा "एकमेव मार्ग त्यांना उजवीकडे नेणारा होता." मग त्यांनी अनेक आधार दाखवून सिद्ध केले की, युद्ध नजीक आले होते आणि "कदाचित केवळ एकच युद्ध नव्हे, तर अनेक युद्धांची मालिका घडणार आहे." त्यांचे हे भाकीत बाल्कनमध्ये लौकरच खरे ठरले.

नेहमीचा पवित्रा घेऊन, बंडीच्या बगलेत अंगठे खुपसून ते उभे राहिले आणि छोटया खोलीत सावकाशपणे येरझाऱ्या घालू लागले. त्यांच्या आकुंचित पापण्यांमधून त्यांचे डोळे चमकत होते.

"युद्ध येतंय. ते अटळ आहे. भांडवलदारी जग सडलंय आणि लोकांना एव्हाना संकुचित राष्ट्राभिमानाची व राष्ट्रवादाची बाधा झालीय. मला वाटतं, अखिल युरोपीय युद्धाला आपण साक्षी राहणार. कामगारवर्ग? रक्तपात टाळायची कामगारवर्गात ताकद असेल असं मला मुळीच वाटत नाही. ते कसं करता येईल? युरोपभर सार्वत्रिक संप घडवून? त्यासाठी कामगार पुरेसे सुसंघटित नाहीत किंवा त्यांना पुरेशी वर्गजाणीवही नाही. असा संप म्हणजे यादवी युद्धाचा आरंभ ठरेल आणि आपण वास्तववादी राजकारणी असल्यामुळं अशा गोष्टींवर विसंबू शकत नाही."

चालता चालता थांबून ते उदासपणाने पुढे म्हणाले:

"अर्थात कामगारवर्गाची खूप मोठी हानी होईल, काय करणार, त्याच्या नशीबातच आत्ता तसं आहे. पण त्याचे शत्रू एकमेकांना दुबळे करतील; तेसुद्धा अटळ आहे."

ते माझ्यापाशी आले. "जरा विचार करा!" काहीशा नवलाने, शांतपणे, पण तरीही जोरदारपणे ते म्हणाले. "ज्यांच्यापाशी सर्व आहे असे लोक ज्यांच्यापाशी काहीही नाही अशा लोकांना एकमेकांची कत्तल करायला का उद्युक्त करताहेत असं वाटतं? ह्यापेक्षा जास्त वेडपट, जास्त किळसवाणा गुन्हा तो कोणता? कामगार ह्याची भयंकर किंमत मोजतील, पण अखेरीस ते जिंकतील, इतिहासाची तशी इच्छा आहे."

जरी ते वारंवार इतिहासाबद्दल बोलत असले, तरी इतिहासाच्या

इच्छेसमोर अथवा इतिहासाच्या ताकदीसमोर ते नतमस्तक होतात, अशी सूचना त्यांच्या बोलण्यात मी कधी ऐकली नव्हती.

बेचैन होऊन ते टेबलाशी बसले, त्यांनी कपाळ चोळले आणि थंड चहाचा घुटका घेऊन अचानक विचारले :

"अमेरिकेत त्यांनी तुमच्याबद्दल एवढा कांगावा का केला ? त्याबद्दल मी वर्तमानपत्रांमध्ये वाचलं, पण प्रत्यक्षात काय घडलं ?"

माझ्या साहसांची हकीकत मी थोडक्यात सांगितली.

व्लादीमिर इल्यिच यांच्यासारखे सांसर्गिक हसणारा दुसरा कुणी मला कधीही भेटलेला नाही. महान सामाजिक शोकांतिकांची अटळता स्पष्टपणे पाहू व जाणवू शकणारा, कठोर वास्तववादी, भांडवलदारी जगाचा कट्टर द्वेष करणारा हा माणूस डोळ्यात पाणी येईपर्यंत लहान मुलाप्रमाणे हसू शकत होता हे पहायला खरोखरीच विचित्र वाटायचे. असे हसू शकणारा माणूस मनाने किती खंबीर, निकोप आणि धडधाकट असला पाहिजे !

"तुम्ही विनोदी आहात !" हसता हसता त्यांचा श्वास घुसमटला. "हे कधी मी अपेक्षिलं नव्हतं. फारच मजेदार..."

डोळे पुसून त्यांनी सौम्य स्मित केले आणि गंभीरपणे ते म्हणाले :

"तुमच्या पराभवांची गंमतीदार बाजू तुम्ही पाहू शकता हे चांगलं आहे. विनोदाची जाण असणं हा एक सुरेख, निकोप गुण आहे. मला विनोद खूप आवडतो, पण स्वतःला मात्र विनोदाचं अंग नाही. मला खात्री आहे, आयुष्यात जेवढं दुःख आहे, तेवढाच विनोदही आहे."

दोन दिवसांनंतर मी त्यांना परत भेटणार होतो, पण हवा आणखीच वाईट बनली आणि माझ्या थुंकीतून रक्त पडू लागल्यामुळे दुसऱ्याच दिवशी शहर सोडून जाणे मला भाग पडले.

पॅरीसनंतर आमची पुन्हा भेट काप्रीमध्ये झाली. तेथे दोन प्रसंगी लेनिन अत्यंत वेगळ्या मनःस्थितींमध्ये होते, अशी माझी विचित्र समजूत बनली.

धक्क्यावर व्लादीमिर इल्यिचना मी भेटायला गेलो तेव्हा एकदम नरम स्वरात ते मला म्हणाले :

"मला माहीत आहे, अलेक्सेय माक्सिमोविच, माखिस्तांबरोबर माझा समेट घडवायची आशा तुम्ही बाळगून आहात, जरी ते अशक्य आहे असा माझ्या पत्रानं तुम्हाला इशारा दिलाय. तेव्हा कृपया प्रयत्न करू नका!"

माझ्या घरी जाताना वाटेवर आणि घरी आल्यानंतर मी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत होतो की, त्यांचे बोलणे मुळीच योग्य नव्हते, तात्त्विक मतभेदांचा समेट घडविण्याचा माझा अजिबात इरादा नव्हता, कारण ते मतभेद मला स्वतःलाच नीटसे उमजलेले नव्हते. त्याशिवाय, तारुण्यापासून सर्व तत्त्वज्ञानांबाबत मी संशयी होतो, कारण माझा "आत्मनिष्ठ" अनुभव त्यांच्याशी विसंगत होता: माझ्या दृष्टीने जग नुकतेच "आकारत" होते, आणि तत्त्वज्ञान त्याच्या अयोग्य व अवेळी प्रश्नांच्या चपराकी मारीत होते:

"तू कुठं चालला आहेस? कशासाठी? तुला काय वाटतं?"

काही तत्त्वज्ञानी मंडळींनी तर ताडकन आज्ञा केली:

"थांब!"

त्याशिवाय, मला एव्हाना जाणीव होती की, एखाद्या स्त्रीप्रमाणे तत्त्वज्ञानसुद्धा अत्यंत सुमार रूपाचे, अगदी कुरूप असू शकते, पण धूर्तपणे आणि खात्रीशीरपणे पोषाख करून सुंदरतेचा आभास निर्माण करू शकते. ह्यावर व्लादीमिर इल्यिच हसले.

"हा विनोद झाला," ते म्हणाले. "पण 'जग नुकतंच आकारतंय' – हे छान! त्यावर थोडा गंभीर विचार करा आणि तिथून आरंभ करून तुम्ही अशा ठिकाणी पोहोचाल, जिथं फार पूर्वीच पोहचायला हवं होतं."

नंतर मी म्हणालो की अ. अ. बग्दानोव, अ. वि. लूनाचार्स्की आणि वि. अ. बाझारोव ही माणसे माझ्या दृष्टीने फार मोठी आहेत, उत्कृष्ट सर्वांगीण शिक्षण घेतलेली आहेत. पक्षात त्यांच्या तोलाची माणसे मला भेटली नव्हती.

"शक्य आहे. ह्यातून निष्कर्ष काय निघतो?"

"सरतेशेवटी मी त्यांना समान उद्दिष्ट असलेली माणसं मानतो आणि समान उद्दिष्ट पूर्णतया स्वीकारल्यानंतर तात्त्विक मतभेद नष्ट झाले पाहिजेत..."

"म्हणजे तडजोडीची आशा अद्याप तुम्ही बाळगून आहात? व्यर्थ आहे!" ते म्हणाले. "ती आशा सोडून द्या, माझा तुम्हाला हा मित्रत्वाचा सल्ला आहे. तुमच्या म्हणण्याप्रमाणं प्लेखानोव यांचंसुद्धा समान ध्येय आहे, पण – हे आपल्यातच ठेवा – मला वाटतं की, ते वेगळ्याच ध्येयाचा पाठपुरावा करताहेत, कारण ते भौतिकवादी आहेत, जीवनाशी संबंध नसलेल्या तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते नाहीत."

आमचे बोलणे तेथेच थांबले. मी शब्द न शब्द इथे नमूद केलेला नाही, हे सांगण्याची जरूरी नाही, पण त्या संभाषणाचा आशय नेमका दिलाय अशी खात्री देतो.

लंडन काँग्रेसपेक्षा जास्त ठाम, जास्त ताठर अशा रूपात व्लादीमिर इल्यिच लेनिनना ह्यावेळी मी पाहिले. तेथे ते चिंताक्रांत होते; पक्षातील फूट त्यांना फार त्रास देत होती असे काही क्षण स्पष्ट दिसले होते.

इथे ते शांत, थंड, औपरोधिक होते, तात्त्विक विषयांवर बोलण्यास स्पष्ट नकार देत होते, सावध आणि दक्ष होते. अ. अ. बग्दानोव यांच्यासारख्या किंचित स्वमतवादी, पण सर्वांना आवडणाऱ्या सभ्य माणसालाही लेनिन यांच्याकडून काही झोंबणारे टोमणे ऐकावे लागले. लेनिन यांचा त्यांच्यावर फार प्रभाव पडला होता.

"शॉपेनहॉवर म्हणाले होते: 'जो स्पष्टपणं विचार करतो, तो स्पष्टपणं विवेचन करतो.' मला वाटतं, ही त्यांची सर्वोत्तम उक्ती होती. पण तुम्ही, कॉम्रेड बग्दानोव, अस्पष्ट विवेचन करता. अवघ्या दोन-तीन वाक्यांमध्ये मला सांगा, तुमचा "पर्याय" कामगारवर्गाला काय देऊ करतो आणि मार्क्सवादापेक्षा माखिस्तवाद जास्त क्रांतिकारक का?"

बग्दानोव यांनी खुलासा देण्याचा प्रयत्न केला, पण त्यांचे बोलणे खरेच शब्दबंबाळ व संदिग्ध होते.

"पुरे करा!" व्लादीमिर इल्यिचनी सल्ला दिला. "मला वाटतं, जॉरेस एकदा म्हणाले होते: 'मंत्री होण्यापेक्षा सत्य सांगणं मी जास्त पसंत करीन'; मी त्यात भर घालीन: 'किंवा माखिस्त होण्यापेक्षा.'"

त्यानंतर बग्दानोव यांच्याशी ते बुद्धिबळांचा डाव खेळले आणि हरले तेव्हा चिडले, मुलाप्रमाणे फुरंगटले. हे फार असाधारण होते:

त्यांच्या आश्चर्यकारक हसण्याप्रमाणेच त्यांचे बालिश फुरंगटणेसुद्धा त्यांच्या व्यक्तिरेखेच्या एकसंध पूर्णत्वाला बाधा आणत नव्हते.

पण काप्रीमध्ये लेनिन यांचे दुसरेही रूप बघायला मिळाले – सुरेख कॉम्रेड, जगातील प्रत्येक गोष्टीबद्दल सजग स्वारस्य असलेला आणि लोकांबद्दल कमालीचे ममत्व बाळगणारा उल्हासी माणूस.

एके संध्याकाळी, जेव्हा बाकी सारेजण फिरायला गेले होते, तेव्हा म. फ्यो. आन्द्रेयेवा यांना व मला उद्देशून ते दुःखी आणि अत्यंत खेदजनक स्वरात म्हणाले:

"ती बुद्धिमान, गुणी माणसं आहेत, पक्षासाठी त्यांनी खूप काम केलंय, आणखी दहा पट जास्त काम ती करू शकतील, पण ती आपल्याबरोबर येणार नाहीत! त्यांना शक्य नाही. ह्या गुन्हेगारी व्यवस्थेनं त्यांच्यासारख्या शेकडोंना मोडून टाकलंय आणि अपंग बनवलंय!"

दुसऱ्या एका प्रसंगी ते म्हणाले:

"लूनाचास्की पक्षात परत येतील; त्या दोघांपेक्षा ते कमी व्यक्तिवादी आहेत. फार दुर्मिळ गुणी गृहस्थ आहेत. त्यांच्याबाबतीत मी 'दुबळा' आहे – छी:, किती मूर्ख शब्द! 'कुणाबद्दल तरी दुबळेपण असणं!' मला ते आवडतात, ते फार उत्कृष्ट कॉम्रेड आहेत. त्यांच्यात फ्रेंचाची बुद्धिमत्ता आहे. त्यांची छिचोरतासुद्धा फ्रेंच आहे, त्यांच्या सौंदर्यवादाची छिचोरता."

काप्रीच्या मच्छीमारांच्या जीवनाविषयी त्यांनी बारीक चौकशा केल्या. त्या मच्छीमारांची मिळकत किती, पाद्रयांचा त्यांच्यावर कितपत प्रभाव होता ह्याबाबतची माहिती त्यांना हवी होती. त्या मच्छीमारांची मुले कोणत्या शाळांमध्ये जातात ह्याबद्दलही त्यांनी विचारणा केली. त्यांच्या कुतूहलांचा पल्ला पाहून मी चकित झालो. एक पाद्री एका गरीब शेतकऱ्याचा मुलगा होता असे मी सांगताच त्यांनी तात्काळ विचारले की, शेतकरी किती प्रमाणात त्यांच्या मुलांना धार्मिक विद्यालयांमध्ये धाडतात आणि ती मुले स्वतःच्या खेड्यांमध्ये पाद्री म्हणून काम करायला परततात अथवा नाही.

"पाहिलंत? जर हा केवळ योगायोग नसेल, तर हे व्हॅटिकनचं धोरण असलं पाहिजे... फार धूर्त धोरण!"

इतरांपेक्षा खूप उंचावर असलेला, पण महत्त्वाकांक्षेच्या प्रलोभनांना टाळू शकणारा आणि "सामान्य माणसां" बद्दल जिव्हाळा बाळगणारा दुसरा माणूस मला तरी आढळत नाही.

त्यांच्यापाशी आकर्षित करण्याचा गुण होता, त्या गुणाच्या जोरावर कामकरी जनतेच्या हृदयांना व सहानुभूतींना त्यांनी जिंकले. त्यांना इटालियन भाषा बोलता येत नव्हती, पण शल्यापिन आणि इतर काही नामवंत रशियनांना पाहिलेल्या काप्रीच्या मच्छीमारांनी त्यांना खास स्थान अंत:प्रेरणेने देऊ केले होते. त्यांचे हसणे फार मोहक होते – मानवी मूर्खपणातील अजागळपणा आणि बुद्धिमानाचा धूर्तपणा अजमावण्यास समर्थ असलेल्या, तरीही "निष्कपट मनाचा" बालिश साधेपणा उपभोगू शकणाऱ्या माणसाचे निकोप हसणे.

"केवळ प्रामाणिक माणूस तसं हसू शकतो," म्हातारा मच्छीमार जीओवान्नी स्पादारो म्हणाला होता.

आकाशाप्रमाणे निळया आणि पारदर्शी लाटांवरील होडीत हिंदकळत असताना केवळ "बोटावर", म्हणजे छडी न वापरता फक्त दोरा धरून, मासे धरण्यास शिकण्याचा लेनिननी प्रयत्न केला. बोटाला किंचित कंप जाणवताच दोरा खेचा, असे मच्छीमारांनी त्यांना सांगितले होते.

"कोझी द्रिन-द्रिन. कापीशी?" ते म्हणाले.

त्याच क्षणाला त्यांच्या गळाला मासा अडकला व त्याला खेचत बालिश आनंदाने आणि शिकाऱ्याच्या उन्मादाने ते ओरडले:

"आहा! द्रिन-द्रिन!"

मच्छीमारांनीसुद्धा मुलांप्रमाणे मोठ्यांदा हसून आरोळया ठोकल्या व सीन्योर द्रिन-दिन असे लेनिनना टोपण नाव दिले.

लेनिन निघून गेल्यानंतर खूप काळपर्यंत मच्छीमार वारंवार विचारत:

"सीन्योर द्रिन-द्रिन कसे आहेत? झार त्यांना पकडणार नाही अशी तुमची खात्री आहे?"

१९१९ च्या दुष्काळी, अवघड वर्षामध्ये कॉम्रेडनी, सैनिकांनी व प्रांतांमधील शेतकऱ्यांनी पाठवलेले अन्न खाण्यास लेनिन शरमत होते.

त्यांच्या साध्या फ्लॅटमध्ये पार्सले आणली म्हणजे ताबडतोब उपासमारीमुळे खंगलेल्या अथवा आजारी असलेल्या त्यांच्या कॉम्रेडांकडे पीठ, साखर आणि लोणी पाठविण्याची लेनिन व्यवस्था करीत. एके दिवशी मला जेवणाला बोलावून ते म्हणाले :

"आस्त्रखानहून पाठवलेले धुरावलेले मासे आज मी तुम्हाला खाऊ घालतो."

भव्य कपाळाला चुण्या घालून आणि सर्वदर्शी डोळ्यांनी बाजूला पहात ते पुढे म्हणाले :

"जणू त्यांचा मी मालक असल्याप्रमाणं ते वस्तू पाठवतात! काय करणार? जर मी स्वीकारल्या नाहीत, तर त्यांच्या भावना दुखावतील. आणि भोवती सगळे उपाशी आहेत."

अत्यंत साध्या सवयींचा, मद्याला आणि तंबाखूला स्पर्श न करणारा हा माणूस सकाळपासून रात्रीपर्यंत त्याच्या अवघड व गुंतागुंतीच्या कार्यात गुंतलेला होता; स्वतःच्या गरजांकडे लक्ष देणे त्याला जमत नसले, तरी बरोबरीच्या माणसांच्या कल्याणाकडे त्यांचे सतत अवधान होते. एक दिवस मी त्यांना भेटायला आलो तेव्हा मेजापाशी बसून ते काहीतरी लिहीत होते.

"नमस्ते, कसे आहात?" कागदावरील लेखणी बाजूला न करता ते मला म्हणाले. "एका मिनटात माझं काम संपेल. प्रांतातला एक कॉम्रेड वैतागलाय, म्हणजे थकलाय. त्याला उल्हसित करणं आमचं काम आहे. माणसाची मनःस्थिती ही क्षुल्लक बाब नव्हे!"

एकदा मॉस्कोत मी त्यांना भेटायला गेलो तेव्हा त्यांनी विचारले :

"तुमचं जेवण झालं?"

"हो."

"तुम्ही खोटं सांगत नाही?"

"माझ्यापाशी साक्षीदार आहेत – क्रेमलिनच्या भोजनकक्षात मी जेवलो."

"तिथं अत्यंत भिकार अन्न शिजवतात असं मी ऐकलंय."

"भिकार नाही, पण आहे त्यापेक्षा जास्त चांगलं शिजवणं शक्य आहे."

त्यावर ते मला बारकाईने प्रश्न विचारू लागले : "अन्न वाईट का होतं? त्यात सुधारणा कशा करता येतील?"

"त्यांना काय झालंय?" ते संतापाने फणफणून म्हणाले. "एखादा चांगला आचारी त्यांना सापडत नाही? माणसं मरेपर्यंत राबताहेत. त्यांनी अधिक खावं म्हणून त्यांना चवदार अन्न दिलंच पाहिजे. मला माहीत आहे की, पदार्थांची टंचाई आहे, दर्जा हलका आहे, पण म्हणूनच लायक आचारी पाहिजे". अन्नपचनामध्ये चवीचे महत्त्व किती आहे ह्याबाबत त्यांनी कुणा एका आहारशास्त्रज्ञाचा दाखला दिला.

"अशा गोष्टींना तुम्हाला सवड कशी सापडते?" मी विचारले.

"सुयोग्य आहारांसाठी?" त्यांनी प्रतिप्रश्न केला. माझा प्रश्न अयोग्य होता असे त्यांचा स्वर सूचित करीत होता.

माझ्याप्रमाणेच मूळचे सोर्मोवोचे असलेले माझे जुने परिचित स्कोरोखोदोव हे फार कनवाळू अंतःकरणाचे गृहस्थ होते आणि 'चेका'* मधील कामाच्या ताणाबाबत एकदा त्यांनी माझ्यापाशी तक्रार केली. त्यावर मी म्हणालो :

"मला वाटतं, ते तुमचं काम नव्हे. त्या कामाला तुम्ही योग्य नाहीत."

"अगदी बरोबर!" खिन्नपणे त्यांनी कबुली दिली. "त्या कामाला मी मुळीच लायक नाही." पण क्षणभर विचार करून ते पुढे म्हणाले : "तरीसुद्धा, जेव्हा मला आठवण होते की, इल्यिचनासुद्धा अनेकदा स्वतःच्या मनावर बहुधा जबरी करावी लागते, तेव्हा मला माझ्या दुबळेपणाची शरम वाटते."

दात आवळून आणि "मनांवर जबरी" करून ज्यांना काम करावे लागत होते अशा बऱ्याच कार्यकर्त्यांना मी ओळखत होतो. ज्या ध्येयाच्या विजयासाठी ते सेवा करीत होते, त्यासाठी त्यांना "सामाजिक आदर्शवाद" अक्षरशः भयानक ताणाखाली ठेवावा लागत होता.

लेनिनना कधी "स्वतःच्या मनावर जबरी करावी लागली होती?"

ते स्वतःची फारशी चिंता वाहात नसल्यामुळे अशा गोष्टींविषयी

---

*प्रतिक्रांतीविरुद्ध लढा देणारी सर्वाधिकारी समिती.

कुणापाशी क्वचित बोलत आणि स्वतःच्या अंतःकरणात उसळणाऱ्या तुफानांना गुप्त ठेवण्यात त्यांच्याइतका पटाईत माणूस दुसरा कुणीही नव्हता. फक्त एकदाच, गोर्की गावामध्ये कुणाच्यातरी मुलांना कुरवाळ-ताना ते म्हणाले :

"त्यांचं आयुष्य आपल्यापेक्षा जास्त चांगलं असेल ; आपल्या आयु-ष्यातला बराचसा भाग त्यांना अनुभवावा लागणार नाही. त्यांची आयुष्यं कमी क्रूर असतील."

पण जेथे खेडे बिलगले होते त्या टेकड्यांकडे पहात ते पुढे खिन्नपणे म्हणाले :

"तरी मला त्यांचा हेवा वाटत नाही. आपल्या पिढीनं विलक्षण ऐतिहासिक महत्त्वाचं कार्य पार पाडण्यात यश मिळवलंय. परिस्थितींनी आपल्या आयुष्यावर लादलेली क्रूरता समजून घेतली जाईल आणि तिचे समर्थन करता येईल. ती पूर्णं समजून घेतली जाईल, संपूर्ण !"

त्यांनी हलकेच, प्रेमाने स्पर्श करून मुलांना थोपटले.

एक दिवस त्यांना मी भेटायला गेलो तेव्हा त्यांच्या मेजावर 'युद्ध आणि शांतता' कादंबरी मला दिसली.

"बरोबर, तल्स्तोय ! शिकारीचा प्रसंग वाचायचा माझा इरादा होता, पण एका कॉम्रेडला पत्र लिहिलं पाहिजे ह्याची मला आठवण झाली. वाचनासाठी मला मुळीच सवड मिळत नाही. केवळ काल रात्री तुमचं तल्स्तोयवरचं पुस्तक मी वाचलं."

त्यांनी सस्मित डोळे किलकिले केले आणि आरामखुर्चीत अंग पसरत, खालच आवाजात पटकन पुढे म्हणाले :

"केवढा खडक, आं ? केवढा प्रचंड माणूस ! केवढा थोर कलाकार आहे... आणि आणखी कशाचं मला आश्चर्य वाटतंय माहीत आहे ? हे काऊंट येण्यापूर्वी साहित्यात खरा शेतगडी नव्हता."

त्यांनी त्यांचे चमकते डोळे माझ्याकडे वळविले :

"युरोपात त्यांच्या तोडीचा कोण आहे ?"

त्यांनी स्वतःच उत्तर दिले :

"कुणीही नाही."

खूष होऊन त्यांनी हात चोळले व ते हसले.

रशियाबद्दलचा, रशियनांबद्दलचा, रशियन कलेबद्दलचा त्यांना वाटणारा अभिमान त्यांच्या बोलण्यामधून मला वारंवार जाणवायचा. हे वैशिष्टच लेनिन यांना शोभणारे नव्हते, भाबडेसुद्धा वाटायचे, पण त्यात कामकरी जनतेबद्दलच्या त्यांच्या सखोल प्रेमाचे अतिरेकीपण ओळखायला नंतर मी शिकलो.

शार्क माशाने तोडलेल्या आणि गुंता केलेल्या जाळ्यांना काळजीपूर्वक सोडविणाऱ्या काप्रीच्या मच्छीमारांना पहात ते म्हणाले होते:

"आपली माणसं कामात जास्त उत्साही असतात."

मी शंका व्यक्त केली तेव्हा ते चिडून म्हणाले:

"हं... ह्या बेटावर राहताना तुम्ही रशियाला विसरताय का?"

एके संध्याकाळी मॉस्कोत ये. पा. पेश्कोवा यांच्या घरी इसाय दोब्रोवैन यांनी वाजवलेले बीथोवनचे सोनाटा ऐकल्यानंतर लेनिन उद्गारले:

"'अपॅशनेटा'पेक्षा अधिक चांगला दुसरा मला माहीत नाही आणि तो मी रोज ऐकू शकेन. किती आश्चर्यकारक, अलौकिक संगीत! माणसं असे चमत्कार घडवू शकतात हा विचार मला नेहमी अभिमानाची भावना देतो, कदाचित ही भावना भाबडी असेल!"

डोळे किलकिले बनवून खिन्नपणे स्मित करीत ते पुढे म्हणाले:

"पण वारंवार संगीत ऐकणं मला शक्य नाही. माझ्या नसांवर त्याचा परिणाम होतो. गलिच्छ नरकात राहून असं सौंदर्य निर्माण करणाऱ्या माणसांबद्दल कौतुकाचे उद्गार काढून त्यांची डोकी थोपटण्याची मला इच्छा होते. पण आजकाल कुणाच्याही डोक्यावर थोपटता येत नाही, ते तुमच्या हाताला चावण्याची शक्यता आहे. त्यांच्या डोक्यावर मारलं पाहिजे, निर्दयपणानं मारलं पाहिजे, जरी आदर्शरीत्या लोकांवर कोणतीही हिंसा करण्याच्या आम्ही विरुद्ध आहोत. हं—किती भयंकर अवघड काम!"

त्यांची प्रकृती खूप वाईट होती आणि ते कमालीचे थकलेले होते, तरी ९ जुलै १९२१ रोजी त्यांनी मला पुढील चिठी लिहिली:

"अ. मा.!

"मी तुमचे पत्र ले. बो. कामेनेव यांच्याकडे पाठवलेय. मी एवढा थकलोय की एकही गोष्ट करू शकत नाही. जरा विचार करा, तुम्ही रक्त थुंकताय, पण जायला नकार देताय! खरोखर तुम्हाला हे अत्यंत लज्जास्पद आहे, तुमचे वागणे अयोग्य आहे. युरोपातील चांगल्या आरोग्यधामात तुमच्यावर उपचार होतील आणि तुम्ही तिप्पट जास्त उपयुक्त काम करू शकाल. अगदी खरे सांगतोय. इथे ना तुम्हाला उपचार मिळतात, ना तुमच्याकडून काम घडते—फक्त गोंधळ. शुद्ध सावळा गोंधळ. जा आणि बरे व्हा. हट्टी वागू नका अशी विनंती करतो!

"आपला लेनिन."

मी रशिया सोडून जावे असा आग्रह ते एका वर्षाहून जास्त काळ मला करीत होते. मला नवल वाटत होते की, स्वतःच्या कामात पूर्णपणे गुरफटलेले असूनसुद्धा, कुणीतरी कुठेतरी आजारी आहे आणि विश्रांतीची त्या व्यक्तीला गरज आहे, ह्याची त्यांना आठवण कशी रहात होती.

आत्ता नमूद केलेल्या पत्रासारखी अनेक पत्रे ते वेगवेगळ्या लोकांना लिहीत.

त्यांच्या कॉम्रेडांबद्दल त्यांना वाटणाऱ्या विलक्षण आस्थेबद्दल, त्यांच्याकडे लक्ष देण्याबद्दल, त्यांच्या जीवनामधील अप्रिय, क्षुल्लक तपशीलांविषयी त्यांना वाटणाऱ्या तीव्र स्वारस्याबद्दल मी आधीच नमूद केले आहे. चतुर मालक त्याच्या कार्यक्षम व प्रामाणिक कामगारांबद्दल काहीवेळा स्वार्थी कळकळ दाखवितो, तशा कळकळीचा लवलेशही त्यांच्या ह्या आस्थेत मला कधी आढळला नाही.

त्यांचे अवधान खऱ्याखुऱ्या कॉम्रेडचे प्रामाणिक अवधान होते, समानाचे त्याच्या समानांविषयी वाटणारे प्रेम होते. मला माहीत आहे की, व्लादीमिर लेनिन यांच्या तोडीचा माणूस त्यांच्या पक्षातील सर्वात मोठ्या माणसांमध्येही कुणी नव्हता, पण ह्या वस्तुस्थितीची त्यांना जाणीव दिसत नव्हती अथवा कदाचित तशी जाणीव करून घ्यायची त्यांची

इच्छा नव्हती. लोकांशी वाद घालताना ते तिखट होते, त्यांना हसत होते, त्यांची टवाळीसुद्धा करत होते. ते सर्व खरे आहे.

तरीही आदल्या दिवशी त्यांनी ज्यांच्यावर टीकेची झोड उठवलेली असायची अशा लोकांबद्दल, त्यांच्या बोलण्यात त्या लोकांच्या गुणांबद्दल व नीतीमत्तेबद्दल प्रामाणिक आश्चर्याचा स्वर पुन:पुन्हा ऐकू यायचा; १९१८-१९२१ च्या नरकसमान परिस्थितीत, सर्व देशांच्या हेरांनी आणि सर्व राजकीय पक्षांनी वेढलेले असताना, युद्धाने खंगलेल्या देशाच्या देहावर पुवाळणाऱ्या गळवांप्रमाणे पिकणाऱ्या कारस्थानांच्या वातावरणात काम करणाऱ्या लोकांच्या खडतर, अविरत प्रयत्नांबद्दल त्यांच्या बोलण्यातून आदर उमटायचा. ही माणसे विश्रांतीविना काम करीत होती, अपुरे आणि कमी दर्जाचे अन्न खात होती, सतत चिंतेच्या मन:स्थितीत जगत होती.

नागरी फाटाफुटीच्या रक्तपाती तुफानामुळे ज्याचा पाया हादरला होता अशा जीवनाच्या चिंतांचा, त्या परिस्थितींचा बोजा खुद्द लेनिनना जाणवत होता असे भासत नव्हते. फक्त एकदाच, म. फ्यो. आन्द्रेयेवा यांच्याशी बोलताना, त्यांच्याकडून तक्रारवजा स्फोट झाला अथवा निदान आन्द्रेयेवा यांना ती तक्रार वाटली:

"अहो मार्या फ्योदरोवना, आपण काय करणार? आपण लढा चालू ठेवला पाहिजे. तसं करणं भागच आहे! अर्थात आपल्याला हे कठीण जातंय. मला काहीवेळा अवघड जात नाही असं वाटतं तुम्हाला? फार फार अवघड जातं, मी सांगतो तुम्हाला! पण द्झेर्झिन्स्कीकडं पहा. किती भयानक दिसतोय तो! पण त्यावर इलाज नाही. जोवर आपण जिंकतोय, तोवर कष्टांची पर्वा करणार नाही!"

मी फक्त एकदाच त्यांच्याकडून तक्रार ऐकली:

"किती वाईट," ते म्हणाले, "की मार्तोव आमच्याबरोबर नाहीत! किती छान कॉम्रेड आहेत ते, फार शुद्ध मनाचे!"

"रशियात फक्त दोन कम्युनिस्ट आहेत, लेनिन आणि कल्लो-न्ताय," असे मार्तोव म्हणाल्याचे लेनिननी कुठेतरी वाचले, तेव्हा ते खूप वेळपर्यंत मन:पूर्वक हसत होते असे मला आठवते.

हसण्याचा आवेग ओसरल्यानंतर एक उसासा टाकून ते पुढे म्हणाले:

"किती हुशार आहेत ते! .."

एका आर्थिक अंमलदाराला अभ्यासिकेच्या दारापर्यंत निरोप दिल्यानंतर त्याच आदराने व नवलाने ते म्हणाले होते:

"तुम्ही त्यांना खूप दिवसांपासून ओळखता? कुठल्याही युरोपीय देशात मंत्रिमंडळाचं नेतृत्व ते करू शकतील."

हात चोळत ते पुढे म्हणाले:

"गुणांच्या बाबतीत युरोप आपल्यापेक्षा जास्त दरिद्री आहे."

एका माजी तोफखानावाल्याच्या, बोल्शेविकाच्या, नव्या शोधाला पाहण्यासाठी तोफखान्याच्या मुख्य ठाण्यावर माझ्याबरोबर चलावे असे मी त्यांना सुचविले. विमानविरोधी मारा अचूक करण्याचे ते उपकरण होते.

"अशा गोष्टींचं मला काय ज्ञान?" ते म्हणाले, पण तरीही माझ्याबरोबर आले. एका अंधाऱ्या खोलीत पांढऱ्याशुभ्र केसांचे, मिशावाले, विद्वान असे सात जनरल टेबलाभोवती बसले होते व त्या टेबलावर ते उपकरण ठेवलेले होते. लेनिन यांची सौम्य नागरी आकृती त्यांच्यात हरवून गेल्याप्रमाणे भासली. संशोधक त्याच्या उपकरणाची रचना समजावून सांगू लागला. एक-दोन मिनिटे त्याचे बोलणे ऐकल्यानंतर लेनिन यांनी "हं" असा संमतीदर्शक उद्गार काढला आणि जणू राजकीय समस्यांवर त्या माणसाची ते परीक्षा घेत होते अशा पद्धतीने त्यांनी त्याला प्रश्न विचारायला आरंभ केला:

"नेम धरण्याची यंत्रणा दुहेरी काम कसं पार पाडते? यंत्रणेच्या हिशेबांनुसार तोफांच्या नळ्यांची दिशा आपोआप बदलता येणार नाही का?"

पल्ल्याबद्दल आणि इतर काही गोष्टींबद्दलही त्यांनी प्रश्न विचारले, संशोधकाकडून व जनरलांकडून तात्काळ मिळालेली उत्तरे ऐकली.

"तुम्ही एका कॉम्रेडबरोबर येणार आहात असं मी माझ्या जनरलांना सांगितलं होतं, पण तो कॉम्रेड कोण, हे मात्र सांगितलं नव्हतं," संशोधक नंतर मला म्हणाला, "त्यांनी इल्यिचना ओळखलं नाही. एवढ्या शांतपणं, गाजावाजा न करता आणि रक्षक न घेता लेनिन येतील, अशी बहुधा जनरलांनी कल्पनाही केली नसेल. 'ते तंत्रज्ञ, प्राध्यापक

आहेत का?' त्यांनी विचारलं. 'लेनिन!' सगळे अवाक् झाले. 'आपल्या क्षेत्राबद्दल त्यांना एवढी चांगली माहिती कशी? त्यांच्या प्रश्नांवरून त्यांना उत्तम तंत्रज्ञान आहे असं दिसलं!' ते बुचकळ्यात पडले. आलेले गृहस्थ लेनिनच होते ह्यावर त्यांचा विश्वास बसलाय असं मला वाटत नाही..."

तोफखान्याच्या मुख्य ठाण्यावरून परतताना लेनिन हसत हसत त्या संशोधकाबद्दल म्हणाले:

"माणसाला जोखण्यात किती चूक होते! तो चांगला जुना कॉम्रेड आहे हे मला माहीत होतं, पण बुद्धीनं एवढा तल्लख आहे हे मात्र ठाऊक नव्हतं. ह्या कामात तो किती चांगला आहे हे सिद्ध झालं. छान माणूस! उपकरणाच्या व्यावहारिक मूल्याबाबत मी शंका व्यक्त केली तेव्हा ते जनरल कसे रागावले होते ते पाहिलंत? मी मुद्दाम तसं बोललो– त्याच्या त्या चतुर उपकरणाबद्दलचं त्यांचं खरं मत अजमावून घेण्यासाठी."

ते परत हसले आणि त्यांनी विचारले:

"त्याच्यापाशी आणखी एक शोध आहे म्हणता? त्याबद्दल अजून काही का केलं नाही? त्यानं ह्याच गोष्टींमध्ये गुंतलं पाहिजे. ह्या सगळ्या तंत्रज्ञांना कामाची आदर्श परिस्थिती आपण मिळवून दिली तर किती छान होईल! पंचवीस वर्षांत रशिया जगातला सर्वांत प्रगत देश होईल!"

त्यांच्या तोंडून लोकांचे कौतुक मी वारंवार ऐकत होतो. जी माणसे त्यांना आवडत नव्हती, अशा माणसांच्या शक्तीचा गौरव करण्याचीही त्यांच्यापाशी क्षमता होती.

...माझ्याशी ते विश्वासू सल्लागार आणि प्रेमळ "जपणूक करणाऱ्या मित्रा" प्रमाणे वागत.

"तुम्ही एक गूढ आहात," गालात हसत एकदा ते मला म्हणाले. "साहित्यात तुम्ही चांगले वास्तववादी भासता, पण लोकांशी वागताना रोमांचवादी आहात. प्रत्येकजण इतिहासाचा बळी आहे असं तुम्हाला वाटतं ना? आम्हाला इतिहास माहीत आहे आणि बळी ठरलेल्यांना आम्ही म्हणतो: 'वेदी उलथून टाका, मंदिरं नष्ट करा आणि देवांना

बाहेर हाकलून द्या!' तरीही माझी खात्री पटवून द्यायला तुम्हाला आवडेल की, बुद्धिजीवींना आरामदायी जीवन उपलब्ध करून देणं कामगारवर्गाच्या लढाऊ पक्षाचं आद्य कर्तव्य आहे."

माझी चूक होत असेल, पण माझ्याशी चर्चा करायला व्लादीमिर इल्यिचना आवडायचे, असा माझा समज झाला होता आणि नेहमी माझा निरोप घेताना ते म्हणत: "शहरात असाल तेव्हा मला फोन करा आणि आपण भेटू."

दुसऱ्या एका प्रसंगी ते म्हणाले:

"तुमच्या अनुभवांची कक्षा विशाल आणि मोठी असल्यामुळं तुमच्याबरोबर चर्चा करण्यात नेहमी मजा येते."

शास्त्रज्ञांवर विशेष भर देण्याबद्दल बुद्धिजीवींच्या भावना काय आहेत, ह्यावर त्यांनी मला विचारले: त्यावेळी शास्त्रज्ञांच्या कल्याण आयोगावर अ.बो.खालातोव आणि मी काम करीत होतो. कामगारवर्गीय साहित्याबाबतही त्यांना कुतूहल होते.

"तुमची त्यापासून काही अपेक्षा आहे?"

मी म्हणालो की, माझ्या फार मोठ्या अपेक्षा आहेत; पण भाषाशास्त्र, पश्चिमी आणि प्राच्य भाषा, लोककथा, जागतिक साहित्याचा इतिहास यांच्या शाखा आणि रशियन साहित्याच्या इतिहासाचा स्वतंत्र विभाग असलेल्या साहित्यिक शिक्षण संस्थेची स्थापना करणे आवश्यक आहे, असे मला जाणवले होते.

"हं", तिरपे पहात आणि गालात हसत ते उद्गारले. "फार महत्त्वाकांक्षी आणि चकित करणारी योजना आहे! महत्त्वाकांक्षी असायला माझी हरकत नाही, पण थक्क करणारी ठरेल! ह्या क्षेत्रात आपल्यापाशी प्राध्यापक नाहीत. भांडवलदारी प्राध्यापक कोणता इतिहास आपल्याला शिकवतील, तुम्हाला माहीतच आहे... नाही, सध्या आमच्या हे कुवतीत नाही... आणखी तीन किंवा पाच वर्षं थांबलं पाहिजे."

ते खेदाने पुढे म्हणाले:

"वाचनासाठी मला मुळीच सवड मिळत नाही!.. आजकाल फार भयानक कविता लिहितात असं तुम्हाला वाटत नाही? मासिकांची

मासिकांच्या पानं त्यांनी भरलेली असतात आणि दररोज नवनवे संग्रह प्रसिद्ध होत आहेत."

मी म्हणालो की, अशा काळात गीताबद्दल तरुणांना ओढ वाटणे स्वाभाविक आहे आणि माझ्या मते चांगले गद्य लिहिण्यापेक्षा सामान्य कविता लिहिणे अधिक सोपे आहे. कविता लिहायला कमी वेळ लागतो आणि आमच्यापाशी छंदशास्त्राचे अनेक चांगले अध्यापक आहेत.

"नाही, नाही, गद्यापेक्षा कविता लिहिणं जास्त सोपं आहे, ह्यावर माझा मुळीच विश्वास बसत नाही! अशी कल्पनाच मी करू शकत नाही. तुम्ही मला सोलून काढायची धमकी घातलीत, तरी कवितेच्या दोन ओळी लिहिणं मला शक्य नाही." कपाळाला आठ्या घालून ते पुढे म्हणाले: "आपल्यापाशी आहे तेवढं सर्व आणि युरोपात आहे तेवढं सारं जुनं क्रांतिकारक साहित्य जनतेला उपलब्ध करून दिलं पाहिजे."

रशियापासून दीर्घ काळ दूर राहिलेले आणि मायदेशाला लक्षपूर्वक न्याहाळणारे असे ते रशियन होते—दुरून रशिया जास्त प्रेक्षणीय आणि रंगीबेरंगी भासला होता. त्याच्या सुप्त शक्तीचे त्यांनी अचूक मूल्यमापन केले होते: अवजड आणि भयाण इतिहासाने जागृत केलेल्या लोकांची असाधारण, पण अजून दुबळेपणाने व्यक्त झालेली गुणवत्ता; पण तेथे सर्वत्र गुणवत्ता होती, विलक्षण रशियन जीवनाच्या काळसर पार्श्वभूमीवर तेजस्वी सोनेरी ताऱ्यांप्रमाणे चमकत होती.

व्लादीमिर लेनिन, ह्या जगातील मोठा अस्सल माणूस, वारले. त्यांना ओळखणाऱ्या सर्वांना त्यांच्या मृत्यूने फार मोठा वेदनादायी धक्का बसलाय, फार वेदनादायी धक्का!

पण त्यांच्या मृत्यूची काळी रेषा जगाच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व अधोरेखित करील—जगाच्या कामकरी जनतेच्या पुढाऱ्याचे महत्त्व.

त्यांच्याबद्दलच्या द्वेषाचे काळे मेघ, त्यांच्या भोवती विणण्यात येणाऱ्या खोटेपणाचे आणि निंदेचे काळे मेघ अधिक दाट बनले तरी फरकत नाही, कारण वेड्या बनलेल्या जगाच्या घुसमटणाऱ्या काळोखात

त्यांनी उंचावलेली मशाल मंद करण्याची ताकद कोणत्याही शक्तीत नाही.

सबंध जगाने कायम आठवण ठेवावी अशा लायकीचा दुसरा माणूस अद्याप कधी झालेला नाही.

व्लादीमिर लेनिन वारले. पण ज्यांना त्यांनी स्वतःचे शहाणपण आणि स्वतःचा निर्धार अर्पण केला, ते जगत आहेत. ते जिवंत आहेत आणि पृथ्वीवर पूर्वी कुणीही केले नसेल अशा यशस्वीपणाने काम करीत आहेत.

१९२४, १९३०

अलेक्सान्द्र मालीश्किन

दक्षिणेकडे जाणारी आगगाडी

अलेक्सान्द्र मालोशिकन (१८९२-१९३८). १९१७च्या ऑक्टोबर क्रांतीनंतर साहित्यात पदार्पण करणाऱ्या सोविएत लेखकांच्या पिढीत अलेक्सान्द्र मालोशिकन यांचा समावेश होतो.

पेन्झा प्रांतातील बोगोरोदस्कोये खेड्यात मालोशिकन जन्मले. तेथे त्यांचे वडील किराणा मालाच्या धंद्यात काम करीत होते. मालोशिकन स्वतःच्या बालपणाबद्दल लिहितात: "आम्ही गरीब होतो, आमचे घराणे खालच्या स्तरातले होते आणि आमच्या सबंध कुटुंबात मी पहिला मुलगा होतो, ज्याला माझ्या वडिलांनी व्याकरण शाळेत मोठ्यांच्या पोरांबरोबर शिकण्यासाठी दाखल करण्याचे धाडस दाखविले." १९११ साली मालोशिकनना सेंट पीटरबुर्ग विद्यापीठातील भाषाशास्त्र विभागात प्रवेश मिळाला आणि त्याच वेळी रशियन अभिजात परंपरेशी निष्ठा राखणाऱ्या, "छोटा माणूस" मध्यवर्ती व्यक्तिरेखा असलेल्या त्यांच्या पहिल्या लघुकथा प्रसिद्ध होऊ लागल्या.

१९१६ साली पदवीधर झाल्यानंतर, मालोशिकन यांची कृष्णसागरी काफल्यात सक्रिय सेवेत नेमणूक झाली. १९१७ च्या ऑक्टोबर क्रांतीनंतर ब्रिगेड सोविएतचे प्रतिनिधी म्हणून त्यांची निवड झाली.

'देरचा पाडाव' (१९२३) ह्या मालोशिकनना वाचकप्रिय बनविणाऱ्या कथेत यादवी युद्धातील पेरेकोपच्या लढाईचे वर्णन आहे. वीर पोवाड्याच्या शैलीतील ह्या भावनावेगी कथनाला, सुप्रसिद्ध सोविएत चित्रपटनिर्माते अलेक्सान्द्र दोवझेन्को यांनी दिलेले काव्यात्म नाव अनेक टीकाकारांना आवडले.

'दक्षिणेकडे जाणारी आगगाडी' ही मालोशिकन यांच्या सर्वोत्तम कथांपैकी एक आहे. तिच्यात घडामोडींच्या वर्णनांना विशेष महत्त्व नाही, तर माणसाला आमूलाग्र बदलून टाकणाऱ्या सर्वविजीगिषु प्रेमाच्या प्रकटीकरणाला महत्त्व आहे. सामान्यतेच्या, डोळ्यात न भरणाऱ्या आणि ओबडधोबडपणाच्या बाह्य कवचातून लेखक त्याचे दर्शन घडवितो.

सुटीपूर्वीच्या त्या खास भावनेशी तुमची ओळख आहे? कुठल्यातरी अदृश्य सूर्यप्रकाशित उद्यानामधून आलेली वाऱ्याची झुळूक तुमच्याभोवती िंजी घालतेय आणि तुमच्या हृदयाच्या तारा छेडतेय असे वाटत राहते. वसंतामध्ये तिची पहिली चाहूल लागते, जेव्हा ट्रेड युनियन समिती क्रिमियामधील खाटांची पाहणी करू लागते, टंकलेखिका लोकरी जाकीटे घरी ठेवतात आणि उन्हाळी पोषाखांबरोबर व पोलक्यांबरोबर सकाळच्या प्रहरी ऊन आणि सताड उघडया ट्रामच्या खिडक्या कचेरीत आणतात. उन्हाळ्यासाठी एव्हाना शहराबाहेर उपनगरात दाचामध्ये * रहायला गेलेले तुमच्या खात्यातील हिशेबनीस तुम्हाला तिची आठवण करून देतात. एकाग्रतेचा तेजोवलयांकित देव्हारा समजल्या जाणाऱ्या त्याच्या मेजावर आणि आकडेमोडींनी गच्च भरलेल्या खतावण्यांच्या लठ्ठ ढिगावर-सुद्धा कल्याङ्माच्या चांदण्याची चमक दिसते व भोजांच्या झाडांची खूप रात्रीपर्यंतची सळसळ असते... एकांत कोपऱ्यांच्या आणि संकेतभेटींच्या उद्यानातील भटक्या रात्री. दक्षिणेकडे जाणाऱ्या आगगाड्यांची वेळा-पत्रके तुम्ही डोक्यात घेऊन वावरत असता आणि मॉस्कोच्या ऐन मध्य-भागातील कचेरीच्या भिंती काचेच्या बनतात व त्यांच्या पलीकडून त्या आगगाड्या धावत असतात – बेफाम! ताज्या आणि असीम विस्ताराच्या स्तेपमधून!

आणखी एका कारणामुळे दक्षिणेकडे मी ओढला जात होतो.

एक काळ होता जेव्हा स्तेपमध्ये संहाराचे थैमान घुमत होते आणि

---

*शहराबाहेरील उन्हाळी घर – सं.

लढाईत जिंकलेले प्रत्येक आडबाजूचे छोटे स्टेशन जगाला यापूर्वी कधीही माहीत नसलेल्या अधिक चांगल्याचे आश्वासन देत होते. बेरेझ्नेवातका खेड्याजवळ ६ व्या उराल रेजिमेंटच्या शोकांतिकेबद्दलच्या युद्धवार्ता बहुधा तुम्हाला आठवतात? वेळीच तो विश्वासघात शोधून काढण्यात मला यश आले होते आणि सतत चोवीस तास लढल्यानंतर रेजिमेंटच्या उरलेल्या रक्ताळल्या माणसांसह कोंडी फोडून आमच्या डिव्हिजनला जाऊन मिळालो होतो. एवढे खरे, माझी निम्मी माणसे लढाईत कामी आली होती, त्यात माझ्या एकुलत्या एक भावाचाही समावेश होता.

कधीही न परतणाऱ्या तारुण्याच्या आणि मृत्यूच्या वासाने दरवळलेले ते स्थळ परत पाहताना किती विचित्र वाटत होते. तीन वर्षांत तो वास मी पुरता विसरून गेलो होतो.

मला आठवते, मॉस्को सोडण्यापूर्वी जरा आधी, एका संध्याकाळी मी अर्बातमध्ये कुठलातरी चित्रपट पहायला गेलो होतो. सर्व काही जसे असावे तसे होते: दर्शनी दालनात कोऱ्या चेहऱ्यांची जोडपी येरझाऱ्या घालीत होती; 'बायादेरे'चे सूर व्हायोलीनवर विव्हळत होते, झपाटले-ल्या माणसासारखा पियानोवादक स्टुलावर वर-खाली उडत होता. प्रचंड, जाडजूड पडदे लावलेल्या खिडक्यांमागून हमरस्त्यावरील कोलाहल ऐकू येत होता; बुलवारांवरून धावणाऱ्या, माणसांनी भरलेल्या, प्रका-शित खिडक्यांच्या ट्रामगाड्यांचा जमिनीखालून येणारा धडधडाट ऐकू येत होता. माझ्या प्रवासाची, दक्षिणेची, मला आठवण झाली आणि का कुणास ठाऊक, पण बेरेझ्नेवातका नावाचे एक ठिकाण होते, अथवा ६ व्या रेजिमेंटवर संकट कोसळले होते, किंवा धूर ओकणाऱ्या पेरेकोप-वर पहाट फुटली होती – ह्या गोष्टी अशक्यप्राय भासल्या. त्यांच्याबद्दल विचार करणे म्हणजे उखडलेल्या थडग्यात डोकावून पाहण्यासारखे भया-नक होते. आता त्या काळोख्या मैदानांना भेदून आगगाड्या दक्षिणेकडे सुखासाठी धावत होत्या...

खरे तर मीसुद्धा त्या निनावी मृतांमध्ये निजलेला असतो!

...अतिथकल्यामुळे केवळ तसे मला वाटले होते. माझ्या प्रयाणाच्या सकाळी फलाटावर लोकांचा उत्साह उतू जात होता आणि आकाश

एवढे आनंदी निळे चमकत होते, की त्याबद्दल मी तात्काळ सारे विसरून गेलो. मला एवढेच माहीत होते की, मी मुक्त होतो. कामाच्या फायली, अहवाल, संदर्भ — ह्या सर्वांना मी मेंदूतून झटकून टाकले होते. त्या ढिगावर मी जंगली नाच केला.

सेवास्तोपोलची आगगाडी दोन वाजता सुटणार होती. मी कुपेमध्ये बसलो होतो आणि माझे सहप्रवासी कोण असतील ह्याबद्दल रिकामपणी विचार करीत होतो. सर्वांत प्रथम दोन तरुणी आल्या; अर्थातच कुठल्या-तरी भक्कम खात्याच्या कचेरीतील चिटणीस दिसत होत्या. त्यांच्या पिवळ्या सूटकेसेस, आद्याक्षरे विणलेल्या त्यांच्या प्रवासी पिशव्या आणि मेजावर ठेवण्यासाठी त्यांनी आणलेली फुले — ह्या सर्व गोष्टी आईच्या संरक्षित पंखाखालील स्वच्छ व आरामशीर जीवनाची साक्ष देत होत्या. डब्याबाहेर खिडकीखाली, कमरेला घट्ट पट्टे बांधलेल्या, प्रशस्त जबड्यां-च्या, जुन्या जगातील दोन मातोश्री प्रचंड चकचकीत चामडी पिशव्या घेऊन उभ्या होत्या. त्या सांगत होत्या :

"लिहा, पत्र लिहा! झेन्या, संध्याकाळी तिथं गारठा असतो, न विसरता स्वेटर घाल! सोन्या, याल्टात सोफ्या आन्द्रेयेवनाला नक्की भेट!"

आणि उघड्या दंडांची, चाहत्यांच्या नजरांनी चुंबली जाणारी, काळ्या डोळ्याखाली आकर्षक तीळ असलेली झेन्या लाडिक आवाजात ओरडली :

"व्लादीमिर अलेक्सान्द्रोविचना सांगा! .. त्यांनी वचन दिलंय व्यवस्था करण्याचं..." आणखी ट्रेड युनियन समितीला कळवण्याबाबत तिने काही सांगितले आणि खार्कोववरून पोस्टकार्ड पाठविण्याचे आश्वासन दिले.

दुसरी, रेशमी स्कर्टमधील गुबगुबीत तरुणी — तिच्यामधून लौकरच नक्की शहरी आणि दाचात राहणारी छानदार माता निर्माण होईल; ट्राम पकडायला उशीर झाला म्हणून नेहमी धावणाऱ्या आणि असंख्य पार्सलांच्या वजनाखाली धापा टाकणाऱ्या बायका असतात, त्या तऱ्हेची आई ह्या तरुणीमधून निर्माण होणार होती. ह्या दुसऱ्या तरुणीने स्वतः-

च्या विपुल सोनेरी केशसंभाराला हलकेच हेलकावा दिला व मंद स्मित करीत ती म्हणाली :

"मम्मी, तूस्काला खायला घालायला विसरू नको."

दोघींचे डोळे धुंदीने चमकत होते. ह्या तरुणींच्या घरातील खोल्या माझ्या नजरेसमोर उभ्या राहिल्या – फर्निचरचे म्युझियम भासणाऱ्या, खुर्च्यांवर आच्छादने, छोटी कपाटे, किरकोळ वस्तू, जुन्या अंमलदारी दिमाखाचे वातावरण राखणाऱ्या, १९१० ते १९१४ सालातील खोल्या, क्रांतीच्या तुफानापासून ते आमच्या निवांत शांत दिवसांपर्यंत यशस्वीपणे जतन केलेल्या. आणि त्या भयानक वर्षांनंतर प्रथमच – क्रिमियाकडे, पूर्वीप्रमाणेच !

मग एक लष्करी माणूस आला. रेजिमेंट कमांडरच्या फिती खांद्यावर लावलेला, वाऱ्या-पावसाचा मार खाल्लेल्या बायकी, खेडवळ चेहऱ्याचा हा सुमारे तिशीचा तरुण भल्या मनाने आधीपासूनच प्रत्येकाकडे पाहून अवघड स्मित करीत होता. अर्ध्या तासाच्या अवधीत मला समजले की, त्याचे नाव ग्रीगोरी इवानीच होते, अकादमीत प्रवेश मिळविण्याचा त्याने एकदा प्रयत्न केला होता, पण एकूण शिक्षणात तो कमी पडला होता, आता तो परत प्रयत्न करणार होता आणि ह्यावेळी उत्तीर्ण होण्याची त्याला खात्री होती – ह्या दिमाखदार सूटकेसेसवर आणि जगातील सगळ्या मम्मींवर सूड घेण्यासाठी.

"तुम्हीसुद्धा उपचार आणि विश्रांतीसाठी जात आहात?" ग्रीगोरी इवानीचने वरच्या सुरात नम्रपणे मला विचारले आणि भल्यामोठ्या जांभळट पंजांची स्वतःच्या मांडीवर घडी घातली.

"होय, दक्षिणेला," मी उत्तरलो आणि त्याच्याकडे कौतुकभरल्या असूयेने पाहताना माझ्या मनात विचार आला : "अरे सैताना, तुला कसले उपचार पाहिजेत?"

आणि जणू काही माझ्या न उच्चारलेल्या प्रश्नाला उत्तरादाखल त्याने स्फोटाचा धक्का बसलेल्या माणसाचे भयानक स्मित केले. त्यासरशी त्याच्या रसरशीत गालांना एकदम सुरकुत्या पडल्या. असले विद्युल्लेखे-प्रमाणे चमकून जाणारे स्मित अश्रू पुसून टाकल्याप्रमाणे बाजूला झटकायचे

असते. त्या स्मितामधून कुठलीतरी रात्रीची लढाई दिसली, पिळलेल्या अंधाराची, सभोवार सरपटणाऱ्या मृत्यूची...

"आहा," माझ्या मनात आसुरी समाधानाचा विचार आला, "म्हणजे तुलासुद्धा हे माहीत आहे!"

सरतेशेवटी एक उदास विवाहित जोडपे आले. त्यांच्या दुर्मुखल्या आणि त्रासलेल्या अवतारावरून दुर्भाग्याने त्यांचा सतत पिच्छा पुरविल्याचे दिसत होते. कधी वोरोनेझमध्ये दुकानात विक्रेते, कधी लेबेद्यानच्या सहकारी भांडारात पैसे देणाऱ्या व घेणाऱ्या कारकुनाचे काम, कधी मॉस्कोत रेलकामगार, आणि नेहमी आर्थिक टंचाईने ग्रासलेले अथवा कर्मचाऱ्यांच्या कपातीत बळी पडलेले... फलाटावर अखेरच्या वेळी उत्साही घंटा घणघणली आणि हमालांच्या हातगाड्यांना कसेबसे चुकवत मम्मींनी रुमाल हलविले. आमच्या भोवताली रेलवाघिणींचे दाट जंगल खडखडू लागले आणि त्यानंतर फक्त सोनेरी, धुळकट मोकळे मैदान...

अच्छा, मॉस्को!

ग्रीगोरी इवानीच आणि मी उठलो व तरुणींच्या डोक्यांवरून आमच्या खालच्या भिरभिरत जाणाऱ्या छपरांच्या धुंदकारल्या दृश्याला पाहू लागलो. एकदम माझ्या ध्यानात आले की, ग्रीगोरी इवानीचची नजर झेन्याच्या पापणीखालील तीळावर खिळली होती, त्याचे भान हरपले होते व तिच्याकडे चोरून तो कटाक्ष टाकत होता... लाजरे, पोरकट, चोरटे कटाक्ष...

"काही उपयोग नाही, ग्रीगोरी इवानीच," त्याला सांगावे असे मला वाटत होते. "त्यांच्या लाडावून ठेवलेल्या खोल्या आणि नाजुक सुगंध तुला समजायचे नाहीत, त्यांच्या शब्दांचे तू चुकीचे अर्थ घेशील, कारण तुझ्या डोक्यात विचार असणार, ह्या सफरीत पंधरा रूबलची खर्चात बचत करून घरी तुझ्या म्हातारीला कसे पाठवावेत – हिवाळ्यात छपराची शाकारणी करण्यासाठी. तुझ्या गावढळ साधेपणाला पाहून ती गोंधळेल आणि कंटाळेल, ग्रीगोरी इवानीच..."

उपनगरातील फलाटांच्या आणि छोट्या स्टेशनांच्या झोपाळू स्तब्धतेतून आम्ही सुसाटत जात होतो, जंगलांच्या शीतलतेमध्ये आणि अंधारात घुसत होतो; आम्ही सर्वत्र बंडाळी, खडखडाट आणि धूळ पेरीत होतो.

तरुणी कंटाळल्या. टेबलाशी त्या एकमेकींसमोर बसल्या होत्या, वाऱ्यावर उडणाऱ्या केसांना सारखे करीत होत्या आणि निर्विकरपणे सर्वांवरून ओझरते कटाक्ष टाकीत होत्या. ग्रीगोरी इवानीचला एकदम स्फूर्ती आली व किटलीसाठी त्याने बाकाखाली सूर मारला. लौकरच सेर्पूखोव येणार आहे.

ग्रीगोरी इवानीचने तरुणींच्या चकचकीत मुलामेदार किटलीकडे नजर फेकली.

"तुमची किटलीसुद्धा भरून आणू?"

ह्या अनपेक्षित प्रश्नाने चकित झालेली झेन्या त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने टक लावून पहात राहिली.

"चालेल..."

आगगाडी स्टेशनात थांबली तेव्हा बुटांच्या आऱ्या व किटल्या जोडीने कॉरीडॉरमधून खडखडत गेल्या. झेन्या खिडकीबाहेर झुकली.

"उशीर करू नका!" त्याच्यापाठी ती ओरडली.

मी खिडकीबाहेर पहायला भीत होतो–त्या स्वर्गीय आनंदाच्या भरात ग्रीगोरी इवानीच पाय अडखळून पडला तर!

सेर्पूखोवपलीकडील विस्तारलेल्या प्रदेशामधून आम्ही तरंगत जात होतो; चंद्राचा लालभडक गोळा आकाशात उगवला होता, अंधारल्या पोकळीत चर्चच्या इमारती व खेडी बुडून गेली होती आणि दूरची शेते धुक्यात गुरफटली होती. चहा पिता पिता तरुणींशी गप्पा मारण्याइतपत ग्रीगोरी इवानीच धीट बनला. पण झेन्याच्या अतिरेकी अवधानतेवर माझा विश्वास नव्हता, तिच्या प्रेमळ, डोळे गोल फिरवून केलेल्या स्मितावर माझा विश्वास नव्हता. बहुधा ह्याच भावनने ती मॉस्कोत राजकीय मिरवणुकींच्या वेळी लाल रुमाल बांधत असेल अथवा ट्रेड युनियन समितीच्या कम्युनिस्ट अध्यक्षाकडे टवाळीच्या नजरेने पहात असेल... ही पोरगी महाधूर्त होती, बॉसबरोबर कसे वागायचे हे तिला चांगले ठाऊक होते. लौकरच आम्हाला समजले की, ती व सोन्या आलूपकाला जात आहेत, नंतर क्रिमियाच्या दक्षिण किनाऱ्याने फिरणार आहेत. त्या स्थळी पूर्वी शाळकरी वयात, १९१४ साली, केवळ त्या गेल्या होत्या, नंतर युद्धाची घोषणा झाली होती व सर्वत्र एकच घबराट माजली होती.

"पण तरीसुद्धा तुला बायदारी दरवाजे आठवतात, सोन्या?"

"आह्, बायदारी दरवाजे!" सोनेरी केसवालीने अत्यानंदाने तोंडाचा चंबू केला.

"तुम्हीसुद्धा सेवास्तोपोलपर्यंत चाललाय?" झेन्याने विचारले आणि तिच्या डोळयांमध्ये थेट आव्हान खेळत होते. पियानोपलिकडे, कोमेजलेल्या टयूलीपच्या पाकळयांच्या दिव्याखाली, ह्या डोळयांनी आत्तापर्यंत अशी किती आव्हाने फेकली असतील?

"नाही, मी सेवास्तोपोलपलिकडं जातोय. ते... बायदारी दरवाजे मी पूर्वीच पाहिलेत. आमची ब्रिगेड त्या सगळया प्रदेशातून गेली होती..."

ग्रीगोरी इवानीच काहीतरी खास सुचावे म्हणून प्रयत्नशील होता.

"माझ्यापाशी सगळं लिहिलेलं आहे–कुठं काय आहे. फार म-जे-दा-र! खार्कोवपलीकडं कोंबडीची पिलं... हवी तेवढी खा! हा-हा-हा!" ग्रीगोरी इवानीचचे घोगरे माफक हसणे बायकी होते. "त्यानंतर मेलीतोपोलपलीकडं तळलेले मासे. फार मस्त तळलेले मासे, हा-हा-हा!"

त्याला स्वस्थ बसवत नव्हते, तो आनंदाने उसळत होता, दुर्मुखल्या जोडप्याला सहानुभूती दाखविण्यासाठी चहाचा आग्रह करीत होता. प्रथम त्यांनी नकार दिला, पण नंतर पिशवीतून प्रचंड आकाराची लष्करी भांडी काढली व लाजत लाजत ग्रीगोरी इवानीचपुढे धरली. तो त्यांच्या भांडयात चहा ओतत राहिला, हाताला रग लागेपर्यंत खूप वेळ आणि संयम राखून ओतत राहिला. पण भांडयांना बहुधा तळच नव्हता. ग्रीगोरी इवानीच अवघडला, पण ओतणे थांबविले तर अधिकच विचित्र वाटले असते आणि शरमिंद्या मुद्रेने भांडे धरणाऱ्या स्त्रीलासुद्धा अवघडल्यासारखे झाले होते. तिचे काळे दात केविलवाणे स्मित करीत होते. पाहुणचाराच्या त्या प्रयत्नानंतर जणू कुणी अंगावर थुकले असावे, अशा तऱ्हेने ग्रीगोरी इवानीच गप्प बसला; धरणी दुभंगली आणि तिने पोटात घेतले तर बरे होईल, असे त्याला वाटत होते.

तिन्हीसांजांना आम्ही तूला शहरात शिरलो; चमकणाऱ्या दिव्यांची आनंदी प्रांतिक संध्याकाळ. दिव्यांच्या प्रकाशातील थंड वातावरणात पाय मोकळे करण्यासाठी तरुणी खाली उतरल्या व आमच्यापासून पूर्ण

अलिप्त राहून फलाटावर येरझाऱ्या मारू लागल्या. लष्करी भांड्यांच्या अनुभवानंतर ग्रीगोरी इवानीच त्यांच्यापाशी जाण्याचे धाडस करीत नव्हता. तो दूर अंतरावर एकाकी, दुर्मुखला उभा होता. पण मी खूष होतो. मला कोंडून ठेवणाऱ्या भिंती अखेर कोसळल्या होत्या. त्या ताज्या अंधारात निदान मी कल्पना करू शकत होतो की, प्रत्येक स्टेशनापलिकडे असीम शहर होते, त्यात हजारो आयुष्ये होती व त्यांच्यापैकी कोणतेही आयुष्य माझ्या आयुष्याला छेदून जाणे शक्य होते. आणि बेरेझ्नेवातका — अजून कुठेतरी जमिनीच्या काळया वक्राकार उंचवटयापलिकडे होते, अजून दुःखाच्या धुरकट वातावरणात रहात होते.

झेन्याने उबदार विणलेला स्वेटर घातला आणि उघडया खिडकीकडे ती कॉरीडॉरमधून गेली. बाहेर थंड रात्र होती, अद्‌भुत आरंभ आणि अंत नसलेली जंगले अखंडपणे भराभरा मागे सरकत होती, गाणे ऐकल्या-सारखे भासत होते. आता तिच्या खऱ्या, कुमारिकेच्या सुस्त चेहऱ्याला न्याहाळून पाहण्याची वेळ आहे! पण ग्रीगोरी इवानीच तेथे नव्हता. आगगाडीच्या दुसऱ्या भागात तो केविलवाणा फिरत होता. पुढच्या स्टेशनवर गुळगुळीत दाढी केलेला पहिल्या वर्गाच्या डब्यातील एक तरुण आमच्या खिडकीखालून गेला. त्याने रुबाबदार पोषाख केला होता आणि झेन्याकडे त्याने डोळे वर उचलले, तेव्हा संधिप्रकाशात ते अथांग भासले. तो फार छान गात होता. खिडकीखालील गाणे तुम्हाला माहीतच आहे — झाडे सळसळत असतात आणि स्वतःशीच चकित झालेला आनंद कुणीतरी त्या रात्रीत तुमच्याजवळून घेऊन जातो. बिचाऱ्या ग्रीगोरी इवानीचा, केवढा क्षण तू गमावलास! पण तेवढ्यात आमचा ग्रीगोरी इवानीच दिग्विजयी मुद्रेने कॉरीडॉरमधून धापा टाकीत आला — गाडी पकडायला बहुधा त्याला उशीर झाला होता — आणि प्रत्येक बगलेत त्याने एकेक प्रचंड कलिंगड धरले होते.

"कलिंगडांची मस्त जोडी आहे!" तो आम्हाला उद्देशून युक्रेनी भाषेत ओरडला आणि न राहवून त्याने परत घोगरे हास्य केले. कलिंगडे तशीच बगलेत धरून स्वतःच्या प्रचंड धूडासह धप्पदिशी आसनावर बैठक मारली.

"अहो, तुमचं नाव मला माहीत नाही! तिथं तुमच्या डोळयांमध्ये

कचरा जाईल. जरा बघा, अवघ्या वीस कोपेकना केवढ्या राक्षसांची जोडी मी विकत घेतलीय!"

झेन्या आळसटपणे आली. प्रकाशात तिचे डोळे धुंद आणि स्वप्नाळू भासत होते. तिने नकारार्थी मान हालविली: नाही, तिला नको आणि खूप थंडी आहे... तिने कपाळाला आठ्या घालीत अंगाला शहारा दिला. "सोन्या, आता झोपणार तू?" पण ग्रीगोरी इवानीचमध्ये काळ्या बंड-खोर शक्ती जागृत झाल्या होत्या आणि तो हार मानायला तयार नव्हता.

"तुम्ही कलिंगडावर जरा नजर टाका," तो चिकाटीने म्हणाला आणि दाणदिशी त्याने दोन्ही गुडघ्यांवर ते कलिंगड आपटले.

कलिंगड मधोमध फुटले आणि त्याच्यामधून शीगोशीग भरलेला रसदार, लालबुंद, साखरेसारखा मधुर गर त्याने चाकूने पटकन कापून झेन्यापुढे धरला.

"घ्या...!" आणि ग्रीगोरी इवानीचने जणू सुखाचे वाटप करावे त्याप्रमाणे आम्हा सर्वांना कलिंगडाच्या फाका वाटल्या.

मूक हास्याच्या उकळ्या फुटणाऱ्या झेन्याला नाही म्हणणे शक्य झाले नाही, ताठर लठ्ठीनेही कलिंगड घेतले. उदास जोडप्याने आणि मीही फाका स्वीकारल्या व वसंतामधील वितळणाऱ्या बर्फाचा वास येणाऱ्या त्या थंड गराचा आस्वाद घेतला. मघापर्यंत मौनाची परिसीमा गाठणाऱ्या ग्रीगोरी इवानीचने आता आम्हा पाचांच्या वाटणीची बडबड चालविली होती.

...रात्रीने वेढलेल्या बागांमध्ये आगगाडी थांबली.

मी बाहेर फलाटावर गेलो आणि दिव्याच्या निळसर प्रकाशात स्टेशनचे नाव वाचले. एके काळी देनीकिन आणि मामोन्तोव* इथून गेले होते व त्यांच्या पाठोपाठ आमच्या लाल सेनेच्या आगगाड्या धडधडत गेल्या होत्या. दिव्याकडे पाठ करून मी डोळे अर्धवट मिटले आणि ते दृश्य समोर उभे करण्याचा प्रयत्न केला: फुटलेल्या खिडक्या, स्टेशनच्या हॉलमध्ये राकेलच्या दिव्यांचा थरथरणारा प्रकाश, मॉस्कोविरुद्ध पाठ-

---

* १९१८–१९२० च्या यादवीत प्रतिक्रांतिकारकांचे नेतृत्व करणारे रशियन सेनापती – सं.

वलेले, फाटक्या कपड्यांमधले, निराश बनलेले, उवांनी भरलेले, बाकांवर आणि फरशीवर अंगांचा मुटकुळ्या करून झोपलेले रायफलधारी सैनिक; जखमी श्वापदांप्रमाणे ओरडणारी वाफेची इंजिने. पण मला ते दृश्य रेखाटणे जमले नाही — नदीने विळखा घालावा तसा गारठ्याने मला विळखा घातला; अंधुक बागांमधील दाट आणि कोवळी पाने शूरपणे सळसळत होती. गवतावर अंग झोकावे आणि स्तेपचा वारा खात झोपी जावे...

ग्रीगोरी इवानीचला मी दुरूनच ओळखले. दुसरे राक्षसी कलिंगड पोटाशी धरून तो आनंदाने उड्या मारीत डब्याकडे चालला होता. पायऱ्यांपाशी आमची एकमेकांशी टक्करच होणार होती, पण त्याने काळजीपूर्वक मला टाळले आणि घाबरट थरथर नाहीशी होईपर्यंत तोंड वळवून एका बाजूला उभा राहिला.

अंधाऱ्या डब्यात सारे लोक झोपले होते. माझ्या खांद्याला स्पर्श करून तो म्हणाला:

"अरेरे, उशीर झाला मला. फार छान कलिंगड आहे. पाहिजे तुम्हाला?" आणि त्याने गोंधळून दबत्या सुरात विचारले: "रात्री माझ्या बुटांचं काय करू? माझ्या पायांना वास मारतो."

"काहीतरी फालतू," मी म्हणालो.

तरीही तो हुतात्म्याप्रमाणे तसाच झोपी गेला, जड बुटांचे पाय फळीच्या कडेशी लोंबते ठेवून.

आता मी एकटाच जागा होतो आणि मामोन्तोवच्या मागावर आगगाडी किंचाळत धावत होती. एखाद्या काळ्या मेघाप्रमाणे रस्त्यांना, शहरांना आणि माझ्या स्वप्नांना काळोख्या मैदानांनी झाकोळून टाकले.

निर्झराच्या खळाळत्या पाण्याप्रमाणे इथे नुकतेच पीक येऊन गेले होते आणि शेकडो वेर्स्ता अंतरापर्यंत पिवळे खुंट उभे होते. झुडुपांमध्ये आणि पॉप्लरच्या झाडांमध्ये कमरेपर्यंत लपलेली दरोडेखोरांची ठाणी होती; फलाटावर अनवाणी बायका अन्न, भांडी, कलिंगडे घेऊन होत्या, खेड्यातील आणि बागांमधील सारी विपुलता घेऊन होत्या, त्यांचे गाल पिकलेल्या आलुबुखारांसारखे होते. स्टेशनावर सूर्य होता आणि पलिकडे ते वळत गेलेले दरोडेखोरांचे रस्ते; अगदी थोड्या काळापूर्वी ह्याच

रस्त्यांवरून माखनो, श्चूस, ख्मारा* यांनी लाल सेनेच्या तुकड्यांना हुलकावण्या दिल्या होत्या. त्यांपैकी एका रस्त्यावर, त्याच्या राखाडी-निळसर मऊ धुळीवर, बैल मंदपणे गाडी ओढत होते आणि सैन्यातून मुक्त झालेला, फिकट जाकीट घातलेला एक तरुण सैनिक गाडीतील बोजावर पालथा झोपून सुस्तावल्या डोळ्यांनी आगगाडीकडे पहात होता. खेड्यापलिकडील जुनाट खांबांच्या आणि गंजलेल्या काटेरी तारांच्या चरांमध्ये हंसपाद वनस्पतींची आणि झोंबणाऱ्या खाजकुयलींची दाटी माजली होती. चरांमध्ये कोळयाच्या जाळयाच्या व गवताच्या अंधारात कोंबड्या कलकलत होत्या.

सर्वत्र रान माजले होते, गलेलठ्ठ वाढले होते, आत्मतुष्टपणे आणि दुर्लक्षाने ढीग रचण्यात आले होते.

आमच्या डब्यात परत आम्ही कलिंगडे खाल्ली आणि खार्कोवजवळ स्वस्तातील कोंबडीची पिले खाल्ली; वस्तुत: खाण्याचा आम्हाला एव्हाना वीट आला होता. ग्रीगोरी इवानीचच्या किटलीमधून किती वेळा चहा प्यायलो त्याची गणतीच नाही. सोनेरी केसवाल्या तरुणीला एव्हाना मलावरोधाचा त्रास सुरू झाल्याची लक्षणे मी स्पष्ट पहात होतो, पण भाबडा ग्रीगोरी इवानीच त्या तरुणींना क्षणभरही दृष्टीआड करीत नव्हता, सतत त्यांच्या पाठोपाठ पहारेकऱ्यासारखा बुटांच्या आऱ्या खण-खणत फिरत होता. खार्कोवला स्टेशनवरील पत्रांच्या पेटीपर्यंत त्यांना सोबत करण्याचीही त्याने तयारी दाखविली. स्टेशनच्या संडासात शांतपणे विधी उरकण्याच्या हेतूने सोनेरी केसवालीने पत्रांच्या पेटीची युक्ती शोधून काढली होती, पण आता झेन्याचा दंड धरून वेदनांनी व्याकूळ होत ती फलाटावर तुरूतुरू चालत होती आणि हसून हसून मुरकुंडी वळलेली झेन्या पहिल्या वर्गाच्या डब्याकडे नेत्रकटाक्ष फेकण्याचा खेळ खेळत होती.

मला आसुरी आनंद होत होता: "आहा, माझं ऐकलं नाहीस, ग्रीगोरी इवानीच!" पण तो अस्तित्वातच नव्हता – त्या घोगऱ्या हस-

---

* १९१८-१९२० साली युक्रेनमध्ये सोविएत सत्तेला विरोध करणाऱ्या अराजकवादी टोळयांचे पुढारी – सं.

ण्यामागे आणि बुटांच्या आऱ्यांमागे अस्सल ग्रीगोरी इवानीच थोडाच होता?

तर अशा आत्मतुष्ट आणि बेपर्वाईच्या वातावरणामधील आमच्या डब्यात दुर्मुखल्या जोडप्याच्या जागी एक नवे जोडपे आले. ते दुर्मुखले जोडपे खार्कोव स्टेशनवर गुपचूप उतरून गेले होते. आता आलेल्या दणकट, रागीट चेहऱ्याच्या बाईपाशी अंगावर पिणारे मूल होते. तिचा नवरा, पेटत्या डोळ्यांच्या जिप्सीप्रमाणे दिसणारा तरुण, चार वर्षांच्या एका छोटचा मुलीला हाताशी धरून बाईपाठोपाठ आत आला. मग त्यांची पोती, त्यांच्या टोपल्या आणि त्यांची कांबळी आली. किंचाळणाऱ्या लहान बाळासकट त्या सर्वांचा ढीग सोनेरी केसवालीच्या बिछान्यावर टाकण्यात आला. बाईने आजूबाजूला लक्ष न देता सरळ आपला मोठा स्तन बाहेर काढला व बाळाला ती पाजू लागली. प्रत्येक थांब्याला तरुण माणूस लगबगीने फलाटावर धावत जायचा व खाद्यपदार्थ आणि गरम पाणी आणायचा. प्रत्येकाकडे बिनतक्रारपणे शांत, अपराधी मुद्रेने पाहणाऱ्या ह्या नम्र तरुणाला मी पूर्वी कुठेतरी पाहिले होते असे सतत भासत होते.

दोघी तरुणी तिरपे कटाक्ष टाकीत होत्या, खांदे उडवीत होत्या आणि त्यांच्या ओठांआड विष दडले होते. त्या खूप नाराज होत्या.

आणि खरोखरच, थोड्याच वेळाच्या अवधीत, कलिंगडाच्या सालींचा, गराचा व इतर न चावलेल्या तुकड्यांचा पायांखाली सडा पडला होता. त्या जोडप्याची मोठी मुलगी हातात कलिंगडाची मोठी फाक घेऊन निसरड्या घाणीवर मनसोक्त उड्या मारीत होती. ह्याच कारटीने गरम पाण्याने भरलेली किटली लठ्ठ सोनेरी केसवालीच्या अंगावर सांडण्याची करामतही केली.

सोनेरी केसवालीचा आता संयम तुटला: "उर्मटपणाची कमाल झाली... मला समजत नाही... घाण घालतात, गोंधळ करतात, माणसाचे कपडे खराब करतात. मी तक्रार करीन."

भोवती मुळीच न पाहता ती बाई तिच्या बाळाला डोलवत राहिली.

"अहो बाई," हस्तक्षेप करणे आता आवश्यक आहे असे वाटून मी म्हणालो, "ह्या अस्वच्छतेबद्दल तुम्हाला दंड करतील. बघा, कूपेत तुम्ही काय गोंधळ घातलाय."

तिने आतापर्यंत धरलेल्या मौनाचा स्फोट झाला.

"खुशाल दंड करोत!" ती किंचाळली. "मला मुलं आहेत, तुम्ही बघताय, मला मुलं आहेत! इथं जर तुम्हाला त्रास होतोय, तर पहिल्या वर्गातून प्रवास करा. काय एकेक माणसं..."

फळीवर हातांचे कोपर टेकून तरुण माणूस उभा होता आणि फक्त गालातल्या गालात हसत होता. त्याचे हे वागणे मला समजत नव्हते—चिवटपणा अथवा साधेपणा. मी त्याच्याकडे ठामपणे मुद्दाम नजर रोखली. तो माझ्याकडे सस्मित मुद्रेने पहात राहिला. जुन्या संकटकाळात हे **स्मित** पाहिल्याचे मला जाणवत होते, पण आठवत नव्हते. कठोर स्वरात मी बाईला उत्तर दिले:

"बाई, आम्ही कुठलीतरी माणसं नव्हेत, सोविएत कर्मचारी आहोत. लक्षात ठेवा!"

"आणि बसण्याची सगळी जागा तुम्ही एकटयानं अडवलीत!" सोनेरी केसवाली स्वतःचा ओला स्कर्ट सळसळवत रडव्या आवाजात ओरडली.

आता सुरू होणाऱ्या भांडणाला साक्षी राहण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती. मी उठलो आणि कॉरीडॉरच्या टोकाशी असलेल्या, खडखडाटाने भरलेल्या उघडया खिडकीपाशी किती तास उभा राहिलो, कोण जाणे!

अमर्याद दूरपर्यंत मैदाने सरकत होती. त्यांच्यापाठी क्षितिजावर पहाटेच्या उबदार प्रकाशात डोंगरमाथ्यांच्या जांभळ्या रेषा वर उठल्या होत्या. मी कल्पना केली: पहाटेच्या वेळी कुठल्यातरी परीकथेतील सेना त्या डोंगरकडेने संचलन करीत येत होती; अजून अदृश्य असलेल्या सूर्यामुळे शिपायांचे चेहरे गुलाबी चमकत होते. बेरेझ्नेवातकाच्या गीताची ती पहिली लकेर होती—ज्या भूमीने माझ्या तीनशे साथींचा बळी घेतला होता, त्या प्रत्येकाला मी त्याच्या पहिल्या नावाने ओळखत होतो. शयनयानांसकट आगगाडी रात्रीच्या वेळी त्यांच्यावरून धावत जाणार होती.

...रात्री धोक्याचा इशारा मिळाला.

रेलमार्गाच्या सेरेब्र्यानोये—बेरेझ्नेवातका विभागात आदल्या रात्री

दरोडेखोरांनी एक्स्प्रेस आगगाडी अडवली होती. म्हणून जंक्शनावर आमच्या आगगाडीत सशस्त्र सैनिकांची तुकडी चढली. १९१९ च्या अर्धवट विसरलेल्या तुफानांचा निःश्वास डब्यामधून वाहात गेला. अर्धवट अंधाऱ्या कूपेमध्ये प्रवासी गटागटांनी लगटून बसले; तरुण मंडळी हसत होती, वरच्या फळीवरील एक दाढीवाला चिंतायुक्त स्वरात म्हणाला : "सैतानच जाणे त्यांचे काय बेत आहेत, कदाचित एव्हाना कुठंतरी दबा धरून बसले असायचे!" "तुझ्यापाशी खूप पैसे असले पाहिजेत, म्हणून असा घाबराघुबरा होतोस!" फुगीर विजार घातलेला, फेंगडचा पायांचा एक पोरगा त्याला हसून म्हणाला.

आमच्या कूपेमध्ये एक मिणमिणती मेणबत्ती पेटविण्यात आली आणि ती बाई पुन्हा एकदा कुणाचीही दखल न घेता तिच्या बाळाला झोपविण्यासाठी डोलवू लागली. अशा आणखी किती कठोर संध्याकाळी ती आयुष्यात अनुभवणार आहे? मुकाट मदत करणाऱ्या तरुणाने त्या सर्वांना रात्रीचे खाऊ घातले, त्यांचे बिछाने बनवून दिले व पाणी आणायला तो गेला. त्यांच्यापायी माझा जीव घुसमटू लागला.

रात्र उदास होती, दरोडेखोरांना योग्य होती. धोका विसरावा आणि दिवसाउजेडी जाग यावी अशा हेतूने प्रवासी झोपण्याची घाई करीत होते. आता एकटचा असलेल्या सोनेरी केसवालीने स्वतःच्या गुबगुबीत मांडचा सबंध कूपेभर पसरीत मोठचा कष्टाने वरच्या फळीवर अंग लोटले. मी एकटाच जागा होतो.

ग्रीगोरी इवानीचचा शोध घेण्याचे मी ठरविले. आगगाडी उतारावरून चालली होती आणि कॉरीडॉरमधून जाताना माझे झोके जात होते. मी हात लावताच टोकाचे दार खाडकन उघडले—खडखडाट, घर्षण, गारठा. तो तेथे होता, पण एकटा नव्हता—दोघेही एकमेकांना आनंदाने लगटून खिडकीबाहेर ओणवून उभी होती.

प्रथम मला उमजले नाही. अर्थात, झेन्याला खरोखरीच दरोडेखोरांची भीती वाटत होती, म्हणून असे घडले होते. आता तिला कुणातरी रुंद, खात्रीपूर्वक सामर्थ्याचा आधार हवा होता. अन्यथा शेतगडचाच्या पंखाखाली एकदम तिने लपण्याचे दुसरे कारण काय?

"थोडचा पुढं स्टेशन येईल, मी दाखवीन तुम्हाला..." ग्रीगोरी

इवानीच म्हणत होता ; हा आवाज दुसऱ्या ग्रीगोरी इवानीचचा होता, "बघा, मी अजून जिवंत आहे आणि समुद्रकिनारी विश्रांतीला चाललोय. कदाचित आणखी तीन वर्षांनी परत ह्या भागातून जाईन आणि तेव्हा सगळं अनोळखी वाटेल, मी दोन भाषांमध्ये बोलत असेन..."

"आणखी सांगा," झेन्याने हळू आवाजात विनंती केल्याचे अथवा दुसरे काहीतरी नम्र, आर्जवी बोलल्याचे मी ऐकले ; त्यांनी मला पाहिले नव्हते, मी हळूच माझ्यापाठी दार बंद केले...

दु:खाच्या अंधुक भावनेने अचानक तेव्हा मला का घेरले, माहीत नाही : कदाचित माझा तर्क चुकला होता आणि आयुष्याने सहजपणे माझ्या दुबळ्या विचाराला पायदळी तुडविले होते म्हणून ; अथवा मलाही आयुष्यातून दिग्विजयी थाटात मिरवत जाण्याची इच्छा होती ?

मी माझ्या डब्यात परतलो व बाकड्यावरील माझ्या कोपऱ्यात बसून डुलकी काढू लागलो. सगळे झोपले होते ; तो नम्र तरुणसुद्धा माझ्यासमोर लोखंडी खांबाला डोके टेकवून बैठ्या अवस्थेत झोपला होता.

बेरेझ्नेवातका आता फार दूर राहिले नव्हते. बेरेझ्नेवातकापर्यंत ? म्हणजे पृथ्वीवर असे एक स्थळ खरेच होते ?

...मध्यरात्रीला सशस्त्र सैनिक आमचे कागदपत्र तपासायला आले.

जगाचे अंधुक हिंदकळणारे कोपरे झोपेत अर्धे गाडले गेले होते. तरुणानेही पेंगुळलेपणाने डोळे उघडले, माझ्यापाशी उजेडाची त्याने मागणी केली व काळजीपूर्वक स्वत:चे खिसे चाचपले.

"प्रथम हे घ्या माझं पक्षाचं कार्ड," अखेर तो म्हणाला, "आता पासपोर्ट शोधून काढतो."

दस्तऐवज तपासून पाहण्यासाठी दोन कपाळे दिव्याखाली एकमेकांना टेकली.

"एवढं पुरे आहे," आदरपूर्वक कठोर स्वरात ते म्हणाले.

झोपाळू, एकसुरी, धावणाऱ्या स्तब्धतेत आम्ही एकाकी उरलो. माझ्या समोरच्या माणसाचे डोळे मला हाक मारीत असल्याचे जाणवले.

"कॉम्रेड," पुढे झुकून खालच्या आवाजात तो एकदम म्हणाला, "मघाच्या प्रकाराबद्दल, माझ्या बायकोबद्दल, मी माफी मागणार होतो.

ती थोडीशी..." तो भलेपणाने हसला. "ती जरा चिडकी आहे. भूमिगत काम केल्यामुळं तसं झालंय!"

मी थोडासा चकित झालो, पण घाईघाईने नम्रपणे त्याला खात्री दिली की, मघाचे सर्व काही मी विसरून गेलो होतो. तो बोलायला उत्सुक भासला. दरोडेखोरांचा त्याने उल्लेख केला. मी म्हटले की, हा भाग माझ्या चांगल्या परिचयाचा होता — बेरेझ्नेवातकापूर्वी चढ येईल, आगगाडी डोंगरातून खोदून काढलेल्या मार्गातून जाईल आणि ही जागा छापा घालायला सर्वांत सोयीस्कर. पेरेकोपमधून कोंडी फोडून बाहेर पडलेल्या सहाव्या सेनेबरोबर मी इथं होतो.

तो आनंदित बनला.

"माहीत आहे मला. नंतर ती क्रिमियात आली. मी तिथला आहे."

सेनेच्या मुख्य ठाण्यावरील, खास विभागातील, अनेक माणसांची व अनेक डिव्हिजन कमांडरांची नावे त्या तरुणाने घेतली. पण माझे नाव त्याला आठवले नाही.

"कदाचित माझ्याबद्दल तुम्ही ऐकलं होतं? याकोवलेव, पार्तीझान*. आम्ही सहाव्या सेनेत सिम्फेरोपोलमध्ये दाखल झालो."

माझ्या अंगातून शहारा गेला. हा याकोवलेव? अर्थात, मला आठवला. डिव्हिजनच्या टेहळ्या कंपनीत आम्ही एकदा ह्या विशेष आकर्षक न दिसणाऱ्या तरुणाचा फोटो कुतूहलाने न्याहाळला होता. फाशीचा दोर कोणत्याही क्षणी गळ्यात लटकण्याचा धोका असलेला हा गनिमी सेनेचा, धाडसी तरुण नेता व्रान्गेलच्या पिछाडीचा ताबा घेत होता. याकोवलेव! केवळ जंगली श्वापदांना माहीत असलेल्या बर्फाळ वाटांवरून ऐन हिवाळ्यात याईला पर्वतरांगा ओलांडण्याचा विक्रम करणारा याकोवलेव ठाऊक नाही असा आमच्यात कोण होता? सेवास्तोपोलमध्ये फासावर चढविण्यात आलेल्या त्याच्या भावाबद्दल तो बदला घेत होता.

"सर्वांत अवघड हिवाळा होता. पण आम्ही तरीही निसटलो. बायदारीजवळच्या गुहेत लपलो. आत्ता जी माझी बायको आहे, तिच्या-

---

*गनिमी सैनिक. — सं.

मार्फत आम्ही सेवास्तोपोलच्या समितीशी संपर्क राखला होता."

ह्या माणसाचे बोलणे मी अत्यंत उत्सुकतेने ऐकत होतो. इत:पर डब्यातील रात्र नव्हती – आम्ही बेरेझ्नेवातकाच्या भूमीवर आमच्या आभासांबरोबर होतो. त्याने पुढे मला सांगितले की, कूप्यान्स्क तालुक्यात कुठेतरी तो मिलिशिया प्रमुख होता आणि आता त्याच्या घरापाशी, याल्टापासून जवळ, त्याची बदली झाली होती. बायदारी दरवाजे पुन्हा पाहण्याच्या हेतूने तो आणि त्याची बायको मुद्दाम सेवास्तोपोलमार्गे प्रवास करीत होतो. दु:खी आणि प्रभावी संगीताप्रमाणे आगगाडीचा खडखडाट ऐकू येऊ लागला. मी झोपेत असताना ग्रीगोरी इवानीच आल्याची चाहूल मला लागली. तो चोरपावलांनी आला व त्याचा ग्रेट-कोट घेऊन गेला; वारा घोंघावणाऱ्या खिडकीपाशी शरणागत खांद्यां-भोवती लपेटायला.

मी झोपेत असतानाच प्रकाशित बैठ्या बराकींची रांग मागे पसार झाली आणि बेरेझ्नेवातका आल्याचे मी ओळखले.

स्टेशनच्या भिकार हॉलमध्ये मी धावलो. वार्निश केलेला मोडका लाकडी दिवाण तेथे होता. लाल सेनेचे सैनिक टेलीफोनांपाशी उभे होते. त्या सर्वांपाशी रायफली होत्या. बंडाळीपूर्वी जशी अशुभ कुजबूज ऐकू येते तशी पुढील दालनात सैनिकांची हालचाल चालली होती. मी तार-कचेरीत गेलो: पूर्वीचाच मोठ्या नाकाचा, गिधाडासारखा दिसणारा आर्मेनियन तारयंत्राशी खुडखुडत होता. जणू त्या हस्तीदंती चाव्यांमधून सारे आयुष्य पसार झाले होते असे मला दाखविण्यासाठी तो 'कड-कट्ट' वाजवीत राहिला.

"संपर्क नाही," तो म्हणाला.

"आणि होणार नाही," मी म्हणालो. "आम्ही माघार घेतोय."

टेकडीच्या उंचवटयावरून मृत्यूपासून माघारी येणाऱ्या बटालियनकडे मी घोडा पिटाळला. सैनिकांचे चेहरे भकास दिसत होते, उन्हामुळे गुलाबी बनले होते. गोठलेला सूर्य खाली मृत्यूकडे पहात होता.

"मुख्य ठाण्याची पलटण कुठं आहे?" मी विचारले. माझा भाऊ तिचा मुख्य होता. कुणालाही माहिती नव्हती. माघारीला आडोसा मिळावा म्हणून आम्ही बळी दिलेल्या बटालियना टेकडीच्या पायथ्याशी

कुंपणांमागून अजून गोळीबार करीत होत्या. त्या बटालियना नष्ट होणार होत्या. जमिनीवर पालथ्या पडलेल्या लाल सैनिकांना ओलांडत मी घोड्यावरून चाललो होतो. चिंध्यांच्या ढिगांप्रमाणे ते भासत होते. पण अजून ते जिंवत होते, अजून निश्चयी होते, प्रत्यक्षात काय घडले होते ह्याबद्दल अजून अज्ञानी होते. माझ्या भावाने उडी मारली, कुंपणापाशी तो धावला आणि त्यावर चढण्यासाठी त्याने कुंपणं हातांनी गच्च पकडले.

"अलेक्सेय!" त्याला थोपविण्याचा प्रयत्न करीत मी ओरडलो. "तिकडं नव्हे, अलेक्सेय!"

त्याने मागे वळून पाहण्यापूर्वीच त्याला गोळी लागली. मी घोड्यावरून खाली उडी मारली आणि त्याची टोपी काढली. त्याच्या डोक्याच्या मागील बाजूचे केस लाल लगद्यासारखे बनले होते आणि त्यांच्याखाली एक खोल भोक पडले होते. मी कधीही न पाहिलेल्या थडग्यांवरून आता आम्ही धडाडत जात होतो. मंद हेलकाव्यांमुळे प्रत्येकाला झोप लागली होती; आणि मीही झोपलो.

पेरेकोपपलिकडे, सीवाशपलिकडे, पहाट झाली. किनारे नसलेले उबदार पांढरे गवत आणि आकाशात पक्षी – त्या पक्ष्यांना पर्वत व त्यांच्यापलिकडील निळाई पहायला मिळत असणार. जान्कोयाला सूर्य अचानक आमच्या आगगाडीवर झळाळू लागला आणि माध्यान्हीच्या प्रहराप्रमाणे स्टेशनच्या भिंती तात्काळ झळाळू लागल्या. अस्फाल्टच्या फलाटांवर काळया मखमाली सावल्या पडल्या. फलाटावर पाणी शिंपल्याचा त्या सावल्यांमुळे भास होत होता. थंड जागी गुलाबाची फुले विकत होते. होय, आम्ही निळया नंदनवनाच्या दारांपाशी होतो. पुन्हा एकदा स्तेपच्या पांढऱ्या उबेत आम्ही लपेटले गेलो. तेथे सकाळची झुळूकसुद्धा नेहमी उन्हाने भाजलेल्या कुठल्यातरी स्थळावरून येते आणि आनंदाने खिडकीबाहेर हात काढावेसे वाटतात, गरम चौकटीला गाल टेकवावासा वाटतो, स्वप्नात गुरफटावेसे वाटते आणि गाण्यांच्या ओळी गुणगुणाव्याशा वाटतात... गेल्या रात्रीच्या खुणा भीतीने माझ्या अंतरात चाचपतो. पण त्या नाहीशा झाल्यात. फक्त आगगाडीची मंद लय वाजतेय.

माझा विश्वास बसत नाही: माझ्या जगावर आडवी पडलेली,

कधीही क्षमा न करणारी ती सावली एखाद्या अंधाऱ्या कोपऱ्यातून अजून-ही माझ्यावर झेपावेल असे वाटते...

मुले जागी झाली होती आणि आमच्या फळ्यांखाली त्यांची चिवचिव चालली होती. याकोवलेवची लगबग परत सुरू झाली होती. दूरवर एक फिकट सावली सरकून गेली – एका सुंदर, अतुलनीय ईशस्तवनाचा प्रति-ध्वनी – मग्रूर डोळ्यांच्या, केस विस्कटलेल्या स्त्री-हेराची प्रतिमा, व्रान्गेल-च्या मुख्य ठाण्यावर फाशीच्या विधीच्या पूर्वसंध्येवेळी... थांबा, गुहा अजून पुढे आहे.

"ते पहा चातीरदाग," माझ्यापाठी तरुणी उद्गारल्या आणि माझ्या खिडकीपाशी धावल्या. त्या उन्मादी आनंदात त्यांचे भान हरपले होते आणि बेसावध मऊ स्तनांची ऊब माझ्या पाठीला त्या दाबत होत्या. त्यांच्या मागे ग्रीगोरी इवानीचचा सकाळच्या चुण्या पडलेला हसरा लाल चेहरा डोकावीत होता.

"सीम्फेरोपोल अजून लांब आहे?" त्याने मला हळूच विचारले.

"आणखी एक तास लागेल."

बिचाऱ्याला लौकरच आम्हा सर्वांचा निरोप घ्यावा लागणार आहे.

पुढच्या थांब्यावर कॉम्रेड याकोवलेव, गनिमी सेनेचा कमांडर, फळांच्या ठेल्यांपाशी गेला आणि टोपी भरून भलेमोठे जांभळे आलुबुखार व द्राक्षांचे मोठे पुडके विकत घेऊन आला. त्याने फळे त्याच्या बायको-च्या आतिथ्यशील ओच्यात ओतली आणि सगळे कुटुंब तेथून सावकाशपणे फळे उचलून मुकाटपणे खाऊ लागले. प्रसाधनगृहातून नुकत्याच बाहेर आलेल्या जाडचा सोनेरी केसवालीने तिच्या परफ्यूमचा गंध कूपेभर पसर-वून वातावरण शीतल केले होते आणि हातात आरसा धरून ती स्वतःचा चेहरा निरखत होती. तिच्या डोक्यामागे, पांघरुणे फडफडणाऱ्या खिडकी-पलिकडे, चुनखडी-निळसर पर्वत उंचावला, चमचमती भूमी दिसू लाग-ली – क्रिमिया. दरोडेखोरांचा, रात्रीचा केव्हाच विसर पडला होता; डब्यात ऊन पसरले होते आणि जीव घुसमटण्याइतपत उष्मा होता. पुरुष हैराणपणे सदऱ्यांच्या गळपट्ट्या पुढे खेचत होते: त्या पूर्ण फाडून टाकण्यास त्यांना आनंद वाटला असता.

सीम्फेरोपोलमध्ये ग्रीगोरी इवानीच रहस्यमय रीतीने गायब झाला.

फळीच्या टोकाशी त्याचा नेटक्या पट्ट्या बांधलेला बिस्तरा व त्याची सूटकेस होती. सैलशा सुती फ्रॉकमधून दिसणारी झेन्याची उघडी मान, सडपातळ पाठ आणि बंडखोर कुरळ्या बटांवर मागे धरलेले तिचे उघडे दंड मी कॉरीडॉरमधून पाहू शकत होतो. सोनेरी केसवालीशी तिचे भांडण चालू होते :

"सोन्या लाडके, मी काय करतेय त्याची मला पूर्ण जाणीव आहे. कृपा करून मला व्याख्यान देऊ नको!"

शेवटच्या घंटेपूर्वी काही क्षण ग्रीगोरी इवानीच अवतरला. त्याचा चेहरा खूप गोंधळलेला होता.

"मी सेवास्तोपोलपर्यंतचं तिकीट काढलं," अपराधी स्मित करीत तो म्हणाला. "तुमचे ते अद्‌भुत बायदारी दरवाजे पाहिलेच पाहिजेत."

सोनेरी केसवाली मत्सराने आणि कुचकटपणे उद्‌गारली :

"तुम्ही त्यांना पूर्वी पाहिलंय ना?"

"ते दुसरे होते," ग्रीगोरी इवानीच गडबडून म्हणाला. "नाव सारखं होतं, विसरलो. ती दुसरी जागा होती."

आकाशापर्यंत भिडणाऱ्या उंच कड्यांनी आगगाडीला वेढले होते. त्यांच्या दूरच्या, सपाट गवताळ माथ्यांवर गरमागरम उत्सवी माध्यान्ह कुठेतरी पसरली होती. जल्लोषाच्या क्षणिक रात्रींसारखे बोगदे गडगडत होते आणि अंधाराच्या प्रत्येक आगमनाबरोबर कॉरीडॉरमधून गुदगुल्या करणारा तरुणींचा परिचित हास्यध्वनी खळखळत होता. मॉस्को-सेवास्तो-पोल आगगाडीच्या आगमनाची वर्दी देणाऱ्या घंटा स्टेशनात एव्हाना वाजत असणार. आमच्या सूर्यप्रकाशित, आतुरल्या प्रवासाची अखेर आली होती! आमच्या पोलादी छातींमधील सर्व ताकद एकवटून आम्ही शिट्या वाजवीत होतो आणि फलाटांच्या शेवटच्या जंगलात आनंदाने घुसत होतो.

स्टेशनच्या रिकाम्या, पडदे टांगलेल्या हॉलच्या चकचकीत दारांवर व अस्फाल्टच्या फरशीवर सूर्यकिरणे नाचत होती. स्टेशनबाहेर जाण्याची कमान दिमाखात झळकत होती. तेथे सर्व तापलेले होते आणि प्रचंड, विपुलतेने फुटणाऱ्या लाटांचा विचार मनात येत होता.

बारा उतारूंच्या क्रिमिया-सहल बसची वाट पहात आम्ही आमच्या

सामानावर निर्वासितांप्रमाणे बसून होतो. जाहिरातींच्या फलकांवरून क्रिमिया सर्व बाजूंनी आमच्यावर कोसळत होता – निळाईत टांगलेल्या पांढऱ्या भिंतींच्या परीकथा, पार्श्वभूमीवर फुलबागा व समुद्र असलेले मावळतीच्या सावलीतील प्रासाद, आणि त्या फलकांमधून थेट संध्याकाळची आगगाडी पकडण्यासाठी मोटारी व बसगाड्या धावत येत होत्या, अजून गालांवर समुद्रकिनारीच्या खडकांची धूळ असलेल्या, उन्हात करपलेल्या कांतीच्या प्रवाशांचे लोंढे आणून ओतत होत्या. किती गहिरा खेद वाटत होता त्या लोकांना – आता ते मॉस्कोला चालले होते, परत मॉस्कोला!

कॉम्रेड याकोवलेवची बायको मुलांचे कपडे बदलत होती, तोवर तो माझ्याशी जुना परिचित असल्याप्रमाणे बोलत होता. क्रिमियात नोकरी करण्याचे स्वप्न तो फार पूर्वीपासून पहात होता. इथे घरची हवा आहे, मुले छान वाढतील, नोकरीत विशेष काळजी करण्यासारखी परिस्थिती नसेल – इथे असे काय घडणार! आणि त्याला व त्याच्या बायकोला केव्हापासून अपुरे राहिलेले शिक्षण पूर्ण करायचे होते.

"आज आम्ही तुमची गुंफा बघू," खोट्या बेफिकीरीने मी म्हणालो.

तो माझ्याकडे कसा पाहील आणि काय उत्तर देईल, हे माझ्या दृष्टीने फार महत्त्वाचे होते. तरुणाने माझ्या डोक्यावरील आकाशाकडे पहात स्मित केले.

आणि तो काहीही बोलला नाही.

बसमध्ये मला आणि सोनेरी केसवालीला पुढची आसने मिळाली. माझ्यापुढे सगळे असावेत अशी खरे म्हणजे माझी इच्छा होती. पण काही हरकत नाही, आता जेव्हा मला वाटेल तेव्हा तोंड वळवून मी सर्वांना पाहू शकत होतो.

सोनेरी केसवाली एकदम प्रेमळ बनली आणि उपनगरातील बोडक्या टेकड्यासुद्धा आनंदाने पाहू लागली.

"सुरेख, सुरेख," ती उद्‌गारत होती. बसच्या हादऱ्यांबरोबर तिचे मांस थुलथुलत होते.

आम्ही दमट बालाक्लावा दरीतून जात होतो. डोक्यावर ढग होते आणि उजवीकडील खेडी कंबरभर उंच हिरव्या दऱ्यांमध्ये लपली होती. निळे नंदवन आणखी पुढे होते. वळणा वळणांनी आम्ही वर चढत होतो.

ड्रायव्हरने गीअर बदलला आणि इंजिन वेगळ्या सुरात कण्हू लागले. जणू उंचीमुळे त्याच्या काळजाला पकड बसली होती. पांढरट कुरळ्या उतारांचे डोंगर आमच्या जवळ जवळ येत होते. आणखी वरती जाणे शक्य नव्हते — आमच्या खालती हवा होती, खुरटी झुडुपे व श्वास रोधून टाकणाऱ्या खोल दऱ्या. आता आम्ही खाली झेपावणार होतो.

"आ-ह!" ग्रीगोरी इवानीच घाबरटपणाचा आव आणत चीत्कारला.

आम्ही पोकळीत कोसळत होतो, बसला झुडुपे खरचटत होती, आमची फुफ्फुसे रिती बनली होती. मी भोवती नजर टाकली. झेन्याने ग्रीगोरी इवानीचचा दंड पकडला होता व ती त्याला बिलगली होती. ती असहाय होती, तिच्या सर्व खोल्या व मम्मी हरवल्या होत्या. ग्रीगोरी इवानीचचे डोळे माझ्या डोळ्यांना भिडले, पण ते अत्यानंदापायी काहीही पहात नव्हते...

बायदारीमध्ये आम्ही विश्रांती घेतली. आगामी संध्येचा गंध वातावरणात दरवळत होता. थोडा पावसाचा शिडकावा झाला होता आणि आता पाईनच्या झाडांवरून ऊन व वारा येत होते. गारव्यामुळे ठेल्यांमधील द्राक्षांवर हिरवे दंव पसरले होते. आमचा प्रवास कधी संपणारच नाही असे भासत होते... कदाचित ते स्वप्न होते.

होय, ते स्वप्नच होते. एकेकाळी पार्तीझान येथील खिंडीमधून गेले होते. आणखी एक वळण आणि कुणाचेतरी डोळे ज्याचा शोध घेत होते त्याला पाहणार होते; त्या हिरव्यागार उंच शिखरावरील पाईनच्या वृक्षांमधील काळोख्या पोकळीकडे टक लावून पाहणार होते. पर्वताचा गोलाकार खांदा आता मागे सरत होता, झुडुपांची निळसर रेषा उतरत होती, रस्त्याच्या दुसऱ्या बाजूच्या रितेपणाची खूण... होय, ह्याचीच मी वाट पहात होतो — अचानक खुपसल्या जाणाऱ्या सुऱ्याप्रमाणे माझ्या पाठीमागील माणसाच्या काळजात उमटणारी कळ मला जाणवत होती. भूतकाळातीळ दिग्विजयी आणि भयानक प्रकाशझोत मला जाणवत होता, तेथील जीवन नव्या तेजोवलयात दाखवत होता. कदाचित माझ्या कल्पनांचा खेळ असेल. माझ्यापाठी बसलेल्या दोन अंधुक चेहऱ्यांना पाहण्यासाठी मी डोके वळविले. मी त्यांना शोधत होतो, पण त्याऐवजी ग्रीगोरी इवानीच मला दिसला — डोळे मिचकावणारा भुतासारखा हसरा चेहरा — आणि अनेक डोळे, विस्फारणारे व परत एकदम फिकट निळे होणारे.

बायदारी दरवाजांपाशी आम्ही जाऊन ठेपलो! पर्वतांच्या भिंती सताड उघडल्या होत्या. कड्याच्या अगदी टोकाशी ड्रायव्हरने सहजपणे बस थांबवली – काळीज गोठवून टाकणाऱ्या निळसर पोकळीच्या टोकाशी. आमच्यापुढे आणि आमच्याखाली काहीही नव्हते – फक्त आकाश आणि जगावर चढणारी थरथरती दिग्विजयी निळाई.

सागर.

बसमध्ये चीत्कार उमटत होते, कुजबूज चालली होती, उत्तेजक वातावरण पसरले होते. सोनेरी केसवालीने सर्वात प्रथम जमिनीवर उडी मारली व कड्याच्या टोकापाशी ती धावली.

"सुंदर, देवा, किती सुंदर!"

खालच्या खिंडीत जणू कोल्हा दृष्टीला पडला अशा थाटात ग्रीगोरी इवानीचने खिशातून रिवॉल्वर उपसले व तो धावला.

"खबरदार! मारू नका, खबरदार!" झेन्या किंचाळली व रस्त्यावरून त्याच्यामागून धावत गेली.

आता कॉम्रेड याकोवलेव दांपत्याला मी पाहणे आवश्यक होते. बाळाला पाजण्यापुरता अवसर आहे अथवा नाही, ह्याबद्दल ड्रायव्हरपाशी बाई विचारणा करीत होती. "तेवढा वेळ आहे," ड्रायव्हर उत्तरला. माझ्यासमोर उलगडलेल्या अथांग सुंदर जगावरून माझे डोळे दुसरीकडे वळविणे अशक्य झाले होते. असीम क्षितिजावर सागर पसरला होता – काल तो असाच पसरला होता, आमच्याविना, आणि त्या जंगली, खळाळत्या स्तब्धतेत गेली हजारो वर्षे तो तसाच पसरून होता. माझ्या पायाखालील हिरव्या पोकळीत मी शहरे कल्पिली... टोकदार दगडावर उभा राहिलेला मठ. पाकोळयांच्या बेभान घिरट्या... पण तरीसुद्धा ती माणसे पाहणे आवश्यक होते.

...आणि नम्रपणे खाली वाकलेले बाईचे मस्तक व तिच्या मानेवरील मऊ कुरळया केसांचा विस्कटला संभार मी पाहिला. पर्वतांमध्ये गारवा पसरला होता. ग्रेटकोटापासून बनवलेला कोट तिच्या खांद्यांवर होता – त्या तुफानी अमर वर्षांचा श्वास त्या कोटाच्या घड्यांमध्ये अजून राहिला होता. तरुण पुरुष खिशात हात घालून तिच्याशेजारी उभा होता व तिच्या स्तनांकडे टक लावून पहात होता. त्याच्या पापण्यांचे

आनंदी अर्धवर्तुळ बनले होते. त्यांच्यावर सागराची झाक व स्तब्धता पसरली होती.

मी चेहरा वळविला व चिरंतन पाषाणांच्या आणि पाण्याच्या जीवनाने निर्माण केलेल्या असीम अद्‌भुताला पाहू लागलो. रेशमी स्कर्टमधील लठ्ठ पोरगी चिंताक्रांत बनली होती आणि झेन्या कुठे आहे अशी प्रत्येकापाशी चौकशी करीत होती. पण झेन्याची काळजी कुणाला? फक्त मला दिसत होते—हातांवर तरुणीला उचलून त्या धोकेबाज निळाईच्या कडेने झुडुपांमधून हसत ग्रीगोरी इवानीच कसा धावत गेला होता!

१९२५



आंद्रेय प्लातोनोव

फ्रो

आंद्रेय प्लातोनोव (१८९९-१९५१). आंद्रेय प्लातोनोव यांनी तरुणपणी कवितालेखनाने आरंभ केला, पुढे ते लघुकथा लिहू लागले आणि १९२७ मध्ये त्यांनी पहिले पुस्तक प्रसिद्ध केले.

प्लातोनोव यांचे नायक सामान्य माणसे आहेत आणि वरवर पाहता त्यांच्यात कोणतेही श्रेष्ठपण नाही. पण नंतर लेखकाच्या इच्छेनुसार ही माणसे त्यांची अफाट आत्मिक भांडारे उघडी करतात: औदार्य, प्रेम, दयाळूपणा, प्रतिसाद देण्याची वृत्ती. क्रांतीच्या स्वच्छ करणाऱ्या वादळाने माणसांमध्ये ह्या गुणांना जाग आली असे ते दाखवितात.

ते स्वतःच म्हणाले होते की, त्यांचा मुख्य विषय होता: "माणसातील मानवतेची प्रगती, अमानुषतेवरील मानवतेचा विजय." दुसऱ्या महायुद्धादरम्यान त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांमध्ये हा विषय फार ठळकपणे गुंफला आहे. युद्धवार्ताहर म्हणून प्लातोनोव अनेकदा आघाड्यांवर गेले होते व त्यांनी लक्षणीय मनोधैर्य दाखविले होते. फॅसिझमच्या मानवविरोधी आशयाविरुद्ध त्यांनी आपला जीवनाग्रही, आशावादी साहित्यगुण पूर्णतया वापरला. 'पाण्यातल्या सरड्यांविरुद्धचे युद्ध' ह्या कारेल चापेक यांच्या कादंबरीवरील लेखात प्लातोनोव यांनी जगभरच्या लेखकांना आवाहन केले होते: "तुमच्या पोलादी उपरोधी लेखण्यांनी वेड्या माणसाचे मठ्ठ डोके फोडा आणि मानवतेचा चालू, तरीही अत्यंत क्रूर शत्रू असलेल्या फॅसिझमच्या सावलीने केवळ तात्पुरती ग्रासलेली अफाट मोकळी जागा भविष्यकाळ म्हणून दाखवा."

शारीरिक जखमांपेक्षा मानसिक युद्ध-जखमा भरून येण्यास फार काळ लागेल, असे युद्धानंतर म्हणणाऱ्या पहिल्या लेखकांपैकी प्लातोनोव एक होते. पण ह्या काळात लिहिलेल्या कथांमध्येसुद्धा प्लातोनोव नेहमीप्रमाणे आशावादी राहिले होते, शेवटी माणसात वाईटापेक्षा चांगले जास्त उरेल अशी नेहमी आशा प्रकट करीत होते.

तो खूप दूर, प्रदीर्घ काळासाठी गेला होता; जवळ जवळ कधीही परत येणार नव्हता. एक्स्प्रेस आगगाडीचे इंजिन दिसेनासे झाले व मोकळ्या मैदानात त्याने निरोपाचे गाणे म्हटले. प्रवाशांना सोडायला आलेली माणसे फलाटावरून निघून गेली व आपापल्या नित्याच्या आयुष्यांमध्ये गुंतली. एक पोर्टर दांडपोतेरे घेऊन आला आणि वाळूच्या किनाऱ्यावर रुतलेल्या जहाजाचा डेक स्वच्छ करावा, त्याप्रमाणे फलाट स्वच्छ करू लागला.

"जरा बाजूला व्हा, बाई!" गुबगुबीत पायांच्या एकाकी जोडीला उद्देशून तो म्हणाला.

ती बाई भिंतीवर लटकावलेल्या पत्रांच्या पेटीपाशी गेली आणि पत्रे गोळा करण्याच्या वेळा तिने वाचल्या: पत्रे वारंवार गोळा केली जात होती आणि दररोज पत्र लिहिले तरी चालले असते. तिने पेटीच्या धातूवरून बोट फिरविले: पेटी दणकट होती, तिच्यात टाकलेल्या पत्रातील कुणाचेही काळीज तेथून भरकटले नसते.

स्टेशनपलिकडे नवीन रेलनगरी वसली होती. घरांच्या पांढऱ्या भिंतींवर झाडांच्या पानांच्या सावल्या डोलत होत्या; सायंकालीन उन्हाळी सूर्याने श्वासोच्छ्वासाला हवा नसलेल्या जणू पारदर्शी पोकळीतून निसर्गाला व इमारतींना स्पष्टपणे आणि उदासपणे उजळून काढले होते. रात्र पडण्यापूर्वी जगातील प्रत्येक गोष्ट फार ठळक बनली होती, डोळे दिपवून टाकत होती आणि भुतासारखी भासत होती — त्यामुळे हे जग अस्तित्वात नसल्यासारखे वाटत होते.

ह्या विचित्र प्रकाशाला पाहून ती तरुणी आश्चर्याने थबकली — तिच्या

बीस वर्षांच्या आयुष्यात अशी रिती, चमकती, नि:स्तब्ध उघडी जागा कधी पाहिल्याचे तिला आठवत नव्हते. हवेच्या तरलपणामुळे, ज्या पुरुषावर ती प्रेम करीत होती तो परत येईल अशी आशा वाटल्यामुळे, तिच्या काळजात लकाकले. केशप्रसाधनाच्या दुकानाच्या खिडकीवर तिने स्वत:चे प्रतिबिंब पाहिले ; सामान्य चेहरा, केसांना फुगवून बन-विलेल्या कुरळया बटा (एकोणीसाव्या शतकात अशी केशरचना लोकप्रिय होती) आणि तीव्रपणे, कृत्रिम प्रेमळपणाने पाहणारे राखी खोल डोळे. दूर निघून गेलेल्या पुरुषावर प्रेम करण्याची तिला सवय झाली होती आणि तिच्या देहात व तिच्या सामान्य, कंटाळवाण्या आत्म्यात नवीन मधुर आयुष्य जन्मावे म्हणून त्याच्याकडून सतत, अखंड प्रेमाची ती अपेक्षा करीत होती. मात्र ती स्वत: तिच्या इच्छेनुसार सतत आणि सखोल प्रेम करू शकत नव्हती. काहीवेळा ती थकून जायची आणि तिचे काळीज न दमणारे नव्हते ह्याचा खेद वाटून ती रडायची.

तीन खोल्यांच्या नव्या फ्लॅटमध्ये ती रहात होती. रेलइंजिनाचा ड्रायव्हर असलेला तिचा विधुर बाप एका खोलीत रहात होता आणि ती तिच्या नवऱ्याबरोबर दोन खोल्यांमध्ये रहात होती. कसलीतरी गूढ विद्युतसामग्री बसविण्यासाठी व चालू करण्यासाठी तिचा नवरा आता अतिपूर्वेत गेला होता. यंत्रांच्या रहस्यांशी तो सतत गुंतलेला असायचा. मानवजातीच्या हितासाठी आणि आनंदासाठी अथवा दुसऱ्या कशासाठी तरी – नेमके कशासाठी ह्याची त्याच्या बायकोला नक्की माहिती नव्हती – यंत्रांमार्फत जग बदलून टाकण्याची आशा तो बाळगून होता.

म्हातारपणामुळे तिचा बाप क्वचितच दूर प्रवासाला जात होता. तो राखीव मेकॅनिक म्हणून काम करीत होता – म्हणजे आजारी माण-सांच्या बदली, नुकत्याच दुरुस्त केलेल्या इंजिनांना परत वापरात आण-ण्याचे अथवा जवळच्या अंतरांवर कमी वजनाच्या मालगाड्या नेण्याचे काम करीत होता. एक वर्षापूर्वी त्याला पेन्शनवर पाठवायचा प्रयत्न झाला होता. पेन्शनीचा अर्थ न उमगल्यामुळे म्हातारा प्रथम कबूल झाला, पण चार दिवसांच्या स्वातंत्र्यानंतर पाचव्या दिवशी तो सिग्नल-पाशी गेला, प्रवेशाला मनाई असलेल्या पट्ट्यात एका उंचवट्यावर बसला आणि अवजड आगगाड्या ओढत नेणाऱ्या इंजिनांना अश्रुभरल्या डोळ्यांनी

बघत रात्री उशीरापर्यंत तेथेच बसून राहिला. त्यानंतर दररोज तो त्या उंचवटयावर जाऊन इंजिने बघत बसायचा, आठवणींमध्ये आणि कल्पनांमध्ये रमायचा व जणू खूप दूरचा प्रवास करून आल्याप्रमाणे संध्याकाळच्या वेळी थकलाभागला घरी परतायचा. घरी आल्यानंतर हात धुवून उसासा टाकीत म्हणायचा की, नऊ हजाराव्या उतारापाशी एका डब्याचा ब्रेक तुटून पडला अथवा आणखी काहीतरी घडले, मग जणू कडक दांडा धरल्यामुळे डाव्या हाताच्या तळव्याला सूज आली असावी अशा थाटात त्याला व्हॅसेलिन चोळ असे मुलीला चाचरत सांगायचा, नंतर जेवायचा, काहीतरी सटरफटर गोष्टींवर बडबड करायचा व पटकन सुखाने गाढ झोपी जायचा. दुसऱ्या दिवशी सकाळी सेवानिवृत्त मेकॅनिक पुन्हा प्रवेशाला मनाई असलेल्या पट्टयात जायचा आणि नेहमीप्रमाणे त्याच्या एकाकी उत्साहाच्या कल्लोळात इंजिने पहात, रडत, कल्पना लढवत व सहानुभूती बाळगत दिवस घालवायचा. जाणाऱ्या इंजिनात काही बिघाड झालाय अथवा ड्रायव्हर स्वतःचे काम नीट करीत नाही असे जर त्याला वाटले, तर त्या उंचवटयावरून मोठयांदा ओरडून तो टीका करायचा आणि सूचना द्यायचा: "पाणी फार झालंय! अरे मूर्खा, झडप उघड! मोकळं कर!", "वाळू सांभाळ, नंतर गरज भासेल! कशासाठी शिंपडतोस निष्कारण?", "चाकांच्या कडा घट्ट कर, सगळी वाफ वाया घालवू नको. हे इंजिन आहे, वाफेची आंघोळ करायचा हमामखाना नव्हे!" जेव्हा आगगाडीची जुळणी चुकीची असायची, रिकाम्या वाघिणी सर्वांत पुढे अथवा मध्यभागी लावल्यामुळे अचानक ब्रेक लावल्यास चिरडण्याची शक्यता असायची, तेव्हा सेवानिवृत्त मेकॅनिक उंचवटयावर उभा व्हायचा आणि शेवटच्या डब्यातील गार्डला उद्देशून मुठी वळवून धमकावायचा. जेव्हा त्याचे स्वतःचे इंजिन त्याचा पूर्वीचा मदतनीस वेनिआमिन चालवीत न्यायचा, तेव्हा म्हाताऱ्याला हमखास काहीतरी मोठी चूक सापडायची. तशी चूक त्याने स्वतःच्या कारकीर्दीत कधीही सहन केली नसती. निष्काळजी मदतनीसावर ताबडतोब कारवाई कर, असा सल्ला तो ड्रायव्हरला द्यायचा: "अरे वेनिआमिन, वेनिआमिन, त्याच्या हाण थोबाडात!" प्रवेशाला मनाई असलेल्या पट्टयातील उंचवटयावरून म्हातारा मेकॅनिक ओरडायचा.

ढगाळ हवेच्या दिवशी तो बरोबर छत्री घ्यायचा आणि त्याची एकुलती एक मुलगी उंचवटयावर त्याचे दुपारचे जेवण घेऊन यायची, कारण संध्याकाळी रोडावल्या, भुकेल्या अवस्थेत व कामाची इच्छा अतृप्त राहिल्यामुळे चिडलेल्या मन:स्थितीत घरी परतणाऱ्या बापाची तिला दया यायची. पण अलीकडेच, म्हातारा त्याच्या उंचवटयाच्या जागेवरून नेहमीप्रमाणे ओरडत होता आणि शिव्यागाळी करीत होता तेव्हा रेल डेपोच्या कम्युनिस्ट पक्षाच्या समितीचे चिटणीस कॉम्रेड पीस्कूनोव म्हाताऱ्यापाशी आले व त्याला हाताला धरून त्याला डेपोत घेऊन गेले होते. कचेरीच्या व्यवस्थापकाने म्हाताऱ्याची इंजिन विभागात परत नेमणूक केली होती. थंड इंजिनाच्या केबिनमध्ये मेकॅनिक चढला, बंबाशी बसला आणि अत्यानंदापायी तेथेच झोपी गेला होता. बंबाला त्याने एका हाताने मिठी घातली होती, जणू तो बंब म्हणजे संपूर्ण कामकरी जनतेचे पोट होता आणि म्हातारा त्याच्याशी एकरूप झाला होता.

"फ्रोस्या!" नवऱ्याला प्रदीर्घ प्रवासावर निरोप देऊन स्टेशनवरून नुकत्याच परतलेल्या मुलीला तो म्हणाला. "फ्रोस्या, चुलाण्यातून मला काहीतरी खायला दे. कुणास ठाऊक, ऐन रात्री मला कामावर बोलावतील..."

कोणत्याही क्षणी त्याला कामावर बोलावतील अशा अपेक्षेने तो वाट पहात बसून रहायचा, पण तसे क्वचितच घडायचे. तीन-चार दिवसांच्या अवधीनंतर एखादी संमिश्र, कमी वजनाची मालगाडी नेण्याची अथवा दुसरी साधी कामगिरी निघायची. पण पूर्वतयारी न करता, भुकेल्या आणि दीनवाण्या परिस्थितीत कामगिरीवर जाण्याची त्याला भीती वाटायची. म्हणून स्वत:च्या आरोग्याची, मन:स्थितीची आणि पचनाची तो चांगली काळजी घ्यायचा, कारण सर्वोत्कृष्ट प्रतीचा महत्त्वाचा कामगार म्हणून तो स्वत:ला पहात होता.

"नागरिक मेकॅनिक!" अधूनमधून तो स्वत:ला उद्देशून म्हणायचा, अत्यंत प्रतिष्ठितपणे शब्दांचा उच्चार करायचा आणि जणू दुरवरून येणारा टाळयांचा कडकडाट ऐकतोय अशा थाटात अर्थपूर्ण मौनाने प्रतिसाद द्यायचा.

फ्रोस्याने चुलाण्यातून भांडे काढले व बापाला काहीतरी खायला

दिले. सायंकालीन सूर्याच्या किरणांनी फ्लॅट उजळून काढला होता. फ्रोस्याच्या देहापर्यंत ती किरणे पोहोचली होती आणि त्या देहात तिचे हृदय सतत रक्ताला ऊब देत होते, रक्ताचा उपसा करीत होते, जीवनाची जाणीव करून देत होते. ती स्वतःच्या खोलीत गेली. टेबलावर तिच्या नवऱ्याचा बालपणीचा फोटो होता. मोठेपणी त्याने स्वतःचा फोटो कधीच काढला नव्हता, कारण त्याला स्वतःमध्ये स्वारस्य नव्हते आणि आपला चेहरा महत्त्वाचा वाटत नव्हता. पिवळट पडत चाललेल्या त्या फोटोत भल्या मोठ्या डोक्याचा एक मुलगा फाटक्या सदऱ्यात व सामान्य विजारीत अनवाणी उभा होता. त्याच्या पाठीमागे जादूच्या झाडांसह एक कारंजे व राजवाडा होता. अद्याप ज्ञात नसलेल्या जगाकडे तो मुलगा लक्षपूर्वक टक लावून पहात होता, त्याच्या पाठीमागे टांगलेल्या फोटोग्राफरच्या पडद्यावरील अद्भुत जीवनाकडे त्याचे ध्यान नव्हते. अद्भुत जीवन खुद्द त्या मुलामध्येच होते. खेळण्याऐवजी हातात झाडाची डहाळी धरलेल्या आणि विश्वासू अनवाणी पायांनी जमिनीला स्पर्श करणाऱ्या त्या रुंद, उत्सुक, भित्र्या चेहऱ्यात अद्भुत जीवन सामावले होते.

एव्हाना रात्र पडू लागली होती. गावाचा गुराखी रात्रीच्या मुक्कामासाठी स्तेपमधून गायी घेऊन परतत होता. गायी आपापल्या मालकांच्या दारांशी प्रवेश मिळावा म्हणून हंबरत होत्या: बायका, घरच्या कारभारणी, गायींना गोळा करून गोठ्यांमध्ये नेत होत्या. प्रदीर्घ दिवस रात्रीमध्ये थंड बनत होता. दूर गेलेल्या पुरुषाच्या प्रेमात व आठवणींमध्ये न्हात फ्रोस्या संधिप्रकाशात बसून होती. खिडकीबाहेरच्या पाईन वृक्षांनी सुखी स्वर्गीय अवकाशाच्या दिशेने सरळ वाटचाल सुरू केली होती. काही साध्या पक्ष्यांचे मंद आवाज शेवटची झोपाळू गाणी गात होते आणि रात्रीचे पहारेकरी असलेले रातकिडे सौम्य किरकिरीमार्फत सर्व ठीक असल्याचे व जागता पहारा देत असल्याचे सांगत होते.

फ्रोस्या क्लबात जाणार आहे का असे तिच्या बापाने तिला विचारले. तेथे "फुलांची लढाई" नावाचा नवा कार्यक्रम होता आणि रेल कंडक्टरांच्या विभागामधील काही हौशी कलावंतांचे कार्यक्रम होते.

"नाही," फ्रोस्या म्हणाली, "मी नाही जाणार. मी नवऱ्याच्या आठवणीनं झुरत बसून राहीन."

"फेद्याच्या?" मेकॅनिक म्हणाला. "तो येईल परत. वर्षभरानंतर उगवेल... बैस झुरत! मी एक-दोन दिवसांसाठी घरापासून लांब गेलो म्हणजे तुझी आईसुद्धा झुरत बसायची. पांढरपेशा घरातली होती!"

"मी पांढरपेशा नाही, तरीसुद्धा नवऱ्यासाठी झुरतेय!" आश्चर्याने फ्रोस्या म्हणाली. "नाही, बहुतेक मीसुद्धा पांढरपेशा आहे..."

बापाने तिची समजूत घातली:

"तू कुठली पांढरपेशा!.. आता पांढरपेशे उरले नाहीत. ते केव्हाच मेले. पांढरपेशा बनायला अजून तुला खूप काळ जगलं पाहिजे आणि अभ्यास केला पाहिजे. त्या फार छान बायका होत्या..."

"बाबा, तुमच्या खोलीत जा," फ्रोस्या म्हणाली. "लौकरच तुम्हाला जेवण वाढीन, पण आत्ता मला एकटं रहायचं आहे..."

"आत्ता जेवायची वेळ झालीय," बापाने संमती दिली. "कुणास ठाऊक, डेपोतून निरोप्या यायचा. कुणी आजारी पडला असेल, किंवा दारू पिऊन झिंगला असेल, किंवा कुणाच्या घरात कौटुंबिक झगडा झाला असेल, काही नेम नाही. अशा वेळी मला थेट हजर व्हावं लागेल: दळणवळण कधीही थांबवून चालत नाही! तुझा फेद्का आता एक्स्प्रेस-मधून वेगात चाललाय, हिरवे सिग्नल त्याच्यासाठी पेटलेत, चाळीस किलोमीटर पुढचा रस्ता त्याला मोकळा आहे, मेकॅनिक लांबवर नजर टाकतोय, विजेनं सगळे कंट्रोल उजळलेत, सगळं जसं असावं तसं आहे!"

म्हातारा खोलीतून बाहेर जायला नाखूष होता. येरझाऱ्या घालीत तो पुढे बडबडत राहिला. जेव्हा त्याचे काळीज आणि मन इंजिनात गुंतलेले नसायचे, तेव्हा स्वतःच्या मुलीच्या अथवा इतर कुणाच्याही संगतीत रहायला त्याला आवडायचे.

"बाबा, जेवायला जा!" मुलीने त्याला आज्ञा केली. तिला रात-किड्यांची किरकिर ऐकायची होती, खिडकीमधून रात्रीचे पाईन पहायचे होते आणि नवऱ्याबद्दल विचार करायचा होता.

"हलकट झालीय!" बाप हळूच म्हणाला आणि खोलीबाहेर गेला.

बापाला जेवण वाढून फ्रोस्या घराबाहेर पडली. क्लबात खूप धमाल चालली होती. तेथे संगीत वाजत होते. मग कंडक्टरांच्या विभागातील हौशी वृंदगायक गायले: "झाडात झाड सुरेख पाईनचं हो! शंकूची

फळं त्यावर लोंबतात हो!", "झुक झुक झुक जाते आगीनगाडी, घर्र घर्र घर्र जातं विमान, कड कड कड जाते हिमभंजन नौका... आमच्या-बरोबर सगळे गुडघ्यात वाका, आमच्याबरोबरच सरळ उभे रहा, म्हणा 'झुक-झुक-घर्र-घर्र', पाय हलवा, आणखी हालचाल, आणखी संस्कृती, आणखी उत्पादन – हेच आमचं ध्येय...!"

क्लबातील प्रेक्षक आज्ञाधारकपणे हालचाली करीत होते, लाजून पुटपुटत होते, हौशी कलाकारांच्या आज्ञांचे पालन करताना मनोरंजना-पायी हाल सोसत होते.

फ्रोस्या पुढे चालत गेली. रस्त्यावर दोन्ही बाजूला झाडांच्या संरक्षक रांगांविना दुसरे काही नव्हते. दुरवरून पूर्वेच्या दिशेने एक्स्प्रेस आगगाडी येत होती, मोकळ्या मैदानातून गाडीला दिग्विजयीपणे पळवताना इंजि-नाचा फुसफुसाट चालला होता, शिरोभागावरील दिव्यामधून समोरचा रस्ता ते उजळून टाकत होते. ही आगगाडी कुठेतरी अतिपूर्वेला जाणा-ऱ्या एक्स्प्रेसला भेटली होती, फ्रोस्याने आपल्या लाडक्याचा निरोप घेतल्या-नंतर ह्या डब्यांनी तिला पाहिले होते आणि स्वतःनंतर तिच्या नवऱ्याला भेटणाऱ्या ह्या आगगाडीला फ्रोस्या डोळ्यात प्राण आणून एकटक पाहू लागली. ती स्टेशनकडे तडक निघाली, पण जेव्हा ती स्टेशनवर पोहो-चली, त्या दरम्यान थोडा वेळ थांबून आगगाडी पुढे निघून गेली होती. भेटलेल्या सर्व लोकांना विसरून शेवटचा डबा अंधारात नाहीसा झाला. फलाटावर अथवा स्टेशनच्या इमारतीत एकही अनोळखी चेहरा फ्रोस्याला दिसला नाही. आगगाडीतून एकही प्रवासी उतरला नव्हता आणि वाटेत भेटलेल्या एक्स्प्रेसबद्दल व फ्रोस्याच्या नवऱ्याबद्दल विचारणा करण्यासाठी कुणीही नव्हते. कदाचित कुणीतरी त्याला पाहिले असेल आणि त्याच्या-बद्दल काही माहीत असेल!

पण स्टेशनात फक्त दोन म्हाताऱ्या बायका मध्यरात्रीच्या लोकलची वाट पहात होत्या आणि दिवसाचाच माणूस तिच्या पायांखालील घाण लोटत होता. जेव्हा तुम्ही उभे राहून विचार करीत असता, तेव्हा ही माणसे नेहमी झाडलोट करीत असतात, त्यांना कुणीही आवडत नाही.

फ्रोस्या झाडूवाल्यापासून दूर झाली, पण तो परत तिच्यापाशी आला.

"तुम्हाला माहीत आहे का," तिने त्याला विचारले, "दोन

नंबरची एक्स्प्रेस सुरळीत जातेय ना? इथून दुपारी गेली. तिच्याबद्दल स्टेशनवर काही बातमी नाही सांगितली?"

"आगगाडी येत असते तेव्हाच फलाटावर उभं रहायला परवानगी असते," झाडूवाला म्हणाला. "आता एकही आगगाडी यायची नाही, तेव्हा स्टेशनात जा, बाई... सतत इथं माणसं उगीच घोटाळत असतात, त्यापेक्षा घरी तंगड्या वर करून वर्तमानपत्रं वाचावीत. पण नाही, त्यांना ते शक्य होत नाही, इथं कचरा करत फिरतात..."

फ्रोस्या रेलमार्गावरून स्टेशनच्या विरुद्ध दिशेने निघाली. तेथे मालगाड्यांचा गोल डेपो होता, कोळशाचा ढीग होता, राखेचे खड्डे होते आणि शंटिंगचे रूळ होते. उंच दिव्यांनी आसमंत उजळून काढला होता, वाफेचे आणि धुराचे लोट उसळत होते. काही इंजिने प्रवासासाठी जोरात वाफ भरत होती, काही वाफ सोडत होती, धुण्यापूर्वी थंड होत होती.

फ्रोस्याजवळून चार बायका हातात लोखंडी फावडी घेऊन गेल्या व त्यांच्या पाठोपाठ एक पुरुष गेला. तो फोरमन अथवा पथक-प्रमुख होता.

"इथं कोण हरवलंय तुझं, सुंदरी?" त्याने फ्रोस्याला विचारले. "हरवलं असशील तर सापडणार नाही, जो जातो तो परत येत नाही... चल आमच्याबरोबर वाहतुकीत मदत करायला!"

फ्रोस्या विचारात पडली.

"दे फावडं!" ती म्हणाली.

"हे घे माझं," पथक-प्रमुख उत्तरला आणि त्याने फ्रोस्याला फावडे दिले. "ए बायांनो!" तो इतर बायकांना उद्देशून म्हणाला. "तिसऱ्या पिटापाशी जा, मी पहिल्यापाशी जातो..."

इंजिने ज्या ठिकाणी भट्ट्यांमधील राख टाकीत, त्या पिटापाशी त्याने फ्रोस्याला आणले व तिला कामाला सुरुवात करायला सांगून तो निघून गेला. दोन बायका आधीच तेथे काम करीत होत्या, गरम राख फावड्यांनी उपसत होत्या. फ्रोस्यासुद्धा त्यांच्यापाशी खड्ड्यात उतरली आणि काम करू लागली. दोन अनोळखी मैत्रिणी तिच्या शेजारी होत्या ह्याचा तिला आनंद झाला होता. उष्णतेमुळे व कडवट वायूमुळे श्वासोच्छ्वास करणे अवघड जात होते. राख फावड्याने उपसणे दमविणारे, अवघड काम होते, कारण खड्डा अरुंद होता व त्यात फार गरम होत

होते. तरीही फ्रोस्याला मजा वाटू लागली होती : इथे स्वत:च्या चिंता ती विसरू शकत होती, नव्या मैत्रिणींबरोबर काम करू शकत होती, ताऱ्यांनी आणि विजेच्या दिव्यांनी उजळवून टाकलेली मोठी, मुक्त रात्र पाहू शकत होती. तिचे प्रेम तिच्या हृदयात शांतपणे झोपले होते ; एक्स्प्रेस खूप दूर अदृश्य झाली होती आणि तिचा नवरा सैबेरियाने वेढलेल्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यात वरच्या फळीवर झोपला होता. खुशाल झोपू दे त्याला आणि कसल्याही चिंता त्याला करायला लागू नयेत. ड्राय-व्हरला समोर दूरपर्यंत लक्ष ठेवू दे आणि अपघात न होण्याची खबरदारी घेऊ दे!

लौकरच फ्रोस्या व दुसरी एक बाई पिटातून बाहेर आल्या. त्यांनी उपसलेली राख आता आगगाडीच्या उघडया डब्यात भरायची होती. ते काम करता करता दोघी बायका एकमेकींकडे अधूनमधून पहात होत्या, गप्पा मारीत होत्या, थोडा वेळ काम थांबवून ताजी हवा घेत होत्या.

फ्रोस्याची मैत्रीण तीस वर्षांची होती. स्वत:च्या वाईट कपडयांबद्दल ती सतत बडबडत होती, त्यांना सारखे करीत होती, कुडकुडत होती. कुणा दुष्ट माणसाच्या कुचाळकीमुळे चार दिवस तिला तुरुंगाची हवा खावी लागली होती व आजच तिची सुटका झाली होती. तिचा नवरा सहकारी गुदामावर पहारेकरी म्हणून काम करीत होता, हातात रायफल घेऊन सबंध रात्र तो पहारा द्यायचा व ह्या कामाबद्दल त्याला महिना साठ रूबल पगार मिळत होता. ती तुरुंगात होती तेव्हा तो रडला होता आणि तिची सुटका व्हावी म्हणून अधिकाऱ्यांपाशी रदबदली करा-यला तो गेला होता. वस्तुत: त्याआधी ती एका प्रेमिकाबरोबर रहात होती आणि त्याने चुकून नकळतपणे स्वत:च्या अफरातफरीच्या भानगडी तिला सांगितल्या होत्या (कदाचित तो थकला होता किंवा भ्यायला होता) आणि नंतर घाबरून त्याने तिचा काटा काढायचा प्रयत्न केला होता, त्याच्याविरुद्ध साक्षीदार राहू नये म्हणून. पण आता तो स्वत:च पकडला गेला होता. खुशाल हवा चाखो तुरुंगाची. ती मुक्त झाली होती आणि यापुढे नवऱ्याबरोबर राहणार होती : काम होते, पाव आता विक्रीला होता आणि अंगावर कपडे घालण्यापुरते पैसे ती दोघे मिळवतील.

फ्रोस्याने तिला सांगितले की, तीसुद्धा दु:खात होती : तिचा नवरा खूप दूर गेला होता.

"गेला म्हणजे मेला नव्हे, परत येईल!" फ्रोस्याच्या कामगार-मैत्रिणीने तिचे सांत्वन केले. "मला अटक झाली तेव्हा माझी अवस्था फार केविलवाणी झाली होती. काळीज कुरतडत होतं. पूर्वी कधी तुरुंगात गेले नव्हते, तुरुंगाची सवय नव्हती. तशी सवय असती तर एवढं कठीण गेलं नसतं. मी कधीही बेकायदेशीर जगले नव्हते आणि कायद्यानं मला कधी हात लावला नव्हता... तिथून सुटल्यानंतर घरी आले, माझ्या नवऱ्याला खूप आनंद झाला, रडलासुद्धा. पण मला मिठी मारायला भीत होता – त्याला वाटत होतं, मी गुन्हेगार म्हणजे फार मोठी व्यक्ती. पण माझ्यात काहीही बदल झाला नव्हता, मी साधी आहे... संध्याकाळी त्याला कामावर जाणं भाग होतं, आम्हा दोघांना फार वाईट वाटलं. बंदूक उचलून म्हणाला : 'चल, मी तुला लेमन पाजतो' पण मला दु:खानं घेरलं होतं, काही केल्या उल्हास वाटेना. मी त्याला एकट्यालाच कँटीनमध्ये जायला सांगितलं. पिऊ दे त्याला लेमन. जेव्हा आमच्यापाशी पैसे येतील आणि माझं तुरुंगाचं दु:ख निघून जाईल, तेव्हा आम्ही दोघं एकत्र कँटीनमध्ये जाऊ. मी त्याला असं सांगितलं आणि इथं काम करायला आले. इथं काही ना काही काम मिळेल अशी माझ्या मनात आशा होती. रात्रीच्या वेळीसुद्धा काही कामं असतात. मनाशी विचार केला, सोबतीला दुसरी माणसं भेटतील, हुरूप वाटेल, डोकं शांत होईल. आणि खरंच, जणू तू माझी चुलत बहीण आहेस असं समजून तुझ्याशी बोलले, मनाला खूप शांत वाटतंय... चल, आटपू या, हा डबा भरून टाकला पाहिजे. कचेरीत पैसे देतात. सकाळी पाव विकत घ्यायला जाईन... फ्रोस्या!" खाली खड्ड्यात काम करणाऱ्या दुसऱ्या फ्रोस्याला उद्देशून ती ओरडली. "अजून तिथं खूप राख उरलीय?"

"नाही," खड्ड्यातील फ्रोस्या म्हणाली. "इथं अगदी कमी आहे."

"तर मग वरती ये," पहारेकऱ्याच्या बायकोने तिला आज्ञा केली. "लौकर काम आटपू, पैसे घ्यायला एकत्र जाऊ."

त्यांच्या भोवती इंजिनांचा फुसफुसाट चालू होता. काही इंजिने

दूरच्या प्रवासासाठी वाफ भरून घेत होती, तर काही विश्रांतीपूर्वी शेवटचे सुस्कारे टाकत होती.

फोरमन आला.

"कसं काय, बायांनो? पिटातलं काम संपवलं? छान! ताबडतोब कचेरीत जा, मी आलोच? तिथं पैसे घ्या. मग तिथं ठरवू: कोण क्लबात नाचायला जाणार, कोण घरी पोरांना झोपवायला जाणार! तुम्हाला उद्योग फार!"

कचेरीत बायकांनी सह्या केल्या: येफ्रोसीन्या येवस्ताफ्येवा, नताल्या बूकोवा आणि "येवा" अशा अक्षरांसारखे कोयता-हातोड्याचे चिन्ह दुसऱ्या येफ्रोसीन्याच्या सहीऐवजी. ती अजूनही निरक्षर होती. त्यांना प्रत्येकी तीन रूबल व वीस कोपेक मिळाले आणि त्या आपापल्या घरी निघाल्या. फ्रोस्या येवस्ताफ्येवा व पहारेकऱ्याची बायको नताल्या एकत्र बाहेर पडल्या. आंघोळ करून स्वच्छ होण्यासाठी फ्रोस्याने नव्या मैत्रिणीला स्वतःच्या घरी बोलाविले.

तिचा बाप स्वयंपाकघरात पेटीवर पूर्ण कपडे घालून झोपला होता. त्याने अंगात जाडजूड हिवाळी जाकीटही घातले होते व इंजिनाच्या चित्राचा बिल्ला लावलेली टोपी घातली होती. अचानक कामावर बोलाविण्यात येईल अथवा काही तांत्रिक बिघाडापायी तात्काळ त्याला तेथे हजर रहावे लागेल, अशा तयारीत तो झोपला होता.

बायकांनी गुपचूप आपली कामे पार पाडली, थोडी पावडर फासली, खुदकन हसल्या आणि बाहेर पडल्या. एव्हाना बराच उशीर झाला होता व क्लबात बहुधा नाच आणि "फुलांची लढाई" सुरू झाले होते. जेव्हा फ्रोस्याचा नवरा लाकडी फळीवर खूप दूरवर झोपला होता, त्याच्या काळजात फ्रोस्याबद्दल कोणतीही भावना नव्हती, आठवण नव्हती, प्रेम नव्हते, तेव्हा तिला सबंध जगात खूप एकटे वाटत होते, सुख-दुःखापासून ती मुक्त होती व काही काळ नाचावे, संगीत ऐकावे, इतर लोकांचे हात धरावेत, असे तिला वाटत होते. सकाळी जेव्हा तो तेथे एकटा जागा होईल आणि एकदम तिची आठवण काढील, तेव्हा कदाचित ती रडणार.

दोघी बायका लगबगीने क्लबाशी धावल्या. लोकल गाडी धडधडत

गेली : मध्यरात्र, अजून फार उशीर झाला नव्हता. क्लबात हौशी जाझ-बँड वाजत होता. 'रिओ-रीता' नाचासाठी फ्रोस्या येवस्ताफ्येवाला इंजिन ड्रायव्हरच्या मदतनीसाने तात्काळ निमंत्रण दिले.

अत्यंत आनंदी चेहऱ्याने फ्रोस्या नाचायला गेली : तिला संगीत आवडायचे ; संगीतामध्ये दु:ख आणि सुख खऱ्या आयुष्याप्रमाणे व तिच्या अंत:करणात होते त्याप्रमाणे अविभाज्यपणे एकमेकांशी गुंफलेले होते, असे तिला भासायचे. नाचताना तिला स्वत:चा विसर पडला होता. ती एका विलक्षण तंद्रीत होती, अद्भुत अवस्थेत होती, तिच्या देहाच्या सहज हालचाली घडत होत्या, कारण संगीताचे सूर फ्रोस्याचे रक्त गरम करीत होते.

"'फुलांची लढाई' ह्याआधी झाली?" धपापत्या श्वासाने तिने हलक्या आवाजात जोडीदाराला विचारले.

"नुकतीच संपली. तुम्ही उशीर का केलात?" अर्थपूर्ण रीतीने साहाय्यक इंजिन ड्रायव्हर म्हणाला. जणू तो कायम फ्रोस्याच्या प्रेमात होता आणि सतत तिच्यासाठी झुरत होता.

"अयाई, किती वाईट!" फ्रोस्या म्हणाली.

"तुम्हाला इथं आवडतं?" तिच्या जोडीदाराने विचारले.

"अर्थातच आवडतं!" फ्रोस्या उत्तरली. "इथं खूप छान आहे!"

नताशा बूकोवाला नाचता येत नव्हते, ती भिंतीपाशी उभी होती आणि त्या रात्रीच्या मैत्रिणीची टोपी तिने हातांमध्ये धरली होती.

वाद्यवृंद विश्रांतीसाठी थांबला होता तेव्हा फ्रोस्या व नताशाने लेमोनेडच्या आख्ख्या दोन बाटल्या पिऊन फस्त केल्या. नताशा ह्या क्लबात फक्त एकदा आली होती. त्या स्वच्छ, छान सजवलेल्या हॉलकडे भित्र्या आनंदी मुद्रेने ती पहात होती.

"फ्रोस्या, ए फ्रोस्या!" ती दबल्या आवाजात म्हणाली. "समाजवादात सगळ्या जागा अशा होतील का ग?"

"अर्थातच!" फ्रोस्या म्हणाली. "कदाचित यापेक्षा जास्त चांगल्या होतील!"

"हे काही वाईट नाही!" नताल्या बूकोवाने संमती दर्शविली.

विश्रांतीनंतर फ्रोस्या परत नाचली. आता तिला शंटिंग ओव्हरसी-

अरने नाचाचे आमंत्रण दिले होते. बँडवर 'माय बेबी' फॉक्सट्रॉट वाजत होता आणि ओव्हरसीअरने जोडीदारणीला घट्ट धरले होते, तिच्या केसांना स्वतःचा गाल चिकटविण्याचा तो प्रयत्न करीत होता, पण त्याच्या ह्या गुपचूप लडिवाळपणामुळे फ्रोस्या मुळीच उत्तेजित झाली नाही. खूप दूर असलेल्या माणसावर ती प्रेम करीत होती, तिचा बिचारा देह मिटलेला आणि बधीर बनलेला होता.

"तुमचं नाव काय?" नाचाच्या मध्येच तिच्या जोडीदाराने तिच्या कानात विचारले. "तुमचा चेहरा माझ्या माहितीचा आहे, पण तुमचे वडील कोण हे मात्र मी विसरलो."

"फ्रो!" फ्रोस्या उत्तरली.

"फ्रो? तुम्ही रशियन नाही?"

"अर्थातच नाही!"

ओव्हरसीअर क्षणभर विचारात पडला.

"नाही कशा? तुमचे वडील तर रशियन आहेत: येवस्ताफ्येव!"

"ते महत्त्वाचं नाही," फ्रोस्या अस्फुटपणे म्हणाली. "माझं नाव फ्रो!"

ती मुकाटपणे नाचू लागली. हॉलभोवती उभे असलेले लोक नाचणाऱ्यांना पहात होते. फक्त तीन जोडपी नाचत होती–बाकीची नाचायला लाजत होती, किंवा त्यांना नाचता येत नव्हते. फ्रोस्याने ओव्हरसीअरच्या छातीवर डोके टेकले. तिच्या जुन्या धर्तीच्या केशरचनेकडे त्याने पाहिले व तिची ही किंचित विश्वासदर्शक कृती त्याला खूप आवडली. लोकांपुढे त्याला स्वतःचा अभिमान वाटला. हळूच तिच्या डोक्यावरून हात फिरविण्याची त्याला इच्छा झाली, पण लोकांमध्ये बभ्रा होईल म्हणून तो घाबरला. शिवाय त्याची अधिकृत भावी पत्नी तेथे हजर होती आणि ह्या फ्रो पोरीशी प्रणयचेष्टा केल्याबद्दल नंतर तिने त्याची कडक हजेरी घेतली असती. म्हणून सभ्यतेखातर ओव्हरसीअर फ्रोपासून किंचित दूर सरकला, पण फ्रो पुन्हा त्याच्या छातीशी व टायशी बिलगली. तिच्या डोक्याच्या वजनामुळे त्याचा टाय बाजूला सरकला व सदऱ्यापासून उघडी छाती डोकावू लागली. घाबरलेल्या आणि शरमलेल्या मनःस्थितीत ओव्हरसीअर नाचत होता, संगीत

थांबण्याची अधीरतेने वाट पहात होता. पण संगीत अधिकाधिक उत्तेजक बनत होते आणि फ्रोने त्याला चक्क मिठी घातली. अचानक त्याला त्याच्या छातीवरील केसांवरून ओलसर थेंब टपकत असल्याचे जाणवले.

"तुम्ही रडताय?" घाबरून त्याने विचारले.

"थोडीशी," फ्रो पुटपुटली. "मला दारापाशी घेऊन चला. पुढं नाचायची माझी इच्छा नाही."

तिचा जोडीदार नाचत नाचत तिला दारापर्यंत घेऊन गेला व ती तात्काळ कॉरीडॉरमध्ये सटकली. तेथे कमी माणसे होती.

नताशा मैत्रिणीच्या टोपीसकट बाहेर आली. फ्रोस्या घरी गेली, पण नताशा सहकारी गुदामाकडे तिच्या पहारेकरी नवऱ्याकडे निघाली. गुदामाशेजारी बांधकाम साहित्याचे आवार होते, तेथे एक छान बाई राखण करायची आणि तिच्याशी आपल्या नवऱ्याची काही भानगड आहे अथवा नाही, ह्याबद्दल नताशाला खात्री करून घ्यायची होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी सैबेरियातील एका स्टेशनवरून, उरालच्या पलीकडून, फ्रोस्याला एक तार आली. तिच्या नवऱ्याने लिहिले होते: "प्रिय फ्रो, माझं तुझ्यावर प्रेम आहे आणि मी स्वप्नात तुला पाहतो."

तिचा बाप बाहेर गेला होता. तो डेपोत गेला होता: विश्रांतीच्या खोलीत इतरांशी गप्पा मारायला, 'शिटी' वाचायला, खेच-विभागात रात्र कशी गेली हे जाणून घ्यायला, मग मित्राबरोबर कँटीनमध्ये जाऊन बीयर पिता पिता जिव्हाळ्याच्या चार गोष्टी बोलायला.

फ्रोस्याने दात घासले नाहीत. तिने तोंडावर पाण्याचे जेमतेम शिंतोडे उडविले आणि चेहऱ्याची रंगरंगोटी करण्याची तसदी घेतली नाही. स्वतःच्या प्रेमभावनेव्यतिरिक्त इतर कोणत्याही गोष्टीवर वेळ वाया घालविण्याची तिची इच्छा नव्हती आणि इतःपर स्वतःच्या देहाबाबत तिला स्त्रीसुलभ आस्था वाटत नव्हती. फ्रोस्याच्या खोलीच्या छतामधून, दुसऱ्या मजल्यावरून, बाजाचे सूर सतत ऐकू येत. संगीत थोडा वेळ थांबायचे व पुन्हा सुरू व्हायचे. अजून पुरते उजाडले नव्हते तेव्हाच फ्रोस्या सकाळी जागी झाली होती, मग परत झोपली होती आणि तेव्हासुद्धा तिने ही साधी सुरावट ऐकली होती; शेतात राबणाऱ्या छोटचा राखी पाखराच्या गाण्यासारखी. त्या पाखराची सारी शक्ती

कामात खर्च झाल्यामुळे गाण्याला त्याला दमसास पुरत नाही. वरच्या मजल्यावर डेपोतील लेथचालकाचा छोटा मुलगा रहात होता. मुलाचा बाप बहुधा कामावर गेला असावा आणि आई कपडे धूत असावी – आणि मुलगा एकटेपणापायी कंटाळला असावा. काहीही न खाता फ्रोस्या तशीच रेल दळणवळण आणि सिग्नलच्या क्लासांना निघाली.

येफ्रोसीन्या येवस्तापयेवा चार दिवस क्लासांना गेली नव्हती आणि तिच्या मैत्रिणी बहुधा तिच्या आठवणी काढीत होत्या, पण आता अनिच्छेनेच त्यांना भेटायला जात होती. फ्रोस्याला क्लासांमध्ये खूप सवलती मिळायच्या, कारण तिची शिकण्याची क्षमता उत्तम होती व तांत्रिक विषयांची तिला फार गहन समज होती, पण तिला स्वतःला मात्र हे कसे जमत होते ते समजायचे नाही. अनेक बाबतीत तिच्या नवऱ्याचे अनुकरण करीत ती जगत होती; तो दोन तांत्रिक इन्स्टिटयूटमधून पार पडला होता व स्वतःच्या शरीराच्या नाडीप्रमाणे यंत्रांची नाडी त्याला कळायची.

प्रथम तिचा अभ्यास अगदी वाईट चालला होता. प्यूपिनची विद्युत प्रवर्तक वेटोळी, प्रक्षेपण उपकरणे अथवा धातूच्या तारेची प्रतिकारशक्ती मोजणे, अशा गोष्टींमध्ये तिचे मन रमत नव्हते. पण एक दिवस तिच्या नवऱ्याच्या ओठांनी ह्या शब्दांचा उच्चार केला आणि कल्पक रीतीने त्या काळया, नीरस यंत्रांची महत्त्वाची कार्ये तिला समजावून सांगितली, तिला मृत भासणारी ती यंत्रे ज्या सुरेख आकडीमोडींमुळे जगत होती त्या गूढ गुणांचे रहस्य तिला समजावून सांगितले. फ्रोस्याच्या नवऱ्याला वैयक्तिक भावनेप्रमाणे विद्युतप्रवाहाचा दाब कळायचा. त्याच्या हातांचा अथवा मनाचा स्पर्श घडणाऱ्या सर्व गोष्टी सजीव बनायच्या, त्यामुळे कोणत्याही यंत्रणेतील शक्तींचा प्रवाह त्याला खरोखरीच समजायचा, यंत्राच्या धातूचा वेदनादायी, चिवट प्रतिकार त्याला साक्षात जाणवायचा.

तेव्हापासून वेटोळी, व्हीटस्टोनचे पूल, संपर्कक आणि प्रकाश – एकके ह्या वस्तू फ्रोस्याला मौल्यवान वाटू लागल्या; जणू तिच्या लाडक्या माणसाचे ते सजीव भाग होते. तिला त्या वस्तू समजू लागल्या, त्यांना ती मनात जपू लागली. जेव्हा तिला काही समजेनासे व्हायचे, तेव्हा ती

घरी येऊन केविलवाणेपणे म्हणायची : "फ्योदर, आम्ही मायक्रोफॅरॅड आणि वाट चुकलेले प्रवाह शिकतोय. मला कंटाळा आला!" पण दिवसभराच्या त्यांच्या विरहानंतर जेव्हा तो बायकोला आलिंगन द्यायचा, तेव्हा काही काळ खुद्द फ्योदर मायक्रोफॅरॅड आणि वाट चुकलेला प्रवाह बनायचा. फ्रोस्या चक्क स्वतःच्या डोळ्यांनी त्या वस्तू बघायची, ज्या पूर्वी तिला समजून घ्यायच्या होत्या, पण समजत नव्हत्या. मैदानातील रानटी फुलांप्रमाणे त्या साध्या, नैसर्गिक आणि आकर्षक होत्या. रात्री फ्रोस्याला वारंवार दुःख व्हायचे की, ती केवळ स्त्री होती आणि फ्योदर-प्रमाणे मायक्रोफॅरॅडमध्ये अथवा वाफेच्या इंजिनात किंवा विजेमध्ये रूपांत-रित होऊ शकत नव्हती. त्याच्या गरम पाठीवरून ती हळूच बोट फिर-वायची, पण तो गाढ झोपलेला असायचा आणि जागा व्हायचा नाही. का कुणास ठाऊक, पण त्याचे शरीर नेहमी गरम असायचे. एकूण तो विचित्र माणूस होता. क्षुल्लक गोष्टींवर पैसे खर्च करणे त्याला आव-डायचे, ऐन गोंगाटात तो गाढ झोपू शकायचा, चांगले अथवा वाईट असे कसलेही अन्न खायचा, कधीही आजारी पडत नसे आणि चीनच्या दक्षिणेतील सोविएत भागात जाऊन तेथे सैनिक बनण्याच्या योजना आखत होता...

आता फ्रोस्या येवस्ताफ्येवा वर्गात बसली होती तेव्हा तिचे विचार दुबळे, सैरभैर बनले होते आणि वर्गात शिकविण्यात येणारी एकही गोष्ट तिच्या डोक्यात शिरत नव्हती. फळ्यावरील आकृतीची तिने वहीत कशीबशी नक्कल काढली आणि उच्च स्वरसंवादावर लोखंड साचल्यास काय परिणाम होतात ह्याबाबतचे अध्यापकांचे व्याख्यान खिन्नपणे ऐकत बसली. फ्योदर निघून गेला होता; आता दळणवळण आणि सिग्नल तिला आकर्षक वाटत नव्हते, वीज हा विषय एकदम परका बनला होता. प्यूपिनची विद्युत प्रवर्तक वेटोळी, मायक्रोफॅरॅड, व्हीटस्टोन पूल इत्यादी गोष्टी तिच्या काळजात सुकून गेल्या होत्या व विद्युत प्रवाहां-मधील उच्च स्वरसंवादशास्त्रासंबंधी ओ का ठो तिला कळत नव्हता. लहान मुलाने बाजावर वाजविलेले एकसूरी छोटे गाणे तिला सारखे आठवत होते : "आई धुतेय कपडे, बाबा गेले कामावर, खूप वेळ ते नाही येणार, मला एकटयाला खूप खूप कंटाळा आलाय!"

फ्रोस्याने व्याख्यानाकडे पूर्ण दुर्लक्ष केले व वहीत ती स्वतःचे विचार लिहू लागली : "मी मूर्ख, मी केविलवाणी मुलगी आहे, फेद्या, लौकर ये, मी दळणवळण आणि सिग्नल शिकीन, नाही तर मरून जाईन, तू माझं दफन करशील आणि चीनला जाशील."

तिचा बाप बूट, कोट, टोपी चढवून घरात बसला होता. आज त्याला कामाचे बोलावणे येणार अशी त्याची खात्री होती.

"आलीस?" त्याने मुलीला विचारले. घरात कुणाचे आगमन झाले म्हणजे त्याला नेहमी आनंद व्हायचा. बाहेरील जिन्यावरच्या सर्व पावलांचे आवाज तो ऐकायचा, जणू सुखाला टोपीत शिवून आणणारा खास पाहुणा तो सतत अपेक्षित होता.

"तुला लोणी घातलेली खीर गरम करून देऊ?" बापाने विचारले. "मी पटकन आणतो."

मुलीने नकार दिला.

"सॉसेज तळू?"

"नको!" फ्रोस्या म्हणाली.

बाप थोडा वेळ गप्प बसला; मग त्याने पुन्हा विचारले, पण किंचित भीत भीत :

"टोस्ट आणि चहा घेणार? पटकन पाणी गरम करतो..."

मुलगी गप्प होती.

"कालच्या मॅक्रोनी आहेत!.. मी तुझ्यासाठी राखून ठेवल्यात."

"आता जरा गप्प बसा," फ्रोस्या म्हणाली. "तुम्हाला अतिपूर्वेत कामावर धाडलं तर बरं होईल..."

"मी मागितलं होतं, पण नाही घेत. म्हणतात, म्हातारा झालोय, डोळे अधू बनलेत," बापाने खुलासा केला.

फ्रोस्या स्वतःच्या खोलीत आता निघून जाईल अशी त्याला भीती वाटत होती आणि तेथेच तिने बसून त्याच्याशी गप्पा माराव्यात अशी त्याची इच्छा होती. म्हणून तिला तेथे अडकवून ठेवायला म्हातारा युक्ती शोधत होता.

"आज ओठाला रंग का फासला नाहीस?" त्याने विचारले.

"खड्‌ संपलाय का? तसं असेल तर आत्ता धावत जाऊन विकत आणतो..."

फ्रोस्याच्या राखी डोळयांमध्ये आसवे डबडबली आणि ती स्वतः-च्या खोलीत गेली. बाप एकटाच राहिला; त्याने स्वयंपाकघर स्वच्छ करायला व घरची किरकोळ कामे उरकायला आरंभ केला. मग तो चवडयांवर बसला, त्याने ओव्हनचे दार उघडले, आत डोके घातले व मॅक्रोनीच्या तव्यावर तो रडू लागला.

दार ठोठावल्याचा आवाज झाला. दार उघडण्यासाठी फ्रोस्या बाहेर आली नाही. म्हाताऱ्याने ओव्हनमधून डोके बाहेर काढले, सगळे कपडे घाण झाले होते, त्याने फडक्याने तोंड पुसले आणि दार उघडण्यासाठी तो बाहेर गेला.

डेपोमधून माणूस आला होता.

"सही कर, नेफेद स्तेपानोविच: आज आठ वाजता हजर हो. संपूर्ण दुरुस्तीसाठी थंड इंजिन घेऊन जायची कामगिरी तुझ्यावर सोपवलीय. ३१० ला जोडणार आहेत. खाणं आणि कपडे घे बरोबर. निदान आवडाभर परतणार नाहीस..."

नेफेद स्तेपानोविचने बुकात सही केली आणि डेपोचा माणूस निघून गेला. म्हाताऱ्याने स्वतःची पत्र्याची पेटी उघडली–कालचा पाव, कांदे व साखरेचा खडा अजून पेटीत होते. मेकॅनिकने त्यात आणखी काही औंस धान्याची, दोन सफरचंदांची भर घातली, क्षणभर विचार केला आणि प्रवासी पेटीला भलेमोठे कुलूप ठोकले.

नंतर त्याने हळूच फ्रोस्याच्या खोलीचा दरवाजा ठोठावला.

"मुली!.. माझ्यापाठी दार बंद कर. मी प्रवासावर जातोय. एक-दोन आठवडयासाठी 'शा' जातीचं इंजिन दिलंय. थंड आहे, पण हरकत नाही."

बाप घरातून बाहेर पडेपर्यंत फ्रोस्या खोलीतून आली नाही. मग तिने बाहेरचे दार बंद केले.

"वाजव! का वाजवत नाहीस?" बाजा वाजवणारा मुलगा रहात होता त्या वरच्या मजल्याकडे पहात ती पुटपुटली.

पण तो बहुधा भटकायला गेला असावा–उन्हाळा होता, दिवस

मोठे होते आणि झोपाळू, आनंदी पाईन वृक्षांमध्ये संध्याकाळच्या वेळी वारा विसावला होता. संगीतवादक अजून लहान होता, कायम प्रेम करण्यासाठी जगातील एकाच वस्तूची निवड अद्याप त्याने केलेली नव्हती. त्याचे हृदय रिते आणि स्वतंत्रपणे स्पंदन होते, केवळ स्वतःसाठी जीवनामधून त्याने काहीही ओरबाडून घेतले नव्हते.

फ्रोस्याने खिडकी उघडली, भल्यामोठ्या बिछान्यावर तिने अंग टाकले व डोळे मिटून घेतले. वरच्या हवेच्या झुळूकींबरोबर पाईनचे बुंधे मंद करकरत होते आणि अंधार पडेपर्यंत थांबू न शकणारा एकाकी रातकिडा दूरवर किरकिरत होता.

फ्रोस्या जागी झाली. जगात अजून उजेड होता. उठायला पाहिजे होते. तिने आकाशाकडे टक लावली: ते उबेने पूर्ण भरले होते आणि अदृश्य होणाऱ्या सूर्याच्या जिवंत खुणा त्यावर उमटलेल्या होत्या. जणू निसर्गाने स्वतःच्या सर्व विशुद्ध शक्तींना वापरून सुखाला तेथे ठेवले होते, त्या सुखाच्या धारांचा तेथून माणसावर वर्षाव व्हावा म्हणून.

दोन उशांच्या दरम्यान फ्रोस्याला एक आखूड केस सापडला; तो केस फक्त फ्योदरचाच असणे शक्य होते. तिने उजेडात तो केस न्याहाळला. केस पांढरा होता. फ्योदर अठ्ठावीस वर्षांचा होता, पण एव्हाना त्याचे सुमारे वीस केस पांढरे झाले होते. तिच्या बापाचेही केस पांढरे होते, पण तो त्यांच्या बिछान्याकडे कधी फिरकतसुद्धा नव्हता. फ्योदर ज्या उशीवर झोपला होता ती उशी फ्रोस्याने हुंगली. फ्योदरच्या अंगाचा, त्याच्या डोक्याचा उशीला अजून वास येत होता. फ्रोस्याच्या नवऱ्याने त्या उशीवरून शेवटच्या वेळी डोके वर उचलल्यापासून उशीचा अभ्रा धुतलेला नव्हता. फ्रोस्याने फ्योदरच्या उशीत तोंड खुपसले व ती तशीच तेथे पडून राहिली.

वरच्या मजल्यावरील लहान मुलगा घरी परतला होता आणि बाजा वाजवू लागला होता. सकाळी उजाडण्यापूर्वी जे संगीत तो वाजवीत होता, तेच आताही वाजवीत होता. फ्रोस्या उठली व टेबलावरील एका रिकाम्या डबीत तिने नवऱ्याचा केस जपून ठेवला. मुलाने बाजा वाजविणे थांबविले: त्याची झोपण्याची वेळ झाली होती, कारण तो लौकर उठायचा, किंवा त्याचा बाप कामावरून घरी परतला असावा आणि मुलगा

बापाच्या मांडीवर बसला असावा. त्याची आई चिमटचाने साखर फोडत होती आणि म्हणत होती की त्यांनी नव्या चादरी विकत घ्यायला पाहिजे कारण जुन्या चादरी पार विरल्या होत्या व धुताना फाटत होत्या. बाप गप्प होता. अजून जुन्या चादरींवरच भागवून नेता येईल असा विचार करीत होता.

सारी संध्याकाळ रूळांच्या कडेने, जवळच्या राईत आणि रायच्या शेतांमधून फ्रोस्या भटकत होती. आदल्या दिवशी तिने जेथे काम केले होते त्या राखेच्या खड्ड्यापाशी ती थांबली. खड्डा परत राखेने गच्च भरला होता, पण तेथे कुणीही काम करीत नव्हते. नताशा बूकोवा कुठे रहात होती हे फ्रोस्याला ठाऊक नव्हते, काल तिने नताशाला तिचा पत्ता विचारला नव्हता. मैत्रिणींकडे अथवा ओळखीच्या लोकांकडे जाण्याची फ्रोस्याची इच्छा नव्हती. आपल्या प्रेमाबद्दल इतर माणसांपाशी ती बोलू शकत नव्हती. त्यांच्यासमोर तिला काहीसा संकोच वाटायचा. जीवनातील इतर सर्व गोष्टी तिच्या दृष्टीने मृत व नीरस बनल्या होत्या. नताशाचा एकाकी नवरा रायफल धरून पहारा देत होता त्या सहकारी गुदामाजवळून ती गेली. त्याने आणि त्याच्या बायकोने उद्या पोटभर लेमन प्यावे म्हणून त्याला काही रूबल द्यावेत असे तिला वाटले, पण तसे वागण्याचा तिला धीर झाला नाही.

"पुढं जा, बाई! इथं फिरायला परवानगी नाही. इथं गुदाम आहे — सरकारी मालमत्ता," पहारेकरी तिला म्हणाला. जाकीटातील खिशात खोलवर कुठेतरी बोटांनी पैसे कुरवाळीत फ्रोस्या तेथे उभी होती.

गुदामांपलिकडे रिकामी ओसाड जमीन होती. तेथे आखूड, खरबरीत, वाईट गवत उगवलेले होते. फ्रोस्या तेथे गेली व विरळ गवताच्या रटाळ जगात विषण्णपणे उभी राहिली. तेथून तारे अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असल्याप्रमाणे भासत होते.

"बिच्चारी फ्रो, बापडी फ्रो, निदान कुणीतरी तुला मिठी मारली तर किती बरं होईल!" ती स्वतःला उद्देशून म्हणाली.

घरी परतल्यानंतर फ्रोस्या तात्काळ झोपली, कारण बाजा वाजविणारा मुलगा केव्हाच झोपी गेला होता आणि रातकिड्यांची किरकिरसुद्धा थांबली होती. पण काही कारणाने तिला झोप लागेना. तिने

अंधारात नजर फिरवीत नाकाने हुंगले: तिच्या शेजारी फ्योदर ज्या उशीवर निजला होता, ती उशी तिला बेचैन करीत होती. उशीमधून अजूनही परिचित, उबदार देहाचा वास दरवळत होता आणि ह्या वासाने फ्रोस्याचे हृदय विषण्ण बनले. तिने चादरीत उशी गुंडाळून कपाटात ठेवली आणि मग अनाथाप्रमाणे ती एकाकी झोपली.

फ्रोस्याने दळणवळण आणि सिग्नलच्या क्लासांना जाणे बंद केले. नाही तरी आता तिला शास्त्र समजतच नव्हते. फ्योदरकडून पत्र अथवा तार येईल अशा अपेक्षेने ती सतत घरात वाट पहात बसली. घरात कुणी नाही म्हणून पोस्टमन पत्र परत घेऊन जाईल अशी तिला भीती वाटत होती. चार दिवस सरले, मग सहा संपले, पण पहिल्या तारे-व्यतिरिक्त फ्योदरने आणखी काहीही बातमी धाडली नव्हती.

थंड इंजिन पोहोचवून तिचा बाप घरी परतला. घरापासून दूर राहिल्याबद्दल व काही कामगिरी पार पाडल्याबद्दल, अनेक माणसांना भेटल्याबद्दल, दूरच्या स्टेशनांना व विविध घडामोडींना पाहिल्याबद्दल तो खूष होता. आता खूप वेळपर्यंत विचार करायला, आठवणी काढा-यला व लोकांना सांगायला त्याच्यापाशी भरपूर सामग्री होती. पण फ्रोस्याने त्याला एकही प्रश्न विचारला नाही, तेव्हा बापाने स्वत:च तिच्यापाशी वर्णन करायला आरंभ केला – थंड इंजिनाचा प्रवास कसा झाला, मुक्कामांच्या स्टेशनांवरील इतर मेकॅनिकांनी इंजिनाचे सुटे भाग चोरू नयेत म्हणून तो रात्रीचा कसा झोपला नाही, कुठे स्वस्त रानफळे विकत होते आणि वासंतिक गारठ्यामुळे कुठे रानफळांची नासाडी झाली होती, इत्यादी. फ्रोस्या उत्तरादाखल काहीही बोलली नाही. स्वेर्दलोवस्क-मधल्या वॉयलबद्दल आणि कृत्रिम रेशिमाबद्दल तो सांगत होता, तेव्हा-सुद्धा तिने त्याच्या बोलण्यात रस घेतला नाही. "ही फॅसिस्ट बनलीय का?" बापाच्या मनात विचार आला. "माझ्या बायकोला असं पोर मी कसं दिलं? आठवत नाही!"

फ्योदरकडून पत्र अथवा तार येण्याची वाट पाहून कंटाळलेल्या फ्रोस्याने अखेर टपाल कचेरीत पत्रे वाटण्याची नोकरी पत्करली. पत्रे कदाचित गहाळ होत असावीत असा तिचा समज झाला होता, म्हणून सर्व पत्त्यांवर पत्रांना सुरक्षितपणे पोहोचविण्याचे काम तिने पत्करले

होते. आणि परक्याकडून उशीरा पत्र मिळण्यापेक्षा फ्योदरची पत्रे तिला लौकरात लौकर मिळावीत अशी तिची इच्छा होती. तिच्या हाती ती हरवली नसती. बटवडा कचेरीत इतर सर्व पोस्टमनांच्या आधी ती हजर व्हायची; वरच्या मजल्यावरील मुलाने बाजा वाजवायला आरंभ करण्यापूर्वीच ती पत्रांच्या वाटप विभागात हजर व्हायची आणि तेथे फुकट मदत करायची. गावात येणाऱ्या सर्व पत्रांवरील पत्ते ती वाचत होती. पण फ्योदरकडून तिच्या नावावर एकही पत्र येत नव्हते. सर्व लिफाफे इतर माणसांसाठी यायचे आणि त्यांच्यात वेगवेगळी नीरस पत्रे असायची. तरीसुद्धा दिवसातून दोन वेळा त्या सर्व पत्रांचे फ्रोस्या प्रामाणिकपणे वाटप करायची. स्थानिक लोकांना त्या पत्रांपासून निदान थोडा आराम लाभेल अशी तिला आशा वाटायची. पोटाशी पत्रांची जाडजूड पिशवी धरून एखाद्या गरोदर बाईप्रमाणे भल्या सूर्योदयाच्या वेळी ती रस्त्यांवरून झपाझपा चालत जायची, दारे ठोठावायची, अर्ध्या चड्डयांमधील पुरुषांना, अंतर्वस्त्रांमधील बायकांना व मोठ्या माणसांच्या आधी उठलेल्या लहान मुलांना पत्रे आणि पाकीटे द्यायची. डोक्यावरील आकाश अजून गडद निळे असतानाच फ्रोस्या काम सुरू करायची, तिच्या चिंताग्रस्त हृदयाने थकावे म्हणून भराभरा चालून स्वतःच्या पायांना दमवायची. पत्रे स्वीकारणाऱ्या अनेक लोकांना तिच्या आयुष्याबद्दल कुतूहल वाटायचे आणि पत्रे घेताना ते तिला विचारीत: "तुम्हाला महिना ब्याण्णव रूबल पगार मिळतो ना?" "हो", फ्रोस्या म्हणायची, "सगळ्या कपातींनंतर." केवळ प्रयोग म्हणून लग्न कर, अशी 'क्रास्नाया नोव' नांवाच्या नियतकालिकाच्या एका वर्गणीदाराने तिला मागणी घातली होती. कदाचित त्यांना सुख सापडेल आणि सुख नेहमीच चांगले असते, असे तो तिला म्हणाला होता. "ह्यावर तुमचं काय मत आहे?" वर्गणीदाराने विचारले. "विचार करीन", फ्रोस्या उत्तरली. "तुम्ही विचार करू नका!" त्याने सल्ला दिला. "तुम्ही माझ्या घरी भेटायला या, मला जाणवून घ्या. मी खूप संवेदनाक्षम, भरपूर वाचन झालेला, सुसंस्कृत माणूस आहे. मी कोणत्या मासिकाचा वर्गणीदार आहे हे तुम्ही पाहताच. ह्या मासिकाच्या संपादक मंडळातील सर्व माणसं अत्यंत हुशार आहेत. तशी खूप माणसं आहेत आणि आपण दोघं असू. हे सगळं

प्रतिष्ठित आहे आणि विवाहित स्त्री म्हणून तुम्हाला जास्त अधिकार लाभेल. कुमारी म्हणजे एकाकी, समाजविरोधी घटक!"

दुसऱ्यांच्या दारांसमोर पत्रे अगर पाकीटे धरून उभी राहता राहता फ्रोस्याला अनेक लोक माहीत झाले. काहींनी तिला मद्य आणि खाण्याचे पदार्थ देण्याचाही प्रयत्न केला, काही तिला स्वतःच्या चालू समस्यांविषयीच्या तक्रारी सांगायचे. जीवनात कुठेही रितेपणा नव्हता, शांतता नव्हती.

जातेवेळी फ्योदरने फ्रोस्याला ताबडतोब स्वतःचा पत्ता कळवीन असे आश्वासन दिले होते, कारण नेमका तो कुठे राहणार ह्याची त्याला स्वतःलाच माहिती नव्हती. पण त्याला जाऊन आता पंधरवडा उलटला तरी त्याच्याकडून काहीच बातमी नव्हती आणि त्याला कोणत्या पत्त्यावर पत्र पाठवावे हे तिला समजत नव्हते. हा वियोग फ्रोस्याने सहन केला. स्वतःचे हृदय कामात गुंतलेले रहावे आणि त्याची निराशा थकावी म्हणून ती अधिकाधिक वेगाने पत्रे वाटू लागली, लौकर लौकर धापा टाकू लागली. पण एके दिवशी दुसऱ्या वाटपाच्या वेळी रस्त्याच्या ऐन मध्यभागी ती मोठ्यांदा विव्हळली. तिचा श्वास तिच्या छातीत अचानक कसा अडकला हे तिच्या ध्यानातच आले नाही. तिच्या हृदयाचे ठोके मंदावले आणि तिने उंच आवाजात प्रदीर्घ किंचाळी मारली. रस्त्यावरील माणसांचे तिच्याकडे लक्ष गेले. भानावर येताच फ्रोस्या पत्रांच्या पिशवीसकट शेतांमध्ये धावली, कारण मंद होत जाणारा रिता श्वासोच्छ्वास सहन करणे तिला अशक्य होऊ लागले होते. तेथे ती जमिनीवर आडवी झाली आणि काळजात बरे वाटेपर्यंत भरपूर विव्हळली.

मग ती उठून बसली, तिने पोषाख नीट केला व तिच्या चेहऱ्यावर स्मित उमटले. आता तिला टीक वाटत होते, आणखी किंचाळण्याची गरज नव्हती.

पत्रे वाटून झाल्यानंतर ती तार कचेरीत गेली तेव्हा फ्योदरकडून आलेली तार तिला देण्यात आली. फ्योदरने पत्ता कळविला होता व चुंबन धाडले होते. घरी येताच काहीही न खाता ती तात्काळ नवऱ्याला पत्र लिहायला बसली. बाहेर मावळलेल्या दिवसाकडे तिचे लक्ष नव्हते, वरच्या मजल्यावरील मुलाने झोपण्यापूर्वी वाजविलेला बाजा तिने ऐकला

नाही. तिच्या बापाने दारावर टकटक वाजवून तिला चहा व लोणी-पाव आणून दिले आणि फ्रोस्याने अंधारात डोळ्यांना ताण देऊ नये म्हणून विजेचा दिवा पेटविला.

त्या रात्री नेफेद स्तेपानोविच स्वयंपाकघरामधील पेटीवर झोपला. डेपोतून गेले सहा दिवस त्याला बोलावणे आले नव्हते; आज रात्री त्याला नक्की बोलावणे येणार अशी त्याची खात्री होती व जिन्यावर निरोप्याच्या पावलांचा आवाज ऐकायला त आतुर झाला होता.

रात्री एक वाजता घडी केलेला कागद हाती धरून फ्रोस्या स्वयं-पाकघरात आली.

"बाबा!"

"काय ग मुली?" म्हाताऱ्याची झोप हलकी होती आणि सावध होती.

"एवढी ही तार पोस्टात घेऊन जा. मी खूप दमलेय."

"पण मी गेलो आणि तेवढ्यात डेपोचा माणूस आला तर?" बा-पाने घाबरून विचारले.

"तो थांबेल," फ्रोस्या म्हणाली. "तुम्हाला फार वेळ लागणार नाही... मात्र तुम्ही स्वतः तार वाचू नका, सरळ खिडकीत द्या तिथं."

"नाही वाचणार," म्हाताऱ्याने वचन दिले. "पण तू पत्र लिहीत होतीस. एकाच फेरीत तेसुद्धा घेऊन जातो."

"मी काय लिहिलं त्याचा तुमच्याशी संबंध नाही... तुमच्यापाशी पैसे आहेत?"

बापापाशी पैसे होते. तेव्हा त्याने तारेचा कागद घेतला आणि तो निघाला. तार कचेरीपाशी म्हाताऱ्याने तारेतील मजकूर वाचला. "काय नेम," मनाशी तो म्हणाला, "कदाचित पोरीनं मूर्खासारखं काहीतरी लिहिलेलं असायचं. नजर टाकलेली बरी."

अतिपूर्वेतल्या फ्योदरला उद्देशून तार होती: "पहिल्या आगगाडीनं ये तुझी बायको माझी मुलगी फ्रोस्या मरणाच्या दाराशी आहे श्वासनलि-केत बिघाड बाप नेफेद येवस्ताफ्येव."

"वा रे तरुण मंडळी !" नेफेद स्तेपानोविचच्या मनात विचार आला आणि त्याने तारेच्या खिडकीत कागद दिला.

"पण मी तर आज फ्रोस्याला पाहिलं होतं !" तारेच्या खिडकीतील महिला कर्मचारी म्हणाली. "खरंच आजारी पडली?"

"असं आहे खरं," इंजिन ड्रायव्हरने खुलासा केला.

सकाळी फ्रोस्याने बापाला परत पोस्ट ऑफीसात जायला सांगितले व वाईट प्रकृतीपायी नोकरीचा राजीनामा देत असल्याचे पत्र लिहून त्याच्यापाशी दिले. म्हातारा परत पोस्ट ऑफीसात गेला; नाही तरी त्याला डेपोत जायचेच होते.

अंतर्वस्त्रांना दुरुस्त करण्यास, पायमोज्यांना रफू करण्यास, फरशी घासून घर स्वच्छ करण्यास फ्रोस्याने आरंभ केला. घर सोडून ती एक-दाही बाहेर गेली नाही.

दोन दिवसांनंतर एक्स्प्रेस तारेने उत्तर आले: "ताबडतोब येतोय चिंतामग्न माझ्याविना दफन करू नका फ्योदर."

नवऱ्याचे आगमन नेमके केव्हा होईल ह्याचा फ्रोस्याने अंदाज घेतला आणि तारेनंतर सातव्या दिवशी ती थरथरत्या आनंदी मनाने स्टेशनच्या फलाटावर येरझाऱ्या घालू लागली. पूर्वेकडील ट्रान्ससैबेरियन एक्स्प्रेस वेळेवर आली; फ्रोस्याचा बापही फलाटावर होता, पण पोरीची मनःस्थिती बिघडू नये म्हणून थोड्या दूर अंतरावर उभा होता.

एक्स्प्रेसच्या ड्रायव्हरने सुरेख वेगात गाडी स्टेशनात आणली व हळुवार ब्रेक लावून थांबविली. त्याची ही करामत पाहून नेफेद स्तेपानोविचच्या डोळ्यांमध्ये अश्रू तरारले आणि तो कशासाठी स्टेशनवर आला होता हेसुद्धा क्षणभर विसरला.

ह्या थांब्यावर आगगाडीतून फक्त एक प्रवासी उतरला. त्याच्या डोक्यावर हॅट होती आणि अंगात लांब गडद निळा रेनकोट होता. त्याचे थकलेले डोळे सावधपणामुळे चमकत होते. त्याच्यापाशी एक बाई धावत गेली.

"फ्रो !" प्रवासी उद्गारला आणि त्याने सूटकेस फलाटावर टाकली.

बापाने नंतर ती सूटकेस उचलली व मुलीच्या आणि जावयाच्या पाठोपाठ तो चालू लागला.

अर्ध्या वाटेवर मुलगी बापाकडे वळून म्हणाली :

"बाबा, डेपोत जा आणि कामगिरी मागून घ्या. घरात बसून बसून तुम्हाला कंटाळा येतो... माहीत आहे ना..."

"होय, कंटाळा येतो," म्हाताऱ्याने कबुली दिली. "आत्ता जातो. ही सूटकेस घे माझ्याकडून."

जावयाने म्हाताऱ्या इंजिन ड्रायव्हरवर एक कटाक्ष टाकला.

"नमस्ते, नेफेद स्तेपानोविच!"

"नमस्कार, फेद्या! सुस्वागतम्!"

"धन्यवाद, नेफेद स्तेपानोविच..."

फ्योदर आणखी काहीतरी बोलण्याच्या बेतात होता, पण तेवढ्यात म्हाताऱ्याने फ्रोस्याकडे सूटकेस दिली व तो डेपोच्या दिशेने निघून गेला.

"लाडक्या, मी सगळं घर स्वच्छ केलंय," फ्रोस्या म्हणाली. "मी मुळीच मरणाच्या पंथाला नव्हते."

"आगगाडीत मी तर्क केला की, तू मरत नाहीस," नवरा उत्तरला. "तुझ्या तारेवर खूप वेळपर्यंत माझा विश्वास बसत नव्हता."

"तर मग का आलास?" फ्रोस्याने आश्चर्याने विचारले.

"माझं प्रेम आहे तुझ्यावर, तुझी ओढ लागली," खिन्नपणे फ्योदर म्हणाला.

फ्रोस्या उदास झाली.

"एखाद्या दिवशी तुझं माझ्यावरचं प्रेम उडून जाईल अशी मला भीती वाटते. मग मात्र मी खरंच मरीन..."

फ्योदरने तिच्या गालाचे चुंबन घेतले.

"जर मेलीस तर तू सगळ्यांना विसरून जाशील, मलासुद्धा," तो म्हणाला.

फ्रोस्याचा उदासपणा नाहीसा झाला.

"नाही, मरणं नीरस आहे. निष्क्रियपणाचं आहे."

"अर्थात, निष्क्रियपणाचं आहे," फ्योदरने स्मित केले. तिचे फार वरचे, पंडिती शब्द त्याला आवडायचे. चतुर वाक्ये शिकव असा पूर्वी फ्रोस्याने त्याच्यापाशी खास आग्रह धरला होता. त्याने वही भरून चतुर आणि पोकळ शब्द तिला लिहून दिले होते.

घरी येताच ती दोघे तात्काळ विश्रांतीसाठी आडवी झाली व झोपी गेली. तीन तासांनंतर बापाने दार ठोठावले. फ्रोस्याने दार उघडले आणि बापाने खाण्याचा डबा भरून परत जाईपर्यंत ती थांबून राहिली. बहुधा त्याला कामगिरी मिळाली होती. फ्रोस्याने दार बंद केले व परत ती झोपली. रात्री त्या दोघांना जाग आली. त्यांनी थोड्या गप्पा मारल्या, मग फ्योदरने फ्रोला मिठी मारली व सकाळपर्यंत ती दोघे गप्प झाली.

दुसऱ्या दिवशी फ्रोस्याने लौकर जेवण बनविले, नवऱ्याला खाऊ घातले आणि स्वतःही जेवली. आता ती व्यवस्थित, चवदार पदार्थ करण्याची मुळीच तसदी घेत नव्हती, पण दोघांनाही सध्या खाण्यापिण्याची विशेष पर्वा वाटत नव्हती. प्रेमाचा वेळ बिनमहत्त्वाच्या, भौतिक गोष्टींवर खर्चण्याची त्यांची इच्छा नव्हती.

फ्रोस्याने फ्योदरला सांगितले की, आता ती गंभीरपणे अभ्यासाला सुरुवात करणार, त्यांच्या देशातील प्रत्येक माणूस अधिक चांगला रहावा म्हणून ती खूप शिकून काम करणार.

फ्योदरने फ्रोचे बोलणे ऐकून घेतले आणि नंतर स्वतःच्या कल्पना व योजना तिला तपशीलवार समजावून सांगितल्या: तारांशिवाय अयनभारीत हवेच्या साह्याने वीज प्रक्षेपित कशी करायची, अल्ट्रासॉनिक लहरींच्या प्रक्रियेने धातूंचा टिकाऊपणा कसा वाढवायचा, शंभर किलोमीटर उंचीवर स्ट्रॅटोस्फीअरमध्ये माणसाला चिरजीवनाची खात्री देणारी खास प्रकाशाची, उष्णतेची आणि विजेची परिस्थिती कशी आहे — म्हणजे प्राचीन जगाचे स्वर्गाबद्दलचे स्वप्न आता खरे ठरणार, इत्यादी. फ्रोस्यासाठी आणि जगातील प्रत्येकासाठी आणखी खूप काही गोष्टी करण्याचे फ्योदरने आश्वासन दिले.

आधीच थकलेले तोंड किंचित उघडे ठेवून फ्रोस्या आनंदाने नवऱ्याचे बोलणे ऐकत होती. पुरेसे बोलून झाल्यानंतर त्यांनी प्रणयाला आरंभ केला — त्यांना आत्ताच्या आत्ता सुखी व्हायचे होते, वैयक्तिक आणि वैश्विक सुखासाठी त्यांच्या भावी कठीण श्रमांची फलिते मिळण्यापूर्वीच. कोणतेही हृदय विलंब सहन करीत नाही, ते दुखते आणि त्याचा कशावरही विश्वास बसत नाही. विचारांचा, बोलण्याचा, एकमेकांचा आनंद

लुटण्याचा थकवा त्यांनी झोपून भरून काढला व पुन्हा जगण्यासाठी ताजीतवानी जागी झाली. फ्रोस्याला मुले हवी होती. ती त्यांचे संगोपन करणार आहे, मुले मोठी झाल्यानंतर बापाचे काम पूर्ण करणार आहेत — कम्युनिझमचे आणि विज्ञानाचे काम. कल्पनेच्या भराऱ्यांमध्ये फ्योदर निसर्गातील गूढ शक्तींबद्दल फ्रोस्याच्या कानात कुजबुजत होता, मानवजातीला समृद्धी देणाऱ्या व माणसाच्या नतद्रष्ट आत्म्यात प्रचंड बदल घडवून आणणाऱ्या नैसर्गिक शक्तींबद्दल बोलत होता. मग ती दोघे एकमेकांची चुंबने-आलिंगने घेत होती, त्यांचे उदात्त स्वप्न जणू आधीच प्रत्यक्षात उतरले होते असा त्यांना आनंद वाटत होता.

संध्याकाळी फ्रोस्या थोड्या वेळासाठी घराबाहेर पडायची व स्वतःसाठी आणि नवऱ्यासाठी खाद्यपदार्थ आणायची. त्या दोघांची भूक अधिकाधिक वाढत चालली होती. अजिबात अलग न होता एव्हाना चार दिवस दोघांनी एकत्र घालविले होते. तिचा बाप प्रवासातून अजून परतला नव्हता; त्याने बहुधा आणखी एक थंड इंजिन दूरपर्यंत नेले होते.

आणखी दोन दिवसांनंतर फ्रोस्या नवऱ्याला म्हणाली की, थोड्या अधिक काळपर्यंत ती दोघे अशीच एकत्र राहतील व मग कामाच्या आणि जगायच्या उद्योगाला लागतील.

"उद्या किंवा परवापासून आपण अस्सल आयुष्याला सुरुवात करू!" फ्रोस्याभोवती हातांचा विळखा घालीत फ्योदर म्हणाला.

"परवापासून!" फ्रोस्याने कुजबुजत संमती दिली.

आठव्या दिवशी फ्योदर दुःखी मनःस्थितीत जागा झाला.

"फ्रो! कामाला लागू या, आयुष्याला सुरवात करू या, आवश्यक आहे त्या रीतीनं... तू परत क्लासांना जायला पाहिजे."

"उद्या!" फ्रो पुटपुटली आणि नवऱ्याचे डोके तिने हातांमध्ये धरले.

त्याने स्मित केले व संमती दिली.

"केव्हापासून, फ्रो?" दुसऱ्या दिवशी फ्योदरने विचारले.

"लौकरच, लौकरच," स्वप्नाळू, केविलवाणी फ्रो उत्तरली. तिच्या हातांनी त्याचा हात धरला होता. त्याने तिच्या कपाळाचे चुंबन घेतले.

एके दिवशी फ्रोस्या उशीरा उठली. बाहेर केव्हाच उजाडले होते. ती खोलीत एकटीच होती. ती व तिचा नवरा यांचे पुनर्मीलन घडल्यानंतरचा तो दहावा अथवा बारावा एकत्रित दिवस होता. फ्रोस्या तात्काळ उठली, तिने खिडकी सताड उघडली आणि तिला बाजाचा आवाज ऐकू आला; एव्हाना ती ह्या बाजाला पूर्ण विसरून गेली होती. बाजा वरच्या मजल्यावर वाजत नव्हता. फ्रोस्याने खिडकीबाहेर नजर टाकली. पडवीशेजारच्या ओंडक्यावर भल्या मोठ्या डोक्याचा एक अनवाणी मुलगा बसला होता व तोंडाने बाजा वाजवीत होता.

फ्लॅटमध्ये शांत व विचित्र वातावरण होते. फ्योदर कुठेतरी बाहेर गेला होता. फ्रोस्या स्वयंपाकघरात गेली. तिचा बाप स्टुलावर बसून डुलकी काढत होता. अद्याप टोपी घातलेले त्याचे डोके टेबलावर टेकलेले होते. तिने त्याला जागा केले.

"केव्हा परतलात?"

"आ?" म्हातारा उद्‌गारला. "आज भल्या सकाळी."

"दार कुणी उघडलं? फ्योदरनं?"

"कुणीही नाही," बाप म्हणाला. "दार उघडंच होतं... मला फ्योदरनं स्टेशनवर शोधून काढलं. तिथं मी बाकड्यावर झोपलो होतो."

"स्टेशनवर का झोपलात? तुम्हाला झोपायला घर नाही काय?" फ्रोस्या रागावली.

"काय बिघडलं? मला तिथली सवय आहे," बाप म्हणाला. "मला वाटलं... माझी तुम्हाला अडचण होईल..."

"बरं, बरं, ढोंगी! फ्योदर कुठं आहे, केव्हा तो घरी येणार?"

बाप अवघडला.

"तो येणार नाही," म्हातारा म्हणाला, "तो निघून गेला..."

फ्रो बापासमोर गप्प राहिली. म्हाताऱ्याने स्वयंपाकघरातील फडक्यावर टक लावली व तो पुढे म्हणाला:

"सकाळी एकस्प्रेस होती. तो तिच्यात चढला आणि अतिपूर्वेला गेला. म्हणाला, कदाचित नंतर चीनपर्यंत जाईन, कुणास ठाऊक!"

"आणखी काय म्हणाला?" फ्रोस्याने विचारले.

"काही नाही," बाप उत्तरला. "घरी जा आणि तुझी काळजी

घे, असं मला म्हणाला. सगळी कामं पार पडली म्हणजे एक तर तो परत येईल किंवा तुला तिकडं बोलावून घेईल, असं म्हणाला."

"कसली कामं?" फ्रोस्याने चौकशी केली.

"माहीत नाही!" म्हातारा म्हणाला. "तो म्हणाला, तुला सगळं माहीत आहे. कम्युनिझम किंवा दुसरं काही तरी."

फ्रो बापाला सोडून स्वतःच्या खोलीत गेली. खिडकीच्या चौकटीवर पोट रेलून ती बाजा वाजविणाऱ्या मुलाकडे पाहू लागली.

"ए मुला!" तिने हाक मारली. "माझ्याकडं ये."

"आत्ता येतो," बाजावाला उत्तरला.

तो ओंडक्यावरून उठला, सदऱ्याच्या टोकाने त्याने बाजा पुसला आणि तिच्याकडे येण्यासाठी घराकडे निघाला.

मोठ्या खोलीच्या मध्यभागी फ्रो रात्रीच्या पोषाखात एकटी उभी होती. पाहुण्याची वाट पहात ती सस्मित उभी होती.

"अच्छा, फ्योदर!"

कदाचित ती मूर्ख होती, कदाचित तिच्या आयुष्याचे मोल अवघे दोन कोपेक होते आणि तिच्यावर प्रेम करण्याची व तिला जपण्याची गरज नव्हती, पण केवळ तिला एकटीलाच माहीत होते: दोन कोपेकचे दोन रूबलमध्ये रूपांतर कसे करायचे!

"अच्छा, फ्योदर! तू माझ्याकडं परतशील आणि मी तुझी वाट पाहीन!"

छोट्या पाहुण्याने पुढील दारावर भीत भीत ठोठावले. फ्रोस्याने त्याला आत घेतले, त्याच्यासमोर ती फरशीवर बसली, त्या मुलाचे हात तिने स्वतःच्या हातांमध्ये धरले व त्याच्याकडे आनंदाने टक लावून ती पाहू लागली: फ्योदरने तिला मधुर शब्दांमध्ये ज्या मानवजातीबद्दल सांगितले होते, ती म्हणजेच कदाचित हा माणूस असावा.

१९३६

अलेक्सेय तल्स्तोय

रशियन स्वभाव

अलेक्सेय तलस्तोय (१८८२-१९४५). अलेक्सेय तलस्तोय जमीनदार उमराव घराण्यात जन्मले. त्यांची माता तुर्गेनेवा हिने १८६० नंतरच्या उदारमतवादी विचारसरणीतील लघुकथा व कादंबऱ्या लिहून प्रसिद्ध केल्या. तिच्या सल्ल्यानुसार अलेक्सेय तलस्तोयनी वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी पहिली कथा लिहिली.

क्रांतीच्या वेळी एव्हाना ते सुप्रसिद्ध लेखक बनले होते: 'लगडा मालक' आणि 'दोन जीवने' ह्या कादंबऱ्या; 'वोल्गापलिकडे' ही कथामालिका; 'मिशूका नालीमोव', ही लघुकथा; 'लाडकी', 'अग्निबाण, 'लढाईचा दिवस' ही नाटके, इ. सृजनशील महत्त्वाकांक्षांमध्ये ते वास्तववादी लेखकांच्या छावणीत दाखल झाले: गोर्की, बूनिन, श्मेल्योव, कूप्रिन, सूर्गूच्योव आणि इतर.

अलेक्सेय तलस्तोयनी १९१७ च्या फेब्रुवारीतील भांडवलदारी लोकशाहीवादी क्रांतीचे बेभानपणे स्वागत केले, पण लोकांच्या उठावाचे प्रमाण बघून ते घाबरले, ऑक्टोबर क्रांतीच्या पाठोपाठ घडलेल्या घटनांनी गोंधळले व १९१९ साली त्यांनी देशांतर केले. पण पूर्णतया रशियन लेखक असलेल्या तलस्तोयना देशाचा वियोग सहन झाला नाही. नंतर त्यांनी लिहिले: "माझ्या संपूर्ण आयुष्यातील तो सर्वांत कठीण काळ होता. देशांतर करून राहणे ह्याचा अर्थ बहिष्कृत जीवन जगणे; देशापासून तुटलेला माणूस म्हणजे कोणत्याही परिस्थितीत कुणालाही नको असलेला शुष्क, वजनहीन लेखक होय. १९२२ च्या वसंतात मी माझ्या कुटुंबासह सोविएत रशियाला परतलो."

मायदेशी त्यांनी पुन्हा महाथोर कादंबऱ्या लिहिल्या: 'कसोटी' ही त्रयी आणि 'पहिला प्योत्र'.

'पहिला प्योत्र' च्या लेखकाला गोर्की यांनी लिहिले होते: "तुमच्या खूप मोठ्या, चतुर, आनंदी साहित्यगुणांचा मी चाहता आहे आणि तुमच्याबद्दल मी फार आदर बाळगतो हे तुम्हाला माहीत आहे. खरेच, तुमच्या आनंदी गुणाला मी चमकदारपणा आणि धूर्त छोटया स्मितासह घेतो; पण हा गुण मला तिसऱ्या क्रमांकाचा वाटतो, कारण सर्वप्रथम तुमच्यात मोठा, अस्सल रशियन गुण आहे अस्सल रशियन चातुर्यासह."

रशियन स्वभाव! फार मोठ्या नसलेल्या कथेला हे शीर्षक फारच भपकेबाज वाटते. पण काय करणार – मला तुमच्याशी रशियन स्वभावाबाबतच बोलायचे आहे.

रशियन स्वभाव! त्याचे वर्णन कर पाहू... वीरांच्या पराक्रमांबाबत सांगू? पण त्यांची संख्या एवढी प्रचंड आहे की कोणत्या कथा सांगायच्या ह्याबाबत निवड करताना गोंधळ होईल. माझ्या एका मित्राने त्याच्या स्वतःच्या आयुष्यातील एक कथा सांगून मला मदत केली. जर्मनांना त्याने कसा चोप दिला त्याबाबत मी सांगत नाही, जरी तो सोनेरी तारा लावतो आणि त्याची अर्धी छाती पदकांनी भरलेली असते. तो साधा, शांत, सामान्य माणूस आहे – वोल्गा नदीवरील सारातोव प्रदेशातील एका खेड्यातील सामुदायिक शेतकरी. पण त्याच्या दणकट देहामुळे आणि देखणेपणामुळे चारचौघात तो उठून दिसतो. रणगाड्याच्या टपामधून तो बाहेर पडायचा तेव्हा पाहणाऱ्याची नजर त्याच्यावर खिळून रहायची – साक्षात रणदेव! तो खाली उडी मारायचा, डोक्यावरील शिरस्त्राण उतरवून दाट, घामाने ओल्या बनलेल्या केसांना मोकळे करायचा, मळलेला चेहरा फडक्याने पुसायचा आणि हमखास स्मित करायचा – स्वभावाने तो चांगला आहे म्हणून!

युद्धात मृत्यूला सतत सामोरे जावे लागत असल्यामुळे माणसे त्यांच्या नेहमीच्या पातळीपेक्षा वरती जातात. उन्हात करपलेली कांती जशी सोलून जाते, तसा सर्व कचरा माणसातून निघून जातो व गाभा, फक्त अस्सल माणूस उरतो. अर्थात काहींचा गाभा इतरांपेक्षा जास्त कणखर असतो, पण ज्यांच्यात थोड्या उणीवा असतात असे लोकसुद्धा प्रयत्नांची

शर्थ करतात, कारण प्रत्येकाला चांगला, एकनिष्ठ साथी होण्याची इच्छा असते. माझा मित्र येगोर द्रचोमोव युद्धापूर्वीसुद्धा ह्या बाबतीत काटेकोर होता – त्याच्या आईबद्दल, मार्या पालीकार्पोवनाबद्दल व त्याचे वडील, येगोर येगोरोविच ह्यांच्याबद्दल त्याला अतीव प्रेम आणि आदर वाटायचा. "माझा बाप पहिल्या दर्जाचा माणूस आहे – तो स्वतःचा आदर करतो. मला म्हणाला, मुला, तू जगात खूप गोष्टी पाहशील, परदेशी जाशील, पण रशियन आहेस ह्याचा नेहमी अभिमान बाळग..."

वोल्गा नदीतीरावरील त्याच खेड्यातील एका तरुणीशी येगोरचे लग्न ठरले होते. स्वतःच्या प्रेयसींबद्दल आणि बायकांबद्दल आम्ही खूप बोलतो, विशेषतः युद्धआघाडीवर जेव्हा सामसूम असते, थंडीचा कडाका असतो आणि जमिनीखालील निवाऱ्यात शेकोटीसमोर बसून भोजन संपलेले असते. काही वेळांना अशा गोष्टी ऐकायला मिळतात की, कान टवकारले जातात. उदाहरणार्थ, कुणीतरी सुरुवात करतो: "प्रेम म्हणजे काय?" एकजण म्हणतो: "आदरामधून प्रेम निर्माण होतं." दुसरा म्हणतो: "मुळीच नाही. प्रेम म्हणजे सवय. माणूस फक्त त्याच्या बायकोवरच प्रेम करत नाही, तर आई-बापावर प्रेम करतो, प्राण्यांवरसुद्धा प्रेम करतो." तिसरा म्हणतो: "थूः, मूर्ख कुठला! प्रेम म्हणजे जेव्हा तुझ्यात सगळं उकळत असतं, माणूस झिंगल्यासारखा वावरत असतो..." एक-दोन तासपर्यंत त्यांची अशी बडबड चालते आणि शेवटी सार्जंट-मेजर अधिकारवाणीने विषयाच्या गाभ्याला हात घालतो... येगोर द्रचोमोवला ह्या चर्चांची बहुधा लाज वाटत असावी, म्हणून स्वतःच्या प्रेयसीबद्दल त्याने माझ्यापाशी अगदी ओझरता उल्लेख केला होता. तो म्हणाला होता की, ती फार चांगली मुलगी आहे, आणि त्याची वाट पाहील असे जर म्हणाली होती, तर नक्की त्याची वाट पाहणार आहे... अगदी तो लंगडा परतला तरीसुद्धा...

लढाईतील पराक्रमांबद्दलही बोलणे त्याला आवडत नसे. "तशा आठवणी काढायला मला आवडत नाही," कपाळाला आठ्या घालून सिगारेटचा जोरदार झुरका मारीत तो म्हणायचा. त्याच्या रणगाड्याच्या लढायांमधील करामती आम्ही त्याच्या साथीदारांकडून ऐकत असू. ड्रायव्हर चूवील्योवने एक विलक्षण हकीकत सांगितली.

"आम्ही नुकतंच मागं फिरलो होतो आणि बघतो तर टेकडीवरून सरपटत येत होता... ओरडलो: 'कॉम्रेड लेफ्टनंट, टायगर!' 'पुढं चल, पूर्ण वेगानं!' ते ओरडले. आणि फर वृक्षांचा जमेल तेवढा आडो-सा घेत मी रणगाडा नागमोडी चालीनं दामटला... टायगर आंधळ्या माणसाप्रमाणं तोफनळीसकट चाचपडत होता... त्यानं तोफ डागली, पण त्याचा नेम हुकला... कॉम्रेड लेफ्टनंटनी थेट त्याच्या कुशीत तोफ डागली! दुसरा तोफगोळा त्याच्या टपावर हाणला आणि हवेत सोंड उंचावून टायगर मागं गडगडला... तिसरा गोळा मारल्यानंतर टायगर-च्या सगळ्या फटींमधून धूर निघू लागला आणि मग शंभर मीटर उंची-पर्यंत आगीच्या ज्वाळा उसळल्या... आणीबाणीच्या दारातून रणगाडा सैनिक बाहेर पडले आणि इवान लापशिनच्या मशिनगननं त्यांना टि-पलं... आमचा रस्ता मोकळा झाला आणि पाच मिनिटात आम्ही खेड्यात पोचलो. तिथं एकच हलकल्लोळ! फॅसिस्ट सैरावैरा धावायला लागले... चिखल झालेला होता... कुणी बूट गमावले आणि नुसत्या पायमोजांवर कोठाराकडं धावत सुटले. कॉम्रेड लेफ्टनंटनी मला हुकूम दिला: 'मार धडक त्या कोठारावर!' आम्ही तोफा वळवल्या आणि पूर्ण वेगानं कोठारावर चालून गेलो... बापरे! आमच्यावर तुळ्या, विटा आणि कोठाराच्या छपरावर चढून बसलेले फॅसिस्ट कोसळत होते... मी परत मागं फिरलो आणि त्या जागेवर इस्त्री मारली. जे शिल्लक उरले त्यांनी हात वर करून आरोळ्या दिल्या 'हिटलर कापूत...!'"

संकटाचा आघात होईपर्यंत लेफ्टनंट येगोर द्र्योमोव असा लढत होता. कूर्स्कच्या लढाईत, नंतरच्या टप्प्यात जेव्हा जर्मनांना ताण असह्य झाला व ते माघार घेऊ लागले, तेव्हा टेकाडावर गव्हाच्या शेतात उभ्या असलेल्या द्र्योमोवच्या रणगाड्यावर तोफगोळा आपटला व त्याचे दोन साथीदार जागच्या जागी ठार झाले. दुसऱ्या तोफगोळ्याने रणगाडा पेटवला. पुढच्या दारातून बाहेर पडलेल्या ड्रायव्हर चूवील्योवने टपावर चढून लेफ्टनंटला कसेबसे बाहेर ओढून काढले. द्र्योमोव बेशुद्ध पडला होता व त्याचे कपडे पेटले होते. चूवील्योवने त्याला बाहेर ओढून काढले आणि दुसऱ्याच क्षणी स्फोटाने रणगाड्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या,

टप पन्नास मीटर दूर उडाले. आगीच्या ज्वाला विझविण्यासाठी चूवील्योवने द्रचोमोवच्या डोक्यावर आणि कपडयांवर मूठ मूठ माती फेकली व तोफगोळयांनी पडलेल्या खड्डयांमधून त्याला ओढत ओढत प्रथमोपचार केंद्रापर्यंत आणले. "तेव्हा मी त्यांना का ओढून आणलं?" चूवील्योव नंतर म्हणाला, "कारण त्यांच्या काळजाचे ठोके मला ऐकू येत होते..."

येगोर द्रचोमोव वाचला आणि त्याची दृष्टीही बचावली, पण त्याच्या चेहऱ्यावर भाजल्याच्या भयानक खुणा मात्र राहिल्या, काही ठिकाणी तर हाडे दिसत होती. तो आठ महिने इस्पितळात होता. शस्त्रक्रियांच्या मदतीने त्याचे नाक, ओठ, पापण्या आणि कान ह्यांना परत जागच्या जागी बसविण्यात आले. आठ महिन्यांनंतर पट्टया काढल्यावर त्याने आरशात स्वतःचा चेहरा पाहिला, पण आता तो त्याचा चेहरा नव्हता. ज्या नर्सने त्याला छोटा आरसा दिला होता, तिने तोंड फिरविले व ती रडू लागली. त्याने तात्काळ तिचा आरसा परत केला.

"ह्यापेक्षाही वाईट घडतं," तो म्हणाला, "आणि ह्याच्यासह जगणं शक्य आहे."

पण नर्सपाशी त्याने पुन्हा कधीही आरसा मागितला नाही. त्याऐवजी तो वारंवार स्वतःच्या चेहऱ्याला हाताने स्पर्श करायचा; जणू त्या चेहऱ्याची तो सवय करून घेत होता. वैद्यकीय मंडळाने जेव्हा त्याला बिनलष्करी सेवेसाठी सुपात्र असल्याचे प्रमाणपत्र दिले, तेव्हा तो थेट जनरलपाशी गेला आणि त्याच्या रेजिमेंटमध्ये परत दाखल होण्याची परवानगी त्याने मागितली. "पण तुम्ही अपंग आहात", जनरल म्हणाले. "मुळीच नाही. मी कुरूप बनलोय, पण त्याचा अडथळा येत नाही. लौकरच मी नेहमीसारखा लढायला योग्य होईन." (मुलाखतीच्या वेळी जनरल त्याच्या चेहऱ्याकडे पहायचे टाळत होते असे येगोरच्या ध्यानात आले व केवळ एक निळसर फट असलेल्या त्याच्या तोंडावर गंभीर स्मित उमटले.) आजारपणानंतरची विश्रांती म्हणून त्याला वीस दिवसांची रजा मिळाली व तो आपल्या आई-बापाला भेटण्यासाठी घरी गेला. तो मार्च महिना होता.

स्टेशनवर एखादी घोडागाडी मिळेल अशी त्याची अपेक्षा होती,

पण खेड्यापर्यंत तब्बल अठरा वेर्स्ता* अंतर त्याला पायी जावे लागले. जमिनीवर अजून बर्फाची पखरण होती. सर्वत्र दमट आणि वैराण वातावरण होते. चावरा वारा त्याच्या मोठ्या कोटाची कॉलर सतत उडवीत होता आणि एकाकीपणा त्याच्या कानांमध्ये भणभणावत होता. तिन्हीसांजेच्या सुमाराला तो खेड्यात पोहोचला. विहीरीपाशी लांब दांडा वाऱ्यामुळे करकरत पुढे-मागे डोलत होता. रस्त्यावरील सहावे खोपट म्हणजे त्याच्या वडिलांचे घर होते. एकदम तो थबकला, त्याने खिशांमध्ये हात खुपसले व मान हलविली. थेट पुढील दारी जाण्याऐवजी त्याने घराभोवती वळसा घेतला व गुडघाभर बर्फात बैठ्या खिडकीखाली वाकून आत बसलेल्या त्याच्या आईकडे पाहिले. कंदिलाच्या मंद उजेडात ती टेबलावर रात्रीच्या जेवणाची मांडामांड करीत होती. अजूनही पूर्वीचाच काळा रुमाल तिच्या डोक्यावर होता, अजूनही ती पूर्वीसारखी शांत, संथ आणि प्रेमळपणे वावरत होती, पण आता ती अधिक वयस्क दिसत होती, तिचे खांदे कृश बनले होते... "अरेरे, हे कळलं असतं तर रोज तिला निदान खुशालीचे दोन शब्द लिहून पाठवायला पाहिजे होते..." त्याच्या मनात विचार येऊन गेला. जेवण साधे होते – दुधाचा प्याला, पावाचा तुकडा, दोन चमचे आणि मीठ. कृश हातांची छातीखाली घडी घालून ती विचारमग्न अवस्थेत उभी होती. खिडकीमधून आईकडे पहात असताना येगोर द्र्योमोवच्या ध्यानात आले की, तिला घाबरवणे योग्य नव्हते, तिच्या म्हाताऱ्या चेहऱ्याला निराशेचा थरकाप देणे योग्य नव्हते.

ठीक आहे! त्याने फाटक उघडले, अंगणात पाऊल टाकले व दार ठोठावले. दारापलिकडून आईचा आवाज आला: "कोण आहे?" तो उत्तरला: "लेफ्टनंट ग्रोमोव, सोविएत संघाचा वीर."

त्याची छाती विलक्षण धडधडत होती. त्याला दाराच्या खांबाचा आधार घ्यावा लागला. नाही, आईने त्याचा आवाज ओळखला नव्हता.

---

* वेर्स्ता – १.०६६८ कि. मी. – सं.

तोसुद्धा हा आवाज प्रथमच ऐकत होता असे त्याला भासले. अनेक शस्त्रक्रियांनंतर त्याचा आवाजसुद्धा पार बदलून गेला होता. तो बसका, घोगरा, अस्पष्ट बनला होता.

"काय पाहिजे बाबा तुला?" तिने विचारले.

"मार्था पालीकार्पोवनाला तिच्या मुलाकडून, सीनियर लेफ्टनंट द्रचोमोवकडून, नमस्कार आणलाय."

तेव्हा तिने धाडकन दार उघडले व त्याच्यापाशी धावत जाऊन त्याचे हात पकडले:

"म्हणजे माझा येगोर जिवंत आहे? धडधाकट आहे? घरात ये रे बाबा."

येगोर द्रचोमोव टेबलाजवळच्या बाकड्यावर बसला. जेव्हा त्याचे पाय फरशीला अजून स्पर्शत नव्हते त्या काळापासून तो तेथे बसत आला होता. तेव्हा त्याची आई त्याचे कुरळे डोके काहीवेळा कुरवाळत म्हणायची: "खा माझ्या लाडक्या!" तो तिला तिच्या मुलाबद्दलची – म्हणजे स्वतःबद्दलची – हकीकत सांगू लागला. त्याच्या खाण्या-पिण्याचे त्याने तपशीलवार वर्णन करून सांगितले, तो छान मजेत असल्याचे आणि बिनकष्टांचे आयुष्य जगतोय असे सांगितले व रणगाड्यांच्या लढायांचा वृत्तांत मात्र अगदी त्रोटक दिला.

"तू सांग, युद्ध भयानक असतं ना?" तिने मध्येच त्याला अडवून विचारले. त्याच्या चेहऱ्यावर तिचे डोळे खिळले असले तरी ते दुसरीकडेच पहात होते.

"होय, आई, भयानक तर असतंच, पण सवय होते."

वडील आले, येगोर येगोरोविच. त्यांचेसुद्धा वय झालेले दिसत होते. त्यांच्या दाढीवर पीठ शिंपडल्याप्रमाणे दिसत होते. त्यांनी पाहुण्याला न्याहाळले, उंबरठ्यावर फाटके नमदी बूट आपटून बर्फ झटकले, सावकाशपणे मफलर काढला, मोठा कोट उतरवला व टेबलापाशी जाऊन हस्तांदोलन केले – वडिलांचा तो रुंद, न्याय्य हात येगोरच्या किती परिचयाचा होता! त्यांनी प्रश्न विचारले नाहीत कारण छातीवर पदकांची रांग लटकावलेला हा माणूस तेथे कशासाठी आला होता हे त्यांनी ताडले होते. ते खाली बसले व डोळे अर्धवट मिटून ऐकू लागले.

लेफ्टनंट द्रयोमोव तशा अनोळखी अवस्थेत जेवढा जास्त वेळ बसला व स्वत:बद्दल तिऱ्हाईताप्रमाणे बोलत राहिला तेवढे त्याला स्वत:चे खरे रूप उघड करणे जास्त अवघड बनले. "अहो आई, बाबा, आता तरी मला ओळखा ना! मी विद्रूप झालोय म्हणून ओळख पटत नाही?" असे बोलण्याची ऊर्मी त्याला दाबावी लागली. घरातील त्या टेबलापाशी त्याला आनंद वाटत होता आणि दुखावल्याची भावनाही जाणवत होती.

"बरं, आता जेवण वाढ बघू आई. आपल्या पाहुण्यासाठी काही-तरी आण." येगोर येगोरोविचनी जुन्या छोट्या कपाटाचे दार उघडले. कपाटाच्या डाव्या कोपऱ्यात काड्यापेटीच्या खोक्यात मासे धरायचे गळ अजून पडून होते, फुटक्या नळीची चहाची किटली उभी होती, कपा-टातून पावाच्या तुकड्यांचा आणि कांद्याच्या सालींचा वास येत होता. येगोर येगोरोविचनी वोदकाची छोटी बाटली बाहेर काढली – फक्त दोन छोटे प्याले भरतील एवढीच वोदका होती. आणखी वोदका मिळणे शक्य नव्हते म्हणून त्यांनी खेदाने उसासा टाकला. अनेक वर्षांपूर्वी ते रात्रीच्या जेवणाला एकत्र बसत, तसेच आता जेवायला बसले. केवळ थोड्या वेळानंतर लेफ्टनंट द्रयोमोवच्या ध्यानात आले की, त्याने ज्या हातात चमचा धरला होता त्या हाताची हालचाल त्याची आई निरखून पहात होती. तो किंचित हसला. त्याच्या आईने नजर वर उचलली आणि वेदनेने तिचा चेहरा थरथरला.

वेगवेगळ्या विषयांवर ते बोलले, वसंताचा मोसम कसा जाईल आणि शेतकरी वेळेवर पेरणी करू शकतील अथवा नाही ह्याबाबत त्यांनी चर्चा केली आणि ह्या उन्हाळ्यात युद्ध संपण्याची अपेक्षा आहे असे येगोर येगोरोविच म्हणाले.

"येगोर येगोरोविच, ह्या उन्हाळ्यात युद्ध संपेल असं तुम्हाला का वाटतं?"

"माणसं फार संतापलीत," येगोर येगोरोविच उत्तरले, "मरणा-मधून गेलीत, आता त्यांना थोपवणं शक्य नाही. जर्मन – कापूत!"

मार्या पालीकार्पोवनाने विचारले:

"त्याला सुटी केव्हा मिळणार हे तुम्ही सांगितलं नाहीत – आम्हाला भेटण्यासाठी घरी यायला. तीन वर्षं त्याला पाहिलं नाही. आता मोठा झाला असेल, मिशा बाळगत असेल... रोज मरणाच्या जवळ रहून बहुतेक त्याचा आवाज जास्त करडा झालाय का?"

"आता लौकरच येईल आणि कदाचित तुम्ही ओळखणार नाही," लेफ्टनंट म्हणाला.

चुलाण्याच्या कट्ट्यावर त्यांनी त्याचा बिछाना घातला. प्रत्येक वीट, ओंडक्याच्या भिंतीमधील प्रत्येक फट, छतावरील प्रत्येक गाठ त्याच्या आठवणीत होती. सर्वत्र मेंढकातडीचा आणि पावाचा वास दरवळत होता. ऐन मरणाच्या घटकेलाही घरच्या ह्या सुखाचा माणसाला विसर पडत नाही. मार्चचा वारा छपरावर भणाणत होता. लाकडी आडोशापलिकडे त्याच्या वडिलांचे मंद घोरणे चालू होते. पण त्याची आई मात्र सुस्कारे टाकीत होती, अस्वस्थपणे बिछान्यात तळमळत होती. ती झोपली नव्हती. हातांच्या ओंजळीत तोंड लपवून लेफ्टनंट स्तब्ध पडून होता. "खरंच तिनं मला ओळखलं नाही," त्याच्या मनात विचार येत होता, "खरंच ओळखलं नाहीस? आई, आई..."

जळणाऱ्या लाकडांच्या कडकड आवाजाने त्याला सकाळी जाग आली. त्याची आई शांतपणे चुलाणा पेटवीत होती. ताणलेल्या दोरीवर त्याच्या पायाला गुंडाळण्याच्या पट्ट्या धुवून वाळत टाकलेल्या होत्या. दारापाशी स्वच्छ केलेले बूट उभे होते.

"बाजरीच्या पिठाची धिरडी तू खातोस?" तिने विचारले.

त्याने ताबडतोब उत्तर दिले नाही. चुलाण्यावरून तो खाली उतरला, अंगात सदरा चढवून त्याने कमरेभोवती पट्टा आवळला व बाकावर तो अनवाणी बसला.

"तुमच्या खेड्यात कात्या मालीशेवा राहते? आंद्रेय स्तेपानोविच मालीशेवची मुलगी?"

"गेल्या वर्षी तिन कोर्स संपवला, आता आमच्या शाळेत मास्तरीण आहे. तिला भेटायची इच्छा आहे तुझी?"

"तिला न विसरता नमस्कार सांग, असं तुमच्या मुलानं म्हटलं होतं."

आईने शेजाऱ्यांच्या मुलीमार्फत कात्याकडे निरोप धाडला. लेफ्टनंटने पायात बूट चढवायच्या आत कात्या मालीशेवा तेथे हजर झाली. तिचे टपोरे राखी डोळे चमकत होते, आश्चर्याने तिच्या भुवया उंचावल्या होत्या आणि आनंदापायी तिचे गाल लाल बनले होते. जेव्हा तिने डोक्यावरील रुमाल तिच्या रुंद खांद्यांवर टाकला, तेव्हा लेफ्टनंटच्या काळजात बारीक कळ उमटली व तो आतल्या आत कण्हला. त्या उबदार, सोनेरी केसांचे चुंबन घ्यायला किती छान वाटेल! त्याच्या मैत्रिणीचे थेट असेच चित्र त्याच्या नजरेसमोर सदैव होते—ताजी टवटवीत, नाजुक, आनंदी, प्रेमळ, सुंदर... अशी सुंदर की घरात तिने प्रवेश करताच सर्वत्र सोनेरी प्रकाश उजळावा.

"तुम्ही येगोरकडून निरोप आणलात? (तो प्रकाशाकडे पाठ करून उभा होता आणि बोलणे अशक्य झाल्यामुळे त्याने नुसती मान डोलावली.) मी त्याची रात्रंदिवस वाट पाहतेय, त्याला असाच निरोप द्या..."

ती त्याच्या अधिक जवळ गेली. तिचे डोळे त्याच्या डोळ्यांना भिडले आणि जणू तिच्या छातीवर कसलातरी आघात झाल्याप्रमाणे ती एक पाऊल एकदम मागे सरली. ती घाबरली होती. त्याच्या मनाचा निर्धार पक्का झाला—आजच्या आज निघून जायचे.

आईने गरम दुधात बाजरीच्या पिठाची धिरडी बनविली. लेफ्टनंट द्र्योमोवबद्दल तो परत बोलला, ह्यावेळी त्याच्या पराक्रमांचे त्याने वर्णन केले. तो कर्कश्य आवाजात बोलत होता, कात्याकडे न पाहता बोलत होता. त्याच्या कुरूपतेचे प्रतिबिंब तिच्या गोड मुद्रेवर पाहण्याची त्याची इच्छा नव्हती. सामुदायिक शेतावरील एक घोडा मागून आणण्यासाठी येगोर येगोरोविच जाणार होते. पण लेफ्टनंट जसा पायी आला होता, तसाच पायी स्टेशनवर परतला. जे काही घडले होते त्याचा त्याला एवढा जबरदस्त हबका बसला होता, की तो वारंवार स्वतःचा चेहरा हाताने चाचपून पहात होता आणि घोगरट आवाजात स्वतःशी पुटपुटत होता: "आता मी काय करू?"

तो स्वतःच्या रेजिमेंटमध्ये परतला. मजबूती आणण्यासाठी रेजिमेंट पिछाडीला आली होती. तेथे त्याच्या मित्रांनी असे जबरदस्त स्वागत

केले की, त्याच्या मनावरचे ओझे एकदम उतरले. त्याने ठरविले की, त्याच्या दुर्दैवाची बातमी आईपासून आणखी काही दिवसपर्यंत लपवून ठेवायची. आणि कात्याचा काटा काळजातून उपटून टाकायचा!

दोन आठवड्यांनंतर त्याच्या आईकडून पत्र आले:

"माझ्या लाडक्या मुला! तुला पत्र लिहायला भीती वाटतेय, कारण विचार काय करायचा हेच मला समजत नाही. तुझ्याकडून निरोप घेऊन एक माणूस आम्हाला भेटून गेला. तो खूप भला माणूस होता, पण त्याचा चेहरा विद्रूप झालेला होता. तो आमच्याकडं प्रथम काही दिवस राहणार होता, पण त्यानं विचार बदलला आणि तो अचानक निघून गेला. तेव्हापासून, मुला, एक क्षण माझा डोळ्याला डोळा लागत नाही, कारण तो माणूस म्हणजे तूच होतास असं मला भासतं. येगोर येगोरोविच मला रागावतात, 'म्हातारे, तुझं डोकं फिरलंय,' असं म्हणतात. 'जर तो आपला मुलगा असता, तर त्यानं आपल्याला सांगितलं नसतं? त्यानं सोंग घ्यायचं काय कारण होतं? त्याच्यासारखा चेहरा असणाऱ्या माणसानं अभिमान बाळगला पाहिजे.' येगोर येगोरोविच माझी समजूत पटवू पाहतात, पण माझं आईचं काळीज दुसरंच सांगतं—तो माझाच मुलगा होता असं सांगतं. तो माणूस आमच्या चुलाण्यावर झोपला होता आणि त्याचा मोठा कोट स्वच्छ करण्यासाठी मी अंगणात घेऊन गेले तेव्हा त्या कोटाला छातीशी कवटाळून मी रडले, कारण तो तूच होतास हे मला समजलं होतं. लाडक्या येगोर, कृपा कर, ख्रिस्ताखातर मला लिही, काय घडलं ते सांग अथवा खरंच मला कदाचित वेड लागलं असेल."

येगोर द्रयोमोवने मला, इवान सूदारेवला, हे पत्र दाखविले आणि ही हकीकत सांगून बाहीने स्वतःचे डोळे पुसले. मी त्याला म्हणालो: "हा स्वभावातला संघर्ष तुला अनुभवायला लागतोय! मूर्ख, मूर्ख आहेस तू. तुझ्या आईला पत्र लिही आणि तिची माफी माग. तिला वेडं करू नको... तुझ्या चेहऱ्याची तिला काय फिकीर! आता तुझ्यावर ती जास्तच प्रेम करील."

त्याने त्याच दिवशी पत्र लिहिले. "प्रिय आई-बाबा, मार्या पाली-

कार्पोवना आणि येगोर येगोरोविच, माझ्या मूर्खपणाबद्दल मला क्षमा करा. तो माणूस म्हणजे खरोखरीच मी होतो, तुमचा मुलगा, तुम्हाला भेटायला आलेला..." बारीक हस्ताक्षरात त्याने आणखी चार पाने मजकूर लिहिला. जर त्याला सवड असती तर त्याने वीस पानेही लिहिली असती.

काही आठवड्यांनंतर आम्ही प्रशिक्षणाच्या मैदानावर उभे होतो तेव्हा एक सैनिक धावत आला व येगोर द्रयोमोवला म्हणाला: "कॉम्रेड कप्तान, तुम्हाला कुणीतरी भेटायला आलंय..." सैनिक जरी ताठ उभा होता, तरी जणू कुणीतरी त्याला दारूची मेजवानी लौकरच देणार आहे असा भाव त्याच्या चेहऱ्यावर होता. द्रयोमोव व मी जेथे रहात होतो त्या खोपटाकडे आम्ही गेलो. तो अस्वस्थ बनल्याचे मी पहात होतो — तो सारखा खोकत होता आणि घसा खाकरत होता. माझ्या मनात आले: "रणगाडावाला आहे, पण हिंमतवान नाही." तो माझ्यापुढे झोपडीत शिरला आणि त्याचा आवाज मला ऐकू आला:

"नमस्कार आई, मी आहे..." एक छोटया चणीची बाई त्याच्या छातीशी बिलगलेली मी पाहिली. जेव्हा मी भोवती नजर फिरविली, तेव्हा खोलीत आणखी एक बाई उभी असल्याचे माझ्या ध्यानात आले. अगदी खरे सांगतो — आणखी अनेक सुंदर स्त्रिया कुठे ना कुठे असतील, अशी काही एकमेव नव्हे, पण व्यक्तिशः मी हिच्यासारखी सुंदर स्त्री अद्याप पाहिली नव्हती.

त्याने आईच्या मिठीतून स्वतःला सोडवून घेतले व त्या तरुणीकडे तो वळला. आधीच मी म्हटलेय की, त्याच्या भव्य देहामुळे तो एखाद्या रणदेवाप्रमाणे भासतो. "कात्या!" तो म्हणाला "कात्या, तुम्ही कशाला आलात? ज्याची वाट पहायची तुम्ही वचन दिलं होतं तो हा माणूस नव्हे..."

सुंदर कात्याने त्याला उत्तर दिले — एव्हाना मी बाहेर गेलो होतो, तेव्हा माझ्या कानांवर तिचे शब्द पडले: "येगोर, मी तुमच्याबरोबर कायम रहायचं ठरवलंय. मी तुमच्यावर प्रेम करीन, मनापासून प्रेम करीन... मला दूर लोटू नका..."

होय, हे बघा रशियन स्वभाव! माणूस सामान्य दिसेल, पण संकट कोसळले म्हणजे त्याच्या अंगी अचाट बळ येते—मानवी सौंदर्य त्याला प्राप्त होते!

१९४४



कॉन्स्तन्तिन सीमोनोव

तिसरा अॅड्जूटन्ट

कॉन्स्तन्तिन सीमोनोव (१९१५-१९७९). जे वाचक दुसऱ्या महायुद्धामधून स्वतः पार पडलेत अथवा वडीलधाऱ्यांच्या ताज्या आठवणींमध्ये जे लहानाचे मोठे झाले, अशा सर्व वाचकांच्या दृष्टीने कॉन्स्तन्तिन सीमोनोव यांचे नाव दुसऱ्या महायुद्धाशी कायमचे निगडित आहे. 'माझी वाट पहा' ही सीमोनोव यांची कविता युद्धआघाड्यांवर आणि पिछाडीला, अशा दोन्ही ठिकाणी प्रत्येकाला ठाऊक होती.

वैविध्यपूर्ण आणि यशस्वी साहित्यिक कारकीर्दीच्या दरम्यान कॉन्स्तन्तिन सीमोनोव यांनी अनेक कादंबऱ्या, लघुकथा, लेख, नाटके, कविता, निबंध प्रसिद्ध केले व हे सर्व लेखन युद्धाशी निगडित होते.

युद्धवार्ताहर आणि प्रचंड लोकप्रिय लेखक ह्या नात्याने सीमोनोव लष्करातील भिन्न पदांच्या आणि भिन्न सेवादलांच्या लोकांना भेटले होते, त्यांच्याशी बोलले होते. लढाईपूर्वी सैनिकाच्या भावना कोणत्या असतात आणि मोहीमेच्या परिणामांना जबाबदार असणाऱ्या प्रमुख लष्करी अधिकाऱ्याला काय वाटत असते, ह्यांची स्वतःच्या निरीक्षणांवरून त्यांना जाणीव होती. मॉस्कोची, स्तालीनग्रादची मोठी लढाई त्यांनी प्रत्यक्ष पाहिली होती, कूर्स्कच्या फुगवटयावरील लढाईला ते साक्षी होते. पाणबुडीतून ते रूमानियाच्या किनाऱ्यांवर गेले होते, युगोस्लाव पार्तीझानांपाशी विमानातून त्यांना नेण्यात आले होते व सोविएत-अमेरिकन सेना एल्बवर ज्या दिवशी भेटल्या, त्या दिवशी ते तेथे होते. नाझी जर्मनीविरुद्धचे युद्ध सोविएत जनतेच्या दृष्टीने खरोखरीच महान देशरक्षक युद्ध होते; त्यामुळे ह्या युद्धात लढणाऱ्या प्रत्येक माणसाची भूमिका आणि त्याचे महत्त्व स्वाभाविकपणे वाढले. त्याच्या वृत्तीच्या ताकदीवर, मानवी देहाला ज्या परिस्थिती सहन होणे अशक्य असते अशा ठिकाणी ठामपणे उभे राहण्याच्या त्याच्या क्षमतेवर, विजय अथवा पराभव अवलंबन होते. ह्या समस्येच्या संशोधनाला सीमोनोव यांनी स्वतःची काही सर्वोत्तम पुस्तके वाहिली आहेत; तल्स्तोय यांच्या परंपरेला अनुसरून त्यांनी युद्धाला "त्याच्या वास्तव प्रकटीकरणात — रक्तात, यातनांमध्ये, मृत्यूत" सादर करण्याचा प्रयत्न केला.

कमिस्सारांची ठाम खात्री होती की, भ्याडांपेक्षा शूर लोक कमी ठार होतात. हे मत पुनःपुन्हा उच्चारायला त्यांना आवडायचे आणि कुणी विरोध केला तर ते संतापायचे.

डिव्हिजनमध्ये कमिस्सारवर लोक प्रेम करीत आणि त्यांना घाबरत-सुद्धा. नवागतांना युद्धाची सवय लावण्याची त्यांची स्वतःची एक खास तऱ्हा होती. वाटचालीत त्या माणसाबद्दल ते सर्व माहिती करून घ्यायचे. डिव्हिजनच्या मुख्य ठाण्यावर अथवा एखाद्या रेजिमेंटमधून ते त्याला उचलायचे आणि स्वतःबरोबर फिरवायचे, सबंध दिवसभर त्याला नजरे-आड होऊ द्यायचे नाहीत.

जर हल्ला करायचा असेल, तर ह्या माणसाला ते हल्ल्यावर सां-गाती घेऊन जायचे, सतत त्याच्या जवळ रहायचे.

जर तो माणूस त्यांच्या कसोटीला उतरला, तर संध्याकाळी कमि-स्सार त्याच्याशी नव्याने ओळख करून घ्यायचे.

"काय आडनाव?" अचानक कमिस्सार त्या माणसाला विचारायचे.

आश्चर्यचकित कमांडर स्वतःचे नाव सांगायचा.

"माझं — कोर्नेव. एकत्र चाललो, एकत्र पोटावर सरपटलो, आता ओळख करून घेऊ."

डिव्हिजनमध्ये आगमन झाल्यानंतर पहिल्याच आठवड्यात त्यांचे दोन अॅड्जूटन्ट लागोपाठ ठार झाले होते.

पहिला घाबरला होता आणि माघारी सरपटत जाण्यासाठी खंदका-बाहेर पडला होता. शत्रूच्या मशिनगनने त्याची चाळण केली होती.

संध्याकाळी मुख्य ठाण्यावर परतताना, मृत अॅड्जूटन्टजवळून अत्यंत बेफिकीरपणे, मानसुद्धा वळवून न पाहता कमिस्सार चालत गेले होते.

दुसऱ्या अॅड्जूटन्टला हल्ल्याच्या वेळी छातीत गोळी घुसली होती. काबीज केलेल्या खंदकात तो उताणा पडला होता, त्याला धाप लागली होती व तो काहीतरी प्यायला मागत होता. तेथे पाणी नव्हते. बांधास-मोरच्या मैदानात जर्मनांची प्रेते विखुरली होती. एका प्रेतापाशी पाण्याची बाटली पडली होती.

पाण्याची बाटली भरलेली अथवा रिकामी आहे ह्याची खात्री करून घ्यायला जणू काही कमिस्सारनी दुर्बीणीतून पाहिले.

मग त्यांनी स्वतःचा अवजड आणि इतःपर तरुण नसलेला देह छातीएवढ्या तटबंदीपासून वर उचलला व नेहमीच्या संथ पद्धतीने रणांगणावर ते चालत गेले.

का कुणास ठाऊक, पण जर्मनांनी गोळीबार केला नाही. जेव्हा ते बाटलीपाशी पोहोचले, तिला उचलून, हलवून त्यांनी काखोटीला मारले व ते परत जायला वळले, तेव्हा त्यांनी गोळीबार सुरू केला.

जर्मन त्यांच्या माघारी गोळ्या झाडत होते. दोन गोळ्या बाटलीला लागल्या. त्यांनी भोकांमध्ये बोटे कोंबली व पुढ्यात बाटली धरून ते चालत राहिले.

जेव्हा त्यांनी परत खंदकात उडी मारली, तेव्हा ती बाटली काळजी-पूर्वकपणे एका माणसाच्या हवाली केली.

"त्याला पाणी पाजा!"

"समजा तुम्ही तिथपर्यंत गेलात आणि बाटली रिकामी असती तर?" कुणीतरी पृच्छा केली.

"तर मागं परतलो असतो आणि पूर्ण भरलेली बाटली शोधायला तुम्हाला धाडलं असतं!" रागीट कटाक्ष टाकीत कमिस्सार उत्तरले.

डिव्हिजनच्या कमिस्सारने करू नयेत अशा गोष्टी ते वारंवार करायचे. पण त्या केल्यानंतरच केवळ हा विचार त्यांच्या मनात यायचा. मग स्वतःवर आणि ज्यांनी त्यांच्या कृतीची आठवण करून दिलेली असायची त्यांच्यावर ते चिडायचे.

आत्ता अशीच परिस्थिती होती. पाण्याची बाटली आणून दिल्यानंतर

पुढे त्यांनी ॲड्जूटन्टकडे लक्ष दिले नाही व रणांगणावरील लढाईच्या निरीक्षणात जणू त्याच्याबद्दल ते संपूर्ण विसरून गेले.

पंधरा मिनिटांनंतर त्यांनी बटालियन कमांडरला अनपेक्षित प्रश्नाने दचकवले.

"त्याला इस्पितळात पाठवलंत?"

"शक्य नाही, कॉम्रेड कमिस्सार, अंधार पडेपर्यंत वाट पहावी लागणार."

"अंधार पडेपर्यंत तो मरेल." आणि विषय संपला अशा थाटात कमिस्सार दुसरीकडे वळले.

पाच मिनिटांनंतर दोन सैनिक सुसाट उडणाऱ्या गोळ्यांमधून स्वतःची शरीरे चोरीत त्या ॲड्जूटन्टचा निश्चल देह खडबडीत मैदानातून मागे घेऊन गेले.

त्यांना जाताना कमिस्सारनी थंडपणे पाहिले. स्वतःसाठी आणि दुसऱ्यांसाठी धोक्याचे माप त्यांच्या दृष्टीने सारखे होते. माणसे मरतात — कारण ते युद्ध होते. पण शूर लोक क्वचित मरतात.

सपाट आडवे न होता अथवा आडोशाला न धावता ते दोन लाल सैनिक धैर्याने पुढे जात होते. घायाळ माणसाला घेऊन जात आहोत ह्याचा त्यांना कधीही विसर पडला नाही. म्हणून कोर्नेवची खात्री होती की, ते सुखरूप जातील.

त्या रात्री मुख्य ठाण्यावर परतताना कमिस्सारनी रण-इस्पितळाला भेट दिली.

"काय, तो आता बरा आहे, त्याच्यावर उपचार केलेत?" त्यांनी सर्जनना विचारले.

कोर्नेवना वाटायचे की, युद्धात प्रत्येक गोष्ट सारख्याच वेगाने पार पाडली पाहिजे. संदेश पोहोचविणे असो, हल्ला करणे असो अथवा जखमीवर उपचार करणे असो.

जेव्हा सर्जननी त्यांना सांगितले की, अतिरक्तस्रावामुळे ॲड्जूटन्ट मेला, तेव्हा कमिस्सारनी आश्चर्याने वर पाहिले.

"तुम्ही काय बोलताय ह्याची तुम्हाला जाणीव आहे?" सर्जनच्या खांद्यावरील पट्ट्यांना धरून ओढत त्यांनी शांतपणे विचारले. "तो जगावा

म्हणून आमच्या लोकांनी ऐन रणधुमाळीत त्याला दोन वेर्स्ता अंतर वाहून आणला आणि तो मेला असं तुम्ही मला सांगताय. मग कशाला त्यांनी त्याला उचलून आणलं?"

पण पाण्याची बाटली आणायला ते स्वत: कसे गेले होते, ह्याबद्दल मात्र कमिस्सारनी चकार शब्द उच्चारला नाही.

सर्जननी खांदे उडविले.

"शिवाय," सर्जनची ती कृती पाहून कमिस्सार पुढे म्हणाले, "तो असा पोरगा होता, ज्यानं जगायला पाहिजे होतं. होय, होय, पाहिजे होतं," रागाने त्यांनी पुनरुच्चार केला. "वाईट काम करताय."

आणि निरोप न घेता ते थेट मोटरीकडे गेले.

सर्जननी त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहिले. अर्थात, कमिस्सारचे म्हणणे बरोबर नव्हते. तार्किकदृष्टचा विचार करता कमिस्सार आत्ता मूर्खासारखा बोलले होते. पण तरीही त्यांच्या शब्दांमध्ये असे काही सामर्थ्य होते, असा काही विश्वास होता, की सर्जनना क्षणभर भासले की खरोखरीच शूर लोक मरता कामा नयेत आणि तरीही जर ते मरत असतात, तर ह्याचा अर्थ उपचार योग्य रीतीने होत नव्हते.

"छे:!" हा विचित्र विचार मनातून झटकून टाकायचा प्रयत्न करीत सर्जन मोठ्यांदा उद्गारले.

पण तो विचार त्यांना झटकून टाकता आला नाही. खडबडीत मैदानातून त्या घायाळ अॅड्जूटन्टला स्ट्रेचरवरून वाहून आणणारे दोन लाल सैनिक सर्जनच्या नजरेसमोर सतत दिसत राहिले.

"मिखायल ल्वोविच," धूम्रपानासाठी व्हरांड्यात आलेल्या आपल्या मदतनीसाला ते अचानक म्हणाले. त्यांचा स्वर असा होता, जणू फारा दिवसांपासून त्यांना हे बोलून टाकण्याची इच्छा होती. "सकाळी आणखी पुढं डॉक्टरांसह मलमपट्टचा करण्याची दोन केंद्रं उघडली पाहिजेत..."

कमिस्सार मुख्य ठाण्यावर केवळ पहाटेच्या सुमारास पोहोचले. त्यांची मन:स्थिती वाईट होती. भेटायला आलेल्या माणसांबरोबर त्यांनी तडकाफडकी निर्णय घेऊन, त्यांची तुटक शब्दात खरडपट्टी काढून, तात्काळ पाठवणी केली. त्यांची ही रीत होती व तिच्यात धूर्तपणा होता. कमिस्सारना राग आणणारी माणसे आवडायची. माणसात सर्व काही

करण्याचे सामर्थ्य आहे असा त्यांचा विश्वास होता. माणसाला एखादी कामगिरी पार पाडता आली नाही तर ते त्याची कधीही खरडपट्टी काढत नसत, पण एखादी गोष्ट करता येत असूनही केली नाही तर मात्र त्यांना संताप यायचा. एखाद्याने खूप काही केले, तर त्याने आणखी का केले नाही म्हणून कमिस्सार त्याची हजेरी घ्यायचे. माणसे थोडीशी रागात असली म्हणजे अधिक चांगल्या पद्धतीने विचार करतात. मुख्य मुद्दा मनात ठसावा म्हणून वाक्य अर्ध्यातच तोडायला कमिस्सारना आवडायचे. अशा रीतीने त्यांनी सबंध डिव्हिजनला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली होती. कुणाही माणसाला भेटल्यानंतर, पुढील भेटीपर्यंत त्या माणसाला विचारात गुंतविणारी काहीतरी गोष्ट त्याच्यावर ठसविण्याचा कमिस्सार नेहमी प्रयत्न करायचे.

कालच्या हानीचा तपशील सकाळी त्यांना मिळाला. तो वाचताना त्यांना सर्जनची आठवण झाली. त्या म्हाताऱ्या अनुभवी डॉक्टरला तो काम वाईट करतो असे सांगणे अर्थातच योग्य नव्हते, पण हरकत नाही, जरा तो विचार करील. कदाचित तो रागावेल आणि त्याला एखादी चांगली कल्पना सुचेल. कमिस्सारना स्वतःच्या बोलण्याबद्दल मुळीच खेद वाटला नाही. सर्वांत खेदाची बाब होती अॅड्जूटन्टचा मृत्यू. मात्र त्यांनी ह्या विषयावर फार काळपर्यंत मनाला रेंगाळू दिले नाही. अन्यथा ह्या युद्धाच्या महिन्यांमध्ये अनेक गोष्टींवर खेद करीत बसावे लागले असते. युद्धानंतर, जेव्हा अचानक मृत्यू हा अपघात ठरेल, तेव्हा ते त्या सगळ्या आठवणींना उजाळा देतील. सध्या सर्व मृत्यू अचानक होते. मृत्यूचा दुसरा प्रकारच नव्हता आणि एव्हाना त्याची सवय होणे आवश्यक होते. तरीही खेद वाटतच राहिला आणि काहीशा कोरड्या आवाजात त्यांनी चीफ ऑफ स्टाफना सांगितले की, त्यांचा अॅड्जूटन्ट ठार झाला होता व नवा अॅड्जूटन्ट शोधणे आवश्यक होते.

तिसरा अॅड्जूटन्ट चणीने छोटा, सोनेरी केसांचा, निळ्या डोळ्यांचा पोरगा होता. शालेय शिक्षण पूर्ण करून तो नुकताच युद्धआघाडीवर आला होता.

त्यांच्या ओळखीच्या पहिल्याच दिवशी त्याला कमिस्सारांबरोबर थिजलेल्या शारदीय मैदानाला ओलांडून आघाडीवरच्या बटालियनकडे

जावे लागले होते. सभोवर उखळी तोफगोळयांचे स्फोट उडत होते, पण तो क्षणभरही मागे राहिला नाही. ॲड्जूटन्टच्या कर्तव्याला अनुसरून तो सतत कमिस्सारांच्या जोडीने चालत होता. शिवाय ह्या धिप्पाड बांध्याच्या, संथपणे चालणाऱ्या कमिस्सारांचा ॲड्जूटन्टवर प्रभाव पडला होता. जर कमिस्सारांबरोबर चालत राहिलो तर आपल्याला काहीही होणार नाही, अशी ठाम श्रद्धा ॲड्जून्टच्या मनात निर्माण झाली होती.

जेव्हा तोफगोळयांचा वेग व वर्षाव वाढला, तेव्हा स्पष्ट झाले की, जर्मनांनी त्यांचा पाठलाग धरला होता. कमिस्सार व ॲड्जूटन्ट अधून-मधून पोटांवर पालथे पडू लागले.

पण दुसऱ्याच क्षणी, जवळच्या स्फोटाचा धूर विरून जाण्यापूर्वीच, कमिस्सार वर उठून पुढे चालू लागायचे.

"पुढं चल, पुढं चल," घोगऱ्या आवाजात ते पुटपुटले. "इथं पडून राहण्यात वेळ घालवायचं कारण नाही."

खंदकांच्या अगदी जवळ ते पोहोचले तेव्हा जर्मनांनी त्यांना चिमटचात अडकवले. एक तोफगोळा त्यांच्या पुढचात व दुसरा मागे फुटला.

कमिस्सार उठले व त्यांनी कपडे झटकले.

"पाहिलंत," चालता चालता मागील स्फोटाच्या खड्डयाकडे बोट दाखवीत ते म्हणाले, "जर आपण घाबरून मागं थांबलो असतो, तर त्याचा तडाखा थेट आपल्यावर बसला असता. नेहमी वेगानं पुढं गेलं पाहिजे."

"पण जर आपण आणखी वेगानं पुढं गेलो असतो..." ॲड्जूटन्टने वाक्य पूर्ण न करता मानेने पुढील खड्डा दाखविला.

"तर काही बिघडलं नसतं," कमिस्सार म्हणाले. "त्यांनी आपल्यावर इथं नेम धरला होता—पण पल्ला कमी पडला. जर आपण तिथं असतो, तर त्यांनी तिथं नेम धरला असता आणि पुन्हा पल्ला कमी पडला असता."

कमिस्सार थट्टा करीत असावेत अशा विचाराने ॲड्जूटन्टने नकळत स्मित केले. पण कमिस्सारांच्या मुद्रेवर कमालीचा गंभीर भाव होता. अत्यंत ठामपणे ते बोलले होते. आणि ॲड्जूटन्टची ह्या माणसावर अपार श्रद्धा जडली होती. युद्धात जन्मणारी अशी श्रद्धा आयुष्यभर

टिकते. शेवटची शंभर पावले तो कमिस्सारांच्या अगदी खांद्याला खांदा लगटून चालला.

त्यांची पहिली ओळख अशी झाली.

एक महिना उलटला. दक्षिणेकडील मार्गांवर बर्फाचे पापुद्रे चढले होते अथवा कमालीचा चिखल माजला होता.

प्रतिचढाईसाठी पिछाडीला कुठेतरी सेनेची जमवाजमव होत असल्याची अफवा होती, पण अजून तरी थकलेली डिव्हिजन रक्तपाती बचावात्मक लढाया करीत होती.

दक्षिणेकडील शारदीय काळोखी रात्र होती. जमिनीखालील निवाऱ्यात कमिस्सार बसले होते आणि लोखंडी चुलाण्यासमोर स्वतःचे चिखलमाखले बूट वाळविण्याचा प्रयत्न करीत होते.

आज सकाळी डिव्हिजनचे कमांडर गंभीर जखमी झाले होते. चीफ ऑफ स्टाफ स्वतःचा जखमी हात काळ्या फडक्यात टांगून बोटांनी मेजावर ताल धरीत होते. बोटे त्यांच्या आज्ञा परत ऐकू लागली होती, त्यांना टिचक्या वाजविता येत होत्या, ह्याचा त्यांना आनंद झाला होता.

"ठीक आहे, तुम्ही महाहट्टी माणूस आहात," खंडित संभाषण त्यांनी पुढे चालू केले. "आपण असं धरून चालू की, खोलोदिलीन घाबरल्यामुळं ठार झाला. पण जनरल तर शूर गृहस्थ होते–तुमचं काय मत आहे?"

"होते नव्हे, आहेत. आणि ते जगतील," कमिस्सार म्हणाले आणि इतःपर बोलण्यासारखे काही नाही असे समजून त्यांनी तोंड फिरविले.

पण चीफ ऑफ स्टाफनी त्यांची बाही खेचली आणि जणू दुसऱ्या कुणी त्यांचे दुःखी उद्गार ऐकू नयेत अशा अगदी हळू आवाजात ते म्हणाले:

"जगतील, तसं झालं तर चांगलंच, पण मला शंका आहे. मात्र मीरोनोव जगणार नाही, झावोदचिकोव जगणार नाही आणि गावरीलेन्कोही जगणार नाही. ते मेले, वस्तुतः ते शूर लोक होते. मग तुमच्या सिद्धांताचं काय?"

"माझा सिद्धांत नाही," कमिस्सार ताडकन उत्तरले. "मला एवढंच माहीत आहे की, समान परिस्थितीत भित्र्यांपेक्षा शूर लोक क्वचित मरतात. आणि शूर असलेल्या, पण तरीही ठार झालेल्या माणसांचीच

तेवढी नावं तुमच्या जिभेवरून उमटताहेत ह्याचं कारण, भित्र्या माणसांचं दफन होण्याआधीच त्याला विसरतात, पण जेव्हा शूर मरतो, तेव्हा त्याची आठवण काढतात, त्याच्याबद्दल बोलतात आणि लिहितात. आपण फक्त शूरांची नावं लक्षात ठेवतो. बस्स. आणि जर तुम्ही ह्याला माझा सिद्धांत म्हणत असाल, तर तुमची इच्छा. जो सिद्धांत लोकांना निर्भय वागायला मदत करतो, तो चांगलाच सिद्धांत."

ॲड्जूटन्टने निवाऱ्यात प्रवेश केला. एका महिन्यात त्याचा चेहरा काळवंडला होता, डोळे थकले होते. पण बाकी सर्व बाबतीत कमिस्सारनी त्याला पहिल्या दिवशी जसा पाहिला होता, तसा तो मुलगाच राहिला होता. दक्ष पवित्र्यात उभे राहून त्याने वर्दी दिली की, आत्ता ज्या द्वीपकल्पाहून तो आला होता, तेथे सर्व ठीक आहे, फक्त बटालीयनचा कमांडर कप्तान पोल्याकोव जखमी झाला होता.

"त्याची जागा कुणी घेतलीय?" कमिस्सारनी विचारले.

"पाचव्या कंपनीच्या लेफ्टनंट वासिल्येवनी."

"आणि पाचव्या कंपनीवर कोण?"

"कुणी एक सार्जंट."

कमिस्सार क्षणभर विचारात गढले.

"थंडीनं खूप गारठलात?" त्यांनी ॲड्जूटन्टला विचारले.

"खरं सांगायचं तर खूप गारठलोय."

"वोदका प्या."

कमिस्सारनी किटलीतून अर्धा ग्लास वोदका ओतली आणि लेफ्टनंटने केवळ ग्रेटकोटाची बटणे मोकळी करण्यापुरती उसंत घेऊन एका दमात ग्लास घशाखाली रिता केला.

"आता परत जा," कमिस्सार म्हणाले. "मला चिंता वाटतेय, समजलं? द्वीपकल्पावर तुम्ही असलं पाहिजे, माझ्या डोळ्यांच्या रूपानं. जा."

ॲड्जूटन्ट उठला. उबेच्या ठिकाणी आणखी एक मिनिटभर जास्त थांबण्याची इच्छा असणाऱ्या माणसाप्रमाणे तो सावकाशपणे ग्रेटकोटाची बटणे लावू लागला. पण बटणे लावून होताच पुढे तो रेंगाळला नाही.

दाराच्या चौकटीवर डोके आपटू नये म्हणून खाली वाकून तो अंधारात नाहीसा झाला. दार त्याच्या माघारी आपटले.

"छान पोरगा आहे," डोळ्यांनी त्याचा मागोवा घेत कमिस्सार म्हणाले. "अशांवर माझा विश्वास आहे. त्यांच्या बाबतीत विपरीत घडणार नाही. माझा विश्वास आहे की, ते धडधाकट राहतील आणि त्यांचा विश्वास आहे की, मला बंदुकीची गोळी टिपणार नाही. हे सर्वांत महत्त्वाचं. खरं ना, कर्नल?"

चीफ ऑफ स्टाफ सावकाशपणे मेजावर बोटांनी तबला वाजवत होते. मूळ स्वभावाने शूर असलेल्या त्या गृहस्थाला स्वतःच्या अथवा इतरांच्या शौर्याबाबतच्या सिद्धांतांचा काथ्याकूट करायला आवडत नसे. पण आत्ता त्यांना भासले की, कमिस्सारांचे बोलणे बरोबर होते.

"होय," ते म्हणाले.

चुलाण्यात ओंडके कडकडत होते. रणांगणाचा नकाशा पसरलेल्या मेजावर हात पसरून ओणव्या अवस्थेत कमिस्सार झोपले होते. जणू त्या नकाशावरील सर्व भूमी ते परत घेऊ इच्छित होते.

सकाळी कमिस्सार स्वतः द्वीपकल्पावर गेले. त्या दिवसाची आठवण काढायला नंतर त्यांना कधी आवडले नाही. आदल्या रात्री जर्मनांनी तेथे गुप्तपणे छापा घातला होता आणि त्याच्या प्रखर हल्ल्यात पाचव्या कंपनीतील अखेरच्या माणसापर्यंत सर्व मारले गेले होते.

दिवसभर त्यांनी जे केले होते, ते डिव्हिजनचे कमिस्सार ह्या नात्याने त्यांना करण्याची मुळीच गरज नव्हती. सकाळी त्यांनी सापड-तील तेवढी माणसे गोळा केली होती व तीनदा त्यांच्यासह शत्रूवर हल्ले चढविले होते.

पहिल्या गोठणाऱ्या थंडीने घट्ट बनलेली वाळू तोफगोळ्यांच्या स्फोटां-च्या खड्डयांनी भरली होती, रक्ताचे तिच्यावर शिंपण झाले होते, गोळीबारांच्या व स्फोटांच्या आवाजांनी वातावरण दुमदुमले होते. शत्रूची सर्व माणसे मारली गेली अथवा कैद झाली. बर्फाळ पाण्यातून पोहत स्वतःचा तीर गाठायचा ज्यांनी प्रयत्न केला, ते बुडून मेले.

रक्ताचे काळपट डाग पडलेल्या बागनेटाची इतःपर गरज नसलेली रायफल कमिस्सारनी स्वतःच्या सैनिकापाशी दिली व द्वीपकल्पावर ते

फिरू लागले. आदल्या रात्री काय घडले होते त्याची हकीकत केवळ प्रेते त्यांना सांगू शकली असती. पण प्रेतेसुद्धा बोलू शकतात. मृत लाल सैनिक जर्मन प्रेतांमध्ये पडले होते. त्यांच्यापैकी काहीजण खंदकांमध्ये मरून पडले होते. बागनेटांनी त्यांना खुपसण्यात आले होते व त्यांच्या चिंध्या झालेल्या रायफली अजून त्यांच्या हातांमध्ये गच्च धरलेल्या होत्या. ज्यांनी मोर्चावर टिकाव धरला नव्हता, ते उघडचा मैदानात, गोठलेल्या हिवाळी स्तेपमध्ये पडले होते. ते पळाले होते आणि तेथे त्यांना शत्रूच्या गोळ्यांनी टिपले होते. प्रेतांच्या अवस्था निरखत, त्यांचे अचल चेहरे न्याहाळत, नि:स्तब्ध रणांगणावरून कमिस्सार सावकाशपणे चालत होते. आयुष्याच्या अखेरच्या क्षणाला प्रत्येक माणूस कसा वागला होता, ह्याचे चित्र मनासमोर उभे करण्याचा ते प्रयत्न करीत होते. मृत्यूसुद्धा त्यांची भ्याडपणाशी समजूत घालू शकला नव्हता. जर शक्य असते, तर भ्याडां-पासून वेगळ्या जागी त्यांनी शूरांचे दफन केले असते. जीवनात होती तशी मृत्यूनंतरही त्यांच्यात सीमारेषा असायला हवी होती.

स्वत:च्या अॅड्जूटन्टचाही ते शोध घेत होते. त्यांचा अॅड्जूटन्ट रणां-गणावरून पळून जाणे शक्य नव्हते आणि तो कैद होण्याची शक्यताही नव्हती, तेव्हा तो नक्कीच मृतांमध्ये आढळणार होता.

शेवटी, खंदकांच्या खूप मागे, जेथे माणसे लढली होती व मेली होती, तेथे कमिस्सारना तो आढळला. अॅड्जूटन्ट जमिनीवर पसरला होता, त्याचा एक हात त्याच्या अंगामागे विचित्रपणे मुडपला होता, दुसऱ्या हातात पिस्तूलावर मरणमिठी होती. त्याच्या सदऱ्याच्या पुढील भागात रक्त वाळले होते.

कमिस्सार त्याच्याजवळ काही वेळ उभे राहिले, मग त्यांनी एका ऑफीसरला बोलाविले व अॅड्जूटन्टचा सदरा उघडून जखम तपासण्याचा हुकूम दिला.

त्यांनी स्वत:च ती पाहणी केली असती, पण एका हल्ल्यात ग्रेनेडचे अनेक कपचे त्यांच्या उजव्या हातात घुसले होते व तो हात सध्या लुळा लोंबत होता. त्यांनी स्वत:च्या सदऱ्याकडे त्रासिकपणे टक लावून पाहिले. उजव्या हाताची बाही खांद्यापर्यंत कापली होती व हातावर घाईघाईने बांधलेल्या मलमपट्टीवर रक्ताचा डाग उमटला होता. जखमेचा आणि

वेदनेचा त्यांना तेवढा राग नव्हता, जेवढा ते जखमी झाले ह्या वस्तुस्थितीचा होता. डिव्हिजनमधील माणसे आत्तापर्यंत त्यांना अभेद्य समजत होती! अगदी अयोग्य क्षणाला ही जखम झाली होती. लौकरात लौकर ती बरी होणे व तिला विसरून जाणे आवश्यक होते.

ऑफीसर खाली वाकला आणि त्याने ॲड्जूटन्टच्या सदऱ्याची व आतील बंडीची बटणे उघडली.

"बागनेट," वरती पहात ऑफीसर म्हणाला, परत ॲड्जूटन्टवर खाली वाकला आणि आख्खे मिनिटभर त्याने ॲड्जूटन्टच्या निश्चल देहाला कान लावला.

जेव्हा ऑफीसर उठला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य होते.

"अजून त्याचा श्वास चालू आहे," तो म्हणाला.

"श्वास चालू आहे?"

कमिस्सारांच्या मुद्रेवर भावनांचा कल्लोळ स्पष्ट दिसत होता.

"दोघं इकडं या!" त्यांनी तीक्ष्ण हुकूम दिला. "त्याला उचला आणि थेट उपचार केंद्रावर न्या. तो कदाचित अजून जगू शकेल."

ते वळले व ताड ताड मैदानातून चालत गेले.

"जगेल किंवा नाही?" इतर प्रश्नांबरोबर हा प्रश्न त्यांच्या मनात घोटाळत होता. लढाईत तो कसा वागला? सर्वांच्या अगदी मागे तो का होता? आणि नकळतपणे हे सर्व प्रश्न एकाच दिशेने वळत होते: जर सगळे ठीक असेल, जर तो शूराप्रमाणे लढला असेल, तर तो जगेल, नक्की जगेल.

एक महिन्यानंतर, अधिक फिकट आणि कृश बनलेला, पण अजूनही सोनेरी केस व निळे डोळे असणारा पोरगेला ॲड्जूटन्ट जेव्हा इस्पितळातून डिव्हिजनच्या मुख्य कचेरीत परतला, तेव्हा कमिस्सारनी त्याला एकही प्रश्न विचारला नाही, फक्त आपला शाबूत डावा हात ॲड्जूटन्टपुढे हस्तांदोलनासाठी पुढे केला.

"तेव्हा मी पाचव्या कंपनीपर्यंत पोहोचू शकलो नाही," ॲड्जूटन्ट म्हणाला, "पाणी ओलांडताना अडकलो आणि शंभर पावलं अंतर उरलं होतं, तेवढ्यात..."

"माहीत आहे," कमिस्सारनी त्याचे बोलणे मध्येच तोडले, "सगळं

माहीत आहे, काही खुलासा करू नका. माहीत आहे, तुम्ही योग्य वागलात आणि जिवंत आहात ह्याचा आनंद वाटतोय."

मरणांतिक घायाळपणातून अवघ्या एका महिन्यात खडखडीत बऱ्या झालेल्या ह्या मुलाकडे त्यांनी असूयेने पाहिले व मग स्वतःच्या पट्टी बांधलेल्या हाताकडे नजर टाकीत ते खेदपूर्वक म्हणाले:

"माझं आणि कर्नलांचं आता ते वय राहिलं नाही. महिना उलटून गेला तरी माझ्या जखमा भरून येत नाहीत. आणि त्यांच्या जखमांना तर दोनपेक्षा जास्त महिने उलटून गेलेत. तशाच स्थितीत डिव्हिजनचं नेतृत्व करतोय–दोघांच्या हातांनी. ते उजव्या आणि मी डाव्या..."

१९४२

मिखायल शोलोखोव

माणसाचे दैव

मिखायल शोलोखोव (१९०५-१९८४). सरकारी, लेनिन व नोबेल पारितोषिकांचे मानकरी, सोविएत विज्ञान प्रबोधिनीचे सदस्य, मिखायल शोलोखोव त्यांच्या 'शांत वाहते दॉन' (१९२८-१९४०) आणि 'अभुक्त भूमीचा कायापालट' (१९३२-१९६०) कादंबऱ्यांबद्दल सबंध जगभर प्रसिद्ध आहेत.

"शोलोखोव आधुनिक लेखकांपैकी एक सर्वांत मोठे लेखक आहेत असे म्हणणे म्हणजे फार कमी बोलणे होय," सोविएत लेखक आ. इवानोव म्हणतात.

शोलोखोव अवघे वीस वर्षांचे होते, तेव्हा त्यांच्या लघुकथांचे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले. एव्हाना सुप्र-सिद्ध लेखक बनलेल्या अलेक्सांद्र सेराफीमोविच यांनी प्रस्तावनेत म्हटले होते: "शोलोखोव यांच्या कथा वाचताना स्तेपमध्ये उगवणाऱ्या तेजस्वी जंगली फुलांची मला आठवण झाली. त्यांचे साधे आणि ठळक वर्णन तुमच्या नजरेसमोर हुबेहूब दृश्य उभे करते. कझा-कांची बोलभाषा त्यांची रंगीत भाषा आहे. संक्षिप्त निवेदन जिवंतपणाने मुसमुसलेले, आतुरतेने आणि सत्याने भरलेले आहे. त्यांची प्रमाणबद्धतेची जाण एकूण परि-णाम अधिकच भेदक घडविते. ते आपल्याला जे सांगतात त्याचे महत्त्व प्रचंड आहे. त्यांच्या नजरेत सूक्ष्मता आणि पकड आहे. आणि अनेक लकबींपैकी अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण लकबी कशा निवडाव्या हे त्यांना ठाऊक आहे."

'शांत वाहते दॉन' प्रकाशित झाल्यावर दोन वर्षां-च्या अवधीत शोलोखोव यांचे नाव प्रत्येकाला ठाऊक झाले. 'दॉन कथा' मध्ये आरंभलेला विषय ह्या कादंबरीत त्यांनी पुढे चालविला: झारकालीन रशियातील सापेक्षरीत्या श्रीमंत व मुक्त जमात असणाऱ्या दॉन कझाकांची जीवनपद्धती आणि महान ऑक्टोबर समाजसत्तावादी क्रांतीनंतर ह्या समाजाच्या जीवनपद्धतीची व जागतिक दृष्टिकोनाची सुरू झालेली फेररचना. वर्गीय लढा मरणांतिक लढला जात असताना घडणाऱ्या नाट्यमय प्रसंगांचे वर्णन करताना प्रत्येक जातिवंत कलावंताप्रमाणे शोलोखोव निष्ठुर प्रामाणिक राहतात आणि युद्धाचे प्रांगण अनेकदा घराचे आवार, मोठे कुटुंब बनते.

येवगेनीया ग्रीगोऱ्येवना लेवित्स्काया यांना. १९०३ पासून सोविएत कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्या.

युद्धानंतरच्या पहिल्या वर्षातील वसंताचा मोसम दॉन नदीच्या वरच्या खोऱ्यात दुर्मिळ स्नेहलतेने आणि वेगाने आला. मार्चअखेरी अझोव सागरतीरांवरून उबदार वारे वाहू लागले आणि अवघ्या दोन दिवसात नदीचा वालुकामय डावा किनारा उघडा पडला. स्तेपमध्ये बर्फाने भरलेली डबकी आणि ओहोळ तुडुंब फुगली, बर्फ फुटून स्तेपमधील ओढे खळाळत धावू लागले आणि रस्ते जवळजवळ संपूर्ण बंद झाले.

वर्षाच्या अशा प्रतिकूल काळात बूकानोवस्काया खेड्यात जाणे मला भाग पडले होते. अंतर फार नव्हते – फक्त सुमारे साठ किलोमीटर – पण प्रवास अवघड ठरला. सूर्योदयापूर्वीच माझा मित्र व मी प्रवासाला निघालो. छानदार पोसलेल्या घोड्यांची जोडी कातडी पट्ट्यांना ताणत होती, अवजड गाडी ओढणे घोड्यांना जड जात होते. वाळूत हिम आणि बर्फ मिसळून दाट चिखल बनला होता व गाडीची चाके आसापर्यंत त्यात खोल बुडत होतो. तासाच्या अवधीत घोड्यांच्या पुठ्ठ्यांवर, मांड्यांवर आणि अरुंद लगामांच्या पट्ट्यांखाली पांढुरक्या फेसाचे ठिपके उमटले. सकाळच्या ताज्या हवेत घामाचा आणि भरपूर डांबर फासलेल्या उबदार ओखडाचा उग्र गंध दरवळू लागला.

जेथे घोड्यांना गाडी ओढणे फारच कठीण जात होते, तेथे आम्ही खाली उतरून गाडीबरोबर चालत होतो. बुटांखाली पाणचट बर्फ चुरडत होता, चालणे अवघड जात होते, पण रस्त्याच्या कडांना अजून चमकदार पाण्याचा थर होता व तेथून जाणे जास्त कठीण होते. तब्बल सहा तासांनंतर आम्ही फक्त तीस किलोमीटर अंतर कापू शकलो होतो; येलान्का नदीच्या पायउताराच्या जागेपर्यंत पोहोचलो.

मोखोवस्की खेडयाजवळची ही छोटी नदी उन्हाळयात जवळ जवळ कोरडी असायची. पण आता आल्डर झाडांच्या दाटी झालेल्या कुरणात सुमारे एक किलोमीटर रुंदीपर्यंत तिचे पात्र पाण्याने भरले होते. एका वेळी जेमतेम तीन माणसांना सामावू शकणाऱ्या सपाट तळाच्या छोटया होडीतून आम्हाला नदी ओलांडायची होती. गाडी व घोडयांना आम्ही घरी परत पाठवून दिले. दुसऱ्या तीरावरील सामुदायिक शेताच्या शेड-मध्ये जवळ जवळ सबंध हिवाळाभर उभी असलेली जुनी व खिळखिळी बनलेली जीप आमची वाट पहात होती. काहीशा भयाकुल मन:स्थितीतच मी त्या डगमगत्या होडक्यात जीपच्या ड्रायव्हरबरोबर बसलो. माझा मित्र आमचे सामान घेऊन मागे थांबला. आमची होडी जेमतेम पाण्यात शिरली न शिरली तोच होडीच्या कुजक्या फळयांमधून पाण्याची छोटी कारंजी उसळू लागली. हाती सापडेल त्या वस्तूंनी ती कारंजी बुजवायचा आम्ही प्रयत्न केला आणि दुसऱ्या किनाऱ्यावर पोहोचेपर्यंत होडीतील पाणी उपसून बाहेर फेकत राहिलो. नदीचा दुसरा तीर गाठायला आम्हा-ला तब्बल एक तास लागला. ड्रायव्हरने खेडयातून जीप आणली, तो परत होडीकडे गेला आणि वल्हे उचलीत म्हणाला:

"जर ही भिकारडी होडी पाण्यातच फुटली नाही, तर दोन तासां-नंतर तुमच्या मित्राला घेऊन येतो. त्याआधी वाट पाहू नका."

खेडे नदीपासून बरेच दूर होते आणि पाण्यापाशी विलक्षण स्तब्धता होती. फक्त शरदाच्या अखेरी अथवा वसंताच्या आरंभी निर्जन स्थळांवर अशी स्तब्धता पसरते. पाण्यावरील हवेत दमटपणा होता आणि कुज-णाऱ्या आल्डरांचा कडवट गंध पसरला होता. पण धुक्याच्या जांभळट धुरात न्हाऊन निघणाऱ्या दूरच्या स्तेपमधून, हिमाच्या मिठीतून नुकत्याच मुक्त झालेल्या मातीचा सदातरुण, किंचित जाणवणारा मंद वास वाऱ्याची हलकी झुळूक आणत होती.

जवळच, पाण्याच्या कडेशी वाळूवर, तट्टयाचे मोडके कुंपण पडले होते. धूम्रपान करण्याच्या इराद्याने मी त्या कुंपणावर बसलो, पण माझी घोर निराशा झाली; माझ्या खिशातील सिगारेटींचे पाकीट ओलेचिप्प भिजले होते. नदीच्या पात्रात आमच्या डुगडुगत्या होडीच्या एका बाजूवर एका लाटेने तडाखा मारला होता आणि त्या चिखल-

भरल्या पाण्याच्या लाटेने मला कंबरेपर्यंत भिजवून काढले होते. सिगारेटींचा विचार करायला तेव्हा सवडच नव्हती, कारण हातातील वल्हे टाकून होडीतील पाण्याचा भराभरा उपसा करावा लागला होता, होडीसकट आम्हाला वाचविण्यासाठी जिवाचा आटापिटा करावा लागला होता. पण आता मात्र माझ्या निष्काळजीपणावर मी चिडलो होतो. कडवट भावनेने मी खिशातील ओले पाकीट बाहेर काढले व उकीडवे बसून ओलसर तपकिरी सिगारेटी कुंपणावर मांडून ठेवू लागलो.

माध्यान्ह झाली होती. मे महिन्याप्रमाणे सूर्य तळपत होता. सिगारेटी लौकरच वाळतील अशी मी आशा करीत होतो. फार गरम वाटत होते. प्रवासात सैनिकी गरम विजार आणि जाकीट अंगात चढविल्याबद्दल आता मला पश्चात्ताप झाला होता. हिवाळ्यानंतरचा तो खरोखरच पहिला अस्सल उबदार दिवस होता. पण तेथे एकटे बसायला, त्या स्तब्धतेत आणि एकाकीपणात स्वतःला पूर्ण झोकून द्यायला, डोक्यावरील लष्करी टोपी काढून वल्हविण्याच्या श्रमांनी घामात भिजलेले माझे केस वाऱ्याच्या झुळूकींवर वाळवायला आणि फिकट निळाईत तरंगत जाणाऱ्या शुभ्र मोठ्या स्तनांच्या ढगांकडे निष्क्रियपणे बघत बसायला मला खूप छान वाटत होते.

लौकरच मी पाहिले की, खेड्याच्या टोकाकडील झोपड्यांमागून एक माणूस रस्त्यावर चालत आला. त्याचा हात धरून एक लहान मुलगा त्याच्याबरोबर चालत होता; मुलाची उंची पाहता त्याचे वय पाच किंवा सहा वर्षे असावे, जास्त नाही. नदीच्या पायउताराच्या दिशेने ते दमल्या चालीने येत होते, पण जीपजवळ येताच ते वळले आणि माझ्याकडे आले. उंचापुरा आणि किंचित पोक काढून चालणारा पुरुष थेट माझ्यापाशी आला आणि भरदार, बसक्या आवाजात म्हणाला:

"रामराम, भाऊ!"

"नमस्कार." माझ्यापुढे त्याने धरलेला मोठा खरबरीत पंजा मी हातात घेऊन म्हणालो.

पुरुष त्या मुलावर ओणवा होत म्हणाला:

"काकांना नमस्कार कर मुला. तुझ्या बाबासारखाच तोसुद्धा ड्राय-

व्हर दिसतोय. तू आणि मी लॉरी चालवत होतो, पण हा तो छोटी मोटार चालवतोय."

आकाशाप्रमाणे तेजस्वी आणि नितळ अशा किंचित हसऱ्या डोळ्यांनी त्या मुलाने थेट माझ्याकडे पाहिले व गुलाबी थंड हात धीटपणे माझ्यासमोर धरला. त्याचा हात हळूच हलवीत मी म्हणालो:

"गृहस्था, तुझा हात एवढा थंड का आहे रे? दिवस तर उबदार आहे आणि तू गारठलास?"

बालसुलभ विश्वासाने मुलगा माझ्या गुडघ्यांशी बिलगला आणि पांढऱ्याशुभ्र भुवया आश्चर्याने उंचावीत म्हणाला:

"काका, मी गृहस्थ नाही, मी लहान मुलगा आहे! आणि मी मुळीच गारठलो नाही, माझे हात गार आहेत – बर्फाचे चेंडू करून खेळत होतो म्हणून!"

पाठीवरील अर्धी-रिकामी पडशी उतरवीत माझ्याशेजारी धप्पदिशी बसत बाप म्हणाला:

"ह्या प्रवाशाबरोबर चालणं मला फार अवघड झालंय. त्यानं स्वतःएवढंच मला दमवलंय. जर लांब ढांगा टाकू लागलो, तर हा पेंगळत चालू लागतो; त्याच्या चालीनं जाऊ लागलो, तर धावायला लागतो. घोडा आणि कासव यांच्याप्रमाणं चाललाय आमचा प्रवास. शिवाय तो काय उद्योग करतोय हे बघायला डोक्याच्या पाठीमागं डोळे असणं आवश्यक आहे. जरा तुमची पाठ फिरली की हा डबक्यात पाय बुडवायला धावलाच, किंवा बर्फाची काडी लिमलेटच्या वडीसारखी चोखायला लागलाच. नाही बुवा, अशा प्रवाशाबरोबर जाणं हे पुरुषाचं काम नव्हे, पायी प्रवास तर मुळीच शक्य नाही." तो थोडा गप्प बसला आणि मग त्याने विचारले: "काय रे भाऊ, तुझ्या साहेबांची वाट पाहतोस?"

मी ड्रायव्हर नव्हतो असे त्याला सांगणे मला प्रशस्त वाटले नाही आणि मी उत्तरलो:

"वाट पहावी लागणार असं दिसतंय."

"त्या किनाऱ्यावरून यायचाय?"

"हो."

"तुला माहीत आहे का, होडी केव्हा येईल?"

"दोन तासांनंतर."

"बराच अवकाश आहे. तोवर विश्रांती घेऊ. मला काही घाई नाही. जवळून चाललो होतो तेव्हा दिसलं: माझा ड्रायव्हरभाऊ ऊन खातोय. मनाशी विचार केला, जावं त्याच्यापाशी आणि एकत्र तंबाखू ओढावी. एकट्यानं तंबाखू ओढण्यात आणि एकट्यानं मरण्यात मजा नाही. चैनीत जगतोस असं दिसतंय, चांगल्या सिगारेटी ओढतोस. ओल्या झाल्या वाटतं! बंधू, ओली तंबाखू आणि आजारी घोडा, दोन्ही कुचकामी! त्यापेक्षा माझ्याजवळची कडक तंबाखू ओढू!"

ठिगळे लावलेल्या उन्हाळी विजारीच्या खिशातून त्याने किरमिजी रंगाच्या जीर्ण रेशमी बटव्याची गुंडाळी बाहेर काढली व तो बटवा उघडत होता तोवर त्याच्या कोपऱ्याशी लिहिलेली अक्षरे वाचण्यात मला यश आले: "प्रिय सैनिकाला, लेबेद्यान्स्काया माध्यमिक शाळेतील ६ वी-च्या वर्गातील विद्यार्थिनीकडून."

घरच्या पैदाशीची कडक तंबाखू आम्ही ओढू लागलो व खूप वेळ-पर्यंत गप्प बसलो. मुलाला घेऊन तो कुठे चालला होता, अशा वाईट रस्त्यांवरून प्रवास कोणत्या कारणापायी तो करीत होता, असे त्याला विचारण्याच्या बेतात मी होतो पण तेवढ्यात त्यानेच मला आधी प्रश्न विचारला:

"तूसुद्धा सगळ्या युद्धातून गेलास?"

"जवळ जवळ सगळ्या."

"पुढच्या आघाड्यांवर?"

"हो."

"मलासुद्धा तिथं भरपूर संकटं झेलावी लागली, बंधू."

त्याने त्याचे मोठे काळे हात गुडघ्यांवर टेकविले व खांदे पाडले. मी त्याच्याकडे तिरपा कटाक्ष टाकला, तेव्हा माझ्या मनात विचित्र अस्वस्थता निर्माण झाली. राख शिंपडलेली असावी असे डोळे तुम्ही कधी पाहिलेत, सततच्या वेदनेने आणि दुःखाने भरल्यामुळे ज्यांच्याकडे पाहणे शक्य नाही असे डोळे तुम्ही कधी पाहिलेत? योगायोगाने मला भेटलेल्या ह्या माणसाचे डोळे अशा प्रकारचे होते.

कुंपणातील एक सुकलेली वाकडी डहाळी त्याने तोडली, मिनिटभर मुकाटपणे त्या डहाळीने वाळूवर विचित्र आकृत्या रेखाटल्या आणि मग तो बोलू लागला :

"कधी कधी सबंध रात्र झोप लागत नाही. रिकाम्या डोळयांनी अंधाराला बघत राहतो आणि मनात विचार येतो : 'आयुष्यानं मला असं पांगळं का बनवलं? कशाबद्दल अशी शिक्षा दिली?' मला ह्याचं उत्तर मिळत नाही : ना अंधारात, ना तळपत्या सूर्यप्रकाशात... नाही मिळत उत्तर आणि कधी मिळायचंही नाही!" अचानक त्याने स्वत:ला आवरले, लाडाने मुलाला धक्का मारला व तो म्हणाला : "जा पोरा, पाण्यापाशी खेळायला जा. मोठ्या नदीपाशी लहान पोरांना नेहमी काहीतरी सापडतं. मात्र सांभाळ, पाय ओले करू नकोस!"

मुकाटपणे आम्ही धूम्रपान करीत होतो तेव्हा बाप-मुलाकडे मी चोरटे कटाक्ष टाकले व त्यांच्याबद्दलची एक विचित्र गोष्ट मला खटकली. मुलाचे कपडे साधे होते, पण चांगले दणकट होते. केसाळ कातडीचे अस्तर लावलेला त्याचा छोटा कोट, लोकरी मोजांवरचे त्याचे व्यवस्थित छोटे बूट, कोटाच्या बाहीवर फाटल्या जागी केलेले नीटस रफूकाम — ह्या सर्व गोष्टी बाईच्या हाताची, आईच्या कुशल हाताची साक्ष देत होत्या. पण बापाचा अवतार अगदी वेगळा होता. त्याच्या दुलईदार जाकीटाला अनेक ठिकाणी जळकी भोके होती आणि त्यांच्यावरील रफूकाम ओबडधोबड होते, त्याच्या विजारीवरील ठिगळ नीट शिवलेले नव्हते, तर त्याला मोठे पुरुषी टाके घातलेले होते, त्याच्या पायात नवेकोरे लष्करी बूट होते, पण त्याच्या जाड लोकरी मोजांना जागजागी भोके पडली होती. त्यांना बाईच्या हातांचा कधी स्पर्श झालेला दिसत नव्हता. एक तर तो विधुर होता, किंवा त्याचे बायकोशी पटत नव्हते, असा मी कयास बांधला.

मुलगा पाण्यापाशी धावलेला त्याने पाहिला, मग तो किंचित खोकला व पुन्हा बोलू लागला. मी लक्षपूर्वक ऐकू लागलो.

"सुरवातीला माझं आयुष्य सामान्य होतं. वोरोनेझ प्रांतात १९०० साली माझा जन्म झाला. यादवी युद्धात लाल सेनेत किकविद्झेच्या डिव्हिजनमध्ये होतो. बावीसच्या दुष्काळी वर्षात कुबानमध्ये गेलो आणि

कुलकांपाशी* बैलासारखा राबलो, नाही तर आज जिवंत दिसलो नसतो. घरी माझे आई-बाप आणि बहीण मात्र उपासमारीनं मेले. एकटा उरलो. माझे नातेवाईक कुठंही नाहीत, एकसुद्धा नात्याचं माणूस नाही. एक वर्षानंतर कुबानहून परतलो, घर विकलं आणि वोरोनेझला गेलो. प्रथम सुतारांच्या संघात काम केलं, नंतर कारखान्यात गेलो, फिटरचं काम शिकलो. लौकरच लग्न केलं. बायको अनाथाश्रमात लहानाची मोठी झाली होती. ती पोरकी होती. माझ्या वाट्याला चांगली मुलगी आली होती! चांगल्या स्वभावाची, आनंदी, लाघवी आणि हुशार– माझ्याशी तुलना करायची नाही. अगदी लहानपणापासून तिची संकटांशी ओळख झालेली होती. बहुधा ह्याचा तिच्या स्वभावावर परिणाम झाला होता. एका बाजूनं तिच्याकडं पाहिलं तर ती खूप आकर्षक होती असं म्हणता आलं नसतं, पण मी तिरप्या नजरेनं तिला पहात नव्हतो, अगदी थेट समोरून पहात होतो. माझ्या दृष्टीनं तिच्यापेक्षा सुंदर स्त्री जगात कुणी नव्हती आणि कधी असणारही नाही!

"कामावरून मी घरी परतायचा तेव्हा काहीवेळा खूप थकलेला आणि चिडलेला असायचा. पण ती कधीही उर्मटपणानं प्रत्युत्तर करायची नाही. ती सौम्य आणि शांत वागायची, माझ्यासाठी जिवाचा आटापिटा करायची, घरात पुरेशा वस्तू नसतानाही चांगलंचुंगलं खायला बनवायचा प्रयत्न करायची. तिला नुसतं पाहून माझा जीव हलका व्हायचा. थोड्या वेळानंतर तिला मिठी मारून मी म्हणायचा: 'लाडक्या इरीना, मला क्षमा कर, मी तुझ्याशी उद्धट वागलो. आज कामाच्या ठिकाणी दिवस वाईट गेला.' परत घरात शांतता नांदायची आणि माझं मन निवांत व्हायचं. बंधू, कामाच्या दृष्टीनं हे किती महत्त्वाचं आहे, तुला ठाऊक आहे? सकाळी ताडकन उठायचा, कारखान्यात जायचा आणि हाती आलेलं प्रत्येक काम झराझरा पार पडायचं! चतुर बायको-सखी असण्याचा अर्थ हा आहे!

---

*कुलक– "भाडोत्री मजूर ठेवून किंवा व्याजाने पैसे कर्जाऊ देऊन । तत्सम मार्गाने इतर लोकांच्या श्रमाचे शोषण करणारे धनिक शेतकरी." (लेनिन).

“कधी कधी पगारानंतर मित्रांबरोबर प्यायचा प्रसंग यायचा. कधी कधी लटपटत्या पायांनी घरी परतायचा—बघणाऱ्याला धडकी भरत असावी. हमरस्ता अपुरा भासायचा, मग गल्ल्या-बोळांबद्दल बोलायलाच नको. त्या दिवसात मी सैतानासारखा दणकट आणि बळकट होतो, खूप दारू पिऊ शकत होतो आणि घरी नेहमी स्वतःच्या पायांवरच येत होतो. पण कधी कधी शेवटचा टप्पा पहिल्या गीअरमध्ये जायचा. म्हणजे हाता-पायांवर रांगत संपवायचा. तरीसुद्धा तिच्याकडून कधी रागाचा शब्द ऐकावा लागला नाही, आदळआपट आणि आरडाओरड अनुभवली नाही. माझी इरीना नुसती हसायची, पण सावधपणं, झिंगलेल्याला अपमान वाटणार नाही अशा रीतीनं. माझे बूट ओढून काढत पुटपुटायची : ‘आन्द्रचूशा, भिंतीच्या कडेला झोप, नाही तर झोपेत पलंगावरून खाली पडशील.’ मी ओटच्या पोत्यासारखा धप्प खाली कोसळायचा आणि सगळ्या वस्तू डोळ्यांसमोर गरगर फिरायच्या. झोप लागता लागता जाणवायचं की, ती माझं डोकं हलकेच कुरवाळतेय, प्रेमळ शब्द पुट-पुटतेय आणि माझ्याबद्दल तिला वाईट वाटतंय हे मला समजायचं...

“सकाळी कामावर जाण्यापूर्वी दोन तास आधी ती मला उठवायची, मी ताळ्यावर यावा म्हणून. अति प्यायल्यामुळं मी काही खाणार नाही हे तिला माहीत असायचं, तेव्हा ती मला खारवलेली काकडी किंवा तसंच काहीतरी खायला द्यायची आणि ग्लासभर वोदका द्यायची. ‘पी आन्द्रचूशा, पण लाडक्या, पुन्हा असं वागू नको.’ एवढा विश्वास ठेव-ल्यावर माणूस एखाद्याला खोटं कसं पाडणार! मी प्यायचा आणि शब्दांऐवजी नुसत्या डोळ्यांनी आभार मानायचा, तिचा पापा घ्यायचा आणि गरीब कोकरासारखा कामावर जायचा. पण मी झिंगून आलो असताना तिनं जर माझ्याशी वाकडं बोलणं केलं असतं, मला चावे घ्यायला सुरवात केली असती, तर खरं सांगतो, मी घरी परत झिंगून आलो असतो. जिथं बायको मूर्ख असते, अशा काही कुटुंबांमध्ये नेमकं असं घडतं. अशी अनेक कुटुंबं मी पाहिलीत आणि मला माहीत आहेत.

“लौकरच आम्हाला मुलं होऊ लागली. प्रथम मुलगा झाला, त्याच्या पाठोपाठ दोन मुली... इथं माझ्या मित्रांपासून मी तुटलो. माझा सगळा पगार घरी बायकोला नेऊन देऊ लागलो. आमच्या कुटुंबाचा

आकार बराच वाढला होता आणि आता पिणं परवडत नव्हतं. सुटीच्या दिवशी फार तर बीयरचा एक ग्लास प्यायचा.

"एकोणतीस साली मला मोटारींमध्ये रस निर्माण झाला, मी मोटारींची कामं शिकलो आणि लॉरी चालवू लागलो. त्या कामात मी रमलो, कारखान्यात परत जाण्याची इच्छा होईना. ड्रायव्हिंगमध्ये जास्त मजा वाटत होती. कशी दहा वर्षं जगलो आणि काळ कसा उलटला हे ध्यानातसुद्धा आलं नाही. जणू स्वप्नासारखा काळ सरला. दहा वर्षं म्हणजे काय! चाळीसवरच्या कुणाही माणसाला विचार, आयुष्याची वर्षं कशी उलटतात हे त्याच्या ध्यानात येत काय! मुळीच नाही! भूतकाळ त्या धुरात गुरफटलेल्या दूरच्या स्तेपसारखा असतो. आज सकाळी ते स्तेप मी ओलांडत होतो तेव्हा चौफेर स्वच्छ वातावरण होतं, पण आता वीस किलोमीटर ओलांडून आलोय तर त्या स्तेपवर धुंदकारलंय, झाड आणि गवत यांच्यातला फरक सांगणं, नांगरणीची जमीन आणि कुरण यांच्यातला फरक सांगणं, अवघड आहे.

"ती दहा वर्षं मी रात्रं-दिवस काम केलं. मी चांगले पैसे मिळवत होतो आणि इतर माणसांपेक्षा वाईट रहात नव्हतो. मुलं आनंद देत होती: तिघंही शाळेत चांगली शिकत होती. सर्वांत थोरला आनातोली गणितात तरबेज होता आणि मॉस्कोतल्या एका वर्तमानपत्रात त्याचं नावसुद्धा छापून आलं होतं. बंधू, बुद्धीचा हा वारसा त्याला कुठून मिळाला, मला तरी माहीत नाही. पण मी खूष होतो, त्याचा मला अभिमान वाटत होता. फार अभिमान वाटायचा!

"दहा वर्षांत आम्ही थोडे पैसे साठवले होते आणि युद्धापूर्वी दोन खोल्यांचं, कोठीच्या खोलीसकट आणि छपराच्या पोर्चसकट छोटं घर आम्ही बांधलं. इरीनानं दोन शेळ्या विकत घेतल्या. आणखी काय पाहिजे होतं? मुलं दुधाची खीर खात होती, आमच्या डोक्यावर छप्पर होतं, अंगांवर कपडे होते, पायात बूट होते, सर्व काही व्यवस्थित चाललं होतं. फक्त घराची जागा चांगली नव्हती. आमच्या जमिनीचा तुकडा विमान कारखान्यापासून जवळ होता. जर माझं घर दुसरीकडं कुठंतरी असतं, तर माझं आयुष्य कदाचित वेगळं बनलं असत.

"आणि युद्ध सुरू झालं. दुसऱ्या दिवशी लष्करी कचेरीतून बोलावणं

आलं आणि तिसऱ्या दिवशी ठाण्यावर हजर राहण्याचा हुकूम. माझ्या चौघांनीही मला निरोप दिला: इरीना, आनातोली, माझ्या मुली नास्तेन्का आणि ओल्यूश्का. मुलांनी छान संयम धरला, पण पोरींच्या डोळ्यांमधून एक-दोन आसवं टपकलीच. जणू थंडी वाजावी तसा आनातोली थोडा शहारला. एव्हाना त्याला सतरावं वर्ष लागलं होतं. माझी इरीना... आमच्या सतरा वर्षांच्या एकत्र आयुष्यात मी तिला तशी कधी पाहिलं नव्हतं. तिच्या आसवांनी माझा सदरा खांद्यावर आणि छातीवर अखंड भिजून निघाला होता. सकाळी परत तेच सुरू झालं होतं... आम्ही स्टेशनवर पोचलो आणि तिची दया येत असल्यामुळं तिच्या चेहऱ्याकडं पाहण्याचा मला धीर होईना. तिचे ओठ सुजले होते, रुमालाखालून केस डोकावत होते, तिचे डोळे मंद आणि वेडीसारखे भासत होते. ऑफीसरांनी आगगाडीत चढण्याचा हुकूम दिला, पण तिनं स्वत:ला माझ्या छातीवर झोकून दिलं आणि माझ्या मानेभोवती हातांची मिठी घातली. तोडलेल्या झाडासारखी ती सर्वांगानं थरथरत होती. मुलांनी तिची समजूत घालायचा प्रयत्न केला, मीही समजावलं, पण काही उपयोग होईना. इतर बायका त्यांच्या नवऱ्यांशी आणि मुलांशी बोलत होत्या, पण माझी मात्र फांदीला पान चिकटावं तशी मला चिकटून होती, सारा वेळ थरथरत होती आणि तिच्या तोंडून एक शब्द फुटत नव्हता. 'इरीना, स्वत:ला सावर,' मी म्हणालो. 'मी जाण्यापूर्वी निदान काहीतरी बोल.' दर शब्दागणिक हुंदका देत ती म्हणाली: 'माझ्या जिवलगा... आन्द्रयूशा... आपली दोघांची... परत भेट होणार नाही... ह्या जगात...'

"इथं माझं हृदय तिच्याबद्दलच्या करुणेनं फुटून चाललं होतं आणि ती असले शब्द बोलली. तिच्यापासून अलग होणं मला सोपं जात नव्हतं हे तिला समजायला पाहिजे होतं. मी काही सासूकडं मेजवानी झोडायला चाललो नव्हतो. माझा ताबा सुटला! जोर लावून मी तिचे हात वेगळे केले आणि हलकेच तिच्या खांद्याला धक्का मारला. पण मला जरी तो हलका धक्का वाटला, तरी माझ्या अंगी रेड्याचं बळ होतं आणि ती जवळ जवळ तीन पावलं मागं झेलपाटली, मग हात पसरून पुन्हा माझ्याकडं छोटी पावलं टाकत आली आणि मी तिच्यावर ओरडलो:

'असा निरोप देतात काय? मला आधीच जिवंत पुरतेस काय?!' पण परत मी तिला मिठी मारली, कारण तिचं चित्त मुळीच थाऱ्यावर नसलेलं मी पाहिलं."

तो अचानक बोलायचा थांबला आणि नंतरच्या शांततेत घसा घुसमटल्याचा एक मंद आवाज मी ऐकला. त्याचा भावनावेग मलाही जाणवला. मी त्याच्याकडे तिरपा कटाक्ष टाकला, पण त्याच्या निर्जीव, राखाडी डोळयांमध्ये एकही अश्रू मला दिसला नाही. दुःखाने डोके खाली घालून तो बसला होता. त्याचे लुळे लोंबणारे मोठे हात किंचित कापत होते; त्याची हनुवटी थरथरत होती आणि त्याचे ठाम ओठही थरथरत होते...

"नको मित्रा, आठवणी काढू नको!" मी हळूच म्हणालो, पण त्याने बहुधा माझे शब्द ऐकले नाहीत. अत्यंत कष्टाने भावनावेगावर मात करून तो एकदम घोगऱ्या, विचित्र बदललेल्या आवाजात म्हणाला:

"तेव्हा तिला तसं ढकललं ह्याबद्दल माझ्या मरणापर्यंत, माझ्या शेवटच्या घटकेपर्यंत मी स्वतःला कधी क्षमा करणार नाही!"

तो परत खूप वेळपर्यंत गप्प झाला. सिगारेट वळायचा त्याने प्रयत्न केला, पण वर्तमानपत्राचा कागद फाटला, तंबाखू गुडघ्यांवर सांडली. शेवटी त्याने कशीबशी सुरळी बनविली, भसाभसा काही झुरके घेतले आणि घसा खाकरीत तो पुढे म्हणाला:

"इरीनापासून मी स्वतःला अलग केलं, माझ्या हातांच्या ओंजळीत तिचा चेहरा धरला आणि तिचं चुंबन घेतलं. तिचे ओठ बर्फासारखे गार होते. मुलांचा निरोप घेतला आणि एव्हाना चालू झालेल्या आगगाडीच्या डब्याच्या पायरीवर उडी मारली. आगगाडी अगदी मंद गतीने चालू लागली होती आणि माझा डबा पुन्हा माझ्या माणसांजवळून गेला. एकत्र घोळका करून उभी राहिलेली, हात हलविणारी, हसण्याचा केविलवाणा अयशस्वी प्रयत्न करणारी माझी पोरकी पोरं मला दिसत होती. इरीनाने तिचे हात छातीशी गच्च आवळून धरले होते; तिचे ओठ पांढरेफटक पडले होते, ती काहीतरी पुटपुटत होती, माझ्याकडं एक टक लावून पहात होती आणि जोरदार वाऱ्याच्या विरुद्ध दिशेनं चालण्याचा प्रयत्न करावा अशा रीतीनं तिचा संपूर्ण देह पुढं झुकला

होता... सबंध आयुष्यभर ती अशी माझ्या आठवणीत राहिलीय – छातीशी गच्च आवळलेले हात, पांढरेफटक ओठ आणि आसवांनी डबडबलेले विस्फारलेले डोळे... अनेकदा माझ्या स्वप्नांमध्येसुद्धा ती मला अशीच दिसते... तेव्हा मी का तिला ढकललं? ती आठवण झाली की, काळजात जणू बोथट सुरी खुपसल्यागत वाटतं...

"युक्रेनमधल्या ब्येलाया त्सेर्कोव इथं आमची जमवाजमव झाली. मला 'झीस-५' लॉरी देण्यात आली आणि तिला घेऊन मी युद्धाच्या आघाडीवर गेलो. युद्धाबद्दल तुला काही सांगण्याची गरज नाही, तू स्वत: पाहिलं आहेस आणि सुरवातीची परिस्थिती तुला माहीत आहे. घरून मला सतत पत्रं येत होती, पण मी मात्र क्वचित पत्र पाठवायचा. मी लिहायचा की, सगळं ठीक आहे, थोडी लढाई आम्ही करत आहोत, आणि आत्ता जरी माघार घेत आहोत, तरी लौकरच आम्ही बळ एकवटू आणि फ्रीत्सांना चोपून काढू. आणखी काय लिहिणार? कठीण काळ होता, काही लिहावंसं वाटत नव्हतं. आणि कबूल करतो की, रडके सूर पिळायला मला कधी आवडत नव्हतं. स्वत:च्या बायकांना आणि मैत्रिणींना रोजच्या रोज काही कारण नसताना अशी रडकी पत्रं लिहिणाऱ्यांचा मला विलक्षण तिटारा वाटायचा. म्हणे त्याला फार कष्ट पडताहेत, कुठल्याही क्षणी ठार होईल! आणि हा कुत्र्याच्या अवलादीचा पुढं अशाच तक्रारी लिहीत जातो, सहानुभूती धुंडाळत राहतो, लाळ गाळत राहतो, पण त्याला समजून घ्यायची इच्छा नसते की, आमच्याप्रमाणंच घरीसुद्धा त्या बिचाऱ्या बायका-मुलांना वाईट दिवस काढावे लागत होते. सबंध देश त्यांच्या खांद्यांवर होता! आणि ह्या वजनाखाली चिरडून न जाण्यासाठी आमच्या बायका-मुलांचे खांदे किती बळकट असले पाहिजेत! त्यांनी जिद्द सोडली नाही, सारा भार पेलला! पण तेवढ्यात असा एखादा रड्या केविलवाणं पत्र लिहितो आणि कष्टकरी बाईच्या पायांखालची जमीनच निसटते. तशा पत्रानतर बिचारीला काय करावं तेच सुचत नाही, कामाला तोंड देणं जमत नाही. नाही! गरज पडली तर पुरुषानं सारं सोसलं पाहिजे, सैनिकानं सारं पेललं पाहिजे. पण तुझ्यात जर पुरुषापेक्षा बाईचा अंश जास्त असेल, तर तुझे खारकेसारखे कुल्ले झाकायला झालरीचा परकर नेस, म्हणजे नि-

दान मागच्या बाजूनं बाईसारखा दिसशील आणि आरारूटमधलं गवत उपटायला किंवा गायींचं दूध काढायला जा, कारण तुझ्यासारख्यांची आघाडीवर गरज नाही, तिथं तुझ्याविना भरपूर दुर्गंध आहे!

"पण मी वर्षभरसुद्धा लढलो नाही... दरम्यान दोनदा जखमी झालो, दोन्ही वेळा थोडासा: एकदा दंडात, दुसऱ्यांदा पायात. पहिल्यांदा विमानामधून झाडलेली गोळी लागली, दुसऱ्या वेळी तोफगोळ्याचा कपचा घुसला. बंधू, जर्मनांनी माझ्या लॉरीचो चाळण केली, पण प्रथम मी सुदैवी ठरलो. सारा वेळ सुदैवी ठरत होतो, अखेर अभागी ठरेपर्यंत... बेचाळीसच्या मे महिन्यात लोझोवेन्कीत मी पकडला गेलो. फार विचित्र प्रसंगात. जर्मन जोरदार हल्ला चढवत होते आणि आमच्या १२२ मि. मी. हॉविट्झर तोफखान्याच्या एका तुकडीजवळचा दारूगोळा संपला. माझ्या लॉरीत आम्ही खच्चून तोफगोळे भरले. घामानं पाठीला गदरा चिप्प चिकटेपर्यंत मीसुद्धा तोफगोळे भरण्याचं काम करत होतो. खूप घाई करणं आवश्यक होतं, कारण शत्रू जवळ येऊन ठेपला होता. डावीकडून रणगाड्यांची घरघराट ऐकू येत होती, उजवीकडून आणि समोरून आगीचा वर्षाव चालू होता, परिस्थिती वाईट होती...

"आमच्या लॉरी-पथकाच्या कमांडरनं विचारलं: 'घेऊन जाशील, सोकोलोव?' खरं तर विचारण्याचं कारण नव्हतं. तिथं माझे साथीदार मरत असताना मी इथं स्वस्थ कसा बसणार! 'विचारताय काय!' मी त्याला उत्तरलो. 'मी गेलंच पाहिजे. बास्स!' तो म्हणाला, 'तर मग, धाव! टीपेच्या वेगानं जा!'

"मी भरधाव निघालो. ह्यावेळेसारखं सबंध आयुष्यात कधी गेलो नव्हतो! माहीत होतं की, मी बटाटे वाहून नेत नव्हतो, हा माल सावधपणं न्यायला पाहिजे होतं, पण जेव्हा आमची पोरं रिकाम्या हातांनी लढत होती, जेव्हा सबंध रस्ता तोफखान्याच्या माऱ्याखाली भाजून निघत होता, तेव्हा कसला आलाय सावधपणा! सुमारे सहा किलोमीटर अंतर कापलं आणि आमच्या तोफखान्याच्या अगदी जवळ जाऊन पोहोचलो होतो. रस्त्यापासून वळायचं आणि तोफखाना उभा होता त्या खोलगट जागेपर्यंत जायचं... पण बघतो तर काय? आमचे पायदळाचे सैनिक रस्त्याच्या दोन्ही अंगांनी माघारी धावत होते आणि

त्यांच्यामध्ये तोफगोळे फुटत होते. मी काय करायला पाहिजे होते? माघारी जायचं? पूर्ण वेग वाढवला. तोफखाना अवघ्या एक किलोमीटर अंतरावर राहिला होता, रस्त्यापासून एव्हाना मी वळलो होतो, पण बंधू, मी तिथपर्यंत कधीच पोचलो नाही... बहुधा दूर पल्ल्याच्या तोफेनं मारलेला गोळा माझ्या लॉरीपाशी फुटला. मला स्फोटाचा आवाज ऐकू आला नाही, काहीच समजलं नाही, फक्त माझ्या डोक्याच्या आत काहीतरी फुटलं आणि पुढचं काही आठवत नाही. मी जिवंत कसा राहिलो आणि खड्डयापाशी किती वेळपर्यंत पडून होतो, मला काही माहीत नाही. मी डोळे उघडले, पण मला वर उठता येईना. माझ्या डोक्याला झटके बसत होते आणि ताप भरल्याप्रमाणे अंगात हुडहुडी भरली होती. डोळ्यांसमोर अंधारी येत होती, डाव्या खांद्यात काहीतरी घासत आणि कडकडत होते, कुणीतरी हाती येईल त्या वस्तू घेऊन दोन दिवसपर्यंत अखंड मला मारलं असावं अशा रीतीनं सबंध अंग ठणकत होतं. खूप वेळपर्यंत मी जमिनीवर पालथा पडून राहिलो आणि शेवटी कसाबसा वर उठलो. पण मी कुठं होतो आणि मला काय झालं होतं, हे अजूनही समजत नव्हतं. माझी स्मरणशक्ती पुरती नाहीशी झाली होती. पण मला निजून रहायला भीती वाटत होती. मी परत कधी उठूच शकणार नाही अशी धास्ती वाटत होती, म्हणून तिथं झुकांडचा खात मी उभा होतो, वादळात सापडलेल्या पॉप्लरच्या झाडासारखा.

"जेव्हा मी भानावर आलो आणि भोवती पाहिले. तेव्हा माझ्या काळजाभोवती कुणीतरी पकड आवळल्याचा मला भास झाला. मी वाहून आणलेले तोफगोळे सर्वत्र विखुरले होते. जवळच माझी लॉरी चारही चाके वर करून उताणी पडली होती. आणि लढाई? लढाई माझ्या मागील प्रदेशात चालू होती... असं कसं झालं?

"मी लपवीत नाही, पण माझे पाय डळमळले आणि तोडलेल्या झाडागत मी खाली कोसळलो, कारण मी आता शत्रूच्या वेढ्यात सापडलो होतो आणि लौकरच फॅसिस्टांचा कैदी बनणार होतो हे माझ्या ध्यानात आलं. युद्धावर काय घडतं पहा...

"स्वतःचा दोष नसताना शत्रूचा कैदी होणं म्हणजे काय हे समजून

घेणं सोपं नाही बंधू! ज्यानं हे स्वत: अनुभवलेलं नाही, त्याला पटकन हे समजावून देणं शक्य नाही.

"तर मी तिथं पडून होतो आणि लौकरच रणगाड्यांची घरघर ऐकली. ज्या दिशेनं मी आलो होतो, त्या दिशेला चार मध्यम जर्मन रणगाडे भरवेगानं गेले... काय जाणवलं असेल मला? मग तोफा ओढणारे ट्रॅक्टर आले, फिरता भटारखाना गेला, मग पायदळ; फार नव्हे, एक कंपनी सैनिक असावेत. मी तिरप्या नजरेनं त्यांच्याकडं पहायचा आणि परत मातीत तोंड खुपसून पडायचा. त्यांना पाहताना किळस येत होती, काळजातसुद्धा किळस येत होती...

"मला वाटलं, सगळे गेले, मी डोकं वर केलं आणि बघतो तर त्यांचे सहा सबमशिनगनवाले माझ्यापासून शंभर पावलांवरून येत होते. मी बघताच ते रस्त्यापासून वळले आणि थेट माझ्याकडं आले. एकही शब्द न बोलता. म्हटलं, आता माझं मरण जवळ आलं. मी उठून बसलो, कारण निजल्या अवस्थेत मरायची माझी इच्छा नव्हती आणि मग उभा राहिलो. त्यांच्यापैकी एकजण माझ्यापासून काही पावलांवर थांबला आणि त्यानं सबमशिनगन खांद्यावरून काढली. माणसाची घडण मोठी विचित्र आहे: ह्या क्षणाला माझ्या मनात कोणतीही घबराट नव्हती, काळजात किंचितसुद्धा थरथरलं नाही. फक्त त्याच्याकडं टक लावून पाहताना मनात येत होतं: 'आत्ता हा एक छोटी फैर झाडणार. कुठल्या भागावर मारील? डोक्यावर किंवा छातीवर?' जणू माझ्या शरीराच्या कोणत्या भागावर तो गोळ्या मारणार ह्याची मला फिकीर नव्हती.

"तो तरुण होता, भक्कम बांध्याचा, काळ्या केसांचा. पण त्याचे ओठ अगदी पातळ होते, दोऱ्यासारखे आणि त्याच्या डोळ्यात दुष्ट चमक होती. 'हा मला क्षणाचा विचार न करता ठार मारणार,' मनाशी म्हटलं. आणि तसंच घडलं: त्यानं सबमशिनगन वर उचलली. मी थेट त्याच्या डोळ्यांना डोळे भिडवले आणि गप्प राहिलो. पण दुसरा सैनिक, बहुधा कार्पोरल असावा, तो वयानं मोठा होता, दिसायला वयस्क होता — तो काहीतरी ओरडला, पहिल्याला त्यानं बाजूला सारलं आणि माझ्यापाशी आला. तो स्वत:च्या भाषेत काहीतरी बरंच बोलला आणि माझा

उजवा कोपर त्यानं वाकवून पाहिला. माझ्या दंडाचे स्नायू अजमावून पहात होता. 'ओ-ओ-ओ!' तो म्हणाला आणि सूर्य मावळत होता त्या रस्त्याकडं त्यानं बोट दाखवलं. जणू त्याला म्हणायचं होतं: 'जा खेच-रा, आमच्या राईखसाठी राबायला जा.' कुत्र्याची अवलाद, काटकसरी होता.

"पण काळया केसवाल्याचा माझ्या बुटांवर डोळा होता. माझे बूट चांगले दिसत होते. त्यानं हातांनी खूण केली: 'काढ.' मी जमि-नीवर बसलो, बूट काढले आणि त्याला देऊ लागलो. त्यानं बुटांना पटकन माझ्या हातांमधून खेचून घेतलं. मी पायांभोवती गुंडाळलेली फडकी सोडली आणि जमिनीवरून त्याच्याकडं बघत तीसुद्धा त्याच्यासमोर धर-ली. तो ओरडला, स्वतःच्या भाषेत त्यानं मला शिव्या हासडल्या आणि परत सबमशिनगनला हात घातला. बाकीचे खो खो हसू लागले. मग ते निघून गेले. काळया केसवाल्यानं रस्त्यावर पोहोचण्यापूर्वी दोन-तीनदा मागं वळून माझ्याकडं पाहिलं. लांडग्याच्या संतापलेल्या पिलाप्रमाणं त्याचे डोळे चमकत होते. कुणालाही वाटलं असतं की, त्यानं माझे बूट घेण्याऐवजी जणू मीच त्याचे बूट लुबाडले होते.

"बंधू, माझ्यापुढं दुसरा उपायच नव्हता. मी रस्त्यावर आलो, वोरोनेझच्या शिव्यांची जोरदार लाखोली वाहिली आणि पश्चिमेकडं निघालो – कैदी व्हायला! तेव्हा मला नीट चालता येत नव्हतं – तासा-भरात एक किलोमीटर अंतर जेमतेम कापत होतो. झिंगलेल्या माणसासा-रखी माझी चाल होती. सरळ जायचा प्रयत्न करावा, तर रस्त्याच्या-एका कडेनं दुसऱ्या कडेपर्यंत झोकांडी जायची. मी थोडं अंतर गेलो आणि माझ्याच डिव्हिजनमधल्या माणसांच्या रांगेनं मागून मला गाठलं. त्यां-च्यावर सुमारे दहा जर्मन सबमशिनगनवाल्यांचा पहारा होता. रांगेच्या पुढचा जर्मन माझ्यापाशी आला आणि एकही शब्द न बोलता त्यानं माझ्या डोक्यावर सबमशिनगनच्या दस्त्याचा तडाखा हाणला. मी जर खाली कोसळलो असतो, तर गोळयांची फैर उडवून त्यानं मला जमि-नीशी शिवून टाकलं असतं, पण आमच्या माणसांनी मला पडता पडता सावरलं आणि रांगेच्या मध्यभागी घेऊन अर्धा तासभर अक्षरशः माझ्या काखेत आधार देऊन नेलं. जेव्हा मी भानावर आलो, तेव्हा एकजण

दबत्या आवाजात म्हणाला: 'देवाखातर, खाली पडू नको! शेवटचं बळ खर्च कर, पण चालत रहा, नाही तर ते तुला ठार मारतील!' आणि मी अक्षरशः अंगातली अखेरची ताकद लावून चालत राहिलो.

"सूर्यास्ताला जर्मनांनी पहारा जास्त बळकट केला. लॉरीमधून त्यांनी आणखी वीस सबमशिनगनवाले आणले आणि आम्हाला जास्त वेगानं हाकलू लागले. खूप घायाळ झालेली माणसं इतरांशी वेग राखू शकेनात, तेव्हा त्यांना जर्मनांनी रस्त्यावर गोळ्या घालून ठार मारलं. दोघांनी पळून जायचा प्रयत्न केला, पण चांदण्या रात्री उघड्या मैदानात मैलभर लांबपर्यंत तुम्ही दिसू शकता हे त्यांच्या लक्षात राहिलं नव्हतं. अर्थात त्यांचाही जर्मनांनी निकाल लावला. मध्यरात्रीला आम्ही एका अर्धवट जळक्या खेड्यात पोचलो. घुमट फुटलेल्या चर्चमध्ये आम्हाला कोंडण्यात आलं. दगडी फरशीवर रात्र काढावी लागली, वाळक्या गवताची एक पेंडीसुद्धा नव्हती. कुणापाशीही मोठा कोट नव्हता, त्यामुळं अंगाखाली अंथरायला काहीच नव्हतं. काहीजणांपाशी तर सदरेही नव्हते, नुसत्या सुती बंड्या होत्या. हे बहुतेक सगळे बिनसनदी अधिकारी होते. त्यांनी सदरे काढून टाकले होते, सामान्य सैनिकांपेक्षा ते वेगळे ओळखून येऊ नयेत म्हणून. आणि तोफखान्यातल्या माणसांच्या अंगांवरही सदरे नव्हते. तोफा चालवताना त्यांनी सदरे काढले होते.

"त्या रात्री धो धो पाऊस कोसळला आणि आम्ही सगळे भिजून चिप्प झालो. छपराचा काही भाग तोफगोळ्यामुळं अथवा बॉबमुळं फुटला होता व बाकीचा भाग तोफगोळ्याच्या कपचीमुळं फाटला होता. देवाच्या वेदीपाशीसुद्धा कोरडी जागा नव्हती. अंधाऱ्या कोंडवाड्यातील मेंढरांप्रमाणं आम्ही सबंध रात्र त्या चर्चमध्ये उभे होतो. मध्यरात्रीला कुणीतरी माझ्या दंडाला स्पर्श करून विचारलं: 'कॉम्रेड, तू जखमी आहेस?' मी उत्तरलो: 'तुला काय पाहिजे, बंधू?' तो म्हणाला: 'मी लष्करी डॉक्टर आहे. तुला मदत करू शकतो काय?' मी त्याला सांगितलं की, माझा डावा खांदा कडकड आवाज करतोय, तो सुजलाय आणि भयंकर ठणकतोय. तो ठामपणं म्हणाला: 'सदरा आणि आतली बंडी काढ.' मी कपडे काढले आणि तो त्याच्या सडपातळ बोटांनी माझ्या खांद्याभोवती चाचपू लागला. फार दुखत होतं! दात आवळून त्याला

म्हणालो : 'तू माणसांचा नव्हे, गुरांचा डॉक्टर असावास. निर्दय माणसासारखा दुखऱ्या जागी मुद्दाम का दाबतोस?' पण तो चाचपत राहिला आणि रागानं उत्तरला : 'चूप राहणं तुझं काम आहे! लागला शिकवायला मला शहाणपण! सहन कर, आता खूप जोरात दुखेल!' आणि त्यानं माझ्या दंडाला असा झटका मारला, की माझ्या डोळ्यांसमोर काजवे चमकले.

"मी भानावर आल्यानंतर त्याला विचारलं : 'तू काय करतोस, नतद्रष्ट फॅसिस्टा? माझ्या हाताचे आधीच तुकडे पडलेत आणि तू त्याला असा हिसका मारतोस!' तो किंचित हसला आणि म्हणाला : 'मला वाटलं, उजव्या हातानं तू मला थप्पड मारणार, पण तू फार सहनशील पोरगा दिसतोस. तुझा हात मोडला नव्हता, खांद्यातून निखळला होता आणि मी परत त्याला जागच्या जागी बसवलंय. आता तुला मघापेक्षा हलकं वाटतंय?' आणि खरंच, वेदना कमी होत असल्याचं मला जाणवलं. मी त्याचे मन:पूर्वक आभार मानले आणि तो अंधारात पुढं जात हळूच विचारू लागला : 'कुणी जखमी आहे?' जातिवंत डॉक्टर होता. तो स्वत: कैदेत होता, पण तरीही स्वत:चं थोर काम करत राहिला होता.

"ती रात्र फार अस्वस्थ गेली. शारीरिक विधी करायलासुद्धा त्यांनी आम्हाला बाहेर सोडलं नाही. पहारेकऱ्यांच्या कमांडरनं जेव्हा आम्हाला दोघा-दोघांच्या जोडीनं चर्चमध्ये कोंडलं, तेव्हाच सांगितलं होतं की, मलमूत्र विसर्जनासाठी आम्हाला ते बाहेर सोडणार नाहीत. आणि दुर्दैव म्हणजे आमच्यातल्या एका धर्मश्रद्धाला बाहेर जाण्याची आत्यंतिक गरज भासली. तो सतत आवरून धरत होता आणि शेवटी त्याला रडू कोसळलं. म्हणाला, 'पवित्र मंदिरात घाण करणं मला शक्य होत नाही! मी आस्तिक आहे, ख्रिश्चन आहे. बंधूनो, मी काय करू?' आपली माणसं कशी असतात तुला माहीत आहे ना? कुणी हसत होती, कुणी शिव्या घालत होती, कुणी त्याला वेगवेगळे सल्ले देऊन चिडवत होती. त्यानं आम्हा सर्वांची खूप करमणूक केली, पण त्या प्रकरणाची अखेर वाईट झाली. तो दारावर धडका मारू लागला आणि बाहेर सोडा अशी मागणी करू लागला. त्याला त्याचं उत्तर मिळालं. एका नाझीनं दारामधून सबमशिनगनची लांबलचक फैर उडवली. त्या गोळीबारात

तो ख्रिश्चन आणि आणखी तिघं ठार झाले व एकाला एवढ्या गंभीर जखमा झाल्या, की सकाळच्या दरम्यान तो मेला.

"मृतांना आम्ही कोपऱ्यात ओढून ठेवलं आणि शांत बसून मनाशी विचार करू लागलो. हा आरंभ काही उल्हसित नव्हता... मग हळूहळू दबत्या आवाजांमध्ये आम्ही बोलू लागले, एकमेकांच्या नावा-गावाची चौकशी करू लागलो, कैदी कसे बनलो ह्याबद्दल विचारू लागलो. एकाच पलटणीतली अथवा एकाच कंपनीतली माणसं एकमेकांना अंधारातच हळू आवाजात हाका मारू लागली. माझ्या शेजारी दबत्या आवाजातलं संभाषण मी ऐकलं. एकजण म्हणत होता: 'जर उद्या सकाळी इथून पुढं जाण्यापूर्वी त्यांनी आपल्याला रांगेत उभं केलं आणि कमिस्सारांना, कम्युनिस्टांना, यहुद्यांना दोन पावलं पुढं यायला सांगितलं, तर तू लपायचा प्रयत्न करू नको पलटण-कमांडरा! त्याचा काही उपयोग होणार नाही. तुला वाटतं, तू सदरा काढलास, म्हणजे साधा सैनिक वाटशील त्यांना? नाही जमायचं! तुझ्याखातर मी हाल सोसायला तयार नाही. मीच सर्वांत प्रथम तुझ्याकडं बोट दाखवीन. मला माहीत आहे, तू कम्युनिस्ट आहेस आणि मी पक्षात दाखल व्हावं म्हणून तू माझं मन वळवायचे किती प्रयत्न केलेस तेही मला आठवतं. आता त्या कर्मांची भोग फळं!' हा बोलत होता माझ्या अगदी जवळ, डाव्या बाजूला बसलेला. त्याच्या दुसऱ्या बाजूला बसलेल्याचा तरुण आवाज उत्तरला: 'मला नेहमी संशय होता की, क्रीझ्नेव, तू चांगला माणूस नाहीस. विशेषत: तू निरक्षर आहेस असं ढोंग करून पक्षात दाखल व्हायचं नाकारलंस तेव्हा. पण तू देशद्रोही बनशील असं मात्र कधी मला वाटलं नव्हतं. तू सातवीपर्यंत शिकला आहेस ना?' त्यावर तो सहजपणं कमांडरला उत्तर देतो: 'होय, शिकलोय, मग काय?' खूप वेळपर्यंत दोघं गप्प राहिले. मग पलटणीचा कमांडर हळूच म्हणाला — मी आवाजावरून ओळखलं — 'कॉम्रेड क्रीझ्नेव, मला त्यांच्या तावडीत देऊ नको.' दुसरा हळूच हसला आणि म्हणाला: 'आघाडीच्या पलिकडं कॉम्रेड राहिलेत, मी तुझा कॉम्रेड नव्हे आणि तू माझ्यापाशी विनवणी करू नको. कोणत्याही परिस्थितीत मी तुझ्याकडं बोट दाखवीनच. स्वत:चा जीव कुणालाही जास्त प्यारा...'

"त्यानंतर ते बोलायचे थांबले, पण मी ऐकलेल्या संभाषणातील दुष्टपणानं मी शहारलो. मनाशी विचार केला, 'नाही, कुत्रीच्या अवलादीच्या, आमच्या कमांडरचा घात करायची संधी मी तुला देणार नाही! ह्या चर्चमधून स्वतःच्या पायांनी तू बाहेर चालत जाणार नाहीस, तुझ्या पायांना धरून फरफटत तुला बाहेर नेतील!' मग हळूहळू उजाडू लागले आणि मोठ्या गुबगुबीत चेहऱ्याचा एक माणूस डोक्याखाली हातांची उशी करून उताणा निजलेला मी पाहिला. त्याच्या पलिकडे एक अपऱ्या नाकाचा पोरगा नुसत्या बंडीत, गुडघ्यांभोवती हातांची मिठी घालून फिकट चेहऱ्यानं बसून होता. 'ह्या पोरग्याला तो लठ्ठ्या घोडा पेलणं जमणार नाही,' माझ्या मनात आलं, 'मीच त्याचा निकाल लावला पाहिजे.'

"मी त्या तरुणाच्या दंडाला स्पर्श केला आणि दबत्या आवाजात विचारलं: 'तू—पलटणीचा कमांडर?' त्यानं उत्तरादाखल नुसती मान होकारार्थी हलवली. 'हा तुला शत्रूला देऊ बघतोय?' त्यानं पुन्हा मान हलवली. तेव्हा मी म्हणालो: 'तर मग त्याचे पाय पकड, त्यानं लाथा झाडू नयेत म्हणून! पटकन!' आणि मी त्या लठ्ठ्यावर झडप घालून त्याच्या नरड्याभोवती माझी बोटं गच्च आवळली. त्याला ओरडायलासुद्धा सवड मिळाली नाही. काही मिनिटंपर्यंत मी त्याला माझ्याखाली दाबून धरला आणि मग उठलो. जीभ बाहेर लोंबत असलेला एक देशद्रोही कमी झाला होता!

"पण त्यानंतर मला मळमळू लागलं आणि हात धुण्याची अनावर इच्छा झाली. जणू काही माणसाचा नव्हे, तर वळवळणाऱ्या विषारी सापाची नरडी मी दाबली होती... आयुष्यात प्रथमच माणसाला ठार मारलं आणि तेसुद्धा आमच्यापैकी एकाला... पण तो कुठला आमचा? तो शत्रूपेक्षाही वाईट होता, फितूर. मी उठलो आणि पलटण-कमांडरला म्हणालो: 'चल इथून कॉम्रेड. चर्च खूप मोठं आहे.'

"क्रीझ्नेवनं म्हटलं होतं त्याप्रमाणं सकाळी आम्हा सर्वांना चर्चजवळ बाहेर उभं करण्यात आलं, आमच्याभोवती सबमशिनगनवाल्यांची साखळी होती आणि तीन एस् एस् ऑफीसर त्यांच्या मते आमच्यातल्या सर्वांत धोकेबाजांना वेगळं निवडून काढू लागले—कम्युनिस्ट, ऑफीसर आणि

कमिस्सार. पण त्यांना कुणीच सापडलं नाही. आणि आमच्यातला एखादा नालायक फितुरही त्यांना कुणी सापडला नाही, कारण आम्ही जवळ जवळ निम्मे लोक कम्युनिस्ट होतो, उरलेल्यांमध्ये खूप ऑफीसर आणि कमिस्सार होते. दोनशेपैकी जर्मनांनी फक्त चौघांना वेगळं काढलं. एक यहुदी आणि तीन रशियन सैनिक. त्या रशियनांचे डोळे काळे होते आणि केस कुरळे होते, म्हणून ते संकटात सापडले. एस् एस् ऑफीसरांनी त्यांच्यापाशी जाऊन विचारलं: 'यहुदी?' ज्याला त्यांनी विचारलं तो म्हणाला की, रशियन; पण ते त्याचं म्हणणं कबूल करायला तयार नव्हते. 'बाहेर पड!' आणि खलास.

"त्या गरीब बिचाऱ्यांना जर्मनांनी गोळ्या घालून ठार मारलं आणि आम्हाला पुढं हाकललं. फितुराला ठार मारण्यात मला मदत करणारा पलटण-कमांडर थेट पोझनानपर्यंत सतत माझ्या शेजारी राहिला. आमच्या वाटचालीच्या पहिल्या दिवशी तो अधूनमधून माझ्या जवळ यायचा आणि माझा हात दाबायचा. पोझनानला एका घटनेपायी आम्हाला अलग करण्यात आलं.

"हे बघ बंधू, मी कैदी झालो होतो त्या पहिल्या दिवसापासून पळून जाऊन स्वतःच्या माणसांमध्ये परतण्याचे बेत मी आखत होतो. पण मला खात्रीशीर पळायचं होतं. पोझनानला छावणीत त्यांनी आम्हाला ठेवीपर्यंत वाटेत कुठंही पळण्याची संधी मला सापडली नव्हती. पण पोझनान छावणीत माझ्या मनाजोगी परिस्थिती मला आढळली. मेलेल्या कैद्यांना पुरण्यासाठी मे महिन्याच्या अखेरीस जर्मनांनी आम्हाला छावणीजवळच्या एका छोट्या जंगलात थडगी खणायला नेलं होतं—त्यावेळी आमच्यातली खूप माणसं हगवणीच्या विकारानं मेली होती. पोझनानची ती माती खणत असताना मी भोवती नजर टाकली, तेव्हा आमच्यावरचे दोन पहारेकरी जेवायला खाली बसल्याचे पाहिले. तिसरा उन्हात डुलकी काढत होता. मी गुपचूप फावडं खाली ठेवलं आणि झुडुपामागं गेलो. मग सूर्य उगवण्याची दिशा डोळ्यांसमोर धरून धूम ठोकली...

"मी नाहीसा झाल्याचं त्या पहारेकऱ्यांच्या ध्यानात ताबडतोब आलं नाही. माझ्यासारख्या लुकड्या माणसात तेव्हा कुठून ताकद आली होती कोण जाणे, पण एका दिवसात मी चाळीस किलोमीटरची मजल

मारली. माझ्या प्रयत्नांमधून काही फळ मिळालं नाही. चौथ्या दिवशी, त्या नतद्रष्ट छावणीपासून जेव्हा मी खूप दूर होतो, तेव्हा त्यांनी मला पकडलं. माझ्या मागावर त्यांनी शिकारी कुत्रे सोडले होते आणि ओटच्या उभ्या शेतात त्या कुत्र्यांनी मला धरलं.

"पहाटेच्या वेळी उघड्या मैदानातून जायला मी घाबरत होतो आणि जंगल निदान तीन किलोमीटर दूर होतं. म्हणून दिवसभरासाठी मी ओटच्या शेताचा आडोसा धरला होता. ओटच्या काही कणसांना हातांमध्ये चुरडून मी खिशांमध्ये धान्याचे दाणे भरत होतो, तेवढ्यात कुत्र्यांचं भुंकणं आणि फटफटीचा आवाज मला ऐकू आला... माझं काळीज लकाकलं, कारण कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज माझ्या जवळ जवळ येत चालला होता. मी पालथा झोपलो आणि कुत्र्यांनी माझ्या तोंडाला चावू नये म्हणून हातांमध्ये डोकं लपवलं. अखेर कुत्रे आले आणि अवघ्या एका मिनिटात त्यांनी माझ्या कपड्यांच्या चिंध्या चिंध्या केल्या. अक्षरशः आईने जन्माला घातलं होतं त्यावेळच्या अवस्थेत मी राहिलो. त्या कुत्र्यांनी ओटच्या पिकातून मला भरपूर फरफटत नेलं, मग एका मोठ्या कुत्र्यानं माझ्या छातीवर पुढचे पंजे टेकवले आणि माझ्या नरडीचा चावा घेण्याचे प्रयत्न तो करू लागला, पण अजून त्यानं चावा मात्र घेतला नव्हता.

"दोन फटफट्यांवरून जर्मन आले. प्रथम त्यांनी मला भरपूर मारलं आणि नंतर माझ्यावर कुत्र्यांना सोडलं. कुत्र्यांनी मला फाडून काढलं. नागड्या आणि रक्ताळल्या अवस्थेत मला छावणीत परत नेण्यात आलं. पळण्याचा प्रयत्न केल्याबद्दल एक महिना कोठडीत एकटं बसण्याची मला शिक्षा झाली, पण तरीही मी जिवंत होतो... मी जिवंत राहिलो होतो! ..

"बंधू, कैदेत मला काय काय सहन करावं लागलं त्याच्या आठवणी त्रास देतात, आणि त्याबद्दलची हकीकत सांगणं जास्तच त्रासदायक वाटतं. जर्मनीत आम्हाला सहन कराव्या लागलेल्या अमानुष यातनांची आठवण झाली, त्या छावण्यांमध्ये हाल हाल करून ठार मारण्यात आलेल्या माझ्या सगळ्या साथींची आणि मित्रांची मला आठवण झाली; म्हणजे माझं काळीज घशात वर येतं आणि श्वास घुसमटतो...

"दोन वर्षांच्या कैदेत त्यांनी मला कुठं कुठं पळवलं! ह्या काळात अर्धा जर्मनी प्रवास घडला: सॅक्सनीत सीलिकेटच्या कारखान्यात काम केलं, रूरमध्ये खाणीतला कोळसा काढला; बव्हारीयात फावडं घेऊन जमिनीची मशागत केली, त्यूरीन्गीयामध्ये होतो आणि जर्मनीतली आणखी अनेक ठिकाणे फिरावं लागलं. तिथला निसर्ग वेगवेगळा आहे, पण आमच्या बंधूंना ते गोळ्या घालायचे आणि त्यांची टाळकी फोडायचे मात्र सगळीकडं सारख्याच रीतीनं. ते हरामखोर अक्करमाशे आम्हाला जशी मारहाण करायचे, तशी मारहाण आपल्याकडचा माणूस जनावरालासुद्धा करत नाही. गुद्दे मारायचे, लाथा हाणायचे, रबरी दडुक्यांनी मारायचे, किंवा हाताशी सापडली तर लोखंडी सळई घेऊनही मारायचे. रायफलीं-च्या दस्त्यांचा आणि काठ्यांचा किती मार खावा लागायचा त्याची गणतीच नाही.

"आम्हाला ते मारायचे ह्याचं कारण आम्ही रशियन होतो, कारण आम्ही जगात अजून जिवंत होतो, कारण आम्ही त्यांच्यासाठी राबत होतो. चुकीच्या नजरेनं पाहिलं म्हणून, चुकीचं पाऊल टाकलं म्हणून, त्यांना पाहिजे त्या रीतीनं मागं वळलो नाही म्हणून, ते आम्हाला मारा-यचे. एखाद्या दिवशी आमचा मुडदा पडावा, आमच्याच रक्तात घुसम-टून आम्ही मार खाऊन मरावं, म्हणून ते आम्हाला मारायचे. बहुधा आम्हा सर्वांना ढकलून देण्यासाठी जर्मनीत पुरेशा भट्ट्या नव्हत्या.

"सगळीकडं आम्हाला सारखंच अन्न मिळायचं: एर्झात्स पाव दीडशे ग्राम—त्यात अर्धा लाकडाचा भुस्सा मिसळलेला—आणि सलगमची पाण-चट पेज. काही ठिकाणी गरम पाणी प्यायला द्यायचे, काही ठिकाणी नाही. कशाला बोलायचं, तूच निवाडा कर: युद्धापूर्वी माझं वजन ८६ किलोग्राम होतं आणि शरदाच्या दरम्यान ५० पेक्षा जास्त भरेना. नुसती हाडं आणि कातडी. हाड वाहण्याची ताकदसुद्धा उरली नव्हती. पण तरीही काम करावं लागत होतं, तोंडून एक शब्द काढायचा नव्हता आणि गाडी ओढणाऱ्या घोड्यापेक्षाही जास्त कामाचा बोजा आम्हाला उरकावा लागत होता.

"सप्टेंबरच्या सुरवातीला त्यांनी आम्हा १४२ सोविएत युद्धकैद्यांना क्यूस्त्रीनच्या छावणीमधून ड्रेस्देनजवळच्या बी-१४ छावणीत नेलं. त्यावेळी

त्या छावणीत सुमारे दोन हजार कैदी होते. आम्ही सगळे दगडाच्या खाणीत काम करत होतो, त्यांचा जर्मन दगड हातांनी तासत आणि फोडत होतो. प्रत्येक माणसानं दर दिवशी चार घनमीटर दगड फोडायचा होता; लक्षात ठेव, शरीर आणि मनाला मोठ्या मुष्कीलीनं तगवून ठेवणाऱ्या माणसाला हे काम पार पाडायचं होतं. आणि सुरवात झाली: आमच्या गटातल्या एकशेबेचाळीसपैकी दोन महिन्यांनंतर अवघे सत्तावन्न उरले. कसं वाटतं बंधू? फार अवघड ना? आमच्या साथींना पुरायला-सुद्धा आम्हाला सवड मिळत नव्हती. तेवढ्यात छावणीत अफवा पसरली की, जर्मनांनी स्तालीनग्राद काबीज केलं होतं आणि ते सैबेरियात घुसत होते. एका दुःखात दुसऱ्या दुःखाची भर पडली. आम्हाला त्यांनी गच्च दाबून ठेवलं होतं, जमिनीपासून नजर वर करू देत नव्हते, जणू त्या जर्मन मातीत मिसळण्याची आम्ही मागणी करत होतो. छावणीतले पहारेकरी रोज प्यायचे, गाणी ओरडायचे, आनंद साजरा करायचे.

"एका संध्याकाळी कामावरून आमच्या बराकीत परतलो. सबंध दिवस पाऊस कोसळत होता आणि अंगावरची लक्तरं चिप्प भिजली होती. थंड वाऱ्यामुळं आम्ही सगळे कुडकुडत होतो, दात वाजायचे थांबत नव्हते. कपडे कोरडे करायला, ऊब घ्यायला कुठं जागा नव्हती आणि आम्हाला मरणांतिक भूक लागली होती. पण आम्हाला संध्याकाळी कधीच अन्न देत नसत.

"मी अंगातले ओले कपडे काढून त्यांचा माझ्या फळीवर बोळा फेकला आणि म्हणालो: 'त्यांना चार घनमीटरचं काम पाहिजे, पण आपल्यापैकी प्रत्येकाला पुरायला एक घनमीटर पुरेसा आहे.' मी एवढंच बोललो, पण आमच्यात एक हलकट होता. त्यानं छावणीच्या कमांडट-पाशी माझे हे कडवट शब्द पोचवले.

"छावणीचा कमांडट किंवा त्यांच्या भाषेत लागेरफ्यूरेर, म्यूल्लेर नावाचा एक जर्मन होता. फार उंच नाही, दणकट बांध्याचा, तागा-सारखे केस आणि कातडी सगळी पांढरी पांढरी. त्याच्या डोक्यावरचे केस, त्याच्या पापण्या, भुवया पांढुरक्या रंगाच्या होत्या; त्याचे डोळे-सुद्धा पांढुरके आणि बटबटीत. तुझ्या-माझ्याप्रमाणं रशियन बोलायचा, जणू अस्सल वोल्गावाल्याप्रमाणं हेल काढायचा. आणि शिव्या घालण्यात

पटाईत! ही कला हरामखोरानं कुठं शिकली कोण जाणे! आम्हाला ब्लॉकसमोर उभं करायचा – बराकीला ते ब्लॉक म्हणतात – आणि त्याच्या एस् एस् माणसांच्या घोळक्यासकट उजवा हात मागं धरून आमच्या रांगेसमोरून चालत जायचा. तो कातडी हातमोजा घालायचा आणि त्याच्या बोटांच्या रक्षणासाठी कातडयाखाली शिशाची पट्टी ठेवायचा. तो रांगेसमोरून चालत जायचा आणि एका माणसाआड प्रत्येकाला नाकावर ठोसा मारून रक्तबंबाळ करायचा. 'फ्लूविरोधी प्रतिबंधक उपाय' असं त्यानं ह्या उद्योगाला नाव ठेवलं होतं. असं रोज चालायचं. छावणीत एकूण चार ब्लॉक होते आणि एके दिवशी एका ब्लॉकला तो 'प्रतिबंधक उपाय' करायचा, दुसऱ्या दिवशी दुसऱ्या ब्लॉकला व असंच पुढं चालत रहायचं. अक्करमाशा रोज काम करायचा, एकही दिवस सुटी घ्यायचा नाही. फक्त एक गोष्ट मूर्खाला समजत नव्हती; फेरीवर निघण्यापूर्वी तो समोर उभा रहायचा आणि चेव यावा म्हणून भरपूर शिवीगाळ करायचा. त्यामुळं खरं तर आम्हाला थोडं बरं वाटायचं. कारण ते शब्द आम्हाला आमचे वाटायचे, तिकडून आलेली वाऱ्याची झुळुक वाटायची. त्याची शिवीगाळ आम्हाला आनंद देते हे जर त्याला समजलं असतं, तर त्यानं रशियनमधून शिव्या दिल्या नसत्या, स्वतःची भाषा वापरली असती. फक्त आमच्यातला एकजण, माझा मॉस्कोचा एक मित्र, त्याच्यावर खूप चिडायचा. तो म्हणायचा: 'जेव्हा हा शिव्या घालतो, तेव्हा मी डोळे झाकतो आणि जणू मॉस्कोतल्या बीयरबारमध्ये बसलोय असं वाटतं, बीयर प्यायची खूप इच्छा होते आणि डोकं गरगरतं.'

"तर घनमीटरांबद्दल मी बोलल्यानंतरच्या दुसऱ्या दिवशी त्या कमांडटनं मला बोलावणं धाडलं. संध्याकाळी बराकीत एक दुभाष्या दोन पहारेकऱ्यांसकट आला. 'कोण सोकोलोव आन्द्रेय?' मी उत्तर दिलं. 'चल आमच्यामागून, तुला हेर लागेरफ्यूरेर बोलावताहेत. कशाला बोलावलं होतं हे मला समजलं. माझा खातमा होणार. म्हणून मी मित्रांचा निरोप घेतला. मी मरणाला भेटायला चाललोय हे त्यांना माहीत होतं. मग मी एक खोल श्वास घेतला आणि पहारेकऱ्यांमागून चालू लागलो. छावणीच आवार ओलांडताना मी वरती ताऱ्यांकडं पाहिलं आणि त्यांचाही निरोप घेतला. मनाशी विचार केला: 'तुझ्या छळाचं

माप भरलं, आन्द्रेय सोकोलोव, छावणीप्रमाणं — क्रमांक तीनशे एकतीस.' इरीनाबद्दल आणि मुलांबद्दल वाईट वाटलं, मग ते दुःख नाहीसं झालं आणि त्या पिस्तुलाच्या नळीला अस्सल सैनिकाच्या निधडेपणानं बघायला मनाशी धैर्य एकवटू लागलो. ह्या आयुष्याचा निरोप घेणं कितीही वाईट असलं, तरी शत्रूला माझ्या खऱ्या भावना दिसाव्यात असं मला वाटत नव्हतं...

"कमांडंटच्या खोलीत खिडकीच्या चौकटीत फुलं होती. आपल्या एखाद्या क्लबासारखी ती छान स्वच्छ जागा होती. टेबलाशी छावणीतले सगळे ऑफीसर बसले होते. पाचजण तिथं बसून श्नाप्स पीत होते आणि डुकराची चरबी चघळत होते. टेबलावर आधीच उघडलेली एक मोठी बाटली होती, भरपूर पाव, डुकराची चरबी, खारवलेली सफरचंदं होती. वेगवेगळ्या खाद्यपदार्थांचे उघडलेले डबे होते. त्या वस्तूंवर मी एकदा नजर टाकली आणि तुझा विश्वास बसणार नाही, पण मला एकदम मळमळलं आणि ओकारीच आली. मी एखाद्या लांडग्यासारखा भुकेला होतो, मानवी अन्नाचं दर्शन विसरलो होतो आणि अचानक नजरेसमोर चवदार पदार्थांचं भरपूर प्रदर्शन... मी कशीबशी ओकारी आवरली, पण त्या टेबलापासून नजर दुसरीकडं वळवायला मला फार प्रयास पडले.

"माझ्या समोरच अर्धवट झिंगलेला, एका हातातून दुसऱ्या हातात पिस्तूल खेळवणारा, पिस्तूलाशी खेळणारा म्यूल्लेर बसला होता. एखाद्या सापाप्रमाणं त्याचे डोळे माझ्यावर रोखलेले होते. मी ताठ उभा राहिलो, बुटांच्या टुटक्या टाचा एकमेकींवर आपटल्या आणि मोठ्या आवाजात हजेरी दिली: 'युद्धकैदी आन्द्रेय सोकोलोव तुमच्या सेवेला हजर आहे, हेर कमांडंट.' तो मला विचारतो: 'काय रे रशियन इवान, चार घनमीटर काम करणं फार होतं? म्हणालो, 'होय, हेर कमांडंट, फार आहे.' 'आणि एक घनमीटर तुझ्या थडग्याला पुरेल?' 'होय, हेर कमांडंट, पुरेल आणि थोडं उरेलसुद्धा.'

"तो उभा राहिला आणि म्हणतो: 'मी तुझा खास सन्मान करतो. त्या शब्दांबद्दल आत्ता मी तुला गोळ्या घालतो. इथं योग्य नाही, बाहेर आवारात चल, तिथं शेवटची सही कर.' मी म्हणालो: 'तुमची मर्जी.'

तो एक मिनिटभर विचार करत उभा राहिला, त्यानं पिस्तूल टेबलावर फेकलं, श्नाप्सचा आख्खा ग्लास भरला, पावाचा एक तुकडा घेऊन त्यावर चरबीची फाक ठेवली व माझ्यासमोर धरून म्हणाला: 'मरणा-पूर्वी पी, रशियन इवान, जर्मन शस्त्रांच्या विजयासाठी!'

"मी त्याच्याकडून ग्लास आणि पाव घेतले होते, पण त्याचे शब्द ऐकताच माझ्या आत एकदम भाजल्याप्रमाणं चटके बसले. मनात विचार आला: 'मी रशियन सैनिक जर्मन शस्त्रांच्या विजयासाठी पिऊ? मग पुढं आणखी काय सांगशील हेर कमांडंट? एकूण माझं मरण तर टळत नाही, तर मग मसणात जा तुझ्या वोदकाबरोबर!'

"मी टेबलावर ग्लास आणि पाव ठेवला व म्हणालो: 'पाहुणचारा-बद्दल आभार, पण मी पिणारा नाही.' तो गालात हसत म्हणतो: 'आमच्या विजयासाठी प्यायची इच्छा नाही तुझी? तर मग तुझ्या मरणासाठी पी!' माझं काय जाणार होतं? 'माझ्या मरणासाठी आणि छळातून होणाऱ्या मुक्ततेसाठी मी पितो,' मी त्याला म्हणालो. मी ग्लास उचलला आणि दोन घोटात रिकामा केला. मात्र पावाला स्पर्श केला नाही. सभ्यपणानं मी हातानं माझे ओठ पुसले आणि म्हणालो: 'पाहुण-चाराबद्दल आभार. मी तयार आहे हेर कमांडंट, चला, माझी सही घ्या.'

"पण तो माझ्याकडं तीक्ष्ण नजरेनं बघत म्हणाला: 'मरणापूर्वी एक घास खा.' मी त्याला उत्तरलो: 'मी पहिल्या ग्लासानंतर खात नाही.' त्यानं दुसरा ग्लास भरला आणि माझ्या हाती दिला. तो दुसरा ग्लासही मी प्यायलो, पण खाण्याला हात लावला नाही. मी सगळं धैर्य पणाला लावलं होतं. मनाशी म्हटलं: 'बाहेर मरायला जाण्यापूर्वी नि-दान भरपूर झिंगतो.' कमांडंटनं त्याच्या पांढऱ्या भुवया आश्चर्यानं खूप उंचावत विचारलं: 'खात का नाहीस रे, रशियन इवान! लाजू नको!' आणि मी पालुपद आळवलं: 'माफ करा, हेर कमांडंट, दुसऱ्या ग्ला-सानंतर खायची मला सवय नाही!' त्यानं गाल फुगवले, नाकातून फुर्रर आवाज काढला आणि खो खो हसत जर्मन भाषेत काहीतरी भरा-भरा बोलला. बहुधा माझ्या शब्दांचा त्याच्या मित्रांना अनुवाद सांगत असावा. तेसुद्धा हसले, खुर्च्या मागं सारून त्यांनी आपली थोबाडं माझ्या-

कडं वळवली आणि माझ्या ध्यानात आलं की, काहीशा वेगळ्या नजरांनी ते मला पहात होते, काहीशा सौम्यपणं.

"कमांडटनं माझ्यासाठी तिसरा ग्लास भरला, पण हसण्यामुळं त्याचे हात थरथरत होते. तो ग्लास मी सावकाश प्यायलो, पावाचा बारीक तुकडा चावला आणि बाकीचा टेबलावर ठेवला. त्या अवकरमाशांना मी दाखवून देणार होतो की, भुकेनं जरी मी अर्धमेला झालो असलो, तरी त्यांनी माझ्या अंगावर फेकलेले भिकेचे तुकडे मी खाणार नाही, मला माझी रशियन अब्रू आणि प्रतिष्ठा आहे, त्यांच्या इच्छेप्रमाणं मी जनावर बनलो नव्हतो.

"त्यानंतर कमांडटचा चेहरा गंभीर बनला, त्यानं स्वतःच्या छातीवरचे दोन लोखंडी क्रूस नीट केले, तो टेबलामागून निःशस्त्र पुढं आला आणि म्हणाला: 'हे बघ सोकोलोव, तू अस्सल रशियन सैनिक आहेस. तू धैर्यशील सैनिक आहेस. मीसुद्धा सैनिक आहे आणि ताकदीच्या शत्रूचा आदर करतो. मी तुला गोळी घालणार नाही. शिवाय आमच्या शूर फौजा आज वोल्गावर पोचल्यात आणि त्यांनी स्तालीनग्रादचा पूर्ण कबजा केलाय. आम्हाला खूप आनंद झालाय आणि म्हणून मोठ्या उदारपणं मी तुला जीवदान देतो. जा तुझ्या ब्लॉककडं आणि हे तुझ्या धैर्यासाठी घे.' टेबलावरचा छोटा पाव आणि डुकराच्या चरबीचा एक तुकडा त्यानं माझ्या हाती दिला.

"तो पाव मी छातीशी घट्ट धरला आणि डाव्या हातात चरबीचा तुकडा उचलला. प्रसंगाला मिळालेल्या ह्या अनपेक्षित कलाटणीनं मी एवढा भांबावलो होतो की, मी आभारसुद्धा मानले नाहीत. नुसता डावीकडं वळलो आणि दारापाशी गेलो. तो सबंध वेळ मला वाटत होतं: 'आत्ता माझ्या खांद्यांमधून तो गोळ्या झाडील आणि हे खाणं माझ्या मित्रांपर्यंत कधीही नेता येणार नाही.' नाही, काही घडलं नाही. ह्यावेळीही मरण माझ्याजवळून पसार झालं, पण त्याचा थंड निःश्वास मात्र जाणवला...

"कमांडटच्या खोलीतून मी न लटपटता बाहेर पडलो, पण बाहेर मात्र माझा ताबा सुटला. बराकीत मी झेलपटत घुसलो आणि सीमेंटच्या फरशीवर बेशुद्ध झालो. दुसऱ्या दिवशी उजाडायच्या आधीच आमच्या

लोकांनी मला जागं केलं : 'सगळी हकीकत सांग!' मग मला कमांडंट-च्या खोलीतला प्रसंग आठवला आणि मी त्यांना सर्व हकीकत सांगितली. 'खाण्याचे वाटे कसे करायचे?' माझ्या शेजारच्या फळीवरल्या माणसानं विचारलं, त्याचा आवाज थरथरत होता. 'सर्वांना सारखा वाटा,' मी त्याला म्हणालो. उजाडेपर्यंत आम्ही थांबलो. बारीक दोऱ्यानं आम्ही पावाचे व चरबीचे तुकडे केले. आम्हा प्रत्येकाला काडचापेटीएवढ्या आकाराचा पाव मिळाला, एकही कण वाया घालवण्यात आला नाही. अर्थात चरबी मात्र ओठांना फासण्यापुरती मिळाली. पण कुणावरही अन्याय न करता सर्वांना सारखा वाटा देता आला.

"लौकरच आमच्यातल्या सुमारे तीनशे भक्कम लोकांना त्यांनी दल-दलीचा भाग कोरडा करायच्या कामाला जुंपलं. नंतर रूरच्या खाणीं-मध्ये. तिथं मी चव्वेचाळीसपर्यंत होतो. त्या दरम्यान आमच्या पोरांनी जर्मनीचा नक्षा काही प्रमाणात उतरवला होता आणि आम्हा कैद्यांना तुच्छतेनं वागवणं नाझींनी बंद केलं होतं. एके दिवशी त्यांनी दिवसपा-ळीच्या आम्हा सर्वांना रांगेत उभं केलं आणि तात्पुरत्या भेटीला आलेला कुणी ओबेरलेयतेनेन्त दुभाष्यामार्फत म्हणाला: 'सैन्यात किंवा युद्धापूर्वी ड्रायव्हर म्हणून ज्यांनी काम केलंय, त्यांनी एक पाऊल पुढं यावं.' पूर्वी ड्रायव्हरचं काम केलेले आम्ही सात लोक पुढं आलो. त्यांनी आम्हा-ला जुनाट सैल झगे दिले आणि पहाऱ्यात पॉटसडॅमला नेलं. तिथं गेल्या-वर आमची ताटातूट झाली. माझी 'तोदत्'मध्ये काम करायला नेमणूक झाली. रस्तेबांधणीच्या आणि संरक्षणव्यवस्थेच्या खात्याला जर्मनांनी हे नाव दिलं होतं.

"एका जर्मन मेजर इंजिनिअरला 'ओपेल-ॲडमिरल'मधून मी फिरवायचा. महालठ्ठ फॅसिस्ट होता! बुटका, ढेरपोटचा, जेवढा उंच तेवढाच आडवा आणि एखाद्या बाईसारखा पुठ्ठा. त्याच्या पुढील कॉलर-वर तीन हनुवटया लोंबायच्या आणि मानेवर तीन जाड वळकटया. मला वाटतं, त्याच्या अंगावर तीन पूड* नुसती चरबी होती. जेव्हा तो चालायचा, तेव्हा वाफेच्या इंजिनासारखा फुसफुसायचा. आणि

* १ पूड – १६ किलोग्राम – सं.

खायला बसला म्हणजे—बापरे! सबंध दिवसभर चघळायचा आणि ब्रँडीचे घुटके मारायचा. कधी कधी त्यातलं माझ्याही वाट्याला थोडं फार यायचं. रस्त्यावर थांबवायचा, सॉसेज आणि चीज कापायचा, घुटका मारायचा. जेव्हा मजेत असायचा, तेव्हा कुत्र्याला टाकावा तसा माझ्याकडं तुकडा फेकायचा. हातात कधीही द्यायचा नाही. त्याला ते कमीपणाचं वाटायचं. पण काहीही असो, छावणीपेक्षा हे आयुष्य अनेक पटींनी सुसह्य होतं. हळू हळू मी परत माणसासारखा दिसू लागलो. माझं वजनही वाढायला लागलं.

"सुमारे दोन आठवडे पॉटसडॅम आणि बर्लिनच्या दरम्यान मी मेजरची ने-आण केली. मग आपल्या सैन्याविरुद्ध संरक्षक तटबंदी बांधण्या-साठी युद्धआघाडीवर त्याची पाठवणी करण्यात आली. इथं माझी झोप उडाली. माझ्या स्व.:च्या बाजूला, माझ्या देशाकडं कसं पळायचं ह्याचा मी रात्र रात्र विचार करू लागलो.

"पोलोत्स्क शहरात आम्ही आलो. पहाटेला, गेल्या दोन वर्षांत प्रथमच, आपल्या तोफखान्याचा गडगडाट मी ऐकला आणि तो आवाज ऐकल्यानंतर माझं काळीज कसं धडधडलं म्हणून सांगू, बंधू? अजून लग्न झालं नव्हतं तेव्हा इरीनाकडं जातानासुद्धा अशी धडधड झाली नव्हती! पोलोत्स्कच्या पूर्वेला, सुमारे अठरा किलोमीटर अंतरावर लढाई जुंपली होती. शहरातील जर्मन चिडके बनले होते, भेदरले होते आणि माझा लठ्ठ्या जास्त जास्त पिऊ लागला. दिवसा आम्ही सर्वत्र फिरत असू, तटबंदी कशा बांधायच्या ह्याबद्दल तो सूचना द्यायचा आणि रात्री एकटा बसून प्यायचा. त्याला सूज आली होती, त्याच्या डोळ्यांखाली पिशव्या लोंबत होत्या...

"मनाशी विचार केला, आता थांबायचं कारण नाही, माझी संधी आलीय! आणि मी एकट्यानं पळायचं नाही, ह्या लठ्ठ्याला बरोबर पळवून न्यायचं, आपल्या माणसांना उपयोगी पडेल!

"कचऱ्याच्या ढिगात मला दोन किलोग्राम वजनाचा एक लोखंडी तुकडा सापडला. जर लठ्ठ्याला त्या वजनानं मारायचीच वेळ आली, तर रक्त लागू नये म्हणून त्यावर एक फडकं गुंडाळलं. रस्त्यावर टेली-फोनच्या तारेचा एक तुकडा मी उचलला, माझ्या गरजेच्या सर्व वस्तू

सज्ज केल्या आणि पुढच्या सीटखाली दडवून ठेवल्या. एका संध्याकाळी, जर्मनांचा मी अखेरचा निरोप घेण्यापूर्वी दोन दिवस आधी, पेट्रोल पंपावरून मी परतत होतो आणि चिक्कार झिंगलेला एक जर्मन उंतेर भिंतीशी चाचपडत असलेला मी पाहिला. मी गाडी थांबवली, एका पडक्या इमारतीत त्याला घेऊन गेलो, त्याचा गणवेष उतरवला, त्याच्या डोक्यावरची टोपी काढून घेतली. ते सारं सामान मी सीटखाली दडवलं आणि तयार झालो.

"माझ्या मेजरनं २९ जूनच्या सकाळी शहराबाहेर त्रोस्नीत्साच्या दिशेनं जाण्याचा मला हुकूम केला. तिथं बांधण्यात येणाऱ्या काही संरक्षक मोर्चांचा तो प्रमुख होता. आम्ही मोटार घेऊन निघालो. मेजर मागील सीटवर बसून शांत डुलकी काढत होता आणि मी पुढच्या सीटवर माझं घशात उडी घेऊ पाहणारं काळीज घेऊन बसलो होतो. प्रथम मी गाडी वेगात चालवली, पण शहराबाहेर वेग कमी केला, मग थांबलो आणि भोवती नजर फेकली. मागून खूप दूरवरून दोन लॉरी सावकाश येत होत्या. मी लोखंडी वजन काढलं आणि दार सताड उघडलं. लठ्ठ्या मागच्या सीटवर घोरत होता, जणू त्याच्या बायकोशेजारी निजला होता. माझ्या लोखंडानं त्याच्या डाव्या कानशीलावर मी तडाखा हाणला. त्याचं डोकं त्याच्या छातीवर लुडकलं. खात्रीसाठी मी त्याला आणखी एक तडाखा मारला, पण त्याला ठार मारण्याची माझी इच्छा नव्हती. त्याला मी जिवंत नेऊ इच्छित होतो. आमच्या पोरांना तो खूप माहिती सांगू शकला असता. त्याच्या चामडी पिशवीतून मी पिस्तूल खेचून काढलं आणि माझ्या खिशात कोंबलं. मग मागच्या सीटमागचा आधार मी खेचला, मेजरच्या गळ्याभोवती टेलीफोनची तार गुंडाळली आणि तिची टोकं मागच्या आधाराला बांधली. मी जोरात गाडी चालवताना त्यानं घसरून खाली पडू नये म्हणून. जर्मन गणवेष मी अंगावर चढवला, टोपी घातली आणि जिथं जमीन गडगडत होती, जिथं लढाई चालू होती, त्या ठिकाणी थेट गाडी घेऊन निघालो.

"दोन पिल-बॉक्सांदरम्यान जर्मन युद्धआघाडी होती. एका खंदकातून मशीनगनवाल्यांचा एक गट वरती आला आणि माझ्याबरोबरचा मेजर त्यांना दिसावा म्हणून मी मुद्दामच वेग कमी केला. ओरडून

आणि हातवारे करून ते मला सांगू लागले की, मी आणखी पुढं जाऊ नये, पण मी न समजण्याचा बहाणा केला आणि ऐशीच्या वेगानं गाडी पिटाळली. काय घडत होतं ह्याची जाणीव होऊन त्यांनी गोळीबार सुरू करायच्या आत मी तटस्थ भूमीत होतो, तोफगोळयांच्या खड्डयांना टाळून सशासारखा पळत होतो.

"जर्मन पाठीमागून गोळीबार करत होते आणि आपली माणसं तेवढयाच त्वेषानं पुढून आग ओकत होती. पुढच्या काचेवर चार गोळ्या घुसल्या आणि रेडिएटरची चाळण झाली... तेवढयात जवळच एका सरोवरापाशी छोटं जंगल मला दिसलं आणि आपली काही माणसं मोटारीकडं धावत येताना दिसली, तेव्हा मी जंगलात गाडी घातली, दार उघडलं, जमिनीवर पडलो आणि तिची चुंबनं घेऊ लागलो, मला श्वास घेणं अवघड झालं होतं...

"यापूर्वी कधी मी पाहिला नव्हता असा खांद्यावर खाकी फितींचा सदरा घातलेला एक तरुण सर्वांत प्रथम माझ्यापाशी पोचला आणि हसून म्हणाला: 'आहा, हरामखोर फ्रीत्सा, वाट चुकलास?' मी अंगातला जर्मन सदरा फेकून दिला, जर्मन टोपी पायांखाली टाकली आणि त्याला म्हणालो: 'माझ्या लाडक्या सुरेख पोरा! लाडक्या मुला! अरे मी फ्रीत्स नाही, वोरोनेझमध्ये जन्मलेला माणूस आहे! मी युद्धकैदी होतो, समजलं? आता गाडीत बसलेल्या त्या लठ्ठ्याला सोडवा, त्याची ब्रीफकेस ताब्यात घ्या आणि तुमच्या कमांडरपाशी त्याला घेऊन जा.' मी पिस्तूल त्याच्या हवाली केलं आणि एकाकडून दुसऱ्याकडं अशी माझी पाठवणी होत होत अखेर संध्याकाळी डिव्हिजनच्या प्रमुख कर्नलांसमोर उभा राहिलो. दरम्यान मला खाऊ आणि न्हाऊ घालण्यात आलं होतं, प्रश्न विचारण्यात आले होते, नवा गणवेष देण्यात आला होता. तेव्हा कर्नलांच्या जमिनीखालच्या निवाऱ्यात मी व्यवस्थित, स्वच्छ शरीरानं आणि मनानं, योग्य पोषाखात उभा होतो. कर्नल टेबलापासून उठले, माझ्यापाशी आले आणि सगळ्या ऑफीसरांसमक्ष माझं चुंबन घेऊन म्हणाले: 'तुझे आभार मानतो, सैनिका, जर्मनांकडून तू फार छान देणगी आणलीस. वीस जर्मनांना पकडून जेवढी माहिती मिळाली नसती, त्यापेक्षा जास्त माहिती तुझ्या मेजरनं आणि त्याच्या ब्रीफकेसनं आम्हाला

सांगितली. तुला सन्मानपदक मिळावं अशी मी वरती शिफारस करीन.' कर्नलांच्या शब्दांमुळं आणि त्यांनी दाखवलेल्या प्रेमामुळं मी गहिवरून गेलो, माझे ओठ थरथरू लागले. मी एवढंच म्हणू शकलो: 'कॉम्रेड कर्नल, पायदळात माझी नेमणूक करावी अशी विनंती आहे...'

"पण कर्नल हसले आणि माझ्या खांद्यावर त्यांनी थाप मारली. 'तुला पायांवर धड उभं राहता येत नाही अशा परिस्थितीत तू काय लढणार? आजच तुझी इस्पितळात पाठवणी करतो. तिथं तुझ्यावर उपचार करतील, तुला खाऊ घालतील, नंतर एका महिन्याच्या रजेवर घरी जाऊन माणसांना भेट आणि जेव्हा आमच्यापाशी परतशील, तेव्हा कुठं तुझी नेमणूक करायची ते पाहू.'

"कर्नलांनी आणि त्यांच्याबरोबरच्या सर्व ऑफीसरांनी माझ्याशी हस्तांदोलन करून मला निरोप दिला आणि गरगरत्या डोक्याने मी बाहेर गेलो, कारण गेल्या दोन वर्षांत माणूस म्हणून कसं वागवतात हेच मी विसरलो होतो. बंधू, नोंद घे, वरच्या अधिकाऱ्यांशी बोलताना खांद्यात मुंडी खुपसायची माझी सवय जायला खूप काळ लागला; कोणत्याही क्षणी मार बसेल अशी अजूनही भीती वाटायची. त्या नाझी छावण्यांमध्ये आम्हाला अशी शिकवण मिळाली होती...

"इस्पितळात दाखल होताच मी इरीनाला पत्र लिहिलं. मी कैदी कसा बनलो आणि जर्मन मेजरसकट कसा निसटून आलो, ही सर्व हकीकत मी तिला थोडक्यात लिहून कळवली. लहान पोराप्रमाणं बढाई मारायची इच्छा मला का झाली, सांगता येत नाही. कर्नलनी मला पदकाचं आश्वासन दिलंय हेसुद्धा मी सांगून टाकलं होतं...

"दोन आठवडेपर्यंत मी नुसता झोपत आणि खात होतो. एका वेळी मला जास्त खायला देत नसत, पण वारंवार देत. डॉक्टर म्हणाले की, मला खावंसं वाटायचं तेवढं सारं अन्न त्यांनी मला दिलं असतं, तर मी मेलो असतो. पण दोन आठवडे उलटल्यानंतर तोंडात घास जाईना. घरून काहीही उत्तर आलं नव्हतं आणि कबूल करतो, मी चिंतेत पडलो होतो. खाणं-झोपणं सुचेना, सगळ्या तऱ्हेचे वाईट विचार डोक्यात गर्दी करू लागले. तिसऱ्या आठवड्यात वोरोनेझहून एक पत्र आलं. पण ते इरीनाकडून नव्हतं, माझ्या शेजाऱ्याकडून—जुळारी—आलं होतं. तसं

पत्र कुणाला कधी न मिळो! त्यानं कळवलं हातं की, १९४२ च्या जून-मध्ये जर्मनांनी विमान कारखान्यावर बाँबफेक केली होती आणि थेट माझ्या झोपडीवर एक मोठा बाँब पडला होता. त्यावेळी इरीना आणि दोन्ही मुली घरात होत्या. त्यानं लिहिलं होतं... काही शिल्लक उरलं नव्हतं... फक्त घर होतं त्या जागी एक मोठा खड्डा... प्रथम ते पत्र मी शेवटपर्यंत वाचू शकलो नाही. माझ्या डोळ्यांसमोर काळोखी आली आणि हृदय एवढं गच्च आवळून गेलं, की परत ते कधी उलगडेल असं वाटेना. मी बिछान्यावर पडून राहिलो आणि जेव्हा अंगात थोडीशी ताकद परत आली, तेव्हा पत्र शेवटपर्यंत वाचलं. माझ्या शेजाऱ्यानं लिहिलं होतं की, बाँबहल्ल्याच्या वेळी आनातोली दूर शहरात होता. संध्याकाळी तो परतला, घराच्या जागी पडलेला खड्डा त्यानं एकदा पाहिला आणि त्याच रात्री तो शहरात परतला. माझ्या शेजाऱ्याला जाण्यापूर्वी तो एवढंच म्हणाला की, तो सैन्यात दाखल व्हायला जात होता.

"माझ्या काळजावरचा ताण जेव्हा सैल झाला आणि कानांमध्ये रक्त चढलं, तेव्हा स्टेशनवर निरोपाच्या वेळी इरीना मला कशी बिलगली होती त्याची आठवण झाली. ह्या जगात परत आमची भेट होणार नाही असं तिच्या बाईच्या काळजानं तिला तेव्हाच सांगितलं असलं पाहिजे. आणि मी तिला ढकलून दिलं होतं... एके काळी माझं कुटुंब होतं, स्वतःचं घर होतं, ते बांधायला अनेक वर्षांचा काळ खर्च झाला होता आणि एका क्षणात ते नष्ट झालं होतं, मी एकाकी उरलो होतो. माझं हे विस्कटलेलं आयुष्य म्हणजे स्वप्न असावं असं मला वाटलं. जेव्हा मी कैदी होतो, तेव्हा प्रत्येक रात्री मनातल्या मनात मी इरीनाशी आणि मुलींशी बोलायचा, मी लौकरच घरी परतेन असं आश्वासन देऊन त्यांना आनंदी बनवण्याचा प्रयत्न करायचा, त्यांनी रडू नये असं सांगायचा. मी म्हणायचा, मी भक्कम आहे, मी सोसू शकतो, एक दिवशी आपण सगळे परत एकत्र येऊ. दोन वर्षं मी मृतांशी बोलत होतो!"

बोलणारा मिनिटभर गप्प झाला. नंतर वेगळ्या, हळू आवाजात अडखळत म्हणाला:

"बंधू, तंबाखू ओढू या, मला घुसमटल्यासारखं वाटतंय."

आम्ही तंबाखू ओढू लागलो. पाणथळ जंगलात सुतार पक्ष्याची टोक टोक फार मोठ्यांदा ऐकू येत होती. आल्डरची पाने उबदार झुळु-कीबरोबर अजून मळसळत होती; वरच्या निळ्या नभात ढगांचे दाट पुंजके तसेच तरंगत जात होते. जणू तट्ट फुगलेली शिडे. पण त्या गंभीर शांततेच्या क्षणांमध्ये वसंताच्या महान पूर्णतेची तयारी करण्यात गुंतलेले, जीवनातील सजीवांच्या चिरंतन दुजोऱ्याच्या तयारीत गुंतलेले असीम जग मला अगदी वेगळे भासत होते. गप्प राहणे अवघड झाले आणि मी विचारले :

"पुढं काय झालं?"

"पुढं?" निवेदक अनिच्छेने म्हणाला. "पुढं कर्नलकडून मला एक महिन्याची सुटी मिळाली आणि एक आठवड्यानंतर मी वोरोनेझमध्ये दाखल झालो. माझ्या कुटुंबाबरोबर एके काळी मी रहात होतो त्या जागी मी पायी चालत गेलो. तांबूस पाण्यानं भरलेला खोल खळगा तिथं होता. कमरेपर्यंत उंच लव्हाळी वाढली होती... ओसाड, स्मशान-शांतता. बंधू, मला फार फार त्रास झाला! दुःखानं तिथं उभा राहिलो आणि मग स्टेशनवर परतलो. तिथं एकूण तासभरसुद्धा नव्हतो. त्याच दिवशी डिव्हिजनमध्ये गेलो.

"पण सुमारे तीन महिन्यांनंतर मला आनंदाची चमक अनुभवायला मिळाली; काळ्या ढगांआडून सूर्य बाहेर आल्यानंतर वाटतं तसं! आनातोलीची बातमी मिळाली. दुसऱ्या आघाडीवरून त्यानं मला पत्र पाठवलं होतं. माझ्या शेजाऱ्याकडून त्याला माझा पत्ता मिळाला. असं आढळलं की, प्रथम तो तोफखाना विद्यालयात दाखल झाला होता; त्याचं गणिताचं ज्ञान तिथं उपयोगी पडलं. एक वर्षानंतर तिथलं शिक्षण संपवून तो आघाडीवर गेला होता आणि त्यानं आता लिहिलं होतं की, कप्तानपदी त्याची बढती झाली होती, 'पंचेचाळीस' तोफखान्याचा तो प्रमुख होता, सहा वेळा त्याचा सन्मान झाला होता. थोडक्यात, त्यानं त्याच्या म्हाताऱ्याला खूप मागं टाकलं होतं. परत मला त्याचा खूप अभिमान वाटला. काही म्हणा, पण माझा मुलगा कप्तान होता, एका तोफखान्याचा मुख्य होता, ही काही चेष्टा नव्हती! शिवाय सन्मान-पदकं. त्याचा बाप 'स्टडबेकर'मधून तोफगोळे वाहून नेत होता, इतर

लष्करी सामान नेत होता, ह्यात काही विशेष नव्हतं. त्याच्या बापाचं काम भूतकाळ बनलं होतं, पण त्याचं, कप्तानाचं, सारं आयुष्य अजून पुढंच होतं.

"आता रात्रीच्या वेळांना मला म्हाताऱ्याची स्वप्नं पडू लागली. युद्ध संपल्यानंतर पोराचं लग्न लावीन आणि त्यांच्याबरोबर राहीन. मी थोडं सुतारकाम करीन आणि त्यांच्या पोरांना सांभाळीन. म्हाताऱ्या माणसाच्या सर्व गोष्टी मी करीन. पण ही सारी स्वप्नं धुळीला मिळाली. हिवाळ्यात आम्ही अखंड पुढं जात होतो, एकमेकांना वारंवार लिहायला सवड नव्हती. पण युद्धाअखेरी, बर्लिनजवळ असताना, एके सकाळी मी आनातोलीला पत्र लिहिलं आणि दुसऱ्याच दिवशी मला उत्तर मिळालं. असं घडलं होतं की, वेगवेगळ्या मार्गांनी आम्ही दोघंही जर्मन राजधानी-पाशी आलो होतो व आता एकमेकांच्या अगदी जवळ होतो. आमच्या भेटीच्या क्षणाची मी अधीरपणं वाट पहात होतो. तो क्षण आला... ऐन नऊ मेच्या दिवशी, विजय-दिनाच्या सकाळी, माझ्या आनातोलीला जर्मन रायफलवाल्यानं ठार मारलं...

"कंपनी-कमांडरनं दुपारी मला बोलावलं. त्याच्याशेजारी एक अनोळखी तोफखान्याचा लेफ्टनंट-कर्नल बसलेला मी पाहिला. मी खोलीत गेलो आणि जणू तो वरिष्ठाला भेटत होता अशा तऱ्हेनं उठून उभा राहिला. माझा कंपनी-कमांडर म्हणाला: 'सोकोलोव, तुला भेटायला आलेत,' आणि स्वतः खिडकीपाशी वळला. मला विजेचा झटका बसल्या-चा भास झाला. काहीतरी अशुभाची जाणीव झाली. लेफ्टनंट-कर्नल माझ्यापाशी येऊन म्हणाला: 'धीर धर, बापा! तुझा मुलगा, कप्तान सोकोलोव, आज सकाळी तोफखान्यापाशी ठार झाला. माझ्याबरोबर चल.'

"माझा झोक गेला, पण मी पाय स्थिर ठेवले. दगड-विटांनी विखुरलेल्या त्या रस्त्यांवरून मोठ्या मोटारीतून तो लेफ्टनंट-कर्नल आणि मी ज्या रीतीनं गेलो, ते अजूनही मला खरं वाटत नाही. रांगेत उभे राहिलेल्या सैनिकांची आणि लाल मखमलीत झाकलेल्या शवपेटीची मला अंधुक आठवण आहे. पण बंधू, तुला जसा बघतोय, तसा माझा आना-तोली मला स्पष्ट दिसतो. मी शवपेटीपाशी गेलो. होय, माझा मुलगा

तिथं निजला होता आणि माझा नव्हता सुद्धा. माझा — नेहमी हसरा, अरुंद खांद्यांचा लहान पोरगा, हडकुळ्या गळ्यातून पुढं डोकावणारा कंठमणी; पण हा तरुण होता रुंद खांद्यांचा, देखणा पुरुष. त्याचे डोळे अर्धवट झाकलेले होते. जणू माझ्यापलिकडं खूप दूर अंतरावर तो पहात होता. फक्त त्याच्या तोंडाच्या कोपऱ्यांशी माझ्या मुलाप्रमाणं किंचित हसू उमटलेलं होतं. कोणे एकेकाळी मला माहीत असलेला आनातोली! मी त्याचं चुंबन घेतलं आणि बाजूला झालो. लेफ्टनंट-कर्नलनं भाषण केलं. माझ्या आनातोलीचे मित्र त्यांचे अश्रू पुसत होते, पण मला रडूच येत नव्हतं. मला वाटतं, माझी आसवं काळजातच सुकून गेली होती. कदाचित म्हणूनच अजून काळजात फार दुखतंय?..

"माझ्या अखेरच्या आनंदाचं आणि आशेचं त्या परक्या जर्मन भूमीवर मी दफन केलं, तोफखान्यानं त्यांच्या कमांडरला त्याच्या लांबच्या प्रवासावर धडाकून सलामी दिली आणि माझ्या आतमध्ये काहीतरी तुटल्यासारखं वाटलं... मी तुकडीत परतलो तेव्हा वेगळा माणूस बनलो होतो. त्यानंतर लौकरच सैन्यातून माझी मुक्तता झाली. कुठं जायचं? वोरोनेझला? मुळीच नाही! मागल्या हिवाळ्यात जखमी झाल्यामुळं सैन्यातून मुक्तता मिळालेला माझा एक मित्र ऊर्यूपीन्स्कमध्ये रहात होता, अशी मला आठवण झाली. त्यानं मला केव्हातरी त्याच्यापाशी रहायला बोलावलं होतं. तर मी त्याच्याकडं गेलो.

"माझ्या मित्राला आणि त्याच्या बायकोला मलं नव्हती. शहराच्या टोकाशी स्वतःच्या घरात ती दोघं रहात होती. त्याला अपंगपणाबद्दल पेन्शन मिळत होतं, पण लॉरी डेपोत ड्रायव्हर म्हणून तो काम करत होता आणि मलाही तिथं नोकरी मिळाली. माझ्या मित्राच्या घरातच मला रहायला जागा मिळाली. आसपासच्या प्रदेशात वेगवेगळा माल आम्ही वाहून नेत होतो आणि शरदात धान्य वाहून नेण्याचं काम करत होतो. तेव्हा माझ्या नव्या मुलाशी, वाळूत खेळणाऱ्या ह्या मुलाशी, माझी ओळख झाली.

"लांबच्या सफरीवरून परतलो म्हणजे प्रथम कॅफेत जाऊन काहीतरी खात असू आणि अर्थातच थकवा घालवण्यासाठी शंभर ग्राम वोदका पीत असू. ही सवय वाईट आहे, पण एव्हाना मला पिणं आवडू लागलं

होतं हे कबूल केलं पाहिजे. एके दिवशी कॅफेपाशी ह्या मुलाला पाहिलं. दुसऱ्या दिवशीही तो मला तिथंच दिसला. छोटा गुंड! तोंडावर कलिंगडाचा रस आणि धूळ माखलेली, सबंध मळलेला, केसांच्या अस्ताव्यस्त झिंज्या, पण डोळे मात्र पाऊस पडून गेल्यानंतर रात्रीच्या आकाशात दिसणाऱ्या ताऱ्यांसारखे! मला त्याचा लळा लागला आणि आश्चर्य वाटेल, पण त्याला भेटायची ओढ वाटू लागली. त्याला भेटण्यासाठी मी घाईघाईनं काम आटपून कॅफेकडं धाव घेऊ लागलो. कॅफेतली माणसं देतील ते अन्न तो तिथं खायचा.

"चौथ्या दिवशी सरकारी शेतावरून धान्यानं भरलेल्या लॉरीसकटच मी कॅफेपाशी आलो. तिथं हा माझा पोरगा पायऱ्यांवर पाय हलवत बसला होता. त्याच्या चेहऱ्यांवरून तो खूप भुकेला दिसत होता. मी खिडकीतून डोकं बाहेर काढून ओरडलो: 'ए वान्या! लौकर मोटारीत येऊन बैस! तुला एलेव्हेटरपर्यंत फिरवून आणतो, मग इथं परतू आणि जेवू.' माझ्या आरोळीनं तो दचकला, मग पायऱ्यांवरून खाली उडी घेऊन लॉरीच्या खिडकीशी धडपडत चढत त्यानं हळू आवाजात विचारलं: 'माझं नाव वान्या आहे असं तुम्हाला कुठन समजलं, काका?' त्याचे सुंदर डोळे विस्फारून तो माझ्या उत्तराची वाट पाहू लागला. मी त्याला सांगितलं की, ज्यांना सगळ्या गोष्टी माहीत असतात अशा माणसांपैकी मी एक आहे.

"तो उजव्या बाजूला आला. मी दार उघडलं आणि त्याला माझ्याशेजारी बसवून आम्ही निघालो. तसा चळवळ्या पोरगा होता, पण एकदम शांत बसला आणि लांब कुरळ्या पापण्यांखालून माझ्याकडं कटाक्ष फेकत उसासे टाकू लागला. एवढासा लहान मुलगा, पण एव्हाना उसासे टाकायला शिकला होता! हे काय त्याचं काम होतं? मी त्याला विचारलं: 'तुझा बाप कुठं आहे, वान्या?' दबत्या आवाजात म्हणतो: 'आघाडीवर ठार झाला.' 'आणि आई?' 'आम्ही आगगाडीतून जात होतो तेव्हा बॉंबहल्ल्यात आई मारली गेली.' 'कुठून येत होतात?' 'माहीत नाही, आठवत नाही...' 'तुझे कुणी नातेवाईक नाहीत?' 'कुणीही नाही.' 'रात्री झोपतोस कुठं?' 'जिथं जागा मिळेल तिथं.'

"माझ्या घशात गरम आसवं दाटल्याचं मला जाणवलं आणि मी

ताबडतोब मनाशी निर्णय घेतला: 'कशाला आम्ही एकट्यानं हाल सोसायचे! माझा मुलगा म्हणून मी ह्याला सांभाळतो!' एकदम मला हलकं वाटू लागलं आणि हुरूप चढला. त्याच्याकडं झुकून हळूच विचारलं: 'वान्या, मी कोण आहे, तुला ठाऊक आहे?' त्यानं निःश्वास टाकावा तसं विचारलं: 'कोण?' मी तशाच हळू आवाजात त्याला म्हणालो: 'मी तुझा बाप!'

"देवा रे! मग काय घडलं म्हणून सांगू! त्यानं माझ्या गळ्याभोवती हातांची मिठी घातली, माझ्या गालांचे, ओठांचे, कपाळाचे पापे घेतले आणि छोट्या पाखरासारखा चिवचिवाट सुरू केला. लॉरीत माझे कान बधीर झाले. 'बाबा! लाडक्या! मला माहीत होतं! तू मला शोधून काढशील हे मला ठाऊक होतं! कसंही करून शोधशील! तू केव्हा शोधशील म्हणून मी खूप खूप वाट पाहिली!' तो मला बिलगला. त्याचं सबंध शरीर थरथर कापत होतं; वाऱ्यात थरथरणाऱ्या गवताच्या पात्यासारखं. माझ्या डोळ्यांसमोर धुकं पसरलं, माझंही अंग कापत होतं आणि हात थरथरत होते... चाकावर मी कसा ताबा ठेवला होता, कोण जाणे. तरीही मी लॉरी खड्ड्यात घातलीच आणि इंजिन बंद केलं. डोळ्यांसमोर धुकं असताना पुढं गेलो नाही, कुणाला तरी धडक मारीन अशी भीती वाटत होती. आम्ही तशाच अवस्थेत पाच मिनिटं बसून राहिलो. माझा छोटा मुलगा मला अजूनही बिलगून बसला होता, काहीही बोलत नव्हता, फक्त त्याचं सबंध शरीर कापत होतं. मी उजव्या हाताचा त्याच्याभोवती विळखा घातला, हलकेच त्याला मिठी मारली आणि डाव्या हातानं लॉरी वळवून मी रहात होतो त्या घराकडं नेली. त्यानंतर एलेव्हेटरकडं जाणं मला अशक्य ठरलं.

"फाटकापाशी लॉरी उभी करून माझ्या नव्या मुलाला मी हातांवर उचललं आणि घरात आणलं. माझ्या मानेभोवती छोट्या हातांची मिठी घालून तो मला घट्ट बिलगून होता. दाढी वाढलेल्या माझ्या गालाला स्वतःचा गाल त्यानं चिकटवून ठेवला होता. तसाच मी त्याला उचलून घरात आणला. माझा मित्र आणि त्याची बायको दोघंही घरात होती. मी आत आलो आणि दोन्ही डोळे मिचकावून धीटपणं म्हणालो: 'माझा वान्या अखेर सापडला! भल्या माणसांनो, आम्ही आलो

आहोत ! . .' निपुत्रिक असलेल्या त्या दोघांना सारा प्रकार चटकन ध्यानात आला आणि त्यांची धांदल-धावपळ सुरू झाली. मुलगा मला सोडायला तयार नव्हता. मी कशीबशी त्याची समजूत घातली. साबणानं त्याचे हात धुवून त्याला टेबलापाशी बसवलं. माझ्या मित्राच्या बायकोनं बशीत त्याला कोबीचं सार वाढलं आणि त्यानं भराभरा ते संपवलेलं बघितलं, तेव्हा तिच्या डोळ्यांमध्ये पाणी तरारलं. चुलाण्यापाशी ती उभी राहिली आणि मलवस्त्रात टिपं गाळू लागली. ती रडतेय असं वान्याला दिसताच तो तिच्यापाशी धावला आणि तिच्या कपड्यांना खेचत विचारू लागला : 'मावशी, तुम्ही रडताय कशाला ? बाबानं मला कॅफेपाशी शोधून काढलं. सगळ्यांना ह्याचा आनंद वाटला पाहिजे, पण तुम्ही रडताय !' ह्यावर ती आणखीच हमसून हमसून रडू लागली.

"जेवणानंतर त्याचे केस कापायला त्याला न्हाव्याच्या दुकानात घेऊन गेलो आणि घरी मी स्वत: त्याला आंघोळ घातली व स्वच्छ चादरीत त्याला गुंडाळला. मला घट्ट मिठी मारून तो माझ्या हातांमध्येच गाढ झोपला. मी हळूच त्याला बिछान्यावर निजवला, एलेव्हेटरकडं लॉरी घेऊन गेलो, धान्य उतरवलं आणि लॉरी परत डेपोत नेली. मग मी दुकानांमध्ये गेलो. गरम कापडाची विजार, सदरा, सँडल आणि गवती टोपी एवढ्या वस्तू त्याच्यासाठी खरेदी केल्या. अर्थात सगळी मापं चुकीची ठरली आणि वस्तूंचा दर्जाही वाईट होता. माझ्या मित्राच्या बायकोनं विजारीवरून माझी खरडपट्टी काढली : 'तुझं डोकं फिरलंय – असल्या कडक उन्हाळ्यात पोरांना कुणी गरम विजार घालतात !' ताबडतोब तिनं टेबलावर शिवणयंत्र ठेवलं, पेटीत शोधाशोध सुरू केली आणि एक तासाभरात माझ्या वान्यासाठी सुती अर्धी चड्डी व अर्ध्या बाह्यांचा पांढरा सदरा बनवून दिला. मी वान्याशेजारीच निजलो आणि बऱ्याच काळानंतर प्रथमच मला शांत झोप लागली. तरीही रात्री चार वेळा मला जाग आली. वळचणीखालच्या चिमणीप्रमाणं तो माझ्या हाताच्या आढीत लगटून झोपला होता. त्याचा संथ श्वासोच्छ्वास चालू होता. माझ्या आनंदाचं वर्णन मी करू शकत नाही ! त्याची झोपमोड

होऊ नये म्हणून न हलण्याचा मी प्रयत्न करत होतो, तरीही हळूच उठत होतो, काडी पेटवून तिच्या उजेडात त्याला निरखून पहात होतो...

"पहाटेपूर्वी मी जागा झालो. एवढं कोंदट का वाटत होतं, मला समजेना. माझा मुलगा अंगावरची चादर उडवून माझ्या छातीवर आडवा झोपला होता आणि त्याच्या छोटचा पावलानं माझं नरडं दाबलं गेलं होतं. त्याच्याबरोबर झोपणं त्रासदायक आहे, पण तरीही त्याची सवय झालीय, त्याच्याविना मला उदास वाटतं. रात्री तो झोपेत असताना कधी त्याला कुरवाळतो, कधी त्याच्या कुरळ्या बटांचा वास घेतो. माझ्या काळजातली वेदना त्यामुळं कमी होते, ते जास्त मऊ बनतं; दु:खांपायी माझ्या काळजाचा दगड बनलाय...

"प्रथम तो माझ्याबरोबरच लॉरीतून फिरायचा. पण तसं चालणार नाही हे माझ्या ध्यानात आलं. मला एकटचाला काय लागतं? पावाचा तुकडा आणि चिमूटभर मिठाबरोबर एक कांदा, सैनिकाला सबंध दिवसाला पुरतो. पण त्याच्याबरोबर गोष्ट वेगळी होती. त्याला दूध दिलं पाहिजे, अंडी उकडून दिली पाहिजेत आणि गरम खाण्याशिवाय त्याचं जमणार नव्हतं. माणसाचं काम तर थांबून रहात नाही. मन घट्ट केलं आणि माझ्या मित्राच्या बायकोच्या ताब्यात त्याला दिलं. सबंध दिवसभर तो रडला आणि संध्याकाळी एलेव्हेटरपाशी धावत मला भेटायला आला. रात्री खूप उशीरापर्यंत तिथंच थांबला.

"प्रथम त्याच्याबरोबर मला फार अवघड गेलं. एके दिवशी खूप थकून आलो होतो आणि अजून बाहेर उजेड असतानाच आम्ही बिछान्यावर पडलो. तो नेहमी चिमणीसारखा चिवचिवत असायचा, पण ह्यावेळी गप्प होता. मी विचारलं: 'कसला विचार करतो आहेस मुला?' छताकडं टक लावून बघत त्यानं उलट मला विचारलं: 'बाबा, तुझा कताडी कोट कुठं आहे?' आयुष्यात कधी मी कातडी कोट वापरला नव्हता! आता वेळ निभावून नेणं भाग होतं. 'वोरोनेझमध्ये राहिला,' मी म्हणालो. 'आणि माझा शोध घ्यायला तुला इतका वेळ का लागला?' मी उत्तरलो: 'मुला, मी तुला जर्मनीत शोधलं, पोलंडमध्ये शोधलं, सबंध ब्येलोरूस्सियाभर धुंडाळलं, पण तू लेका इथं ऊर्यूपीन्स्कमध्ये होतास!' 'ऊर्यूपीन्स्क जर्मनीपेक्षा जवळ आहे? आपल्या घरा-

पासून पोलंड खूप लांब आहे?' झोपेपर्यंत आम्ही तशी बडबड करत राहिलो.

"बंधू, त्यानं कातडी कोटाबद्दल उगीच विचारलं असं वाटतं? नाही, त्यामागं कारण होतं. त्याचा खरा बाप कधीतरी कातडी कोट वापरत होता आणि त्याला अचानक त्याबद्दल आठवण झाली होती. लहान मुलाची स्मरणशक्ती वळीवाच्या पावसात लकाकणाऱ्या विजेसारखी असते. ती लख्खदिशी चमकते, क्षणभर सगळ्या वस्तू उजळते आणि नाहीशी होते. त्याची स्मरणशक्ती असे काम करत होती—वळीवाच्या पावसात चमकणाऱ्या विजेसारखी.

"ऊर्युपीन्स्कमध्ये आम्ही दोघं आणखी एक वर्षभर एकत्र राहिलो असतो, पण नोव्हेंबरात मला अपघात झाला. खेड्यातून चिखलाच्या रस्त्यावरून मी लॉरी चालवत होतो आणि लॉरी घसरली; वाटेत एक गाय आडवी आली आणि मी तिला धक्का मारला. अशा वेळी जसं घडतं तसं घडलं—बायकांनी ओरडा केला, माणसांची गर्दी जमली आणि तेवढ्यात वाहतूक-इन्स्पेक्टर तिथं हजर झाला. मी त्याला समजुतीनं घ्यायला सांगितलं, पण त्यानं माझा परवाना काढून घेतला. गाय उठली, तिनं शेपटी हवेत उंचावली आणि ती रस्त्यावरून चौखूर धावत निघून गेली, पण मी मात्र माझा परवाना गमावला. हिवाळ्यात मी जुळारी म्हणून काम केलं आणि नंतर सैन्यातल्या एका जुन्या मित्राशी पत्रव्यवहार केला. तुमच्या काशारी भागात तो ड्रायव्हर म्हणून काम करतोय. त्यानं मला स्वतःकडं रहायला बोलावलंय. तो लिहितोय की, सहा महिने जुळारी म्हणून काम कर आणि मग आमच्याइथं तुला नवा परवाना देतील. म्हणून मी आणि माझा मुलगा काशारीला चाललोय.

"मात्र एक खरं—गायीचा अपघात झाला नसता, तरीसुद्धा मी ऊर्यूपीन्स्क सोडलं असतं. एका जागी फार काळ राहवत नाही. जेव्हा माझा वान्या आणखी थोडा मोठा होईल आणि त्याला शाळेत पाठवायची वेळ येईल, तेव्हा कदाचित माझी भटकंती थांबेल आणि एकाच जागी मी स्थिर होईन. सध्या तरी आम्ही दोघं रशियन भूमीवरून भटकतोय."

"त्याला दमायला होत नाही?" मी विचारलं.

"तो स्वतःच्या पायांवर फार चालत नाही. बहुतेक वेळ माझ्या

खांद्यांवर बसतो. जेव्हा त्याला पाय मोकळे करावेसे वाटतात, तेव्हा खाली उडी मारतो आणि छोटया बकऱ्याप्रमाणं रस्त्याच्या कडेनं बागडत जातो. बंधू, आमचं दोघांचं जमून जाईल, पण माझ्या काळजात काही-तरी खुपतंय, पिस्टन बदलला पाहिजे... काहीवेळा अशी कळ निघते की, शुद्धच हरपते. एखाद्या रात्री झोपेतच मला मरण येईल आणि माझ्या मुलाला मी घाबरवीन, अशी भीती वाटते. आणखी एक संकट आहे: दररोज माझी मेलेली माणसं मला स्वप्नात दिसतात. जणू मी काटेरी तारांच्या कुंपणात आहे आणि दुसऱ्या बाजूला ती सगळी मुक्त... इरीनाशी आणि मुलांशी मी सगळं बोलतो, पण ज्या क्षणी काटेरी तार खेचून तोडायचा मी प्रयत्न करतो, त्या क्षणी ती सगळी एकदम नाहीशी होतात, डोळयांदेखत विरून जातात... एक आश्चर्य आहे: दिवसा माझा स्वतःवर भक्कम ताबा असतो, माझ्या तोंडून एक सुस्कारा बाहेर पडणार नाही. पण रात्री झोपेतून काहीवेळा जागा होतो, तेव्हा उशी आसवांनी भिजलेली असते..."

जंगलात माझ्या मित्राचा आवाज व पाण्यावरील वल्ह्यांच्या सप-काऱ्यांचा आवाज मला ऐकू आला.

ह्या अनोळखी, पण आता मला निकटच्या बनलेल्या माणसाने उठून माझ्यापुढे त्याचा मोठा, लाकडासारखा भक्कम पंजा धरला:

"अच्छा बंधू, सुखी हो!"

"आणि काशारीपर्यंतचा तुझा प्रवास सुखाचा होवो!"

"धन्यवाद. ए बाळा, चल होडीकडं!"

मुलगा बापापाशी धावला, त्याच्या उजव्या बाजूला गेला आणि बापाच्या कोटाची किनार पकडून लांब ढांगा टाकीत बापाबरोबर चालू लागला.

दोन अनाथ माणसे, युद्धाच्या प्रचंड झंझावातात परक्या मुलुखात भिरकावले गेलेले वाळूचे दोन कण... त्यांच्या भवितव्यात काय आहे? माझी इच्छा आहे की, हा अदम्य निर्धाराचा रशियन माणूस टिकून राहील आणि बापाच्या आधारानं हा मुलगा मोठा होईल, जर त्याच्या मायभूमीनं मदतीसाठी त्याला हाक घातली, तर तो धावून जाईल, सारे संकटे सोशील, सर्व अडथळे पार करील.

॥*

अगदी जड मनाने मी त्यांच्या पाठमोऱ्या आकृती पहात होतो... कदाचित आमच्या निरोपाचा प्रसंग सुरळीत पार पडला असता, पण काही पावले गेल्यानंतर वान्या त्याच्या बारकुळ्या पायांवर वळला आणि माझ्याकडे पाहून त्याने त्याचा चिमुकला गुलाबी हात हलविला. अचानक माझ्या काळजाला एका मऊ, पण नख्यांच्या पंजाचा विळखा बसल्या-प्रमाणे मला भासले आणि मी घाईघाईने तोंड फिरविले. नाही, युद्धा-च्या दरम्यान केस पांढरे झालेले हे वयस्क पुरुष केवळ झोपेतच रडत नाहीत. जागेपणीसुद्धा ते रडतात. इथे महत्त्वाची गोष्ट – योग्य वेळी वळता आले पाहिजे. मुख्य म्हणजे मुलाच्या काळजाला इजा करायची नाही, पुरुषाच्या गालांना भाजणारे अश्रू मुलाच्या दृष्टीला पडू द्यायचे नाहीत...

१९५६

व्लादीमिर बोगोमोलोव

पहिले प्रेम

व्लादीमिर बोगोमोलोव (जन्म १९२६). व्लादीमिर बोगोमोलोव दुसऱ्या महायुद्धात टेहळ्या पथकाचे अधिकारी होते व मॉस्कोच्या वेशींपाशी, वायव्य आघाडीवर, युक्रेनमध्ये, ब्येलोरूस्सियात, पोलंडमध्ये, जर्मनीत आणि मांचूरियात त्यांनी लढाया खेळल्यात. त्यांच्या सर्व कथा युद्धाविषयीच्या आहेत. "माझं साहित्य मला कितीही चांगलं माहीत असलं, तरी फक्त माझ्या स्मरणावर मी कधीही अवलंबून रहात नाही," ते म्हणतात. "प्रत्येक घटनेची, प्रत्येक तपशीलाची, मी दोन-दोनदा तपासणी करतो व मगच केवळ तिच्या सत्यतेवर, विश्वास ठेवतो." 'सत्याचा क्षण' ('ऑगस्ट ४४ मध्ये') ह्या कादंबरीसाठी त्यांनी २४६७९ कात्रणे व टिपणे गोळा केली होती; साहित्याच्या प्रक्रियेबाबतच्या त्यांच्या परिपूर्णतेचा आणि काटेकोर बारकाव्यांचा हा पुरावा होय!

१९५८ साली प्रथम प्रसिद्ध झालेल्या 'इवान' ह्या पुस्तकात त्यांनी एका लहान टेहळ्या मुलाची कथा सांगितली आहे. युद्धानें ह्या मुलाला सामान्य बालपणापासून आणि नंतर खुद्द आयुष्याला वंचित केले. पुस्तकाला प्रचंड लोकप्रियता लाभली. १९६३ साली व्हेनिस चित्रपट महोत्सवात ह्या कथेवर आधारलेल्या चित्रपटाला सर्वोच्च पारितोषिक मिळाले.

'सत्याचा क्षण' ही कादंबरी युद्धातील सोविएत टेहळ्यांच्या कामगिरींविषयी आहे.

'पहिले प्रेम' ही लघुकथा युद्धकालीन जीवनाच्या एकूण चित्रणात भर टाकणारी आहे; प्रेम, सुख आणि खुद्द आयुष्याचा युद्ध कसा नाश करते ह्याचे दर्शन घडविलें आहे.

आम्ही एकमेकांना बिलगून झोपलो होतो आणि जमीन कठीण अथवा थंड किंवा दमट भासत नव्हती.

सहा महिन्यांपूर्वी आमची पहिली भेट घडली होती–ती आमच्या रेजिमेंटमध्ये दाखल झाली होती त्या क्षणापासून. मी एकोणीस वर्षांचा होतो आणि ती–अठरा वर्षांची.

आम्ही चोरून भेटत होतो: कंपनी कमांडर आणि नर्सची मदतनीस. आमच्या प्रेमाबद्दल कुणालाही काही माहीत नव्हते, आता आम्ही तिघे होतो याबद्दलही कुणाला ठाऊक नव्हते...

"मला जाणवतंय, हा मुलगाच आहे," दबत्या आवाजात दहाव्यांदा तिने खात्रीपूर्वक म्हटले. मला खूष करण्याची ती आकांताने धडपड करीत होती. "आणि तो हुबेहूब तुझ्यासारखा होणार!"

"मुलगी झाली तरी हरकत नाही माझी. खुशाल तुझ्यासारखी दिसो!" मी पुटपुटलो, पण माझे विचार दुसरीकडेच भरकटत होते.

पुढे पाचशे मीटर अंतरावर माझ्या कंपनीचे सैनिक व सार्जंट निवाऱ्यांमध्ये आणि उघड्या खंदकांमध्ये झोपले होते. आणखी पुढे, आघाडीच्या चौक्यांपुढे, जर्मन प्रकाशशलाकांमध्ये अधूनमधून उजळून निघणारी व आत्ता काळोखात झाकलेली १६२ टेकडी होती.

आठवड्यापूर्वी दुसऱ्या कंपनीने जे करण्याचा प्रयत्न केला होता, ते पहाटे माझी कंपनी करणार होती–ती टेकडी काबीज करणार होती. संध्याकाळी मुख्य ठाण्याच्या निवाऱ्यात आमच्या रेजिमेंटच्या कमांडरनी आम्हा पाच अधिकाऱ्यांना बोलावून ही कामगिरी पार पाडायचा हुकूम

दिला होता. आम्हा पाचांशिवाय इतर कुणालाही ह्या मोहीमेची माहिती नव्हती. कामगिरीची आम्हाला कल्पना देऊन कमांडर पुन्हा मला म्हणाले होते :

"तर लक्षात ठेव : 'कात्यूशा' उडाल्या आणि हिरव्या प्रकाश-शलाका उजळल्या की, तू हल्ला चढव... शेजारीसुद्धा उठाव करतील, पण टेकडी तू काबीज करायची!"

आम्ही एकमेकांना गच्च मिठी मारून निजलो होतो आणि तिचे चुंबन घेताना अटळपणे आगामी लढाईबद्दलचा विचार माझ्या मनात आला. पण त्याहीपेक्षा तिच्या भवितव्याची मला जास्त काळजी वाटत होती आणि काय करावे याबाबत मेंदूला शिणवत होतो.

"...आता दोघांसाठी मला झोपलं पाहिजे," उत्तरेकडील नाद-मधुर किणकिणत्या सुरात ती पुटपुटत होती. "तुला माहीत आहे, रात्रीच्या वेळांना मला वारंवार भास होतो की, सकाळ उजाडेल आणि हे सर्व संपेल. हे खंदक, रक्त, मृत्यू... एव्हाना तिसरं वर्ष–युद्ध कायम थोडंच चालणार? कल्पना कर : सकाळ झालीय, सूर्य वर येतो आणि युद्ध नाही, मुळीच नाही..."

"मी आत्ता मेजरकडे जातो!" तिच्या डोक्याखालून माझा हात सोडवून घेत मी ठामपणे उठलो : "मी त्यांना सगळं सांगतो, सगळं! खुशाल तुला घरी पाठवोत. आजच्या आज!"

"अरे काय बोलतोस?" एकदम उठून तिने माझा हात पकडला व जोराने स्वतःकडे खेचला. "नीज!.. कसा मूर्ख रे तू!.. मेजर तुझी चामडी सोलून काढील!"

आणि रेजिमेंटच्या कमांडरच्या बसक्या, खरखरीत आवाजाची नक्कल करीत, सावकाशपणे शब्दांना लांबवीत ती पुटपुटली :

"कनिष्ठांशी शरीरसंबंध ठेवल्यामुळं तुकडीची लढाईची क्षमता उंचावत नाही आणि ऑफीसरचा दरारा नष्ट होते. कोणताही ऑफीसर अशा भानगडीत गुंतलेला आढळला, तर त्याच्या दर्जाचा विचार न करता मी तात्काळ त्याची हकालपट्टी करीन! जोडीला असा शेरा मारीन की चौकी-पहाऱ्यावरसुद्धा ठेवणार नाहीत! प्रथम युद्ध जिंका आणि

मग कुणा पाहिजे तिच्यावर मनसोक्त प्रेम करा. पण आत्ता – सक्त मनाई!"

तिचा आवाज चिरकला, पण ती स्वतःवर खूष होत मागे लवंडली आणि आवाज न करता हसू लागली, आमची चाहूल कुणाला लागू नये म्हणून.

होय, माझी परिस्थिती चांगली नव्हती हे मला ठाऊक होते. मेजर अत्यंत कडक शिस्तीचे गृहस्थ होते. युद्धात स्त्रियांना स्थान नाही आणि प्रेमाला तर मुळीच नाही, असे त्यांचे ठाम मत होते.

"तरीही मी त्यांच्याकडं जातो!"

"चूप!" तिने चेहरा माझ्या गालाला भिडवला. थोडया वेळानंतर उसासा टाकीत ती दबत्या आवाजात म्हणाली: "मी स्वतःच सारं करीन! मी विचार करून ठेवलाय. मुलाचा बाप तू असणार नाहीस!"

"मी नाही?" माझे रक्त तापू लागले. "मी नाही, तर मग कोण आहे?"

"कसा रे बावळट तू!" ती खटयाळपणे हसली. "छे:, देव करो, तो तुझ्यासारखा न होवो! हे बघ, कागदोपत्री आणि एकूण बाप तूच असशील! पण आत्तापुरतं मी दुसरंच सांगीन."

ती नेहमी बालकाप्रमाणे मोकळी आणि खरे वागायची, त्यामुळे आताचा तिचा धूर्तपणा पाहून मी थक्क झालो.

"कुणाचं नाव सांगणार तू?"

"ठार झालेल्यांपैकी कुणाचं तरी. उदाहरणार्थ, बायकोव."

"नाही, ठार झालेल्यांच्या वाटेला जाऊ नको."

"तर मग... कीन्दयायेव."

सार्जंट कीन्दयायेव देखणा, रंगेल तरुण होता, मद्यपी आणि [illegible] होता, नुकतीच शिक्षेवर त्याची पाठवणी झाली होती.

हेलावून मी ग्रेटकोट खाली पसरला व आवेगाने तिला माझ्यापाशी [illegible].

"सावकाश!" घाबरून माझ्या छातीला मुठींनी रेटत ती म्हणाली.

"आम्हाला चिरडून टाकशील तू! (एव्हाना स्वतःला ती बहुवचनात संबोधू लागली होती आणि त्यात बालिश आनंद अनुभवत होती). माझा लाडका बावळट! माझ्याशी तुझी गाठ पडली हे तुझं भाग्य समज. माझ्या संगतीत तुझं कधी वाईट होणार नाही!"

ती मुक्तपणे, निष्काळजीपणे हसत होती, पण मी मात्र हसू इच्छित नव्हतो.

"ऐक, तू आत्ताच्या आत्ता मेजरकडं जा!"

"रात्री? अरे, काय बोलतोस?!"

"मी येतो तुझ्या सोबतीला! त्यांना सारा खुलासा कर आणि सांग, की तुला त्रास होतोय, यापुढं इथं काम करणं तुला शक्य नाही!"

"पण हे खरं नाही!"

"मी तुला विनंती करतोय! पुढं तू कशी राहशील? तू गेलंच पाहिजे! तू समजून घे.. अचानक... जर उद्या लढाईवर गेलो तर?"

"लढाईवर?" क्षणात ती सावध बनली. "खरं सांगतोस?"

"होय."

काही काळपर्यंत ती मुकाट पडून राहिली. तिच्या श्वसनावरून—जे मला परिचित होते—मला समजले की, ती अस्वस्थ बनली होती.

"ठीक आहे... लढाईपासून लांब पळत नाहीत. आणि पळणं शक्यही नाही... तरीही कमिशनपुढं माझी तपासणी होऊन डिव्हिजन-कडून हुकूम येईपर्यंत काही दिवस नक्कीच लागणार... मी उद्याच मेजर-कडं जाईन. ठरलं?"

मी गप्प राहिलो. तिला काय सांगावे हेच मला सुचत नव्हते.

"मेजरपाशी जाणं मला सोपं आहे असं वाटतं तुला?" अचानक ती पुटपुटली. "त्यापेक्षा मरणं सोपं! किती वेळा मला म्हणाले: 'बघ शहाणी वाग!' आणि मी... शिवाय कम्सामोलची सभासद..."

तिने आवंढा गिळला, मान फिरवली आणि कोटाच्या बाहीत तोंड

खुपसून आवाज न करता ती हुंदकू लागली. मी तिला जवळ धरले, तिच्या छोटया ओठांची, कपाळाची, आसवांमुळे खारट बनलेल्या डोळ्यांची चुंबने घेतली.

"सोड, मी जाते," मला दूर लोटत अस्फुट आवाजात तिने विनविले. "मला सोबत येतोस?"

...बटालियनच्या वैद्यकीय पथकाचा जेथे मुक्काम होता त्या ओलसर घळीत आम्ही अंधारात उतरलो. एव्हाना थोडी गुबगुबीत बनलेली तिची कंबर मी धरली होती. मी तिला दोन्ही हातांनी पकडले होते व ती पडू नये अथवा घसरू नये म्हणून तिचे प्रत्येक पाऊल डोळ्यात तेल घालून पहात होतो. जणू काही युद्धापासून, पहाटेच्या लढाईपासून मी तिचे रक्षण करू शकणार होतो, जेथे रणांगणात तिला धावावे लागणार होते, घायाळ सैनिकांना सुरक्षित जागी ओढून आणताना जेथे ती अनेकदा घसरणार होती, पडणार होती!

त्या घटनेला पंधरा वर्षे उलटलीत, पण अगदी काल घडल्याप्रमाणे सर्व काही मला आठवते.

पहाटे 'कात्यूशा' उडाल्या, मशिनगन आणि डिव्हिजनच्या तोफखान्याचा भडिमार सुरू झाला, हिरव्या प्रकाशशलाका उजळल्या...

जेव्हा सूर्य उगवला तेव्हा कंपनीतील उरलेल्या माणसांसकट मी टेकडीपर्यंत मुसंडी मारली. अर्ध्या तासानंतर भक्कम बांधणीच्या जर्मन खंदकात रेजिमेंटच्या कमांडरनी आणि आणखी कुणीतरी माझे अभिनंदन केले, मला आलिंगने दिली, माझ्याशी हस्तांदोलने केली. मी ठोकळयागारखा उभा होतो, कसलीही जाणीव नव्हती, काही दिसत नव्हते आणि काही ऐकू येत नव्हते.

सूर्य... जर मी त्याला मागे रेटू शकलो असतो, क्षितीजामागे! जर मी पहाटेला माघारी आणू शकलो असतो!.. अवघ्या दोन तासांपूर्वी आम्ही तिघे होतो...

पण सूर्य सावकाशपणे, कठोरपणे वर चढला, मी टेकडीवर उभा

होतो आणि ती... ती तेथे मागे राहिली होती, जेथे मृतांना पुरणाऱ्या पथकातील लोक फिरत होते...

ती माझ्या दृष्टीने कोण होती आणि आम्ही तिघे होतो, ह्याची कुण्णा कुण्णाला चुकूनही कल्पना नव्हती...

१९५८

विक्तर अस्तापयेव

बायकोचे हात

विक्तर अस्ताफ्येव (१९२४-१९८४). सरकारी पारितोषिक विजेते विक्तर अस्ताफ्येव यांचे दोन मुख्य विषय होते — त्यांच्या बालपणातील आठवणी आणि दुसरे महायुद्ध. आईबापाच्या मायेला वंचित झालेले आणि सुखी घराची सुरक्षितता न लाभलेले केविलवाणे बालपण त्यांना जगावे लागले. पण सैबेरियाच्या निसर्गसान्निध्यात राहिल्यामुळे आणि तेथील लोकांची ओळख झाल्यामुळे त्या अनाथावस्थेतील कळकटपणा काही अंशी कमी झाला होता व त्याबद्दल ते संपूर्ण आयुष्यभर कृतज्ञ राहिले होते. 'चोरी' (१९६६) आणि 'शेवटची मानवंदना' (१९७२-७९) ह्या लघुकादंबऱ्या त्यांना बालपणीच्या आठवणींमधून स्फुरल्या.

युद्धाचा दुःखद अनुभव त्यांच्या मनावर कायम ठसा उमटवून गेला. ह्या विषयावरील त्यांच्या कथा ('कोसळणारे तारे', १९६०; 'धनगर आणि धनगरीण', १९७१; 'घे आणि आठवण ठेव, १९६२;) आश्चर्यकारक प्रभाव पाडतात, तरी त्यांचा सूर अगदी साधा व नाट्यविरहित आहे, नायक कमालीचा ऐहिक आहे. अस्ताफ्येव यांचे नायक शांतताकाळात ज्या परिपूर्णतेने आणि नेकीने पोलाद ओतत होते अथवा गव्हाची कापणी करीत होते, त्याच वृत्तींनी रणांगणावर पराक्रम गाजवितात. ठाम श्रद्धेने आणि स्वाभाविक साधेपणाने त्यांनी त्यांच्या घराचे, देशाचे रक्षण केले. विरोधाभासासाठी लेखक सर्व सजीव वस्तूंविरुद्धच्या विध्वंसक युद्धाच्या अस्वाभाविकतेवर भर देतो आणि ज्याच्याशी कोणत्याही मौल्यवान वस्तूची तुलना करता येणार नाही अशा मानवी जीवनाच्या सौंदर्याबद्दल बोलतो. 'दिवसा उजेड आहे का' च्या नायकाला आशा वाटते की, "अशा कत्तलीनंतर आणि आत्मनिर्मूलनानंतर लोक भूतकाळाच्या चुकांची पुनरावृत्ती करणार नाहीत... तेव्हा त्याचा विश्वास होता व त्याच्या श्रद्धेने त्याला आणि खंदकातील सर्व लोकांना बळ दिले की, ही भीती, हा दुष्टपणा आणि द्वेष त्यांच्या मुलांना माहीत होणार नाहीत; ती फक्त चांगली, सुजाण कामे करीत आयुष्य जगतील. सरतेशेवटी आयुष्य एवढे लहान होते!"

माझी जिवाभावाची सखी आणि सहचरी मान्या हिला

त्या डोंगरउतारावर माझ्यापुढेच त्याने झपझप पावले टाकली आणि त्याच्या बुटांखाली निसरडे गेदे शेवाळयात खोल रुतले. त्या सबंध उतारावर सळसळत्या लव्हाळ्यांचे, चुरचुरत्या सुगंधी पान-वनस्पतींचे आणि काळया मनुक्याच्या फांद्यांचे सावट पसरले होते. छुप्या निर्झरांनी आणि छोटया छोटया ओहोळांनी अख्खा डोंगरउतार पाझरत होता. या खुरटया झुडुपांच्या साम्राज्यावर चेरी, वाळुंजी आणि आल्डर वृक्षाच्या शेंडयांनी एकत्रित होऊन छत्र धरले होते. झऱ्यांचे मंद, झुळझुळ आवाज या छत्राखाली कोंदले गेले होते. या झाडांच्या फांद्यांवर पक्ष्यांचा फडफडाट चालायचा, बुंध्यांलगतच्या बिळांमध्ये उंदीर सुळकन् पसार व्हायचे आणि डोळे दिपवून टाकणाऱ्या दिवसाच्या उजेडापासून वटारल्या डोळयांची घबडे पानांआड दडून बसायची. ही अशी जागा होती जिथे पशुपक्षी रहात होते, वंशवृद्धी करीत होते, अन्नाचा शोध घेत होते, ओहोळांचे पाणी पीत होते, एकमेकांची शिकार करीत होते आणि त्यामुळेच चोरटे, सावध जीवन जगत होते. गाणे गायचे असले तर पक्षी दुसरीकडे, उंच डोंगरमाथ्यावर जायचे. तिथे त्यांना सूर्योदयाचा देखावा आधी पहायला मिळायचा आणि सूर्यास्ताचा देखावा उशिरापर्यंत न्याहाळता यायचा. तिथे गाणी म्हणताना त्यांच्यावर क्वचितच हल्ला होत असे.

झुडुपांमधून कधी दिसणारी तर कधी लपणारी स्तेपान त्वोरोगोवची फक्त पाठ तेवढी मी पाहू शकत होतो. त्याच्या रंगविटल्या शर्टामधून त्याचे कमालीचे पिळदार खांद्यांचे स्नायू तट्ट फुगलेले दिसत होते. तो किंचित पुढे झुकून चालला होता आणि डाव्यापेक्षा त्याचा उजवा खांदा थोडा अधिक पुढे आला होता. त्यांची हालचाल अत्यंत लवचीक आणि आटोपशीर होती. त्याची चाल भक्कम होती व तो सबंध पाऊल जमि-

नीवर ठामपणे रोवायचा. त्याला आपल्या पायावर अत्यंत ठामपणे तोल सांभाळावा लागायचा, कारण त्याला हात नव्हते.

तो काही वेळा खाली पडायचा, पण नेहमी आपल्या कोपरांवर किंवा कुशीवर; त्यासाठीच तर त्या पुढे आलेल्या उजव्या खांद्याचा उपयोग व्हायचा. तो हलकेच पडायचा, कोणतीही गडबड न करता चटकन उठून उभा रहायचा व पुढे चालू लागायचा.

त्याच्याबरोबर वेग राखताना माझी तारांबळ उडत होती. झुडुपांना, लव्हाळ्यांना हाती लागेल त्या वस्तूला पकडून आधार घेत मी कसाबसा धडपडत चाललो होतो. पायाखाली जणू सापांची वारूळे असावीत त्या-प्रमाणे लव्हाळी फूत्कार करीत होती, त्यांच्या पात्यांना पकडून धरताना पंजे कापले जात होते. तैगामध्ये आपण किती चपळपणे वावरतो हे मला दाखविण्यासाठीच मुद्दाम स्तेपानने हा रस्ता निवडला असावा असे विचार माझ्या मनात येत होते व मनातल्या मनात मी त्याला शिव्यांची लाखोली वहात होतो.

तेवढ्यात तो मागे वळला आणि मी दमलो आहे का, अशी त्याने सहानुभूतीने विचारणा केली. माझ्या उत्तराची वाटही न पाहता तो म्हणाला, "तर मग थोडा वेळ बसू या."

मी एका निर्झराशेजारी बैठक मारली. त्या उतारावरून नागमोडी वळणे घेत तो वहात आला होता, शेवाळाखाली एका छोट्या खड्ड्यात त्याने गिरकी घेतली होती आणि दाट गवतात लहान विषारी साप जशी उडी घेतो तशी उडी घेऊन तो दुसऱ्या एका निर्झराला जाऊन मिळाला होता. एका उंच कपारीच्या दगडावरून आनंदाने खळखळ करीत त्याने मोठ्या मजेने त्या दुसऱ्या निर्झराला आलिंगन दिले होते. ज्या ठिकाणी त्या निर्झराचा उगम झाला होता तिथे दाट रवाळ वाळू जमली होती व पाण्याने धुवून निघाल्याने पांढरीशुभ्र दिसत होती. त्या पाण्यात एक मुंगळा गटांगळ्या खात होता. त्याच्या दृष्टीने तो बारका खड्डा म्हणजे पंचमहाभुतांनी थैमान घातलेल्या सागरासारखा भासत असावा. त्याने धडपड करायचा नाद सोडून देऊन आपल्या दैवावर हवाला टाकला होता. केवळ अधूनमधून कशाचा तरी आधार घेण्यासाठी तो हातापायांची हालचाल करीत होता.

"बेटा पुरता झिंगलाय," हसत स्तेपान म्हणाला.

आपल्या आकड्याने त्याने एक डहाळी उचलली व त्या पाण्याच्या खड्ड्यात बुचकळली. मुंगळ्याने ती डहाळी कशीबशी पकडली, तिच्यावर तो मोठ्या कष्टाने चढला, काही काळ तिच्यावर स्वस्थ बसून राहिला आणि मग एकाएकी बायका-मुलांची आठवण झाल्याप्रमाणे घाईघाईने गवतामध्ये तुरुतुरु निघून गेला. स्तेपानने डहाळी फेकून दिली आणि आपल्या गुडघ्यांमध्ये थोटे हात लपवून तो बसून राहिला. तो बसला असला म्हणजे नेहमी तसे करतो असे माझ्या लक्षात आले होते. त्याचा चेहरा विचारी दिसत होता. त्याच्या चेहऱ्यावर रेषा कमी होत्या, पण ज्या होत्या त्या मात्र अगदी दाट होत्या. त्या रेषा म्हणजे केवळ वयाने पडलेल्या सुरकुत्या नव्हत्या, तर या माणसाच्या आयुष्यात घडलेल्या फार मोठ्या आघातांच्या खुणा होत्या. उत्तर उरालमधील लोकांच्या डोळ्यांच्या पापण्यांचे केस पांढुरके असतात त्याप्रमाणे त्याच्याही पापण्या पांढुरक्या होत्या. त्याच्या अर्धमिटल्या डोळ्यांवर त्या पापण्यांनी जणू पडदा घातला होता. पण तरीही त्याची शोधक, भेदक नजर त्या पापण्यांआडून माझ्यावर खिळलेली मला जाणवत होती.

मी झऱ्याचे पाणी प्यायलो आणि सिगरेट शिलगावली. स्तेपान डुलकी घेत होता असे वाटत होते, पण कदाचित मला विश्रांती मिळावी म्हणून तो बहाणा करीत असावा. त्याची बंदूक त्याच्या शेजारीच विसावली होती आणि काडतुसांचा छातीवरील पट्टा हनुवटीपर्यंत वर सरकवलेला होता. तो त्या पट्ट्यामधून आपल्या दातांनी काडतुसे खेचून काढायचा आणि दातांनीच ती काडतुसे बंदुकीमध्ये ठासायचा. त्याच्या उजव्या हाताच्या खुंटाला बांधलेल्या लोखंडी आकड्याने तो बंदुकीचा चाप खेचायचा. ही युक्ती शोधण्यासाठी तो अख्खे एक वर्ष प्रयत्न करीत होता. एके दिवशी त्याच्या झोपडीच्या दारावरच त्याला हा आकडा आढळला व बंदूक उडवण्याचा मार्ग सापडला. गवत कापण्यासाठी त्याने कोयत्याच्या दांड्याच्या जागी एक धातूची नळी बसविली होती व तिच्यात तो एका हाताचा खुंट कोंबायचा आणि दुसऱ्या खुंटाला कच्च्या चातडीच्या वादीला बांधायचा. हा उपाय शोधायला त्याला दोन वर्षे लागली. अलिकडे गेले सहा महिने तो कुऱ्हाड चालवायचा सराव करीत

होता. लांब दांडयाची कुऱ्हाड खांद्याला अडकवून व पात्याशी वादी बांधून तो वापरीत असे. आता तो सुतारकाम करू शके. स्वतःचे ओंडक्याचे लाकडी खोपटे त्याने स्वतः बांधले होते, स्वतःची उडवी त्याने उभारली होती, शिकार करणे व सापळे लावणे ही कामे तो स्वतः करीत होता, आपल्या मुलासाठी त्याने घसरजोडे बनवले होते आणि शेजारच्या मुलाच्या घरावर जसा वाऱ्याची दिशा दाखवणारा कोंबडा होता तसाच सुरेख कोंबडा त्याने आपल्या मुलासाठी कोरून आपल्या घरावर बसवला होता. रेल्वेत काम करणारा एक माणूस काही दिवस त्यांच्या कुटुंबात रहात होता. एका नववर्षाच्या सणाच्या दिवशी त्याने स्तेपानची बायको नाद्या हिच्याशी लघळपणा करण्याचा प्रयत्न केला. स्तेपानने त्याला झोडपून काढले. स्वतःच त्याला बदडून काढले. शेजारपाजारच्या लोकांनी त्या रेल्वेतल्या माणसाची कशीबशी सुटका करून त्याचा जीव वाचवला. तो माणूस पुन्हा स्तेपानच्या घरी कधीही रहायला आला नाही.

खाणीत काम करीत असताना सुरुंगाच्या स्फोटामुळे स्तेपानचे हात तुटून पडले होते. त्यावेळी तो अवघा एकोणीस वर्षांचा होता. आता त्या वस्तीत खाण नव्हती. तो भाग ओसाड आणि निर्जन बनला होता. अगदी थोडी घरे शिल्लक उरली होती – जंगलच्या राखणदाराचे घर, छोटया सरकारी शेतावरील काही कामगारांच्या झोपडया आणि माजी खाणकामगार व आताचा शिकारी स्तेपान त्वोरोगोव याचे खोपटे.

स्तेपानला यासंबंधीचे सारे प्रश्न मी आधीच विचारून झाले होते. या भागात सर्वोत्तम शिकारी म्हणून प्रसिद्ध असलेल्या या थोटया वीराबद्दल कोणत्याही परिस्थितीत लेख लिहून आणलाच पाहिजे अशी मला कडक तंबी मिळाली होती. पण त्याच्या निवेदनात कुठेतरी एक मोठी पोकळी मला जाणवत होती व त्यामुळे लेखाचा सूरच लागत नव्हता.

"तुम्ही फार उशीरा आलात," सहानुभूतीच्या सुरात त्याची बायको नाद्या मला म्हणाली होती. "वसंतामध्ये तुम्ही यायला पाहिजे होतं. त्यावेळी स्तेपाननं केसाळ कातडीच्या जनावरांची तिपटीनं शिकार केली होती. पण आम्ही आता मात्र काही विक्रम करायच्या मागं नाही. मी घरच्या कामांमध्ये गुंतलेय आणि हिवाळा येईपर्यंत स्तेपानला आपले स्वतःचे उद्योग आवरायचे आहेत."

"त्यांना बिचाऱ्यांना हुकूम झालाय," करड्या आवाजात स्तेपान म्हणाला होता. "आपण आत्ताच काही शिकारीचे विक्रम करतो किंवा नाही याची त्यांच्या साहेबाला कुठं पर्वा आहे? लेख तयार झाला पाहिजे, बास्स! आपण आपली सगळी माहिती त्यांना सांगायची एवढंच आपलं काम! त्यांच्यावरून त्यांना काही कल्पना आली तर वाह्व्वा!" त्यानंतर थोडा वेळ थांबून तोही अनुकंपेच्या सुरात म्हणाला होता, "तुमच्यावर भलतंच जोखमीचं काम येऊन पडलंय नाही? आमच्याबद्दल काय लिहिणार? आई, आपल्या कुटुंबाचे सगळे फोटो दाखव त्यांना! कदाचित त्यांना त्यात काहीतरी सापडेल."

एव्हाना मला त्वोरोगोव कुटुंबाचा सारा इतिहास ज्ञात झाला होता. त्यांच्या आईला केवढा मोठा आघात सहन करावा लागला होता आणि त्यातून सावरायला किती दीर्घ काळ धडपडावे लागले होते, याची मला कल्पना आली होती. स्तेपान हा तिचा एकुलता एक मुलगा होता. गेल्या युद्धात तिचा "दादला" बेपत्ता म्हणून जाहीर झाला होता. पण तरीही या सर्व कहाणीत काहीतरी शिल्लक राहिल्यासारखे जाणवत होते.

"माझ्या हातांशिवाय मी बंदूक कशी उडवतो ते पाहण्यासाठी शिकारीला मला बाहेर काढायचा तुमचा बेत होता काय?" स्तेपानने माझ्या विचारमालिकेत खंड पाडला.

"हो, म्हणजे तसं नाही," मी काहीसा गोंधळून उत्तरलो. "मला फक्त उरालमधील तैगात बाहेर पडून सगळ्या गोष्टींवर एक नजर टाकायची होती."

स्तेपानने कपाळाला आठ्या घातल्या. "सगळ्या गोष्टींवर नजर टाकायचीय?"

त्याने डोके खाली घातले आणि आपल्या ओठांनी कॉलरवर दोऱ्याने बांधलेली रानकोंबड्याला साद घालायची पिपाणी खेचली. त्याने तिचा आवाज काढताच ताबडतोब एका रानकोंबड्याने आव्हानात्मक आरोळी ठोकली व हवेत उडून तो फडफडला. स्तेपानचे डोळे चमकले आणि त्याने मला डोळा घातला. "तो आत्ता एका मिनिटात इथं येईल! त्यांचे कळपच्या कळप इथं आहेत."

स्तेपानने त्या रानकोंबड्याच्या आवाजाची पुन्हा एकवार नक्कल

केली आणि तो पक्षी देवदाराच्या झाडावरून उडत येऊन अगदी आमच्या जवळच्याच वाळुंजीच्या लवलवत्या फांदीवर येऊन बसला. त्या फांदीवर बसून डोलत तो सभोवार रागारागाने बघत होता. जणू त्याला म्हणायचे होते, "कुणाला माझ्याशी झुंज करायची आहे?"

स्तेपानने त्याला अचूक टिपला, अत्यंत शांतपणे आपल्या बंदूकीची नळी फुंकून साफ केली, पुन्हा बंदूक भरली, मारलेला पक्षी उचलला आणि काहीही न बोलता तो मुकाटपणे पुढे चालू लागला.

डोंगराच्या माथ्यावर आम्ही जेव्हा पोचलो तेव्हा तो थांबला आणि शांतपणे म्हणाला: "इथं एक नजर टाका. जर हेच तुम्हाला बघायचं असेल तर!"

मी पाहिले. जेथपर्यंत माझी दृष्टी पोचत होती तेथपर्यंत डोंगर आणि जंगले पसरलेली दिसत होती; डोंगर अर्धवट निजले होते, शरद ऋतूच्या आराधनेत जंगले गप्प झाली होती. वाटा, रस्ते आणि विजेच्या तारा यांनी विंधलेल्या तैगाच्या मुद्रेवर नजीक येऊन ठेपलेल्या ऱ्हासाच्या खुणा स्पष्ट उमटल्या होत्या. निर्झर-नाले इतस्ततः पसरले होते, डोंगरांभोवती आणि दूरवरच्या जंगलांभोवती त्यांनी आपले पिवळे पाश आवळले होते आणि जणू त्या खिंडींमधून, दऱ्यांमधून आणि घळींमधून पृथ्वीच्या तटतटलेल्या शिरा उमटून दिसाव्यात तसे त्यांचे ओहोळ भासत होते. एकूण दृश्य भव्य, उदात्त, शांत भासत होते. आगामी महानिद्रेची जंगलांना चाहूल लागली होती. गळणारी पाने सळसळ करीत त्यांना अंगाई गाऊन झोपवू लागली होती; येऊ घातलेल्या शरदातल्या पावसाच्या, हिवाळ्यातल्या हिमवर्षावाच्या आणि प्रदीर्घ प्रतीक्षा कराव्या लागणाऱ्या वसंताच्या कानगोष्टी सांगत होती. या पृथ्वीतलावरच्या साऱ्या सजीव गोष्टी, त्यात जंगले अपवाद नाहीत, वसंताच्या आणि आनंदाच्या चिरंतन अपेक्षेत सदैव जगत असतात. शरदाच्या करुण संगीताने मंत्रमुग्ध झालेली जंगले आपली वस्त्रे टाकून देत होती, चकाकत्या निर्झरांवर पाने पसरून आपले आरसे झाकून टाकत होती; जणू आपल्या अनावृत नग्नतेची प्रतिबिंबे पाहण्याचे ती टाळत होती.

पानांचा कोट पांघरून पृथ्वीने हिवाळ्याची तयारी केली होती. तिचे

सारे आवाज मुके बनले होते. फक्त पानांची सळसळ ऐकू येत होती आणि दाट दंवबिंदू, हिमकण व अद्याप सतत पडत नसलेले, परंतु वारंवार कोसळणारे पावसाचे थेंब, यांच्यामुळे भरलेल्या निर्झरांची बारीक गुणगुण ऐकू येत होती.

पण आम्ही ज्या डोंगरावर उभे होतो तो मात्र इतर जंगलापेक्षा वेगळे जीवन जगत होता असे वाटत होते. सुमारे दहा वर्षांपूर्वीच त्याच्यावरची झाडे पाडण्यात आली होती आणि त्याच्या उतारांवर कुजलेल्या खुंटाच्या खुणा शिल्लक उरल्या होत्या. त्या खुंटांच्या वरच्या अंगाला बुरशी चढली होती व बाजूच्या अंगांना उन्मळलेली भुईछत्रे विखुरली होती. या खुंटांभोवती लिंबाची, अॅशची आणि भोजाची जवान झाडे दाटपणे बहरत होती. त्यांच्यावर एव्हाना रासबेरीच्या आणि वाळुंजीच्या फांद्यांचे जाळे पसरले होते. त्या फांद्या वाळक्या गवताच्या पट्ट्यांमध्ये घुसल्या होत्या, आनंदाने त्यांनी एकमेकींना मिठ्या घातल्या होत्या व आपली पिवळी, जांभळी, नारिंगी पाने विखुरली होती. सडपातळ अॅशच्या रोपांना फळांचा पहिला बहर आला होता आणि आपल्या तीनचार मुठी पहिल्या फळांना ती मोठ्या तोऱ्याने मिरवीत डोलत होती. पण मी हे दृश्य पहात असतानाच, सारिकांचा एक थवा भिरभिरत त्या अॅशच्या रोपांवर उतरला. अॅशची ती तांबडी लाल फळे चोची मारून खाताना त्या सारिकांनी एकच कलकलाट चालवला होता. थोड्याच वेळात त्या अॅशच्या झाडांवर एकही फळ शिल्लक उरले नाही. ती झाडे भेदरल्यासारखी उभी होती. आणि मग दुसरे छोटे छोटे पक्षी त्यांच्यावर येऊन बसले व त्यांची मधुर चिवचिव सुरू झाली. जणू ते म्हणत होते, "अरे अॅशच्या रोपट्यांनो, पक्ष्यांना फळं चारण्यासाठीच तुमचा जन्म झालाय. अशी खंत काय करताय वेड्यांनो!"

"मग, अखेर तुम्ही काय ठरवलंत?" स्तेपानने मला अनपेक्षितपणे विचारले.

मी खांदे उडवले आणि भराऱ्या घेणाऱ्या सारिकांच्या थव्याला पाहू लागलो.

"काही ठरवलं नाही," मी कबुली दिली. "तुमच्याबद्दल लिहिणं फार अवघड आहे, काही निर्माण करू शकेन असं वाटत नाही."

"अर्थातच तुम्हाला जमणार नाही," मला दुजोरा देत स्तेपान म्हणाला. माझ्याप्रमाणे तोसुद्धा पक्षी पहात होता. "काय लिहिणार तुम्ही माझ्याबद्दल? तर मी अपंग असलो तरी भीक न मागता स्वतःची भाकरी कष्ट करून मिळवतो? हा मानानं जगण्याचा वारसा मला आई-पासून मिळालाय. इतरांच्या जीवावर जगणारी आम्ही माणसं नव्हेत. आमची भाकरी आम्ही नेहमी काम करून मिळवलीय." तो थोडा वेळ बोलायचा थांबला, माझ्याकडे वळला, मला त्याने जवळून निरखून पाहिले आणि काहीतरी जणू निष्कर्षाला पोचल्याप्रमाणे त्याने मला हळु-वार आवाजात विचारले, "मी तुमच्यावर थोडी टीका केली तर रागा-वणार नाही? टीका ही आपल्याला मार्गदर्शन करते असं ते म्हणतात, होय ना?"

"मी कशाला रागवू? मला तुमचा मित्र माना."

"तर मग ठीक आहे. आज चौथा दिवस तुम्ही आमच्याबरोबर राह्यल्याला. शांतपणानं सगळी माहिती गोळा करताय. आणि सारा वेळ माझ्या भोवताली घोटाळताय. पण मी कोण आहे?" त्याने स्वतःकडे, आपल्या बुटांकडे, आपल्या काडतूसांच्या पट्ट्याकडे, आपल्या बंदुकीकडे पाहिले. फक्त त्याने आपल्या हातांच्या खुंटांकडे मात्र पाहिले नाही. "तुम्ही नाद्याकडं लक्ष द्यायला पाहिजे होतं. तिच्या हातांकडं! तेच सर्वांत महत्त्वाचे आहेत. इतर कुणाहीप्रमाणं तिला फक्त दोनच हात आहेत. पण केवढे लाख मोलाचे हात! नुसतं बोलून काय उपयोग? तेच सर्वांत महत्त्वाचे असं मी बोललोय." मला विश्वासात घेतल्याप्रमाणे तो माझ्याजवळ सरकला. "त्यांच्याबद्दल तुम्ही कसं लिहिणार? कसं? पण जर महत्त्वाच्या गोष्टीबद्दल लिहिलं नाहीत तर नुसते कागद खराब करण्यात काही अर्थ नाही. खरं आहे की नाही? मी माझ्यापुरतं एवढंच म्हणू शकेन की माझं तिच्यावर प्रेम आहे. काहीवेळा वाटतं की, मी चिक्कार दारू पिईन आणि तिला हे सांगीन. पण अजूनपर्यंत कधी हे शब्द तोंडातून बाहेर काढायला जमलंच नाही. पण आता जर त्याबद्दल तुम्ही लिहू शकलात, माझ्या मनात मी तिच्याबद्दल ज्या साऱ्या सुंदर गोष्टी बोलतो त्यांच्याबद्दल लिहू शकलात तर किती बहार होईल! अशा गोष्टी लोक गाण्यांमधून गातात! हे जर तुम्हाला जमलं नाही

नर तुमच्या पदरी काही पडेलसं मला वाटत नाही." काही वेळ तो आपल्याच विचारांमध्ये गढला. त्याचा चेहरा एकदम साधा भाबडा आणि दयाळू बनला. "खरंच, आपल्या काळजात असलेलं सारं काही बोलून टाकायचं म्हणजे जरा अवघडच आहे. योग्य शब्दच सापडत नाहीत. सारे शब्द कसे दुबळे आणि फिकट वाटायला लागतात. आग लागो त्यांना! काही वेळा शब्दांवाचूनही एखादी गोष्ट स्पष्ट होते. होय की नाही?" पुन्हा एकदा त्याने माझ्याकडे पाहिले. जणू तो मला जोखत होता. "चला माझ्याबरोबर. मी तुम्हाला काहीतरी दाखवतो. काही खास कारणासाठी नव्हे, सहज एक मित्र म्हणून..."

वस्तीमधून वीजेच्या तारा गेल्या होत्या. लांबटांग्या मनोऱ्यांनी इमारती लाकडाच्या झाडांना आणि झुडुपांना बाजूला सारले होते. त्या मनोऱ्यांखालच्या जमिनीत चर खणले होते व त्यांच्या मध्ये गवताच्या प्रचंड गंजी रचलेल्या होत्या. त्या गंजीच्या कलत्या पाठींवर गळून पडलेल्या पानांचा थर साचला होता. ती पाने आगीतल्या अखेरच्या विझत जाणाऱ्या फुफाटयासारखी दिसत होती. त्या जळक्या काळसर रंगामुळे, गोवतालच्या हिरव्या दुसऱ्या फुटव्यात गंजी अधिकच काळपट, गंभीर व एकाकी भासत.

वीजेच्या तारांमुळे जेथील झाडी मोठ्या प्रमाणात कापली होती त्या एके ठिकाणी कुजलेल्या वनस्पतींच्या टेकाडांमधून व कुजक्या लता-वेलींमधून एक छोटा झरा हळूच आडवा वहात जात होता. तो झरा अगदी भित्रा, गुपचूप वाहणारा होता, पण त्याचे पाणी मात्र ताजे होते. त्याच्या पाण्यामुळे सर्व प्रकारची झुडुपे त्याच्याकडे आकर्षित झाली होती. एक लबाड चेरीचे झुडूप जंगलच्या अंधारातून बाहेर पडून त्या झाडकापणीच्या भागात हळूच घुसले होते. झाडांची कापणी करणाऱ्या इन्स्पेक्टरने काही कारणाने त्या झाडाकडे दुर्लक्ष करून त्याची तोडणी केली नव्हती. कदाचित त्या वर्षी त्या झाडाला चांगला बहर आला तर भरपूर चेरी फळे खाण्याच्या हेतूने त्याने ते झाड तोडले नसावे, किंवा दुसरेही काही कारण असू शकेल.

तैगामधून एक भित्रे पाऊल बाहेर टाकणाऱ्या चेरीच्या झुडुपाजवळ

स्तेपान थांबला आणि त्याने त्या झुडुपाला नखशिखांत न्याहाळले. पण त्याने मला जसे न्याहाळले होते त्यापेक्षा यावेळी त्याची नजर वेगळी होती. आपल्या नजरेच्या प्रेमळ उबेने जणू तो त्या झुडुपाला कुरवाळत होता. एखाद्या झुडुपाकडे पाहून स्मित करताना, त्यातल्या त्यात एका सामान्य चेरी झुडुपाकडे पाहून स्मित करताना आजवर मी कुणाला पाहिले नव्हते. म्हणून मीही कुतूहलाने त्याच्यावर नजर टाकली. पण त्या झुडुपात खास असे काहीच नव्हते. काही लोक ज्या झाडाबद्दल गाणी गातात किंवा कविता लिहितात आणि काहीवेळा त्याच्या फांद्या एवढ्या ओरबाडतात की ते झाड मरूनच जाते, असे एक सामान्य चेरीचे ते झाड होते.

रसाने टपोऱ्या भरलेल्या तपकिरी रंगाच्या देठाची ती फळे पानांमधून पक्ष्यांच्या डोळ्यांप्रमाणे डोकावत होती. पानांवर एव्हाना गंजाचे डाग पडले होते आणि सूर्याच्या बाजूचा पानांचा भाग भाजून गेला होता. झुडुपाखालच्या गवताच्या खुंटांनी उन्हाळ्याचा निरोप घेतला होता व पानांबरोबर तेही कुजत होते. त्या कुजण्याचा भुईछत्र्यांप्रमाणे वास दरवळला होता.

"तोडणार काही फळं," अद्याप त्या झुडुपावरची नजर न हलविता स्तेपानने विचारले.

मी हे काम मोठ्या आनंदाने पत्करले, फळांनी लगडलेल्या काही फांद्या मी तोडल्या व स्तेपानच्या मांडीवर टाकल्या. त्याने त्या तोंडाशी उचलल्या, आपल्या ओठांनी ती रसरसलेली फळे तोडली व समाधानाच्या सुरात पुटपुटला :

"काय गोड आहेत! अॅश आणि चेरी म्हणजे उरालमधली द्राक्षंच!" पण पुढच्याच क्षणी त्याने चेहरा वेडावाकडा करीत फांदी दूर फेकून दिली. "शी: घाण, थू:!"

अर्धवट सुकलेल्या एका फांदीवर कोळ्याच्या जाळ्याच्या धाग्यांचा एक छोटा करडा गोळा लटकत होता व त्या कोषात अनेक हिरव्या अळ्या वळवळ करीत होत्या. या कोषांमध्ये स्वतःला गुरफटून घेऊन त्या झाडांची पाने, कोवळे अंकुर फस्त करीत होत्या. आणखी थोड्या मोठ्या झाल्यावर याच अळ्या नवी किळसवाणी हिरवी सेना प्रसवतील

व ती नवी पिढी झाडाला संपूर्ण मारून टाकत नसली तरी त्याची वाढ खुंटवील आणि फलधारणेला प्रतिबंध करील.

स्तेपानने पुन्हा चेरीला हात लावला नाही. तो आकाशाकडे पहात होता. आकाश अद्याप निळे असले तरी लौकरच पावसाची आणि हिम-वर्षावाची शक्यता होती. स्तेपान कसलातरी विचार करण्यात गढून गेला होता. एकदम मध्येच तंद्रीतून जागे होत तो मला म्हणाला :

"तुम्ही एवढे गप्प का?"

"फळं खातोय."

"खरंच! त्या झुडुपावरची फळं फार मधुर आहेत. माझ्या काही आठवणी त्यांच्याशी गुंतल्या आहेत."

एका ऑगस्ट महिन्याच्या अखेरीच्या सूर्यप्रकाशित दिवशी, सरत्या उन्हाळ्याच्या काळात, तो आणि नाद्या इस्पितळामधून घरी जाताना या वाटेने कसे गेले, त्याची कहाणी सांगायला त्याने आरंभ केला.

त्यांच्या लग्नापूर्वीची ही हकीकत होती. वस्तुतः त्यांची त्यावेळी नुकतीच भेट झाली होती. चांगले काम केल्यानंतर भरपूर झोप घ्याय-ला, चविष्ट खायला आणि मनसोक्त मनोरंजन अनुभवायला कामगा-रांना 'एक-दिवसा'च्या विश्रामधामात पाठवीत. अशा 'एक-दिवसा'च्या विश्रामधामात त्या दोघांची गाठ पडली. नाद्या ऑफिसात साफसफाई करण्याचे काम करीत होती. कोळशाच्या भुकटीने आणि खाणकामगारां-च्या बुटांनी घाण होणारी कळकट भिंतीची खाण-कचेरी धुवूनपुसून साफ करण्याचे काम तिच्याकडे होते. आणि त्यापूर्वी सहा वर्षे ती एका कुटुं-बात लहान मुलांची देखभाल करण्याचे काम करीत होती.

त्यानंतर तीन चार वेळा ती दोघे क्लबात सिनेमा पहायला एकत्र गेली. तीन चार वेळा स्तेपानने नाद्याला घरापर्यंत सोडले. 'ट्रिनिटी रविवारी,' रशियन परंपरेनुसार, बरोबर समोवार घेऊन उन्हाळा सा-जरा करायला ती कुरणांमध्ये गेली. उरालमधील इतर वस्त्यांप्रमाणे, याही वस्तीमध्ये लोक सर्व नवे-जुने सण साजरे करीत आणि भरपूर पीत. त्या कुरणांमध्ये प्रथमच स्तेपानने नाद्याचे पहिले चुंबन घेतले

आणि त्याच्या दुसऱ्याच दिवशी त्याचे दोन्ही हात मनगटांजवळ तुटून पडले.

त्या वज्रघाताने स्तेपानला अंधेरी आली. सारे चेहरे व सर्व गोष्टी एकदम त्याच्या नजरेआड झाल्या. ती खाण, एकूण भोवतालचे जग आणि नाद्या त्याच्या नजरेसमोरून नाहीशी झाली. फक्त आईची आठवण राहिली. स्फोटानंतर प्रथम तो जेव्हा शुद्धीवर आला तेव्हा पहिल्यांदा आईचा विचार त्याच्या डोक्यात आला. तिला किती दुःख होईल या कल्पनेने त्याला छळले. सुरुवातीला त्याला वेदना जाणवली नाही किंवा भीतीही वाटली नाही. पण इस्पितळात जेव्हा त्याला लघवी करण्याची भावना झाली तेव्हा भीतीने ग्रासले. झोपेतच आपल्याला लघवी होईल आणि सर्वांसमोर आपली शोभा होईल या भीतीने दोन दिवस त्याने तळमळून काढले. वॉर्डातल्या इतर लोकांनी त्याला मदत करण्याची तयारी दाखविली. पण त्याने नकार दिला. शरमेने भाजून निघत असताना एकच विचार सतत त्याला छळत होता, "सारं आयुष्यभर माझी ही अशीच अवस्था राहणार का?"

रात्रीच्या वेळी स्तेपान बिछान्यातून उठला आणि खिडकीशी सरपटत गेला. पण वॉर्ड तळमजल्यावरच होता. माशांचा उपद्रव होऊ नये म्हणून खिडकीवर मलमलीचे कापड बसवलेले होते. त्या जाळीवर तोंड दाबून तो कण्हला. आणि एकाएकी त्याला एक आवाज ऐकू आला.

"स्तेपान, स्वतःला त्रास करून घेऊ नको. मी इथं तुझ्याजवळ आहे. घरी सारं काही ठीक आहे. तुझ्या आईला मी इथं तुला भेटायला येऊ देत नाही. तिच्या काळजाची अवस्था तेवढी ठीक नाही."

तो जाळीवर झेपावला, ती तोडून अंधारात आपल्या जळत्या थोट्या हातांनी त्याने नाद्याला चाचपून धरले, तिला आपल्याजवळ ओढले व तो रडला. त्या अंधारात तिला फारसे दिसत नव्हते. पण तरीही ती त्याला जास्तीत जास्त जवळ बिलगायचा प्रयत्न करीत होती, आपल्या दातांनी जाळी तोडून त्याच्या चेहऱ्याला आपल्या ओठांनी स्पर्श करायचा प्रयत्न करीत होती. आपल्या शेजारी एक सजीव व्यक्ती आहे अशी त्याला सांत्वनपर जाणीव व्हावी म्हणून ती धडपडत होती.

"कुठलेही वाईट विचार मनात आणू नको," ती सतत अस्पष्ट

आवाजात त्याला म्हणत होती. "सारं काही ठीक होईल. वाईटाचा अजिबात विचार करू नको..."

पण तिच्या या अशा बोलण्याने त्याला रडण्याचे अधिकाधिक उमाळे फुटत होते.

"माझ्या हातांना आगीवर ठेवल्यासारखे ते भाजताहेत!" तो विव्हळला.

लहान मुलाच्या जखमेवर आईने हळुवार फुंकर घालावी त्याप्रमाणे त्याच्या मलमपट्टी केलेल्या हातावर नाद्याने फुंकरी घातल्या.

"झोपेच्या औषधाच्या पुड्या माग. त्यांचं काहीतरी विचित्र नांव आहे, मला ते आठवत नाही. तू झोपेत असताना तुझ्या जखमा लौकर बऱ्या होतील. मागायला शरमू नको. आणि कुठलेही वाईट विचार मनात आणू नको." आणि हा सारा वेळ ती त्याच्या हातांच्या खुंटांवर फुंकरा मारीत राहिली.

नाद्याच्या सांत्वनपर शब्दांमुळे म्हणा किंवा तो स्वत: मनसोक्त रडल्यामुळे म्हणा, त्याला एकदम खूप हलके हलके वाटले आाण तिथेच रंगविलेल्या खिडकीच्या चौकटीच्या खालच्या बाजूवर आपले गाल टेकून तो झोपी गेला.

सकाळच्या वेळी त्याला मदत करायला उत्सुक दिसणाऱ्या एका कनवाळू माणसाला त्यानेच स्वत: साह्य करण्याची विनंती केली.

रोज रात्री नाद्या त्याच्या खिडकीशी यायची. दिवसा तिला आपल्या कामापासून सुटी घेणे शक्य नव्हते.

"तू अशी सारखी सारखी येऊ नको," तो तिला म्हणायचा. "अठरा फर्लांगाचा पल्ला यायचा आणि तेवढाच परत जायचा, म्हणजे काही सोपं नाही."

"त्याची चिंता तू करू नको, स्तेपान. रात्र रात्र झोपेविना रहायची मला सवय आहे. माझं सगळं आयुष्य दुसऱ्या लोकांची मुलं सांभाळण्यातच गेलंय."

ज्या दिवशी त्याची इस्पितळातून सुटका व्हायची होती त्या दिवशी त्याला न्यायला ती स्वत: आली. वॉर्डात दिवसाउजेडी तिने प्रथमच पाऊल ठेवले व त्याच्या वस्तूंचे बोचके ती बांधू लागली. तो हताशपणे

बिछान्यावर बसून होता, आपल्या हातांचे खुंट नजरेआड लपवीत होता आणि तिच्याकडे टक लावून पहात गप्प बसून होता. वॉर्डातली इतर सर्व पुरुषमाणसेही तिच्याकडे पहात होती. त्यांच्या नजरांनी तिला लाजल्यासारखें झाले व ती घाई करू लागली. साऱ्या वस्तू बोचक्यात बांधून घेतल्यानंतर तिने एकवार सस्मित मुद्रेने वॉर्डातल्या लोकांकडे पाहिले व हळूच वाकून लाजरे अभिवादन केले.

"लौकर बरे व्हा. येतो आता आम्ही." असे म्हणून पुन्हा एकदा वाकून तिने अभिवादन केले. तेथील रुग्णांनी एकसुरात त्यांना निरोप दिला व स्तेपानला उद्देशून ते धीराचे चार शब्द बोलले. त्यावर स्तेपान अधिकच गंभीर बनला आणि वॉर्डाबाहेर त्वरेने गेला.

अर्ध्या वाटेपर्यंत ते दोघे गप्पच चालले होते. फक्त एकदाच नाद्याने त्याच्याकडे तिरपा कटाक्ष टाकून त्याला तहान लागली आहे का असे लाजत लाजत विचारले.

त्याने दुर्मुखलेपणे उत्तर दिले: "नाही."

त्या उदास, नीरव आकाशामधून अगदी डासाएवढे बारीक दिसणारे एक जेट विमान अजिबात आवाज न करता, आपल्या शेपटामधून बारीक धुराचा पट्टा उमटवीत चालले होते. त्यांच्या डोक्यावर त्या विमानाने आठाच्या आकाराचा धुराचा पट्टा उमटवला आणि ठिणगी उडावी त्याप्रमाणे सूर्याच्या दिशेने झेप घेऊन ते अदृश्य झाले.

"ते कसं जातं नाही!" नाद्या विमानाकडे पहात उद्‌गारली. "त्या वैमानिकांच्या कानांचे पडदे फाटून जात असतील, होय की नाही?"

स्तेपानने नुसते खांदे उडवले. कानाचे पडदे त्याच्या दृष्टीने त्यावेळी महत्त्वाचे नव्हते. उन्हाळा संपत आला होता आणि अद्याप बटाटे खणून काढायचे होते, सर्पणाचा साठा करून ठेवायचा होता, कुरणामधून गवत कापून घरी आणून ठेवायला पाहिजे होते. पण हे सारे कसे करायचे? कशाच्या साह्याने करायचे?

अगदी नको त्या क्षणाला त्याला नेमकी लढाऊ वैमानिक कोस्त्याची आठवण झाली. स्तेपान त्याला नेहमी शहरात पहायचा. आपल्या ढकलगाडीत एका चामडी खोगीरावर फूटपाथच्या मध्यभागी कोस्त्या बसून रहायचा. तो पांगळा असला तरी झकपक कपडे करून, रुबाबदार कल्ले

राखून रहायचा. आणि आपली तोंडपाठ झालेली कर्मकहाणी लोकांना ऐकवून भीक न मागता हक्काने त्यांच्याकडून दान मागून घ्यायचा. "एका 'लावोचकिन' विरुद्ध तीन 'मेस्सर' विमानं, आणि त्या भडव्यांनी मला खाली पाडलं! तुमच्यात काही सदसद्विवेकबुद्धी उरली असली तर या गरीब बापड्या माणसाचं दु:ख हलकं करायला एक रूबल द्या..."

आणि लोकांमध्ये अजून खूपच सदसद्विवेकबुद्धी शिल्लक होती. ते आपल्याजवळची शेवटची कोपेकची नाणीसुद्धा काढून द्यायचे. पांगळ्या-थोटच्या अवस्थेत त्यांच्या दयाबुद्धीला आवाहन करणे ही तर जगातली सर्वांत सोपी गोष्ट होती. पण मग नंतर काय? लढाऊ वैमानिक को-स्त्याप्रमाणे दारूच्या गुत्त्यामधून झिंगत धडपडत बाहेर पडायचे, एक भावनाप्रधान गाणे बरळायचे आणि नंतर फूटपाथच्या कडेला झोपायचे?

"जळो ते जिणे! कशाला मरायला मला त्याची आठवण झाली? दुसऱ्या गोष्टी नाहीत विचार करायला?" स्तेपानने स्वत:चे विचारचक्र दुसरीकडे वळवायचा प्रयत्न केला. पण त्याचे मन प्रफुल्लित होईना.

तासा दोन तासांमध्ये तो आपल्या वस्तीत पोहोचेल आणि वस्तीत उरलेली सर्व माणसे त्याला भेटायला येतील. बायका त्याची अवस्था पाहून मुसमुसत राहतील आणि "त्याला शिणवू नये" म्हणून आपले अश्रू आवरून त्याची आई त्याच्या डोक्यावरून मायेने हात फिरवीत राहील.

स्थानिक शेतावरचा क्षुद्र मनाचा म्हातारा मधमाशीपालक फेक्लिन मधाचे एक भांडे भरून घेऊन भेटीला येईल. ते भांडे तो गुपचुपपणे व सूचक खुणा करीत स्वैपाकघरात आईच्या हाती देईल. मग बायकां-प्रमाणे एक दीर्घ उसासा टाकीत तो म्हणेल, "देवा रे देवा, दैव किती चंचल असतं! उद्या ते तुमच्या वाट्याला काय आणील सांगता येत नाही!" मग तो मोठ्या खुबीदारपणे गप्प राहून कशाची तरी वाट पहात राहील.

आई लगबगीने टेबलावर खाद्यपदार्थांची मांडामांड करील व कपा-टामधून वोदकाची बाटली काढील. शिष्टाचार म्हणून फेक्लिन नकारार्थी मान हलवील आणि मग "फक्त एकच प्याला" म्हणत टेबलाशी सबंध संध्याकाळ बैठक मारून बसेल. पहिला प्याला पिताना तो त्याखाली

हाताचा तळवा झाकून पिईल, मग दुसरा, नंतर तिसरा आणि त्यानंतर हात झाकून पिण्याची तसदी घेणार नाही. "आयुष्य कसं जगलं पाहिजे," या विषयावर नंतर बडबड सुरू करील. आपले स्वतःचे उदाहरण आदर्श म्हणून दाखवील आणि आपल्या धूर्तपणाचे, चातुर्याचे व काटकसरी स्वभावाचे सर्वांनी कौतुक करावे अशी अपेक्षा करील.

आणि फेक्लिन हा भला माणूस नाही, दुसऱ्यांच्या खर्चाने त्याला दारू प्यायला आवडते, तो इतरांच्या कुचाळक्या करण्यात धन्यता मानतो, तो कमालीचा चिक्कू आहे हे माहीत असूनही प्रत्येकजण त्याचे बोलणे निमूटपणे ऐकून घेत राहील. कुणी आगीत भाजलेला असो, कुणी आजारी असो किंवा कुणी उपवर तरुण लग्नाच्या तयारीत असो — फेक्लिन आपले मधाचे भांडे घेऊन यायचा. त्या मधाच्या भांड्यासारखाच त्याचा स्वभाव चिकट होता.

या गोष्टींच्या नुसत्या विचाराने स्तेपानला मळमळू लागले. "कदाचित नाद्या फेक्लिनला वाटेला लावू शकेल?" त्याने तिरप्या नजरेने नाद्याकडे एक कटाक्ष टाकला. तिच्या नाकाच्या सांध्याशी तिच्या भुवया जवळ जवळ जुळलेल्या होत्या. तिच्या गालांची हाडे रुंद होती आणि त्यावरची कातडी ताणलेली होती, पण तिचे ओठ जाड आणि हसरे होते. स्तेपान बाजूला वळला आणि त्याने बाहेर फुटणारा निश्वास दाबून टाकला. साऱ्या जंगलाला ऐकू जाणारे निश्वास टाकीत बसणे खऱ्या मर्दाला शोभण्यासारखे नव्हते. शिवाय नाद्याकडूनच प्रथम गोष्टींना तोंड फुटणे योग्य ठरले असते असे त्याला वाटले. आता ती दोघे काय करणार होती? पुढे काय करायचे? अर्थातच त्याचे दुःख त्याने एकट्यानेच सोसणे सर्वथा योग्य होते. त्याचे ओझे तिने कशासाठी वाहायचे?

कुजलेल्या वनस्पतींचा ओला पालापाचोळा त्यांच्या पावलांखाली रप् रप् आवाज करीत दबत होता. ती दोघे झऱ्यापाशी पोचली होती.

"अय्या, किती सुंदर चेरीचं झाड आहे!" नाद्या उद्गारली आणि झाडापाशी धावत गेली. तिने उडी मारून एक फांदी पकडली व जमिनीपर्यंत खाली खेचत म्हणाली: "पकड!"

स्तेपानने जळजळत्या नजरेने नाद्याकडे रोखून पाहिले. तो कशाने फांदी धरणार होता? पण दुसऱ्याच क्षणी त्याने आपल्या गुडघ्यांखाली

ती फांदी दाबून धरली आणि नाद्याच्या जवळ तो झुकला. झपझप फळे तोडणारे तिचे हात तो पाहू लागला. तिच्या डोक्यावरचा सुती रुमाल एका बाजूला सरकला होता आणि तिची कानाची पाळी उघडी पडली होती. कानात डूल घालण्याच्या हौसेने नुकतेच तिने कान टोचून घेतले होते, पण डूल विकत घ्यायची तिची ऐपत नसल्याने ती भोके पुन्हा बुजत चालली होती. साफसफाईचे काम करणाऱ्यांना जेमतेम पोटापुरते पैसे मिळत आणि दाईचे काम करणाऱ्यांना तर पगाराऐवजी फाटके जुनेपुराणे कपडे आणि झिजलेली पादत्राणे मिळत.

आपल्या ओच्यात तिने फळे भरून घेतली, गवतावर तिने फतकल मारले आणि त्याला आज्ञा केली: "आता फांदी सोडून दिलीस तरी चालेल. आपण आता फळं खाऊ या."

स्तेपानने फांदी सोडताच ती एक झोका घेऊन वर गेली. तिच्यावरची सारी फळे तोडली गेली होती व ती विस्कटली होती. त्यांच्या डोक्यावर ती थोडीशी डोलली आणि मग एकदम स्तब्ध झाली.

"हे घे!" नाद्या म्हणाली आणि तिने फळांचा झुबका स्तेपानच्या ओठांशी धरला.

ती थंडगार फळे त्याच्या ओठांना झोंबली. तो मागे सरला.

"मला नकोत."

"जशी तुझी मर्जी. मी खाईन. मला ही चेरीची फळं खूप आवडतात आणि पोट भरून खाईपर्यंत मी इथून तसूभर हलणार नाही.

"ते तुझं तू ठरव."

त्याच्याशी बोलण्याचा अधिक प्रयत्न न करता ती मटामटा फळे खाऊ लागली. तिला अधिक फळे खाववेनात असा एक क्षण आला. ती शांतता तिला अवघडून टाकत होती. सावधचित्ताने ती कशाची तरी वाट पहात होती हे स्पष्ट दिसत होते.

वाळक्या लव्हाळ्यांमध्ये स्वतःहून अडकलेल्या आणि त्यातून सुटण्याची जिवाच्या आकांताने धडपड करणाऱ्या चतुराकडे स्तेपान एकटक पहात होता. त्याने त्याच्या मदतीला जावे का त्याला बुटांखाली चिरडावे? त्या दमलेल्या कीटकापासून स्तेपानने आपली दृष्टी दुसरीकडे वळवली. त्याच्या पुढे त्या वीजेच्या तारांच्या मनोऱ्यांपलिकडे जंगलाची भिंत उभी

होती. त्याच्या कडेची खुरटी झाडे कापून टाकण्यात आली होती. बंदी-रेषेच्या पलिकडे, कुजलेल्या वनस्पतींच्या लहानमोठ्या ढीगांमधून एक छोटा निर्झर गुपचूप या जंगलाकडे वहात होता. हिमाच्या पहिल्या स्पर्शाने कोमेजलेली फुले देठांवर मान टाकून दु:खदपणे त्याच्यावर झुकली होती. डोळ्यांना आनंद देणारे असे सभोवती काहीही नव्हते. सारा निसर्ग उन्हाळा आणि शरदऋतू यांच्या संधीरेषेवर उभा होता.

"नाद्या, आपण आता काय करायचं?" त्या दडपणाऱ्या शांततेचा स्तेपानने भंग केला. त्याच्या बोलण्याची वाट पहात गप्प बसून राहण्याच्या प्रयत्नात ती दमली असावी, कारण त्याच्या आवाजासरशी ती एकदम दचकली. पण तिने उत्तर मात्र शांतपणे दिले :

"जे इतर सारे करतात तेच करायचं."

त्याच्या कपाळावरच्या आठ्या अधिक ठळक बनल्या.

"याचा अर्थ काय?"

"अर्थ साधा आहे."

"कमाल आहे!"

नाद्याने त्याच्याकडे तिरपा कटाक्ष टाकला. तिच्या एकमेकात मिसळणाऱ्या भुवया रागाने थरथरत होत्या.

"व्वारे स्तेपान, काय पण मर्द गडी तू! सारा वेळ एवढा जपून सांभाळून कशाला वागतोस? मी तुला तिऱ्हाईत वाटते ना! पण मला मात्र तुझ्याबद्दल तशी तिऱ्हाईताची भावना नाही."

"नाद्या, मला हात नाहीत."

"म्हणून काय झालं?" ती ताडकन म्हणाली. "हे काय आहेत? दांताळी?" आणि तिने आपले हात त्याच्यासमोर धरले. कष्ट करून तिचे हात खरबरीत बनले होते, तक्तपोशीच्या फळ्या पुसून काढताना त्या हातांवर चरे उमटले होते, नखे तुटून ओबडधोबड बनली होती. "खूप सहन केलं तुझ्यासाठी!" ती संतापाने उद्गारली व ओच्यातली फळे झटकून टाकीत उठून उभी राहिली. "चल! उगीच कशाला आपली डोकी फिरवून घ्यायची!"

तो जागचा हलला नाही. पायाशी पडलेल्या चेरीच्या फळांच्या झुबक्यांकडे पहात तो दबत्या आवाजात म्हणाला :

"मला माफ कर."

"कशासाठी मी तुला माफी करायची? असा कसा रे तू वेडा?" आणि तिने त्याच्या लहान मुलासारख्या मऊ केसांना विस्कटत त्याच्या डोक्यावरून ममतेने हात फिरवला. आपल्या थोटद्या हातांनी त्याने तिला धरले आणि एकेकाळी आपल्या आईच्या ओच्यात त्याने तोंड खुपसले होते तसे नाद्याच्या ओटीपोटात त्याने आपले तोंड खुपसले.

"पण आपण जगायचं कसं?"

नाद्याने त्याला घट्ट धरले, त्याच्या कपाळाचे, त्याच्या गालाचे, त्याच्या ओठांचे तिने चुंबन घेतले. तिच्या चुंबनाला त्याच्या ओठांनी तत्परतेने आणि उत्कटपणे प्रतिसाद दिला.

"माझ्या लाडक्या स्तेपान!"

"नाद्या! मला खूप शरम वाटेल!"

"कुणावर तरी प्रेम करत असताना शरम वाटायचं काही एक कारण नाही," त्याला बिलगत अस्फुटपणे ती म्हणाली. "मुळीच कारण नाही..."

"आहे! आहे!" तो ढसढसा रडत, दात करकरा चावीत म्हणाला.

एखादी स्त्री पुरुषाचा प्रतिकार मोडून काढते अशा काही क्वचित प्रसंगांपैकी तो एक प्रसंग होता. आणि जे काही केले होते त्याच्या जाणीवेने तिचा ऊर दाटून आला. ती चटकन मान फिरवून पडून राहिली व त्याच्या विषयीच्या अनुकंपेने दाटून येणाऱ्या अश्रूंना आवरून मुकाटपणे गवताच्या काड्या चावत राहिली. अश्रू ढाळण्याचा तिला इतःपर अधिकार राहिला नव्हता.

स्तेपानला गदगदून आले आणि पाताळामधून बोलावे तसा त्याचा आवाज उमटला:

"मला माफ कर."

ती चटकन उठून उभी राहिली, आपला घागरा तिने सोडून टाकला, आपल्याकडे पाहू नको असे ती त्याला म्हणाली व झऱ्याकडे गेली. काही वेळानंतर ती परतली. स्वच्छ, निर्मळ देहाने ती त्याच्या समोर येऊन उभी राहिली. हात दोन्ही बाजूंना सरळ सोडून ती त्याच्यासमोर उभी होती.

"तर आता आपलं लग्न लागलं!" एक क्षणभर ती गप्प राहिली चेरीच्या झाडाला तिने स्पर्श केला आणि त्याला एक नाजुक धक्का दिला. "या चेरीच्या झाडानं आपलं लग्न लावलं. आपल्या लग्नाचा एकुलता साक्षीदार. जर आपल्याला वेगळं व्हायचं असेल तर अजून आपण वेगळे होऊ शकतो. हा साक्षीदार कुणाला काही सांगणार नाही."

"नाद्या, तुला असं बोलवतं कसं?" स्तेपान उखडून म्हणाला. अश्रू ढाळून दुःख हलके करता न येणे ही स्त्रीची फार मोठी छळणूक आहे याची त्याला जाणीव झाली होती. "आपण आईकडं जाऊ आणि साऱ्या गोष्टी रीतसर जाहीर करू."

ती शुष्कपणे किंचित हसली. "आता काय रीतसर जाहीर करायचं राह्यलंय? मी केव्हाच तुझ्या घरी रहायला गेलेय. अपघाताच्या दिवशीच मी माझं गाठोडं घेऊन आले. म्हातारीनं एकटीनंच कशाला दुःख करत बसायचं असं मला वाटलं. एकीला दोघी असलेल्या बऱ्या!" तिने ओठ दातात गच्च आवळून धरला व नजर दूर फिरवली. "पाहिलंस किती वेगानं काम करते मी! बघता बघता माझा माणूस मी हिसकावून घेतला!"

"नाद्या, तू असं बोलायचं काही एक कारण नाही," स्तेपान रागावून तिला म्हणाला. "अगदी काही कारण नाही!" तिचे दयाळू, गरम ओठ थरथर कापू लागलेले पाहताच तो उठला आणि आपला गाल त्याने तिच्या गालांवर दाबला. "तुला जर हवं असेल तर मी पर्वताच्या माथ्यावर चढून जाईन आणि तिथून सगळ्या वस्तीला, सगळ्या जगाला ओरडून सांगीन की, केवढी थोर बाई आहेस तू! तुझ्या पायाचं तीर्थ प्यायची माझी तयारी आहे, तुझ्यासाठी काय वाट्टेल ते करायची माझी तयारी आहे..."

"आता मात्र तुला खरंच वेड लागलं बरं का!" नाद्या हसत म्हणाली व हाताने तिने डोळ्यांचे कोपरे पुसून काढले. "तू दारू प्यायला नव्हतास तरी पक्क्या दारुड्यासारखा बरळत होतास. चल, घरी जाऊ या."

"चल, घरी गेलेलं बरं. सगळं कशाला बोलून टाकायचं?" स्वतःला

आवरीत स्तेपान म्हणाला आणि त्याने मान हलवली. "काही वेळा स्वत:ला आवरणं मोठं अवघड जातं."

"मित्रा, हे असं घडलं सारं," सारी कहाणी सांगून झाल्यानंतर व त्यानंतर सुमारे पाच किलोमीटर अंतर आम्ही काहीही न बोलता चालल्यानंतर स्तेपान गंभीर सुरात मला म्हणाला. "अशा तऱ्हेनं दोनाचे चार हात झाले. माझा मुलगा आता मोठा होतोय. आम्ही त्याला तो-श्का म्हणतो. लौकरच तो दुसरीच्या वर्गात जाईल. सर्व काही अपेक्षे-प्रमाणं सुरळीत चाललंय. पण नाद्या म्हणजे आमच्या कुटुंबाचा मुख्य खांब आहे. आमचं छप्पर तिच्या खांद्यांवर उभं आहे. तिच्याविना माझं आयुष्य नासक्या बटाट्याप्रमाणं वाया गेलं असतं. समजलं?"

आम्ही स्तेपानच्या घराजवळ येत होतो. एकाएकी त्याने आपली बंदूक माझ्याकडे फेकली आणि एखाद्या चेंडूप्रमाणे गडगडत तो डोंगर-उतारावरून पायथ्यापर्यंत गेला.

"काय कमाल आहे या बाईची!" तो ओरडला. "कितीही आवर घातला तरी ही आपली मोकाट सुटते!"

खालच्या खिंडीमधून घरगुती बनावटीची एक गवताची गाडी नाद्या स्वत: ओढत चालली होती. संतापाने बडबडत स्तेपान तिच्यापाशी पळत गेला. उतारावरून खाली येत असताना नाद्याचे शब्द माझ्या कानी पडले.

"पण गवत कुजून चाललं होतं!"

"पेन्शनीच्या कचेरीत ते मला घोडा देतील. तू स्वत: कशाला ओझ्याचं गाढव बनते? मी कचेरीत जाऊन घोडा मागतो."

"हं! त्या कचेरीचं दार ठोठावायला मी तुला जाऊ देईन असं वाटतं?" नाद्या उलट फणकारून म्हणाली. "आणि उगीच दंगा माजवू नकोस. मी ही शेवटची गाडी आणतेय. अनाथ-अपंगांना कचेरीतून घोडा घेऊ दे. आपल्यापेक्षा त्यांना जास्त गरज आहे."

"काय स्वभाव आहे या बाईचा! जहाजाच्या नांगरानंसुद्धा चिरडता येणार नाही!" स्तेपान माझ्यापाशी कुरकुरला आणि आपल्या बायकोला हट्टाने बाजूला सारून त्याने स्वत:ला गवताच्या गाडीला जुंपून घेतले.

तिने हातातला चिमटा गवतात खुपसला आणि गाडीला मागच्या बाजूने ढकलायला सुरुवात केली.

अजूनही त्याच झुंजूमुंजू दु:खद भावनेने जंगलची झाडे घळींमध्ये आणि निर्झरांवर आपली पानवस्त्रे टाकून नग्न होत होती. आपल्या उरात अखेरची ऊब धरून आणि हिमवर्षावापूर्वी पहिली कात टाकून नवे कोट पांघरण्याची तयारी करणाऱ्या प्राण्यांना कवटाळून, अतिदूर पसरलेला विस्कटलेला तैगा प्रदेश सोबतीला घेऊन अद्याप डोंगर उभे होते. अजूनही दयाळू भासणारे, पण ढगांनी दाटून येत चाललेले आकाश धरतीवर शांतपणे ओठंगले होते.

आणि सभोवतालच्या या एकूण वातावरणापाशी पूर्णत: एकरूप झालेली ती दोन माणसे त्या डोंगरउतारावर आपली गवताची गाडी हळूहळू आणि खंबीरपणे ढकलत चालली होती. त्या उतारावर एक भक्कम बांधलेले लाकडी घरकुल उभे होते आणि त्या घरकुलाच्या छपरावर आकाशाकडे नाक रोखून एक लाकडी विमान आपल्या पत्र्याच्या पंखासह सज्ज होते. आता वारा सुटला नव्हता, त्यामुळे तो विमानाचा पंखा नेहमीप्रमाणे घरघर आवाज करीत नव्हता. पण मला असे भासत होते की, कोणत्याही क्षणी ते छोटुकले विमान तैगामधून भरारी घेईल, भोवतालच्या पर्वतांपेक्षा उंचावर जाईल आणि दूर दूर उडत निघून जाईल.

१९६१



वालेन्तिन रासपूतिन

फ्रेंचचा धडा

वालेन्तिन रासपूतिन (जन्म १९३७). सैबेरियातील ऊस्त-ऊदे खेड्यात एका शेतकरी कुटुंबात जन्म. १९५५ च्या सुमारास ईर्कूत्स्क विद्यापीठाच्या इतिहास-तत्त्वज्ञान अध्यासनात प्रवेश, शिक्षक होण्याची पूर्वतयारी. त्यांच्या स्वतःच्या शब्दात, "ह्या कामाबद्दल आनंद वाटत होता, अभिमान वाटत होता आणि गंभीरपणे तयारी केली होती." एकदा ईर्कूत्स्कच्या युवक वृत्तपत्रात त्यांनी एक लेख लिहिला, पुढे त्याच्यावरच कथा बनविली. काही वर्षांनंतर वा. रासपूतिन यांचा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला: 'ह्या जगातील माणूस' (१९६७). त्यानंतर त्यांच्या सत्यकथा प्रसिद्ध झाल्या: 'मारीयासाठी पैसे' (१९६७), 'शेवटची मुदत' (१९७०), 'जग आणि आठव' (१९७५), 'मात्येराचा निरोप' (१९७६). सुप्रसिद्ध सोविएत लेखक से. झालिगिन यांनी रासपूतिनबद्दल लिहिले आहे: "आमच्या साहित्यात त्यांनी पटकन प्रवेश केला, त्याआधी धावाधाव केली नाही आणि शब्दप्रभू म्हणून स्थान पक्के केले."

खुद्द लेखक वार्ताहरांबरोबर बोलताना म्हणाला होता: "टीकाकार माझी तथाकथित ग्रामीण गद्याच्या प्रतिनिधींमध्ये गणना करतात. ग्रामीण गद्य, शहरी, लष्करी, युवकांचे इ. इ. विभागणी मला फार मर्यादित वाटते. ग्रामीण गद्यातील माझे आणि माझ्या सहकाऱ्यांचे काम व्यक्तित्वाच्या नैतिक शोधाच्या स्वरूपाचे ठरेल. लोकांमधील संबंधांतील "दुखऱ्या" जागांवर बोट ठेवण्यात लेखकाला जेव्हा यश येते आणि काही प्रमाणात खुद्द माणसाचे स्वतःशी असलेले संबंध दाखविता येतात, तेव्हा वाचकाला ते नेहमी रंजक वाटतात..."

वालेन्तिन रासपूतिन सूक्ष्म मानसशास्त्रज्ञ आहेत. बाह्यतः सामान्य, लक्षात न येणाऱ्या माणसाच्या अंतरंगाचे तपशीलवार चित्रण ते वाचकाला सादर करतात. नायकाच्या मानसिक स्थितीवर पूर्ण लक्ष केंद्रित ठेवून लेखक स्वतःच्या साहित्यामध्ये वाचकांचे कुतूहल कायम ठेवतो.

वालेन्तिन रासपूतिन रशियन फेडरेशनच्या सरकारी पारितोषिकाचे मानकरी आहेत.

अनास्तासिया प्रोकोप्येवना कोपीलोवायांना फार विचित्र आहे : आपल्या आई बापांसमोर आपल्यांला वाटते, तशीच आपल्या शिक्षकांसमोरही आपल्याला अपराधी भावना का जाणवते ? आणि शाळेत घडलेल्या गोष्टीबद्दल नव्हे, तर नंतर आपण जे काही बनतो, त्याबद्दल.

अठ्ठेचाळीस साली मी पाचवीच्या वर्गात गेलो. अचूक सांगायचे तर मी प्रवास केला. आमच्या खेड्यात फक्त प्राथमिक शाळा होती आणि पुढील शिक्षणासाठी आमच्या घरापासून पन्नास किलोमीटर दूर असलेल्या तालुक्याच्या गावी जाणे भाग पडले. एक आठवडा आधी माझी आई तेथे गेली होती व तिच्या ओळखीच्या एका बाईकडे माझ्या राहण्याची व्यवस्था करून आली होती. ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या दिवशी सामुदायिक शेताचा एकमेव ट्रक चालविणाऱ्या वान्याकाकाने, मी जेथे राहणार होतो, त्या पदकामेन्नाया रस्त्यावर मला उतरविले, माझा बाडबिस्तरा घरात न्यायला मदत केली, माझ्या पाठीवर धीर देणारी थाप मारली व ट्रक घेऊन तो निघून गेला. अशा रीतीने वयाच्या अकराव्या वर्षी माझे स्वावलंबी जीवन सुरू झाले.

त्या वर्षी अन्नटंचाई अजून संपली नव्हती. आईला आम्ही तीन मुले होतो — मी सर्वांत थोरला. वसंताच्या मोसमात परिस्थिती जेव्हा फारच बिकट बनली, तेव्हा बटाट्यांचे डोळे व राय आणि ओटचे दाणे मी गिळले होते, माझ्या छोट्या बहिणीला गिळायला लावले होते; आमच्या पोटांमध्ये ते वाढतील आणि सारा वेळ खाण्याबाबत विचार करावा लागणार नाही, असे मला वाटले होते. सगळा उन्हाळा आम्ही आमच्या बियाण्याला अंगारा नदीचे पाणी पाजले होते, पण का कुणास ठाऊक, पीक आले नाही अथवा एवढे कमी उगवले, की आम्हाला ते जाणवलेच नाही. जाता जाता सांगायचे तर, आमचा प्रयोग काही अगदीच वाया गेला नव्हता आणि लोकांना तो कधी ना कधी उपयोगी पडेल; पण आम्ही अननुभवी होतो आणि आमचे कुठेतरी चुकले होते.

मला तालुक्याच्या गावी पाठविण्याचा निर्णय आईने कसा घेतला हे सांगणे अवघड आहे. आम्हाला वडील नव्हते, आयुष्य फार खडतर होते आणि बहुधा तिने विचार केला की, होते त्याहून अधिक वाईट होण्याची शक्यताच नाही — दारिद्र्याची परिसीमा होती. अभ्यासात मी चांगला होतो, शाळेत आनंदाने जायचा आणि खेडचात माझ्या हुषारी-बद्दल मी नाव कमावले होते. म्हाताऱ्या माणसांना पत्रे लिहून देण्याचे व त्यांना आलेली पत्रे वाचून दाखविण्याचे काम मी करायचा, खेडचा-च्या छोटचा ग्रंथालयातील सर्व पुस्तके मी वाचली होती आणि संध्या-काळच्या वेळांना त्या पुस्तकांमधील गोष्टी पदरचा मीठमसाला लावून इतर मुलांना मी सांगायचा. पण सरकारी कर्जरोख्यांच्या बाबतीत लो-कांची माझ्यावर फार भिस्त होती. युद्धकाळात माणसांपाशी असे कर्ज-रोखे खूप साचले होते, जिंकलेल्या क्रमांकांच्या याद्या वारंवार प्रसिद्ध होत होत्या आणि तेव्हा लोक त्यांचे रोखे घेऊन माझ्यापाशी येत. माझी नजर भाग्यवान होती असा लोकांचा समज होता. आणि खरेच जिंकणारे क्रमांक आढळायचे; जिंकलेल्या रकमा काही फार मोठचा नसत, पण त्या अवघड काळात सामुदायिक शेतकऱ्याला जादा कोपेकसुद्धा आनंद द्यायचा आणि इथे माझ्याकडून अनपेक्षित रकमेची घोषणा व्हायची. त्यांच्या आनंदाचा काही भाग माझ्याही वाटचाला यायचा. इतर मुलां-पेक्षा मला वेगळी वागणूक मिळायची आणि जास्त खायला द्यायचे. अत्यंत कंजूस म्हणून प्रसिद्ध असलेल्या इल्याकाकाने जेव्हा चारशे रूबल जिंकले, तेव्हा त्याने मला आख्खी बादली भरून बटाटे दिले होते; त्या वसंतात बादलीभर बटाटे म्हणजे फार मोठी संपत्ती होती.

सरकारी कर्जरोख्यांची आकडेवारी मला समजायची म्हणून सगळी माणसे आईला सांगायची:

"तुझा पोरगा हुषार डोक्याचा आहे. तू त्याला चांगला शिकव. शिकणं कधी वाया जात नाही."

म्हणून सगळ्या अडचणी असूनही आईने माझ्या पुढच्या शिक्षणाची तजवीज केली होती. वस्तुतः यापूर्वी आमच्या खेडचातून तालुक्याच्या गावी पुढील शिक्षणासाठी कुणीही गेलेला नव्हता. मीच पहिला होतो. अर्थात माझ्यासमोर काय वाढून ठेवले होते, नव्या जागी कोणत्या अड-

चणींना तोंड द्यावे लागणार होते, ह्याबाबत मला काहीही कल्पना नव्हती.

इथेही मी अभ्यास चांगला करीत होतो. दुसरा उपायच काय? अभ्यासासाठीच मी आलो होतो आणि दुसरे छंद मला नव्हते. त्यावेळी प्रत्येक गोष्ट मी मन लावून करायचा, दुसरा मार्ग मला ठाऊक नव्हता. कुठल्याही धड्याची पूर्वतयारी न करता शाळेत जाण्याची माझी हिंमत झाली नसती, त्यामुळे अर्थातच मला सर्वोत्तम गुण – पाच – नेहमी मिळत. फक्त फ्रेंच भाषा सोडून.

माझे फ्रेंच उच्चार चांगले येत नव्हते. शब्द आणि व्याकरण माझ्या सहज लक्षात रहात, अनुवाद मी झटपट करायचा, शुद्धलेखनाच्या अड-चणी मी झकास पार करायचा, पण माझ्या उच्चारांमध्ये मात्र माझ्या अंगाराच्या अनेक पिढ्यांच्या पूर्वजांनी अडथळा आणला होता; त्यांनी परको शब्दांचे उच्चार कधीच केले नव्हते – परकी शब्द अस्तित्वात होते अशी त्यांना शंका आली तरीसुद्धा! आमच्या खेड्यात भरभर बोल-णाऱ्या लोकांच्या पद्धतीने मी फ्रेंचची गाडी सोडायचा, अर्धे ध्वनी अनावश्यक समजून गिळायचा आणि उरलेले अर्धे भुंकल्यासारखा ओर-डायचा. फ्रेंचची मास्तरीण लीदीया मिखायलोवना जेव्हा माझे फ्रेंच बोलणे ऐकायची, तेव्हा तिचा चेहरा वेदनांनी वेडावाकडा बनायचा व ती स्वतःचे डोळे झाकून घ्यायची. अर्थात अशा प्रकारचे फ्रेंच बोलणे तिने कधीच ऐकलेले नव्हते. नासिक ध्वनी आणि स्वरांची मिश्रणे कशी उच्चारायची ह्याचे ती मला पुनःपुन्हा प्रात्यक्षिक करून दाखवायची, समजावून सांगायची आणि तिच्या पाठोपाठ पुनरुच्चार करण्यास मला सांगायची, पण मी अडखळायचा; माझी जीभ वळेचना – जणू लाक-डाची बनायची. सारा खटाटोप वाया जायचा.

माझा सर्वांत भयंकर काळ सुरू व्हायचा, जेव्हा शाळेतून मी घरी परतायचा. तेथे शाळेत मी सतत कशात ना कशात गुंतलेला असायचा, काहीतरी करीत असायचा, इतर मुले त्यांच्याबरोबर मलाही खेचून नेत; इच्छा असो वा नसो, धावपळ करायचा, खेळांमध्ये भाग घ्यायचा

आणि धड्यांच्या वेळी अभ्यासावर मन एकाग्र करायचा. पण ज्या क्षणी मी एकटा रहायचा, त्या क्षणी घरच्या आठवणींनी व्याकुळ बनायचा. घराची ओढ लागायची, खेड्याची ओढ लागायची. माझ्या घरच्या माणसांपासून कधी एक दिवससुद्धा मी लांब राहिलेला नव्हतो आणि परक्या माणसांमध्ये राहण्याची पूर्वतयारी झालेली नव्हती. एखाद्या आजारापेक्षाही माझी ही भावना फार किळसवाणी होती. एकच इच्छा होती, एकच ध्यास लागला होता — घरी जायचे! मी कमालीचा खंगलो. सप्टेंबरअखेरी माझी आई मला भेटायला आली, तेव्हा माझी अवस्था बघून घाबरली. ती असेपर्यंत मी स्वतःवर ताबा ठेवला, तक्रार केली नाही किंवा डोळयात पाणी आणले नाही, पण जेव्हा ती परत निघाली, तेव्हा मात्र मला राहवले नाही व मोठमोठ्यांदा रडत मी ट्रकमागे काही अंतर धावलो. मी थांबावे, तिची आणि स्वतःची अब्रू घालवू नये, म्हणून आईने हाताने खुणा केल्या, पण तिला समजून घेण्याच्या मनःस्थितीत मी नव्हतो. तेव्हा तिने मनाशी निर्णय केला व ट्रक थांबवायला सांगितले.

"आवर तुझं सामान," मी तिच्या जवळ जाताच तिने मला आज्ञा केली. "पुरे झालं तुझं शिक्षण, चल घरी!"

मी भानावर आलो आणि मागे पळालो.

पण केवळ घरच्या ओढीपायी मी खंगलो नव्हतो; मला कधी पोटभर खायलाच मिळत नव्हते. शरदाच्या मोसमात जेव्हा वान्याकाका गावाजवळच्या केंद्रापाशी सरकारला धान्य विकायला आणायचा, तेव्हा दर आठवड्याला नियमितपणे माझ्यासाठी खाणे घेऊन यायचा. पण संकट म्हणजे मला ते खाद्य कधीच पुरायचे नाही. फक्त पाव व बटाटे असत, कधी कधी आईने दुसऱ्या कसल्यातरी वस्तूच्या मोबदल्यात घेतलेली दह्याची बरणी असायची; कारण आमच्या घरात गाय नव्हती. वान्याकाका खाण्याच्या जिनसा आणायचा तेव्हा त्या खूप वाटायच्या, पण दोन दिवसांनंतर काहीच शिल्लक उरत नसे. लौकरच माझ्या ध्यानात आले की, माझा अर्धा पाव रहस्यमय पद्धतीने नाहीसा व्हायचा. मी पुन्हा पुन्हा खात्री करून घेतली. आत्ता पाव असायचा, थोड्या काळानंतर गायब व्हायचा. बटाट्यांची तीच गत. कोण चोरत होते

हे मला समजत नव्हते—सतत आरडाओरडा करणारी, तीन मुलांचा एकटीने सांभाळ करणारी माझी घरमालकीण नाद्यामावशी, किंवा तिच्या थोरल्या दोन मुलींपैकी एक मुलगी अथवा धाकटा फेदका. ह्याबद्दल विचार करायलासुद्धा मी घाबरत होतो, मग शोध घेणे तर दूरच. पण वाईट वाटायचे, कारण माझी आई स्वतःच्या मुलांच्या तोंडचा घास काढून माझ्यासाठी पाठवीत होती आणि शेवटी ते अन्न माझ्या तोंडात पडतच नव्हते. पण ह्या परिस्थितीशी मी जुळते घ्यायचे ठरविले. आईला सत्य समजले असते तर तिचे दुःख आणखीच वाढले असते.

इथे उपाशी राहणे आणि खेड्यात उपाशी राहणे ह्यात खूप फरक होता. तेथे, विशेषतः शरदाच्या मोसमात, काही ना काही ओरबाडता यायचे, तोडता यायचे, खणून काढता यायचे ; अंगारा नदीत मासे होते आणि जंगलात पक्षी होते. पण इथे माझ्या दृष्टीने भोवती काहीच नव्हते : परकी माणसे, परक्यांचे वाफे, परकी माती. छोट्याशा नदीत दहा-दहा जाळ्यांची रांग मासे धरण्यासाठी ताणलेली. एका रविवारी आख्खा दिवस मी गळ टाकून बसलो, तेव्हा लहान चमच्याच्या आकाराचे अवघे तीन मासे हाती आले. असल्या मच्छीमारीने कुणी लठ्ठ होत नाही! मी परत गेलो नाही. उगीच वेळ वाया कशाला घालवायचा? संध्याकाळच्या वेळांना मी चायखान्यापाशी आणि बाजारात घुटमळायचा, किंमती वाचता वाचता लाळ गिळायचा व शेवटी रित्या हातांनी घरी परतायचा. चुलाण्यावर किटली असायची ; पोटाला ऊब आणण्यासाठी गरम पाणी प्यायचा आणि अंथरुणावर पडायचा. सकाळी परत शाळेला. फाटकापाशी ट्रक थांबण्याच्या आणि वान्याकाकाने दार ठोठावण्याच्या सुखी क्षणापर्यंत असे चालत रहायचे. कितीही काटकसर केली तरी अन्न फार काळ पुरणार नाही ह्याची पूर्ण जाणीव असूनही, भुकेने वखवखलेला मी पोट गच्च भरेपर्यंत खायचा आणि एक-दोन दिवसांनंतर परत भुकेची आग घेऊन फिरू लागायचा.

एकदा, अजून सप्टेंबरचा महिना होता, फेदकाने मला विचारले :
"तू 'आग' खेळायला भीत नाहीस?"
"कसली 'आग'?" मला समजले नाही.

"एक खेळ आहे. पैसे लावून खेळतात. जर तुझ्यापाशी पैसे असले, तर चल खेळायला."

"नाहीत पैसे."

"माझ्यापाशीसुद्धा नाहीत. तर मग निदान बघायला जाऊ. बघशील, किती मस्त खेळ आहे."

फेदकाने मला परसदारीच्या वाफ्यांमधून नेले; नंतर काळ्या पडलेल्या, एकमेकात गुरफटलेल्या, विषारी बियांचे घोस लटकलेल्या, खाजकुयलींच्या झुडुपांचे रान माजलेल्या टेकाडाला आम्ही पार केले. एका उंचवटयावरून दुसऱ्या उंचवटयावर उड्या मारीत, जुन्या कचऱ्याच्या ढिगाला ओलांडून आम्ही खालील खोलगट जागी पोहोचलो. तेथे सपाट, स्वच्छ छोटया मैदानात आम्हाला काही पोरे दिसली. आम्ही त्यांच्यापाशी गेलो. पोरे आम्हाला न्याहाळून पहात होती. सगळी जवळजवळ माझ्याच वयाची होती, फक्त एक मुलगा वेगळा होता—उंच आणि दणकट, कपाळावर लाल केसांचा लांब तुरा उभा असलेला. त्या पोरांचा तो म्होरक्या होता हे उघड दिसत होते. मला आठवले: तो सातवीच्या वर्गात शिकत होता.

"ह्याला कशाला आणलंस इथं?" नाराजीच्या सुरात तो फेदकाला म्हणाला.

"तो आपल्यातलाच आहे वादिक, आपल्यातलाच," फेदका समर्थन करू लागला. "आमच्याकडं राहतो."

"तू खेळणार?" वादिकने मला विचारले.

"पैसे नाहीत."

"लक्षात ठेव, आम्ही इथं पैसे लावून खेळतो असं कुठं बरळू नको!"

"मी चुगल्या करत नाही!" मला अपमान वाटला.

पुढे त्यांनी माझ्याकडे लक्ष दिले नाही व मी जवळ सरकून खेळ पाहू लागलो. सगळे खेळत नव्हते—फक्त सहा-सातजण खेळत होते व बाकीची मुले माझ्याप्रमाणेच नुसती बघत होती. सगळेजण वादिकचे चाहते दिसले. तो इथला "दादा" होता हे मी पटकन ओळखले.

खेळ समजायला अगदी सोपा होता. प्रत्येक खेळाडू दहा कोपेक

ठेवायचा. मग "काटा" वरच्या बाजूला करून नाण्यांचा ढीग बनवायचे; जुगारातील पैशांपासून दोन मीटर अंतरावर एक जाड रेषा आखली होती आणि दुसऱ्या टोकाला जमिनीत गाडल्या गेलेल्या धोंड्यावर पुढचा पाय टेकवून खेळाडू चपटा गोल दगड फेकायचा. हा चपटा दगड घरंगळत रेषेच्या जास्तीत जास्त जवळ गेला पाहिजे, पण त्याने रेषा ओलांडायची नाही. ज्याची फेक सर्वांत जवळ जाईल, त्याला पहिली संधी मिळायची. त्याच चपट्या दगडाने नाण्यांवर नेम धरायचा आणि नाण्याची "छाप" बाजू वरती पाडायची. "छाप" नाणे तुमचे व्हायचे आणि दुसऱ्या नाण्यावर नेम धरायचा. नेम नाही लागला तर पुढच्या खेळाडूला खेळी द्यायची. पण सर्वांत महत्त्वाची खेळी होती नाण्यांचा ढीग फोडण्याची; त्या ढिगातील एक जरी नाणे "छाप" वरती करून पडले, तर सगळेच्या सगळे पैसे तुमचे व्हायचे आणि परत नवा डाव सुरू करायचा.

वादिक धूर्त होता. तो सर्वांच्या शेवटी चपटा दगड फेकायचा. एव्हाना खेळाची परिस्थिती स्पष्ट झालेली असायची आणि पहिली खेळी जिंकण्यासाठी कुठे दगड फेकला पाहिजे ह्याची त्याला कल्पना असायची. पैसे पहिल्या खेळाडूला मिळायचे, शेवटच्या खेळाडूपर्यंत क्वचितच पैसे उरत. प्रत्येकाला वादिकचा धूर्तपणा समजत होता, पण त्याबद्दल बोलण्याची कुणाचीही हिंमत होत नव्हती. त्याच्या खेळण्यात कसब होते हे खरे. दगड फेकण्यापूर्वी तो गुडघे किंचित वाकवायचा, डोळे किलकिले करून दगडाने नाण्यावर नेम धरायचा, सफाईदार सावकाशपणे वर उठायचा आणि त्याने नेम धरलेल्या जागी चपटा दगड अचूक जाऊन पडायचा. झटपट हालचालीने तो कपाळावरील केसांचा तुरा मागे उडवायचा, सहजपणे एका बाजूला थुंकायचा आणि मुद्दाम सावकाशपणे पैशांच्या दिशेने चालू लागायचा. जेव्हा नाण्यांचा ढीग केलेला असे, तेव्हा तो जोरदार फटका मारायचा; पण जेव्हा नाणी अलग अलग ठेवलेली असत, तेव्हा मात्र त्यांना तो हलका, काळजीपूर्वक धक्का मारायचा. त्यामुळे नाणे एकदम उंच उडायचे नाही किंवा अनेकदा गडगडायचे नाही, तर किंचित वर उठायचे व "छाप" बाजू वरती होऊन पडायचे. दुसऱ्या कुणालाही असे जमत नव्हते. पोरे जोरात नेम हाणा-

यची, मग नवी नाणी काढून लावायची आणि ज्याच्यापासचे पैसे संपायचे, तो बघ्यांमध्ये सामील व्हायचा.

मला वाटले की, जर माझ्यापाशी पैसे असते, तर मी खेळू शकलो असतो. खेड्यात आम्ही कवड्या खेळत असू आणि त्या खेळातही तीक्ष्ण नजरेची गरज असायची. शिवाय, नेमबाजीचा खेळ मला आवडायचा. मी मूठभर खडे गोळा करायचा, एक अवघड लक्ष्य निवडायचा आणि दहापैकी दहा नेम अचूक लागेपर्यंत खडे फेकत रहायचा. डोक्यावरून, खांद्यामागून, खालून नेम फेकण्याचा मी सराव केला होता. तेव्हा माझ्यापाशी कसब होते. पण पैसे नव्हते.

आईपाशी पैसे नसत, म्हणून तर ती मला पाव पाठवायची. एरवी मी रहात होतो त्या गावी पाव विकत घेता आला असता. सामुदायिक शेतावर पैसे कुठून मिळणार? दोन वेळा आईने पत्राबरोबर पाच रूबलची नोट धाडली होती – आत्ताच्या नाण्यात पन्नास कोपेक – मी दूध विकत घ्यावे म्हणून. अर्थात ती रक्कम काही फार मोठी नव्हती, पण बाजारात दुधाच्या अर्ध्या लिटरच्या पाच बरण्या विकत घेता येत होत्या – एका बरणीला एक रूबल. मला ॲनिमिया होता म्हणून दूध प्यावे लागायचे. काहीवेळा काही कारण नसताना मला चक्कर यायची.

तिसऱ्या वेळी जेव्हा मला पाच रूबलची नोट मिळाली, तेव्हा मात्र मी ती दुधासाठी खर्च न करता तिला मोडून सुटी नाणी घेतली आणि कचऱ्याच्या खळग्यापाशी गेलो. ती जागा फार नामी शोधलेली होती: टेकाडांनी वेढलेला सपाट मोकळा पट्टा, कुठूनही न दिसणारा. खेड्यात सर्व उद्योग मोठ्या माणसांच्या नजरेसमोर चालत आणि जुगार खेळल्यास शाळेच्या हेडमास्तरांसमोर किंवा पोलीसांपुढे जाब देण्याचे धोके असत. पण इथे आम्हाला कुणाचाही अडथळा नव्हता. शिवाय जागा जवळ होती: धावत दहा मिनिटांच्या अंतरावर.

पहिल्यांदा मी नव्वद कोपेक हरलो, दुसऱ्यांदा साठ. पैसे गमावताना अर्थातच मला वाईट वाटले, पण हळूहळू खेळावर माझी पकड बसत असल्याचे मला जाणवत होते, चपटा दगड माझ्या बोटांना सवयीचा बनू लागला होता. मला हव्या त्या जागी दगड फेकण्यासाठी कितपत ताकद वापरली पाहिजे हे मी शिकत होतो. दगड कुठे पडेल आणि किती

दूरपर्यंत घरंगळत जाईल ह्याचा नजरेने अदमास घ्यायला मी शिकत होतो. इतर मुले निघून गेल्यानंतर संध्याकाळी मी परत त्या जागी जायचा, वादिकने धोंड्याखाली लपवलेला चपटा दगड बाहेर काढायचा, खिशातली नाणी रेषेपलिकडे मांडायचा आणि अंधार पडेपर्यंत त्यांच्यावर नेमबाजी करायचा. शेवटी, दहा फेकींपैकी तीन-चार वेळा दगडाचा नाण्यांवर नेम बसू लागला.

अखेर मी विजेता होण्याचा दिवस उगवला.

शरदाचा मोसम उबदार आणि कोरडा होता; ऑक्टोबरचा महिना असूनही फक्त सदऱ्यात फिरण्याइतपत हवा गरम होती. पाऊस क्वचित पडायचा, कुठूनतरी वाईट हवेच्या ठिकाणाहून वाऱ्याने वाहून आणल्यासारखा क्वचित पडायचा. आकाश उन्हाळ्याप्रमाणे निळेभोर होते, पण एव्हाना अधिक खाली झुकल्यासारखे भासत होते आणि सूर्य लौकर मावळत होता. वातावरण स्वच्छ असे तेव्हा टेकाडांवर हवा तरल बनलेली दिसायची, कोरड्या दवण्याचा कडवट उग्र गंध सर्वत्र दरवळायचा. दूरचे आवाज स्पष्ट ऐकू येत आणि स्थलांतरासाठी जाणाऱ्या पक्ष्यांचे कळप ओरडत होते. आमच्या मैदानातील गवत जरी पिवळे व मलूल पडले होते, तरी अजून मऊ आणि जिवंत होते. न खेळणारी पोरे – बहुतेक पैसे हरलेली – त्या गवतावर लोळत होती.

आता शाळा सुटल्यानंतर दररोज मी जुगाराच्या जागी धाव घेऊ लागलो होतो. मुले बदलली होती, काही येईनाशी झाली होती, काही नवी आली होती. फक्त वादिक नेमाने यायचा आणि त्याच्याशिवाय खेळ सुरू होत नसे. त्याच्या पाठोपाठ सावलीप्रमाणे एक आडव्या अंगाचा, बारीक केस कापलेल्या मोठ्या डोक्याचा पोरगा फिरायचा. त्याला "कोंबडा" ह्या टोपण नावाने हाक मारीत. आत्तापर्यंत ह्या कोंबड्याला मी शाळेत कधी पाहिले नव्हते, पण पुढचे आधीच सांगतो, दुसऱ्या सहामाहीत तो आमच्या वर्गात हिमासारखा आमच्या डोक्यांवर टपकला. असे आढळले की, गेल्या वर्षी पाचवीत तो नापास झाला होता, पण कसल्यातरी बहाण्याखाली जानेवारीपर्यंत सुटी लांबविण्यात तो यशस्वी झाला होता. कोंबडासुद्धा बहुधा जिंकायचा, अर्थात वादिकप्रमाणे नव्हे, पण तो नेहमी खेळाहून परतताना जास्त चांगल्या परिस्थितीत असायचा.

ह्याचे कारण कदाचित त्याची आणि वादिकची गट्टी होती व वादिक त्याला हळूच मदत करायचा.

आमच्या वर्गातील तीश्कीन नावाचा एक मुलगा कधी कधी खेळायला यायचा. अत्यंत चळवळ्या, डोळे मिचकावण्याची सवय असलेल्या ह्या मुलाला धड्याच्या वेळी हात वर करायची फार आवड होती. उत्तर माहीत असो-नसो, पण ह्याचा हात वर; जेव्हा त्याला प्रश्न विचारीत, तेव्हा मात्र गप्प.

"तू हात वरती का केलास?" तीश्कीनाला विचारीत.

तो डोळे मिचकावायचा:

"मला उत्तर आठवलं होतं, पण उभा राहिलो तोवर विसरलो."

मी त्याच्याशी मैत्री केली नव्हती. त्यावेळी कुणाही मुलाशी मी मैत्री करीत नव्हतो – लाजाळूपणापायी, मितभाषीपणापायी, खेड्यातील अलिप्तपणापायी; पण मुख्य म्हणजे माझ्या भयानक घरच्या ओढीपायी मला दुसऱ्या कशाचीही इच्छा उरत नव्हती. मुलेही माझ्या सहवासाला फारशी उत्सुक नव्हती, त्यामुळे मी एकटा राहिलो होतो. पण त्यामुळे मी एकाकी पडलो होतो आणि एकाकीपणातून सुटण्याचा प्रयत्न करीत होतो, ह्याची मला जाणीव नव्हती. मला वाटत होते की, मी खेड्यात नसून इथे होतो म्हणून एकटा होतो आणि खेड्यात माझे खूप मित्र होते.

आमच्या खेळण्याच्या ठिकाणी तीश्कीनने माझी दखल घेतल्याचे भासले नाही. तो लौकर हरला, नाहीसा झाला आणि बराच काळपर्यंत परत उगवला नाही.

मी जिंकलो. मी सतत दररोज जिंकत होतो. माझी स्वतःची खेळण्याची लकब होती: पहिली खेळी जिंकण्यासाठी चपटा दगड घरंगळत फेकायचा नाही. जेव्हा खूप खेळाडू असत, तेव्हा सोपे नव्हते. रेषेच्या जेवढा अधिक जवळ, तेवढा तिला ओलांडून शेवटी राहण्याचा धोका जास्त. दगड फेकताना पैशांवर टाकणे महत्त्वाचे होते. मी तेच करायचा. अर्थात त्यात धोका होता, पण माझ्या कसबासह तसा धोका पत्करायला हरकत नव्हती. मी ओळीने तीन-चार वेळा हरण्याची शक्यता होती, पण पाचव्या वेळी जेव्हा मी चवड फोडायचा, तेव्हा हरल्याच्या

दुप्पट पैसे परत मिळवायचा. मग पुन्हा हरायचा, पुन्हा जिंकायचा. मी क्वचित दगडाचा दणका नाण्यावर मारायचा, पण इथेही माझी एक रीत होती. नाणे स्वतःकडे वळविण्यासाठी वादिक त्यावर नेम मारायचा, पण मी त्याउलट नाणे दूर ढकलण्यासाठी नेम मारायचा; असे करणे आगळे होते, पण त्यामुळे नाण्याला दगड आधार द्यायचा, त्याला गोल फिरू द्यायचा नाही आणि नाण्यापासून दूर जाताना नाण्याला आपल्या-मागून न्यायचा.

आता माझ्यापाशी पैसे होते. पण खेळात जास्त वेळ रमून संध्या-काळपर्यंत मी तेथे थांबत नव्हतो. मला फक्त एक रूबलची गरज होती, रोज एक रूबल. माझ्यापाशी एक रूबल जमला की मी खेळ सोडून निघायचा, बाजारात दुधाची बरणी विकत घ्यायचा (बाजारातील वि-क्रेत्या बायका माझ्या वाकड्या, ठोके पडलेल्या नाण्यांबद्दल कुरकुराय-च्या, पण तरीही दूध द्यायच्या), मग जेवून अभ्यासाला बसायचा. अजूनही मला पुरेसे खायला मिळत नव्हते, पण मी दूध पीत होतो ही जाणीवच मला ताकद देत होती आणि भुकेचा ताण कमी करीत होती. चक्कर येण्याचे प्रसंगही पूर्वीपेक्षा कमी झाले होते.

प्रथम माझे यश वादिकने शांतपणे सोसले. त्याचा काही तोटा होत नव्हता, त्याच्या खिशातील पैसे काही माझ्या खिशात निश्चितच जात नव्हते. काहीवेळा तर तो माझे कौतुक करायचा: बघा, कशी फेक केली पाहिजे, शिका त्याच्यापासून, वावळटांनो. पण लौकरच त्याच्या ध्यानात आले की, खेळ सोडून मी फार चटकन निघून जात होतो आणि एक दिवस त्याने मला थोपविले.

"काय रे, पैसे खिशात घातलेस आणि निघालास? भलताच चतुर तू! खेळ पुढं."

"वादिक, मला अभ्यास करायचाय," मी विरोध दर्शविला.

"ज्याला अभ्यास करायचाय, त्यानं इथं येऊ नये."

कोंबड्याने त्याच्या सुरात सूर मिसळला:

"पैसे लावून असं खेळतात हे तुला कुणी सांगितलं? सांभाळ, नाही तर खरपूस मार खाशील. समजलं?"

त्यानंतर वादिकने त्याच्याआधी मला खेळी कधीही दिली नाही.

त्याची फेक सुरेख असायची आणि खेळायची संधी मिळण्यापूर्वीच मला खिशातून नवे नाणे काढावे लागायचे. पण माझी फेक जास्त चांगली होती आणि जर मला संधी मिळाली, तर लोखंड जसे चुंबकापाशी जाते, तसा चपटा दगड थेट नाण्यापाशी जायचा. माझ्या कसबाचे मलाही आश्चर्य वाटत होते. मी स्वतःला आवरायला पाहिजे होते, दुसऱ्यांचे लक्ष वेधणार नाही अशा रीतीने खेळायला पाहिजे होते, पण मी अजूनही फार साधा होतो आणि नाण्यांवर हल्ले चढवीत होतो. फार पुढची मजल मारली तर कुणालाही क्षमा होत नाही, ह्याची मला काय कल्पना? अशा माणसाने दयेची अथवा पाठराख्याची कधीही अपेक्षा धरू नये, कारण इतरांच्या दृष्टीने तो उपटसुंभ असतो आणि त्याच्या पाठोपाठ येणारा त्याचा सर्वांत जास्त द्वेष्टा असतो. त्या शरदात हे ज्ञान मला फार महागात शिकावे लागले.

मी नुकताच नाण्यांवर दगड फेकला होता आणि नाणी गोळा करायला जाणार होतो, तेवढ्यात मी पाहिले की, काहीशा एका बाजूला पडलेल्या नाण्यावर वादिकने पाऊल दाबले. बाकीची सर्व नाणी "काटा" वर करून होती. अशा वेळी "गुदाम" असं फेकण्यापूर्वी ओरडायची पद्धत आहे; म्हणजे "छाप" नसल्यास नाण्यांचा ढीग बनवायचा आणि त्याच्यावर परत दगड फेकायचा. पण माझ्या यशावर मी नेहमीप्रमाणे खात्री ठेवून होतो, म्हणून ओरडलो नाही.

"गुदाम नाही!" वादिकने जाहीर केले.

मी त्याच्यापाशी गेलो आणि नाण्यावरील त्याचे पाऊल बाजूला सरकविण्याचा प्रयत्न केला, पण त्याने मला ढकलले, पटकन नाणे उचलले आणि "काटा" दाखविला. नाणे "छाप" वर करून पडले होते हे पहायला मला त्याआधी अवसर मिळाला होता, एरवी त्याने ते पायाखाली लपविले नसते.

"तू नाणं उलटं फिरवलंस," मी म्हणालो. "छाप" वर होता, मी पाहिलाय."

त्याने माझ्या नाकाखाली मूठ धरली.

"हे तू बघितलं नाही? वास घेऊन बघ!"

मला तडजोड करावी लागली. आग्रह धरण्यात अर्थ नव्हता. जर

मारामारी सुरू झाली असती, तर तेथील एकाही मुलाने माझा पक्ष घेतला नसता. तीश्कीन तेथे होता, पण तोही माझ्या बाजूने लढला नसता. रागाने डोळे आकुंचित करून वादिक माझ्याकडे पहात होता. मी खाली वाकलो, सर्वांत जवळच्या नाण्यावर नेम मारला, नाणे परतवले आणि दुसऱ्या नाण्याकडे वळलो. जर एका तऱ्हेने नाही, तर दुसऱ्या तऱ्हेने, असा मी निर्णय घेतला. कशाही रीतीने ती सर्व नाणी मी जिंकणार होतो. परत मी नेम धरला, पण दगड फेकण्यापूर्वीच कुणीतरी मागून मला जोरात ढोपर मारले आणि मी जमिनीवर वेडावाकडा पालथा आपटलो. भोवताली हशा पिकला.

माझ्यापाठी कोंबडा हसत उभा होता. मी दचकलो:

"असं का केलंस?"

"मी केलं असं तुला कुणी सांगितलं?" माझ्यावर तो खेकसला. "स्वप्न पडलं का?"

"इकडं दे!" वादिकने दगडासाठी हात पुढे केला, पण मी दिला नाही.

संतापामुळे माझी भीती नाहीशी झाली होती आणि आता मी कशालाही घाबरत नव्हतो. कशाबद्दल ते असे वागले? कशाबद्दल? काय मी त्यांचे वाकडे केले होते?

"इकडं दे!" वादिकने हुकूम केला.

"तू नाणं उलट केलंस!" मी त्याच्यावर ओरडलो. "मी पाहिलं, तू उलटं केलंस, पाहिलं!"

"पुन्हा बोल पाहू," माझ्यापाशी येत तो म्हणाला.

"तू नाणं उलट केलंस," आता मी शांतपणे म्हणालो. त्यानंतरच्या परिणामांची मला कल्पना होती.

प्रथम कोंबड्याने परत मागून माझ्यावर प्रहार केला. मी वादिकवर धावून गेलो. त्याने पटकन, अचूकपणे, नेम न धरता माझ्या तोंडावर त्याच्या डोक्याचा दणका मारला. मी खाली पडलो आणि माझ्या नाकातून रक्ताची धार लागली. मी जेमतेम उठलो, तेवढ्यात कोंबडा परत माझ्यावर चालून आला. मी तेथून पळ काढू शकलो असतो, पण काही कारणाने तो विचारच माझ्या मनाला शिवला नाही. वादिक आणि

कोंबड्याच्या दरम्यान माझी होलपट चालली होती. नाकामधून वाहणारा रक्ताचा लोंढा थोपविण्यासाठी नाकावर हात धरावा लागल्यामुळे मला स्वतःचे रक्षण करण्याची संधीच सापडत नव्हती. संतापाने, हट्टाने मी ओरडत राहिलो :

"उलट केलं! उलट केलं! उलट केलं!"

ते मला ओळीने मारत होते, पहिला आणि दुसरा, पहिला आणि दुसरा. कुणीतरी तिसरा मुलगा, छोटा आणि दुष्ट, माझ्या पायांवर लाथा हाणत होता. नंतर माझे पाय काळे-निळे पडल्याचे मला आढळले. खाली पडायचे नाही ह्या एकाच विचाराने मला घेरले होते, कोणत्याही परिस्थितीत खाली पडायचे नाही. खाली पडणे लज्जास्पद ठरेल असे त्या क्षणांनासुद्धा मला वाटत होते. पण अखेर त्यांनी मला खाली पाडला आणि मारणे थांबविले.

"चालता हो इथून, जोवर जिवंत आहेस!" वादिक खेकसला. "लौकर!"

हुंदके देत, बधीर नाकाने सुरसुरत मी उठलो आणि टेकाड चढू लागलो.

"जर कुणापाशी चुगली केलीस, तर ठार मारू!" वादिक माझ्यापाठी ओरडला.

मी उत्तर दिले नाही. अपमान आणि रागापायी माझ्यात घट्ट गाठ वसली होती, माझ्या तोंडून शब्द बाहेर पडत नव्हता. जेव्हा मी टेकाडाच्या माथ्यावर पोहोचलो, तेव्हा एकदम बांध फुटला आणि संतापाने बेभान होऊन मी बेंबीच्या देठापासून ओरडलो; बहुधा सबंध वस्तीत माझे ओरडणे ऐकू गेले असणार :

"तू उलट केलं... स!"

कोंबडा माझ्या दिशेने धावला, पण एकदम थांबला. बहुधा वादिकने ठरविले असावे की, त्यांनी मला भरपूर मारले होते आणि कोंबड्याला त्याने मागे बोलाविले होते. खालच्या मैदानात परत सुरू झालेल्या खेळाकडे मी टेकडीच्या माथ्यावरून सुमारे पाच मिनिटे बघत राहिलो आणि नंतर खाजकुयलींच्या झुडुपांनी भरलेल्या दुसऱ्या बाजूच्या खळग्यात खरबरीत सुक्या गवतावर अंग झोकून ओक्साबोक्शी रडू लागलो.

सबंध जगात त्या दिवशी माझ्याएवढा दुर्दैवी माणूस दुसरा कुणीही नव्हता.

सकाळी मी आरशात माझा चेहरा पाहिला आणि मला धक्काच बसला: नाक सुजले होते, डाव्या डोळ्याखाली निळा डाग पडला होता आणि त्याखाली गालावर रक्ताळलेली जखम. तशा अवतारात शाळेत कसा जाणार? पण शाळेत जाणे आवश्यक होते. काहीही झाले तरी शाळा चुकवून चालणार नव्हते. एक वेळ धरून चालू की, निसर्गाने काही लोकांना माझ्या नाकाएवढे मोठे नाक दिले होते आणि ज्या जागी ते होते त्यावरूनच केवळ त्याला नाक म्हणून ओळखणे शक्य होते; पण गालावरची जखम आणि निळा डोळा – ह्या गोष्टींना खुलासा नव्हता. माझ्या इच्छेविना हे सौंदर्याचे टिळे मला लाभल्याचे स्पष्ट कळत होते.

डोळ्यावर हात धरून मी हळूच वर्गात शिरलो आणि मान खाली घालून डेस्कापाशी बसलो. पहिला धडा माझ्या दुर्दैवाने नेमका फ्रेंचचा होता. आमची वर्गशिक्षिका लीदीया मिखायलोवना इतर शिक्षकांपेक्षा अर्थातच आमच्याकडे जास्त लक्ष द्यायची आणि तिच्यापासून काहीही लपविणे अवघड होते. ती वर्गात येऊन "नमस्ते" म्हणायची, पण आम्हाला खाली बसायला सांगण्यापूर्वी नेहमी प्रत्येकाकडे नजर टाकायची आणि तिच्या शेऱ्यांमध्ये विनोद असला, तरी त्यांचे पालन करावे लागायचे. मी चेहरा लपविण्याचा खूप प्रयत्न केला, तरी अर्थातच माझ्या चेहऱ्यावरच्या खुणा तिने पाहिल्या; इतर मुले माझ्याकडे ज्या तऱ्हेने वळून पाहू लागली होती, त्यावरून मला समजले.

"तर असं आहे," लीदीया मिखायलोवना पुस्तक उघडत म्हणाली, "आज आपल्यात जखमी माणसं आहेत."

वर्ग हसला, पण लीदीया मिखायलोवनाने परत माझ्यावर नजर उचलली. तिची नजर तिरपी होती आणि ती माझ्यापलिकडे कुठेतरी पहात होती असे भासत होते. पण प्रत्यक्षात ती कुठे पहात होती हे ओळखायला एव्हाना आम्ही शिकलो होतो.

"तर काय घडलं?" तिने विचारले.

"पडलो," मी बेधडक खोटे बोललो; पटण्याजोगा खुलासा आधी तयार करण्याची खबरदारी मी घेतली नव्हती.

"अरेरे, किती वाईट! काल पडलास किंवा आज?"

"आज. नाही, काल, संध्याकाळी, अंधार पडल्यावर."

"ही-ही, पडला!" आनंदाने घुसमटत तीश्कीन किंचाळला. "सातवीतल्या वादिकनं त्याला चोपलं. ते जुगार खेळत होते, ह्यानं वाद घालायला सुरवात केली आणि त्याबद्दल प्रसाद मिळाला. मी स्वत: पाहिलं. आणि आता म्हणतो, पडला!"

ह्या विश्वासघाताने मी स्तंभित झालो. तो खरेच एवढा मूर्ख होता अथवा मुद्दाम असे वागत होता? जुगार खेळल्याबद्दल शाळेतून आमची हकालपट्टी झाली असती. माझा चांगलाच खेळ झाला होता. भीतीने माझ्या डोळ्यांपुढे काळोखी आली आणि डोक्यात घण बसू लागले. आता खलास! वा रे तीश्कीन. चांगली टांग मारलीस मला. सगळे स्पष्ट सांगून टाकले.

"तीश्कीन, तुला मी दुसरंच काही विचारणार होते," लीदीया मिखायलोवनाने त्याला आवरले. तिने आश्चर्य दाखविले नव्हते आणि तिचा आवाज नेहमीप्रमाणे शांत होता. "फळ्यापाशी ये, तुला बोलायची इच्छा झालीय, तर उत्तर द्यायची तयारी कर." गोंधळलेला आणि घाबरलेला तीश्कीन फळ्यापाशी येईपर्यंत ती वाट पहात राहिली व मला तुटक म्हणाली: "शाळा संपल्यानंतर थांब."

लीदीया मिखायलोवना मला हेडमास्तरांपाशी घेऊन जाईल अशी मला सर्वांत जास्त धास्ती वाटत होती. म्हणजे आजच्या बैठकीव्यतिरिक्त उद्या मला शाळेच्या सभेसमोर उभे रहावे लागणार आणि जुगारासारख्या लाजिरवाण्या खेळात मी का गुंतलो ह्याबद्दल खुलासा करावा लागणार. हेडमास्तर वासिली आन्द्रेयेविच नेहमी गुन्हेगार मुलाला तसे करायला लावीत—मग खिडकीची काच फोडलेली असो अथवा मुतारीत सिगारेट ओढलेली असो. "असं लाजिरवाणं वर्तन तुला का करावंसं वाटलं?" हात मागे धरून, शाळेसमोर येरझाऱ्या घालीत ते विचारीत. फेऱ्यांबरोबर ते खांद्यांना पुढे झटका देत. त्यामुळे त्यांचा घट्ट बटणे लावलेला फ्रेंच-कोट स्वतंत्रपणे उलट दिशेला झुकल्यासारखा भासायचा.

ते घाई करायचे : "उत्तर दे, उत्तर दे. आम्ही वाट पाहतोय. बघ, तू काय सांगतोस ते ऐकायला सगळी शाळा वाट पाहतेय." विद्यार्थी काहीतरी सबब पुटपुटायचा, पण हेडमास्तर त्याला अडवायचे : "प्रश्नाचं उत्तर दे, प्रश्नाचं. काय होता प्रश्न?" "कशामुळं मला तसं करावंसं वाटलं..." "बरोब्बर – कशामुळं... आम्ही ऐकतोय."

त्या प्रसंगाची अखेर नेहमी आसवे ढाळण्यात व्हायची. केवळ त्यानंतर हेडमास्तरांचे समाधान व्हायचे आणि आम्ही आपापल्या वर्गांमध्ये जात असू. रडण्याची इच्छा नसलेल्या, पण हेडमास्तरांना उत्तरही देऊ न शकणाऱ्या मोठ्या वयाच्या मुलांची फार पंचाईत व्हायची. एकदा आमचा पहिला धडा दहा मिनिटे उशीरा सुरू झाला; तो सारा वेळ हेडमास्तर नववीतल्या एका मुलाला प्रश्न विचारीत होते, पण त्याच्यापासून योग्य उत्तर त्यांना काढता येत नव्हते. अखेर ते त्याला स्वतःच्या कचेरीत घेऊन गेले.

पण मी काय सांगू? त्यापेक्षा एकदम त्यांनी मला शाळेतून हाकलून देणे जास्त चांगले. हा विचार येताच माझ्या मनात पुढचा विचार चमकला : मी घरी जाऊ शकेन. पण तात्काळ चटका बसावा तसा मी घाबरलो. नाही, बेअब्रू घेऊन मी घरी जाऊ शकत नव्हतो. मी स्वतःच शाळा सोडली असती, तर गोष्ट वेगळी. पण मग लोक म्हणाले असते की, ज्याअर्थी माझ्या इच्छेप्रमाणे मी करू शकलो नव्हतो, त्याअर्थी माझ्यावर विसंबणे शक्य नव्हते. प्रत्येकजण माझ्याकडे संशयाने पहात राहिला असता. नाही, तेवढे नको. त्यापेक्षा इथे आणखी सोसेन, सवय करून घेईन, पण अशा अवस्थेत घरी जाणे योग्य नव्हे.

शाळा सुटल्यानंतर भीतीने अर्धमेल्या अवस्थेत मी कॉरीडॉरमध्ये लीदीया मिखायलोवनाची वाट पहात उभा होतो. शिक्षकांच्या खोलीतून ती बाहेर आली आणि तिच्यापाठोपाठ वर्गात जाण्याचा तिने मला मानेने इशारा केला. नेहमीप्रमाणे ती टेबलाशी बसली; मी तिच्यापासून दूर, सर्वांत मागच्या रांगेत जाऊ इच्छित होतो, पण तिने अगदी तिच्या पुढ्यातील पहिल्या डेस्काकडे बोट दाखविले.

"तू पैसे लावून खेळतोस हे खरं?" तिने तात्काळ सुरुवात केली.

ती खूप मोठ्यांदा बोलत होती. अशा गोष्टींची चर्चा इथे शाळेत

दबत्या आवाजात केली पाहिजे अशी माझी धारणा होती आणि माझी भीती आणखीच वाढली. पण ह्यातून बाहेर निसटण्याचा प्रयत्न करण्यात अर्थ नव्हता. तीश्कीनने मला पूर्ण विकले होते. मी तोंडातल्या तोंडात म्हणालो :

"खरं आहे."

"मग – जिंकतोस किंवा हरतोस?"

काय सांगणे जास्त चांगले हे न समजल्यामुळे मी गप्प राहिलो.

"सांगून टाक खरं काय ते. बहुधा हरतोस ना?"

"जि... जिंकतो."

"निदान एवढी एक चांगली गोष्ट. म्हणजे जिंकतोस. मग त्या पैशांचं तू काय करतोस?"

शाळेत प्रथम लीदीया मिखायलोवनाच्या आवाजाची सवय होण्यास मला खूप वेळ लागला होता, तो नेहमी मला गोंधळात टाकायचा. आमच्या खेड्यात माणसे आतल्या खोल आवाजातून बोलायची, त्यांचा आवाज घुमायचा, पण लीदीया मिखायलोवनाचा आवाज बारीक आणि हलका होता, लक्षपूर्वक ऐकावा लागायचा. तिचा आवाज दुबळा नव्हता, जर तिची इच्छा असती तर दमदारपणे ती बोलू शकली असती. जणू श्वास रोखून ती बोलतेय असे भासायचे; एक प्रकारची अनावश्यक काटकसर. ह्या सगळ्याचे खापर फ्रेंचवर फोडायला मी तयार होतो. ही परकी भाषा शिकताना साहजिकच तिचा आवाज दाबला गेला होता, दुबळा बनला होता – पिंजऱ्यातील पाखराप्रमाणे – आणि त्याला परत घुमारा व ताकद यायला काही काळ थांबणे भाग होते. आत्तासुद्धा दुसऱ्या कसल्यातरी कामात असल्याप्रमाणे, काहीतरी अधिक महत्त्वाच्या कामात मन गुंतल्याप्रमाणे, लीदीया मिखायलोवना मला प्रश्न विचारीत होती, पण तिच्या प्रश्नांची उत्तरे टाळणे मला शक्य नव्हते.

"तर मग जिंकलेल्या पैशांचं तू काय करतोस? मिठाई विकत घेतोस? किंवा पुस्तकं? किंवा कशासाठीतरी साठवतोस? तुझ्यापाशी आता खूप पैसे असतील ना?"

"नाही, फार नाहीत. मी फक्त एक रूबल जिंकतो."

"आणि पुढं खेळत नाहीस?"

"नाही."

"एक रूबल? का फक्त एक रूबल? त्याचं काय करतोस?"

"दूध विकत घेतो."

"दूध?"

ती माझ्यासमोर बसली होती: नीटनेटकी, बुद्धिमान, सुंदर पोषाखात आणि मला अस्पष्टपणे जाणवणाऱ्या स्त्रीसुलभ तारुण्यात. एक मंद गंध मला जाणवला. तिचा तो श्वास होता असे मला वाटले. शिवाय ती केवळ गणित अथवा इतिहास शिकवत नव्हती, तर गूढ फ्रेंच भाषा शिकवत होती. त्यामुळे तिच्यात काहीतरी खास, अद्भुत, माझ्यासारख्या सामान्य माणसांना असाध्य असे सामावले होते. डोळे वर उचलून तिच्याकडे पाहण्याचा धीर मला होत नव्हता, पण तिला फसविण्याचा धीरही मला झाला नाही. आणि सरतेशेवटी कशाला मी खोटे बोलू?

ती काही न बोलता माझ्याकडे पहात होती आणि माझ्या कातडीखाली मला जाणवले की, तिचा तिरपा कटाक्ष फेकणाऱ्या डोळ्यांपुढे माझा सारा बावळट अवतार प्रचंड आकार धारण करीत होता. अर्थात मी बघणीयच होतो: तिच्यासमोर जखमी चेहऱ्याचा, बारकुळा, वेडावागडा मुलगा चुळबुळत उभा होता; आईच्या मायेचा हात न लाभणारा, एकाकी; केवळ छातीवर व्यवस्थित बसणारा, तोकड्या बाह्यांना, खांद्यांवर उतरलेला धुवट जुना कोट घातलेला; बापाच्या जुन्या तुमानीपासून बनविलेली फिकट पोपटी रंगाची, कालच्या मारामारीच्या खुणा दाखविणारी आणि चिर्की पद्धतीच्या बुटांमध्ये खोवलेली विजार. मापूर्वीच लीदीया मिखायलोवनाच्या नजरेने माझे बूट टिपल्याचे मी पाहिले होते. वर्गात एकटा मी ह्या प्रकारचे बूट वापरीत होतो. केवळ पुढच्या शरदात जेव्हा मी ते बूट घालून शाळेत जाण्यास साफ नकार दिला, तेव्हा आमची एकमेव संपत्ती असलेले शिवणयंत्र आईने विकले व माझ्यासाठी उंच बूट विकत घेतले होते.

"तरीसुद्धा पैसे लावून खेळू नये," विचारमग्न होत लीदीया मिखायलोवना म्हणाली. "त्याशिवाय तू राहू शकशील. होय ना?"

माझी सुटका झाली होती ह्यावर विश्वास न बसून मी पटकन आश्वासन दिले :

"होय. राहू शकेन."

मी प्रामाणिकपणे बोललो होतो, पण आपल्या प्रामाणिकपणाला दोरीने बांधून ठेवता येत नाही त्याला काय करणार!

खरे सांगायचे तर त्या दिवसांमध्ये माझी स्थिती फार वाईट होती. शरदाचा मोसम कोरडा होता, सामुदायिक शेताने धान्याची पाठवणी लौकर पूर्ण केली होती व वान्याकाका इतःपर येत नव्हता. माझ्या काळजीने आई हैराण असणार ह्याची मला कल्पना होती, पण त्यामुळे आयुष्य सुकर बनत नव्हते. शेवटच्या फेरीच्या वेळी वान्याकाकाने आणून दिलेले बटाट्यांचे पोते एवढ्या चटकन संपले होते, जणू जनावरांना बटाटे खाऊ घातले होते. आवारातील पडक्या आडोशात काही बटाटे लपवून ठेवण्याची माझी कल्पना मला उपयोगी पडली होती. त्या गुप्त साठ्यामुळे मी जिवंत राहिलो होतो. शाळा सुटल्यानंतर मी चोरासारखा हळूच त्या आडोशात जायचा, काही बटाटे खिशात कोंबायचा आणि एखाद्या सोयीस्कर आड जागी शेकोटीत बटाटे भाजायला टेकड्यांकडे पळायचा. मी सतत भुकेला होतो, झोपेतसुद्धा माझ्या पोटात भुकेच्या कोरड्या कळा मला जाणवायच्या.

दुसरे जुगारी शोधण्याच्या आशेने मी शेजारच्या रस्त्यांवरून, ओसाड जागांवरून हिंडू लागलो; टेकड्यांकडे जाणाऱ्या मुलांवर पाळत ठेवू लागलो. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. मोसम संपला होता, ऑक्टोबरचे थंड वारे वाहू लागले होते. फक्त आमच्या पूर्वीच्या खोलगट मैदानात मुले अजून जमत होती. मी जवळपास घोटाळायचा, सूर्यप्रकाशात चमकणारा दगड पहायचा, इतर मुलांना हाताने धमकावणाऱ्या वादिकला पहायचा, नाण्यांवर ओणव्या होणाऱ्या परिचित आकृतींना पहायचा.

शेवटी मला राहवेना आणि मी खाली गेलो. हे अपमानकारक होते ह्याची मला जाणीव होती, पण मला एकदाच चोपून कायमचे हाकलून देण्यात आले होते ह्या वस्तुस्थितीशी जुळवून घेणेही तेवढेच अपमानकारक वाटत होते. माझ्या आगमनाची वादिकवर आणि कोंबड्यावर काय

प्रतिक्रिया होईल ती मला पहायची होती, मी स्वतः कसा वागेन हे पहायचे होते. पण मुख्य प्रेरकशक्ती माझी भूक होती. मला एक रूबल-ची गरज होती – दुधासाठी नव्हे, तर पावासाठी. आणि तो कमावण्याचा दुसरा मार्ग मला माहीत नव्हता.

मी जवळ जाताच खेळ थांबला आणि सगळ्यांचे चेहरे माझ्याकडे वळले. कोंबड्याने टोपीच्या कानावरील पट्ट्या उलट्या वरती वळविल्या होत्या. त्याच्या बेफिकीर पोषाखाच्या रीतीला ते धरून होते. त्याचा आखूड बाह्यांचा चौकड्यांचा सदरा विजारीबाहेर लोंबत होता. वादिक-च्या अंगात सरकत्या झिप्‌चा छान जाड जर्सी होता. सुमारे पाच-सहा जाकीटांच्या व कोटांच्या ढिगावर एक छोटा मुलगा बसला होता.

सर्वांत प्रथम कोंबडा माझ्याशी बोलला:

“कशाला आलास? बऱ्याच दिवसात मार खाल्ला ना-हीस?”

“खेळायला आलोय,” वादिककडे पहात मी जास्तीत जास्त शांतपणे उत्तरलो.

“कुणी सांगितलं तुला, की तुझ्याशी...” कोंबड्याने काही शिव्या हासडल्या, “इथं खेळतील?”

“कुणीही नाही.”

“काय रे वादिक, ताबडतोब चोप देऊ किंवा थोडं थांबू?”

“कोंबड्या, उगाच माणसाला त्रास कशाला देतोस?” माझ्याकडे किलकिल्या डोळ्यांनी पहात वादिक म्हणाला. “समजून घे, माणूस खेळायला आलाय. कदाचित तो आपल्या प्रत्येकाकडून दहा रूबल जिंकू इच्छितोय.”

“तुमच्यापाशी प्रत्येकी दहा रूबल नाहीत,” मी घाबरलो नव्हतो एवढे दाखविण्यासाठी केवळ बोललो.

“तुझ्या कल्पनेपेक्षा आमच्याकडं जास्त पैसे आहेत. लाव पैसे, उगीच बडबडू नको, नाही तर कोंबडा चिडेल. फार गरम डोक्याचा माणूस आहे तो.”

“हाणू का त्याला, वादिक?”

"नको, खुशाल खेळू दे." वादिकने पोरांकडे पाहून डोळे मिचकावले. "तो छान खेळतो, आपण त्याच्या पासंगाला पुरत नाही."

पण एव्हाना मी धडा घेतला होता आणि वादिकचा उदारपणा म्हणजे काय हे मला ठाऊक झाले होते. कदाचित त्याला नीरस खेळाचा कंटाळा आला होता आणि खेळात जरा जास्त गंमत यावी म्हणून मला खेळायला त्याने परवानगी दिली होती. पण त्याच्या गर्वाला मी जरासा धक्का लावला, तर माझी पुन्हा धडगत नव्हती. तो काहीतरी खुसपट ताबडतोब काढील आणि त्याच्या साथीला कोंबडा जय्यत तयार होताच.

सावधपणे खेळायचे आणि जास्त पैसे जिंकायचे नाहीत, असे मी ठरविले. चुकून पैशांना नेम लागेल अशा धास्तीने मी दगड फेकू लागलो, मग पाठीशी कोंबडा उभा नाही अशी खात्री करून एकेक नाण्याला शांतपणे पाडू लागलो. त्या पहिल्या दिवसांमध्ये रूबल जिंकण्याची हिंमत मी केली नाही. पावाच्या तुकड्यापुरते वीस-तीस कोपेक मिळवत होतो. अगदीच काही नसण्यापेक्षा ही परिस्थिती जास्त बरी होती.

पण आज ना उद्या जे घडणे अटळ होते, ते घडलेच. चौथ्या दिवशी जेव्हा मी एक रूबल जिंकला, तेव्हा मला परत मारहाण करण्यात आली. एवढे खरे, ह्यावेळी मार कमी बसला, पण एक खूण राहिली: माझा ओठ जबरदस्त सुजला. त्याला मी कितीही लपवायचा प्रयत्न केला, कितीही चावून धरला, तरी लीदीया मिखायलोवनाच्या नजरेतून तो सुटला नाही. तिने मुद्दाम मला फळ्यापाशी बोलाविले आणि फ्रेंच वाचायला लावले. दहा चांगल्या ओठांनीसुद्धा मी अचूक उच्चार करू शकलो नसतो, मग एका सुजलेल्या ओठाने अशक्यच.

"पुरे, पुरे!" घाबरून लीदीया मिखायलोवना ओरडली व जणू काहीतरी दूर झटकण्यासाठी तिने हात वरती उचलला. "काय हे?! छे:, तुझा स्वतंत्रपणं अभ्यास घेतला पाहिजे. दुसरा मार्ग नाही."

माझे अत्यंत हालांचे आणि अवघड दिवस सुरू झाले. लीदीया मिखायलोवनाबरोबर एकट्याने बसण्याच्या आणि माणसाला छळण्यासाठी शोधलेले शब्द तिच्यापाठोपाठ उच्चारण्यासाठी माझी जीभ मोडण्याच्या त्या घटकेची मी सकाळपासून धास्तावल्या मनाने वाट पहात होतो.

एक जाडजूड लांब ध्वनी काढण्यासाठी, उदाहरणार्थ «beaucoup» शब्दात "ओ", तीन स्वरांना एकत्र कोंबण्याची काय बरे गरज? केवळ मुद्दाम छळण्यासाठीच ना? शतकानुशतके माणसाला दुसऱ्या कारणासाठी उपयोगी पडणाऱ्या नाकामधून ते कण्हण्याचे आवाज कशाला काढत बसायचे? कशाला? सर्वसामान्य शहाणपणाची काही मर्यादा असली पाहिजे. जेव्हा लीदीया मिखायलोवना निर्दयपणे माझ्या गरीब बिचाऱ्या जिभेला बळजबरीने वळवीत होती, तेव्हा मला घाम फुटत होता, मी तांबडालाल होत होतो, श्वास घुसमटत होता. आणि मी एकटाच का? शाळेत माझ्याप्रमाणेच वाईट फ्रेंच बोलणारी अनेक मुले होती, पण ती बाहेर खेळत होती, खुशाल हवे ते करीत होती आणि मी मात्र बळीच्या बोकडाप्रमाणे त्या सर्वांबद्दल शिक्षा भोगत होतो.

पण याहून वाईट संकट यायचे होते. लीदीया मिखायलोवनाने अचानक ठरविले की, शाळेच्या दुसऱ्या पाळीपूर्वी फार कमी वेळ मिळत होता आणि संध्याकाळी तिच्या घरी यायला मला सांगितले. शाळेजवळच्याच शिक्षकांच्या घरात ती रहात होती. घराच्या दुसऱ्या मोठ्या अर्ध्या भागात खुद्द हेडमास्तर रहात होते.

छळाच्या कोठडीत जावे तशा भावनेने मी तेथे गेलो. अर्थातच त्या स्वच्छ, नीटस घरात मी क्षुल्लक बाबींमध्ये लाजत होतो, भीत होतो, गोंधळून जात होतो. प्रथम प्रथम तर श्वासोच्छ्वास करायला घाबरायचा, दगडासारखा बनायचा. मी कोट-बूट काढून ठेवले पाहिजेत, आत गेले पाहिजे, बसले पाहिजे, असे सांगावे लागत होते. अक्षरशः फर्निचर हलवावे तसे मला फिरवावे लागत होते आणि माझ्या तोंडून शब्द पिळून काढण्यासाठी महासायास करावे लागत होते. ह्या सर्व गोष्टी माझे फ्रेंच सुधारण्यास मुळीच उपयोगी पडल्या नाहीत. आश्चर्य म्हणजे शाळेपेक्षा इथे आम्ही कमी वेळ अभ्यास करीत होतो – जेथे दुसरी पाळी फार लौकर येते असे कारण सांगण्यात आले होते! एवढेच नव्हे, तर घरची कामे करता करता लीदीया मिखायलोवना मला प्रश्न विचारायची, किंवा स्वतःबद्दल बोलायची. शाळेत तिचे फ्रेंच चांगले नव्हते म्हणून पुढे कॉलेजात तिने मुद्दाम फ्रेंच विषय घेतला, कारण इतरांप्रमाणे तीसुद्धा फ्रेंचवर चांगले प्रभुत्व मिळवू शकेल अशी तिच्यात जिद्द होती, ही हकी-

कत केवळ माझ्या हितासाठी तिने रचून सांगितली होती, असा मला संशय होता.

एका कोपऱ्यात अंगाची मुटकुळी करून मी ऐकायचा आणि ती केव्हा मला सोडते त्या क्षणाची आतुरतेने वाट पहायचा. खोलीत खूप पुस्तके होती आणि खिडकीजवळच्या स्टूलावर मोठा देखणा रेडिओग्राम होता— त्या काळात ही दुर्मिळ वस्तू होती व माझ्या दृष्टीने नवलाची होती. लीदीया मिखायलोवना रेकॉर्ड लावायची आणि पुरुषाचा छानदार आवाज परत फ्रेंच शिकवायचा. त्यापासून मुळीच सुटका नव्हती. लीदीया मिखा-यलोवना घरच्या साध्या फ्रॉकमध्ये व मऊ नमदी सपातांमध्ये खोलीत वावरायची आणि जेव्हा जेव्हा ती माझ्याजवळ यायची, तेव्हा तेव्हा माझ्या काळजाचे पाणी व्हायचे. मी तिच्या खोलीत बसत होतो ह्यावर माझा विश्वासच बसत नव्हता. तेथील प्रत्येक गोष्ट मला अनपेक्षित आणि असाधारण भासत होती; तेथील हवासुद्धा मला अपरिचित अशा जीव-नाच्या मंद सुवासाने भारलेली वाटायची. त्या जीवनात मी बाहेरून डोकावून पाहतोय अशी भावना मनात यायची आणि अवघड शरमेने मी माझ्या विरविरीत जाकीटात संकोचून जायचा.

लीदीया मिखायलोवना त्यावेळी सुमारे पंचवीस वर्षांची असावी; तिचा रेखीव आणि त्यामुळेच फारसा सजग नसलेला चेहरा, तिरळेपणा लपविण्यासाठी किंचित आकुंचलेले तिचे डोळे, क्वचित पूर्ण हास्य करणारे तिचे मिटले स्मित आणि तिचे आखूड, काळेभोर केस मला चांगले आठवतात. स्वाभाविक सौम्य आणि प्रेमळ असलेल्या शिक्षकांच्या चेहऱ्यां-वरही व्यवसायापायी कालांतराने एक प्रकारचा कठोरपणा येतो. असे पुढे माझ्या ध्यानात आले होते. पण असा करडेपणा तिच्या मुद्रेवर मुळीच नव्हता. मात्र एक प्रकारची सावध, स्वतःबद्दलची शंका तिच्या चेहऱ्यावर तरळत असायची. जणू तिला आश्चर्य वाटत होते: कशी काय मी इथे आले आणि काय करते आहे? आता मला वाटते, ती विवाहित असावी—त्याचवेळी तिच्या आवाजात आत्मविश्वास आणि अनुभवीपणा होता, तिची चाल चपळ, मुक्त आणि ठाम होती, तिचे एकूण वागणे आणि तिची एकूण तऱ्हा आत्मविश्वासाची होती. शिवाय माझे नेहमी असे मत आहे की, रशियन अथवा जर्मन भाषांचा अभ्यास करणाऱ्या

मुलींपेक्षा फ्रेंच किंवा स्पॅनिशचा अभ्यास करणाऱ्या मुली अधिक लौकर स्त्रिया बनतात.

आमचा धडा संपल्यानंतर जेव्हा लीदीया मिखायलोवना मला जेवणाचे निमंत्रण द्यायची, तेव्हा मी किती घाबरायचा आणि अवघडायचा, ह्याची आता आठवण केल्यावर लाज वाटते. जरी मी पूर्वीप्रमाणेच कमालीचा भुकेला होतो, तरी त्या निमंत्रणामुळे माझी एकदम भूकच मरायची. छे:, छे:! लीदीया मिखायलोवनाबरोबर एका टेबलाशी जेवायला बसायचे! त्यापेक्षा उद्यापर्यंत आख्खी फ्रेंच भाषा तोंडपाठ करणे जास्त चांगले, म्हणजे पुन्हा इथे कधीही यायला नको! पावाचा तुकडासुद्धा बहुधा माझ्या घशात अडकला असता! त्या घटकेपर्यंत मला कधी शंकासुद्धा वाटली नव्हती की, लीदीया मिखायलोवना आम्हा सर्वांप्रमाणेच साधे अन्न खात होती– कसलीतरी स्वर्गीय खीर खात नव्हती! कारण ती फारच अपूर्व भासायची, इतरांपेक्षा अगदी वेगळी भासायची.

मी पटकन उठायचा आणि मी खाल्ले आहे, आता आणखी काही नको, असे पुटपुटत भिंतीलगत सरकत दाराकडे जाऊ लागायचा. लीदीया मिखायलोवना माझ्याकडे आश्चर्याने आणि दुखावल्या नजरेने पाहायची, पण मला थोपविणे शक्य नव्हते. मी तेथून पळायचा. असे पुन्हा अनेकदा घडले, अखेरीस लीदीया मिखायलोवनाने मला टेबलाशी जेवण्यास बसण्याचे सांगणे बंद केले. मी अधिक मोकळेपणाने वावरू लागलो.

एके दिवशी शाळेत मला सांगण्यात आले की, खालच्या मजल्यावर कोट टांगून ठेवण्याच्या खोलीत कुणी एका पुरुषाने माझ्यासाठी एक पुडके आणून दिले होते. अर्थातच ड्रायव्हर वान्याकाका असणार, दुसरा कोण! कदाचित घराला कुलूप असेल, माझी शाळा सुटेपर्यंत वान्याकाकाला थांबणे शक्य नसेल, म्हणून पुडके ठेवून गेला असणार. धडे संपेपर्यंत मी कसाबसा धीर धरला आणि नंतर तात्काळ खाली धावलो. शाळा झाडणाऱ्या वेरामावशीने कोपऱ्यातील लाकडी खोक्याकडे बोट दाखविले– पोस्टातून धाडण्यात येणाऱ्या खोक्यांसारखा तो खोका होता. मला आश्चर्य वाटले: खोका कशाबद्दल? आई नेहमी पोत्यामधून खाणे पाठवायची. कदाचित हा खोका माझ्यासाठी नसेल? नाही, त्यावर माझे नाव आणि

वर्ग लिहिले होते. गोंधळ होऊ नये म्हणून वान्याकाकाने लिहिले असावे. खोक्यात खाण्याचे पदार्थ भरून पाठविण्याची कल्पना आईला कुठून सुचली? पहा, कशी बुद्धिमान बनली!

खोक्यात काय होते ते न पाहता खोक्याला घरी नेणे मला शक्य झाले नाही. तेवढा धीर धरवला नाही. आत बटाटे नव्हते हे स्पष्ट होते. पावासाठी खोका लहान होता आणि सोयीस्कर नव्हता. शिवाय तिने नुकताच पाव पाठवला होता व माझ्यापाशी अजून त्यातील थोडा शिल्लक होता. मग काय होते खोक्यात? शाळेतच मी जिन्याखाली सरपटत गेलो. तेथे कुऱ्हाड पडली होती हे मला आठवले आणि कुऱ्हाड शोधून मी खोका उघडला. जिन्याखाली अंधार होता, म्हणून मी परत जिन्याखालून बाहेर पडलो आणि सभोवार कुणी नाही अशी खात्री करून जवळच्या खिडकीच्या चौकटीवर मी खोका ठेवला.

खोक्यातील वस्तू पाहून मी स्तंभित झालो. अगदी वरच्या भागात व्यवस्थित कागदात गुंडाळलेल्या मॅकारोनी होत्या. कमाल! जवळजवळ समांतर रचलेल्या त्या लांब पिवळट नळकांड्या माझ्या डोळयांना दिपवून टाकणारी अमोल संपत्ती होत्या. हे माझ्या कल्पनेपलिकडचे घडले होते. आईने खोका का पाठवला आता स्पष्ट झाले – मॅकारोनी न मोडता, त्यांचा चुरा न होता, धडधाकट स्थितीत त्या माझ्यापाशी पोहोचाव्यात. मी हलकेच एक नळी उचलली, तिला निरखून पाहिले, तिच्यामधून फुंकर मारली व न राहवून आधाशीपणे कुडुम कुडुम आवाज करीत खाऊ लागलो. मग दुसरी खाल्ली, तिसरी खाल्ली आणि माझ्या घरमालकिणीच्या कोठीघरातील लोभी उंदरापासून मॅकारोनी सुरक्षित राखण्यासाठी खोका कुठे ठेवावा ह्याबद्दल विचार करू लागलो. आईने अखेरच्या पैशातून विकत घेतलेली मॅकारोनी त्यांच्यासाठी नव्हती. नाही, मॅकारोनी मी तशी सहज हातची जाऊ देणार नव्हतो. हे काही बटाटे नव्हते!

अचानक मी दचकलो. खरेच, मॅकारोनी आईला कुठून मिळाली? खेड्यात ही वस्तू कधीच नव्हती, पैसे असते तरी विकत घेणे शक्य नव्हते. मग ह्याचा अर्थ काय? आशानिराशेच्या संमिश्र भावनांनी मी मॅकारोनी घाईघाईने बाजूला सारल्या, तेव्हा त्यांच्याखाली खडीसाखरेचे अनेक मोठमोठे खडे होते व व्हिटॅमिनच्या दोन वड्या होत्या. त्या

व्हिटॅमिनच्या वड्यांनी सिद्ध केले: आईने खोका पाठवला नव्हता! तर मग कुणी? मी परत खोक्यावर नजर टाकली: माझा वर्ग, माझे नाव – म्हणजे मलाच. आश्चर्य, फार आश्चर्य!

खोक्याच्या झाकणाच्या भोकांमध्ये मी परत खिळे बसविले आणि खिडकीच्या चौकटीत खोका तसाच ठेवून वरच्या मजल्यावर गेलो व शिक्षकांच्या खोलीचे दार ठोठावले. पण लीदीया मिखायलोवना केव्हाच निघून गेली होती. काही बिघडत नव्हते, ती कुठे रहात होती हे मला ठाऊक होते. अच्छा, म्हणजे असे: टेबलाशी खायला बसत नाहीस, तर घरपोच पदार्थ घे! म्हणजे दुसऱ्या कुणाचे हे काम नक्की नाही! आईने हा खोका पाठवलेला नाही. जर पाठवला असता, तर हे पदार्थ कुठून मिळाले ह्याचा खुलासा करणारी चिठी सोबत निश्चित धाडली असती.

जेव्हा मी खोक्यासह दारात उभा राहिलो, तेव्हा लीदीया मिखायलोवनाने काहीही न समजल्याचा आव आणला. तिच्यासमोर मी खोका जमिनीवर ठेवला तेव्हा तिने आश्चर्याने विचारले:

"हे काय? काय घेऊन आलास? कशाला?"

"हे तुम्ही केलंत," मी कापऱ्या, रडव्या सुरात म्हणालो.

"मी काय केलं? कशाबद्दल बोलतो आहेस?"

"तुम्ही शाळेत हे पार्सल पाठवलंत. मला ठाऊक आहे – तुम्ही."

लीदीया मिखायलोवना लाजून लाल झाली आणि गोंधळली हे माझ्या ध्यानात आले. तिच्या नजरेला नजर भिडविण्यास कदाचित तेव्हा एकदाच मी भ्यायलो नव्हतो. ती माझी मास्तरीण असो वा मावशी असो – त्यावेळी मला पर्वा नव्हती. आता प्रश्न मी विचारीत होतो, ती नव्हे, आणि फ्रेंचमध्ये नव्हे तर रशियनमध्ये, कोणत्याही उपपदांविना. खुशाल ती उत्तरे देवो.

"मी पाठवला खोका, असं तुला का वाटलं?"

"कारण आमच्या घरी मॅकारोनी कधीही मिळत नाही. किंवा व्हिटॅमिनच्या वड्या."

"काय! अजिबात मिळत नाहीत?" तिचे आश्चर्य इतके प्रामाणिक होते, की त्यात तिचा गुन्हा सपशेल उघडा पडला होता.

"नाही, मुळीच मिळत नाहीत. तुम्हाला ठाऊक असायला पाहिजे."

लीदीया मिखायलोवना खो खो हसू लागली आणि मला मिठीत घेण्याचा तिने प्रयत्न केला, पण मी तिच्यापासून दूर झालो.

"खरंच, ठाऊक करून घ्यायला पाहिजे होतं. अशी कशी मी चूक केली?!" ती क्षणभर विचारात गुरफटली. "पण खरंच याबद्दल विचार करणं अवघड होतं! मी नेहमी शहरात राहिलेय. तुमच्याकडं अजिबात मिळत नाहीत ह्या वस्तू? तर मग काय मिळतं?"

"वाटाणे मिळतात. मुळा मिळतो."

"वाटाणे... मुळा... आमच्या कूबानमध्ये सफरचंदं मिळतात. आत्ता तिथं खूप खूप सफरचंदं पिकतात! यंदा मी कूबानमध्ये जाणार होते, पण का कोण जाणे, इकडं आले." लीदीया मिखायलोवनाने सुस्कारा टाकला व माझ्याकडे तिरप्या नजरेने पाहिले. "चिडू नको. अधिक चांगलं व्हावं अशी माझी इच्छा होती. मॅकारोनी माझा घात करतील ह्याची कुणाला कल्पना? हरकत नाही, आता यापुढं जास्त शहाणी होईन. पण ह्या मॅकारोनी तू घे..."

"नाही घेणार," मी तिचे बोलणे अर्ध्यावर तोडले.

"असं का वागतोस? तुझी उपासमार होतेय हे मला माहीत आहे. मी एकटीच राहते, माझ्यापाशी पैसे खूप आहेत. मला हव्या त्या वस्तू मी विकत घेऊ शकते, पण मला एकटीला... मी कमी खाते, लठ्ठ होईन अशी भीती वाटते."

"माझी मुळीच उपासमार होत नाही."

"माझ्याशी कृपा करून वाद घालू नको. मला माहीत आहे. तुझ्या घरमालकिणीशी मी बोललेय. आत्ता ही मॅकारोनी घेऊन गेलास आणि जेवणासाठी आज शिजवलीस तर काय वाईट होईल? का मी तुला मदत करायची नाही – आयुष्यात एकदाच? वचन देते, यापुढं एकही पार्सल पाठवणार नाही. पण कृपया, एवढं एक घे. अभ्यास करायचा असेल तर तू पोटभर खाणं आवश्यक आहे. आपल्या शाळेत तुडुंब खाणारी कितीतरी मठ्ठ पोरं आहेत, ज्यांना काही समजत नाही आणि कदाचित कधीच अक्कल येणार नाही. पण तू बुद्धिमान मुलगा आहेस, तू शिक्षण अर्ध्यात टाकून चालणार नाही."

तिच्या आवाजाचा माझ्यावर गुंगीसारखा प्रभाव पडू लागला होता. ती माझे मन वळवील अशी मला भीती वाटत होती, कारण तिचे बोलणे बरोबर होते हे मला कळत होते आणि तरीही मी ते मान्य करू देणार नव्हतो, म्हणून स्वतःवरच चिडत होतो. मान हलवीत आणि काहीतरी पुटपुटत मी दाराकडे धावलो.

आमची शिकवणी थांबली नाही, लीदीया मिखायलोवनाकडे मी येत राहिलो. आता तिने खरेच मनावर घेतले. जणू तिने ठरविले होते: ठीक आहे, फक्त फ्रेंच तर फ्रेंच! आणि त्यातून खरोखरीच फलिते मिळू लागली, हळूहळू मी फ्रेंच शब्दांचे अधिक चांगले उच्चार करू लागलो. इतःपर अवजड धोंड्यांप्रमाणे ते माझ्या पायांशी पडत नव्हते, तर खणखणत होते आणि उडून जाण्याचा प्रयत्न करीत होते.

"छान," लीदीया मिखायलोवना मला शाबासकी द्यायची. "ह्या तिमाहीत तुला पाच गुण मिळणार नाहीत, पण पुढच्या तिमाहीत नक्की मिळतील."

पार्सलाचा आम्ही परत उल्लेख केला नाही, पण तरीही मी सतत सावध होतो. लीदीया मिखायलोवना कधी कशी वागेल काय नेम? मला स्वतःवरून माहीत होते: जर एखादी गोष्ट जमली नाही, तर तुम्ही तिचा नाद सोडत नाही, दुसऱ्या मार्गाने प्रयत्न करता. मला जाणवत होते की, लीदीया मिखायलोवना माझ्याकडे अपेक्षेने पहात होती आणि मग माझ्या रानटी स्वतंत्रपणाबद्दल स्वतःशी हसत होती; मला राग यायचा, पण आश्चर्य म्हणजे त्या रागापायी माझा विश्वास वाढायचा. एक पाऊलसुद्धा इकडेतिकडे हलवायला घाबरणारा दुबळा, असहाय मुलगा इतःपर मी राहिलो नव्हतो. हळूहळू लीदीया मिखायलोवनाची आणि तिच्या खोलीची मला सवय झाली होती. तसे माझे लाजरेपण अजून कायम होते आणि खुर्चीखाली माझे चिर्की बूट लपवून एका कोपऱ्यात मी बसत होतो; पण माझी पूर्वीची मुखदुर्बळता नाहीशी झाली होती. लीदीया मिखायलोवनाला प्रश्न विचारण्याचे आणि तिच्याशी वाद घालण्याचेही धारिष्टच मला आले होते.

पुन्हा एकदा मला जेवायचा तिने आग्रह केला, पण व्यर्थ. मी खंबीर राहिलो. दहाजणांचा हट्टीपणा माझ्यात एकवटलेला होता.

बहुधा ही घरची शिकवणी आता बंद करायला हरकत नव्हती, मुख्य अडचणीवर मी मात केली होती, माझी जीभ लवचिक बनली होती, बाकीच्या गोष्टी मी शाळेतील धड्यांबरोबर जमवू शकलो असतो. अजून पुढे खूप वर्षे होती. आत्ताच अथपासून इतिपर्यंत मी शिकून टाकले तर पुढे काय करणार? पण ह्याबाबत लीदीया मिखायलोवनापाशी काही बोलण्याचा मला धीर झाला नाही आणि आम्ही अभ्यासक्रम पूर्ण केला होता असे तिला वाटत नसावे, म्हणून मी फ्रेंच दळणे चालू ठेवले होते. जाता जाता सांगायचे तर खरेच ते दळणे होते का... कसे ठाऊक नाही, पण मला ती भाषा आवडू लागली होती आणि फावल्या वेळी कुणी न सांगताही मी शब्दकोश धुंडाळू लागलो होतो, अजून शिकवलेले पुस्तकातील धडे वाचू लागलो होतो. दळणे आनंददायी बनले होते. शिवाय माझा अभिमान उसळून आला होता: पूर्वी जमत नव्हते, आता जमले होते आणि तेसुद्धा उत्कृष्ट. इतरांपेक्षा मी काय वाईट होतो? फक्त लीदीया मिखायलोवनाकडे जाणे बंद व्हायला हवे होते. मी एकट्याने अभ्यास केला असता.

पार्सलाचा प्रसंग घडल्यानंतर सुमारे दोन आठवड्यांनी, एके दिवशी लीदीया मिखायलोवनाने मला विचारले:

"आता तू पैसे लावून खेळत नाहीस? किंवा कुठंतरी आडबाजूला जमून खेळता?"

"आता कसं खेळणार?!" मी आश्चर्याने खिडकीबाहेर पहात म्हणालो. एव्हाना सर्वत्र बर्फ पडले होते.

"काय होता हा खेळ? कसा खेळतात?"

"तुम्हाला कशाला हवी माहिती?" मी सावध झालो.

"कुतूहल म्हणून. आम्हीसुद्धा लहानपणी खेळत होतो. तोच हा खेळ आहे काय, एवढंच मला जाणून घ्यायचंय. सांग, सांग, घाबरू नको."

"मी कशाला घाबरू?!"

मी तिला खेळाबद्दल सांगितले. पण अर्थातच वादिक, कोंबडा आणि खेळातील माझ्या छोट्या युक्त्या यांच्याबद्दल काही बोललो नाही.

"नाही," लीदीया मिखायलोवनाने नकारार्थी मान हलविली.

"तुझ्या ह्या 'आग' खेळाबद्दल प्रथमच ऐकतेय. आम्ही 'चीका' खेळत असू. तुला माहीत आहे तो खेळ?"

"नाही."

"इकडं बघ." ती ताडकन उठली, हँडबॅगेतून तिने काही नाणी काढली आणि भिंतीपासून खुर्ची दूर सरकवली. "इकडं ये, बघ. मी नाणं भिंतीवर मारते." तिने हलकेच नाणे भिंतीवर फेकले आणि ते खणखणत गोलाकार फरशीवर पडले. "आता," तिने दुसरे नाणे मला दिले, "तू फेक. पण लक्षात ठेव—माझ्या नाण्याच्या जास्तीत जास्त जवळ तुझं नाणं पडणं आवश्यक आहे. म्हणजे एका हाताच्या बोटांनी मापल्यास त्याला स्पर्श करता आला पाहिजे. ह्या खेळाला 'मापं' असंही नाव आहे. जर हात पोचला, तर तू जिंकलास. फेक."

मी नाणे फेकले, पण माझे नाणे कडेवर पडल्यामुळे घरंगळत दूर कोपऱ्यात गेले.

"ओ-ओ," लीदीया मिखायलोवनाने हात झटकला. "खूप लांब. आता तू सुरवात कर. पण लक्षात ठेव—जर माझ्या नाण्याचा तुझ्या नाण्याला नुसता कडेशी स्पर्श झाला, तर मी दुप्पट जिंकले. ह्याला 'चीका' म्हणतात. 'चीकनट' म्हणजे 'स्पर्श' ह्या शब्दापासून. समजलं?"

"ह्यात न समजण्यासारखं काय आहे?"

"खेळूया?"

माझा स्वतःच्या कानांवर विश्वास बसेना:

"मी तुमच्याशी खेळू?"

"का नाही?"

"तुम्ही शिक्षिका आहात!"

"मग काय झालं? शिक्षिका काय माणूस नाही? काहीवेळा नुसती शिक्षिका असायचा मला खूप कंटाळा येतो. सतत नुसतं शिकवायचं, शिकवायचं, त्याला अंत नाही. नेहमी स्वतःला आवरून धरायचं: अमूक करायचं नाही, तमूक करायला मनाई." लीदीया मिखायलोवनाने नेहमीपेक्षा जास्त डोळे किलकिले केले व विचारमग्नपणे खिडकीबाहेर ती पाहू लागली. "कधी कधी विसरणं हिताचं असतं, की तू शिक्षिका

आहेस. नाही तर 'हे कर' आणि 'हे करू नको' असं माझ्या तोंडून सतत ऐकण्याचा इतर माणसांना वीट येईल आणि ती माझ्या जवळपास फिरकणार नाहीत. मला वाटतं, शिक्षकानं स्वत:ला फारसं गंभीरपणं घेऊ नये, दुसऱ्यांना फारसं शिकवता येत नाही हे समजून घेतलं पाहिजे – हे सर्वांत महत्त्वाचं आहे." तिने मानेला हलका झटका दिला आणि तिचा चेहरा परत आनंदी बनला. "लहानपणी मी फार वांड होते, माझे आई-वडील सतत माझ्यामुळं हैराण होत. अजूनही मला वारंवार उड्या माराव्याशा वाटतात, धावावंसं वाटतं, कुणाचा तरी पाठलाग करावासा वाटतो किंवा अभ्यासक्रमात अथवा वेळापत्रकात नसेल असं काहीतरी करावंसं वाटतं. केवळ मनात इच्छा येईल तसं वागावंसं वाटतं. इथं मी काहीवेळा उड्या मारते. माणूस खूप वर्षंपर्यंत जगला म्हणजे म्हातारा होत नाही, तर जेव्हा तो लहान मुलाप्रमाणं वागायचा थांबतो, तेव्हा म्हातारा बनतो. मी इथं दररोज उड्या मारल्या असत्या, पण ह्या भिंतीपलिकडं वासिली आन्द्रेयेविच राहतात. ते फार गंभीर गृहस्थ आहेत. आपण 'चीका' खेळत होतो हे त्यांना कधीही समजता कामा नये."

"पण आपण खेळलोच नाही. तुम्ही मला फक्त खेळ दाखवलात."

"आपण पैशांसाठी नव्हे, तर केवळ गंमत म्हणून खेळू. पण तरीही वासिली आन्द्रेयेविचपाशी माझ्याबद्दल चुगली करू नको."

देवा, ह्या जगात काय काय गोष्टी घडतात! मी जुगार खेळतो म्हणून लीदीया मिखायलोवना मला हेडमास्तरांपाशी घेऊन जाईल म्हणून मी थरकाप घाबरलो होतो त्या घटनेला काही फार काळ लोटला नव्हता आणि आता ती मला म्हणत होती की, तिच्याबद्दल मी हेडमास्तरांपाशी चुगली करू नये! साक्षात चमत्कार! मी घाबरून भोवताली नजर टाकली; तसे मी का केले हे सांगणे मला शक्य नाही आणि गोंधळून पापण्यांची उघडझाप केली.

"मग काय, खेळून बघायचं? आवडलं नाही, तर बंद करू."

"ठीक आहे," डळमळीतपणे मी होकार दिला.

"सुरवात कर."

आम्ही नाणी घेतली. लीदीया मिखायलोवना एकेकाळी खरेच खेळली

होती हे दिसून येत होते ; त्याउलट मला खेळाचा थोडासा सराव होत होता. नाणे भिंतीवर कसे फेकायचे – कडेवर अथवा चपट्या बाजूने, किती उंचीवर आणि किती ताकद लावून – ह्याचा मला अजून अंदाज येत नव्हता. माझ्या फेकी आंधळ्या होत्या ; जर आम्ही हिशेब केला असता, तर पहिल्या मिनिटांमध्ये मी खूप पैसे हरलो असतो. वस्तुत: ह्या 'चीका' खेळात विशेष अवघड असे काही नव्हते. अर्थात, लीदीया मिखायलोवनाबरोबर खेळायला मला लाज वाटत होती आणि त्यामुळे माझ्या अवघडलेपणात अधिक भर पडत होती. ही वस्तुस्थिती मला स्वप्नातसुद्धा दिसली नसती, कल्पनेतसुद्धा असा विचार माझ्या मनाला कधी शिवला नसता. भानावर यायला मला बराच वेळ लागला आणि जेव्हा एकाग्रतेने मी खेळू लागलो, तेव्हा लीदीया मिखायलोवनाने खेळ थांबविला.

"ह्यात मजा नाही," ताठ उभे रहात आणि डोळ्यांवर आलेले केस मागे सारीत ती म्हणाली. "खेळायचं तर अस्सल खेळलं पाहिजे. हे आपलं खेळणं तीन वर्षांच्या मुलांसारखं चाललंय!"

"तर मग तो जुगार ठरेल," मी घाबरत म्हणालो.

"अर्थात. पण आपल्या हाती काय आहे? जुगारी खेळ दुसऱ्या रीतीनं खेळताच येत नाही. ह्यात चांगलं आहे आणि वाईटसुद्धा. आपण कमी रकमा लावून खेळू, पण तरीही त्यामुळं मजा येईल, तणाव येईल, थरार येईल..."

काय करावे, कसे वागावे, हे न समजून मी गप्प राहिलो.

"घाबरतोस काय?" लीदीया मिखायलोवनाने मला डिवचले.

"कमाल आहे! मी मुळीच भीत नाही!"

माझ्यापाशी थोडे सुटे पैसे होते. लीदीया मिखायलोवनाला मी तिचे नाणे दिले आणि माझ्या खिशातून स्वत:चे नाणे काढले. ठीक आहे, लीदीया मिखायलोवना, तुमची इच्छाच आहे, तर खेळू जुगार. मला काय, मी प्रथम सुरवात केलेली नाही. पहिल्यांदा वादिकनेसुद्धा माझ्याकडे विशेष लक्ष दिले नव्हते, पण मग त्याचे मन बदलले आणि त्याने मुठींचा वापर केला. तिथे मी शिकलो, आता इथे शिकतो. ही काही फ्रेंच भाषा नव्हे! आणि लौकरच फ्रेंचवरसुद्धा मी लगाम घालीन!

मला एक अट मान्य करावी लागली: लीदीया मिखायलोवनाचा हात जास्त मोठा होता आणि बोटे अधिक लांब होती, म्हणून तिने अंगठा व मधले बोट ह्यांनी मापायचे आणि मी अंगठा व करंगळी ह्यांनी मापायचे. हे योग्य होते आणि मी कबुली दिली.

आम्ही नव्याने खेळ सुरू केला. आम्ही खोलीतून प्रवेशद्वारापाशी गेलो, तेथे अधिक मोकळी जागा होती आणि गुळगुळीत लाकडी पार्टीशनवर नाणी फेकू लागलो. आम्ही नाणी फेकत होतो, गुडघ्यांवर टेकत होतो, फरशीवर रांगताना एकमेकांवर आपटत होतो, मापे घ्यायला हाताची बोटे ताणत होतो, मग परत उठत होतो आणि लीदीया मिखायलोवना निकाल जाहीर करत होती. ती खूप गोंगाट करून खेळत होती, चीत्कारत होती, हातांनी टाळ्या वाजवत होती, मला चिडवत होती — एकूण मास्तरणीपेक्षा शाळकरी मुलीसारखी जास्त वागत होती. काहीवेळा तिच्यावर उलट ओरडायची मला इच्छा व्हायची. पण तरीही ती जिंकत होती आणि मी हरत होतो. काही समजायच्या आत मी ऐंशी कोपेक हरलो. मोठ्या मुष्कीलीने ती रक्कम मी तीसपर्यंत खाली आणली, पण लीदीया मिखायलोवनाचे नाणे दुरून माझ्या नाण्यापाशी पडले आणि माझे कर्ज परत पन्नासपर्यंत चढले. मी चिंतेत पडलो. खेळाच्या अखेरी हिशेब करायचा असे आम्ही ठरविले होते, पण असाच खेळ पुढे जात राहिला, तर माझ्याजवळचे पैसे पुरले नसते. माझ्यापाशी एक रूबलपेक्षा थोडी जास्त रक्कम होती. तेव्हा रूबलपेक्षा जास्त कर्ज करणे माझ्या दृष्टीने इष्ट नव्हते. अन्यथा नाचक्की झाली असती, सबंध आयुष्यभर कलंक लागला असता.

अचानक मी पाहिले की, लीदीया मिखायलोवना जिंकण्याचा प्रयत्न करीत नव्हती. जेव्हा ती मापायची, तेव्हा बोटे वाकवायची. जेथे नाण्यापाशी तिचा हात पोहोचत नव्हता असे म्हणाली, तेथे माझा हात सहज पुरला होता. अपमानीत होऊन मी उठलो.

"नाही," मी म्हणालो, "असं मी खेळणार नाही. का तुम्ही हरताय? हे प्रामाणिकपणाचं नाही."

"पण माझा खरंच हात पुरत नाही," तिने विरोध केला. "माझी बोटं लाकडासारखी बनलीत."

"तुमचा हात पुरेल."

"बरं, बरं, मी प्रयत्न करीन."

गणितात काय ते मला माहीत नाही, पण आयुष्यात सर्वांत स्पष्ट पुरावे मिळतात प्रतिस्पर्ध्यांकडून. दुसऱ्या दिवशी लीदीया मिखायलोवना धूर्तपणे तिचे नाणे हाताने माझ्या नाण्यापाशी सरकवत असलेली जेव्हा मी पाहिले, तेव्हा थक्क झालो. तिचा खोटेपणा मी पाहिला होता हे तिच्या ध्यानात आल्याचे दिसले नाही. ती तसेच नाणे पुढे सरकवत राहिली.

"तुम्ही काय करताय?" चिडून मी विचारले.

"मी? काय करतेय मी?"

"ते नाणं तुम्ही का सरकवलंत?"

"मुळीच नाही, ते इथंच पडलं होतं," तिने धडधडीत नकार दिला, अगदी आनंदाने—थेट वादिक किंवा कोंबड्याप्रमाणे.

अरे वा! म्हणे मास्तरीण! खुद्द मी पाहिलं होते, वीस सेंटीमीटर अंतरावरून पाहिले होते, तिने नाणे सरकवले होते आणि आता खात्री-पूर्वक सांगत होती की, तिने नाण्याला हात लावला नव्हता, आणखी वर हसत होती. मला काय आंधळा समजली? लहान बाळ समजली? म्हणे फ्रेंच भाषा शिकवते! अवघ्या कालच्या दिवशीच लीदीया मिखाय-लोवना मुद्दाम माझ्यासाठी हरत होती ह्याचा मला विसर पडला होता आणि तिने मला फसवू नये म्हणून मी लक्ष ठेवून होतो. वा रे वा! म्हणे लीदीया मिखायलोवना!

त्या दिवशी फ्रेंचवर आम्ही फक्त पंधरा किंवा वीस मिनिटे खर्चली आणि त्यानंतर त्याहूनही कमी वेळ. आम्हाला दुसरा छंद लागला होता. लीदीया मिखायलोवना मला एखादा परिच्छेद वाचायला लावायची, माझ्या चुका सुधारायची, परत एकदा ऐकायची आणि नंतर आम्ही खेळ सुरू करायचा. दोन छोट्या पराजयांनंतर मी जिंकू लागलो. लौ-करच 'चीका' माझ्या ध्यानात आला, त्यातील सर्व खुब्या मला अव-गत झाल्या.

परत माझ्यापाशी पैसे खुळखुळू लागले. परत मी बाजारात धावू लागलो, कडांना गोठलेले दूध विकत घेऊ लागलो. वरची गोठलेली

साय मी काळजीपूर्वक कापायचा, थंडगार तुकडे तोंडात टाकायचा आणि त्यांची मधुरता सर्वांगात जाणवायची. मग भांडे उलटे करून चाकूने हिरवट, गोडसर तळ खरवडून खायचा. बाकीचे दूध वितळवून काळ्या पावाबरोबर प्यायचा.

एकूण जगणे शक्य होते आणि लौकरच युद्धामुळे झालेली हानी भरून काढल्यानंतर सर्वांना सुखाचे दिवस दिसणार होते.

अर्थात, लीदीया मिखायलोवनाकडून पैसे घेताना मला अवघड होते, पण मी प्रामाणिकपणे ते पैसे जिंकत होतो, असे स्वत:चे समाधान करून घेत होतो. खेळण्याचा प्रस्ताव मी स्वत: कधीही मांडला नव्हता, तीच नेहमी सुचवायची. नकार देण्याची माझ्यात हिंमत नव्हती. मला वाटले, तिला त्यात मजा वाटत होती, ती आनंदी वागायची, हसायची, मला खेचायची.

ह्या सगळ्याची अखेर काय होणार हे जर आम्हाला ठाऊक असते..

...एकमेकांसमोर गुडघ्यांवर टेकून आम्ही हिशेबावर वाद घालत होतो. त्याआधीसुद्धा आमचा दुसऱ्या कशाबद्दल तरी वाद झाला होता.

"अरे मठ्ठ डोक्याच्या, जरा समजून घे," माझ्या दिशेने सरकत, हातवारे करीत ती म्हणाली. "कशाला मी तुला फसवू? मी हिशेब करतेय, तू नव्हे. मला जास्त चांगलं माहीत आहे. तीनदा ओळीनं मी हरले आणि त्यापूर्वी 'चीका' झाला होता."

"तो 'चीका' मोजायचा नाही."

"का नाही मोजायचा?"

"तुमचासुद्धा 'चीका' झाला होता."

आम्ही मोठमोठ्यांदा ओरडत होतो, एकमेकांच्या बोलण्यात अडथळा आणत होतो, तेवढ्यात अचानक एक आश्चर्याचा–घाबरलेला म्हणता येणार नाही–पण ठाम खणखणीत आवाज आम्ही ऐकला:

"लीदीया मिखायलोवना!"

आम्ही थिजलो. वासिली आन्द्रेयेविच दारात उभे होते.

"लीदीया मिखायलोवना, काय झालंय तुम्हाला? इथं काय चाल-लंय?"

लीदीया मिखायलोवना सावकाशपणे, अगदी खूप सावकाशपणे,

गुडघ्यांवरून उठून उभी राहिली. तिचा चेहरा लालबुंद बनला होता, केस विस्कटलेले होते. तिने केसांना मागे सारून व्यवस्थित केले.

"वासिली आन्द्रेयेविच, माझी अपेक्षा होती की, इथं आत येण्यापूर्वी तुम्ही दार ठोठावाल."

"मी ठोठावलं. मला कुणीही उत्तर दिलं नाही. इथं काय चाललंय ह्याचा कृपया खुलासा कराल? हेडमास्तर ह्या नात्यानं जाणून घेण्याचा मला हक्क आहे..."

"आम्ही 'चीका' खेळतोय," लीदीया मिखायलोवनाने शांतपणे उत्तर दिले.

"तुम्ही पैसे लावून खेळताय—ह्याच्याबरोबर?" वासिली आन्द्रेयेविचनी माझ्याकडे जोराने बोट दाखविले आणि मी घाबरून खोलीत लपण्यासाठी पार्टिशनमागे रांगत गेलो. "विद्यार्थ्याबरोबर जुगार खेळताय? मला तुमचं सांगणं बरोबर समजलं?"

"बरोबर."

"कमाल आहे!" हेडमास्तरांचा श्वास घुसमटला. "तुमच्या वर्तनाचं वर्णन करायला मला शब्द सुचत नाहीत. हा गुन्हा आहे! लबाडी आहे! नीचपणा आहे! आणि... आणखी... मी वीस वर्षं शाळेत काम करतोय, खूप गोष्टी पाहिल्यात, पण असं कधी..."

आणि त्यांनी डोक्यावर हात उडविले.

तीन दिवसांनंतर लीदीया मिखायलोवना निघून गेली. जाण्याच्या आदल्या संध्याकाळी शाळा सुटल्यानंतर ती मला भेटली आणि माझ्या घरापर्यंत सोबत आली.

"मी कूबानला परत चाललेय," निरोपाच्या वेळी ती म्हणाली. "तू शांतपणं पुढं शीक. ह्या मूर्ख प्रसंगाबद्दल कुणीही तुला धक्का लावणार नाही. इथं माझी चूक आहे. तू शीक." तिने माझे केस विस्कटले आणि ती निघून गेली.

परत तिला मी कधीही पाहिले नाही.

हिवाळ्याच्या मध्यास, जानेवारीतील सुटीनंतर, शाळेत माझ्या नावावर एक पार्सल आले. जेव्हा मी जिन्याखालील त्याच कुऱ्हाडीने

खोका उघडला, तेव्हा व्यवस्थितपणे रांगेत रचलेल्या मॅकारोनी माझ्या दृष्टीला पडल्या. आणि त्यांच्याखाली जाड कापसाच्या आच्छादनात तीन लालबुंद सफरचंदे होती.

त्यापूर्वी फक्त चित्रांमध्ये मी सफरचंदे पाहिली होती, पण आता तीच ही असे तर्काने जाणले.

१९७३

यूरी नगीबिन

नवा नवरा

यूरी नगीबिन (जन्म १९२०). यूरी नगीबिन सर्वसामान्य वाचकांमध्ये अनेक दशके लोकप्रिय आहेत. १९५० नंतरच्या त्यांच्या कथा: 'पाईप', 'हिवाळी ओक', 'कोमारोव'; 'अध्यक्ष', 'चैकोवस्की', 'बायकांचे राज्य' ह्या चित्रपटांच्या पटकथा व 'लहानपणाबद्दलचे पुस्तक' (१९७२) हे आत्मचरित्रात्मक कथांचे पुस्तक, ह्यांनी त्यांना अफाट कीर्ती दिली.

नगीबिन ह्यांच्या गुणांचे नेमके वर्णन करणे सोपे नाही. त्यांचे कार्य खूप विविध आहे आणि कमालीच्या अनपेक्षित अस्सलपणाने त्यांनी ते पूर्णत्वाला नेले आहे. काळाच्या महत्त्वाच्या समस्यांबाबत त्यांना वाटणारे तीव्र व सततचे कुतूहल उल्लेखता येईल. ह्या समस्या "जागतिक" बनण्याच्या फार आधीच त्यांनी पाहिल्या होत्या (उदाहरणार्थ, माणूस आणि निसर्ग ह्यांच्यामधील नाते). भूतकाळातील साहित्य व कलेबद्दल त्यांना वाटणारे व्यावसायिक स्वारस्य, मानसशास्त्रीय गद्यप्रभू आणि युद्धविषयांचे लेखक अशी त्यांना ख्याती देऊन गेलेय...

नगीबिन यांची पहिली लघुकथा 'दुहेरी चूक' १९४० साली प्रसिद्ध झाली. १९४२ साली वोल्खोव युद्धआघाडीवर असताना प्रतिनिधित्वाच्या मताने त्यांना सोविएत संघाच्या लेखक-संघाचे सदस्यत्व देण्यात आले.

नगीबिन फार चतुर कथानिवेदक आहेत. नकलेसाठी नमूना निवडण्याच्या मोहाला बळी न पडता त्यांनी रशियन व सोविएत कादंबरीची तंत्रे आत्मसात केली आहेत, स्वतःची "नगीबिन" कथा निर्माण केली आहे; ह्या शैलीच्या असंख्य उदाहरणांमध्ये ती चटकन ओळखता येते.

पोदस्व्यात्येमध्ये शिकारी शोधून काढणे फार अवघड आहे असे वोरोनोवला त्या म्हातारीकडून समजले. प्रा नदीच्या दुसऱ्या तीराला ती वोरोनोवला छोटया होडक्यातून घेऊन जात होती. ती उंच, प्रमाणबद्ध शरीराची होती आणि तिच्या भक्कम पायांमध्ये उंच बूट होते; तिचे रुंद गोलसर खांदे दुलईदार खाकी जाकीटात लपेटलेले होते; उन्हाळ्याचे दिवस असूनही तिने उबदार लष्करी टोपी डोक्यावर घातली होती व तिचे पांढरे केस त्या टोपीखाली लपले होते; बांबूच्या लांब काठीने होडीला रेटा देताना तिचा सुरकुतलेला छोटा चेहरा वोरोनोवपासून दूर वळायचा, तेव्हा तिला पाहण्यात एक प्रकारचा आनंद होता. काळाने तिच्या आकृतीवर परिणाम केला नव्हता, पण हातांची मात्र नासाडी केली होती. तिचे हात सुकलेले, गाठाळ बनले होते व त्यांच्यावर डाग पडले होते; तरी तिच्या सुरकुतल्या चेहऱ्यावरील निळसर डोळयांमध्ये अजून चमक कायम होती. त्या तेजस्वी, भिरभिरत्या डोळयांना खटयाळपणे नाचवीत म्हातारीने प्रदीर्घ खुलासा केला:

"तुला थोडा उशीर झाला. आमच्याकडं मोसमाआधी दोन दिवस शिकारी गवसत नाही, तर मग शिकारीच्या ऐन मोसमात कुठून सापडणार! पूर्वी खरंच सोपं होतं. आता काही लोकांनी तो धंदाच सोडून दिला, कारण सामुदायिक शेतात काम करणं जास्त फायद्याचं आहे. आता माझ्या सगळयात धाकटया वास्काचं पहा—काहीजण सरकारी कामावर गेले. आता सर्वांत चांगले शिकारी राखीव सरोवरावर काम करताहेत. माझ्या सर्वांत थोरल्या आनातोली इवानोविचसारखे. तुम्हाला पारकोत ह्याबद्दल बहुधा काहीच माहीत नसणार..." तिच्या शेवटच्या

शब्दांमधील आत्मतुष्ट किंचित सूचकता तिच्या मुलाच्या राजधानीमधील अज्ञाततेबद्दल नव्हती, तर वोरोनोवच्या अज्ञानाच्या संदर्भात होती.

"नाही, का बरं?" वोरोनोवने आक्षेप घेतला. "शिकारीबाबतीत आनातोली इवानोविच अत्यंत खात्रीशीर माणूस आहेत असं मी तिथं वारंवार ऐकलंय."

"मेश्चेराबद्दल तुमच्या मॉस्कोत फारसं जाणत नाहीत!" म्हातारी आरोपाच्या स्वरात म्हणाली. "राजधानीतल्या पाहुण्यांना होडीमधून फिरविण्याखेरीज आनातोली इवानोविचला काय दुसरा धंदा नाही? तो आमच्या प्रदेशाची राखण करतोय!"

"तर मग तुम्ही मला काय सल्ला देता?" वोरोनोवने विचारले.

वोरोनोवला शिकारीची खूप हौस होती. त्याच्यापाशी चिकाटी होती, तीक्ष्ण नजर होती, स्थिर हात होता, पण तो पट्टीचा शिकारी नव्हता; शिवाय मेश्चेराला त्याची ही पहिलीच खेप होती.

"मी तुला काहीही सल्ला देऊ शकत नाही," लाटेवरून चपळपणे होडक्याला पुढे नेत म्हातारी उत्तरली. "फक्त एक सांगत्ये: म्हाताऱ्यांपैकी कुणाला तरी गाठायचा प्रयत्न कर; त्यांना सध्या काम नाही आणि शिकार त्यांना आवडते. पण कुणी तुला सापडेल असं मला तरी वाटत नाही."

होडी नदीच्या उथळ पात्रात घासली आणि एकदम थांबली. किनारा दोन-तीन मीटर अंतरावर होता. घागरा वर उचलून म्हातारीने एक पाय होडीपलिकडे पाण्यात घातला, मग दुसरा पाय घातला आणि होडीच्या शेपटाला छातीचा रेटा देऊन होडी किनाऱ्यावर ढकलली.

किनाऱ्याच्या ठाम अचलतेमुळे वोरोनोव एकदम मागे कलंडला. त्याने खिशातून दहा रूबलची नोट काढली व म्हातारीपुढे धरली.

"मोड घे," ती म्हणाली आणि वोरोनोवच्या नकाराला उत्तरादाखल पुढे म्हणाली: "आमची भाडी ठरलेली आहेत: नदी ओलांडायला – पाच; रात्रीच्या मुक्कामाला – तीन; शिकाऱ्याला – चोवीस तासांना पंचवीस... हे बघ, त्या झोपडीचं दार ठोठावून बघ. म्हाताऱ्याला विचार, कदाचित त्याचं मन वळवशील."

वोरोनोवने आभार मानले आणि उंच-सखल तीरावरून तो म्हातारीने दाखविलेल्या झोपडीच्या दिशेने चालू लागला.

झोपडीचे दार एका म्हातारीने उघडले. आश्चर्य म्हणजे वोरोनोवला होडीतून आणणाऱ्या म्हातारीशी ह्या म्हातारीचे कमालीचे साम्य होते. तरुण आकृती आणि बटणांसारख्या चमकणाऱ्या काळया सतेज डोळयांचा सुरकतलेला छोटा चेहरा. तिचा पोषाखही तसाच होता: दुलईदार खाकी जाकीट, बूट आणि कानांवर आवरण असणारी गरम केसाळ टोपी. त्या टोपीवर पूर्वी जेथे लष्करी तारा होता, तेथे आता कोनाकृती खळगा पडला होता. "इथल्या म्हाताऱ्या बाया अजून स्वतःचं कसलंतरी युद्ध लढताहेत असं भासतं," वोरोनोवच्या मनात विचार आला व त्याच्या ओठांवर स्मित उमटले.

"नाही बाबा, म्हातारा येणार नाही, त्याला शक्य नाही," ती म्हणाली. "काल वेलीकोयेहून कसाबसा घरापर्यंत आला."

तरीसुद्धा तिने वोरोनोवला झोपडीत प्रवेश करू दिला. उंच उशांच्या बिछान्यावर झोपडीचा आजारी मालक मेंढकातडी पांघरुणांच्या ढिगाखाली झोपला होता. खुद्द म्हातारा दिसतच नव्हता; तंबाखूच्या धुरामुळे पिवळे डाग पडलेली त्याची पांढरी दाढी फक्त पुढे डोकावत होती.

"मी चांगला मोबदला दिला तर?" वोरोनोव म्हणाला.

"ऐकलंस? ए, आई?" बिछान्याच्या खोल गाभ्यामधून एक क्षीण आवाज आला व पांढरी दाढी थरथरली.

"चूप बैस!" बायको म्हाताऱ्यावर ओरडली. "तापानं फणफणताय तरी शिकारीचा नाद सुटत नाही! पाहिलंत, आम्ही तुमच्या उपयोगाचे नाहीत, कॉम्रेड," म्हातारी कडक आवाजात वोरोनोवला म्हणाली.

"तर मग कुठं शोधू मी शिकाऱ्याला?" वोरोनोवने चिकाटीने विचारले.

"ते नाहीतच तर कुठून शोधणार? नाहीत – बास्स!" घरमालकीण चिडून म्हणाली.

असे संभाषण जर काही वर्षांपूर्वी झाले असते, तर वोरोनोवच्या मनातरामधील शिकारीचा आरंभ न होता तेथेच ते संपले असते. पूर्वी

जीवनातील प्रतिकूल गोष्टींचा फार बाऊ करण्याची त्याला सवय होती. अत्यंत क्षुल्लक अडथळा त्याला अलंघ्य भासायचा. पण काळाबरोबर त्याला विश्वास निर्माण झाला होता की, मात करता येणार नाही अशी कोणतीही परिस्थिती नसते आणि शांत व विचारीपणाने चिकाटी धरल्यास कोणताही अडथळा नष्ट करता येतो. जवळ जवळ उल्हसित आवाजातच त्याने विचारले :

"तर मग कुठं सापडेल मला शिकारी?"

म्हातारीच्या विरळ पापण्या भीतीने उंचावल्या.

"कुठं सापडणार बाबा तुला तो?" ह्यावेळी रागाने नव्हे, तर निराशेने ती म्हणाली.

"तेच तर तुम्हाला मी विचारतोय," वोरोनोव म्हणाला.

म्हातारीचे डोळे उजवीकडे-डावीकडे भिरभिरले; जणू तेथे जवळच एक शिकारी लपून बसला होता आणि मॉस्कोहून आलेल्या ह्या माणसाला त्याच्या अस्तित्वाची चाहूल लागली होती.

"तुला काय सांगावं मला समजत नाही... कदाचित नव्या नवऱ्याला पटवशील?"

"जणू नवा नवरा तयार होणार जायला..." मेंढकातड्यांच्या ढिगाखालून आवाज आला.

"जाईल," म्हातारीऐवजी वोरोनोव उत्तरला. "कुठं शोधायचं त्याला?"

"आमच्या डाव्या बाजूला शेवटची झोपडी," म्हातारीने खुलासा केला. "जा बाबा त्याच्यापाशी, कदाचित पटवशील त्याला. पण त्यानं लग्न केलं तेव्हापासून शिकाऱ्याचा धंदा सोडलाय."

"नाही जाणार तो," परत मेंढकातड्यांखालून आवाज आला. "बायकोला सोडून जाणार नाही."

"ह्या नव्या नवऱ्याचं नाव काय?" वोरोनोवने विचारले.

"वास्का," म्हातारी उत्तरली. "दुसरं काय असणार?"

"नाही जायचा तो," वोरोनोव झोपडीबाहेर जात होता तेव्हा त्याच्या कानांवर परत म्हाताऱ्याचे शब्द पडले. सहज मिळणाऱ्या पैशाचा नव्या नवऱ्याने मोह टाळणे म्हणजे मेश्चेराचे एक वैशिष्ट्य असावे

आणि स्थानिक लोकांना ह्याचा अभिमान वाटत असावा, असा वोरो-नोवने मनाशी अंदाज बांधला.

रस्त्याच्या कोणत्या बाजूला वास्काची झोपडी होती हे विचारायला वोरोनोव विसरला होता. शेवटच्या दोन झोपड्यापैकी जी झोपडी अधिक नेटकी दिसत होती, जिच्या छपरावर लोखंडी कोंबडा होता व कोरीव झडपांना नुकतीच सफेदी दिली होती, ती झोपडी वोरोनोवने निवडली. नुकतेच लग्न झालेले जोडपे अशा नेटक्या, डौलदार घरात राहणार अशी अपेक्षा कुणीही केली असती. दार ढकलून वोरोनोव एका मोठ्या, अंधाऱ्या बोळकंडीतून गेला. तेथे वासराचा, पायांखाली कुजणाऱ्या कड-ब्याचा, कोंबड्यांच्या विष्ठेचा आणि किंचित वाळवलेल्या बदकाच्या मांसाचा वास पसरला होता. बोळकंडीच्या मध्यभागी पार्श्वभागात गवत कोंबलेली रानबदके दोराच्या फासात लटकावून ठेवलेली होती. "म्हणजे त्यानं शिकार संपूर्ण सोडलेली नाही," वोरोनोवने मनाशी नोंद केली. तंग तुमान व बाह्या वर गुंडाळलेला पांढरा सदरा परिधान केलेला कुरळ्या केसांचा, रुंद खांद्यांचा एक तरुण गुडघ्यांवरून उठून उभा रा-हिला – तो कुऱ्हाडीने लाकूड फोडत होता – आणि कोण पाहिजे असे त्याने वोरोनोवला विचारले.

"तुम्हीच पाहिजे," वोरोनोव उत्तरला.

तरुणाने कुऱ्हाडीचे पाते लाकडात खुपसले आणि प्रथम तो घरात गेला. वोरोनोव त्याच्या पाठोपाठ दारातून जाऊ लागला, तेव्हा पूर्ण भरलेली बादली घेऊन येणाऱ्या एका छोट्या चणीच्या बाईला त्याने वाट करून दिली.

नवविवाहितांचे घर बाहेरच्याप्रमाणे आतही तेवढेच प्रसन्न होते. नुकताच सफेदी दिलेला चुलाणा, भिंतीना लावलेला रंगीत कागद, खिडक्यांच्या चौकटीतील जेरानियमच्या कुंड्या, भिंतींवर चिकटवलेली मासिकांमधील अनेक चित्रे. कोपऱ्यात विणलेल्या लेसचे आच्छादन घात-लेले कपाट; त्याच्यावर हलक्या दर्जाच्या रंगीत काचेचा मोठा चषक, त्यात "समुद्र कुजबुजतो" असे दोन मोठे शंख; एका स्टँडवर अनेक फोटो व त्यांच्या मध्यभागी अपरिहार्यपणे तरुण जोडप्याचा फोटो.

टेबलाजवळच्या बाकावर दुलईदार जाकीटातील व पायात बूट घात-

लेली एक म्हातारी बसली होती. मेश्चेरातील घरांमध्ये जाकीट व बूट अत्यावश्यक वस्तू असाव्यात असे वोरोनोवचे एव्हाना ठाम मत बनले होते. पण ही बाई म्हणजे त्याला होडीतून घेऊन येणारी म्हातारी होती हे त्याने ओळखले आणि नवविवाहित वास्काची ती आई असावी असा त्याने तर्क केला. दुसऱ्या बाकावर खिडकीपाशी एक तरुणी बसली होती, तिचा डोक्यावरील रुमाल तिच्या खांद्यांवर घरंगळला होता. तिच्या भरदार, उभार स्तनांभोवती सुती ब्लाऊज गच्च चिकटला होता.

"मी तुम्हाला विनंती करायला आलोय," वोरोनोव तिच्याकडे वळून म्हणाला. "तुमच्या धन्याला माझ्याबरोबर सोडाल?"

तरुणीने वोरोनोवकडे चकित नजरेने पाहिले व नंतर डोळे खाली केले. निळसर छटेचे तिचे डोळे फार सुरेख होते.

"तिला अजून धनी नाही!" सौम्य स्मित करीत वास्का म्हणाला. "ही माझी बहीण!"

वोरोनोवने संतापाने स्वतःचा ओठ चावला. ही घरमालकीण नव्हे हे त्याच्या ध्यानात यायला पाहिजे होते. खेड्यातील पाहुणे बसतात तशा औपचारिकपणाने ती बसलेली होती; शिवाय तिचे तिच्या भावाशी खूप साम्य होते: तसेच कुरळे बदामी रंगाचे केस, तशीच गालांवर काळपट लाली, तसेच फिकट निळे, ओलसर धुंद डोळे.

"माझ्या प्रस्तावाबद्दल तुमचं काय म्हणणं आहे?" वोरोनोवने वास्काला विचारले.

"काही कारण नाही त्यानं जायचं!... फुकटचा वेळ दवडणं नुसतं!" वोरोनोवशी दारात भेट झालेल्या तरुणीकडून हे शब्द आले. दारातील उंबरठ्याशी ती उभी होती, सखल वाशापेक्षा तिचे डोके खूप खाली होते आणि रिकामी बादली तिने कमरेशी धरली होती. देखण्या वास्काप्रमाणे त्याची बायको तेवढी सुंदर नव्हती असे ध्यानात येताच वोरोनोवचा अपेक्षाभंग घडला. तिची उंची फारच कमी होती आणि चेहरासुद्धा विशेष नव्हता: छोटा, ठिपकेदार व हिरव्यागार बाटलीच्या रंगाचे डोळे. शिवाय ही नवी नवरी तेवढी तरुणही दिसत नव्हती. तिची पंचविशी उलटलेली होती किंवा त्याहूनही ती जास्त मोठी होती. तिच्या अंगात जुना, घट्ट शिवणीचा आणि आखूड फ्रॉक होता व पायात

झिजलेल्या सपाता होत्या. पण तिचा स्वभाव तिखट असल्याचे वोरोनोवला तात्काळ जाणवले आणि बायकोच्या धारदार शब्दांवर वास्काने मूक स्मित करून हताशपणे हात पसरले ह्यात आश्चर्य नव्हते.

"आजीबाई, निदान आपल्या जुन्या ओळखीला स्मरून तुम्ही मला पाठिंबा द्या!" वोरोनोव म्हातारीकडे वळून म्हणाला.

"इथं मी मालकीण नाही," वास्काची आई उत्तरली.

तिच्या बोलण्यात अपमान नव्हता अथवा बेपर्वाई नव्हती, केवळ सर्वज्ञात आणि योग्य वस्तुस्थिती मांडलेली होती.

काय केले पाहिजे हे आता वोरोनोवला समजले.

"तुमच्याशी दोन शब्द बोलू?" त्याने वास्काच्या बायकोला विचारले.

ती दोघे बाहेरच्या बोळकंडीत गेली. वोरोनोवने सावकाशपणे आणि सावधानपूर्वक त्या छोट्या बाईला समजावून सांगितले की, तिच्या नवऱ्याला तो फक्त तीन-चार दिवसांसाठी घेऊन जाणार, त्याला मेश्चेरातील रीती माहीत आहेत आणि तो भरपूर पैसे द्यायला तयार आहे, कारण तो खूप कामाचा माणूस आहे, शिकारीला जाण्याची सवड त्याला क्वचित लाभत आहे आणि पैसे खर्चण्याबाबत त्याची मुळीच तक्रार नाही. सरतेशेवटी, मॉस्कोतील इतर शिकाऱ्यांप्रमाणे वास्काला शिकार करण्यास तो मनाई करीत नाही...

ओठांची हालचाल करीत छोट्या बाईने त्याचे बोलणे ऐकून घेतले. मनाशी ती पैशांचा हिशेब करीत होती हे स्पष्ट होते. आकडेमोडीने तिचे समाधान झालेले दिसले. तिने स्मित केले, तिचे हिरवेगार डोळे चमकले आणि अत्यंत डौलदारपणे तिने पटकन वोरोनोवपुढे हात धरला.

"ठरलं!"

तिची बाही उघडी पडली तेव्हा तिच्या गोल, घडीव हाताचे आणि गोलाकार कोपराचे ओझरते दर्शन घडले. यशाने धुंद झालेल्या वोरोनोवच्या ध्यानात आले: ह्या बाईत काहीतरी खास होते!

"वासिली, तयारी कर!" ठाम आवाजात ती ओरडली. "कॉम्रेडबरोबर शिकारीला जा."

"शेताच्या अध्यक्षाला विचारलं पाहिजे..."

"मी स्वत: सांगीन तिला. परवाच ती मला म्हणत होती: सगळे पुरुष सुटी मागतात, एकटा तुझाच नवरा बांधून घेतल्यासारखा वागतो. शिवाय मला घर आवरायचंय, फरशा धुवायच्यात, इथं खंडीभर घाण करून ठेवली आहेस!"

वास्काने बायकोकडे नजर टाकली, उसासा टाकला आणि नंतर मनातील काहीतरी ऊर्मी दाबून तो शिकारीला जाण्याच्या तयारीला लागला.

शिकाऱ्याच्या तयारीला फार वेळ लागला नाही. त्याने त्याच्या रबरी बुटांमध्ये थोडे गवत कोंबले, पावलांभोवती गरम फ्लॅनेलच्या फडक्यांना गुंडाळले व भक्कम पायांवर बूट घट्ट खेचले. काळाने काळवं-डलेली काडतुसे बटव्यात भरून त्याने तो बटवा कमरेला खोचला. मग पडशीत काही रबरी आणि लाकडी बदके टाकली. त्याच्या मोकळ्या, सहज आणि तरीही अचूक असलेल्या हालचाली वोरोनोव प्रसन्नपणे पहात होता. स्वत:च्या डौलदार आकृतीची जाणीव न बाळगता वास्का हलकेच दातांमधून शीळ वाजवीत होता.

"घरातून सुटायला मिळतंय म्हणून खूष झालास!" चुलाण्यामागे कपडे धुणारी त्याची बायको मत्सराने म्हणाली.

"जाऊ नको का?" वास्काने उत्सुकपणे विचारले.

"जात नाही म्हणे! जणू खजिना सापडलाय!"

वोरोनोवने सगळी पडशी तेथेच मोकळी केली व फक्त आवश्यक वस्तू बरोबर घेतल्या: पाव, लोणी, खाद्यपदार्थांचे हवाबंद डबे, कडक चहाचा थर्मास, पायमोजांची जादा जोडी व पांघरुण. वासिलीने अंग-णातून वेताची टोपली आणली. टोपलीत जिवंत आमिष ओरडत होते.

वासिलीची बायको त्यांना निरोप द्यायला आली. तिने कमरेशी घट्ट बसणारे मखमाली जाकीट अंगात घातले होते व उंच रबरी बूट पायात चढविले होते. ह्या पोषाखामुळे ती एकदम अधिक तरुण दिसू लागली होती.

"इकडं दे," ती नवऱ्याला म्हणाली आणि त्याची बंदूक तिने घेतली. "तुम्ही वेलीकोयेला जाताय?"

"छोटया सरोवरावर," वास्का उत्तरला.

तिने आश्चर्याने भुवयांची कमान केली आणि काहीतरी बिनसल्याची वोरोनोवला जाणीव झाली. मॉस्कोत त्याने ऐकले होते की, वेलीकोयेत शिकार केली पाहिजे आणि त्याच्या मनात किंचित संशय तरळून गेला की, वास्काला घरापासून फार दूर जाण्याची इच्छा नव्हती.

"कदाचित वेलीकोयेला जाणं जास्त योग्य ठरेल?" तो म्हणाला.

"वेलीकोयेत माणसांची झुंबड आहे," वोरोनोवकडे न पाहता बायकोवर नजर रोखत वास्का उत्तरला.

वास्काच्या बायकोचा पाठिंबा मिळविण्याच्या आशेने वोरोनोवनेही तिच्याकडे पाहिले. पण तिने केवळ तिचे कृश खांदे उडविले आणि लव्हाळयांमागे दिसणाऱ्या होडीकडे ती गेली. घरात जरी तिचा वर-चष्मा चालत असला, तरी शिकारीबाबतीत ती नवऱ्याच्या अधिकारात ढवळाढवळ करीत नव्हती.

वासिलीने कोपराने वोरोनोवला धक्का मारला आणि स्मितपूर्वक बायकोकडे मानेने त्याने खुणावले. तुलाच्या लांब बंदूकीचा दस्ता तिच्या टाचांशी आपटत होता.

"फक्त मला आणि माझा भाऊ आनातोली ह्याला आमच्या बायका शिकारीवर जाताना निरोप द्यायला येतात," काहीशा अभिमानाने तो म्हणाला आणि विचारमग्न होत पुढे बोलला: "नाही तर अपंग स्थि-तीत त्याला जमणं शक्य नाही."

कालव्यापाशी ते पोहोचले तेव्हा होडीची दोरी एव्हाना सोडलेली होती आणि वासिलीच्या बायकोने थेट किनाऱ्यावरून ताजे, ओलसर गवत गोळा करून होडीत पसरले होते. वासिलीने त्याची पडशी, टोपली व बंदूक काळजीपूर्वक ताडपत्रीखाली झाकली आणि फावड्यासारखे दिसणारे वल्हे गवताखालून बाहेर काढले.

"होडीत बसा कॉम्रेड शिकारी, तुमचं नाव आम्हाला माहीत नाही!"

"सेर्गेय इवानोविच." वोरोनोव कसाबसा होडीत चढला; डांबरा-सारखे काळेभोर दिसणारे दलदलीतील पाणी होडीच्या बाकदार बहाणीला आपटत होते.

"छान रहा!" वास्का बायकोला म्हणाला.

वोरोनोवकडे कपाळाला आठ्या घालून पहात तिने पटकन नवऱ्याची बाही धरून त्याला जवळ खेचले, क्षणभर त्याच्या कुशीत ती शिरली, तिने लाजरे स्मित केले आणि मग त्याला दूर ढकलून मुळीच मागे वळून न पाहता, कमरेपेक्षा उंच वाढलेल्या गवतामधून ती घराकडे चालू लागली.

वास्काने वल्हे किनाऱ्यात खुपसले आणि होडीला धक्का मारला. निरुंद जलमार्गातून होडी पुढे धावू लागली, किनाऱ्याच्या टेंगळांवर किंचित आपटू लागली आणि छोट्या कालव्यावर वाकलेल्या धारदार लव्हाळ्याशी सळसळ आवाज करीत जाऊ लागली.

वोरोनोवने कॉलरचे बटण मोकळे केले. त्याच्या सर्व चिंता आता मागे राहिल्या होत्या. एखाद्या बाणाप्रमाणे तो सुसाट त्याच्या लक्ष्याकडे निघाला होता. मेश्चेरातील अडचणींबाबत, तेथील लोकांच्या हट्टी स्वभावाबाबत त्याने मॉस्कोत खूप काही ऐकले होते. मेश्चेराच्या लोकांकडून आपल्याला हवे ते मिळवायचे असेल तर त्यांच्या कलाने वागले पाहिजे, कारण त्यांच्या मनाविरुद्ध घडल्यास त्यांच्याशी संवाद साधणे अशक्य ठरते, असे त्याला सांगण्यांत आले होते. ह्या वातावरणाशी तो चटकन समरस झाला होता, त्याला हवे होते ते त्याने मिळविले होते!

वास्काचे वल्हविण्यातील कौशल्य आणि त्याची ताकद पाहण्यात आनंद होता. निष्क्रियतेमुळे किंचित सुस्त बनलेल्या तरुणाच्या भक्कम देहाला तो व्यायाम आवडत होता. सदऱ्याखालील त्याच्या पिळदार स्नायूंच्या हालचाली स्पष्ट दिसत होत्या आणि त्याचा श्वासोच्छ्वास सहज व छान चालला होता.

लौकरच कालव्याची नागमोडी वळणे सुरू झाली आणि सोप्या सहलीसाठी वास्काने छोटे सरोवर निवडले असावे अशी जर वोरोनोवच्या मनात अजून किंचित शंका वसत होती, तर आता ती पार पुसून गेली. लांबोडी होडी जोरदार वळणे सहज पार करू शकत नव्हती. वल्ह्याचा काठीसारखा वापर करून वास्का त्यावर सगळा जोर लावून त्याला ढकलायचा आणि होडी वेग धरून उथळ पाण्यातून धावायची. वास्का उडी मारून पाण्यात उतरायचा, होडीचा अवजड पुढचा निमुळता भाग वर उचलायचा, वळणाच्या दुसऱ्या भागाकडे त्याला फिरवायचा

व त्यानंतर होडीला पाण्यात ढकलायचा. होडी खूप जड होती, पण जेव्हा वोरोनोव त्याला मदत करू पाही, तेव्हा वास्का नकार देई.

तरीसुद्धा अरुंद कालवा जेथे दलदलीच्या किनाऱ्याच्या उथळ खुल्या पाण्यात पसरला होता, तेथे प्रा नदीत प्रवेश करताना होडी एकदम गाळात घुसली व खाली उतरून वास्काला मदतीचा हात देणे वोरोनोवला क्रमप्राप्त ठरले.

"आत्ता जर बायकोनं पाहिलं असतं, तर माझी धडगत नव्हती!" वास्काने विश्वासात घेऊन म्हटले.

"का बरं?"

"एखादी गोष्ट माझ्या ताकदीबाहेरची आहे ही कल्पनाच तिला सहन होत नाही." वास्का मनापासून हसला. वोरोनोवने विचारले:

"प्रेम करतोस?"

"प्रेम नाही करणार तर दुसरं काय करणार?" वास्का आनंदाने आणि आश्चर्य व्यक्त करीत म्हणाला. "ती कशी आहे, तुम्ही पाहिलंच..! तिच्यासमोर मी कोण?" त्याने हात पसरले.

तो गुडघाभर खोल पाण्यात उभा होता. अंगातील जर्सीच्या बाह्या त्याने वर सारल्या होत्या. कोमट घामाच्या धारा त्याच्या काळसर चेहऱ्यावरून, उन्हात रापून काळयाठिक्कर पडलेल्या मानेवरून वाहात वाहात त्याच्या पिळदार हातांवर ओघळत होत्या. वार्निश फासल्याप्रमाणे त्याची कांती दिसत होती. वास्का खूप देखणा, विशुद्ध आणि भाबडा होता. वोरोनोवच्या मनात आले: "गड्या, तिच्यापेक्षा तू अनेक पटींनी जास्त मोलाचा आहेस!" अर्थात तो हे बोलला नाही आणि प्रा नदीच्या जंगलतीराने ते पुढे जात राहिले.

इथे प्रा नदीसारखी अजिबात दिसत नव्हती. एखाद्या रुंद सरोवरासारखी ती पसरली होती, तिच्यात सपाट छोटी हिरवी बेटे दिसत होती, काठांशी साचलेल्या संथ पाण्यात लव्हाळयांची गर्दी दाटली होती. तेथे मच्छीमारांच्या काळपट होड्या उभ्या होत्या. सागरपक्षी पाण्यावर झेपावत होते. उंच आकाशात बदके एकाकी व कळपाने उडत होती. ढगांवर तरंगणाऱ्या घारीने सफाईदारपणे पाण्यावर सूर मारला आणि धाकदार नख्यांमध्ये झटकन मासा पकडून परत वर झेप घेतली. पाईन-

च्या शेंड्यावर बसलेला कावळा उडाला आणि घारीपाठीमागे गेला. त्याने घारीला लौकरच गाठले व तिचे भक्ष्य पळविले. स्वतःच्या टेहळणी-चौकीवर परतून कावळ्याने मासा पटकन गिळला व उद्योगी घार परत केव्हा मासा पकडते ह्याची तो वाट पाहू लागला.

आता ते दुसऱ्या कालव्यात वळले. हा कालवा सरळ व अरुंद होता, पहिल्या कालव्यासारखा नव्हता. काही ठिकाणी रस्ता रुंदावला होता, पाण्याची छोटी डबकी साचली होती–पाण्याचा प्रवाह एका दलदलीच्या सरोवरातून दुसऱ्या सरोवरात जात होता. इथेही तीर सखल होते, पण लव्हाळी उंच होती, माणसापेक्षा उंच होती. झुडु-पांबरोबर मिसळलेली लव्हाळी थेट पाण्याच्या कडेपर्यंत खाली आली होती, कालव्याचे त्यांनी काळपट, उदास बोगद्यात रुपांतर केले होते. जणू एकदम संध्याकाळ झाल्यासारखी भासत होती. सूर्यास्ताला त्यांना जणू उशीर होणार अशा कल्पनेने वोरोनोव अस्वस्थ झाला.

"आपण अगदी वेळेवर पोहोचणार," वास्का खात्री देत म्हणाला.

अधूनमधून त्यांच्या डोक्यांवरून लांब चोचीचा एखादा पक्षी फडफडत जात होता अथवा गवतात वाळूमधील पक्षी खुसपुसत होता. पाणफुलाच्या काळ्या, सपाट पानामागून पक्ष्याच्या पिलापेक्षा फार मोठे नसलेले एक छोटे बदक अचानक बाहेर आले आणि भर वेगाने हवेत उडाले. अंड्या-तून बाहेर पडण्यास खूप उशीर केल्यामुळे मोठे होण्याची आशा खुंटलेले ते दुर्दैवी पिलू स्वतःचे अल्प आयुष्य वाचविण्याची शर्थ करीत होते. खुरट्या पंखांच्या साह्याने ते पाण्यालगत उडत होते, अधूनमधून होडीचा पुढचा भाग त्याला गाठत होता आणि शेवटी ते तीरावरील लव्हाळ्यां-मध्ये धपकन जाऊन कोसळले. ज्या क्षणी ते अदृश्य झाले, त्याच क्षणी मोठा फडफडाट करीत एक पक्षी वर उडाला. झुडुपांमधील उजेडाच्या फटीत क्षणभरच जंगली बदकाची काळी खडबडीत शिलोटी वर झेपावली आणि अचानक वोरोनोवच्या तोंडासमोर बंदुकीच्या गोळीची गुलाबी आभा चमकली. प्रतिध्वनी विरण्यापूर्वीच बदकाने कमान टाकली व ते झुडुपात कोसळले.

कानापाशी वाजलेल्या अनपेक्षित बारापेक्षा वास्काच्या अमानुष वेगाने आणि चपळपणाने वोरोनोव हबकून गेला. वल्हे टाकून तात्काळ बंदुकीचा

अचूक नेम धरण्याचे वास्काचे कौशल्य पाहून तो थक्क झाला होता. का कुणास ठाऊक, पण आत्तासुद्धा वास्काने त्याच्या बायकोखातर ही करामत केली होती असे वोरोनोवला वाटले आणि वास्काचा त्याला राग आला. अशा उल्हसित मन:स्थितीत वास्का सगळ्या बदकांचा फडशा पाडील आणि त्याला, वोरोनोवला, काहीच उरणार नाही...

"हे बघ वासिली, आपण एक करार करू: उडणाऱ्या पाखरावर आपण दोघांनीही बंदुकी झाडायच्या, पण बसलेल्या बदकांवर मात्र मी एकटाच..."

"मान्य, सेर्गेय इवानोविच!" वासिली किनाऱ्याशी थांबला आणि होडीतून थेट उंच गवतात त्याने पाय टाकला. गवताची पाती त्याच्यामागे झाकली गेली आणि ती परत विलग झाली, तेव्हा पाचूसारख्या हिरव्या मानेचे एक मोठे जंगली बदक वास्का हातात धरून आणत होता.

"आपण सुरवात केली, सेर्गेय इवानोविच!"

"होय," कोरडेपणाने वोरोनोव म्हणाला.

अचानक सरोवर त्यांच्यासमोर खुले झाले आणि सूर्यास्तामुळे लाल बनलेले ढग पाण्याच्या वाटोळ्या आरशावर तरंगत होते. किनाऱ्याशी पाणी काळपट आणि उदास दिसत होते. सरोवराभोवतालच्या बैठ्या फर वृक्षांच्या दाट ओळीचे तेथे प्रतिबिंब पडले होते. उत्तम जागा शोधण्यासाठी सरोवराच्या विस्तारावर नजर फिरविण्याची वास्काला गरज नव्हती. सूर्यास्ताच्या विरुद्ध दिशेला असलेल्या डाव्या तीरावरील अर्धवट बुडालेल्या छोट्या बेटाकडे त्याने भराभरा होडी वल्हवीत नेली. तेथे पोहोचल्यावर त्याने खोटे पक्षी मांडले, आमिषाच्या बदकाला पाण्यावर सोडले आणि होडी झुडुपांमध्ये लोटली.

"तुम्हाला व्यवस्थित दिसतंय, सेर्गेय इवानोविच?" वास्काने विचारले.

"मला छान दिसतंय, पण त्यांना वरून आपण छान दिसू," वोरोनोव पुटपुटला.

"काही काळजी करू नका," वास्काने त्याची समजूत घातली.

बदकांच्या शिकारीला आरंभ व्हायला खूप वेळपर्यंत वाट पहात

बसून रहावे लागते व वोरोनोवची तशी मानसिक तयारी झाली होती. पण जवळजवळ लगेचच वास्का हळू, शांत आवाज त्याला ऐकू आला.

"उजवीकडं बदक आहे, सेर्गेय इवानीच!"

वोरोनोव दचकला आणि पाण्यावर त्याने पटकन नजर फिरविली, पण त्याला फक्त खेळण्यातील बदके दिसली व त्यांच्यात खूप मोठे, काहीसे खोटे भासणारे आमिष दिसले.

"खोटचा बदकाच्या टोकाला, उजवीकडं," वास्काने पूर्वीच्याच शांतपणे म्हटले.

खोटचा बदकावर गोळी झाडतोय अशा भावनेनेच वोरोनोवने बंदुकीचा चाप ओढला. पाण्यावरून बार सुसाटत गेला; सारख्याच स्तब्ध असलेल्या दोन बदकांपैकी एक नुसते डोलले आणि सहजपणे त्याने आपली अभेद्य लाकडी बाजू वळविली, पण दुसरे मान ताणून पाण्यावर आडवे पसरले आणि त्याच्यात स्पंदणाऱ्या जीवनाचे मरणावाटे त्याने दर्शन घडविले.

त्या बदकाला उचलून आणण्यासाठी जेव्हा ते गेले, तेव्हा खाली येऊन बसण्याच्या तयारीतील दुसरे एक जंगली बदक परत वरती उडाले. वोरोनोवने बंदूक झाडली आणि बदकाने पाण्यात कोलांटी उडी मारली. सुमारे तीस मीटर अंतरावर बदकाने परत पाण्यावर डोके काढले. वोरोनोवने दरम्यान बंदूक पुन्हा ठासली होती आणि त्या बदकाचा त्याने पूर्ण निकाल लावला.

"अगदी बरोबर," वास्का म्हणाला.

पण हा केवळ आरंभ होता. अशी यशस्वी शिकार वोरोनोवला क्वचित अनुभवायला मिळाली होती. एका फटक्यात त्याने तीन बदकांना खाली पाडले, मग दोन मोठे पक्षी लागोपाठ मारले आणि हंसाएवढ्या लांब शेपटीचा एक पक्षी मारला. वास्कासुद्धा रिकामा बसला नव्हता. त्याने तीन उडत्या जंगली बदकांवर बार टाकले, पण एक नुसते जखमी होऊन सटकले, दुसरे लव्हाळयांमध्ये पडले आणि पाण्यातील वनस्पतींच्या काळोखात त्यांना गवसले नाही.

सरोवर लहान होते आणि बंदुकींच्या सतत आवाजांमुळे बदके

घाबरून पळाली. पण नंतरच्या शांततेत वोरोनोवला स्वत:ला विसरून जाणारी, आनंदी उत्तेजित मन:स्थिती सोडून गेली नव्हती. ह्याचसाठी त्याला शिकारीचा खेळ आवडत होता. आकाशात जेव्हा पहिला तारा डोकावला, तेव्हा कुठे वोरोनोव त्याच्या उन्मनी मन:स्थितीमधून बाहेर पडला. एव्हाना काळ्या बनलेल्या सरोवराच्या पाण्यात त्या छोट्या, स्वच्छ व तेजस्वी ताऱ्याचे स्पष्ट आणि रेखीव प्रतिबिंब चमकत होते.

"वासिली, आज एवढंच पुरे बंधू! .."

रात्रीच्या मुक्कामासाठी ते कालव्याकडे निघाले. त्यांना जागा ताबड-तोब सापडली; पाण्याच्या कडेशीच, अरुंद प्रवाहापासून जवळच, दाट लव्हाळी गवताची ऐसपैस बैठी गंजी होती. वास्काने होडीचे पुढचे टोक धरून किनाऱ्यापाशी तिला ओढत नेले, पडशा होडीबाहेर काढल्या आणि दलदलीचा कडवट उग्र दर्प येणाऱ्या लवचीक गवताचे बिछाने तो उत्सा-हाने बनवू लागला.

मग त्यांनी जेवण केले व थर्मासमधील चहा घेतला. खूप अंधार पडला होता. आकाश ताऱ्यांनी खचले होते, दूरच्या फर वृक्षांच्या शेंड्यां-च्या रांगेपलिकडे चंद्राची पिवळी कोर उगवत होती. हवा अजून उबदार होती, पण अधूनमधून कालव्याच्या दिशेने गार वाऱ्याची चावरी झुळूक येऊ लागली होती. खारवलेला पाईक मासा खात आणि गोड चहा पीत वोरोनोवने दिवसभराच्या शिकारीच्या तपशीलांची उजळणी केली. वास्का तुटक उत्तरे देत होता, काहीसा तुटक हसत होता आणि वोरो-नोवला वाटले की, हा व्यावसायिक रिवाज असावा – शिकारीच्या दुसऱ्या दिवसापूर्वी पहिल्या दिवसाच्या शिकारीबद्दल न बोलण्याचा. त्याचा उल्हास कमी झाला आणि यशाचा थरार नाहीसा झाला. आता ती भूतकाळातील गोष्ट होती. आजच्या कृतींचा उद्यावर कोणताही प्रभाव पडू शकणार नव्हता.

प्रसन्न थकवा शरीरावर पसरत होता. वोरोनोवला निवांत-शांत वाटत होते.

"सेर्गेय इवानीच, तुमचं लग्न झालंय?" वासिलीचा आवाज ऐकू आला.

"अर्थातच, झालंय," वोरोनोव उत्तरला आणि स्वतःच्या आवाजात त्याला किंचित असमाधानाची छटा जाणवली.

"बायको मॉस्कोत आहे?" वास्काने सावधपणे प्रश्न विचारला.

"नाही, समुद्रकिनारी."

"एकटी किंवा मुलांबरोबर?"

"आम्हाला मुलं नाहीत."

वासिली एका खांद्यावर थोडासा उठला आणि वोरोनोवकडे काही वेळ टक लावून पाहिल्यानंतर गंभीरपणे म्हणाला:

"तुम्हाला ह्याची भीती वाटत नाही... एकटीला सोडण्यात?"

वोरोनोव हसला. वास्काच्या भाबड्या उद्‍गाराचा त्याला अपमान वाटला नव्हता. उलट त्याला फार छान सुरक्षित वाटत होते: स्वतःच्या बायकोबद्दल त्याला पूर्ण खात्री होती. शिवाय तिच्या वर्तनाबद्दल त्याला मुळीच चिंता वाटत नव्हती.

"अरे माझ्या लाडक्या!" काहीशा श्रेष्ठतेचा आव आणत तो म्हणाला: "हे थोपवणं कधी शक्य आहे का?"

शिकारी गप्प राहिला. वोरोनोवला अंधारात त्याचा चेहरा दिसत नव्हता, पण तो चिंतेत आणि विषण्ण विचारांमध्ये गुरफटला होता असे त्याला जाणवले.

वोरोनोवने चहा पिऊन टाकला आणि सुगंधी गवतावर अंग टाकले. विचारांच्या तंद्रीतून जागा झालेला वास्का वोरोनोवपाशी गेला.

"सेर्गेय इवानीच," काहीसा चाचरत तो म्हणाला, "इथं एकट्यानं रात्र घालवायला तुम्हाला भीती वाटणार नाही ना?"

"मुळीच नाही, भीतीचं कारणच नाही," हसू दाबत वोरोनोव म्हणाला. वास्काला मत्सराने ग्रासले नव्हते, तर किंचित विरहाच्या काळात अचानक लाडक्या व्यक्तीला भेटण्याची विलक्षण ओढ त्याच्या मनात निर्माण झाली होती, हे वोरोनोवला समजत होते. तरीसुद्धा, वास्का आता काहीसा विनोदी व करुण भासत होता.

"मी पटकन घरात नुसता डोकावून येतो. पहाटेपूर्वी इथं परत येईन. काळजी करू नका!"

"जा, जा, खुशाल जा," वोरोनोव म्हणाला व संभाषण संपले असे

वास्काने समजावे म्हणून तो कुशीवर वळला आणि जाकीटाची कॉलर त्याने डोक्यावर ओढून घेतली.

वास्काने होडी पाण्यात लोटल्याचा आवाज त्याने ऐकला; लव्हाळ्यावरून घासताना होडीचा तळ खसखसला, किनाऱ्यावरील वाळू कोरडेपणाने आणि कर्कश्यपणे चरचरली, मग पाण्यावर चुबूक असा पोकळ आवाज घुमला आणि दमट दर्प त्याच्या जाकीटात घुसला. होडीच्या टोकाखाली पाण्याची बुडबुड विरत गेली. वास्का वल्ही मारीत त्याच्या बायकोपाशी निघून गेला. दोन कालवे आणि नदी ओलांडण्याचा त्याचा प्रवास वोरोनोवच्या मनासमोर उभा राहिला. वास्काला भेटणारी सर्व वळणे त्याच्या नजरेसमोर आली—होडीला वळणाशी किनाऱ्यावर ओढणे व मग परत दुसऱ्या वळणात ढकलणे, त्या दोघांना त्रासदायक ठरलेला तो वाळूचा किनारा... आणि हे सर्व अंधारात, रात्रीच्या दमट थंडाव्यात करायचे होते. सहलीला तब्बल चार तास खर्चणार होते. जायला चार आणि यायला चार. पहाटेला परतायचे म्हणजे वास्काला बायकोचा एक ताससुद्धा सहवास लाभणार नव्हता. त्या सैतानी सफरीवर त्याला ओढून नेणारी भावना किती प्रबळ असली पाहिजे!

वोरोनोवने उसासा टाकला आणि अंगावरील जाकीट दूर केले. त्याच्याही आयुष्यात असा एक कालखंड होता जेव्हा पहिल्या हाकेसरशी दिवसाच्या अगर रात्रीच्या कुठल्याही प्रहराला तो धावून जात होता; काहीवेळा तर निमंत्रणाविनासुद्धा! तरुण शिकाऱ्याला रात्रीच्या वेळी त्या जलमार्गावरून जी आवेगपूर्ण, अवघड बेचैनी खेचून नेत होती, त्याच भावनेने वोरोनोव एके काळी काठोकाठ भरलेला होता. मग अचानक त्याला स्वतःची, त्याच्या मानसिक शांततेची आणि देव जाणे आणखी कशाची भीती वाटली. त्याला तुटेपर्यंत माहीत होते की, सर्व काही मार्गी लावता येईल—केवळ स्वतःच्या भावनांवर विश्वास ठेवणे एवढेच त्याचे काम होते. पण त्याने स्वतःला सांगितले होते: असे वागणे अधिक चांगले, निवांत व सोपे होते. माघार घ्यायला नको म्हणून त्याने मध्याच्या बायकोशी लग्न केले होते. बुद्धिमान, प्रेमळ आणि निष्ठावंत म्हणून तिला तो खूप काळापासून ओळखत होता. जर आनंद नव्हता, तर दुःखही नव्हते आणि ह्यातसुद्धा काही अर्थ होता...

आता ह्या तरुण वास्काची भेट झाल्यापासून वोरोनोव बेचैन बनला होता, जे त्याला विसरावेसे वाटत होते, त्याची त्याला आठवण होत होती. पण वास्कासुद्धा एक दिवस थंड होईल आणि वोरोनोवला जशी ती दिसली, तशी त्याला त्याची बायको दिसेल : सामान्य, ठिपकेदार चेहऱ्याची, वटवटी, मागण्या करणारी बाई, घरगुती काळज्यांमध्ये आकंठ बुडालेली. वास्काला नशा उतरल्यानंतर खेद होईल... "मी हे काय करतोय?" वोरोनोवने कपाळाला आठ्या घालीत विचार केला. "माझ्या दैवाची त्याच्या दैवाशी सांगड घालतोय?"

ताऱ्यांनी शिंपलेले आकाश खूप खाली ओठंगले होते. जणू आकाशाला ताऱ्यांचा भार आता पेलवत नव्हता आणि कोणत्याही क्षणी तारे खाली उधळतील. खरोखरीच ते खाली कोसळत होते. अधूनमधून स्फटिकासारख्या हिरव्या रंगाच्या प्रकाशरेषा उजळीत, कधी थेट खाली तर कधी मोठी कमान टाकून तारे जमिनीवर कोसळत होते. दिवसभरात खूप तापलेल्या मातीमधून उबदार वाफ हवेत उमटत होती. तारकांसकटचे आकाश कधी फिकट व्हायचे, जणू मागे सरकायचे तर कधी तेजाने भरून खाली झुकायचे; नभाचा साक्षात श्वासोच्छ्वास चालला होता.

पहाटेच्या चावऱ्या थंडीने वोरोनोवला जाग आली. एका क्षणात त्याच्या कपड्यांनी, अंगावर पांघरलेल्या जाकीटाने त्याच्या अंगाखाली चेपलेल्या दाट गवताने व डोक्यावरील टोपीने जणू काही करार केल्यानुसार त्याच्या शरीरापासून मिळणाऱ्या उबेला टिकवून ठेवण्यास नकार दिला व ह्या सर्व वस्तू थंडगार, दमट, अवजड आणि कमालीच्या त्रासदायक बनल्या. वोरोनोवने खांद्यांना झटके दिले व ह्या किंचित हालचालीमुळे त्याच्या अंगात थोडी ऊब व उत्साह यांचा संचार झाला. तो चटकन उठून बसला. वासिलीच्या अनुपस्थितीमुळे आता मनात रागाची भावना उमटणार ह्याची त्याला आधीच जाणीव झाली होती. अजून निळे न बनलेल्या, एव्हाना निरभ्र असूनही अद्याप धूसर भासणाऱ्या राखाडी आकाशावर त्याने नजर टाकली. जंगलापाठीमागे सूर्योदयाचा तेजस्वी पट्टा त्याला दिसला, दवाने पांढुरकी बनलेली लव्हाळी त्याने पाहिली आणि तीराच्या कोपऱ्याशी होडीचे पुढे डोकावणारे काळे नाकाड त्याला दिसले.

वोरोनोव होडीपाशी चालत गेला. होडीत बसून वासिली आदल्या दिवशीच्या बदकांची पिसे तोडीत होता.

"रामराम, नव्या नवऱ्या!" वोरोनोवने साद घातली.

उन्हात करपलेल्या कांतीखालील किंचित फिकुटलेला चेहरा वास्काने वर उचलला व वोरोनोवकडे पाहिले.

"सेर्गेय इवानीच, तुम्हाला एकटं टाकून आलो म्हणून ती मला खूप रागं भरली!" तो एवढ्या आनंदाने बोलत होता, की त्याचे शब्द त्याच्या स्मिताशी जुळत नव्हते. "मी सांगितलं की, तुम्हीच मला पाठ-वलंत. तुम्ही मला आता खोटं पाडू नका..."

"नाही पाडणार तुला खोटं!"

वास्काने सावधपणे, तिरप्या नजरेने वोरोनोवकडे कटाक्ष फेकला.

"माझा तिच्यावर विश्वास नाही असं तुम्ही समजू नका. फक्त मला एकदम तशी ओढ लागली... उगीचच मनात आलं की, ती दुसऱ्याला निवडू शकली असती, दुसऱ्या कुणाबरोबर तरी असू शकली असती. ह्या विचारांनी माझं डोकं एकदम भणाणून गेलं!" वास्काने सवयीनुसार हात पसरले. मग एकदम स्वतःचे कुरळे डोके वळवीत स्वतःशीच हसत पुढे म्हणाला: "किती मूर्ख आहे मी!"

फुगीर निळ्या बुबुळांच्या त्याच्या काळसर डोळ्यांमध्ये एक मंद चमक उमटली.

"आता शिकारीवर जाणं तुला शक्य नाही," वोरोनोव म्हणाला. "पुरता थकला आहेस!"

"अहो काय बोलताय, सेर्गेय इवानीच! आता मी सगळं करू शकेन! आता मी..."

वास्का एवढ्या प्रामाणिकपणे व साधेपणाने बोलला, की संशयाची एकही छटा उरली नाही. त्याच्या छोटुकल्या, कामसू बायकोपासून त्याला जीवनाची ताकद व जीवनाचा आनंद लाभत होते.

वोरोनोवच्या मनात वास्काबद्दल परत एकदा संतापाची लाट उमट-ली. वास्काचा आनंद त्याला त्रासदायक वाटत होता, त्याला कमीपणा देत होता, त्याचा अपमान करीत होता. ह्या तरुण पोराला सांगण्यास तो उतावीळ बनला होता की, एक काळ असा येईल जेव्हा ह्या तारुण्या-

च्या अधीऱ्या भावनांचा झरा आटून जाईल, नाहीसा होईल; पण त्या-ऐवजी त्याने खिन्नपणे वास्काला विचारले :

"कशाबद्दल तू तिच्यावर एवढं प्रेम करतोस?"

"कसं सांगू?" वास्का आश्चर्याने उत्तरला, जणू ह्या विचाराचा पूर्वी त्याच्या मनाला कधी स्पर्शच झाला नव्हता. "तिच्याविना मी कोण असतो? फक्त वास्का! पण आता मी माणूस आहे, नवरा आहे. कुटुंबाचा बाप आहे म्हणायला हरकत नाही. पण मुद्दा हा नव्हे..."

"थांब, थांब," हसत वोरोनोव म्हणाला. "तुला कुटुंबाचा बाप म्हणणं जरा घाईचं होईल. त्यासाठी मुलं असणं आवश्यक आहे."

"मुलं आहेत ना!" आनंदाने हसत वास्का म्हणाला. "कात्का आणि वास्का, जुळी आहेत. शिवाय सेन्का आहे, पण तो अजून रांगता आहे. आजीपाशी राहतोय..."

"काही समजत नाही मला," काहीशा अप्रिय भावनेने वोरोनोव म्हणाला. "किती वर्षं झाली... लग्न करून?"

"आमचं लग्न खूप जुनं झालंय. लौकरच सहा वर्षं पुरी होतील!"

"तर मग तू नवा नवरा कसा रे बेटा?" वोरोनोवने उद्धटपणे विचारले.

वास्काने परत हात पसरले.

"तसं म्हणतात, का ते मला ठाऊक नाही..."

१९५६

यूरी कज़ाकोव

दोघे डिसेंबरात

यूरी कझाकोव (१९२८-१९८२). सहाव्या दशकाच्या अखेरी व सातव्या दशकाच्या आरंभी साहित्यात आरंभ करणाऱ्या शुकशीन, ब्येलोव, प्रोस्कूरीन आणि बोगोमोलोव ह्या लेखकांच्या पिढीत यूरी कझाकोव यांचा समावेश होतो.

लेस्कोव, कोरोलेन्को, गोर्की आणि बूनिन अशा थोर लेखकांनी प्रस्थापित केलेल्या रशियन लघुकथेच्या राष्ट्रीय परंपरांशी कझाकोव प्रामाणिक राहिले. ह्या थोर लेखकांचा कझाकोव यांच्या लेखनावर घडलेला परिणाम ठळकपणे दिसतो. शैलीतील आणि निसर्गवर्णनातील अचूकता, त्याच प्रमाणे कथारचनेतील तारतम्य आणि तोल ते बूनिन यांच्यापासून शिकले.

'प्रॉब्लेमी लितेरातूरी' नियतकालिकाने घातलेल्या प्रश्नावलीला उत्तर देताना कझाकोव म्हणाले होते: "माझ्या वयाच्या बहुसंख्य लोकांसारखाच माझा अनुभव आहे असं मला वाटतं. माझ्या बालपणात आणि यौवनात युद्ध होतं, दुःखी आणि उपासमारीचं आयुष्य होतं. नंतर अभ्यास, काम आणि आणखी अभ्यास... थोडक्यात, सर्वसामान्य अनुभव. पण व्यक्तीच्या अंतर्गत चरित्राला प्राधान्य देण्याकडं माझा कल आहे... वास्तव साहित्याशी स्वतःच्या सीमा भिडविण्याचं धाष्टर्य करणाऱ्या प्रत्येक लेखकाला समस्यांचं एक वर्तुळ लाभतं व त्यात तो सर्व आयुष्यभर गुंतून राहतो. सुख आणि त्याचं स्वरूप, यातना व यातनांमधून सुटका, देशाबद्दलचं नैतिक कर्तव्य, प्रेम, आत्मसातत्यता, कामाविषयीचा दृष्टिकोन, वाईट अंतःप्रेरणांबाबत चिकाटी — माझं मन गुंतवणाऱ्या ह्या काही समस्या आहेत."

तो स्टेशनवर तिची खूप वेळपर्यंत वाट पहात थांबला होता. गोठल्या थंडीचा छान ऊन पडलेला दिवस होता आणि प्रत्येक गोष्ट त्याला आनंदित करीत होती: घसरपट्ट्यांवरून जाणाऱ्या लोकांचे थवे, मॉस्कोत अद्याप साफ करायची सवड न मिळालेल्या ताज्या बर्फाचा चुरडणारा आवाज. तो स्वत:वरही खूष होता: भक्कम घसरजोडे, गुडघ्यांपर्यंत लांबीचे लोकरी मोजे, जाडजूड स्वेटर व टोकदार ऑस्ट्रियन टोपी; पण सर्वांत जास्त खूष होता कातडी पट्टे लावलेल्या, वॉर्निश केलेल्या सुंदर घसरपट्ट्यांवर.

ती नेहमीप्रमाणे उशीर करीत होती आणि पूर्वी तो चिडायचा, पण आता त्याला तिच्या उशीरा येण्याची सवय झाली होती, कारण विचार केला तर बहुधा तिच्यात एवढीच एक उणीव होती. आता त्याने घसरपट्ट्या भिंतीला टेकवून उभ्या ठेवल्या होत्या व पाय उबदार राखण्यासाठी त्यांना हलकेच आपटत ती येण्याच्या दिशेने शांतपणे तो पहात होता. तो आनंदी नव्हता, नाही, फक्त शांत होता. कामाच्या ठिकाणी सर्व ठीक होते, लोकांना तो आवडत होता, घरातही सर्व ठीक होते, सर्व छान होते आणि हिवाळाही छान होता, याबद्दल विचार करायला प्रसन्न व सांत्वनपर वाटत होते. पण हा डिसेंबर महिना खरे तर मार्चसारखा भासत होता — चमकत्या सूर्यामुळे, चकाकणाऱ्या बर्फामुळे आणि मुख्य म्हणजे त्याचा आणि तिचा सूर जुळल्यामुळे. भांडणांचा, मत्सराचा, संशयाचा, अविश्वासाचा, अचानक वाजणाऱ्या फोनच्या घंटींचा, तुमच्या हृदयाला दुखविणाऱ्या व केवळ तुमचा श्वासोच्छ्वास तुम्हाला ऐकविणाऱ्या जीवघेण्या शांततेचा तो यातनादायी कालखंड आता

संपला होता. देवाची कृपा! आता मारे वेगळे होते – शांत, विश्वासू, हळुवार भावना वसत होती.

अखेरीस ती आली. तिच्या चेहऱ्याला व आकृतीला जवळून पहात तो म्हणाला :

"छान! अखेर आलीस..."

त्याने स्वतःच्या घसरपट्ट्या घेतल्या व दोघे सावकाशपणे निघाले, कारण ती घाईघाईने आल्यामुळे तिला धाप लागली होती. तिने लाल टोपी घातली होती. टोपीखालून केसांच्या बटा बाहेर डोकावत होत्या. जेव्हा ती त्याच्याकडे नजर टाकायची, तेव्हा तिचे काळेभोर डोळे तिरपे पहायचे आणि पापण्या फडफडायच्या. तिच्या नाकावर पहिल्या वासंतिक ठिपक्यांची पखरण झाली होती.

तो किंचित मागे राहिला, आगगाडीच्या भाड्यासाठी त्याने सुटी नाणी बाहेर काढली व तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे आणि पायांकडे नजर टाकताच त्याला अचानक जाणवले की, ती खूप सुंदर आहे, तिने छान पोषाख केला होता आणि तिला उशीर होण्याचे कारण बहुधा ती नेहमी सुंदर दिसू इच्छित आहे, ते चुकून बाहेर डोकावणारे बंडखोर केस कदाचित मुद्दामच बाहेर काढलेले असावेत आणि तिची विचारमग्नता किती हेलावून टाकणारी होती!

"ऊन पडलंय! किती छान आहे हिवाळा, होय ना?" तो तिकीटे काढत असताना ती म्हणाली. "तू काही विसरला नाहीस ना?"

त्याने फक्त ओठांना मुरड घातली. आता त्याच्या ध्यानात आले की, त्याने जरूरीपेक्षा खूपच जास्त वस्तू बरोबर घेतल्या होत्या, कारण पाठीवरील पडशी चांगलीच जड भासत होती.

आगगाडीचा डबा गर्दीने आणि गोंगाटाने भरला होता. पडशांची व घसरपट्ट्यांची दाटी झाली होती. प्रत्येकजण ओरडत होता, एकमेकांना हाका मारीत होता, घसरपट्ट्यांचा खडखडाट करीत आसनावर बसत होता. डब्याच्या खिडक्या थंडगार आणि पारदर्शी होत्या, पण आसनां-खालील रेडिएटर कोरडी ऊब पसरवीत होते. आगगाडी सुरू झाल्यानंतर खिडक्यांबाहेरच्या उन्हात चमकणाऱ्या बर्फाकडे पहायला व चाकांचा मंद ताल ऐकायला मजा वाटत होती.

सुमारे वीस मिनिटांनंतर तो धूम्रपानासाठी दाराजवळच्या मोकळ्या जागी गेला. सरकत्या दारांपैकी एका दाराला काचेचे तावदान नव्हते, थंड वारा मोकळ्या जागेत भिरभिरत होता, भिंतीला व छताला पांढरा बनवीत होता, गोठल्या थंडीचा आणि लोखंडाचा तीव्र दर्प येत होता, इथे चाकांची मंद लय नव्हती, तर घुमणाऱ्या रूळांवर प्रचंड खडखड ऐकू येत होती.

धूम्रपान करता करता तो दाराच्या काचेमधून डब्यात नजर टाकत होता. प्रत्येक आसनावरून त्याचे डोळे भिरभिरत होते, ह्या साऱ्या प्रवाशांची त्याला किंचित दया येत होती, कारण ह्या दोन दिवसांमध्ये त्याच्याएवढा सुखी कुणीही असणार नाही असे त्याला ठाम वाटत होते. त्याने तरुणींकडेही पाहिले, त्यांच्या उत्तेजित चेहऱ्यांना पाहताना त्याचे मन किंचित खंतावले. एखादी सुंदर तरुणी रस्त्यावरून दुसऱ्या कुणा-बरोबर जाताना दिसली म्हणजे त्याला नेहमी अशी खंतीची भावना डसायची. मग त्याने तिच्याकडे पाहिले व तो आनंदला. इथेसुद्धा ह्या तरुण व सुंदर मुलींच्या घोळक्यात ती इतर कुणाहीपेक्षा जास्त चांगली होती. ती खिडकीबाहेर पहात होती, तिचा चेहरा उबेने आरक्त बनला होता, तिचे डोळे काळे होते. पापण्या लांबसडक होत्या.

तावदान नसलेल्या दारातून तोसुद्धा गोठल्या थंडीकडे पाहू लागला. प्रखर प्रकाशामुळे व वाऱ्यामुळे त्याच्या डोळ्यांची सतत उघडझाप चालली होती. हिमाच्छादित, करकरणारे लाकडी फलाट भराभरा मागे सरकत होते. काही फलाटांवर आकाशी रंगाची, छपरावर लोखंडी धुरांडे असले-ली प्लायवुडची उपहारगृहे उभी होती. त्या धुरांड्यांमधून आकाशी रंगाच्या धुरांच्या रेषा उमटत होत्या. अशा बारमध्ये शेकोटीपाशी बसून बीयरचे घुटके घेत बाहेरून जाणाऱ्या लोकल गाडीची बारीक शिटी ऐकण्यात किती मजा येते, ह्याबद्दल तो विचार करीत होता. एकूणच सारे छान होते, हिवाळा झकास होता आणि आता प्रेम करायला त्या-च्यापाशी कुणीतरी होते ही केवढी आनंदाची बाब! तो जिच्यावर प्रेम करीत आहे ती तरुणी डब्यात बसलेली आहे, तिच्याकडे नजर टाकल्या-वर तिच्या नजरेचा प्रतिसाद मिळत आहे. हे सर्व किती छान होते ह्याची त्याला उत्तम कल्पना होती — विशेषतः अनेक सायंकाळी मित्रा-

बरोबर रस्त्यांवरून एकाकीपणे अर्थहीन भटकंती केल्यानंतर, तात्त्विक चर्चा करीत, सापेक्षतेच्या सिद्धांतांसारख्या बौद्धिक विषयांवर काथ्याकूट केल्यानंतर अखेर घरी तो एकटाच खिन्नपणे परतत होता. त्याने कविता-लेखनही सुरू केले होते आणि त्याच्या मित्राला कविता आवडत होत्या, कारण मित्रही एकटा होता. आता त्याच्या मित्राचे लग्न झाले होते.

माणसाची घडण किती विचित्र आहे असे त्याच्या मनात आले. त्याचेच उदाहरण: व्यवसायाने वकील, वयाला एव्हाना तीस वर्षे पूर्ण, पण नाव घेण्यासारखी एकही कामगिरी हातून घडली नाही, कसलाही नवा शोध लावलेला नाही, तारुण्यातील आकांक्षांनुसार कवी अथवा क्रीडापटु बनला नाही. आता दु:ख करायला त्याच्यापाशी कितीतरी कारणे आहेत, कारण आयुष्यात काहीच साध्य झाले नाही, पण तो दु:ख उगाळत बसला नाही. त्याचे काम सर्वसामान्य आहे आणि त्याने नाव कमावले नाही ह्याबद्दल त्याला मुळीच भयानक वाटत नाही. उलट आता तो समाधानी आणि शांत आहे, जणू सर्व स्वप्नांच्या पूर्ती झाल्या-प्रमाणे सामान्य जीवन जगत आहे.

मात्र एका गोष्टीची चिंता त्याला नेहमी छळायची – उन्हाळ्या-बद्दलचा विचार. उन्हाळ्याची सुटी कुठे घालवायची ह्याची योजना नोव्हेंबरापासूनच तो सुरू करायचा. सुटीचा कालखंड त्याला नेहमीच न संपणारा आणि तरीही अपुरा वाटायचा. म्हणून सुटी सत्कारणी लावण्यासाठी आधीच विचार करून सर्वोत्तम स्थळाची माणसाने निवड करावी असे त्याचे मत होते. सारा हिवाळा व वसंताचा मोसम तो उत्कृष्ट विश्रामस्थळांची माहिती काढण्यात घालवायचा, तेथील निसर्गा-बद्दल व माणसांबद्दल जाणून घ्यायचा, तेथे कसे पोहोचायचे ह्याबद्दल चिंता करायचा. खुद्द सफरीपेक्षा आणि सुटीपेक्षा बहुधा ह्या चौकशा व योजनाच अधिक सुखदायी असत.

आत्तासुद्धा उन्हाळ्याबद्दलचे विचार त्याच्या डोक्यात घोळत होते, एखाद्या नदीतीरावरील स्थळी तिच्यासह जाण्याचा त्याचा इरादा होता. स्वत:बरोबर एक तंबू घ्यायचा आणि रेड इंडियनांच्या होडीप्रमाणे बनणारी रबरी होडी घेऊन नदीतीरी मुक्काम टाकायचा – मग मॉस्कोला, अस्फाल्टच्या रस्त्यांना, वकीली सल्ल्यांच्या कचेरीतील कामाला रामराम!

तो आणि ती पहिल्यांदा मॉस्कोबाहेर एकत्र गेली होती, त्यावेळची त्याला आता आठवण झाली. कधी काळी काही कामानिमित्त तो एस्तोनियातील एका छोटया गावी गेला होता. ते गाव त्याच्या स्मरणात ठसले होते व नंतर तिला घेऊन तो तेथे गेला. बसचा प्रवास, रात्रीच्या वेळी वाल्दायमध्ये आगमन, भोवतालचा दाट काळोख व जीवनाची एकमेव खूण दाखविणारे प्रकाशित रेस्तराँ, ह्या गोष्टी त्याला आठवल्या. वोदकाचा आख्खा ग्लास पिऊन तो झिंगला होता, ती त्याच्याशेजारी बसमध्ये होती म्हणून तो खूप मजेत होता, स्तब्ध रात्रीत त्याच्या अंगावर रेलून ती डुलक्या काढत होती. पहाटेच्या वेळी ते मुक्कामाला पोहोचले होते. ऑगस्टच्या मध्याचे दिवस असूनही त्यावेळी मॉस्कोत अखंड पाऊस कोसळत होता, पण तेथे एस्तोनियात वातावरण निरभ्र आणि स्वच्छ होते, सूर्योदय घडत होता, तांबडया कौलारू छपरांची पांढरी घरे स्मित करीत होती, असंख्य बागा होत्या, नीरव शांतता होती, रस्त्यांवरील दगडांदरम्यान कुरळे गवत उगवले होते.

एक स्वच्छ, प्रकाशित खोली त्यांनी भाडयाने घेतली होती. खोलीत सर्वत्र साठवून ठेवलेल्या 'आन्तोनोवका' जातीच्या सफरचंदांचा घमघमाट सुटला होता. एस्तोनियातील बाजार संपन्न होता. त्या दोघांनी एकत्र जाऊन डुकराची धुरावलेली चरबी, मधाचे तुकडे, लोणी, टोमॅटो आणि काकडया ह्या वस्तू अत्यंत स्वस्तात खरेदी केल्या होत्या. शिवाय त्या बेकरींमधून येणारा खमंग वास, कबुतरांचे अखंड घुमणे व पंख फडफडविणे. मुख्य म्हणजे ती, अशी अनपेक्षित, जणू त्याला पूर्ण अनोळखी, पण एव्हाना लाडकी, जवळची. तो फार सुखी होता आणि कदाचित नशीबात आणखी मोठे सुख वाट पहात होते, मात्र युद्ध झाले नाही तर.

अलीकडे तो युद्धाबद्दल वारंवार विचार करायचा आणि त्याला युद्धाचा तिटकारा होता. पण आता चमकत्या बर्फाकडे, रायांकडे आणि शेतांकडे पाहताना, रूळांचा घुमणारा आवाज ऐकताना, त्याला खात्रीपूर्वक वाटले की, युद्ध होणार नाही, त्याचप्रमाणे मृत्यू घडणार नाही. कारण त्याच्या मनात आले की, आयुष्यात असे काही क्षण असतात, जेव्हा भयानक गोष्टींबद्दल माणूस विचार करू शकत नाही.

दूरच्या स्टेशनवर उतरणारी ती दोघे जवळ जवळ शेवटची होती. फलाटावरून चालताना त्यांच्या पावलांखाली बर्फ चुरचुरत होते.

"किती छान हिवाळा!" डोळे किलकिले करीत ती परत म्हणाली. "खूप वर्षांत असा नव्हता!"

त्याच्या दाचा*पर्यंतचे वीस किलोमीटर अंतर त्यांना जायचे होते, रात्र तेथे घालवून पुन्हा दिवसा बर्फावरून घसरण्याचा कार्यक्रम होता आणि संध्याकाळी दुसऱ्या रेलमार्गाने घरी परतायचे होते.

त्याच्या वडिलांची छोटीशी फळबाग होती व तेथेच फळ्यांची छोटी केबिन होती. त्या घरकुलात दोन पलंग, एक मेज, ओबडधोबड स्टूले व बीडाचा जर्मन चुलाणा एवढ्या वस्तू होत्या.

त्याने घसरपट्ट्या पायांना बांधल्या, अनेक उड्या मारून बर्फावर पाय आपटले, हिमाची भुकटी उधळली, मग तिच्या घसरपट्ट्यांच्या बांधलेल्या वाद्या तपासल्या व सावकाशपणे त्या दोघांनी जायला आरंभ केला. योग्य वेळी घरी पोहोचून ऊब व आराम घ्यायचा त्यांचा इरादा होता, त्यासाठी जलद जाणे भाग होते, पण ह्या मैदानांमधून आणि जंगलांमधून भराभर जाणे अशक्य होते.

"बघ, त्या अॅस्पच्या झाडांचे बुंधे केवढे आहेत!" थबकून ती म्हणाली. "मांजरांच्या डोळ्यांचा रंग आहे."

तोसुद्धा थबकून बघू लागला–खरोखरच अॅस्पची झाडे शेंड्यांवरती पिवळट-हिरवी होती, हुबेहूब मांजराच्या डोळ्यांचा रंग.

जंगलात उन्हाची तिरपी किरणे घुसली होती व त्यांच्यातून धूर उमटत होता. झाडांच्या बुंध्यांदरम्यान अधूनमधून हिमाची चादर लोंबत होती आणि ओझ्यापासून मुक्त झालेली फरची झाडे आपले पंजे हलवीत] होती.

ती दोघे एका उतारावरून दुसऱ्या उतारावर जात होती, अधूनमधून खालच्या शुभ्र छपरांच्या खेड्यांवर नजर टाकत होती. सगळ्या झोपड्यांमधून चुलाणे पेटले होते व खेडी धूर ओकत होती. धुराचे स्तंभ आकाशात उठत होते, मग मिसळत होते, अलग तरंगत जात

---

*रशियन उन्हाळी घर–अनु.

होते व सभोवतालच्या टेकड्यांभोवती निळसर आच्छादन पसरत होते. एक किंवा दोन किलोमीटर अंतरावरूनसुद्धा खेड्यातील धुराचा वास जाणवत होता, त्या वासामुळे घरी लौकर जाऊन चुलाणा पेटवायची इच्छा मनात तीव्र बनत होती.

घसरगाड्यांच्या धावपट्ट्यांमुळे गुळगुळीत व चकचकीत बनलेले घट्ट थिजलेले रस्ते त्यांना मधूनमधून आडवे येत होते. डिसेंबरचा महिना होता तरी त्या रस्त्यांना काहीसे वासंतिक रूप आले होते: गवताच्या विखुरलेल्या काड्या, चाकोऱ्यांमधील पारदर्शी निळसर झाक आणि वसंताचा गंधसुद्धा. एकदा एक काळा घोडा रस्त्यावरून खेड्याकडे दौडत गेला. त्याची त्वचा चमकत होती, स्नायू उठून दिसत होते, त्याच्या खुरांखालून बर्फ व हिम उडत होते, टापांचा आवाज व फुरफुरणे ऐकू येत होते. ती दोघे परत थबकली आणि खेड्याकडे धावणाऱ्या घोड्याला बघत राहिली.

एकदा एक विस्कटलेला डोमकावळा कमालीच्या चिंतामग्न अवस्थेत जवळून उडत गेला, दुसरा डोमकावळा त्याच्या पाठोपाठ गेला, तर थोड्या दूर अंतरावर एक नीलकण्ठ पक्षी कुतूहलाने घिरट्या मारत होता, डोमकावळ्यांवर सतत नजर ठेवून होता, त्यांना काय सापडले होते ते जाणून घेण्यास फार उत्सुक होता. ह्या घटनेकडेही त्या दोघांचे लक्ष गेले होते. शिवाय आणखीही काही गोष्टी पाहण्यासारख्या होत्या. ह्या गोठलेल्या वातावरणात आणि हिमात उष्णकटिबंधीय पक्ष्यांप्रमाणे रंगीबेरंगी दिसणारे बुलफिंच हिमाखालून व डोकावणाऱ्या एक उंटकटाऱ्यावर झोके घेत होते, किलबिलत होते आणि त्यांच्या जाड, बळकट चोचींमधून हिमावर उडणाऱ्या सुक्या बियांमुळे एक काळा पट्टा उमटला होता.

कधी कधी त्यांना कोल्ह्याचे ठसे आढळत होते, ते सरळ रेषेत असले तरी एका टेकाडापासून दुसऱ्या टेकाडापर्यंत त्यांनी वळसा घातला होता, मग बाजूला जाऊन हिमाच्या चकचकाटात ते अदृश्य झाले होते. ती दोघे बर्फावरून घसरत पुढे जात होती आणि आता ॲस्पच्या व भोजाच्या रायांमध्ये त्यांना सशांचे अथवा खारींचे ठसे आढळू लागले.

मैदानांमधून आणि जंगलांमधून गेलेल्या गूढ निशाजीवनाच्या त्या

सर्व खुणा हृदयात चलबिचल निर्माण करीत होत्या, शिकारीला जाण्या-पूर्वीच्या रात्रीच्या समोवारची आठवण करून देत होत्या, टाचांपर्यंत लांबीच्या मेंढकातडी कोटाची व बंदुकीची, खाली ओठंगलेल्या ताऱ्यांची, रात्रीच्या वेळांना खाण्यासाठी जेथे ससे जमतात त्या काळया गवताच्या गंजींची व त्याच वेळी तेथे येऊन मागील पायांवर उभे रहात हवा हुंगणाऱ्या कोल्ह्यांची आठवण करून देत होत्या. वातावरणात घुमणारा बंदुकीचा बार, अचानक चमकलेला प्रकाश, टेकडयांमध्ये उमटलेले त्या बाराचे प्रतिध्वनी, खेडयांमधील दचकलेल्या कुत्र्यांचे भुंकणे, ताठ पसरलेल्या सशाचे काचेसारखे दिसणारे डोळे, पांढरट हिमाचा थर चढलेल्या त्याच्या मिशा व त्याच्या छोटया देहाचे उबदार वजन, ह्यांची कल्पना मनात करणे सहज शक्य होते.

खाली दऱ्यांमध्ये आणि खिंडींमध्ये हिम खूप खोल व कोरडे होते, पण डोंगरउतारांवर थिजलेल्या पाण्याचा पापुद्रा होता, त्यावर नव्या हिमभुकटीची पखरण झाली होती, त्यामुळे खाली घसरत जाणे अधिक सोपे बनले होते. दूरवरच्या टेकडयांवरील आकाशरेषेलगतची झाडी गुलाबी चमकत होती, आकाश निळे होते, मैदाने असीम भासत होती.

अशा रीतीने वर चढत, खाली घसरत, पडलेल्या झाडांच्या बुंध्यांवर विश्रांती घेत, एकमेकांकडे पाहून स्मित करत ती दोघे जात होती. काहीवेळा तो तिच्या मानेभोवती मागील बाजूने हातांचा विळखा घालायचा, तिला खाली ओढायचा व तिच्या थंडगार ओठांचे चुंबन घ्यायचा. "पहा!" अथवा "ऐक!" अशा अधूनमधून काढलेल्या उद्‌गारांव्यतिरिक्त ती दोघे आणखी काही बोलत नव्हती.

एवढे मात्र खरे की, ती खिन्न होती, तिचे मन दुसरीकडे कुठेतरी भरकटत होते, ती सतत मागे पडत होती. पण त्याला तिची ही मनःस्थिती मुळीच समजत नव्हती, त्याला वाटले की ती फक्त दमली होती. तिची वाट पहात तो थांबून रहात होता आणि जेव्हा ती त्याला गाठायची व काहीशा रागीट चेहऱ्याने त्याच्याकडे पहायची, तेव्हा सावधपणे तिला तो विचारायचा, कारण असे प्रश्न साथीदाराला किती अप्रिय असतात ह्याची त्याला पूर्ण कल्पना होती:

"तू दमलीस काय? तर मग विश्रांती घेऊ."

"छे: छे:!" ती घाईघाईने म्हणायची. "मी आपली सहज... विचारात गुंतले होते."

"अस्सं!" तो म्हणायचा व पुढची वाट धरायचा, पण आता तो मघापेक्षा हळू जाऊ लागायचा.

सूर्य आता खाली उतरला होता, फक्त टेकड्यांचे माथे चमकत होते. दऱ्या आणि खिंडी केव्हाच काळोखात बुडाल्या होत्या, निळ्या सावल्यांनी त्यांच्यावर आक्रमण केले होते. जंगलाच्या आणि मैदानाच्या त्या अफाट विस्तारामधून दोन एकाकी छोट्या आकृती जात होत्या– तो पुढे आणि ती पाठीमागे. तिच्या घसरपट्ट्यांखाली होणारा बर्फाचा सळसळ आवाज व घसरकाठ्यांचा टणत्कार त्याला आवडत होता.

जंगलापलिकडे सूर्य जेथे एव्हाना बुडाला होता त्या ठिकाणाहून, गुलाबी आभेमधून, एकदा इंजिनांचा तालबद्ध घरघराट ऐकू आला व मिनिटभरानंतर उंच आकाशात विमान दिसले. चमकणारी तेवढी एकच वस्तू होती, त्याच्या सांगाड्यावर उन्हाचे पट्टे चमकत होते. खालच्या निःस्तब्ध, गोठल्या शांततेमधून वरती पहायला, स्वतःला विमानातील एक प्रवासी म्हणून कल्पना करायला, त्याची वाट पाहणाऱ्या मॉस्को-बद्दल व विमानतळावर त्याला भेटायला येणाऱ्या लोकांबद्दल विचार करायला खूप मजा वाटत होती.

सायंकाळी तिन्हीसांजांना अखेर ती दोघे मुक्कामाला पोहोचली. थंड्या व्हरांड्यात त्यांनी बर्फाचे थर साचलेले स्वतःचे बूट जोरजोरात आपटले, दाराचे कुलूप काढून आत प्रवेश केला. खोलीत खूप अंधार होता, बाहेरपेक्षा आत जास्त थंडी भासत होती.

ती तात्काळ बिछान्यावर आडवी झाली आणि तिने डोळे मिटून घेतले. वाटचालीच्या श्रमांमुळे ती लालबुंद बनली होती, तिला उकडत होते, पण आता तिचे शरीर गार बनू लागले आणि तिला एवढ्या जोरात हुडहुडी भरली की, शरीराची किंचितसुद्धा हालचाल करायला तिला भीती वाटू लागली. तिने डोळे उघडले आणि अंधारात फळ्यांचे छत पाहिले, रॉकेलच्या दिव्याच्या धुरकट काचेत ज्वाला फडफडताना पाहिली. तिने पुन्हा डोळे गच्च मिटून घेतले आणि क्षणात रंगांच्या

उधळणीत ती तरंगू लागली : पिवळा, हिरवा, पांढरा, निळा आणि लाल. त्या दिवशी तिने डोळे भरभरून पाहिलेले सर्व रंग.

व्हरांड्याखालून सर्पणाची लाकडे आणून त्याने चुलाण्यापाशी टाकली, मग खडखड करीत, कागदाची सळसळ करीत आग पेटवली, घसा खाकरला. पण तिला काहीही नको होते, ह्यावेळी त्याच्याबरोबर आल्याबद्दल तिला पश्चात्ताप वाटत होता.

चुलाणा लालबुंद तापला, खोलीत ऊब पसरली, अंगातील कपडे काढायला आता हरकत नव्हती. त्याने कपडे काढले, बूट व मोजेही काढले, त्यांना चुलाण्यापाशी टांगले. अत्यंत समाधानाने डोळे किलकिले करीत, पायांच्या अंगठ्यांची चाळवाचाळव करीत व धूम्रपान करीत तो अंतर्वस्त्रांमध्ये बसून राहिला.

"दमलीस?" त्याने विचारले. "कपडे काढ!"

जरी तिची हलायची मुळीच इच्छा नव्हती, खिन्नतेने आणि दुःखाने तिला घेरले होते, तसेच झोपावेसे वाटत होते, तरी तिने आज्ञाधारकपणे कपडे काढले, जर्सी, मोजे व स्वेटर वाळवायला टांगले. आता तिच्या अंगावर तंग तुमानीसह एक पुरुषी चौकड्यांचा सदरा होता. खांदे सैल सोडत, दिव्याकडे टक लावून पहात ती बिछान्यावर आडवी पडली.

त्याने बुटांमध्ये पाय सरकवले, खांद्यांवर जाकीट टाकले आणि व्हरांड्यातील बादली उचलली. तो बाहेर गेला तेव्हा बादलीचा मधुर किणकिणाट झाला. परत येऊन त्याने चुलाण्यावर किटली ठेवली व पडशीतील वस्तू टेबलावर आणि खिडकीच्या चौकटीत मांडायला आरंभ केला.

चहा तयार होईपर्यंत ती मुकाट वाट पहात बसली. मग कपात चहा ओतून घेऊन शांतपणे पाव-लोणी खात, गरम कपावर हात शेकत, चहाचे घुटके घेत व सारा वेळ दिव्याकडे टक लावून पहात बसून राहिली.

"गप्प काय बसलीस?" त्याने विचारले. "आजचा दिवस किती मस्त होता! होय ना?"

"मी आज फार दमलेय," ती उठली व त्याच्याकडे न पाहताच तिने पलंगावर अंग टाकले. "आता झोपू या!"

"कल्पना वाईट नाही," तो पटकन सहमत झाला. "जरा थांब, मी आणखी लाकडं घालतो. नाही तर मग घर गार होईल..."

"आज मी एकटीच झोपते. इथं चुलाण्याजवळ झोपलेलं चालेल? तू रागावू नको," ती घाईघाईने म्हणाली व तिने नजर खाली वळविली.

"काय झालं तुला?" चकित होऊन त्याने विचारले आणि तात्काळ त्याला तिचा दिवसभराचा खिन्न-विमनस्क चेहरा आठवला. ह्या आठवणी-सरशी तो संतापला आणि त्याच्या काळजात वेदनादायी ठणक सुरू झाली.

अचानक त्याच्या ध्यानात आले की, त्याला तिची मुळीच माहिती नव्हती–ती विद्यापीठात कशी शिकत आहे, कुणाशी तिच्या ओळखी आहेत आणि कोणत्या विषयांवर ती बोलत आहे, ह्याबद्दल त्याला काहीही ठाऊक नव्हते. ती त्याच्या दृष्टीने एक गूढ होती, त्यांच्या पहिल्या भेटीच्या वेळी होती तशीच, त्याला ती ठाऊक नव्हती आणि बहुधा तिला तो रांगडा व मठ्ठ वाटला होता, कारण तिला काय पाहिजे होते हे त्याला समजत नव्हते, तिला कशाचीही अथवा दुसऱ्या कुणाचीही गरज भासू नये अशा रीतीने तो तिला सतत सुखी ठेवू शकत नव्हता.

त्या सबंध दिवसाबद्दल, दाचा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या त्या भिकार केबिनबद्दल, चुलाण्याबद्दल त्याला एकाएकी शरम वाटली. काही कारणामुळे गोठलेल्या वातावरणाची व दिवसभराच्या उन्हाचीही त्याला शरम वाटली, स्वतःच्या शांत व समाधानी वृत्तीची शरम वाटली. कशासाठी त्यांनी इथे यायला पाहिजे होते? ह्या सगळ्याचा काय उपयोग? आणि ते कौतुकाचे सुख कुठे?

"ठीक आहे..." बेफिकीरीच्या स्वरात तो म्हणाला आणि त्याने खोल श्वास घेतला. "कुठं पाहिजे तिथं झोप."

त्याच्याकडे न पाहता, अंगातील कपडे न काढता ती तात्काळ नि-जली, तिने अंगावर जर्सी पांघरला व चुलाण्यातील ज्वालांकडे ती पाहू लागली. तो दुसऱ्या पलंगावर जाऊन सिगारेट ओढत बसला, मग त्याने दिवा विझवला व तो बिछान्यावर आडवा झाला. त्याला खूप वाईट वाटले होते, कारण तिला तो गमावत होता ह्याची त्याला जाणीव झाली होती. सुखाला प्राप्त करण्यात त्यांना अपयश आले होते. त्याचे

कारण मात्र त्याला उमगत नव्हते आणि त्याबद्दल त्याला चीड येत होती.

मिनिटभरानंतर त्याला तिच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. तो उठून बसला आणि टेबलापलिकडे त्याने तिच्यावर नजर टाकली. चुलाण्यामुळे खोलीत बऱ्यापैकी उजेड होता, ती कुशीवर झोपली होती, जळत्या लाकडाकडे पहात होती. अश्रूंनी माखलेला, वेदनेमुळे वेडावाकडा व कुरूप भासणारा तिचा चेहरा त्याने पाहिला. तिचे ओठ व तिची हनुवटी थरथरत होती, स्वतःचे ओले डोळे ती सतत नाजुक हाताने पुसत होती.

नेमकी आजच ती अशी उदास आणि दुःखी का बनली? तिला स्वतःलाच कारण ठाऊक नव्हते. तिला एवढेच समजले होते की, त्यांच्या प्रेमाचा पहिला बहर ओसरला होता, नव्या कशाचातरी आरंभ घडत होता, जुन्या जीवनाबद्दलचे तिचे स्वारस्य संपले होते. तिच्या मातापित्यांच्या दृष्टीने, काका-मावशांच्या दृष्टीने, त्याच्या व तिच्या मित्रांच्या दृष्टीने एक कुणीही नसण्याचा तिला कंटाळा आला होता. तिला पत्नी व माता बनायचे होते, पण त्याला हे दिसत नव्हते आणि आहे त्या परिस्थितीत तो खूष होता. त्यांच्या प्रेमाचा पहिला थरारक काळ सर्वथा संदिग्ध आणि अनिश्चित होता, तरीही तापता होता, नाविन्याने भरलेला होता. पण त्या काळाबद्दल तिला कमालीचे वाईट वाटत होते.

मग तिला झोप येऊ लागली आणि लहानपणापासून झोपायच्या वेळी पाहण्याची सवय असलेले स्वप्न तिला पडू लागले. तिला तो सामर्थ्यवान आणि शूर दिसत होता. त्याचे तिच्यावर प्रेम होते, तिचे त्याच्यावर प्रेम होते, पण काही कारणास्तव ती सतत म्हणत होती "नाही" आणि तो दूर गेला, खूप दूरच्या उत्तरेच्या प्रदेशात गेला, तेथे मच्छीमार बनला व ती एकटी झुरू लागली. लाटांचा मार खाणाऱ्या खडकांमधून तो शिकार करीत होता, एका खडकावरून दुसऱ्या खडकावर झेपावत होता, संगीतरचना करीत होता, समुद्रावर मासे धरायला जात होता व सतत तिच्याबद्दल विचार करीत होता. एक दिवस तिला जाणवले की, केवळ त्याच्याबरोबरच ती सुखी होऊ शकेल. तिने सर्व गोष्टी सोडल्या व त्याला भेटायला ती निघाली. ती खूप सुंदर असल्यामुळे प्रवासात प्रत्येकजण तिची प्रणयाराधना करीत होता – वैमानिक, ड्रायव्हर

आणि खलाशी – पण तिने कुणाहीकडे लक्ष दिले नाही, तिच्या मनात फक्त त्याचाच विचार होता. त्यांची भेट अत्यंत अद्भुत, चित्तथरारक ठरणार होती, तिच्याबद्दल कल्पना करणे अवघड होते. तो क्षण लांबणीवर टाकण्यासाठी ती नवनवे विलंब शोधून काढत होती. ह्या ठिकाणी सर्वसाधारणपणे त्याला न भेटताच तिला झोप लागायची.

फारा काळात झोपण्याच्या वेळी तिचे मन अशा चाळ्यात गुंतले नव्हते, पण आज तिला पुन्हा अशा स्वप्नाच्या आधीन होण्याची इच्छा झाली. आणि आजसुद्धा मोटारबोटीत बसून ती त्याला भेटायला निघाली असताना तिच्या विचारांचा गोंधळ माजला व त्यातच ती झोपली.

रात्री गारठ्यामुळे तिला जाग आली. विझून गेलेला चुलाणा पुन्हा पेटवायचा प्रयत्न करीत तो उकीडवा बसला होता. तो केविलवाणा दिसत होता. तिला त्याच्याबद्दल दया वाटली.

सकाळी ती दोघे आरंभी गप्प होती. न्याहरी व चहापान मौनातच पार पडले. पण नंतर त्यांच्या वृत्ती उल्हसित बनल्या आणि घसरपट्ट्या लावून ती फिरायला बाहेर पडली. टेकड्यांवर उंच उंच व अधिक धोक्याच्या जागा शोधून घसरगुंडीचा खेळ खेळली.

केबिनमध्ये परत येऊन त्यांनी अंगात ऊब आणली, क्षुल्लक विषयांवर गप्पा मारल्या, ह्या वर्षी हिवाळा किती छान आहे ह्यावर चर्चा केली. अंधार पडू लागला तेव्हा त्यांनी सामानाची आवराआवर केली, केबिनला कुलूप घातले आणि घसरपट्ट्यांवरून स्टेशनचा रस्ता धरला.

संध्याकाळच्या सुमाराला त्यांची आगगाडी मॉस्कोला पोहोचली. त्या दोघांना डुलकी लागली होती, पण विजेच्या प्रकाशाने चमकणाऱ्या खिडक्यांच्या मोठ्या इमारती दिसू लागल्या तेव्हा त्याच्या मनात विचार आला की, आता ती एकमेकांचा निरोप घेतील आणि अचानक त्याने तिला स्वतःची पत्नी कल्पिले.

का नाही? पहिल्या तारुण्याचा बहर ओसरला होता, जेव्हा प्रत्येक गोष्ट साधी वाटते, आवश्यक आहेच असे वाटत नाही – घर, बायको, कुटुंब आणि तत्सम – तो काळ आता संपला होता. आता तो तिशीत होता आणि ती विशिष्ट भावना, जेव्हा तुम्हाला माहीत असते की,

ती सुंदर आहे, तुमच्याबरोबर आहे, पण तरीही तुम्हाला हवे तेव्हा तुम्ही तिला सोडून दुसऱ्या स्त्रीकडे जाऊ शकता, कारण तुम्ही मुक्त आहात, ही भावना आता मनाला फारशी सुखवीत नव्हती.

उद्या सारा दिवस कचेरीत कायदेविषयक सल्ले द्यायचे, अपीले लिहायची, निवेदने तयार करायची, लोकांच्या संकटांबद्दल विचार करायचा, त्यात त्यांच्या घरगुती भानगडींचीही चिंता करायची व मग घरी परतायचे – कुणापाशी? मग उन्हाळा, लांबलचक उन्हाळा, सहली, जलविहार, तंबू वगैरे, पण पुन्हा – कुणाबरोबर? अधिक चांगले, माणुसकीने जगण्याची आणि तिच्या सुखासाठी सर्व काही करण्याची त्याला इच्छा झाली.

पण जेव्हा ती दोघे स्टेशनबाहेरील चौकात आली, जेथे रस्त्यावरचे दिवे जळत होते, शहरातील गोंगाट होता आणि बर्फाचे ढीग एव्हाना झाडून काढण्यात आले होते, तेथे त्या दोघांनाही वाटले की, त्यांची सहल, ते एकत्र सहवासाचे दोन दिवस जणू कधी अस्तित्वातच नव्हते, आता त्यांना एकमेकांचा निरोप घ्यायचा होता, आपापल्या वाटांनी निघून जायचे होते व बहुधा दोन-तीन दिवसांनंतर परत भेटायचे होते. त्या दोघांनाही एकदम नित्याप्रमाणे शांत, हलके वाटू लागले आणि नेहमीप्रमाणे त्यांनी ओझरत्या स्मितांसह निरोप घेतला. तो तिला सोबत गेला नाही.

१९६६



व्लादीमिर सोलोऊखिन

वार्वारा इवानोवना

व्लादीमिर सोलोऊखिन (जन्म १९२४). व्लादीमिर सोलोऊखिन प्रसिद्ध कवी व गद्य लेखक आहेत. 'व्लादीमिरचे ग्रामीण रस्ते' (१९५७), 'दंवबिंदू' (१९६०) ह्या त्यांच्या काव्यात्म लघुकादंबऱ्या व इतर अनेक पुस्तके आजच्या ग्रामीण प्रदेशाबाबतची आहेत. 'रशियन म्युझियमकडून आलेली पत्रे' (१९६६) ह्या पुस्तकाने लेखकाला रशियन पुरातन स्मारकांचा रक्षणकर्ता, रशियन संस्कृतीमधील महान परंपरा चालू ठेवण्याच्या कल्पनेचा कैवारी, अशी कीर्ती मिळवून दिली.

'सुंदर आदीगेने' (१९७६) आणि 'पाव व मध' (१९७८) ह्या लघुकादंबऱ्यांच्या व लघुकथांच्या संग्रहांनी सोलोऊखिन लघुकथाकार म्हणून प्रस्थापित झाले.

कथा लिहिण्यापूर्वी सोलोऊखिन अनेक वर्षे निबंधकार म्हणून काम करीत होते. त्या काळाच्या आठवणी सांगताना सोलोऊखिन म्हणतात: "निबंध एखाद्या लघुकथेप्रमाणे रचला पाहिजे असा मी नियम केला होता, पण तो पूर्णतः वास्तव साहित्यावर आधारलेला पाहिजे... निबंध वास्तव साहित्य बनावेत ह्यासाठी, केवळ मासिकाच्या चालू अंकापुरतेच ते टिकू नयेत, तर खुद्द त्यांच्या लेखकाकडून निदान दोन तास टिकावेत ह्यासाठी, अर्धसत्य त्यांना चालणार नाही... त्यांना फक्त नग्न सत्य असले पाहिजे... आश्चर्य म्हणजे, अनेक वर्षांनंतर जेव्हा मी निबंध न लिहिता लघुकथा लिहू लागलो, तेव्हा जाडजूड पादत्राणांमध्ये चालण्याच्या शर्यतीचा आधी सराव केलेल्या (जणू त्याच्या पायांना मोठी वजने बांधली आहेत) आणि नंतर प्रत्यक्ष शर्यतीच्या मैदानावर रबरी तळाचे हलके बूट घालून गेलेल्या खेळाडूसारखे मला वाटले."

आवश्यक सत्याबद्दलची ही निष्ठा आणि दैनंदिन जीवनात दर पावलागणिक भेटणाऱ्या व्यक्तिरेखांची "ओळख" – ह्यामुळे सोलोऊखिन यांच्या कथा आकर्षक बनल्या आहेत.

टेबलापाशी बसून आम्ही गप्पा मारीत होतो. सर्व खाद्यपदार्थांचा आणि पेयांचा फडशा पडला होता. आता टेबलावर रिकामे ग्लास होते, अंडी तळलेला रिकामा तवा होता, कांद्याची पाती उरलेली एक बशी होती आणि पावाची बशी होती.

टेबलापाशी माझ्याशिवाय आणखी विभागीय समितीचे माजी चिटणीस (विस्तारापूर्वी) आणि आताचे प्रादेशिक कार्यकर्ते कूद्र्याशोव, विभागीय समितीचे नवे चिटणीस (आता पक्षीय समितीचे) ग्रिगोऱ्येव, ग्राम-मंडळाचे अध्यक्ष बरीसोव आणि तांत्रिक दुरुस्ती स्थानकाचे संचालक लेओनिद कॉन्स्तान्तिनोविच कोरोविन बसले होते.

मी प्रांजलपणे तुमच्यासमोर कबूल करतो की, पहिली तीन नावे मी काल्पनिक सांगितली आहेत, उगीच चर्चा व्हायला नको म्हणून. तळलेल्या अंड्यांबरोबर शंभर शंभर ग्राम वोदका प्यायलो. पण लेओनिद कॉन्स्तान्तिनोविच कोरोविन यांचे नाव लपविणे शक्य नाही, कारण त्यांनीच आम्हाला ही छोटी, तरीही महत्त्वपूर्ण कथा सांगितली. ती कथा आता मी तुम्हाला सांगू इच्छितो.

किती छान कथन केले त्यांनी! साक्षात सराईत लेखकाप्रमाणे. अनावश्यक तपशील मुळीच नव्हता, फक्त महत्त्वाचे मुद्दे. जणू त्यांनी आधीच लिहिलेल्या कथेचा सारांश ते सांगत होते.

तळलेल्या अंड्यांबरोबर शंभर ग्राम दारू पिण्यापूर्वी आम्ही आख्खा दिवस दोन 'गाझ' मोटारींमधून वणवण केली होती, सामुदायिक शेतांना आणि पथकांना भेटी दिल्या होत्या, पीक कुठे उगवलेय आणि कुठे नाही ह्याची पाहणी केली होती. वसंताचा तो मोसम फार वाईट होता: एप्रिल-

च्या मध्याला ऐन उन्हाळ्याची तेहतीस सेंटीग्रेडची झळ चटके देत होती.

शिवाय सामुदायिक शेताचे नवे अध्यक्ष जास्त चिकित्सक होते (१९३७ मध्ये जन्मलेल्या तरुण प्राणि-तंत्रज्ञाची त्यांनी नेमणूक केली होती), आणि नवी झाडू नेहमी स्वच्छ झाडते! शिस्त कडक करण्याच्या हेतूने व्यवस्थापक मंडळाने निर्णय घेतला की, सामुदायिक शेतावर काम न करणाऱ्या माणसांचे खाजगी जमिनीचे तुकडे काढून घ्यायचे. आळशांना अथवा हळूच वरकमाई करणाऱ्यांना ताळ्यावर आणायला ही उपाययोजना ठीक होती, पण आमच्याकडे नेहमी घडते त्याप्रमाणे व्यवस्थापक मंडळाने अतिरेक केला.

उदाहरणार्थ, म्हातारा आणि म्हातारी त्यांच्या आयुष्याचे अखेरचे दिवस मोडकळीला आलेल्या छोटया खोपटात कंठत आहेत. माणसाला शक्य होते त्या मर्यादेपर्यंत त्यांनी सामुदायिक शेतावर काम केले होते, पण आता त्यांच्यात बळ उरले नाही. एव्हाना ऐशी उलटून गेलेली! प्रत्येक गोष्टीला मर्यादा आहे. खुशाल बाहेरच्या बाकड्यावर बसू दे त्यांना किंवा त्यांच्या छोटया परसदारीच्या वाफ्यात खणू दे. मे महिन्यात पिवळी रानटी फुले उगवणारा, जूनमध्ये डेझीच्या फुलांनी भरणारा पडीत जमिनीचा छोटा तुकडा आणि त्या तुकड्यापलिकडे बटाटयाचा वाफा. खरे आहे, त्यांची ऐशी उलटलीय, कदाचित लौकरच मरतील, पण निदान एक-दोन वर्षे त्यांना जगले तर पाहिजे. म्हाताऱ्यांना त्यांच्या बटाटयाच्या वाफ्याची आणि भाजीपाल्याच्या जमिनीच्या तुकड्याची गरज आहे. शिवाय सामुदायिक शेतावर पेन्शन देत नाहीत.

आणि अचानक निर्णय येतो: अर्धी जमीन काढून घ्या.

"असं कसं रे बाबा भल्या माणसांनो? वाफ्याच्या एका टोकाला आम्ही थोडं ओट धान्य पेरलंय, कोंबड्यांना खायला घालण्यासाठी!"

पण त्यांचे ऐकतो कोण? त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. पेरलेली जमीन जप्त करण्यात आली. वाया गेलेल्या बियाण्याची भरपाई करण्याचासुद्धा त्यांनी विचार केला नाही. नवी झाडू स्वच्छ झाडून काढते म्हणतात ह्याचा अर्थ असा!

अथवा दुसरे उदाहरण. माणूस सबंध आयुष्यभर मॉस्कोत राहिला, क्रांतीदरम्यान गेला, म्हणजे काही सामुदायिक शेत सोडून पळून गेला

नाही. मॉस्कोत कारखान्यात त्याने काम केले, लोकांसाठी स्वतःची ताकद आणि बुद्धी त्याने खर्च केली असे म्हणायला हरकत नाही. दर-वर्षी सुटीत तो त्याच्या खेड्यात जातो, नदीकिनारी त्याचे घर आहे, घरामागे छोटी बाग आहे.

पेन्शन घेतल्यावर मोकळ्या हवेत राहण्यासाठी तो कायमचा खेड्यात परतला. दरम्यान बाग स्वच्छ, मशागत केलेली, नीटस आणि सुसंस्कृत बनली. विक्रीसाठी नव्हे, तर स्वतःच्या आनंदासाठी. एका मोठ्या लेखकाने म्हटलेय: प्रत्येक माणसाने निदान एक तरी झाड लावावे. पेन्शनराने जमीन खणावी आणि बागेची मशागत करावी असे खुद्द देवाने म्हटलेय.

आणि अचानक निर्णय येतो: मॉस्कोच्या पेन्शनराची बागेसकट सर्व मालमत्ता जप्त करा. आमच्याकडे म्हणतात: कोपऱ्यापर्यंत छाटा. म्हणजे फक्त घराखालील जमीन तेवढी ठेवायची.

सामुदायिक शेताचा तरुण अध्यक्ष स्वच्छ झाडझूड करतोय – वि-भागीय पुढाऱ्यांना त्याने करून ठेवलेले गोंधळ निस्तरायचे आहेत. तेव्हा धुळकट शेतांमधून उन्हाच्या कडाक्यात वणवण केल्यानंतर पाच वाजाय-च्या सुमाराला आमच्या पोटात भुकेचा वणवा पेटला आणि अंडी व डुकराची चरबी आम्ही खाल्ली यात आश्चर्य काय?

संभाषणाला हळूहळू तात्त्विक वळण लागले. कोणत्या संदर्भात चर्चा सुरू झाली हे मला आठवत नाही, पण मानवी ताकद अथवा सहन-शक्ती कुठवर जाऊ शकते आणि माणसाला स्वतःच्या मर्यादा ठाऊक असू शकतात काय अथवा ज्यांचे सुप्त अस्तित्व स्वप्नातसुद्धा कल्पिले नसता ते साठे अचानक बाहेर पडतात आणि सारे ओझे डोंगरमाथ्यापर्यंत वाहून नेतात, ह्याबद्दल संभाषण चालू होते.

वेगवेगळी रंजक उदाहरणे सांगण्यात आली.

"असं घडलंय, युद्धात (आम्ही वेढ्यातून बाहेर पडत होतो), भासत होतं, आणखी किलोमीटर – आणि मृत्यू. एक पाऊल पुढं टाकणं शक्य होत नव्हतं. शरीरातली उरलेली शेवटची ताकद संपत होती. तेवढ्यात जर्मन आले – आणि आम्ही आणखी चाळीस किलोमीटर दौड मारली, अक्षरशः धावत... सोडवा हे कोडं!"

माजी खलाशी मोषा गोर्देन्को ह्याने मला सांगितलेला एक विलक्षण आणि ह्या संदर्भात ठळक असा प्रसंग आठवला.

सुरुंग पेरणाऱ्या त्यांच्या बोटीच्या खालच्या डेकवरचा टाईम-फ्यूज अचानक काम करू लागला. दोन खलाशांनी खट्ट आवाज ऐकला आणि अवघ्या काही सेकंदात स्फोट होणार हे ध्यानात येताच त्यांनी तो सुरुंग उचलला, त्याला ढकलत डेकच्या कडेपर्यंत नेला व बोटीवरून पाण्यात फेकला. बोटीच्या शेपटापाशी त्याचा स्फोट झाला, पण दरम्यान बोट पुढे गेली होती. पण ह्यातील गोम अशी की, त्याच खलाशांना शांत परिस्थितीत नंतर सुरुंगाला डेकपासून एक सेंटीमीटर वर उचलणे अशक्य ठरले. कठड्यापर्यंत ढकलत नेणे दूरच! त्या कसोटीच्या क्षणाला कुठून बळ आले त्यांना?

"हे काहीच नाही!" अचानक लेओनिद कॉन्स्तान्तिनोविच कोरोविन म्हणाले. "तुमच्या ह्या सगळया कथा अगदी फालतू आहेत! मला एक प्रसंग ठाऊक आहे..." आणि त्यांनी पुढील कथा सांगितली: "एका खेड्यातल्या सामुदायिक शेताची मी तपासणी करत होतो... (आमच्या खेड्यापासून वीस किलोमीटर दूर असलेल्या खेड्याचे त्यांनी नाव घेतले). आजच्याप्रमाणंच बरीच वणवण आणि दगदग झाल्यानंतर पथक-प्रमुखा पाशी दोन घास खायला आम्ही गेलो.

"प्रथक-प्रमुख सुमारे चाळीस वर्षांची बाई होती, तात्याना सेर्गेयेवना नावाची. तिचं घर छान होतं, रस्त्याच्या दिशेला तीन खिडक्या असलेलं. खिडक्यांखाली पुढच्या बागेत जाईची फुले होती, जणू फुलांची करंडीच. एवढं खरं, त्या फुलांची फारा काळात कुणी निगराणी करीत नव्हतं हे दिसत होतं. तुम्हालाच माहीत आहे: एक तर सामुदायिक शेतावर पथक प्रमुख म्हणून काम करा, नाही तर फुलं फुलवा. दोन्हीपैकी एकच गोष्ट शक्य आहे.

"ती विधवा होती. वर्षापूर्वी नवऱ्याचा मृत्यू झाला होता. खरं सांगायचं तर तो कशानं मेला मला आठवत नाही, पण कसल्यातरी आजारानं. बहुधा पोटातल्या अल्सरमुळं. कदाचित अल्सरमुळं नसेल. खोटं सांगणार नाही आणि मूळ मुद्द्याशी त्याचा संबंध नाही. वस्तुस्थिती म्हणजे ती विधवा होती.

"पुढची खोली हवेशीर आणि नेटकी होती, फरशीवर गालीच्याचे पट्टे पसरलेले होते, टबांमध्ये फुले होती, सुती पडदे होते, देवाच्या तसबिरींवर कशीदाकाम केलेले टॉवेल होते आणि तसबिरींसमोर लाल दिवे होते.

"'तू हे कशासाठी?' आम्ही तिच्यावर हल्ला चढविला. 'व्यवस्थापक मंडळाची सभासद, पक्षाची सभासद—तुला शरम वाटली पाहिजे!'

"तात्याना सेर्गेयेवनाने लाकडी आडोशाकडे डोळ्यांनी इशारा केला आणि अगदी अस्फुट आवाजात ती म्हणाली:

"'आई मरणाच्या पंथाला आहे. काल तिनं शेवटचे विधी करायला सांगितले'.

"मी आडोशापलिकडे डोकावलो. एक म्हातारी बाई मृताप्रमाणे बिछान्यावर ताठ आडवी निजली होती. तिचे हातसुद्धा छातीशी जुळलेले होते. तिचा चेहराही मृतासारखा दिसत होता: पिवळी त्वचा, खप्पड गाल, गच्च आवळलेले निळसर ओठ, तीक्ष्ण नाक, ठळक आणि रेखीव भुवया. तिचे हात साक्षात मेणाचे भासत होते. चेहऱ्यावर राखाडी अवकळा. ह्याचा अर्थ आता लौकरच किंवा उद्या मृत्यू अटळ आहे. म्हातारीनं अखेरच्या विधींची मागणी उगीच केली नव्हती...

"'होय, वार्वारा इवानोवनानं सगळी कामं संपवलीत,' आडोशामागून बाहेर येत आणि टेबलापाशी जात मी म्हणालो. 'काय वय तिचं? ऐंशी सरली?'

"'पंच्याऐंशी पूर्ण झालीत,' तात्याना सेर्गेयेवना म्हणाली. 'होय, खरंच तिनं सगळी कामं संपवलीत. सर्वांत प्रथम, सात मुलांना लहानाचं मोठं केलं. दोन मुलींची परमुलुखात लग्नं झाली. जर्मनांविरुद्ध लढताना चार मुलगे ठार झाले. एक नुकताच वारला (ती स्वत:च्या नवऱ्याबद्दल म्हणत होती). मुलं ठार झाल्यानंतर त्यांची छोटी मुलं मागं राहिली. त्यांना लहानाचं मोठं करून त्यांच्या पायांवर उभं करायचं होतं. आता ती सगळीकडं विखुरलीत: एक व्लादीमिरमध्ये, ट्रॅक्टरच्या कारखान्यात, एकजण मॉस्कोत इंजिनीअर. ती मोठी झालीत, पण कधी तोंड दाखवत नाहीत. स्वत:च्या घराला परकी बनलीत...'

" 'माझ्या घरात एवढी स्वच्छता माझ्यामुळं आहे असं वाटतं तुम्हाला? सामुदायिक शेताच्या पथकाचं प्रमुखपद सांभाळणाऱ्या माझ्या-सारखीला घरात स्वच्छता ठेवायला वेळ केव्हा? पहाटेपासून अंधार पडेपर्यंत सतत पायांवर आणि ताणलेल्या मन:स्थितीत. तेव्हा घरातल्या सगळ्या स्वच्छतेचं श्रेय तिला. होय. मला तीन लहान मुलं आहेत. सगळ्यात धाकटा अडीच वर्षांचा, सर्वांत मोठा—सहा वर्षांचा. आयुष्यापासून माणसाची सुटका नाही...'

" 'तीन दिवसांपूर्वी आई आडवी झाली. एकदमच मोडली. तीन दिवस झाले आणि ती मरणाला तयार झालीय. एखाद्या मेणबत्तीप्रमाणं जळून चाललीय. मी देवाच्या तसबिरींसमोर दिवे पेटवले आणि शेवटचे विधी केले म्हणून तुम्ही माझी खरडपट्टी काढताय. पण सबंध पंच्याऐंशी वर्षांत तिनं अखेरची आणि एकमेव इच्छा व्यक्त केली, ह्या, पृथ्वीवरची शेवटची जिवंत इच्छा व्यक्त केली, तर मी तिला नाही कसं म्हणू? नाही, आपण वेगळे आहोत, म्हातारी माणसं वेगळी आहेत. त्यांना चांगलं वाटेल त्या मार्गानं त्यांना खुशाल जाऊ द्यावं. आपल्याला जरी समजत नसलं, तरी त्यांच्या दृष्टीनं तो अत्यंत माणुसकीचा मार्ग आहे.'

"इथं आमच्या ध्यानात आलं की, वार्वारा इवानोवना जणू मेली होती अशा थाटात आम्ही बोलत होतो, पण प्रत्यक्षात ती अजून जिवंत होती. कदाचित आमचं गोंगाटी बोलणं ती अद्याप ऐकू शकत होती, पण स्वत: मात्र बोलू शकत नव्हती. आम्ही सावरलो आणि हळू आवा-जात बोलू लागलो, मग संभाषणाचा विषय अजिबात बदलून टाकला.

"तळलेल्या अंड्यांचे जेवण आम्ही घेत होतो त्या दरम्यान तात्याना सेर्गेयेवनाची तीन लहान मुले खोलीत आली. सर्वांत थोरला सेर्योझा तागासारख्या केसांचा राखाडी डोळ्यांचा सहा वर्षांचा मुलगा होता. तलम आणि झिरझिरीत सदरा घातलेली गोल चेहऱ्याची, गुलाबी गालां-ची चार वर्षांची दणकट माशा रानफळांच्या रसाच्या डागांनी माखून निघाली होती. लौकरच तीन वर्षे पुरी होणारा वोवच्का पटकन त्याच्या आईच्या मांडीवर चढून बसला व खाद्यपदार्थांकडे बोटे दाखवू लागला. सगळी मुले अनवाणी होती, पण त्यांच्याकडे दुर्लक्ष झालेले नव्हते. बाईच्या समर्थ हातांखाली त्यांचा सांभाळ होत असल्याचे स्पष्ट दिसत

होते. जर त्यांची थोडीफार आबाळ घडलीच असेल, तर ती गेल्या चार दिवसातील असावी.

"पथक-प्रमुखाला प्रादेशिक विभागीय कचेरीत परिषदेसाठी आम्ही बोलावणार होतो. पण तिच्या घरात लौकरच मृत्यू घडणार हे जाणून आम्ही तिला न येण्याचा सल्ला दिला. तिला खूप कामं उरकावी लागणार होती: शवपेटी, थडगं आणि स्थानिक रिवाजानुसार मर्तिकाचं जेवण. शिवाय दु:ख: जरी आपलं माणूस खूप पिकलं पान असलं, तरी मरणाचं दु:ख होणारच...

"दुसऱ्या दिवशी विभागीय समितीच्या कचेरीत आमची बैठक चालू असताना अचानक माझ्या चिटणीस मुलीनं मला टेलीफोनपाशी बोलावलं. आदल्या दिवशी जिथं आम्ही तळलेली अंडी खाल्ली होती त्या सामुदायिक शेतावरून फोन आला होता. कडबा कापण्याच्या यंत्राच्या पात्याच्या उडालेल्या तुकड्याच्या आघाताने पथक-प्रमुख तात्याना सेर्गेयेवना जागच्या जागी ठार झाली होती. अपघाताच्या स्थळी जाऊन चौकशी करणे आम्हाला भाग होते. न जाऊन कसे चालणार! तो फार मोठा धक्का होता आणि देखणी, चाळीस वर्षांची, घोड्यासारखी भक्कम व दणकट अशी आमची तात्याना सेर्गेयेवना अचानक मेली होती ह्यावर विश्वास ठेवणे आम्हाला कठीण जात होते. आमच्या प्रदेशातील ती सर्वोत्तम पथक-प्रमुख होती.

"डॉक्टरला बरोबर घेऊन 'पबेदा' सामुदायिक शेताकडे निघालो. खेड्याच्या वेशीपाशीच कडब्याचा खळगा होता, त्यामुळे काय घडले होते ते चटकन आमच्या नजरेस पडले.

"तर आम्ही काय पाहिले? मक्याच्या कडब्यावर आमची तात्याना सेर्गेयेवना मरून पडली होती. दुलईदार जाकीटात आणि पुरुषी उंच बुटांमध्ये. ती पालथी पडली होती, तिचा चेहरा एका बाजूला वळलेला होता. लोखंडाच्या कपचीने तिचे कानशील चिरले होते. पथक-प्रमुखाच्या व्यवसायाला अनुसरून तिचे हात मळके होते. खरं तर पाहण्यासारखं काहीच नव्हतं. कडब्यावर सबंध रात्रभर तिचं प्रेत पडून होतं. शवविच्छेदनासाठी तिचा देह लॉरीत घालून इस्पितळात पाठविण्यात आला.

"प्रादेशिक कचेरीत मी परतणार होतो, तेवढ्यात कालचं दृश्य

अचानक नजरेसमोर उभं राहिलं : जवळ जवळ प्रेत बनलेली म्हातारी आणि तीन लहान मुलं.

"'त्यांचं काय झालं असेल? ती कशी असतील?' अनपेक्षितपणे हा विचार माझ्या मनात आला. रितं घर. मेलेली म्हातारी आणि तीन लहान मुलं. काही कारणामुळं माझ्या नजरेसमोर चित्र उभं झालं की, म्हाताऱ्या आजीच्या प्रेताभोवती तीन पोरकी मुलं उभी होती. कदाचित म्हातारीपासून दूर सरकून टेबलाखाली भीतीनं थरथर कापत बसली असतील.

"मी माझी जीप चालू केली आणि खेड्याच्या दुसऱ्या टोकाशी रस्त्याच्या दिशेला तीन खिडक्या असलेलं व समोरच्या बागेत जाईच्या फुलांचं रान माजलेलं पिवळं घर जिथं उभं होतं, तिकडं भरवेगानं निघालो.

"मी मोटारीला ब्रेक लावले. पोर्चच्या पायऱ्या धावतच चढलो आणि भीतीनं जवळजवळ मी मरायचाच. पाण्यासाठी हातात बादली धरलेली, स्वतःच्या पायांवर उभी असलेली वार्वारा इवानोवना मला दारात भेटली.

"अरेच्चा, तू मेली नाहीस?" न राहवून मी प्रश्न केला. माझी एवढी खात्री होती, की हा प्रश्न तोंडात दाबून धरणे मला अशक्य ठरले.

"'आणि त्यांना कुठं टाकू?' वार्वारा इवानोवनाने घरात मानेने इशारा करीत विचारले. अर्थातच तिथं तिची तीन लहान नातवंडं बसले-ली असावीत. 'मी मरीन, ठीक आहे. पण जर ती पूर्ण पोरकी बनलीत, तर त्यांचा सांभाळ कोण करील? मला म्हातारीला कधीही मरायला फुरसद मिळणार नाही हे आता स्पष्ट आहे. वेळ योग्य नाही. घरात या. काही हरकत नाही. थंड दूध पिणार?'

"विश्वास ठेवा अगर ठेवू नका, पण शेवटचे धार्मिक विधी करून घेतल्यानंतर तीन वर्षं उलटली तरी ह्या जगातून जवळ जवळ निघून गेलेली वार्वारा इवानोवना ही रशियन बाई अद्याप जिवंत आहे. मरण्या-साठी तिला सवड नाही. कुठून तिला बळ मिळालंय?"

१९६३

वासिली ब्येलोव

टेकड्या

वासिली ब्येलोव (जन्म १९३२); वोलोग्दा प्रदेशातील तामोनिखा खेड्यात एका शेतकरी कुटुंबात वासिली ब्येलोव जन्मले. वोलोग्दात ते शाळा शिकले व तेव्हापासून तेथेच राहिले आहेत.

१९५६ मध्ये त्यांचे पहिले लेखन-प्रयत्न प्रसिद्ध झाले. १९६१ साली 'माझं राईतलं खेडं' हा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित झाला. मग लघुकथा संग्रह आणि लघुकादंबऱ्या 'दमट उन्हाळा' (१९६३), 'वळसेदार नदी' (१९६४), 'सवयीची बाब' (१९६६), 'सुताराच्या कथा' (१९६८), 'माझे जीवन' (१९७४), 'डॉ. स्पॉक यांच्यानुसार संगोपन' (१९७४) आणि 'बायका' (१९७२-७६) ही कादंबरी. 'सवयीची बाब' ह्या त्यांच्या लघुकादंबरीने सोविएत साहित्यात "ग्रामीण" गद्याची नवी लाट सुरू केली. आजच्या शेतकऱ्यांच्या जीवनाचा, त्यांच्या आंतरिक जगाचा, महिला शेतकऱ्यांच्या स्थानाचा, ग्रामीण चालीरीतींचा, परंपरांचा व ग्रामीण समाजांच्या बदलत्या जीवनपद्धतीचा परामर्श घेतला जाऊ लागला.

लेखक सेर्गेय झालीगिन म्हणतात: "ब्येलोव यांचे नायक आज सहजी आढळणार नाहीत, पण ते त्यांना शोधून काढतात. लेस्कोव अथवा तुर्गेनेव यांची शैलीदार तंत्रे ह्या आधुनिक माणसांबाबत वापरणे जरी जास्त कठीण असले, तरी ब्येलोव त्या तंत्रांचा वापर करतात; एका दृष्टीने हा नवा उपक्रम आहे, पुरातनवाद नव्हे, नक्कल नव्हे, ढोंग मुळीच नव्हे. कारण सरतेशेवटी, नव्या परिस्थितीत परंपरांचे पुनरुज्जीवन करणे व त्यांचा विकास घडविणे – जेव्हा आधीच ठरविण्यात आले आहे की, ह्या परंपरा कायमच्या कालबाह्य झाल्या आहेत आणि आपल्यासारख्या अत्याधुनिकांमध्ये इतःपर त्या स्वारस्यपूर्ण प्रतिसाद निर्माण करू शकत नाहीत – हासुद्धा एक नवा उपक्रमच म्हटला पाहिजे. केवढा नवा उपक्रम!"

कसल्यातरी अंधुक दुखऱ्या हुरहुरीने त्याला जाग आली. लाकडी ओंडक्यांच्या निवाऱ्याच्या एका टोकाला उन्हाचा चकचकीत पट्टा त्याने पाहिला व ह्या अनिश्चित, पण काहीशा सुखदायी आंतरिक बोचणीचे मूळ शोधण्याचा त्याने प्रयत्न केला. काय स्वप्न पडले होते हे त्याने आठवण्याचा यत्न केला, पण रात्रीच्या स्वप्नातील सर्व प्रतिमा नाहीशा झाल्या होत्या, मन रिते बनले होते.

फटींमधूनसुद्धा सूर्याची किरणे आत घुसली होती. खिडक्यांमधून पाकोळ्या झेपावत होत्या, आढ्यांना शेपट्या दाबून चिवचिवत होत्या व परत बाहेर उडून जात होत्या. गवताच्या व सुकणाऱ्या दवाच्या वासाने वातावरण भरून गेले होते. नदीवर डुंबणाऱ्या पोरांच्या आरोळ्या ऐकू येत होत्या आणि मैदानात घोड्याकडून ओढले जाणारे गवतकापणीचे यंत्र खडखडत होते.

घरात कुणीही नव्हते. जुन्या सवयीनुसार त्याची आई बहुधा म्हातारपणाचे उसासे टाकत व कण्हत गवतकापणीला गेली होती. त्याची बायको रोज सकाळी दोन्ही मुलांना सांगाती घेऊन काही अंतरावरच्या डोहापाशी सूर्यस्नानाला व डुंबायला जात होती.

आदल्या दिवशी खेड्यातील एका जुन्या समवयस्क मित्राशी झालेली भेट त्याला आठवली आणि काळजात खुपणाऱ्या बोचणीचे कारण उमगले.

त्याचा मित्र किती वयस्क भासत होता हे काल त्याच्या ध्यानात आले नव्हते. तो माणूस त्याच्यापेक्षा वयाने किंचित लहानच होता. रात्री झोपेत परत येऊ न शकणाऱ्या वर्षांची जाणीव झाली होती...

त्या क्षणापर्यंत तो स्वत:ला तरुणच समजत होता, पण झोपेत

त्याच्या आंतरिक जाणीवेमार्फत अचानक त्याला उमजले की, तारुण्य केव्हाच सरले होते, स्वतःच्या आयुष्याचा दुसरा अर्धा भाग त्याने बदलला होता. "बदलला होता"... किती विचित्र शब्द.

खेड्यात कुणीही नव्हते. त्याच्या लहानपणी उभे होते तसेच घरांच्या फाटकांपाशी गवताचे भारे रचायचे खांब आत्ता उभे होते, पाकोळ्या आणि लांब शेपट्यांचे पक्षी घरांच्या छपरांवर निळया आकाशात भिर-भिरत होते. सूर्य सकाळपासूनच रस्त्यावरची मऊ धूळ तापवत होता.

नाकतोड्यांच्या आवाजांनी भरलेल्या हिरव्या मैदानात तो गेला. चालता चालता त्याने खेड्यावर व भोवतालच्या परिसरावर सावकाशपणे नजर फिरवली. गेल्या कित्येक वर्षात त्याने त्या प्रदेशावर अशी नजर टाकली नव्हती. त्या सर्व गोष्टींचा तो स्वतः एक भाग होता ह्या वि-चित्र भावनेची त्याला जाणीव होती, ती भावना सुखवत होती आणि दुखवतही होती. त्याला स्वतःचेच नवल वाटले. "तो कुठून आला होता आणि ह्या सगळ्याचा अर्थ काय होता? आरंभ कुठे होता, तेव्हा त्याला जीवन कुणी दिले होते, निदान चारशे वर्षांपूर्वी? त्याचे सगळे पूर्वज कुठे आहेत आणि आता ते नाहीत म्हणजे काय? खरोखरोच ते अज्ञातात नाहीसे झाले होते काय आणि तो व त्याचे दोन मुलगे तेवढे बाकी उरले होते? विचित्र, अनाकलनीय...

घोड्याच्या नालाच्या आकाराच्या सरोवराने वेढलेल्या एका उंच हिरव्या टेकाडापाशी तो आला. तुरळक पांढऱ्या ढगांमध्ये चर्चचा घुमट तरंगत होता. ढगांबरोबर तो घुमट तरंगत होता, पण त्यांच्याप्रमाणे दूर वाहून जात नव्हता. वाळुंजींवर मधमाशा मंदपणे गुणगुणत होत्या. खाली सरोवर सूर्यामुळे व वाऱ्यामुळे चमचमत आणि थरथरत होते. त्याची निळाई गडद बनत होती, अखंड बदलण्यामुळे विस्कटत होती. पण इथे टेकाडावर सारे शांत आणि हिरवेगार होते. आकाशातून उष्णता कोसळत होती, तिच्या थरथरत्या उभ्या प्रवाहांमुळे रानाची क्षितिजरेषा वेडीवाकडी बनत होती. काळाने गंजून गेलेल्या राखाडी क्रूसांसमोर नवे कुंपण विशोभित दिसत होते. त्याचप्रमाणे, चर्चच्या घुमटांशी आकाशात स्पर्धा करणारी पाईनच्या नव्या लाकडी फाटकाची कमानही विसंगत भासत होती.

त्या टेकाडावर बळकट कोवळया काटेरी झाडांना बाजूला सारत खूप वेळपर्यंत तो थडगी शोधत होता आणि त्याला ती सापडत नव्हती. त्याच्या मावशीचे थडगे कुंपणाबाहेर काही अंतरावर त्याला आढळले. त्याच्या दगडावरून त्याने त्या थडग्याला ओळखले. पण आजी कुठे निजली होती? वाळुंजीपाशी तिचे थडगे होते अशी त्याला आठवण होती, पण आता त्याला ते सापडेना. अखेर तो कुणाच्यातरी अलीकडच्याच उंचवट्यावर बसला. "खरंच, जर आजीचं थडगं गायब झालंय, तर चार पणजींची थडगी शोधण्यात काही अर्थ नाही... पण इथंच कुठंतरी दुसरी आजी निजलीय, वडलांची आई... कुठं आहे बरं ती? काही मागमूस उरला नाही, सारं सपाट झालंय, झाडांची आणि गवतांची गर्दी माजलीय..."

प्रथमच त्याला स्पष्ट, भाजणाऱ्या, दात गच्च आवळायला लावणाऱ्या विचाराचा तडाखा बसला: ह्यापूर्वी त्याच्या डोक्यात कधीच हा विचार शिरला नव्हता की इथे, त्याच्या जन्मगावात, स्मशानात फक्त बायकाच पुरलेल्या होत्या. त्याला आठवण झाली–त्याच्या स्वतःच्या कुटुंबातील एकाही पुरुषाचे ह्या टेकाडावर दफन झाले नव्हते. ते ह्या मातीत जन्मले होते, पण त्यांच्यापैकी एकही त्या मातीत परतला नव्हता. जणू त्या बायकांच्या समूहात प्रवेश करायला ते पुरुष लाजले होते! पिढ्यान्‌पिढ्या ते दूर जात होते, नांगराच्या फाळांऐवजी त्यांनी बंदुका हातात घेतल्या होत्या, गवतकापणीच्या सदऱ्यांऐवजी लष्करी कुडती अंगात चढवली होती. घर बांधून होताच आणि मुलगे जन्माला येताच, जणू जत्रेला जावे अशा थाटात लगबगीने ते लढाईवर गेले होते. आणि जन्मगावी आता जमिनीखालीसुद्धा पणजी, आजी एकाकी निजल्या होत्या.

त्याने सिगारेट शिलगावली. काड्यापेटीवरील चित्रामुळे त्याला आठवण झाली की, त्याचा एक पूर्वज बल्गारियात तुर्कांविरुद्ध लढताना ठार झाला होता. आजीने त्याला ती हकीकत सांगितली होती. बायकांच्या नशीबावरील अन्यायाबाबत त्याच्या मनात कडवट उपरोधिक विचार आला: त्याचा पणजासुद्धा सुदैवी होता. शिप्काच्या वीरांसाठी बल्गारियाच्या जनतेने उभारलेल्या स्मारकाखाली कदाचित पणजोबाचे थडगे असेल. पण पणजीचे थडगे गायब झाले होते...

त्याच्या मनात विचार आला की, आजोबांचे नशीबही थोर नि-घाले : कथांमधून आणि गीतांमधून वर्णन केलेल्या मांचुरीयाच्या टेकडीवर चिरनिद्रा घेण्यात बहुधा त्यांना मजा वाटत असावी. म्युझियमांमध्ये लावलेली लढाईची चित्रे पहायला त्यांचे वंशज अजून गर्दी करतात आणि रेडिओवर मांचुरियाच्या टेकड्यांबद्दलचे करुण वॉल्तझ्चे सूर अजून घुमतात. आजीचे थडगे मात्र अदृश्य झाले, ना क्रूस आढळतो, ना दगड.

त्याने सिगारेटचे थोटुक विझवले आणि तात्काळ नवी सिगारेट पेटविली. काय हे? च्यायला, त्याच्या वडिलांनी त्याला मागे टाकले होते. आजोबा आणि पणजोबा यांचे ठीक... मामायेव टेकडीवर आहे तसले भव्य, भारदस्त स्मारक जगात इतरत्र कुठेही नाही. त्याला आठवण झाली : गेल्या उन्हाळ्यात तो वोल्गोग्रादला गेला होता तेव्हा सबंध दिवसभर मामायेव टेकडीवर भटकला होता. त्याच्या वडिलांना स्वतःच्या कुशीत घेणारी ती टेकडी थोर आणि कष्टी होती, तिच्या माथ्यावर उभ्या असलेल्या भव्य शिल्पाची शहरावर प्रचंड छाया पडली होती. गौरव-दालनाचे काम अद्याप पूर्ण झाले नव्हते, पण वोल्गावर ठार झालेल्या त्या सार्जंटचा मुलगा ग्रॅनाईटच्या भिंतीवर बापाचे नाव पाहू शकला...

ते गेले, विख्यात टेकड्यांवरील स्मारकांखाली कायमचा विसावा घ्यायला सगळे गेले. आजोबा आणि पणजोबा गेले, त्याचे वडीलही गेले. जेथे त्यांच्या पत्नी व माता विसावल्या होत्या त्या घोड्याच्या नालाच्या आकाराच्या सरोवराचा विळखा बसलेल्या हिरव्या टेकाडावरील घराकडे त्यांच्यापैकी कुणीही परतला नव्हता. इथे कुणी फुले आणली नव्हती, ह्या बायकांना भेटायला कुणीही येत नव्हते, जमिनीखालीसुद्धा ज्यांचे एकाकीपण सरले नव्हते अशा त्या बायकांचे सांत्वन करायला कुणीही येत नव्हते.

वाळुंजीखालील त्या निवांत, हिरव्यागार, दमट-कोमट टेकाडावर तो बसला व विचार करू लागला.

कदाचित, त्याचीही पाळी येईल? पुरुष पूर्वजांच्या वाटेने परक्या टेकड्यांवर जाण्याची?

१९६८

वासिली शुकशीन

हठी

वासिली शुकशीन (१९२९-१९७४). गुणी लेखक, चित्रपट निर्माते, पटकथाकार आणि नट वासिली शुकशीन एका शेतकरी कुटुंबात जन्मले होते. विविध छंदांनी भरलेले ठळक, पण अल्प आयुष्य ते जगले. तारुण्यात त्यांनी फिटर म्हणून काम केले, मग नौदलात नोकरी केली. त्यानंतर जन्मग्रामी रात्रीच्या शाळेचे ते हेडमास्तर बनले. चित्रपटकलाशास्त्राच्या उच्च शिक्षण संस्थेत ते दाखल झाले व चित्रपट–दिग्दर्शनाचा अभ्यासक्रम १९६१ साली त्यांनी पूर्ण केला. १९५९ साली त्यांच्या पहिल्या लघुकथा प्रकाशित झाल्या व 'खेडुत' ह्या शीर्षकाखाली १९६३ मध्ये त्यांचा संग्रह प्रसिद्ध झाला.

लेखन व चित्रपट निर्मिती ह्यांच्यात त्यांनी स्वतः-च्या वेळेची विभागणी केली होती. 'असा एक पोरगा होता' ह्या चित्रपटाला शुकशीन यांनी पटकथा लिहिली होती व व्हेनिस चित्रपट महोत्सवात त्याला सुवर्ण-सिंह मिळाला. १९६८ साली त्यांनी 'त्या तिथे, खूप दूर' हा लघुकथासंग्रह प्रसिद्ध केला. १९७३ मध्ये 'पेचकी-लावचकी' चित्रपट बनविला; १९६५ मध्ये लिहिलेल्या 'लूबाविन' कादंबरीवर १९७२ साली चित्रपट काढला. 'मी तुम्हाला स्वातंत्र्य द्यायला आलोय' ही चित्रपट-कादंबरी १९७१ साली लिहिली. दोन वर्षांनंतर 'नमूने' आणि 'लाल झुपकेदार फुलाचे झाड' हे कथासंग्रह; 'लाल झुपकेदार फुलाचे झाड' वर चित्रपट काढला.

शुकशीन यांच्या व्यक्तिरेखा व त्यांनी रेखाटलेले प्रसंग विलक्षण वास्तव असतात. त्यांच्या कथा व त्यांचे चित्रपट फार प्रभाव पाडतात, आपल्याला खोल ढवळून काढतात. रशियन माणसांचा आत्मा त्यांनी व्यक्त केला–सत्याच्या शोधाने झपाटलेला असा हा आत्मा आहे. शुकशीन यांच्या व्यक्तिरेखांसंबंधी टीकाकारांनी लिहिले होते: "आदर्श जीवन साध्य करण्यास ती उत्सुक आहेत, त्यांना असमाधानाची त्रासदायक जाणीव आहे आणि कशाची तहान लागलीय ते त्यांना शब्दात व्यक्त करता येत नाही. जीवनातील गुंतागुंतींचे व त्यात स्वतःचे स्थान कोठे आहे ह्याचे आकलन करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे."

मोन्या क्वासोवने कुठल्यातरी पुस्तकात वाचले की, सतत चालणारे इंजिन अशक्य आहे आणि तेथून सगळयाचा आरंभ झाला. अमूक अमूक कारणांसाठी – त्यातले एक म्हणजे घर्षण अस्तित्वात आहे. मोन्या... इथे खुलासा करणे आवश्यक आहे की, त्याला मोन्या हे नांव कसे पडले. त्याला मीत्का म्हणून हाक मारत, द्मित्री. पण त्याची आजी त्याला मित्री म्हणायची आणि लाडाने कधी कधी मोत्का, मोत्या म्हणायची. तेव्हा त्याच्या मित्रांनी त्याचे रूपांतर मोन्या असे केले – एक तर ते अधिक सोपे होते आणि सतत फिरणाऱ्या व चळवळया मीत्काला मोन्या हे नांव अधिक योग्य होते. ह्या नांवामुळे इतरांपासून त्याचे वेगळेपण चटकन प्रस्थापित व्हायचे आणि त्याचा हट्टी, अस्वस्थ स्वभाव ठळकपणे दिसायचा.

मोन्याने वाचले की, "सतत चालणारे इंजिन" अशक्य असते. त्याने वाचले की, अनेक लोकांनी तसे इंजिन बनविण्याचा तरीसुद्धा प्रयत्न केला होता... वेगवेगळया काळांमधील "सतत चालणाऱ्या इंजिनां"ची आरेखने त्याने काळजीपूर्वक अभ्यासली. आणि तो विचारात गुंतला. घर्षण आणि यंत्रशास्त्राचे नियम यांच्याकडे त्याने दुर्लक्ष केले. पण पूर्वी कधीही न बनवलेले असे सतत चालणारे इंजिन बनविण्याच्या कल्पनेने त्याला झपाटले. असे इंजिन बनविणे अशक्य असते ह्यावर त्याचा काही कारणाने विश्वासच बसत नव्हता. कुठल्याही समंजस विचाराबाबत त्याचे असे व्हायचे... कोणताही समंजस विचार तो मान्य करायचा नाही आणि स्वतःशी म्हणायचा: "ठीक आहे, मला फिकीर

नाही...'' आत्तासुद्धा त्याच्या मनात आले: ''छ्या:!.. अशक्य म्हणजे काय?''

मोन्याला सव्वीसावे वर्ष लागले होते. तो त्याच्या आजीबरोबर रहायचा. अर्थात कुठेतरी त्याचे आई-बाप होते, पण तो लहान असतानाच आजीने त्याला स्वत:पाशी ठेवून घेतले होते (त्याचे आई-बाप सतत विभक्त व्हायचे आणि परत एकत्र यायचे) आणि लहानाचे मोठे केले होते. मोन्या खेड्यात सातवीपर्यंत शिकला, मग दीड वर्ष शेतकी तंत्रविद्यालयात शिकला, तेथे आवडले नाही म्हणून शिक्षण सोडून सैन्यात भरती होईपर्यंतच्या काळात सामुदायिक शेतावर काम करत राहिला. सक्तीच्या लष्करी सेवेत तो ड्रायव्हरचे काम शिकला होता आणि आता सरकारी शेतावर ड्रायव्हर म्हणून काम करत होता. मोन्याचे केस तांबूस-पिवळे होते, गालांची हाडे उंच होती आणि खोल छोटे डोळे होते. त्याचा जबडा जोरदारपणे पुढे आला होता व त्यामुळे तो तापट आणि हट्टी दिसायचा. तर त्याच्या बाबतीत नेहमी जे घडायचे, ते आता घडले: जर त्याच्या कपाळात एखादी कल्पना घुसली — मग ॲकॉर्डियन वाजविण्याची असो, अथवा गेल्या वर्षी घडले त्याप्रमाणे कायद्यानुसार ०.१५ हेक्टर खाजगी मालकीची जमीन मान्य न करता ०.१७ हेक्टर-साठी तो भांडत राहिला — तेवढी जमीन त्याची आणि त्याच्या आजीची होती व म्हणून त्याने आपले कुंपण घरापाशी सरकवायचे होते — तर अशा कोणत्याही कल्पनेने मोन्या एकदा झपाटला, म्हणजे मग त्याला दुसरे काहीही सुचत नसे. ॲकॉर्डियन कसे वाजवायला शिकायचे अथवा ती ०.०२ हेक्टर अभागी जमीन गमावू नये म्हणून कोणत्या युक्त्या करायच्या, ह्यातच तो सर्वस्वी गुंतून जायचा. आणि नेहमी तो आपले म्हणणे खरे करायचा. आता ह्या इंजिनाबाबत तसेच घडले: मोन्याला भोवतालच्या सर्व गोष्टींचा विसर पडला. महान संशोधनाच्या कामी त्याने स्वत:ला वाहून घेतले. तो कोणतेही काम करत असला — लॉरी चालविणे, जेवणे, टेलीव्हिजन पाहणे — तरी त्याच्या मनात सतत विचार होते इंजिनाबद्दलचे. एव्हाना त्याने जवळ जवळ दहा आराखडे बनवले होते, पण स्वत:च एकामागून एक रद्द केले होते. विचारचक्र जोरात चालू होते. मोन्या रात्री ताडकन उठायचा आणि कुठल्यातरी चाकाचा

आराखडा बनवू लागायचा... त्याच्या संशोधनांमध्ये तो परत परत चाकाकडे वळायचा; त्याने थेट चाकापासून सुरुवात केली होती आणि ते चाक अखंडपणे कसे फिरत राहील ह्याचे नवनवे मार्ग तो शोधत होता.

अखेरीस त्याला मार्ग सापडला. तो असा: एक चाक घ्या, उदाहरणार्थ, सायकलचे चाक आणि त्याला आडव्या आसावर बसवा. मग चाकाच्या कडेशी एक सरकती फळी ४५° कोनात घट्ट बसवायची, म्हणजे वजन, उदाहरणार्थ एक किलो वजन, फळीवरून सहजपणे फिरू शकेल. आता जर चाकाच्या आसाला धातूची एक सळई जोडली अथवा सांधली... जेणेकरून सळईचे दुसरे मोकळे टोक सरकत्या फळीवरील फिरणाऱ्या वजनावरून जाईल... थोडक्यात, सरकत्या फळीवरील गतिमान वजन सळईशी स्पर्शले म्हणजे ते सळईला ढकलेल अथवा धक्का न देता तिला चिकटेल. आणि सळई आसाला जोडलेली आहे, म्हणून ती आसाला फिरवील व त्यामुळे चाक गोल फिरू लागेल. ह्याचा अर्थ चाक आपोआप फिरत राहील.

मोन्याला ही कल्पना रात्री सुचली... तो ताडकन उठला; चाकाचे, सरकत्या फळीचे, सळईचे आणि वजनाचे आराखडे त्याने रेखाटले. पण त्याला खास आनंद झाला नाही, फक्त आश्चर्य वाटले: एवढा वेळ त्यांनी कशासाठी डोकेफोड केली! अत्यंत अभिमानाने आणि शांतपणे त्याने खोलीत येरझाऱ्या घातल्या. केवळ चड्डीत तो फिरत होता. मग खिडकीच्या चौकटीत बसून त्याने एक सिगारेट ओढली. रस्त्यावरचा गरम वारा खिडकीमधून आत येत होता. पुढच्या बागेतील भोजाची कोवळी झाडे डुलत होती आणि सळसळत होती. हवेत धुळीचा वास भरला होता. अचानक मोन्याच्या मनःचक्षूसमोर त्याच्या मायभूमीचे, रशियाचे, चित्र उभे झाले–एक असीम मैदान. आणि खिशात हात घालून, संथ पावलांनी तो त्या मैदानावरून चालत होता. सभोवती पहात तो नुसता चालत होता, आणखी काहीही नाही. आणि ह्या नुसत्या चालण्यात मोन्याला स्वतःची थोरवी दिसत होती. माणूस असा धरतीवरून चालतो– आरडाओरडा नाही, आनंदाच्या आरोळ्या नाहीत, फक्त सभोवार पहात स्वतःच्या वाटेने चालत जायचे. मग लोकांना उशीरा खेद होईल: केवढ्या थोर माणसाकडे त्यांनी दुर्लक्ष केले! केवढा माणूस! –मोन्याने

आणखी काही फेऱ्या मारल्या... जर चड्डीऐवजी त्याने विजार घातलेली असती, तर त्याने हात खिशात घातले असते व तो तसा चालत राहिला असता. त्याला तसे करावेसे वाटले, पण केवळ तेवढ्यासाठी विजार चढवायचा त्याने आळस केला. तो आळस नव्हता, तर त्याला उगीच अवडंबर माजविण्याची इच्छा नव्हती. एका शांततेने, विलक्षण प्रभावी शांततेने, मोन्याचा कबजा घेतला. तो पलंगावर आडवा झाला, पण सकाळपर्यंत त्याला झोप लागली नाही. स्वतःच्या इंजिनाला आता त्याने हात लावला नाही — सर्व काही स्पष्ट होते. पांघरुणावर पडून खिडकीतून तारे पहात राहिला. सकाळच्या प्रहराला गरम वारा थोडा निवला होता, आता उबदार वाटत होते आणि घुसमटत नव्हते. काळोखे आकाश फिकट बनले व लौकरच धुतलेल्या फिकट निळ्या वस्त्राप्रमाणे दिसू लागले... आणि पहाटेची ती भित्री, तात्पुरती खास शांतता खिडकी-बाहेर पसरली. पण लौकरच त्या शांततेचा भंग झाला — जवळपासच्या फाटकांची करकर सुरू झाली, मग विहीरींच्या साखळ्या खणखणल्या आणि रहाटांचे आवाज सुरू झाले... माणसे जागी होऊ लागली. मोन्या अजून तसाच पलंगावर पडून खिडकीबाहेर पहात होता. तसे काहीच बदलले नव्हते, पण आयुष्य किती प्रिय, मौल्यवान बनले होते. च्या-यला, अगदी नकळत, तुमच्या भोवतीच्या सगळ्या गोष्टी अचानक अद्भुत बनतात, अत्यंत मौल्यवान बनतात! मोन्या आणखी अर्धा तास पडून राहिला आणि नंतर तोसुद्धा उठला. अजून तसा लौकरचा प्रहर होता, पण तरीही यापुढे झोप लागणे शक्य नव्हते.

टेबलापाशी बसून त्याने स्वतःचे आराखडे पाहिले... आश्चर्य म्हणजे त्याला हुरहूर वाटत नव्हती अथवा आनंदही झाला नव्हता. मनात विलक्षण शांतता नांदत होती. मोन्याने सिगारेट पेटवली, खुर्चीवर मागे रेलून तो बसला व काडीने दात कोरू लागला — अगदी उगीच; रात्री जे काही प्रचंड घडले होते आणि आता टेबलावर छोट्या आराखड्यांच्या रूपाने जे पडले होते, त्यावर ह्या क्षुल्लक कृतीने ठसा देण्याचा त्याचा यत्न होता. मोन्या स्वतःवर खूष होता: सतत चालणाऱ्या इंजिनाचा आराखडा समोर पडला होता आणि तो संथपणे दात कोरत होता. तर हे असे होते, प्रिय कॉम्रेडहो!.. ह्या भल्या सकाळी तुमच्या बायकां-

शेजारी गरम परांच्या बिछान्यांवर खुशाल निजा! वेडपटांनो, खुशाल मोठमोठ्यांदा घोरत पडा! मग स्वतःवर खूष होत रोजच्या कामांना लागाल, फालतू उद्योगांमध्ये गुंतून पडाल आणि जणू काही फार विचार करताय अशा थाटात कपाळांना आठ्या घालाल. ओ-हो-हो! तुम्हाला विचार करणेसुद्धा जमते? ठीक, ठीक. अर्थात जमते: हात धुण्यासाठी ती टांगती भांडी तुम्हीच शोधलीत. केवढी प्रचंड बुद्धिमत्ता पाहिजे असा शोध लावायला... हाय! जनहो, जनहो! मोन्या उपहासाने हसला आणि हात-तोंड धुण्यासाठी गेला – माणसाने शोधलेल्या त्या वस्तू-कडे.

नंतर सबंध सकाळ मोन्या तशा उपरोधिक मनःस्थितीत राहिला. आजीच्या लक्षात आले की, सकाळपासून स्वारीचा नूर काहीसा वेगळाच होता... ती उत्साही, खंबीर म्हातारी होती. मोत्कावर तिचे प्रेम होते, पण उघडपणे त्या प्रेमाचे प्रदर्शन ती कधीही करत नसे. ती स्वतः-सुद्धा लोकांबद्दल साध्या रीतीने विचार करायची: जगतात, चतकोर भाकरीचा तुकडा मिळवतात, आणि वेळ आली म्हणजे मरतात. महत्त्वाचे म्हणजे जेव्हा कठीण काळ येतो, तेव्हा आयुष्यावरची पकड सैल करायची नाही आणि वेळ निभावून न्यायची. उदाहरणार्थ, पूर्वी युद्धकाळात ती असे वागली होती: एका सामुदायिक शेताच्या धान्यकोठारात फरशीवर फट पडल्याचे तिच्या ध्यानात आले होते आणि त्या फटीतून धान्य सांडत होते. कोठाराची मागील बाजू रस्त्यापाशी होती आणि तेथे रस्त्यावर खाजकुयलीच्या झुडुपांचे व गवताचे तण माजले होते. एका रात्री ह्या तणामधून वाट काढत काढत ती धान्यापाशी पोहोचली. कोठार खूप उंच होते, जमिनीपासून त्याची फरशी वर होती आणि एका माणसाला त्यात सहज घुसता येत होते. फटीतून खाली सांडलेले धान्य तिने पोत्यात भरून घेतले व सुरीने फट अधिक रुंद केली... पुढचा आठवडा प्रत्येक रात्री ती पोते घेऊन तेथे जात होती. स्वतःचा आणि नातवाचा त्यावर तिने बराच काळ निर्वाह चालविला. त्या भयाण उपासमारीच्या काळात रात्रीच्या वेळी ती हे धान्य खलबत्त्यात घालून कुटायची, भोजाच्या सालींमध्ये पीठ मिसळायची आणि पाव भाजायची. अशा रीतीने तिने मृत्यू टाळला. मोत्का तिला स्वतःच्या मुलासारखा

होता, कदाचित त्याहून जास्त प्रिय होता, कारण आता दुसरे जवळचे असे कुणी उरले नव्हते. अर्थात मुलगी होती, मोत्काची आई (म्हातारीचे दोन मुलगे युद्धात ठार झाले), पण ती स्वतःच्या नवऱ्याबरोबरच्या अस्थिर जीवनात फार गुरफटलेली होती, शहरी जीवनात अडकली होती, म्हातारीच्या दृष्टीने पूर्ण निरुपयोगी बनली होती व खेड्याकडे अजिबात फिरकली नव्हती. तेव्हा ती असून-नसून सारखीच होती.

"आज तू असा काय रे?" न्याहरीच्या वेळी आजीने विचारले.

"कसा?" मोन्याने शांतपणे आणि नम्रपणे विचारले.

"स्वतःवर खूष दिसतोस. ऊन खाणाऱ्या बोक्यासारखा... काहीतरी छान स्वप्न पडलं होतं काय?"

मोन्याने थोडा वेळ विचार केला... आणि मग गूढपणे म्हणाला:

"मला स्वप्न पडलं की, माझ्या हातपेटीत मला दहा हजार रूबल सापडले."

"काय बाई तुझं एकेक!" म्हातारी हसली, थोडा वेळ गप्प बसली व मग तिने विचारले: "मग, त्या पैशाचं तू काय करशील?"

"काय?.. तू काय करशील?"

"मी तुला विचारतेय!"

"हं... नाही, तू काय केलं असतंस तेच सांग! तुला सर्वांत प्रथम काय पाहिजे?"

"मला काहीही नको. कदाचित घराची दुरुस्ती करीन..."

"त्यापेक्षा नवीन घर बांधणं जास्त चांगलं. इथं काय दुरुस्त करणार–सगळं कुजून गेलंय."

आजीने उसासा टाकला. खूप वेळपर्यंत ती गप्प बसली.

"कुजलंय हे खरं... पण इथंच माझं आयुष्य सरणार. आता फार दिवस नाही उरले. एव्हाना मी विचार केलाय, मला इथून कसं घेऊन जातील त्याचा..."

"झाली सुरवात!" नाराजीने मोन्या म्हणाला. त्याचेही आजीवर प्रेम होते, जरी त्याची त्याला कधी फारशी जाणीव नव्हती. पण आजीमधील एक गोष्ट त्याला आवडत नसे: आगामी मरणाबद्दलचे तिचे बोलणे. शारीरिक दुबळेपणा, प्रकृती-अस्वास्थ्य अथवा सर्वनाशाची भावना

ह्यामुळे तसे बोलली असती तर एवढे वाटले नसते. पण प्रत्यक्षात आजीला जगण्याची प्रचंड हौस होती, मरणाचा तिला तिटकारा होता, पण मरणासमोर नम्रतेचा आणि दुबळेपणाचा ती आव आणत होती. "काय झालं परत तुला?"

चतुर म्हातारी खोट्या नम्रतेने हसली.

"काय त्यात? मी काय दोनशे वर्षं जगणार आहे? येणारच कधी तरी..."

"ठीक आहे, यायचं तेव्हा येईल. आधीपासूनच कशाला त्याबाबत बडबडत बसायचं?"

म्हातारीला ह्या विषयावर खूप बोलावेसे वाटत होते, पण मोन्याला त्याचा विलक्षण तिटकारा होता, एवढीच तिची खंत होती. तिला त्याच्याशी गप्पा मारायला आवडायचे. तो खूप हुषार मुलगा आहे असे तिचे मत होते आणि खेड्यातील लोक तसे मानत नव्हते ह्याचे तिला आश्चर्य वाटायचे.

"मग, काय स्वप्न पडलं?"

"काही नाही... सकाळ छान आहे, म्हणून मी आनंदात आहे, एवढंच."

"ठीक आहे. तरुण आहेस तोवर कर मजा. एकदा म्हातारपण आलं म्हणजे संपला सगळा आनंद."

"काही हरकत नाही!" न्याहरी संपवत मोन्या मोठ्यांदा, बेफिकीर आवाजात उद्गारला. "आम्ही अजून... दाखवू त्यांना! अजून आम्ही काहीतरी सांगू!"

आणि मोन्या गॅरेजकडे निघाला. पण वाटेत त्याने तरुण इंजिनिअर आंद्रेय निकोलायेविच गोलूबेवच्या घरी डोकावण्याचे ठरवले. शेताच्या ट्रॅक्टर दुरुस्ती खात्यात इंजिनिअर काम करीत असे. तो बाहेरून आलेला होता, बुद्धिमान होता, अर्थात काहीसा दुर्मुखला होता, पण उगीच बढाया मारणारा नव्हता. मोन्याने एक-दोनदा त्याच्याशी चार शब्दांची देवघेव केली होती आणि इंजिनिअर त्याला आवडला होता.

इंजिनिअर या क्षणाला आवारामध्ये स्वतःच्या फटफटीशी काहीतरी खुटखुटत होता.

"रामराम रे!" मोन्या म्हणाला.

"नमस्कार!" इंजिनिअरने पटकन प्रतिसाद दिला नाही. त्याने मोन्याकडे नाराजीचा कटाक्ष टाकला. कदाचित मोन्याचे जवळिकीचे एकेरी संबोधन त्याला आवडले नसावे.

"होईल सवय," मोन्याने विचार केला. "अजून तरुण आहे."

"एका विषयावर चर्चा करायला आलोय," आवारात प्रवेश करत मोन्या पुढे म्हणाला.

इंजिनिअरने परत त्याच्याकडे कटाक्ष टाकला.

"कोणता विषय?"

"शास्त्रज्ञांचं अखंड चालणाऱ्या इंजिनाबद्दल काय मत आहे?" मोन्याने तात्काळ सुरुवात केली. तो एका ओंडक्यावर बसला आणि सिगारेटचे पाकीट त्याने खिशातून काढले... इंजिनिअरकडे वर पहात तो पुढे म्हणाला: "काय?"

"अखंड चालणारं इंजिन म्हणजे काय?"

"अखंड गतीबद्दल बोलतोय मी. अजून जे बनवू शकले नाहीत असं साधं अखंड चालणारं यंत्र."

"मग? त्याचं काय?"

"सध्या ह्याबाबत काय विचार करतात?"

"कोण करतंय विचार?" इंजिनिअरचा पारा वर चढू लागला होता.

"शास्त्रज्ञांचं जग... एकूण. ही समस्या त्यांनी बाजूला सारली काय?"

"अजिबात विचार करत नाहीत. दुसरा काय उद्योग उरला नाही, म्हणून ह्यावर विचार करायचा?"

"म्हणजे, समस्या बाजूला टाकली?"

इंजिनिअर परत फटफटीकडे वळला.

"होय. बाजूला टाकली."

"हे जरा लौकर झालं नाही का?" मोन्या त्याला संभाषणापासून दूर जाऊ देत नव्हता.

"काय लौकर झालं?" इंजिनिअरने परत कटाक्ष टाकला.

"बाजूला टाकणं. समस्या!"

इंजिनिअरने मोन्याला लक्षपूर्वक न्याहाळले.

"अखंड चालणाऱ्या इंजिनाचा तू शोध लावलास की काय?"

आणि मोन्यानेसुद्धा इंजिनिअरला लक्षपूर्वक न्याहाळले. आणि मुंग्यांच्या वारूळात काठी खुपसावी त्याप्रमाणे इंजिनिअरच्या पदवीधारी डोक्यावर त्याने शब्द फेकला:

"होय."

वर न उठताच इंजिनिअरने मोन्याकडे नजर लावली... आणि उघडपणे हसून त्याने मोन्यावर उलट प्रहार केला—अगदी अचूक आणि खवचटपणे:

"अभिनंदन!"

मोन्या अस्वस्थ बनला. स्वतःच्या शोधाबद्दल त्याच्या मनात शंका निर्माण झाली असे नव्हे, पण अखंड गतीचे इंजिन अशक्य आहे ही कल्पना लोकांच्या मनात किती खोल रुजली आहे हे पाहून तो बेचैन झाला होता. एखाद्याने असे यंत्र शोधले तरी लोक आग्रहाने नकार देत राहतील असे त्याला वाटले. अशा लोकांशी वाद घालणे खेदजनक आणि व्यर्थ होते. लोकांसमोर विश्वासाने मन उघडे केल्यानंतर त्यांच्या हल्ल्यापासून स्वतःला इजा होऊ नये म्हणून हट्टी आणि निग्रही वागणे, एवढेच मोन्याचे आत्मसंरक्षणाचे एकमेव साधन होते.

"आणि पुढं काय?" मोन्याने विचारले.

"कोणत्या अर्थानं?"

"तू माझं अभिनंदन केलंस... आता पुढं?"

"पुढं—पाठव त्याला नेहमीच्या मार्गानं... टप्प्याटप्प्यानं ढकल त्याला... एव्हाना तू बनवलंस काय? किंवा नुसत्या कल्पनेतच आहे?"

"कल्पनेत आहे."

"अस्सं..." डोके हलवत इंजिनिअर हसला. "तर मग हालचाल कर आता... लिहून काढ अथवा काय कर ते मी कसं सांगू..."

मोन्या थोडा गप्प राहिला. इंजिनिअरच्या हसण्यामुळे तो दुखावला होता.

"कशा प्रकारचं यंत्र आहे ह्याबद्दल तुला कुतूहल नाही वाटत?

निदान त्याची तत्त्वं तरी विचारायचीस... तू इंजिनिअर आहेस ना स्वत: ? खरंच तुला ह्यात काही गम्य वाटत नाही ?"

"नाही," ठामपणे इंजिनिअर म्हणाला. "मुळीच गम्य नाही."

"का ?"

इंजिनिअर फटफटीपासून दूर झाला, त्याने हात फडक्याला पुसले, फडके लाकडाच्या ओंडक्यांवर फेकले आणि सिगारेटसाठी स्वत:चे खिसे चाचपले. मोन्याकडे खाली पहात तो म्हणाला :

"तरुण माणसा... तू म्हणाला होतास की, तंत्रविद्यालयात काही दिवस शिकत होतास..."

"दीड वर्ष."

"पाहिलंस... मग अशी फालतू वटवट कशी करतोस? स्वत: ड्रायव्हर आहेस, तंत्रशास्त्राशी तुझी ओळख आहे... खरंच तुझा तुझ्या इंजिनावर विश्वास आहे ?"

"त्याच्या कार्याचं तत्त्वसुद्धा तू मला विचारलं नाहीस आणि एकदम त्याला निकालात काढलंस !" मोन्या चकित होऊन म्हणाला. त्या क्षणापासून हट्टीपणा त्याचा ताबा घेत होता हे त्याला जाणवले. छातीत गाठ बसल्याची परिचित जाणीव त्याला झाली. अप्रिय थंडपणा आणि तणाव त्याला छळू लागला.

"जाणून घ्यायची माझी इच्छा नाही."

"का ?"

"कारण हा मूर्खपणा आहे. आणि तुला स्वत:ला हा मूर्खपणा समजला पाहिजे."

"पण समज, हा मूर्खपणा नसला तर ?"

"तपासून बघ. खात्री करून घे आणि मग ये... तुझ्या कार्याच्या तत्त्वासकट. पण जर माझा सल्ला मागत असशील, तर ही खात्री करून घेण्यावरसुद्धा वेळ वाया घालवू नको."

"सल्ल्याबद्दल आभार." मोन्या उठला. "एकूण भल्या शब्दांबद्दल..."

"बघितलंस..." काहीशा खेदाने, पण तरीही ठामपणे इंजिनिअर म्हणाला. "तुम्हाला एका शब्दानं दुखावण्याची सोय नाही. आणखी सांगत सुटशील की, मला इन्स्टिटयूटमध्ये शिकवलं..."

"इथं इन्स्टिटयूटचा काय संबंध ! मी तुझ्यापाशी काही संदर्भासाठी आलो नव्हतो."

"मग काय ही... हौस म्हणायची !" इंजिनिअर उद्गारला. "जवळ जवळ नऊ वर्षं शिकलास... आणि म्हणे अखंड चालणारं इंजिन. काय म्हणू? एव्हाना अशा गोष्टी समजल्या पाहिजेत. तुला काय वाटतं. जर अखंड चालणारं इंजिन बनवणं शक्य असतं, तर एव्हा-ना त्याचा शोध लागला नसता?"

"सगळे ह्याच युक्तिवाद करतात: अशक्य आहे, संपलं. आणि हात झटकून मोकळे..."

"हात नाही झटकले, खूप पूर्वीच दाखवून दिलंय: अशक्य! ठीक आहे, माणूस चौथीपर्यंतच शिकलाय, पण तू तर साडेआठ वर्षं शिकलास! असं कसं काय?" इंजिनिअर आता पुरता चिडला होता आणि चीड लपविण्याचा त्याने प्रयत्न केला नाही. मोन्याकडे संतापाने आणि कठोरपणे तो पहात होता. त्याने प्रश्न केला: "साडेआठ वर्षं तू काय करत होतास?"

"एका पायावरून दुसऱ्या पायावर उड्या मारत होतो," मोन्यासुद्धा चिडून म्हणाला. त्यानेही इंजिनिअरच्या डोळ्यांना डोळे भिडवले. "सभेत बोलल्यासारखं काय बोलतोस? कसला दिमाख दाखवतोस? मी तुला कुठंही वर ढकलायच्या विचारात नाही."

"बघितलंस..." मोन्याच्या संतापाने आणि हट्टीपणाने इंजिनिअर किंचित वरमला, पण त्याचा स्वतःचा राग मुळीच शमला नाही. "बोलायची तर अक्कल आहे... म्हणजे अगदीच अडाणी नाहीस. मग त्या अखंड चालणाऱ्या यंत्राबद्दल निष्कारण एवढा गोंगाट कशाला माज-वतोस? माणसं तुला हसतील." इंजिनिअरने सिगारेट खाली फेकली, तिच्यावर जोराने पाय आपटून तिला चुरडली आणि परत फटफटीकडे मोर्चा वळवला.

मोन्या आवारामधून बाहेर पडला.

ह्या इंजिनिअरने त्याला स्तंभित केले होते. त्याच्याकडून खरडपट्टी निघाल्याबद्दल त्याला लाज वाटली व आता इंजिनिअरचा त्याला विल-क्षण राग आला... सर्वांत वाईट म्हणजे अखंड चालणाऱ्या इंजिनाबद्दल

त्याला शंका वाटू लागली. तो थेट घरी गेला—आराखडे पहायला. खाली पाहून झपझप चालत होता. तशी शरम यापूर्वी कधीही वाटली नव्हती. सकाळच्या बेफिकीर, निःशंक आत्मसमाधानाच्या भावनेची त्याला लाज वाटत होती. सगळी व्यवस्थित खात्री करून घ्यायला हवी होती. त्या समाधानी मनःस्थितीत इंजिनिअरकडे जाण्याचा त्याने मूर्खपणा केला होता. अर्थात, आधी सर्व खात्री करून घ्यायला हवी होती.

आजी घरात नव्हती. छानच झाले. नाही तर एकदम काळजीत पडली असती, त्याच्यावर प्रश्नांचा मारा केला असता... मोन्या टेबलापाशी बसला व त्याने आराखडे जवळ ओढले. काय चुकले होते? वजन—तिथे होते—सळईवर दाब देत होते... दाब देत होते ना? दाबत होते. कसे काय दाबत नाही? तर मग काय करतेय? मोन्याला इंजिनिअरचा प्रश्न आठवला: "साडेआठ वर्षं काय करत होतास?" त्याने संतापून बसल्याजागी हालचाल केली, पण परत स्वतःच्या शोधावर लक्ष एकवटले. मग? वजन सळईवर दाब देते, त्यामुळे सळई सरकते... सरकते. आणि तिचे दुसरे टोक आसाला गच्च सांधलेले आहे... उगीच का शिवीगाळ! का हे अशक्य? आता मोन्या उत्तेजित बनला. अधीरतेने त्याला झपाटले. बरोबर, साडेआठ वर्षे तो शिकला होता हे अगदी खरे! पण हे यंत्र! मोन्या खुर्चीवरून ताडकन उठला आणि खोलीत फेऱ्या मारू लागला. त्याला समजत नव्हते: असे कसे ते लोक? वजन सळईला दाबत नाही आणि त्यामुळे सळई सरकत नाही, हे सिद्ध करून दाखवू देत. का सरकणार नाही? सरकते हे तुम्हाला मान्य आहे? तर मग आस... थू:! काय करावे ते मोन्याला समजत नव्हते. काहीतरी करणे आवश्यक होते—नाहीतर ह्या सर्व भानगडीपायी काळीज फुटले असते. ताणापायी कातडी फाटली असती. मोन्याने आराखडा उचलला व तो घराबाहेर पडला. तो कुठे निघाला होता हे अद्याप त्याला माहीत नव्हते. इंजिनिअरकडे तो गेला असता, पण एव्हाना इंजिनिअर निघून गेला असणार. कदाचित अजून गेला नसेल? मोन्या परत इंजिनिअरकडे गेला. परत तो झपझप चालत होता. आता लाज वाटत नव्हती, पण त्याच अधीरतेने त्याला झपाटले

होते. धावण्याचा मोह त्याने कसाबसा आवरला. तसा मोन्या थोडासा धावलाही – गल्लीत, जेथे लोक नव्हते.

आवारात आता फटफटी नव्हती. मोन्याला वाईट वाटले. कुठल्या-तरी हेतूपेक्षा अधिक यांत्रिकपणे तो इंजिनिअरच्या घरात शिरला. घरा-मध्ये तरुण मालकीण एकटीच होती. ती नुकतीच झोपेतून उठली होती, अजून गाऊनमध्येच वावरत होती, तिचा चेहरा झोपेमुळे सुजलेला होता, केस विंचरलेले नव्हते.

"नमस्ते," मोन्या म्हणाला. "नवरा निघून गेला?"

"हो."

मोन्या तेथून जायला निघाला होता, पण थांबला.

"तुम्ही शिक्षिका आहात ना?" त्याने विचारले.

यजमानीण चकित झाली.

"हो. काय झालं?"

"कुठला विषय शिकवता?"

"गणित."

घरमालकिणीला लाजवणाऱ्या तेथील अव्यवस्थेकडे मुळीच लक्ष न देता, खुद्द घरमालकिणीकडे ध्यान न देता – तिने अद्याप वेणी-फणी केलेली नव्हती – मोन्या थेट टेबलापाशी गेला.

"जरा ह्यावर नजर टाका... तुमच्या नवऱ्याबरोबर माझा ह्या-च्यावर वाद झाला... इकडं या."

ती तरुण बाई काही वेळ अनिश्चितपणे उभी राहिली व मोन्याकडे पहात राहिली. ती सुरेख आणि गुबगुबीत होती.

"काय?" मोन्याने विचारले.

"मामला काय आहे?" शिक्षिकेने टेबलापाशी येत विचारले.

"बघा," मोन्या तिला आराखडा समजावून देऊ लागला. "ही सरकती फळी चांगल्या दर्जाच्या पत्र्याची बनवलेली आहे. ठीक? तिला हे असं... ह्या कोनात चाकाशी जोडलंय. आता इथं आपण वरती वजन ठेवलं... आणि ही सळई आसाला सांधली आहे. वजन सरकायला लागतं, सळईला ढकलू लागतं... ते सळईला ढकलणार, होय की नाही?"

"दाबणार..."

"दाबणार! ह्या वजनामुळं सळई सरकणार, होय ना? तर मग आस काय करील? गोल फिरेल? आणि चाक? चाक आसाला घट्ट बसवलंय..."

"हे काय, अखंड चालणारं यंत्र की काय?" शिक्षिका चकित झाली.

मोन्या खुर्चीवर बसला. शिक्षिकेकडे त्याने पाहिले आणि तो गप्प राहिला.

"हे काय?" तिने विचारले.

"तुम्ही आत्ता स्वतःच सांगितलंत!"

"अखंड चालणारं यंत्र?"

"हो."

शिक्षिकेने आश्चर्याने स्वतःच्या ताज्या ओठांना मुरड घातली आणि खूप वेळपर्यंत आराखडा निरखून पाहिला... खुर्ची ओढून तीसुद्धा बसली.

"काय?" मोन्याने सिगारेट पेटवत विचारले. त्याच्या छातीत परत धडधड सुरू झाली होती, पण आता ती आनंदापायी आणि अधीरतेपायी होती.

"चाक फिरणार नाही," शिक्षिका म्हणाली.

"का?"

"अजून माहीत नाही... त्यासाठी गणितं मांडली पाहिजेत. ते फिरणार नाही."

मोन्याने स्वतःच्या गुडघ्यावर जोरात मूठ आपटली... तो उठला व खोलीत येरझाऱ्या घालू लागला.

"मंडळी!" तो बोलू लागला. "मला समजत नाही: एक तर तुम्ही अति शिकलात, किंवा... का फिरणार नाही?" मोन्या थांबला आणि बाईच्या डोळ्यांमध्ये थेट पाहू लागला. "का?"

बाईसुद्धा त्याच्याकडे चिंतातुर नजरेने पहात होती. ती थोडीशी घाबरलेलीही दिसत होती.

"ते फिरावं अशी तुमची इच्छा आहे?" तिने विचारले.

तिने हे मूर्खपणाने विचारले होते ह्याकडे मोन्याने दुर्लक्ष केले आणि परत आपलेच घोडे पुढे दामटले:

"का फिरणार नाही ते?"

"माझ्या नवऱ्यानं तुम्हाला काय सांगितलं?"

"नवऱ्यानं... काहीही सांगितलं नाही. त्यानं मला भाषण ठोकायला सुरवात केली." परत मोन्या आराखड्यावर झुकला. "तुम्ही सांगा, चाक का... वजन दाबतंय?"

"दाबतंय."

"दाबतंय. ह्या दाबामुळं सळई..."

"जरा थांबा," मोन्याचे बोलणे शिक्षिकेने अर्ध्यावर तोडले. "कशाला इथं आपण तर्क करत बसलो आहोत? पदार्थविज्ञानाचे शिक्षक, अलेक्सान्द्र इवानोविच आपल्याला अगदी सोप्या रीतीनं समजावून देतील... तुम्हाला माहीत नाहीत ते?"

"माहीत आहेत."

"इथून जवळच तर राहतात."

मोन्याने आराखडा उचलला. पदार्थविज्ञानाचे शिक्षक कुठे राहतात हे त्याला माहीत होते.

"मात्र माझ्यासाठी जरा थांबा, ठीक आहे?" शिक्षिकेने विनंती केली. "मी तुमच्याबरोबर येते. मलासुद्धा ह्यात रस वाटू लागलाय."

मोन्या खुर्चीवर बसला.

शिक्षिका चुळबुळली...

"मला कपडे बदलायचे आहेत..."

"अरे हो," मोन्याच्या डोक्यात प्रकाश पडला. "अर्थातच. मी बाहेर व्हरांड्यात थांबतो." मोन्या बाहेरच्या दारापाशी गेला, पण उंबरठ्यावरून मागे वळून पहात हसून म्हणाला: "काय उद्योग आहे नाही? आं?"

"मी आत्ता आटपते," बाई म्हणाली.

पदार्थविज्ञानाचे शिक्षक गेकमान अत्यंत दयाळू गृहस्थ होते. उत्तेजित मोन्याची कहाणी त्यांनी सस्मित चेहऱ्याने ऐकून घेतली. मोन्याचे बोलणे संपल्यानंतर त्यांनी आराखडा पाहिला.

"बघा!.." तरुण शिक्षिकेला ते मनःपूर्वक कौतुकाने म्हणाले. "किती छान विचार केलेला आहे! आणि तुम्ही म्हणता..." आणि

ते मोन्याकडे वळले. स्वतःचे विचार समजावून सांगताना हळू हळू त्यांचा उत्साहसुद्धा वाढत गेला: "इथं पहा–तुमच्या आराखड्यात मी काहीही बदल करणार नाही, फक्त छोट्या दुरुस्त्या सुचवतो. तुमची सरकती फळी आणि तुमचं वजन मी काढून घेतो. ह्या फळीऐवजी चाकाला मी आणखी एक सळई आडवी बसवणार, ही अशी–" गेकमाननी स्वतःचे चाक रेखाटले आणि त्याला सळई जोडली. "आपण ती चाकाला अशी जोडू. ठीक?" गेकमान खूप खूष होते. "आता आपण ह्या आडव्या सळईला एक स्प्रिंग जोडणार–अशी." गेकमाननी स्प्रिंग रेखाटली. "आणि दुसऱ्या टोकाला..."

"असं यंत्र मी पुस्तकात पूर्वी पाहिलंय," मोन्याने शिक्षकांना थोपवले. "तसं चाक फिरणार नाही."

"अस्सं!" शिक्षक आनंदाने उद्गारले. "का बरं?"

"स्प्रिंग दोन्ही बाजूंनी सारखाच दाब देईल."

"म्हणजे एक गोष्ट स्पष्ट झाली. आता तुमचा नमुना घेऊ–वजनासकट. सरकत्या फळीवर वजन आहे आणि सळईवर ते दाब देतं. पण वजन स्प्रिंगप्रमाणंच आहे हे तुम्ही ध्यानात घेतलं, तर सर्व स्पष्ट होईल. तुमचं वजन सळईवर आणि सरकत्या फळीवर सारखाच दाब देतं, जास्त नाही अथवा कमी नाही. चाक फिरणार नाही."

मोन्याचा ह्यावर विश्वास बसेना. "असं कसं होईल?" तो उद्गारला. "तुम्हाला काय झालंय? वजन फळीवरून नुसतं घसरतं, फळी आणखी अचूक कोनात बसवता येईल आणि वजन सळईवर पडतं. पण तुम्ही म्हणता, ते सारखंच?" मोन्या क्रुद्ध नजरेने शिक्षक-महाशयांकडे पहात होता. पण शिक्षक विलक्षण आनंदात होते.

"होय!" सस्मित मुद्रेने ते उद्गारले. यंत्रशास्त्राचे नियम एवढे अपरिवर्तनीय होते ह्याचाच जणू त्यांना आनंद झाला होता. "ते सगळं सारखंच आहे! तुम्हाला जो फरक वाटतो तो केवळ बाह्य फरक आहे, पण जरा बारकाईनं पाहिलंत, तर पूर्ण साधर्म्य आढळून येईल."

"तुम्ही आणि तुमचा सारखेपणा चुलीत जा!" मोन्या अत्यंत कडवटपणे म्हणाला. त्याने आराखडा हिसकावून घेतला व तो तरातरा निघून गेला.

घराच्या दिशेने तो परत झपझप चालत होता. एकूण सगळा कट भासत होता. केवळ सैतानालाच खरे काय ते ठाऊक! त्या सगळ्यांनी मिळून करार केला होता. त्याचे चाक हमखास फिरणार हे शेंबड्या पोरालासुद्धा स्पष्ट होते. पण ती माणसे मान्य करायला तयार नव्हती. काय करणार?

मोन्या घरी धावत आला, आज प्रकृती बरी नाही अशी एक चिठी त्याने खरडली, परसदारीच्या वाफ्यात आजीला शोधून काढले, सरकारी शेताच्या कचेरीत तिला त्या चिठीसकट धाडले. आजीला काही खुलासा करण्याच्या भानगडीत तो पडला नाही. पडवीत जाऊन अखंड चालणारे यंत्र बनविण्याच्या उद्योगाला तो लागला.

...आणि त्याने ते बनविले. संध्याकाळी खूप उशीरापर्यंत तो खपत होता. कंदिलाच्या उजेडात त्याने काम पूर्ण केले. त्याने आपली सायकल सोडवली (त्याला एका चाक पाहिजे होते), एका जुन्या जस्ताच्या बादलीपासून सरकती फळी बनवली, सळई न सांधता बोल्टच्या मदतीने जोडली–सर्व काही त्याच्या योजनेप्रमाणे त्याने पार पाडले.

मोन्याने कंदील थोडा अधिक उंचीवर टांगला, स्वतःच्या चाकापाशी लाकडाच्या एका ठोकळ्यावर तो बसला आणि सिगारेट ओढू लागला. मग कोणत्याही रीतीने उत्तेजित न होता पायाने त्याने चाक ढकलले. काही कारणाने त्याने आपल्या यंत्राला पायाने ढकलून पहिली गती दिली. मग आरामशीरपणे भिंतीला टेकून फिरणारे चाक तो पाहू लागला. पण चाक थोडेसे फिरले आणि मग थांबले. मोन्याने परत त्याला गती दिली–ह्यावेळी हातांनी. त्याला पुनःपुन्हा चाकाला गती द्यावी लागत होती व चकचकीत काड्यांच्या त्या चमकत्या वर्तुळाकडे तो आश्चर्याने व वाढत्या तिटकाऱ्याने पहात होता. ते वर्तुळ थांबत होते. दुसऱ्या वजनाची आवश्यकता होती असे मोन्याला वाटले. सरकती फळी आणि वजन त्यांचा समतोल साधायचा होता. त्याने त्यानुसार फेरफार करून पूर्ण ताकदीनिशी चाक परत फिरवले. पण थोड्याच वेळात चाक थांबले. चाकाचा चुराडा करण्याची मोन्याला तीव्र इच्छा

झाली, पण त्याने संयम केला. आणखी थोडा वेळ तो तेथे बसून राहिला. मग अत्यंत हताश आणि पराभूत मनाने तो उठला आणि पाय नेतील तिकडे चालू लागला.

...तो नदीकिनाऱ्यापाशी येऊन बसला आणि छोटे गोटे गोळा करून काळया पाण्यावर फेकू लागला. नदीचे पाणी संथ नव्हते. लव्हाळयांशी झोंबत, खळखळ आवाज करत, समोरच्या तीराशी अंधारात उसासे टाकत पाण्याचा प्रवाह धावत होता. सारी रात्र तो स्वतःशी पुटपुटत अस्वस्थपणे वाहात होता. मधल्या धारेपाशी प्रवाह वेगवान होता तेथे पाणी चमकत होते, पण किनाऱ्यापाशी मात्र गोटयांना हिंदकळत, जणू झुडुपांमधून कसलातरी शोध घेत, काहीवेळा संतापाचे चीत्कार काढत, तर काहीवेळा हलकेच हास्य करत पाणी वाहात होते.

मोन्याच्या मनाला मुळीच यातना होत नव्हत्या. उलट एकटे बसून राहणे त्याला आवडत होते. सगळे त्याला हसले होते आणि यापुढे हसणार होते: माणसे जरी असाधारण मूर्खपणाच्या गोष्टी करत असली, तरी सबंध खेडयात अखंड चालणाऱ्या यंत्राचा शोध लावण्याचा खटाटोप केला नव्हता. आता काही काळपर्यंत त्यांना चेष्टेला विषय मिळाला होता. खुशाल करोत चेष्टा. लोकांची थट्टा केली पाहिजे. खूप कष्ट करणारी माणसे आहेत, त्यांना मनोरंजनाची खास साधने नाहीत. खुशाल हसोत. ह्या रात्री का कुणास ठाऊक, पण मोन्याला लोकांविषयी प्रेम जाणवत होते. अजिबात खेद न करता तो लोकांविषयी विचार करत होता. लोकांशी नेहमी एवढे वाद त्याने घालायला नको होते, असेसुद्धा त्याला वाटले. कशाला वाद घालायचा? माणसाने जगावे, स्वतःचा क्रूस मुकाट वाहून न्यावा... स्वतःबद्दलही त्याला थोडे वाईट वाटले.

पहाट फुटेपर्यंत मोन्या नदीतीरावर बसून राहिला. स्वतःच्या अपयशाबद्दल त्याला मुळीच चिंता वाटत नव्हती. त्याने नदीच्या पाण्यात हात-तोंड धुतले, तीराचा चढ चढून नदीकिनारीच्या रस्त्याने तो चालू लागला. परत एकदा हेतूशून्यतेने तो भटकत होता. त्याला झोपण्याची इच्छा नव्हती. मोन्याच्या मनात विचार आला: लग्न केले पाहिजे, मुलांना – निदान तीन – जन्म दिला पाहिजे आणि ती कशी वाढतात ते पाहिले पाहिजे. आणि शांती प्राप्त केली पाहिजे. म्हणजे तसे सावकाश

आणि भारदस्तपणे चालता येईल, प्रत्येक गोष्टीकडे निवांतपणे, मनसोक्तपणे, किंचित उपहासाने पाहता येईल. मोन्याला शांतस्वभावी शेतकरी फार आवडायचे.

आता पुरते उजाडले होते. इंजिनिअरच्या घरापाशी आपण कसे पोहोचले हे मोन्याच्या ध्यानात आले नाही. अर्थात तो मुद्दाम तेथे आला नव्हता. सहज फिरता फिरता तो तेथपर्यंत आला होता आणि आवारात त्याला इंजिनिअर दिसला. इंजिनिअर परत स्वतःच्या फटफटीशी खटपटत होता.

"सुप्रभात!" कुंपणापाशी थांबून मोन्या म्हणाला. इंजिनिअरकडे त्याने शांतपणे आणि उल्हासाने पाहिले.

"रामराम," इंजिनिअर प्रतिसाद दिला.

"फिरतंय!" मोन्या म्हणाला. "चाक फिरतंय!"

इंजिनिअरला स्वतःच्या फटफटीचे भान राहिले नाही. मोन्याकडे टक लावून पहात तो काही काळ उभा राहिला... अविश्वासाने नव्हे — मोन्याच्या बोलण्याचे त्याला चटकन आकलन झाले नव्हते.

"यंत्राबद्दल म्हणतोस काय?"

"होय. चाक तर फिरतंय. सबंध रात्रभर फिरत होतं... आत्तासुद्धा फिरतंय. बघायचा मला वीट आला, म्हणून थोडं फिरायला बाहेर पडलो."

आता इंजिनिअरला काहीच समजेनासे झाले होते. मोन्याचा चेहरा तर थकलेला आणि प्रामाणिक दिसत होता. एवढेच नव्हे तर त्यावर शरमेचा लवलेश नव्हता, उलट तेजाने चमकत होता.

"खरंच?"

"चल माझ्याबरोबर. स्वतःच्या डोळ्यांनी बघ."

इंजिनिअर आवारामधून मोन्यापाशी चालत आला.

"तू काहीतरी जादू केलेली दिसतेय..." अजूनही त्याचा मोन्यावर विश्वास बसत नव्हता. "काहीतरी तयार केलंस मला बनवायला?"

"कसलीही जादू नाही!.. पडवीत... सारखं फिरतंय!"

"कोणतं चाक आहे?"

"सायकलचं."

इंजिनिअर थबकला.

"बरोबर. त्यात चांगली बॉल-बेअरिंग असतात. म्हणून ते फिरतं."

"होय," मोन्या म्हणाला. "पण सबंध रात्रभर तर नाही."

ते परत चालू लागले.

इंजिनिअरने पुढे प्रश्न विचारले नाहीत. मोन्याही गप्प राहिला. पण अजूनही त्याची प्रसन्न मनःस्थिती होती. त्याला स्वतःबद्दलच आश्चर्य वाटत होते.

"सबंध रात्र फिरतंय?" मोन्याच्या घराशी पोहोचण्याआधी न राहवून इंजिनिअरने परत विचारले. आणि मोन्याकडे निरखून पाहिले. मोन्याने त्याची नजर शांतपणे झेलली व स्वतःच चकित झाल्याप्रमाणे तो म्हणाला :

"सबंध रात्र! दहा वाजण्याच्या सुमाराला मी सुरू केलं – आता किती वाजले?"

इंजिनिअरने स्वतःचे घड्याळ पाहिले नाही. तो मोन्यापाठीमागून चालत राहिला. जरी तो मनातून गोंधळला होता, तरी तो गोंधळ प्रकट न करण्याची खटपट करत होता, स्वतःच्या इंजिनिअरच्या दर्जाला खाली न आणण्याचा प्रयत्न करत होता. इंजिनिअरकडे पाहताना मोन्याला मजा वाटत होती, पण तोसुद्धा स्वतःच्या भावना लपवत होता.

"तयार?" पडवीच्या दारापाशी थांबून त्याने विचारले. इंजिनिअरकडे एक कटाक्ष टाकून त्याने दार ढकलले... आणि इंजिनिअरला प्रथम चाक दिसावे म्हणून तो बाजूला झाला. चाक स्थिर पाहिल्यानंतर इंजिनिअरची कोणती प्रतिक्रिया होईल ते पाहण्यासाठी तो त्याच्या अगदी पाठोपाठ उभा होता.

"अस्सं," इंजिनिअर म्हणाला. "मला वाटलं, तू काहीतरी जादूची युक्ती केली असशील. पण गड्या, ह्यात काही गंमत नाही."

"मला माफ कर," स्वतःशी खूष होत मोन्या म्हणाला. "चल, माझ्या घरात कन्याक आहे... राखून ठेवली होती. पिऊ या थोडी?"

इंजिनिअरने कुतूहलाने मोन्याकडे पाहिले. तो हसला.

"चल."

ते दोघे घरात गेले. आवाज न करण्याचा प्रयत्न करत, सावधपणे

बाहेरच्या खोलीतून ते जवळ जवळ पार झाले... तेवढ्यात आजीचा आवाज आला:

"मोत्का, सबंध रात्र कुठं होतास?"

"झोप, झोप," मोन्या म्हणाला. "सर्व ठीक आहे."

ते दोघे मोन्याच्या खोलीत गेले.

"बैस," मोन्या म्हणाला. "मी आत्ता सगळी व्यवस्था करतो..."

"अरे... कसलीही व्यवस्था करण्याचं कारण नाही!" इंजिनिअर दबत्या आवाजात म्हणाला. "सोड नाद, सकाळीच कसली व्यवस्था करतोस?"

"ठीक आहे," मोन्याने समती दाखवली. "मी समोसा वगैरे काही बघत होतो... जाऊं दे."

एकेक छोटा चषक कन्याक पिऊन त्यांनी सिगारेटी शिलगावल्या, तेव्हा इंजिनिअरने परत मोन्याकडे कुतूहलाने पाहिले. त्याचे चतुर डोळे आकुंचित पावले होते व मुद्रेवर स्मित विलसत होते.

"माझ्या शब्दांवर विश्वास ठेवला नाहीस ना? करून बघितलंस... बहुधा सबंध रात्र खटपट करत होतास?"

मोन्या आता विचारमग्न आणि शांत बसला होता. जणू एव्हाना त्याला तीन मुले होती व ती कशी वाढताहेत हे तो पहात होता.

"काल सबंध दिवस वाया घालवला... महत्त्वाचं ते नाही," मोन्या बोलू लागला. त्याच्या बोलण्यात क्षुल्लक खंत मुळीच नव्हती, उलट गहन, प्रामाणिक कुतूहल होते. "ते का फिरत नाही हे मला अजूनही समजत नाही. ते फिरलं पाहिजे."

"ते फिरणार नाही," इंजिनिअर म्हणाला. "हाच तर महत्त्वाचा मुद्दा आहे."

त्यांनी एकमेकांकडे मुकाट पाहिले. इंजिनिअरने स्मित केले आणि स्पष्ट झाले की, तो वाईट स्वभावाचा माणूस नव्हता. त्याचे स्मित साध्या, विश्वासू मनाचे स्मित होते. त्याच्या तरुण वयामुळे आणि भिडस्त स्वभावामुळे सरकारी शेताने त्याच्यावर कामाचा एवढा डोंगर रचला होता की, त्यामुळे स्मित करायला अथवा नर्मविनोदाने बोलायलासुद्धा तो विसरला होता. तसे वागायला त्याला सवडच मिळत नव्हती.

"मित्रा, शिकलं पाहिजे," इंजिनिअरने सल्ला दिला. "तेव्हा सगळं समजेल."

"पण इथं शिकण्याचा काय संबंध?" मोन्या नाराजीने म्हणाला. "सारखं आपलं एकच तुणतुणं – शिकलं पाहिजे, शिकलं पाहिजे... पण शिकलेल्यांमध्ये मूर्ख नसतात?"

इंजिनिअर खूप हसला आणि उठला.

"असतात! पण अडाण्यांमध्ये मूर्ख जास्त असतात. मी आत्ताच्या घटनेबाबत बोलत नाही... एकूण. अच्छा!"

"आणखी एक ग्लास पिऊ या?"

"नको. आणि तूसुद्धा पिऊ नको."

इंजिनिअर मोन्याच्या खोलीबाहेर पडला आणि परत चोरपावलांनी बाहेरची खोली पसार करण्याचा त्याने प्रयत्न केला, पण आजी आता जागी होती व चुलाण्याच्या फळीवरून त्याच्याकडे पहात होती.

"उगीच चोरपावलांनी चालू नको. मी झोपलेली नाही," ती म्हणाली.

"नमस्ते आजी!" इंजिनिअरने अभिवादन केले.

"नमस्कार, लाडक्या. तुम्ही का झोपत नाहीत? तरुण वय असून म्हाताऱ्यांसारखं वागता... तुम्ही व्यवस्थित झोपलं पाहिजे."

"मग म्हातारपणी काय करणार?" इंजिनिअरने गंमतीने विचारले.

"म्हातारपणीसुद्धा नीट झोप मिळणार नाही."

"असं असेल तर नंतर केव्हातरी... कुठंतरी."

"तिथं काय आहे ते..."

मोन्या खोलीत खिडकीपाशी बसून होता. खिडकीच्या तावदानाची वरची बाजू लाल रंगात न्हायली होती – सूर्य उगवत होता. खेडे जागे होते होते: फाटकांच्या आपटण्याचे आवाज येत होते, कुरणात चरायला न्या म्हणून गायी हंबरून सांगत होत्या. लोक एकमेकांना साद घालत होते, अधूनमधून काहीजण मोठ्यांदा ओरडत होते... सर्व जसे असावे तसे होते. देवाची कृपा, निदान इथे सर्व स्पष्ट आहे – मोन्याच्या मनात विचार आला. सूर्य उगवतो आणि मावळतो, उगवतो आणि मावळतो, चिरंतन आणि अप्राप्य. दरम्यान माणसे आपली नित्याची कामे करत असतात: ओरडत असतात, धांदल करतात, कामे करतात, कोबीला पाणी घालतात... यशांचा आनंद साजरा करतात! माझ्या लाडक्या लोकांनो... तुम्हाला माझा दंडवत!

१९७३

पयोदोर अब्रामोव

सर्वसुखी

फ्योदोर अब्रामोव (१९२०-१९८३). 'भाऊ आणि बहिणी' ही पहिली कादंबरी फ्योदोर अब्रामोव यांनी १९५८ साली प्रसिद्ध केली. 'प्ऱ्यास्लीन' ह्या त्रयीतील ते पहिले पुस्तक होते. ह्या त्रयीबद्दल त्यांना सरकारी पारितोषिक मिळाले.

अब्रामोव लेनिनग्राद विद्यापीठाच्या तिसऱ्या वर्षा-च्या अभ्यासक्रमात होते तेव्हा युद्ध सुरू झाले. ते होमगार्डमध्ये दाखल झाले, गंभीर जखमी झाले व त्यांना सैन्यातून निवृत्त करण्यात आले. युद्धानंतर त्यांनी विद्यापीठात अध्यापन केलें व रशियन साहित्याच्या अध्यासनाचे प्रमुखपद सांभाळले.

त्यांच्या साहित्याचा दुसरे महायुद्ध हा मुख्य विषय होता. "१९४२ च्या हिवाळ्याअखेरी मी गंभीर जखमी झालो आणि वेढ्यातील लेनिनग्रादमधून माझी बाहेर पाठवणी झाली," फ्योदोर अब्रामोव यांनी लिहिले होते. "इस्पितळांच्या अखंड मालिकांनंतर, अखेरीस मी अर्खांगेल्स्कच्या अभेद्य जंगलांमध्ये पोहो-चलो. तेच माझे घर बनले. ते फार वाईट दिवस होते. पीनेगामध्ये आयुष्यासाठी, जगण्यासाठी लढाई चालली होती. तेथे तोफगोळे फुटत नव्हते, काडतूसे सुसाटत नव्हती, पण भयानक तुटवडा होता, खडतर कष्ट होते आणि "लढाईत कामी आला" अशा पत्रांना पोस्टमन आणत होता. शेतांमध्ये आणि कुरणांमध्ये पुरुषांचे काम होते, पण अर्धपोटी बायका, मुले व म्हातारे ते काम उरकीत होते. त्या उन्हा-ळ्यात मी खूप खूप दुःख आणि यातना पाहिल्या. पण त्याहीपेक्षा जास्त पाहिले रशियन काळजाचे धैर्य, त्याची सहनशीलता आणि त्याचे औदार्य."

शत्रूवर विजय मिळविण्यास सोविएत जनतेला सक्षम बनविणाऱ्या अक्षय नैतिक ताकदीचा झरा शोधण्यासाठी रशियन स्वभावाचे अवगाहन करणे हे अब्रामोव यांनी स्वतःचे उद्दिष्ट बनविले. त्यांनी थांग लावला की, इतिहासाच्या उषःकाली मायभूमी-बद्दलची निष्ठा, खंबीरपणा व अविचल धैर्य आका-राला आले होते व हा राष्ट्रीय स्वभाव नव्या समाज-सत्तावादी व्यवस्थेने हळुवारपणे जोपासला होता.

वडिलांनंतर आम्हाला आख्खे लाकडी घर उरले. आणि साऱ्या मुली. पुरुष एकटा तीखोन. भांडी सगळी रिती. आई रात्रं-दिवस खपत होती, रक्ताचा घाम गाळत होती, पण पावाचे खोके मोकळेच.

थोडक्यात, आम्हाला घराबाहेर पडून आमच्या उदरनिर्वाहाची सोय पहावी लागली. तीखोन शहरात गेला आणि मी बारा वर्षांची मुलगी मठात मोलकरीण म्हणून काम करू लागले. बाई ग, त्या नरकात मी नऊ वर्षे काढली. नऊ वर्षे त्या केसाळ सैतानांची धुणी बडवीत होते.

पहाटे तीन वाजता मला झोपेतून उठवायचे आणि धुण्याच्या ढिगां-पाशी संध्याकाळी आठपर्यंत मी उभी असायची. शेवटी शेवटी डोळयां-समोर काही दिसेनासे व्हायचे, हाता-पायांची जाणीव नाहीशी व्हायची. सोडाखारामुळे हात सोलून निघायचे, कबूतरांच्या पंजासारखे लालभडक दिसायचे. संन्यासी साबणाची काटकसर करायचे, सदासर्वदा सोडाखार द्यायचे कपडे धुण्यासाठी. आणि हिवाळयात नदीवर बर्फाच्या भोकातून कपडे बुचकळायचे! तशा गोठवणाऱ्या थंडीत भला मालक आपल्या कुत्र्याला घराबाहेर ठेवणार नाही, पण मी पंचवीस टोपल्या कपडे धुवायला नदीवर जायची. ह्या सगळया कामाचा मोबदला — महिना-अखेरी एक रूबल!

त्या पवित्र स्थळी त्यांनी मला असे वागविले. कधी कधी आई यायची, खूप रडायची, काही करू शकायची नाही आणि परत जायची. मी घरी जाऊन खाणार काय?

पण एक सांगत्ये: कशीही राहिले, कितीही हाल झाले, तरी

तारुण्य ते तारुण्य! रविवार यायचा आणि मी कुठेतरी पसार व्हायची. आता माझ्याकडे बघा — माझ्या रूपाला कुत्रीसुद्धा घाबरतात. पण त्या काळी अशी भयाण दिसत नव्हते. रस्त्यावरून चालू लागले म्हणजे कामगारांच्या आधाशी नजरा मला गिळायच्या, बोळकंडीतून जाताना संन्यासी माझ्या स्तनांना चिमटे घ्यायचे. काहीवेळा त्या दाढीवाल्यांच्या तोंडावर मी असा ठोसा हाणायची — तीन ताड उडायचे.

ठणठणीत प्रकृतीची मुलगी होते मी. देवाने आरोग्याची देणगी उदारपणे दिली. साठाव्या वर्षी आत्तासुद्धा पिठाचे पोते उचलून नेऊ शकते. पण माझ्या म्हाताऱ्यासमोर, तेव्हा तो म्हातारा नव्हता, झकास उमदा तरुण होता, मात्र माझा टिकाव लागला नाही. नुसत्या एका नजरेत त्याने मला जिंकले. सर्वांना — कामगारांना, संन्याशांना — कुत्र्याची पिले हुसकून लावावीत तशी मी हुसकून लावायची. पण त्याने नुसते एकदा माझ्याकडे पाहिले आणि मी त्याची झाले. ना हात हलेना, ना पाय.

अशा रीतीने मी भट्टीत स्वत:ला पोळून घेतले.

काय करणार, दोष माझाच होता. आईबरोबर बसून दोघी खूप रडलो. नशीबच तसे. ओलेक्सीपाशी सांगायचे — माझ्या म्हाताऱ्याला — माझ्या डोक्यात तसा विचारच आला नाही. चांगल्या घरचा मुलगा, खेड्यात सगळ्याजणी त्याच्याशी लग्न करायला टपलेल्या — ओलेनाच्या पोरीशी तो कशाला बांधून घेईल? हुंडा द्यायला फुटकी कवडी नाही आणि स्वत:चे फाटक बंद ठेवायची अक्कल नाही. पूर्वीच्या काळी मुलीच्या शीलाबद्दल फार कडक होते, आजच्यासारखी परिस्थिती नव्हती.

पण ओलेक्सीला माझी अवस्था समजली आणि तो थेट स्वत:च्या आई-बापापाशी गेला: "आई-बाबा, असं असं घडलंय आणि ओलेनाच्या मुलीशिवाय दुसऱ्या कुणाशीही मी लग्न करणार नाही."

त्यांनी त्याचे मन वळविण्याचे खूप प्रयत्न केले, बापाने त्याला छडीने चोपला — त्यांचा स्वभाव तापट होता — पण ओलेक्सी ठाम राहिला: ओकुल्काशिवाय माझ्या हातांखाली दुसरी कुणीही येणार नाही.

त्याचे वडील भडकले:

"असं बोलतोस! आई-बापाच्या मनाविरुद्ध जातोस? तर मग जग तुझा तू. मी तुला छदाम देणार नाही."

आणि बापाने काही दिले नाही. तीन वर्षे आम्ही काजळलेल्या हमामखान्यात राहिलो. तीन वर्षे धुरात घुसमटत होतो. पीठ मळायला मी काय वापरायची माहीत आहे? आंघोळीचा टब.

ओलेक्सी बिछान्यावर पडायचा आणि म्हणायचा: "गाणं म्हण, कारभारणी!" आयुष्यात कधी मी तशी गायले नाही, विश्वास ठेव. आमचे गाणे ऐकायला आख्खे खेडे रस्त्यावर येऊन उभे रहायचे. लोक म्हणायचे: "ओकुल्का गाते यात नवल नाही. लहानपणापासून लोकांघरी मोलकरीण म्हणून राबली. चांगलं आयुष्य आजवर माहीतच नव्हतं. पण ओलेक्सीला एवढा कसला आनंद होतोय?"

ओलेक्सी व मी लौकरच आमच्या पायांवर उभे राहिलो. आम्ही घर बांधले. नवल करावे असे घर आमचे आम्ही उभे केले. त्याची साथीदार म्हणून मी राबले – ओंडक्यांखाली आणि ओंडक्यांवर. होय, ओलेक्सीच्या जोडीने मी ओंडके उचलले, त्याच्याबरोबर कोपऱ्यांना कुऱ्हाड घेऊन बसले. डोळे बाहेर येईपर्यंत माणसे टक लावून बघायची – एक बाई कुऱ्हाड चालविते! कुणी असे दृश्य पाहिले नव्हते, त्याबद्दल कधी ऐकले नव्हते.

आम्ही घर बांधले, आमचे छान चालले होते आणि आमच्याकडे माझा म्हातारा सासरा आला.

एव्हाना तो दुबळा बनला होता, आंधळा झाला होता – कुणाला अशा माणसाची गरज? त्याचे तीन मुलगे त्याला जवळ करायला तयार नव्हते. त्याला म्हणाले: आता ओलेक्सीपाशी जा. अजून तू त्याच्याकडे राहिला नाहीस. पण ओलेक्सीकडे तो कसा जाणार? ओलेक्सीला साधी सुई न देता त्याने घराबाहेर हाकलून दिले होते ना?

सकाळी मी घराबाहेर आले – व्हरांड्यात कोण बसलेय? सासरे-बुवा. दार ठोठावायचा त्यांना धीर झाला नव्हता, म्हणून दारात गप्प बसून होते. हिवाळी गारठा पडलेला. ऐन कडाक्याची थंडी.

म्हाताऱ्याला हाताला धरून मी घरात आणले आणि चुलाण्यापाशी उबेला बसविले. मग त्याला खाऊ-पिऊ घातले आणि त्याच्या आंघोळीची तयारी केली – त्याच्या अंगात उवा पडल्या होत्या. एखाद्या लहान बाळासारखा रडला. म्हणाला:

"माफ कर, माफ कर, ओकुलीना. तुझ्या भलेपणाला मी लायक वागलो नाही. देव तुझं भलं करो."

मला नेमके माहीत नाही, सासऱ्याच्या प्रार्थनेमुळे मला सुखाचा लाभ झाला अथवा नाही (म्हातारा धार्मिक वृत्तीचा होता, माझ्यासारखा नव्हता, खेड्यात मला सारे म्हणायचे मठवाली), पण जे आयुष्य मला लाभले, त्यावरून खेड्यातील मी सर्वांत सुखी स्त्री आहे असे म्हणू शकते. माझे चार पुरुष युद्धात लढत होते, माझा नवरा आणि तीन मुलगे, सगळेच्या सगळे घरी परतले. पण ओलेक्सीचे सारे भाऊ तेथेच राहिले. त्यात आश्चर्य नाही, कारण खेड्यातील मूठभर पुरुषच परतले! पण माझे – चौघेच्या चौघे. मग तुम्ही मला सर्वसुखी म्हणणार नाही?

१९८०

येवगेनी नोसोव

जिवंत ज्वाला

येवगेनी नोसोव (जन्म १९२५). १९६० नंतर-च्या काळात येवगेनी नोसोव यांचा साहित्यक्षेत्रात प्रवेश झाला. कूर्स्कनजीकच्या एका कष्टाळू कुटुंबात त्यांचा जन्म झाला व त्यांचे संगोपन घडले. त्यांच्या पिढीतील बहुसंख्यांप्रमाणे दुसऱ्या महायुद्धात ते लढले. कोनिग्जबेर्गच्या लढाईत ते गंभीर घायाळ झाले. यद्धानंतर मध्य आशियात त्यांनी अनेक वर्षे काम केले व १९५१ मध्ये केवळ ते कूर्स्कला परतले. वृत्तपत्रीय वार्ताहर म्हणून ते सतत फिरतीवर असत. देशातील सामुदायिक शेतांना आणि उभारणी प्रक-ल्पांना भेटी देत. ह्या अनुभवामुळे त्यांचे जीवनविष-यक व लोकांविषयीचे ज्ञान खूप समृद्ध बनले. मॉस्कोत त्यांनी साहित्याचे उच्च अभ्यासक्रम पूर्ण केले आणि त्यांचा कथा-संग्रह प्रसिद्ध होताच त्याला तात्काळ यश लाभले: ‘किनारे’ (१९७१), ‘पूल’ (१९७४), ‘कुरणात सळसळणारी गवते’ (१९७७), ‘उघड्या देशात’ (१९८०).

नोसोवना निसर्गाची, मासे धरण्याची व मध्य रशियन निसर्गदृश्यांच्या सौम्य सौंदर्याची आवड आहे. रंगविण्याचा त्यांना नाद आहे आणि त्यांच्या कथां-मधून ह्याची जाणीव होते. कारण कोणताही छोटा तपशील न चुकविता, एवढ्या स्पष्टपणे मैदानाला, कुरणाला, राईला, नदीला अथवा सरोवराला पाहणे केवळ चित्रकारालाच शक्य आहे. उदाहरणार्थ, इंद्रधनुष्याचे वर्णन ते असे करतात: “जेव्हा मी झोपलो होतो, तेव्हा कुठूनतरी अचानक आलेल्या वाऱ्याने पश्चिमेच्या आकाशातील ढगांना विभागून त्यांचे स्तर बनविले आणि मावळत्या सूर्याने त्याचा स्थिर डोळा लांबच लांब फटीला भिडविला, जणू त्याने बाहेर पडून उद्या चमकावे अथवा आणखी एक दिवस लपून काढावा ह्याचा तो डोकावून अंदाज घेत होता. आणि आणखी उंच, चकाकत्या नदीच्या खोऱ्यावर एक इंद्रधनुष्य ओठंगले होते— रंगीत फितींची प्रचंड कमान. नदीकाठच्या झुडुपांमधून ती उगवली होती आणि मग प्रचंड अर्धवर्तुळ टाकून दुसरे टोक तीन किलोमीटर दूर असलेल्या एखाद्या खेड्या-च्या बागांना चिकटविले होते.”

ओल्गा मावशी माझ्या खोलीत डोकावली आणि पुन्हा मी कागदां-च्या चळतीसमोर बसलेला तिला आढळलो तेव्हा किंचित आवाज चढवून आज्ञेच्या सुरात ती म्हणाली :

"पुरे झालं खरडणं ! जा बाहेर बागेत, जरा वाफा सारखा करायला मदत कर." कोठीच्या खोलीतून भोजाच्या सालीचा एक खोका ओल्गा मावशी घेऊन आली. दाताळ्याने ओलसर माती सारखी करीत माझ्या पाठीला मी सुखदायी व्यायाम देत होतो तोवर घराशेजारच्या बाकड्यावर बसून तिने फुलांच्या बियांची वेगवेगळी पुडकी निवडून मांडून ठेवली.

"ओल्गा पेत्रोवना, काय हे," मी म्हणालो, "तुम्ही वाफ्यात पॉपीची फुलं लावत नाही ?"

"पॉपी ही काय फुलं आहेत ?" ठामपणे ती म्हणाली. "पॉपी म्हणजे भाजी. परसातल्या वाफ्यात कांद्याबरोबर आणि काकड्यांबरोबर पॉपी लावतात."

"कमाल आहे तुमची !" खो खो हसत मी म्हणालो. "एक जुनं गाणं माहीत आहे :

तिचं कपाळ जणू शुभ्र संगमरवर,
तिचे गाल पेटलेत जणू पॉपीचे फूल."

"ह्या फुलाचं आयुष्य अवघं दोन दिवसांचं," ओल्गा पेत्रोवना हट्टाने म्हणाली. "बागेत त्यांचा काही उपयोग नाही. फुलतं आणि ताबडतोब कोमेजतं. मग सबंध उन्हाळाभर ह्या जागा रिकाम्या राहतात, वाफ्याची शोभा घालवतात."

तरीही मी गुपचूप वाफ्याच्या ऐन मध्यभागी पॉपीच्या बिया शिंपडल्या. काही दिवसांनंतर हिरवे कोंब उगवले.

"तू पॉपी पेरलीस?" ओल्गा मावशीने माझी उलट तपासणी घेतली. "अगदी डांबरट मुलगा आहेस तू! तुझी दया आली म्हणून तीन फुलं ठेवलीत. बाकीची तोडून टाकली."

अनपेक्षितपणे काही कामासाठी मी बाहेरगावी गेलो आणि दोन आठवड्यांनंतर परतलो. तापलेल्या, शिणवणाऱ्या प्रवासानंतर ओल्गा मावशीच्या शांत जुन्या घरकुलात प्रवेश करायला विलक्षण आनंद वाटत होता. नुकत्याच धुतलेल्या फरशीमुळे गारवा पसरला होता. खिडकीबाहेरील जाईच्या वेलीने माझ्या मेजावर नक्षीदार सावली पाडली होती.

"क्वास * देऊ?" माझ्या घामेजलेल्या आणि शिणलेल्या अवतारावर सहानुभूतीने नजर टाकीत ओल्गा मावशीने विचारले. "आल्योशाला क्वास खूप आवडायचं. स्वत: बाटल्या भरून ठेवायचा."

जेव्हा ही खोली मी भाड्याने घेतली होती तेव्हा मेजावर टांगलेल्या वैमानिकाच्या वेषातील तरुणाच्या फोटोकडे पाहून ओल्गा पेत्रोवनाने मला विचारले होते:

"ह्याची अडचण होत नाही ना?"

"मुळीच नाही!"

"हा माझा मुलगा अलेक्सेय. ही खोली त्याचीच. तू आरामात रहा, तुला हवे तेवढे दिवस."

जडशीळ तांब्याच्या प्याल्यात मला क्वास देत ओल्गा मावशी म्हणाली:

"तुझ्या पॉपी एव्हाना तरारल्यात. त्यांना कळ्या फुटल्यात."

फुले पहायला मी बाहेर गेलो. वाफा आता ओळखू येत नव्हता. कडेशी दाट गालीचा पसरला होता. त्यांच्या शेजारी रातराणीचा पट्टा होता. रंगापेक्षा वासात ह्या फुलांचे आकर्षण सामावले होते. पिवळ्या आणि जांभळ्या फुलांचे गुच्छ तेथे होते. पॅरीसच्या सुंदरींच्या जांभळट मखमाली टोप्या सडपातळ देठांवर डुलत होत्या. मी खूप फुले तेथे पा-

---

*क्वास – रायचा पाव आंबवून बनविलेले एक रशियन थंड पेय – अनु.

हिली – काही परिचित, काही नवी. वाफ्याच्या ऐन मध्यभागी, विविधरंगी फुलांच्या वरती, माझ्या पॉपींच्या तीन ताठ कळ्या सूर्याकडे झेपावत होत्या.

दुसऱ्या दिवशी त्या उमलल्या.

ओल्गा मावशी पाणी घालायला बागेत गेली आणि दुसऱ्याच क्षणी रिकामी झारी खडखडवत घरात परतली.

"लौकर बाहेर जा, फुलं उमलताहेत."

दूर अंतरावरून पॉपीची फुले जिवंत ज्वालांच्या मशाली भासत होती. अर्धपारदर्शी तांबड्या पाकळ्यांमधून सूर्याची किरणे घुसली होती. वाऱ्याच्या झुळुकीबरोबर डोलताना पॉपींचा रंग क्षणात पेटल्या आगीसारखा दिसायचा, तर क्षणात गडद किरमिजी बनायचा. त्यांना स्पर्श केला तर बोटे भाजतील असे वाटत होते.

खोडकर, जळत्या तेजाने पॉपी तुम्हाला दिपवून टाकतात. पॅरीसच्या सुंदरी आणि इतर फुले त्यांच्यासमोर फिकी पडतात.

दोन दिवस पॉपी झळझळत होती. दुसऱ्या दिवसाच्या अखेरी अचानक त्यांच्या पाकळ्या गळून पडल्या. ज्वाला विझली. बहरलेला वाफा एकदम रिता दिसू लागला. दवाने माखलेली, अजून ताजी असलेली एक पाकळी मी जमिनीवरून उचलली आणि माझ्या तळहातावर तिला सरळ केली.

"संपलं," मी मोठ्यांदा म्हणालो. माझ्या आवाजात खेद होता.

"होय, जळली..." जणू जिवंत व्यक्ती गेली अशा स्वरात उसासा टाकत ओल्गा मावशी म्हणाली. "पूर्वी कसं काय ह्या पॉपींकडं माझं लक्ष गेलं नाही? पॉपीचं आयुष्य खूप लहान आहे. पण किती संपूर्ण आणि तेजस्वी! काही माणसांचं तसंच असतं..."

अचानक ओल्गा मावशीच्या चेहऱ्यावर म्हातारकळा पसरली. ती लगबगीने घरात निघून गेली.

शेजाऱ्यांनी त्यापूर्वीच मला तिच्या मुलाबद्दल सांगितले होते. अलेक्सेयने स्वतःच्या छोट्या लढाऊ विमानाने भल्या मोठ्या नाझी बॉंबफेक्या विमानावर धडक मारली होती.

आता मी गावाच्या दुसऱ्या टोकाला राहतो आणि कधीमधी ओल्गा

मावशीला भेटायला जातो. नुकताच मी तिच्याकडे जाऊन आलो. आम्ही बाहेर टेबलापाशी चहा पीत गप्पा मारल्या. शेजारी फुलांच्या वाफ्यात पॉपींची शेकोटी पेटली होती. काहींच्या पाकळ्या ठिणग्यांप्रमाणे जमिनीवर सांडल्या होत्या, काही नुकतीच ज्वालेसारख्या जिभा उलगडत होती. खालून ओल्या रसरशीत मातीतून नवनव्या ताठ कळ्या उमटत होत्या, जिवंत ज्वाला सतत पेटती ठेवण्यासाठी!

१९६५

कॉन्स्तन्तिन पाऊस्तोवस्की

रशियाच्या गाभ्यात

कॉन्स्तन्तिन पाऊस्तोवस्की (१८९२-१९६८). कॉन्स्तन्तिन पाऊस्तोवस्की यांच्या पहिल्या कथा १९१२ मध्ये प्रसिद्ध झाल्या. पहिल्या महायुद्धाच्या आणि यादवी युद्धाच्या अनुभवाने समृद्ध बनल्यानंतर, देशभर प्रदीर्घ भ्रमण केल्यानंतर व वेगवेगळे उद्योग हाताळल्यानंतर, पाऊस्तोवस्की लेखनाकडे परतले. लेखन हे स्वतःचे जीवितकार्य असल्याची त्यांना जाणीव झाली: 'कारा बुगाझ' (१९३२), 'कोल्चीस' (१९३४), 'उत्तरेची कथा' (१९३८), 'जीवनकथा' (१९४५-६३), 'सोनेरी गुलाब' (१९५५) ह्या त्यांच्या कथा जीवनाबद्दलच्या काव्यात्म दृष्टिकोनाने भारलेल्या आहेत.

गालीना त्रोफीमोवा ह्या टीकाकार म्हणतात: "सामान्य रशियन माणसांचे पाऊस्तोवस्कींचे ज्ञान; त्यांची समृद्ध भाषा व मायभूमीबद्दलचे त्यांचे अगाध प्रेम, ह्यामुळे जीवनाच्या सर्व स्तरातील वाचकांना त्यांनी जिंकले. मध्य रशियातील ग्रामीण भागाबद्दलची आणि तेथील लोकांबद्दलची रेखाचित्रमालिका 'मेश्चोरा देश' (१९३९), हिला त्यामुळे ताकद व जोम लाभला. १९३० नंतर त्यांनी लिहिलेल्या काव्यात्म कथांचे व रेखाचित्रांचे यश त्यातच सामावले आहे."

कधी ना कधी प्रत्येक लेखकाला इच्छा होत असते की, साहित्याच्या क्रमिक पुस्तकांमधून मांडलेल्या "पोलादी" अथवा "सुवर्ण" नियमांना झुगारून कथा लिहावी.

अर्थात हे नियम उत्कृष्ट आहेत. लेखकाच्या अस्पष्ट कल्पनांना नेमक्या विचाराच्या प्रवाहात ते मार्गी लावतात आणि नदी जशी स्वतःचे पाणी पसरट मुखापर्यंत नेते, त्याप्रमाणे त्या कल्पनांना अंतिम निष्कर्षापर्यंत नेऊन पुस्तक पूर्ण करतात.

साहित्याचे नियमन करणाऱ्या सर्वच नियमांचा अद्याप तक्ता बनलेला नाही. विचार व्यक्त करणाऱ्या अनेक प्रभावी मार्गांना व साधनांना अजून सूत्रबद्ध केलेले नाही.

सुमारे वीस वर्षांपूर्वी पाऊस ह्या विषयावर एक प्रागोगिक चित्रपट मॉस्कोत दाखविण्यात आला होता. केवळ चित्रपट व्यवसायाशी निगडित असलेल्या लोकांनाच तो दाखविण्यात आला होता, कारण सामान्य प्रेक्षक त्या चित्रपटाला कंटाळतील आणि काहीही न समजलेल्या मनःस्थितीत चित्रगृहातून बाहेर पडतील असे वाटले होते.

पावसाची सर्व रूपे त्या चित्रपटात दाखविली होती. शहरातील काळ्या अस्फाल्टवरील पाऊस, पानांवरील पाऊस, दिवसाचा आणि रात्रीचा पाऊस, धो धो कोसळणारा आणि झिम झिम पडणारा पाऊस, सूर्याखालचा "आंधळा" पाऊस, नदीवरचा आणि समुद्रावरचा पाऊस, डबक्यांमधील बुडबुडे, मैदानातून धावणाऱ्या ओल्या आगगाड्या, वेगवेगळ्या मेघांच्या झुंडी...

सगळी यादी देणे मला शक्य नाही, पण तो चित्रपट दीर्घ काळपर्यंत

माझ्या स्मरणात राहिला आणि सामान्य पावसातील काव्याची मला पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणीव झाली. पाऊस पडल्यानंतर येणारा मातीचा गंध अनेकांप्रमाणे मलाही यायचा, पण पावसाचा आवाज मी लक्षपूर्वक कधी ऐकला नव्हता किंवा पावसाळी हवेचा फिका, पांढुरका रंग पाहिला नव्हता.

लेखकाच्या दृष्टीने याहून अधिक चांगले काय—आणि प्रत्येक लेखक नेहमी कवी असलाच पाहिजे—जेव्हा त्याच्या शेजारीच काव्याची नवी दालने खुली होतात व त्याच्या आकलनाला, सामंजस्याला आणि स्मरणाला जास्त समृद्ध बनवतात?

ह्या कथेच्या विषयाने माझ्यावर लादलेल्या कडक अपेक्षांपासून पळवाट काढताना केवळ माझ्या समर्थनार्थ मी हे सारे लिहितोय.

ही कथा सुरू होते ती सकाळ ढगाळ, पण उबदार होती. विस्तीर्ण कुरणे रात्रीच्या पावसामुळे ओलीचिप्प बनली होती, प्रत्येक फुलाच्या पाकळीवर पाण्याचा थेंब चमकत होता आणि अनेक वनस्पतींमधून व झुडुपांमधून ताजा उग्र गंध दरवळत होता.

कुरणांवरून चालत एका छोट्या गूढ सरोवरापाशी मी गेलो. वस्तुतः त्या सरोवरात गूढ असे काहीही नव्हते, पण लोकांमध्ये त्याच्याबाबत नेहमी एक गूढ भावना वसायची. ह्याचे नेमके कारण खूप प्रयत्नांतीसुद्धा मी शोधू शकलो नव्हतो.

माझ्या दृष्टीने ती गूढता सामावली होती स्फटिकासारख्या नितळ, पण त्याचवेळी हिरवट झाक देणाऱ्या ओल्या डांबरासारख्या रंगाच्या सरोवराच्या पाण्यात. जुन्या बडबड्या म्हाताऱ्या माणसांच्या कथनांनुसार, ह्या काळोख्या पाण्यात "समोवारच्या तबका"च्या आकाराएवढे कार्प मासे रहात होते. त्यांना धरण्यात आजपर्यंत कुणालाही यश आले नव्हते, पण कधी कधी सरोवराच्या खोल पाण्यातून ब्राँझच्या रंगाची शेपटी क्षणभरच चमकून नाहीशी व्हायची.

अज्ञात आणि असामान्य अशा एखाद्या गोष्टीची अपेक्षा करताना गूढतेची जाणीव निर्माण होत असते. आणि खरोखरीच, छोट्या सरोवराभोवतालच्या वनस्पतींच्या उंचीमुळे व घनदाटतेमुळे तेथे काहीतरी असाधारण लपले आहे असा विचार मनात यायचा: लाल पंखांचा पतंग,

अथवा पांढऱ्या ठिपक्यांचा निळसर कुंकवाचा किडा, किंवा माणसाच्या दंडाएवढ्या जाडीच्या रसदार देठाचे विषारी फूल.

ह्या सर्व गोष्टी खरेच तेथे होत्या, तलवारीसारख्या पानांच्या पिवळ्या प्रचंड आइरीस वनस्पतींसकट. त्यांचे पाण्यात प्रतिबिंब पडायचे आणि का कोण जाणे, पण चुंबकाभोवती टाचण्या आकर्षित होतात त्याप्रमाणे त्या प्रतिबिंबाभोवती चंदेरी रंगाच्या छोट्या मासोळ्यांचा कळप नेहमी घोटाळत रहायचा.

कुरणे पूर्ण मोकळी होती. गवतकापणीला अजून दोन आठवड्यांचा अवधी होता. दूरवर एक छोटा मुलगा मला दिसला. तोफखान्यातील सैनिकाची जुनी, विटकी टोपी त्याने डोक्यावर घातली होती व अर्थातच ती त्याला खूप मोठी होत होती. एका उदी रंगाच्या घोड्याला त्याने लगामाशी धरले होते आणि तो ओरडत होता. घोडा मानेला हिसके देत होता व घोडमाशीला झटकावे त्याप्रमाणे आपल्या खरबरीत शेपटीने त्या मुलाला दूर झटकण्याचा प्रयत्न करीत होता.

"ए का-का ऽऽ!" मुलगा ओरडत होता. "ए काका ऽऽ! इकडं ये!"

ती मदतीची हाक होती. मी रस्त्यावरून वळलो आणि मुलाकडे गेलो.

"काका," आर्जवी नजरेने माझ्याकडे धीटपणे पहात तो म्हणाला. "मला घोड्यावर बसव, मला स्वतःला जमत नाही."

"तू कुणाचा?" मी विचारले.

"केमिस्टाचा," मुलगा उत्तरला.

आमच्या खेड्यातील केमिस्ट द्मित्री सेर्गेयेविच ह्याला मुले नव्हती हे मला ठाऊक होते आणि मुलाच्या उत्तरामुळे मी काहीसा चकित झालो.

मी मुलाला उचलले, पण त्याच क्षणी घोडा बिथरला व थयथया टापा नाचवत माझ्यापासून दूर सरकू लागला.

"अरे दुष्टा!" मुलगा रागाने उद्गारला. "अगदी वेडपट आहे! पहिल्यांदा त्याचा लगाम माझ्या हातात द्या आणि मग मला त्याच्या पाठीवर बसवा. एरवी तो ऐकणार नाही."

मुलाने लगाम धरताच घोडा तात्काळ शांत झाला, जणू गाढ झोपला. मुलाला उचलून मी घोड्याच्या पाठीवर बसविले, पण घोडा मान खाली घालून स्वस्थ उभा राहिला. जणू संपूर्ण दिवस तेथेच उभे राहण्याचा त्याचा इरादा होता. तो किंचित फुरफुरलासुद्धा. मग त्याच्या फुगीर, धुळकट फऱ्यावर मुलाने अनवाणी टाचांनी जोरात लाथ हाणली. घोड्याने चकित होऊन उचकी दिली आणि बीव्हर ओढ्यापलिकडील वाळूच्या टेकाडांच्या दिशेने तो मंदपणे धावू लागला.

मुलगा खाली-वर होत होता, हातांचे कोपरे हलवत होता, घोड्या-च्या फऱ्यांमध्ये टाचा ढोसत होता. घोडा पळता ठेवण्यासाठी एवढे कष्ट आवश्यक होते ह्याची मला जाणीव झाली.

उंच किनाऱ्यांनी वेढलेल्या सरोवरात गाळाची हिरवी सावली पडली होतीं आणि ह्या सावलीत चंदेरी रंगाचे पिवळ्या फुलांचे झाड रुपेरी दंवासकट चमकत होते.

झाडाच्या फांदीवर लाल जाकीटाचा, पिवळा टाय घातलेला एक छोटा राखी पक्षी बसला होता आणि चोच न उघडता मधुर आवाज काढत होता. त्या पक्ष्याचे व त्याच्या मजेदार उद्योगाचे कौतुक करीत मी थोडा वेळ उभा राहिलो आणि नंतर पाण्याकडे निघालो.

माशा* नावाची एक शहरनिवासी मुलगी मॉस्कोतील शाळेची परीक्षा देऊन आमच्याकडे पाहुणी म्हणून आली होती आणि सुंदर सुंदर फुलांचा एक छानदार गुच्छ तिला भेट म्हणून देण्याचा माझा इरादा होता. पण वाईट फुले मुळी अस्तित्वातच नसल्यामुळे माझ्यापुढे फार अवघड पेच पडला होता – कोणती फुले निवडायची? शेवटी मी निर्णय केला की, सरोवराभोवताली दाटी करणाऱ्या मधुर वासाच्या, दंवाच्छादित वनस्पतींमधून प्रत्येक झाडाचे एक फूल व एक डहाळी घ्यायची.

मी सभोवार पाहिले. किनाऱ्याभोवती नाजुक, पिवळसर फुलांचे झुपके एव्हाना फुलले होते. लाजाळूच्या फुलांसारखा त्यांचा वास होता. जोरदार वारा सुटलेला असताना त्यांना घरापर्यंत सुखरूप घेऊन जाणे

* मारीया नावाचे लाडके रूप – अनु.

जवळजवळ अशक्य होते, पण तरीही मी फांदी तोडली आणि फुले पटकन कोमेजू नयेत म्हणून झुडुपाखाली फांदी ठेवली.

मग तीव्र, तिखट गंधाची तलवारीसारखी दिसणारी काही पाने मी तोडली. मला आठवले की, युक्रेनमध्ये मोठ्या सणापूर्वी ही पाने बायका फरशीवर पसरतात आणि त्यांचा तिखट-कडवट गंध त्यांच्या घरांमध्ये थेट हिवाळ्यापर्यंत दरवळत राहतो.

बाणाच्या टोकासारख्या पानांवर पहिली फळे एव्हाना लटकलीत — सगळ्या बाजूंनी मऊ सुयांनी मढलेले हिरवे शंकू. मी इथेही एक फांदी तोडली.

वाळक्या काटकीच्या मदतीने पाण्यातील पांढऱ्या फुलांची वनस्पती मोठ्या कष्टाने मी ओढून काढली. तांबूस केंद्रांच्या त्या पांढऱ्या फुलांच्या पाकळ्या सिगारेटच्या कागदासारख्या पातळ होत्या व त्या तात्काळ कोमेजल्यामुळे फुले फेकून देणे मला भाग पडले. त्याच काटकीचा वापर करून पाण्यात फुलणारी बकवीट वनस्पती मी तोडली. तिच्या गुलाबी फांद्यांचे झुबके पाण्यावर गोलाकार पसरले होते.

पांढऱ्या लिलीच्या फुलांपर्यंत पोहोचणे मला शक्य झाले नाही व कपडे काढून पाण्यातून चालण्याचा माझा इरादा नव्हता, कारण सरोवराच्या गाळात गुडघ्यांपर्यंत पाय रुतले असते. त्याऐवजी सुसाक असे विचित्र नाव असलेले किनाऱ्यावरील फूल घेण्याचे मी ठरविले. वाऱ्याने आतून फुगविलेल्या छोट्या छत्र्यांच्या आकाराची ही फुले असतात.

पाण्याजवळच्या सुवासिक पानांच्या वनस्पतींच्या दाटीतून भाबड्या निळ्या डोळ्यांच्या नीलपुष्पींचे घोस डोकावत होते. आणखी पुढे, काटेरी झुडुपांच्या लोंबत्या वेटोळ्यामागे, पिवळ्याजर्द फुलांच्या झुपक्यांचे डोंगरी ॲशचे कोवळे झाड उतारावर उभे होते. उंच तांबड्या क्लोवरमध्ये गायचारा व इतर वनस्पती मिसळल्या होत्या आणि फुलांच्या ह्या सुरेख मेळाव्यात प्रचंड काटेरी रोप उभे होते. कमरेपर्यंत उंच गवतात उभे असलेले हे रोप हातांच्या कोपरांवर व गुडघ्यांवर काटेरी आवरणे घातलेल्या चिलखती सरदाराप्रमाणे भासत होते.

उबदार हवा फुलांवर थरथरत आणि हेलकावत होती. बहुतेक सर्व फुलांच्या पाकळ्यांमध्ये गांधील माशीचे अगर मधमाशीचे पट्टेदार पोट

दिसत होते. तिरप्या कोसळणाऱ्या पांढऱ्या व लिंबोणी रंगाच्या पानां-प्रमाणे फुलपाखरे सर्वत्र फडफडत होती.

आणखी पुढे हॉथार्न काटेरी झुडुपांची व रानगुलाबांची दाट भिंत उभी होती. त्यांनी एकमेकांना एवढे घट्ट विळखे घातले होते, की रानगुलाबाची तांबडीभडक फुले व हॉथार्नची बदामासारख्या वासाची पांढरी फुले एकाच झुडुपावर फुलत होती असा चमत्कार भासत होता.

रानगुलाब ताठ्यात उभा होता, ऐटदार पोषाखात होता आणि त्याच्या सर्वांगावर टोकदार कळ्या पसरल्या होत्या. त्याचा फुलवा सर्वांत लहान रात्रींच्या वेळी आला होता – आमच्या रशियन, थोड्याशा उत्तरे-कडील रात्री ; जेव्हा सगळी रात्रभर दवामध्ये बुलबुल पक्षी गात असतात क्षितीजावरची हिरवट आभा कधीच नाहीशी होत नाही आणि ऐन रात्री-च्या प्रहरीसुद्धा एवढा उजेड असतो की, आकाशातील ढगांचे कंगोरे स्पष्ट पाहता येतात. त्यांच्या हिमासारख्या सुळक्यांवर अधूनमधून सूर्या-च्या गुलाबी किरणांचे ठिपके चमकतात. आणि रात्रीच्या वेळी खूप उंची-वरून उडत जाणारे रुपेरी विमान एखाद्या सावकाश जाणाऱ्या ताऱ्यासा-रखे चमकते, कारण त्या उंचीवर सूर्य एव्हाना तळपत असतो.

रानगुलाबांच्या ओरखाड्यांनी आणि खाजकुयलीच्या खरचटांनी नखशिखांत माखलेल्या अवस्थेत जेव्हा मी घरी आलो, तेव्हा फाटकावर एक कागद माशा अडकवत होती. त्या कागदावर छापील अक्षरे होती :

रस्त्यावर धूळ खूप,
वाटेवर घाण खूप,
यायचे असेल घरात,
तर आधी पाय पूस.

"आहा!" मी म्हणालो. "म्हणजे तू केमिस्टच्या दुकानात गेली होतीस आणि असाच मजकूर तिथंही पाहिलास ना?"

"अय्या, किती सुंदर फुलं!" माशा उद्गारली. "फारच सुरेख! होय, मी केमिस्टच्या दुकानात गेले होते. आणखी तिथं एका विलक्षण छान माणसाशी माझी भेट झाली. त्याचं नाव इवान स्तेपानोविच क्रीश्कीन."

"कोण आहे हा?"

"लहान मुलगा. फारच वेगळा."

मी फक्त हसलो. खेड्यातील सगळ्या मुलांची मला इत्थंभूत माहिती होती. अनेक वर्षांच्या अनुभवानंतर मी ठामपणे सांगू शकतो की, आमच्या ह्या गोंगाटी, अस्वस्थ देशबांधवांमध्ये एक खरोखरीच असाधारण वैशिष्ट्य आहे. भौतिकशास्त्रज्ञ ह्या वैशिष्टयाला "सर्वभेद्‌ता" म्हणेल. ही मुले "सर्वभेदक" आहेत, अथवा प्राचीन अवजड भाषेत बोलायचे तर "सर्वसाक्षी" आहेत.

जंगलाच्या, सरोवराच्या अथवा दलदलीच्या अत्यंत निर्जन भागात ही मुले बहुविध आणि काहीवेळा अत्यंत धक्कादायक उद्योगांमध्ये गुंतलेली मला नेहमी आढळत.

अर्थात मी त्या वेळेचा उल्लेख करीत नाही, जेव्हा सप्टेंबरातील कडाक्याच्या गारठ्याच्या धुकेभरल्या सकाळी, सर्वांत जवळच्या घरापासून वीस किलोमीटर दूर अंतरावरच्या सरोवराकाठी, ओल्या आल्डरांच्या दाटीत थंडीत कुडकुडताना ती मला दिसली होती.

घरगुती बनावटीचे मासे धरण्याचे गळ घेऊन ही मुले झुडुपांआड बसली होती व केवळ त्यांच्या नाकांचा सुरसुरण्याचा परिचित आवाज त्यांचे तेथील अस्तित्व प्रकट करीत होता. काहीवेळा ती इतकी छान लपलेली असत, की मला मुळीच दिसत नसत आणि माझ्यापाठी अचानक घोगरा, विनंतीवजा दबता आवाज ऐकताच मी दचकायचा:

"काका, एक गांडूळ दे!"

साहसकथांचे लेखक ज्या प्रदेशांचे वर्णन "जिथं माणसाचा पाय क्वचित पडत होता" असे आवडीने करीत, त्या प्रदेशांकडे ह्या मुलांना त्यांची अक्षय कल्पनाशक्ती व कुतूहल आकर्षित करीत.

माझी खात्री आहे की, जर मी उत्तर ध्रुवावर अथवा चुंबकीय ध्रुवावर गेलो, तर तिथेसुद्धा एखादा मुलगा बर्फातील भोकापाशी नाक सुरसुरत गळ टाकून बसलेला मला आढळेल किंवा मोडक्या चाकूने चुंबकाचा तुकडा जमिनीतून खणून काढताना सापडेल.

त्या मुलांच्या केवळ ह्याच एका वेगळ्या गुणाशी माझी ओळख होती, म्हणून मी माशाला विचारले:

"तुझ्या इवान स्तेपानोविच क्रीश्कीनमध्ये असं कोणतं वेगळेपण आहे?"

"तो आठ वर्षांचा आहे," माशा उत्तरली. "पण केमिस्टसाठी तो वेगवेगळ्या प्रकारच्या औषधी वनस्पती गोळा करून आणतो. उदाहरणार्थ, वालेरियान."

तिने केलेल्या बाकीच्या वर्णनावरून माझ्या ध्यानात आले की, ज्या मुलाला म्हाताऱ्या घोड्यावर बसायला मी मदत केली होती, त्याचे इवान स्तेपानोविच क्रीश्कीनशी खूपच साम्य होते. ह्याबाबतच्या उरल्यासुरल्या शंकाही नाहीशा झाल्या, जेव्हा मी ऐकले की हा क्रीश्कीन केमिस्टच्या दुकानापाशी उदी घोड्यावर बसून आला होता व कुंपणाशी त्या घोड्याला त्याने बांधताच तो घोडा तात्काळ गाढ झोपी गेला होता. इवान स्तेपानोविच क्रीश्कीन केमिस्टच्या दुकानात गेला होता व बीव्हर ओढ्यापलिकडे वेचलेले पोतेभर वालेरियानचे गवत त्याने केमिस्टच्या हवाली केले होते.

फक्त एक मुद्दा उलगडला नव्हता – ह्या इवान स्तेपानोविच क्रीश्कीनने घोड्यावरून न उतरता वालेरियान कसे काय तोडले होते? पण इवान स्तेपानोविच घोड्याला लगामाशी धरून आला होता असे जेव्हा मला कळले, तेव्हा मी तर्क केला की, वालेरियानपर्यंत तो घोड्यावरून गेला होता आणि परतताना पायी आला होता.

आता माझ्या कथेच्या मूळ विषयाकडे वळण्याची खरोखरीच वेळ झाली आहे, कशाबद्दल सांगायची माझी इच्छा होती तिकडे वळायची वेळ झाली आहे – केमिस्ट द्मित्री सेर्गेयेविचबद्दल आणि केवळ त्याच्याबद्दलच नव्हे, तर स्वतःच्या कामाबद्दलच्या व्यक्तीच्या दृष्टिकोनाबद्दल सांगण्याचे खूप दिवसांपासून माझ्या मनात घोळत आहे.

द्मित्री सेर्गेयेविच पूर्णपणे फार्मसीला वाहिलेला होता. त्याच्याशी बोलल्यानंतर माझी खात्री पटली होती की, काही व्यवसाय नीरस असतात हा प्रचलित समज केवळ अज्ञानामधून जन्मलेला दूषित पूर्वग्रह होता. त्यानंतर खेड्यातील केमिस्ट दुकानामधील प्रत्येक गोष्टीत मला आनंद गवसू लागला: नुकत्याच घासून धुतलेल्या लाकडी फळ्यांच्या आणि औषधी तेलाच्या वासांपासून ते बर्झोम खनिज पाण्याच्या धुकट

बाटल्या आणि "वेनेना" – विष – असे लिहिलेल्या फडताळांवरील पांढऱ्या बरण्यांपर्यंत !

द्मित्री सेर्गेयेविचच्या मते प्रत्येक वनस्पतीमध्ये औषधी अथवा विषारी रस अस्तित्वात असतात. त्या रसांना पिळून काढणे, त्यांचे गुणधर्म ठरविणे आणि त्यांचा माणसाच्या हितासाठी वापर करणे, हे मुख्य कार्य आहे.

अर्थात, बऱ्याच गोष्टींचे शोध फार पूर्वीच लागले आहेत. उदाहरणार्थ, हृदयावर उपचार करण्यासाठी लिलीज ऑफ द व्हॅली किंवा फॉक्सग्लोव्ह सारख्या फुलांच्या अर्कांचा वापर. पण अद्याप न अभ्यासलेल्या अशा हजारो वनस्पती होत्या आणि हा जगातील सर्वांत लक्षवेधी उद्योग होता असे द्मित्री सेर्गेयेविचला वाटत होते.

पाईनच्या कोवळ्या सुयांमधून जीवनसत्त्वे पिळून काढण्याचा उद्योग त्या उन्हाळ्यात त्याने हाती घेतला होता. त्यांच्यापासून बनविलेले तोंड जाळणारे हिरवे मिश्रण त्याने आम्हाला प्यायला लावले होते आणि जरी आम्ही तोंडे वेडीवाकडी करीत होतो व पिण्यास नकार देत होतो, तरी आम्हा सर्वांना कबूल करावे लागले होते की, ते मिश्रण फार प्रभावी गुणकारी होते.

एकदा द्मित्री सेर्गेयेविचने एक जाडजूड पुस्तक वाचण्यासाठी माझ्यापाशी आणून दिले – फार्माकोपीया. त्याचे नेमके नाव मला आठवत नाही. एखाद्या चटकदार कादंबरीप्रमाणे हे पुस्तक रंजक होते. अनेक वनस्पतींच्या गुणधर्मांचे त्यात वर्णन होते – केवळ मुळ्या आणि झाडेच नव्हेत, तर शेवाळे, दगडफुले आणि भुईफोड्यासुद्धा. काही वर्णने तर आश्चर्यकारक व अनपेक्षित होती. ह्या वनस्पतींपासून औषधे कशी बनवायची, त्याबद्दलच्या तपशीलवार सूचनाही होत्या.

द्मित्री सेर्गेयेविच दर आठवड्याला 'झ्नाम्या त्रूदा' नावाच्या स्थानिक वर्तमानपत्रात वनस्पतींच्या औषधी गुणधर्मांबद्दल एक छोटा लेख लिहायचा – एखाद्या सामान्य झाडाबद्दल अथवा भुईफोडीबद्दल. ह्या लेखांना ते का कोण जाणे, पण निबंध म्हणत आणि 'मित्रांच्या जगात' ह्या मथळ्याखाली ते प्रसिद्ध होत.

काही झोपड्यांवर ह्या लेखांची कात्रणे चिकटवलेली मला दिसत

आणि विशिष्ट घरातील माणूस कोणत्या रोगाने आजारी आहे ह्याबद्दल तर्काने जाणता येई.

केमिस्टच्या दुकानात नेहमी छोट्या पोरांचा घोळका असायचा. द्मित्री सेर्गेयेविचला औषधी मुळ्यांचा पुरवठा मुख्यत: ह्या पोरांकडून व्हायचा. ही पोरे मन:पूर्वक श्रम करीत, दूरदूरच्या प्रदेशांपर्यंत पायपीट करीत—ख्वोश्चो नावाच्या दलदलीपर्यंत किंवा त्यापलिकडे काझोन्नाया ओढ्यापर्यंत. तेथे क्वचितच कुणी जात असे आणि जे कुणी तेथून परतत, ते गाळाने भरलेल्या उथळ सरोवरांनी व चुक्याच्या उंच झुडुपांनी आच्छादलेल्या पडित जमिनीच्या कथा सांगत.

औषधी गोळा करण्याच्या बदल्यात मुले फक्त लहान बाळांची रबरी चोखणी घेत. ही चोखणी तोंडात घालून ती फुगवत, त्यांचे चेहरे ताणामुळे लालबुंद बनत, मग त्यांना फीत बांधून त्यांचे "उडते बुडबुडयां" सारखे फुगे बनवीत. अर्थात हे बुडबुडे उडत नसत, पण मुले सदैव त्यांना स्वत:पाशी बाळगत: काही वेळा दोरीच्या तुकड्यांनी हातांच्या बोटांना बांधून त्यांचा भयानक आवाज करत, अथवा एकमेकांच्या डोक्यांवर त्यांना आपटत आणि होणाऱ्या मजेदार आवाजाचा आनंद लुटत.

दिवसाचा बराच वेळ मुले असा टिवल्याबावल्या करण्यातच घालवत असे म्हणणे योग्य होणार नाही. फक्त उन्हाळी सुटीत आणि तेसुद्धा दररोज नव्हे, त्यांना बागडायला मोकळा वेळ सापडायचा. मोठ्यांना मदत करण्यातच त्यांचा बहुतेक वेळ खर्च व्हायचा: वासरांना चरायला नेणे, काटक्या गोळा करणे, वाळुंजी तोडणे, बटाटे काढणे, कुंपणे दुरुस्त करणे आणि मोठ्या माणसांच्या अनुपस्थितीत लहान भावंडांचा सांभाळ करणे. सर्वात वाईट म्हणजे लहान बाळांना चालायला जमत नसे आणि त्यांना सर्वत्र पाठुंगळी घेऊन फिरावे लागे.

खेड्यातील मुलांना दोन माणसे फार आवडायची: द्मित्री सेर्गेयेविच आणि "रद्दीवाला" असे टोपणनाव लाभलेला एक म्हातारा.

"रद्दीवाला" महिन्यातून एकदा किंवा त्याहूनही कमी वेळा खेड्यात अवतरायचा. म्हाताऱ्या घोड्याच्या व दोराचा लगाम वाळूभरल्या जमिनीवर लोळवत नेणाऱ्या जुनाट गाडीच्या जवळून धूळभरला डगला अंगात

घातलेला "रद्दीवाला" मंद पावलांनी रखडत चालायचा व केविलवाण्या आवाजात ओरडायचा :

"जुने कपडे, रबरी बूट, शिंगं आणि खूर घेतो!"

"रद्दीवाल्या"च्या गाडीत पुढील भागात साध्या फळकुटांपासून बनविलेली एक जादूची पेटी होती. तिचे झाकण उघडे लोंबायचे. झाकणावर खिळ्यांना अडकवलेली सुंदर रंगीबेरंगी खेळणी असत — शिटचा, रबरावरचे चेंडू, कचकड्याच्या बाहुल्या, चित्रे आणि कशीदाकामाच्या रंगीत लड्या.

"रद्दीवाला" खेड्यात अवतरताच छोटी मुले व मुली घरांमधून धूम धावत सुटत, खायला धावणाऱ्या कोंबडीच्या छोट्या पिलांप्रमाणे एकमेकांना धक्के देत पुढे घुसत, स्वतःबरोबर धाकट्या भावंडांना फरफटत नेत; जुनी पोती, झिजलेली पादत्राणे, गायीची मोडलेली शिंगे आणि इतर सटरफटर जुन्या वस्तू त्या मुलांच्या हाती असत.

जुन्या कपड्यांच्या आणि शिंगांच्या मोबदल्यात "रद्दीवाला" नवी खेळणी द्यायचा. त्या खेळण्यांवरील रंग अजून ताजा असे. तो खूप वेळपर्यंत त्या मुलांबरोबर बोलायचा आणि काहीवेळा वादही घालायचा.

"रद्दीवाल्या"पाशी मोठी माणसे कधीही कोणतीही वस्तू आणत नसत. तो फक्त लहान मुलांचा हक्क होता.

मुलांशी संपर्क ठेवल्यामुळे माणसात अनेक चांगले गुण निर्माण होतात. झिंज्या वाढलेल्या, गालांवर दाढीचे खुंट वाढलेल्या आणि ऊन-वाऱ्यात कातडी सोलून निघाल्यामुळे जांभळ्या नाकवाल्या "रद्दीवाल्या"चे रूप फार उग्र भयानक दिसायचे. त्याचा आवाज भसाडा होता. पण असे दहशत घालणारे रूप असूनही तो मुलांना कधीही रित्या हातांनी परत पाठवायचा नाही. फक्त एकदाच, विटका लाल साराफान अंगात घातलेल्या एका छोट्या मुलीने आणलेले तिच्या वडिलांचे जुने, पूर्ण फाटके बूट त्याने नाकारले होते.

ती मुलगी जणू आकसली, तिने मान खाली घातली व खूप मार खाल्ल्याप्रमाणे "रद्दीवाल्या"च्या गाडीपासून मंदपणे चालत स्वतःच्या घराकडे गेली. गाडीभोवतालची मुले एकदम गप्प झाली, त्यांच्या कपाळांना आठ्या पडल्या व काहींची नाके सुरसुरू लागली.

रडणाऱ्या मुलीकडे अथवा स्वतःच्या क्रूर वागण्यामुळे थक्क झालेल्या मुलांकडे जणू लक्षच नाही असा आविर्भाव आणून "रद्दीवाला" जाड सिगारेट वळू लागला. कागदाची कडा त्याने जीभ लावून सावकाशपणे ओली केली, सिगारेट पेटवली व तो थुंकला. मुले गप्प राहिली.

"काय झालंय तुम्हाला?" रागावून "रद्दीवाल्या"ने मुलांना विचारले. "कळत नाही तुम्हाला? मी सरकारी काम करतोय. माझ्यापाशी घाणेरडा कचरा आणू नका. उद्योगधंद्याला उपयोगी पडतील अशा वस्तू आणा. समजलं?"

मुले गप्प होती. "रद्दीवाल्या"ने सिगारेटचा मोठा झुरका मारला व मुलांकडे पाहण्याचे टाळत तो म्हणाला:

"तिला घेऊन या इकडं. ताबडतोब! जणू काही मी राक्षस आहे अशा नजरेनं बघताहेत!"

घाबरलेल्या चिमण्यांच्या कळपाप्रमाणे मुलांची झुंड लाल साराफानवाल्या मुलीच्या घराकडे धावली.

मुलांनी तिला ओढून आणले. शरमेने तिचा चेहरा लालबुंद बनला होता, आसवांनी तिचे डोळे डबडबलेले होते. "रद्दीवाल्या"ने बुटांना बारकाईने निरखून पाहिले, मग गाडीत त्यांना भिरकावून दिले आणि गुबगुबीत लाल गालांची, गोल आकाराची, गर्द निळ्या डोळ्यांची, ताणलेल्या गोंडस बोटांची सर्वांत सुंदर रंगीत बाहुली मुलीला दिली.

मुलीने भीत भीत बाहुली घेतली, कृश छातीशी तिला घट्ट धरले व ती हसली. "रद्दीवाल्या"ने लगामाला हिसका दिला, म्हाताऱ्या घोड्याने कान पाडले आणि वाळूच्या रस्त्यावरून करकर आवाज करीत गाडी चालू लागली.

"रद्दीवाला" गाडीशेजारून नेहमीप्रमाणे उग्र चेहऱ्याने, एकही शब्द न बोलता चालू लागला. सुमारे वीस घरे ओलांडल्यानंतर तो खोकला आणि त्याच्या नेहमीच्या हेलात ओरडायला त्याने सुरुवात केली:

"जुने कपडे, शिंगं, खूर, फाटके रबरी बूट घेतो!"

त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहताना माझ्या मनात विचार आला की, रद्दीवाल्याच्या व्यवसायाइतका अप्रिय व्यवसाय ह्या जगात जणू दुसरा नाही, पण ह्या माणसाने शेतकऱ्यांच्या मुलांसाठी आनंद निर्माण करणाऱ्या उद्योगात त्याचे रूपांतर केले होते.

गंमत म्हणजे स्वतःच्या दंगेखोर छोट्या पुरवठादारांशी "रद्दीवाला" काहीशा स्फूर्तीने, कल्पकपणे आणि आस्थेने काम करायचा. खेड्यां-मधील प्रत्येक फेरीवेळी तो वरिष्ठांकडून नवनवी खेळणी मिळविण्याचा प्रयत्न करायचा. "रद्दीवाल्या"जवळची खेळणी विविध व आकर्षक असत.

जी मुले केमिस्टसाठी औषधी वनस्पती गोळा करीत, त्यांना मोबद-ल्याखातर मासे धरण्याचे ब्राँझचे आकडे द्यायला खास द्मित्री सेर्गेये-विचच्या विनंतीनुसार जेव्हा "रद्दीवाला" घेऊन आला, तेव्हा खेड्यातील ती एक फार मोठी घटना ठरली. इवान स्तेपानोविच क्रीश्कीनला त्या-च्या सेवेखातर दहा आकडे मिळाले.

गंभीर शांततेत आकड्यांचे वाटप घडले. जणू काही मूक आज्ञेला प्रतिसाद द्यावा अशा रीतीने मुलांनी त्यांच्या जीर्णशीर्ण टोप्या डोक्यांवरून उतरवल्या व अत्यंत काळजीपूर्वकतेने आणि एकाग्रतेने टोप्यांच्या अस्तरां-मध्ये आकडे अडकवण्यास त्यांनी आरंभ केला. त्यांच्या सर्व खजिन्यांना लपविण्याची ही सर्वांत खात्रीशीर जागा होती.

रशियात आम्हा सर्वांना सवय झाली आहे की, साधा, दिमाख न दाखविणारा माणूस अत्यंत समजूतदार व आगळा असतो. लेखक लेस्कोव ह्यांना ह्या गोष्टीची विशेष जाणीव होती, कारण त्यांना रशि-याची आरपार माहिती होती, रशियावर त्यांचे अतोनात प्रेम होते, मायदेशाचा त्यांनी संपूर्ण प्रवास केला होता व शेकडो सामान्य लोकांचे ते विश्वासू मित्र होते.

द्मित्री सेर्गेयेविच ह्यांचे साधे दिसणे विनोदाने सांगायचे, तर कोणत्याही खास गोष्टीच्या अभावापायी वैशिष्ट्यपूर्ण होते. त्यांच्या क्षेत्रातील अथक संशोधक, स्वतःकडून आणि भोवतालच्या माणसांकडून फार अपेक्षा करणारा मानवतावादी, ह्या साध्या रूपात लपून जायचा.

"रद्दीवाल्या"च्या राकट रूपाखाली उदार आणि प्रेमळ हृदय स्पंदत होते. शिवाय, ह्या कल्पक माणसाने त्याच्या बाह्यतः क्षुल्लक भासणाऱ्या व्यवसायाला एक वेगळाच आकर्षक साज चढविला होता.

ह्याबद्दल विचार करीत असताना, आमच्या ह्या भागात माझ्या

मित्राच्या व माझ्या स्वतःच्या बाबतीत घडलेल्या एका रंजक प्रसंगाची मला आठवण झाली.

स्ताराया कानावा इथे मासे धरायला आम्ही गेलो होतो. तपकिरी रंगाच्या पाण्याचा वेगवान प्रवाह असलेला हा जंगलातील एक अरुंद पात्राचा ओढा आहे. मानवी वस्तीपासून खूप दूर दाट जंगलात हा ओढा लपलाय आणि तिथपर्यंत पोहोचणे एक फार कष्टदायक काम आहे. प्रथम नॅरो-गेज रेल्वेने चाळीस किलोमीटर प्रवास करायचा, मग आणखी तीस किलोमीटर पायी चालायचे.

स्ताराया कानावाच्या पाण्यातील भोवऱ्यांमध्ये खूप मोठ्या आकाराचे मासे होते व त्यांच्यासाठी आम्ही तेथे गेलो होतो.

दुसऱ्या दिवशी आम्ही परतलो. जंगलातील शांत संधिप्रकाशात आम्ही नॅरो-गेज रेल्वेच्या स्टेशनावर पोहोचलो. टर्पेन्टाईन, लाकडाचा भुस्सा आणि लवंगा ह्यांचा उग्र दर्प दरवळत होता. ऑगस्टचा महिना होता व भोजाच्या झाडांवर अधूनमधून पिवळी पाने दिसू लागली होती. मावळत्या सूर्यकिरणांमध्ये ही पाने आळीपाळीने चमकत होती.

अनेक रिकाम्या मालडब्यांना घेऊन छोटी आगगाडी आली. ज्या डब्यात सर्वांत जास्त माणसे होती, त्या डब्यात आम्ही चढलो. फाटक्या कपड्यांमधील, दाढ्या न केलेले दोन शिकारी डब्याच्या दाराशी पाय लोंबकळवत बसून धूम्रपान करत होते.

प्रथम बायका गावगप्पा करत होत्या, पण लौकरच जंगलच्या संध्येची जादू डब्यावर पसरली आणि सुस्कारा टाकून त्या गप्प झाल्या.

आगगाडी उघड्या कुरणात आली व शांत सूर्यास्त सर्व वैभवानिशी झळकू लागला. गवतात, धुक्यात आणि दंवात सूर्य बुडाला. रेलमार्गाजवळच्या झुडुपांमधील पक्ष्यांची किलबिल आगगाडीच्या आवाजामधूनसुद्धा ऐकू येत होती.

तेव्हा सर्वांत तरुण बाई सूर्यास्ताकडे बघत गाणे गाऊ लागली, तिचे डोळे सोनेरी भासत होते. ऱ्याझानचे साधे गाणे ती म्हणत होती आणि बायकांपैकी काहीजणी तिला साथ देऊ लागल्या.

जेव्हा त्यांचे गाणे संपले, तेव्हा सैनिकी मोठ्या कोटापासून बनवलेल्या पट्ट्या पायांना गुंडाळलेला एक शिकारी खालच्या आवाजात

त्याच्या साथीदाराला म्हणाला :

"वान्या, आता आपण गाणं म्हणूया ?"

"ठीक आहे, म्हणू !" साथीदाराने संमती दिली.

फाटक्या कपड्यांमधील दोघे पुरुष गाऊ लागले. त्यांच्यापैकी एकाचा दाट, मऊ खर्ज होता. तो सहजपणे लकेरी मारत होता आणि ह्या आगळ्या आवाजाला थक्कपणे आम्ही ऐकत होतो.

गायक गप्प झाले. बायका त्यांना दुवे देऊ लागल्या, अशा दुर्मीळ सुखाचा लाभ करून दिल्याबद्दल दीर्घायुष्य व सुख चिंतू लागल्या.

नंतर आम्ही गायकापाशी त्याच्याबद्दल चौकशा केल्या. तो उत्तरला की, अकापलिकडील सामुदायिक शेतावरचा तो हिशेबनीस आहे. संगीत विद्यालयातील नामवंत गायकांना व प्राध्यापकांना त्याचे गाणे ऐकायला मिळावे म्हणून त्याने मॉस्कोला यावे, असा आम्ही त्याला आग्रह करू लागलो. पण शिकाऱ्याने नुसते लाजून स्मित केले व निग्रहाने नकार दिला.

"छे: हो !" तो म्हणाला. "माझ्या संस्कार नसलेल्या आवाजात मी काय ऑपेरात गाणार ? शिवाय आता आयुष्याचा सांधा बदलण्याचा धोका पत्करायचं माझं वय राहिलं नाही. खेड्यात माझी बाग, बायको, मुलं शाळेत शिकताहेत. मला मॉस्कोला बोलावण्याची कल्पना कुठून सुचली तुम्हाला ? तीन वर्षांपूर्वी मी मॉस्कोला गेलो होतो. तिथल्या गोंगाटानं सकाळपासून रात्रीपर्यंत डोकं भणभणत होतं आणि केव्हा एकदा घरी परतेन असं झालं !"

आमचे स्टेशन जवळ येत होते.

"हे बघा !" माझा मित्र ठामपणे शिकाऱ्याला म्हणाला. "आम्हाला आता उतरलं पाहिजे. मी माझा मॉस्कोचा पत्ता आणि टेलीफोन नंबर तुम्हाला देतो. नक्की मॉस्कोला या. लौकरात लौकर. आवश्यक त्या माणसांशी मी तुमची भेट घडवीन."

त्याने दैनंदिनीमधील एक पान फाडले व घाईघाईने त्यावर स्वत:चा पत्ता खरडला. आगगाडी एव्हाना स्टेशनात थांबली होती.

मावळतीच्या अंधुक प्रकाशात शिकाऱ्याने माझ्या मित्राचा पत्ता वाचला व तो म्हणाला :

"तुम्ही लेखक आहात ?"

"हो."

"मी तुमची पुस्तकं वाचलीत. आपली ओळख झाल्याबद्दल मला खूप आनंद वाटला. आता मी माझी ओळख करून देतो – बल्शोय थिएट-रचा सोलो गायक, पीरोगोव. माझ्या ह्या छोटया थट्टेबद्दल कृपया अपमान वाटून घेऊ नका. ह्या थट्टेच्या समर्थनार्थ फक्त एवढंच म्हणू शकेन : जिथं माणसं एकमेकांशी एवढ्या प्रेमानं वागतात, तो देश भाग्य-वान !"

तो हसला.

"अर्थात, माझ्या बोलण्याचा संदर्भ, एका सामुदायिक शेतावरच्या हिशेबनीसाला ऑपेरा गायक बनविण्याच्या तुमच्या उत्सुकतेबद्दल आहे. आणि माझी खात्री आहे की, खरंच जर मी हिशेबनीस असतो, तर माझा आवाज तुम्ही मला वाया घालवू दिला नसता. त्याबद्दल आभार !"

त्याने आमचे हात घट्ट दाबले. आगगाडी हलली आणि गोंधळल्या मन:स्थितीत आम्ही लाकडी फलाटावर मागे राहिलो. तेव्हा कुठे आम्हाला आठवण झाली की, आमच्यापासून फार दूर नसलेल्या अका नदीवरील मोठ्या खेड्यात, स्वत:च्या जन्मगावी, गायक पीरोगोव दर उन्हाळ्यात येतात, असे द्मित्री सेर्गेयेविचने एकदा सांगितले होते.

आता ही कथा संपवली पाहिजे. स्थानिक म्हाताऱ्यांपासून "वाहवत" जाण्याची सवय मला जडलीय असे दिसतेय आणि नावाडी वासिलीप्रमाणे वाहवत गेलो. जेव्हा तो एक हकीकत सांगू लागतो, तेव्हा त्याला दुसरी हकीकत आठवते, मग तिसरी, तिसरीतून चौथी आणि त्यामुळे त्याच्या कथांना शेवटच नसतो.

माझे उद्दिष्ट अगदी माफक होते – रशियन माणसातील गुणांना व प्रेमळ मनाला उघड करून दाखविणारे काही सामान्य प्रसंग सांगायचे. अत्यंत महत्त्वपूर्ण प्रसंगांबद्दल पुन्हा केव्हातरी बोलू.

१९५०